एक हरवलं गेलेलं बालपण, सरळ स्वभावामुळे झालेला विश्वासघात, तारलं गेलेलं आयुष्य

बेस्टेड

मार्क जॉन्सन

अनुवाद
स्नेहल जोशी



मेहता पब्लिशिंग हाऊस



मार्क जॉन्सन

मार्क जॉन्सन यांचा जन्म १९७० मधे वेस्ट मिडलँडमधे झाला. अनेक प्रकारचे गुन्हे त्यांनी मोठ्या प्रमाणावर केले.
मद्य आणि मादक द्रव्यांचे व्यसन त्यांना लहानपणापासूनच जडले. २००० साली त्यांनी गुन्हेगारी, मद्य आणि मादक पदार्थांचा त्याग केला. आपल्या 'झाडांची शल्यचिकित्सा' या व्यवसायात त्यांनी पूर्वायुष्यातील गुन्हेगार आणि व्यसनग्रस्तांना नोकऱ्या देऊन त्यांचे पुनर्वसन केले. या कार्यासाठी त्यांना 'डेली मिरर प्राईड ऑफ ब्रिटन' आणि प्रिन्स ट्रस्टचा 'यंग अचिव्हर ऑफ द इयर' या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.
मार्क जॉन्सन आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गुन्हेगारी न्याय व्यवस्थेचे सल्लागार म्हणून काम करतात. गुन्हेगार तरुण आणि व्यसनग्रस्त यांचे अनेक प्रकल्पांच्या माध्यमातून पुनर्वसन करून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले.
आपले गुन्हेगारी आणि व्यसनग्रस्त विश्वातील असाधारण अनुभव ही त्यांना त्यांची आयुष्यभराची कमाई वाटते.

MARK JOHNSON

आपल्या स्नेहीजनांना पुस्तके भेट द्या

एक हरवलं गेलेलं बालपण, सरळ स्वभावामुळे झालेला
विश्वासघात, तारलं गेलेलं आयुष्य

वेस्टेड

मार्क जॉन्सन

अनुवाद
स्नेहल जोशी

मेहता पब्लिशिंग हाऊस

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the Publisher and the licence holder.

Please contact us at **Mehta Publishing House,** Pune.
Email : production@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com

- *या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

WASTED by MARK JOHNSON
Copyright © The Wise Project Ltd 2007
First published in Great Britain by Sphere in 2007
Translated in Marathi Language by Snehal Joshi

वेस्टेड / अनुवादित कादंबरी

अनुवाद : स्नेहल जोशी

मराठी अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे - ४११०३०.

अक्षरजुळणी : अनघा पाटणकर

मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी

प्रथमावृत्ती : एप्रिल २००९

P Book ISBN 9788184980196
E Book ISBN 9789353173746
E Books available on : play.google.com/store/books
www.amazon.in

हे पुस्तक जीवनात हरवलेल्या
माणसांना अर्पण. जर माणसं बदलली,
तर जग बदलेल.

अभिप्राय

जीवनात हरवलेल्या माणसांसाठी

सप्तरंग, ६ सप्टेंबर, २००९

ढासळत्या कौटुंबिक मूल्यांची कथा

देशदूत, १२ जून २००९

उपोद्घात

मी चाललोय. या जागेतून मी बाहेर पडतोय. मला या जागेचा तिटकारा येतो. येथील मोडकी तोडकी कपाटं, इथे येणारा स्वच्छ करणाऱ्या द्रवाचा वास. वळवळणाऱ्या पार्श्वभागामुळे ज्याचं कापड जीर्ण झालंय अशा वापरून वापरून जुन्या झालेल्या आरामखुर्च्या, या सर्वांचा मला वीट आलाय. यापेक्षा रस्त्यावर राहणं सहज सोपं होतं. तिथे प्रत्येक गोष्ट सोपी होती. तिथे नियम नव्हते, थेरपिस्ट नव्हते, आठवणी नव्हत्या, काही नव्हतं. होती फक्त मादक द्रव्यं. मला तेच तर हवं होतं. तिथे असताना मला त्याचीच तर कदर होती. रोजच्या जीवनातील दु:ख, वेदना संपल्या होत्या, फक्त ती जागा घेतली होती ती पुढचा डोस कुठून मिळेल, या काळजीनं.

मी दिवा लावला. या दिव्याचा उजेड मला त्रासदायक वाटतोय, कारण अजूनही माझ्या डोळ्यांच्या बाहुल्या दिव्याच्या उजेडाला तोंड द्यायला तशा समर्थ नाहीत. मला एक रिकामी थैली सापडते. मी दीर्घ नि:श्वास सोडीत ती उघडतो.

मी कुठे चाललोय आणि कसा?

बरोबर न्यायला माझ्याकडे फारसं काही नाही. फक्त थोडे कपडे, तेसुद्धा माझ्यासारख्या येथून पळून जाणाऱ्या लोकांनी टाकलेले. मी ते सावकाशपणे थैलीत भरतो. मग मी पलंगाखाली असलेला माझा आर्ट बॉक्स घेण्यासाठी वाकतो. वाकताच माझे सांधे कुरकुरतात आणि माझ्या पायांतून कळा येतात. जेव्हा तुम्ही ड्रग घेणं सोडता, तेव्हा तुमच्या शरीरातील प्रत्येक भागातून वेदना होतात. माझ्या हाडांत असलेली चरबी पार नि:सत्त्व झालीय आणि माझ्या शरीरातील अणुरेणू नाडल्यासारखा झालाय.

मी तो आर्ट बॉक्स उघडतो आणि मला सापडलेल्या वस्तूंची यादी बरोबर आहे की नाही, ते पाहतो. ते रंगकामाचे ब्रशेस्, चमच्याचा दांडा, शिवणाच्या सुया, वही, ते बिल्ले... इतरांनी टाकलेलं हे सर्व मला कचऱ्याच्या डब्यात सापडलंय आणि अगदी आताआताची ही माझी एवढीच मालमत्ता आहे.

माझं हृदय धडधडतं. भीती वाटते. मला जायची इच्छा नाही. पुनर्वसनाचा कार्यक्रम हा फार मोठा प्रवास आहे; परंतु मला राहायचीही इच्छा नाही.

"काय झालं?" एक आवाज. माझ्या खोलीत राहणारा कोलिन विचारतो. तसा खूपच उशीर झालाय. मला वाटलं होतं, की तो झोपला असावा.

"माझ्या शरीराचे तुकडे पडल्यासारखे वाटतायत." मी सांगतो, "मी इथे गेले दोन आठवडे आहे आणि आता मात्र शरीरात मादक द्रव्य जात नसल्यामुळे हे सारं सहनशक्ती पलीकडचं आहे."

तो पलंगावर उठून बसतो, जांभई देतो. "अजून खूप वेदना आहेत का?"

"त्यामुळे माझं चुतं डोकंच गरगरल्यासारखं वाटतंय."

त्याला मी काय म्हणतो ते कळतं. एक चाळीस वर्षांचा, काळा, भटका, छोटा माणूस, तोसुद्धा क्रॅक आणि हेरॉईनच्या संपूर्ण आधीन गेलेला आहे. त्याला मी काय म्हणतो ते समजतं, कारण गेली कित्येक वर्षं स्वत:ला काही वाटू नये, यासाठी मी मादक द्रव्यांचं सेवन करतोय. खऱ्या भावभावना मी गेल्या कित्येक वर्षांत अनुभवलेल्या नाहीत. आता त्या केमिकल्सचा परिणाम कमी झाल्यावर मी पुन्हा माणसांत येतोय. ज्या भावभावना मी त्या मादक द्रव्यामुळे टाळू शकलो होतो, त्या एकदम उफाळून आल्यात. भीती, अपराधीपणाची भावना, शरम, निराशा, असहायता, एकाकीपणा, दु:ख, हरवल्याची भावना, मत्सर, राग... मी फुकट घालवलेल्या आयुष्यात जे सर्व अनुभवलं असतं, ते मला आता जाणवतंय. इतकी वर्षं दुर्लक्षिलेल्या या सर्व भावनांना एखाद्या मोठ्या रेल्वे इंजिनाची ताकद आहे आणि त्या सर्व माझ्या अंगावरून धावतायत. त्या मला चुरडतायत आणि माझा चेंदामेंदा करतायत.

कोलिन माझ्याकडे बघतो. गेली कित्येक वर्षं तो या पुनर्वसनाच्या केंद्रात येतोय, जातोय आणि तो त्यांच्यासारखं बोलू शकतो. तरीही त्याचं पलटी खाऊन इथं येणं चालूच आहे.

"मला असं म्हणायचंय," मी सांगतो, "हे इथे असलेले त्यांचे चुते नियम मी पाळू शकत नाही. त्यांना माझ्याकडून हवंय तरी काय?"

"त्यांना काय हवंय, यापेक्षा तुला काय हवंय, हे महत्त्वाचं."

"मला यातून बाहेर पडायचंय. मला नवीन आयुष्य हवंय."

"ठीक आहे... एक मार्ग आहे."

"काय?"

"ते असं आहे. तुझ्या मनाच्या मागच्या बाजूला जे काही आहे, ते बाहेर पडायला हवंय. तुला प्रामाणिक व्हायला हवं. ज्या गोष्टी तू मनात दाबून ठेवल्यास, तुझी सर्व गुपितं, ते सर्व तुला सांगावं लागेल मित्रा."

मी मिनिटभर विचार करतो. त्या वेळी माझ्या मानेवरचे छोटे केस उभे राहिलेले असतात. हे असं घडतंय. याचा अर्थ असा नव्हे, की कुणीतरी माझ्या थडग्यावर चालतंय. त्याचा अर्थ असा, की एक दुसरी मज्जातंतूची शीर पुन्हा जागृत होतेय, कारण आता माझ्या सूचनाप्रणालीला मादक द्रव्याचा बांध राहिलेला नाही.

"म्हणजे तुझं असं म्हणणं आहे," मी विचारलं, "त्या तिकडे बाहेर खरंच काय होतं किंवा रस्त्यावर काय होतं, हे सर्व मला सांगायला हवं का?"

कोलिन जोरात हसला.

"तू किती अडचणीत होतास, स्वत:बद्दलचं किंवा आपलीच आपल्यालाच दया वाटायची, असलं काही सांगायचं नाही. मी सांगतोय, ते म्हणजे तुला तुझी गौप्यं सांगायला हवीत. खरीखुरी गौप्यं. लहानसहान अशा लज्जास्पद गोष्टी, ज्या तू कुणालाच सांगितलेल्या नाहीस. त्या भ्याडपणाच्या, खुनशी गोष्टी, तुझ्या मित्रांना तू चारलेलं मादक द्रव्य आणि स्वत:शीच ठेवल्यास, त्या सर्व गोष्टी."

माझी गुपितं... तो बहुधा माझी मस्करी करत असावा. अशा कित्येक गोष्टी आहेत, ज्या मी कुणालाच सांगणार नाही, कधीच सांगणार नाही.

तो सांगतो, "तुमच्या कमकुवतपणाबद्दल बोलल्यावर तुमची ताकद तुम्हाला परत मिळते."

मी जाऊन खिडकी उघडतो आणि रात्रीचा गंध घेतो. दीर्घ श्वास घेऊन मी समुद्राची खारी हवा आत ओढून घेतो.

माझ्या मागे अव्याहत येणारा कोलिनचा आवाज मी ऐकतो.

"तुला ते सर्व सांगायलाच हवं."

मी वळतो. तो अजूनही माझ्याकडे पाहत असतो.

"अशा कित्येक गोष्टी आहेत, त्यामुळे तुला उद्वेग येतोय. तुमची गुपितं तुमच्या आत्म्याला कलुषित करतात. यालाच स्वत:ची 'गुप्त बाजू' असं मानतात. तुझं सामान आवरण्याआधी याबद्दल विचार कर मित्रा."

मी मग रात्रभर जागा असतो. माझं शरीर वेदनांमुळे तळमळत असतं. माझ्या पायांचे पंखे, ज्यांनी आवाज करायला हवा, गरगरायला हवं, हलायला हवं, त्यातील प्रत्येक नस दुखत असते. मला जायचंय; पण मला जायलाच कुठे जागा नाही. मला मादक द्रव्यं घ्यायची नाहीयेत; पण त्यांच्याशिवाय मी जगूच शकत नाही. सकाळ होते. मी अजूनही इथेच आहे...

मी जेव्हा ग्रुप थेरपीसाठी जातो, तेव्हा पार गर्भगळीत झालेला असतो. मी खुर्चीत दबकून बसून असतो आणि मी आज पहिल्यांदा बोलणार आहे, हे प्रत्येक जण सांगू शकतो. तिथे वातावरणात एक अपेक्षा असते, कदाचित उत्सुकताही.

"ओ," ॲलन म्हणाला. तो खुष दिसत होता. "अशी काही विशिष्ट घटना आहे का मार्क, की जी तुला आम्हाला सांगायला आवडेल? "

"हो," मी म्हणतो. मी तोंड उघडतो आणि स्वत:च्या तोंडून शब्द बाहेर पडण्याची वाट बघतो. मिनिटभर तोंडातून शब्दच येत नाहीत आणि मग मी सुरू करतो...

■

१

मला रविवार नकोसे वाटतात. या दिवशी डॅडी गुत्त्यात जातात आणि ममा चर्चला जाते. तिला आडकाठी करायला डॅडी घरात नसले, तर ती आम्हालाही घेऊन जाते. आज ते इथे नाहीत. घरात पसरलेली ती विशिष्ट शांतता आणि ममाचं मुकाटपणे स्वयंपाकघरात असणं, यावरून काल रात्री डॅडी घरी परतलेले नसावेत.

ममा त्या सभेसाठी तयार होते, त्याचप्रमाणे आमची मोठी बहीण केलीही. ती नेहमी तिला, जे सांगितलं जातं ते करते आणि आम्हालाही ते करायला सांगते. डॅडी परत येतील म्हणून शेन आणि मी मोठ्या आशेनं रेनॉल्ड रस्त्याकडे पाहत असतो. जरी ते दारू प्यायलेले असले, तरी आमची चर्चची फेरी वाचवण्यासाठी डॅडी आम्हाला परत यायला हवे आहेत. मी त्या रस्त्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत त्या लाल घरांच्या दुहेरी रांगेतून खाली-वर पाहतो; पण डॅडी कुठेच दिसत नाहीत, दुसरं कोणीच दिसत नाही. तिथे असते ती रविवार सकाळची शांतता.

आम्ही त्या सभेसाठी सावकाश कपडे करतो. डॅडी अजूनही आलेले नाहीत, मग आम्ही चालू लागतो. शेन आणि मी, ममा आणि केलीच्या मागे असतो. आम्ही रेनॉल्ड रस्त्यावरून खाली जातो. सफरचंदांची झाडं मागे टाकतो. उन्हाळ्यात त्यांच्या फांद्या पानांनी भरलेल्या असतात आणि त्यांची साल खवल्या खवल्यांची असते. जेव्हा मी धडपडून सफरचंदासाठी वर चढायचो, तेव्हा ते झाड माझ्याभोवती हिरवं ब्लँकेट घातल्यागत मला गुंडाळून घ्यायचं. आता त्या फांद्या उघड्याबोडक्या आहेत आणि पानं गळत आहेत.

ममा माझा हात धरते आणि मला किंग्डम हॉलमध्ये खेचून नेते. किंग्डम हॉल ही पुढच्या बाजूला व्यासपीठ असलेली मोठी खोली आहे. त्या खोलीला सिगरेटचा नव्हे, तर साबणाचा वास येत असतो. आम्ही हिरव्या खुर्च्यांवर बसतो. एक म्हातारा त्या व्यासपीठावर उभा राहून तासभर बोलबोल बोलतो. जेव्हा तिथे

गाण्याची सुरुवात होते, तेव्हा मला बरं वाटतं; परंतु त्या गाण्याला ताल नाही की स्वर नाही. मग पुन्हा आणखी बोलणं चालू होतं. मला गप्प राहणं जमत नाही. मी शेनजवळ कुजबुजतो, वळवळतो. मी माझ्या बुटांच्या लेसेस बांधण्याचा सराव करू लागतो. मी त्या चुकीच्या पद्धतीनं बांधतोय, असं शेनचं म्हणणं असतं. मी त्याला थप्पड देतो. लोक मागे वळून रागानं पाहतात. मग ममा चिडते. तिला आमच्यावर ओरडावंसं वाटतं; पण ते चर्च असल्यामुळे ती काही करू शकत नाही, म्हणून मग ती माझं मनगट पकडते आणि मला त्या खोलीच्या बाजूला असलेल्या प्रसाधनगृहाकडे घेऊन जाते. तिच्या जांभळ्या कोटाला असलेली लोकर माझ्या तोंडाला गुदगुल्या करते. ती मग मला त्या छोट्या खोलीत ओढते आणि माझ्या थोबाडीत ठेवून देते.

"नको, नको. ममा प्लीज नको." मी किंचाळतो.

"श् ऽ ऽ" ती माझ्या पाठीवर थपडा देत फुत्कारते. तिच्या चेहऱ्यावर केसांच्या कुरळ्या बटा उडत असतात. जेव्हा ती मला मारते, तेव्हा मला तिनं चोपडलेल्या अत्तराचा वास येतो. तो माझ्या घशाला खवखवतो. तिच्या गालावर असलेला गुबगुबीतपणा अचानक तिथून नाहीसा होतो आणि चेहरा रागामुळे कठोर होतो.

"ममऽऽऽऽ" परंतु ममा माझ्या तोंडावर एक हात धरते आणि दुसऱ्या हातानं मला थपडवत असते. थाड थुड थूड – मी तिनं धरलेल्या तोंडावरच्या हाताच्या फटीतून तक्रारवजा स्वर काढतच असतो.

जेव्हा ती दरवाजा उघडते, तेव्हा बाहेरच्या खोलीत शांतता असते. प्रत्येक डोकं हे प्रार्थनेसाठी वाकलेलं असतं; परंतु काही लोक प्रार्थना करत नसतात. मला हे माहीत होतं, कारण ते माझ्याकडे टक लावून पाहण्यासाठी वळतात. मी रडत असतो; पण ममानं रागानं पाहिल्यावर मी आवाज न करता रडतो.

"आम्ही प्रार्थना करण्याचा प्रयत्न करत होतो," जेव्हा मागाहून आम्ही ओळीनं बाहेर पडतो, तेव्हा केली मला सांगते. "पण आम्हाला ऐकू येत होत्या त्या न मारण्यासाठी तू ममाला केलेल्या विनवण्या."

चर्चमधून बाहेर पडल्यावर आम्हाला आनंद होतो. ते सभागृह हे ममाचं जग आहे, आमचं नव्हे. जेव्हा आम्ही ममाला त्या मोठ्या प्रेषिताच्या, जिहोवाच्या सभेला आणि बैठकीला जाऊन खुष करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हाही आम्हाला माहीत असतं, की या चौकटीत आम्ही बसत नाही, आम्ही त्यांच्यापैकी एक नाही. आमच्या आत्म्याला वाचवलं गेलेलं नाही. आम्ही त्यांच्यापेक्षा कमी आहोत, कारण त्यांना शाश्वत अशा आयुष्याचं आश्वासन दिलेलं आहे आणि आम्हाला नाही, हे तेही जाणून आहेत.

जेव्हा ममा आम्हाला जिहोवाबद्दल सांगते, तेव्हा डॅडी नेहमीच हसतात. ते या

अशा सभांना जायला आम्हाला परवानगी देत नाहीत. इतकंच नव्हे, तर चर्चच्या दरवाजातून लॉरी घुसवण्याची ते धमकीही देतात.

"जिहोवा तुमच्यावर लक्ष ठेवून आहे. तुम्ही जे काही करता, ते तो पाहतो आणि त्यावरून तो तुमचा निवाडा करतो." हे सांगताना ममाच्या आवाजात काहीसा ताकीद दिल्याचा सूर असतो.

हे ऐकल्यावर डॅडी मग हसत सुटतात, त्यामुळे आम्हाला बरं वाटतं, कारण डॅडी सहसा हसत नाहीत. आमची नॅन आणि इतर मावश्या आणि काका जे रेनॉल्ड्स या रस्त्यावर राहतात, तेही बहुतेक जिहोवाबद्दल सांगितलं, की हसतात आणि त्यांना त्याची भीती वाटत नाही. ममा जेव्हा जिहोवाबद्दल बोलू लागते, तेव्हा ते तिला गप्प बसायला सांगतात.

चर्चमधून बाहेर पडल्यावर जसं आम्ही घराजवळ यायला लागतो, तसं आम्हाला काय बघायला मिळेल, या विचारानं बावरलेले असतो. दारू प्यायल्यावर दिसणारं ते गोड रविवारचं हसू तोंडावर ठेवून डॅडी तिथे सोफ्यावर बसलेले असतील का? ममा त्यांच्यावर ओरडू लागेल का? जेव्हा ममा दरवाजा उघडते, तेव्हा आम्ही घाबरून वाट बघत असतो. आम्ही हळूच घरात शिरतो आणि एखाद्या डिटेक्टिव्ह टीमसारखे, न बोलता, आवाज न करता आम्ही भरभर घरभर शोध घेतो. डॅडी कुठेच नसतात. ममाचा चेहरा भयंकर उग्र वाटतो. ती स्वयंपाकघरात जाते आणि भांड्यांचा खडखडाट सुरू होतो.

नॅन तिच्या सर्वांत लहान दोन मुलांना – जॉर्ज आणि फिल यांना घेऊन रविवारच्या जेवणासाठी येते. ते आमचे मामा आहेत; पण ते आमच्याहून वयानं मोठे नाहीत, त्यामुळे ते आमच्या मामेभावंडांसारखेच वाटतात. जेव्हा बायका मांस भाजत असतात, तेव्हा नॅन ममाजवळ बोलत असते. त्या हळू आवाजात बोलत असतात. मी ऐकत नाही, मला ऐकायचंही नसतं; परंतु डॅडींबद्दल बोलताना येणारा तो विशिष्ट रागाचा स्वर मी ओळखतो. आजूबाजूच्या लोकांसारखा त्यांचा स्वर नाही, कारण त्या टायनेवरच्या न्यूकॅसलवरून आलेल्या आहेत आणि त्यांची उच्चारपद्धतीही तशी वर-खाली होणाऱ्या सुरात आहे. या किड्डरमिन्स्टरमध्ये इथले लोक जेव्हा बोलतात, तेव्हा ते स्वर खाली-वर असे वाटत नाहीत. ते काहीसे पिरपिरत बोलतात. माझे दोन्ही बाजूकडचे नातेवाईक हे न्यूकॅसलवरून आलेले असल्यामुळे मी गेल्या वर्षी प्राथमिक शाळेत जाईपर्यंत जॉर्डी पद्धतीनं उच्चार करायचो.

आता मात्र मी एखाद्या ब्रुमीसारखा बोलतो. डॅडी बहुधा काल रात्री त्या बाईच्या घरी झोपलेले असावेत, असं त्या बोलताना मी ऐकतो. तिचा उल्लेख 'ती बाई' असाच होतो. गेल्या आठवड्यात मी आणि शेननं पाहिलेल्या, डॅडींबरोबर कारमध्ये

असलेल्या त्या बाईविषयी त्या बहुतेककरून बोलत असाव्यात. आम्हाला पाहताच डॅडींनीं कारचा वेग वाढविला होता; परंतु ती कोटाच्या हँगरसारखी लुकडी आहे, हे पाहण्यापुरता वेळ आम्हाला मिळाला होता. तिचे केस लांब आणि काळे होते आणि ती हसत होती. आम्ही ममाला हे सांगितलं तेव्हापासून ती रागावलेलीच आहे.

नॅन ही तशी छोटीच, पण कणखर आहे. तिच्या तोंडाच्या कोपऱ्यात सिगरेट असते. ती सिगरेट कशी ओढते, की सकाळी सकाळी ती तिथे ती चिकटवून ठेवते, हे मला माहीत नाही. माझं नॅनवर फार प्रेम आहे. ती तशी खंबीर आहे. आमच्या कुटुंबाची ती प्रमुख आहे आणि आताच्या या घडीलाही आमची कुटुंबप्रमुख डॅडींवर चिडलेली आहे.

ममानं डॅडींचं ताट टेबलवर वाढून ठेवलंय. केली पुढच्या दरवाजाकडे वारंवार पाहत आहे. स्टेशन आर्म्सकडे डॅडींना बघायला जायची तयारी शेन दाखवतो; परंतु ममा त्याला नकार देते. आता तिचा राग अगदी वाढलाच आहे. नॅन त्या भाजलेल्या मांसाचे निर्दयपणे तुकडे करते. ममा चूपचाप पानांतून भाजी वाढते. डॅडींच्या ताटात अन्न वाढलेलं आहे. आम्ही जेवत असताना वाट पाहत आहोत. वातावरणात एक अपेक्षेचा गंध आहे. त्या मांसाला रागाची चव आहे. जेव्हा डॅडींचं जेवण थंड होतं, तेव्हा गरम करण्यासाठी ममा ते ओव्हनमध्ये ठेवते.

जेव्हा जेवण संपतं, तेव्हा मी बाहेर जातो. मला दुसरीकडे कुठं जावं असं वाटत असतं, मग मी इतर मुलांना गाठतो आणि आम्ही त्या रस्त्याच्या खालच्या बाजूला असलेल्या मुलीच्या घरी जातो. इथे सर्व व्यवस्थित आहे. मला ते आवडतं. बैठकीची खोली नीट आवरलेली आहे. तिची ममा स्वयंपाकघरात आहे आणि तिचे डॅडी बागेत आहेत आणि तिथे सर्व शांतता आहे. आमचं घरही नीटनेटकं आवरलेलं आहे; पण तरीही तिथे कोणत्याही क्षणी स्फोट होईल आणि तेथील सर्व रेकॉर्ड्स, बश्या, खुर्च्या, कपडे हे सबंध रेनॉल्ड रस्त्यावर आणि कदाचित सर्व वेस्ट मिडलँड्सवर फेकले जातील असं वाटतं. या मुलीच्या घरी रविवारी दुपारी असलेला शांतपणा मला आवडतो.

मग तिची मोठी बहीण तिथे धापा टाकीत येते. "तुम्ही बाहेर जाऊ नका." ती सांगते. "रस्त्यावर एक मोठी मारामारी झालीय आणि तुम्ही ती बघू नये."

रस्त्यावर मारामारी.

"कुठे? " मी विचारतो. ती उत्तर देत नाही. तिनं उत्तर द्यावं, अशी जरुरीही नाही. ती मारामारी कुठे चालली असावी, ते मी आधीच जाणतो.

"तिथे रक्त सांडलंय." ती सांगते, "बरंच रक्त."

मी तडक दरवाजातून बाहेर पडतो आणि जी मारामारी मी पाहू नये, तिथे धावत

सुटतो. त्या रस्त्याच्या शेवटाकडून मला आरडाओरड ऐकू येते. अंगावर कोट घातलेली माणसं आमच्या घराच्या बाहेर दाटीवाटीनं उभी असतात.

शेजारी आणि मामा, मावश्या आणि माझा मोठा भाऊ आणि बहीण ही सर्व त्या रस्त्यावरील घराघरांतून गुपचूप बाहेर पडून रस्त्यावर येत असतात. जेव्हा आम्ही त्या बघ्यांपाशी पोहोचतो, तो तान्या मावशी शेन केली, आणि मला तडक घरात घेते. मला तेवढ्यात ममाचा खवळलेला चेहरा दिसतो. ती डॅडींवर त्यांच्याभोवती फिरून ओरडत असते. ते तिथे उभे असतात. तिच्याहून खूप दांडगे वाटतात; पण ते हलत नाहीत. त्यांनी काऊबॉय बूट, निळी जीन्स आणि निळा काऊबॉय शर्ट घातलेला असतो. त्यांच्या मिश्याही काऊबॉयसारख्या आहेत. त्यांचे केस काळे, दाट आणि कुरळे आहेत. डॅडी एखाद्या खऱ्या काऊबॉयसारखे ताठ आणि मजबूतपणे उभे असतात. आज त्यांच्या शर्टवर सर्वत्र डाग आहेत आणि तेसुद्धा रक्त आणि मांसाच्या रसाचे आणि त्यांच्या पायांजवळ आहेत बटाटे आणि भाजलेलं मांस. ममा जेव्हा त्यांच्याभोवती फिरते, तेव्हा बश्यांच्या तुकडे आवाज करत तिच्या पायांखाली चुरडले जात आहेत आणि हा आवाज तिच्या आरडाओरडीपेक्षा जास्त भयानक वाटतो. घरात आतमध्ये काहीच फरक पडलेला नाही. एखाद्या भेटायला आलेल्या व्यक्तीनं जर रस्त्यावरचं रक्त आणि अन्न पाहिलं नसतं, तर आम्ही अगदी सामान्यपणे जगतोय असंच त्याला वाटलं असतं. आम्ही सरळ डॅडी, ममाच्या खोलीत जातो आणि खिडकीजवळ एकमेकांना घट्ट धरून उभे राहतो आणि खाली उभे असलेल्या प्रत्येकाला पाहतो. केलीच्या हाताचा घट्ट विळखा माझ्याभोवती आहे म्हणून मला बरं वाटतं.

खालच्या बाजूला आमच्या ममाचा चेहरा विचित्र आणि वेडावाकडा झालेला दिसतो. ती रडतेय आणि त्याच वेळी तिच्या अंगातून रक्त वाहतंय. ती तशी गुबगुबीत आहे. कोटहँगरसारख्या दिसणाऱ्या कारमध्ये असलेल्या त्या लुकड्या बाईच्या ती बरोबर विरुद्ध आहे.

डॅडी धोकादायक वाटतात. त्यांच्या मुठी त्या कडाडणाऱ्या विजेवर पडण्यासाठी तयार आहेत आणि येथून आम्हाला दिसतं, की तिथे या मारामारीत एक तिसरी व्यक्ती आहे. माझी छोटी, कणखर नॅन. तिचा लुकडा देह रस्त्यावर पडलेला आहे. तिच्या अंगावरही रक्त आहे; पण ती आता उठते आणि माझ्या डॅडींवर किंचाळते. ती त्यांना मारणार असं दिसतं. डॅडी आपल्या मुठी तयार ठेवतात. काही शेजारी उड्या मारून पुढे होतात आणि तिला मागे खेचतात.

मग आमचा अगदी बाजूचा शेजारी डॅडींशी बोलतो आणि सरतेशेवटी तो त्यांना बाजूला घेऊन जातो. डॅडी तसे झुलतच असतात. ते शेजाऱ्याच्या कारमध्ये बसतात आणि निघून जातात. बहुधा ते गुत्त्यात गेले असावेत.

रात्री मी जागा होतो. वरच्या खिडकीतून दिसणारं आकाश काळं आहे. मला एकटं एकटं वाटतं. शेनचा श्वासोच्छ्वास मला धड ऐकू येत नाही. मला उठावंसं वाटतं, या घरातून बाहेर पडावंसं वाटतं. चालत जाऊन दुसऱ्या एखाद्या कुटुंबाबरोबर राहावं, असं वाटतं. मी उठून बसण्याचा प्रयत्न करतो, पण ते शक्य होत नाही. माझ्याभोवती दोऱ्या बांधलेल्या आहेत. त्या इतक्या घट्ट आहेत, की मला श्वासोच्छ्वास करणं अवघड होतं. मी स्वत:ला सांगतो, की हे दोर काल्पनिक आहेत. मी ते ओढून काढण्याचा प्रयत्न करतो; पण ते फार घट्ट आहेत. एखाद्या सुपरमॅनची शक्ती आल्यागत मी धडपडतो, लढतो. मी माझं शरीर वर ओढतो. जेव्हा रात्रीच्या थंड हवेचा मारा माझ्यावर बसतो, तेव्हा मी घामेजलेला असतो.

मी रांगत खोलीच्या दुसऱ्या बाजूला जातो आणि अगदी आवाज न करता खाली दोन जिन्यांच्या मधल्या सपाट जागेत जातो. झोपायच्या खोलीचे दरवाजे उघडे असतात, पण कोणीही हालचाल करत नाही, की कोणी श्वासोच्छ्वास करत नाही. कदाचित, त्या सर्वांना दोरानं बांधलेलं असावं.

मी खालच्या जिन्यावरून थंड आणि स्तब्ध असलेल्या जेवणाच्या खोलीत जातो. मला त्या खिडकीतून बाहेर काहीतरी दिसतं. मी थांबतो आणि त्या काळ्यामिट्ट बागेकडे पाहतो. तेथील भिंतीवर एक आकृती बसलेली आहे. मी टक लावून पाहतो. ती आकृतीही माझ्याकडे टक लावून पाहते. ती आकृती छोटी आणि पांढरी आहे आणि ती कोण आहे, हे मला माहीत आहे. तो जॅक फ्रॉस्ट आहे. त्याचा आकार विचित्र, पेंग्विनसारखा आहे आणि तो निस्तेज आणि गुबगुबीत आहे. कदाचित, तो बर्फाच्या स्फटिकांचा बनलेला आहे. तिथे छोटी चंद्राची कोर आहे आणि तो त्या चंद्रप्रकाशात चमकत आहे. तो सुंदर आहे. आमच्या बागेच्या भिंतीवर चमचम करत तो बसून आहे. कुत्र्याच्या घरात झोपलेल्या आमच्या कुत्रीनं त्याला पाहिलेलं नाही. जॅक माझ्याकडे पाहत भिंतीवर बसतो आणि मी जेवणाच्या खोलीत त्याच्याकडे पाहत उभा आहे. जॅकला माहीत आहे, की मी मार्क जॉन्सन आहे आणि मला माहीत आहे, की तो जॅक फ्रॉस्ट आहे. तो तिथे आमच्या बगिच्यात चमचम करत बसून आहे आणि म्हणून मला बरं वाटतं.

मी वळतो आणि पुन्हा ते दोर मला जिन्यावरून वर ओढतात. मी पलंगावर पडतो आणि ते दोर आता सैल वाटतात आणि तेवढे जडही वाटत नाहीत. माझे पाय त्या जॅकसारखे थंड झालेले आहेत आणि माझा सर्व देह थंडीनं गारठलेला आहे; पण आता जॅक बाहेर आहे, या जाणिवेमुळे मी पटकन झोपी जातो.

दुसऱ्या दिवशी डॅडी गुपचूप आहेत. ते मवाळपणे वागतात, त्यामुळे आम्हालाच विचित्र वाटतं. त्यांनी ममाला आणि नॅनला बुक्के मारले, तरी आम्ही त्यांना पटकन क्षमा करतो. ते आमचे डॅडी आहेत आणि आमचं त्यांच्यावर प्रेम आहे आणि काही

झालं, तरी ममानं त्यांचं जेवण त्यांच्या अंगावर फेकल्यावर तिनं दुसरी काय अपेक्षा करावी? पण आम्ही त्यांच्या अवतीभोवती विशेष खबरदारीनं वागतो.

काही दिवसांनंतर ते बाहेरगावी जातात. डॅडी नेहमीच कुठेतरी जात असतात. ते ज्या तऱ्हेनं येतात-जातात त्यामुळे ते काहीसे जादूचे वाटतात. ते फार महत्त्वाची व्यक्ती आहेत. स्टीलचे तुकडे एकत्र जोडणारी माझ्या डॅडींसारखी माणसं नसतील, तर पॉवर स्टेशनच असणार नाहीत. या कारणामुळे तर आमचं सर्व कुटुंब वेस्ट मिडलँडला आलं. कारण, डॅडी, ममा, नॅन, सर्व काका, मावश्या हे सर्वच एक मोठं पॉवर स्टेशन उभं करण्यासाठी मदत करणार होते, त्यामुळे लोकांना दिव्यांसाठी वीज मिळणार होती. आता माझे डॅडी सर्व ब्रिटनभर काम करतात आणि कधीमधी युरोपमध्ये पॉवर स्टेशन बांधण्याच्या कामावर जातात. ते उन्हाळ्यात रापेपर्यंत काम करतात आणि हिवाळ्यात त्यांच्या मिश्यांमुळे त्यांना ऊब मिळते. ते अगदी देखणे आहेत. इतरांच्या वडिलांप्रमाणे जुन्या वळणाचे आणि जाडे वाटत नाहीत. त्यांचे ते काऊबॉयचे कपडे आणि मानेपर्यंत असलेल्या केसांमुळे ते १९७६चे तरुण आहेत, असं वाटतं. ते मोठे मजबूत आणि खडकासारखे घट्ट आहेत. माझे हिरो आहेत ते आणि माझं त्यांच्यावर प्रेम आहे.

■

२

डॅडी बराच काळ बाहेर राहतात आणि मग काही आठवड्यांसाठी घरी परत येतात. आमच्या आयुष्याचा हा असा क्रम आहे. ते परत कधी येणार, हे मला नेहमी कळतं, कारण अशा वेळी ममा घर अगदी जास्तच स्वच्छ ठेवते. मग घराला पॉलिशचा वास येतो. प्रत्येक गोष्ट अगदी जागेवर असते आणि घरात प्रतीक्षेचं एक आगळंच वातावरण असतं. या वेळी मीही जरा जास्तच वाट बघतोय, कारण ते आल्यावर ती जास्तच अडचणीत येणार आहे. ममाला काही बिल्ले आणि स्टीकर्स माझ्या खोलीत सापडले आणि तिला वाटतं, की मी ते चोरले असावेत.

"मी चोरलेले नाहीत."

"मग तुला ते कुठे मिळाले?"

"मी ते विकत घेतले."

"त्यासाठी तू पैसे कुठून आणलेस?"

"मी टोनीबरोबर होतो आणि त्यानं ते मला दिले."

"आणि त्यावर किमतीची लेबल ठेवून?"

"हो."

मला त्या आरोपांमुळे संतापच आला होता. ती माझ्यावर कधीच विश्वास ठेवत नाही आणि डॅडी परत आल्याबरोबर ती ते त्यांना सांगणार आहे.

ज्या दिवशी डॅडी यायचे असतात, त्या दिवशी शाळा सुटल्यावर मी माझ्या मोठ्या भावाबरोबर सरळ घरी जात नाही. मी रस्त्यात हळूहळू फिरत असतो. थोड्या वेळानं मुलं त्यांच्या घरातून बाहेर पडतात आणि मग आमची सर्वच टोळी जमते. आमच्या टोळ्या बनत असतात आणि मोडत असतात. मुलं भांडतात किंवा बदलतात किंवा ती मोठी होतात आणि दुसऱ्या टोळीला जाऊन मिळतात. मी सबंध वेळ रस्त्यावरच असतो, त्यामुळे मी कोणत्याही एका टोळीत न राहता एका टोळीतून दुसऱ्या टोळीत भरकटत असतो.

आज कुणालातरी जमिनीतून खणून काढलेला पावाचा जुना ट्रे मिळालाय. आम्ही खाली स्टेशनहिलला पादचारी खिंडीतून मोठा वळसा घालून जातो. त्या पायऱ्या चकचकीत सिरॅमिकच्या आहेत आणि पावसात त्या निसरड्या होतात. आम्ही आळीपाळीनं एकमेकाला त्या ट्रेमध्ये घालून खाली ढकलतो. हे बर्फावरून घसरणाऱ्या गाडीसारखं आहे. फक्त इथे बर्फ नाही आणि यात धक्केही बसतात. आमचं खेळणं संपल्यावर आम्ही तो ट्रे कालव्यात फेकतो. आता अंधार पडू लागलाय आणि प्रत्येक जण घराकडे पळतोय. अशा वेळी मी दुकानांत असलेल्या ट्रॉलीज त्या कालव्यात फेकण्यासाठी शोधतोय. मला घरी जायचं नाहीये. मी कधीही जाणार नाही.

मला काही मोठी मुलं रेनॉल्ड स्ट्रीटवर भेटतात. मग मी काही काळ तिथे घुटमळतो. काही वेळानं तेही त्यांच्या घरी जातात. मी त्या छोट्या बागा, कवाड्या आणि बंद दरवाजे इथे एकटा असतो. मी रस्त्यावरून खालच्या बाजूला पाहतो. दिवे जळत आहेत. काही पडदे सोडलेले आहेत. लोक त्यांच्या गॅसच्या विस्तवाशी टीव्ही पाहत, कुत्र्यांना ब्रश करत, चहा पीत बसले आहेत. मी ८९, रेनॉल्ड स्ट्रीटकडे वळतो. ढकलून फाटक उघडतो. त्या फाटकाच्या थंड धातूचा बोटांना होणारा स्पर्श मला परिचित आहे. त्या फाटकाचा होणारा आवाज मी रोज ऐकतो. सावकाश पुढच्या दरवाजाकडे चालत जातो. मी मध्येच काही दगड इकडेतिकडे उडवतो. शेवटी अगदी नाइलाजानं मी ती पितळेची कडी ठोकतो.

ममा पुढे येते. तिचे केस व्यवस्थित विंचरलेले आहेत. मला ते जाणवतं, कारण तिच्या लांब बटा अगदी व्यवस्थित बसवलेल्या आहेत आणि तिनं जीन्सवर नवीन लांब स्वेटर घातलेला आहे.

"तू होतास कुठे?" ती मला विचारते.

"टोनीकडे गेलो होतो."

"तुझा अवतार बघ कसा झालाय तो!"

माझ्या ममाचे केस, तिची बोलण्याची तऱ्हा आणि तिच्यामागे घरात असलेली संपूर्ण शांतता, याचा अर्थ एकच, डॅडी घरी आलेले आहेत.

मी घरात शिरतो. ते इतकं स्वच्छ असतं, की ते निर्जंतुक केल्यासारखं वाटतं. इतकंच नव्हे, तर येथील हवाही निर्जंतुक वाटते. ती बैठकीची खोली नसून ऑपरेशन थिएटर वाटतं आणि मी चिरफाड होण्याच्या बेतात असतो. नव्या तऱ्हेच्या तपकिरी भिंती, तपकिरी सोफा, तपकिरी गालिचा आणि तपकिरी शेल्फ, ज्यात माझ्या डॅडींची पुस्तकं ओळीनं लावलेली आहेत आणि त्या आरामखुर्चीवर; पण आराम करत नसलेले माझे डॅडी आहेत.

या पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा मला डॅडींची जास्त भीती वाटते.

ते आपल्या नेहमीच्या काऊबॉयच्या ड्रेसमध्ये आहेत. निळी जीन्स, निळा शर्ट आणि बूट. त्यांचं लक्ष न जाता हळूच जिन्यानं पळून वर जाता आलं असतं, तर मला बरं वाटलं असतं; परंतु माझ्याकडे तोंड करून ते बसलेले आहेत. त्यांच्या त्या काऊबॉयच्या मिश्यांखाली कुठे स्मित दिसतंय का, हे मी पाहतो; पण तिथे हसूच नाही.

"ठीक आहे ना डॅडी?" मी म्हणतो आणि जिन्याकडे वळतो.

"इथे थांब, मला तुझ्याशी बोलायचं आहे."

केली आणि शेन कुठे आहेत? गॅसच्या लाल विस्तवाशी शेकत बसून ती दोघं नेहमीप्रमाणे टीव्ही का पाहत नाहीयेत? काहीतरी गफला होणार, हे त्यांना बहुतेक माहीत असावं आणि म्हणून ते आपल्या खोलीकडे पळाले असावेत. जेव्हा डॅडी चिडतात, तेव्हा ते कुणावरही राग काढतात– फक्त केली याला अपवाद.

माझी ममा अवतीभवती फिरतेय. तिच्या हातात खरोखर पिसांचा झाडू आणि तिनं कमरेला झालर असलेलं ॲप्रन बांधलेलं नाही; पण ते असंच काहीसं वाटतं. जणू काही ज्युलिया अँड्रुस आमच्यासाठी गाणं म्हणण्यासाठी हळूच घरात शिरलीय आणि डॅडी कुटुंबप्रमुखाची भूमिका बजावतायत. जेव्हा डॅडी असे बरेच दिवसांनी घरी परत येतात, तेव्हा ती दोघं अशीच वागतात.

"मी बाहेर गेलो होतो, याचा अर्थ असा नव्हे, की इथे काय घडतंय, ते मला कळत नाही. मला कळतं. मी इथे नसताना काय घडतं, ते मला कळतं." त्यांचा स्वर संयमित असा आहे. जरा जास्तच संयमित आहे. आम्हा सगळ्यांमध्ये जास्त अशी त्यांची न्यूकॅसलकडची उच्चारपद्धती आहे. इथल्या काही लोकांना त्यामुळे त्यांचं बोलणं काही समजत नाही; परंतु मला ते कळतं. मला त्यांच्या आवाजातील जरबही जाणवते. याचं कारण म्हणजे ते लोखंडी पराती बांधतात. जेव्हा ते घरी परत येतात, तेव्हा त्यांच्या आवाजात त्या लोखंडांच्या मोठ्या सळ्यांची कठोरता असते.

"मी काहीही केलेलं नाही." मी त्यांना सांगतो.

"तू केलंयस. तू पुन्हा एकदा ते केलंयस. चोरी आणि तीसुद्धा तान्या मावशीच्या घरी जाऊन."

हे त्या बिल्ले आणि स्टीकर्सबद्दल नाही. हा दुसराच वेगळा गुन्हा आहे.

"मी केलेलं नाही. तो दुसरा कुणी असेल. तान्या मावशीच्या घरी माणसांची गर्दीच होती!"

डॅडी मला मध्येच थांबवतात आणि मी ताबडतोब थांबतो आणि त्यांचा स्वर अगदी खाली येतो. जणू काही ते स्वत:शीच बोलत आहेत; परंतु नाही, ते माझ्याशीच बोलतायत.

"हे असं पोर माझ्या वाटणीला कसं काय आलं, हे आधी मला कळायला हवं.

हे पोर मला शोभत नाही. त्याची बोटं मी कापून काढली पाहिजेत, कारण उष्ण प्रदेशात ते हेच करतात. मी तर तो सबंध हातच छाटायला हवा. मला या सर्वांचा अगदी वीट आलाय....''

ते आरडाओरड करत नाहीत. त्यांचा आवाज हळूहळू येऊ लागल्यावर ते आणखीच भीतिदायक होतात. मी ते केलं नाही, असं सांगण्याचा प्रयत्न करतो; परंतु माझी ही निदर्शनं त्यांच्या रागापुढे दडपली जातात. अचानक ते उडी मारून उठतात आणि मला झोपायच्या खोलीत खेचत नेतात. जिन्यावर माझे घोटे आपटत असतात. ते मला पलंगावर फेकतात आणि माझा देह चेंडूसारखा उडतो. ते कपड्यांच्या कपाटाकडे जातात, जीन्स बाहेर काढतात आणि जीन्सला अडकवलेला तो काऊबॉय पट्टा बाहेर काढतात. माझ्या कमरेखाली जेव्हा तो पट्टा बसतो, तेव्हा मी मनाचा निर्धार करतो. माझ्या सर्व शरीरातून वेदना जाणवतात. माझ्या पाठीच्या कण्यातून त्या नदीसारख्या धावतात. त्या वेदना लाल असतात. माझा सर्व देह त्यामुळे तापल्यासारखा वाटतो. ते मला पुन्हा मारतात आणि या वेळी ते दुखतं, पण ते दुखतही नाही, कारण आता माझा काही भाग दुसरीकडे असतो. त्या छतावर उंच किंवा एखाद्या मोठ्या हिरव्या झाडावर आणि तो माझा भाग डॅडी मला मारताना पाहत असतो. मी यातून अलग झालोय आणि मला तापल्यासारखं वाटत नाही. मी शांत आहे, थंड आहे. त्या जॅक फ्रॉस्टसारखा आहे.

खाली पलंगावर एक मूल रडतंय आणि एक मोठा माणूस तिथे ओणवून उभा आहे.

''आधी तू तुझी ती बडबड थांबव.'' तो माणूस फुत्कारतो. ''तू एखाद्या मूर्खासारखा वाटतोस.''

ते मूल रडायचं थांबत नाही.

''आता ऊठ आणि त्या जिन्यावरून चालता हो.'' तो निळा मोठा माणूस फुत्कारतो आणि खोलीतून बाहेर पडतो.

माझ्या मोठ्या भावाबरोबर राहत असलेल्या खोलीत मी सूं सूं करत जातो. त्यानं ते सर्व ऐकलेलं असतं. तो काही बोलत नाही; पण सर्व समजतो. जेव्हा डॅडी आम्हाला मारतात, आमची शरीरं काही काळ दुखावतातच; परंतु आतमध्ये बराच काळ काहीतरी ठुसठुसत असतं आणि ते म्हणजे त्यांचं आमच्यावर प्रेम नाही, ही जाणीव.

ती शुक्रवारची रात्र आहे आणि ती पुरुषवर्गाची रात्र आहे, असं डॅडींचं मत आहे. शनिवारची रात्र ही कुटुंबासाठीची रात्र; परंतु शुक्रवारची रात्र ही पुरुषांचीच. डॅडी रेनॉल्ड स्ट्रीटवरील स्टेशन आर्म्स या गुत्त्यात जातील. त्या रस्त्यावरचे सर्वच पुरुष तिथे असतील. ते गटागटानं चालत जातात आणि जसे ते घरातून बाहेर

पडतात, तसा तो गट बघता बघता मोठा होतो.

पुढचा दरवाजा बंद झाल्याचं ऐकू येतं आणि काही काळ तिथे एक वेगळीच शांतता पसरते. ती शांतता असते सुटकेची. जेव्हा मी जागा झालो, त्या वेळी किती वाजले ते मला माहीत नव्हतं; परंतु अजून डॅडी घरी परतलेले नसावेत, नाहीतर मला ते ऐकू आलं असतं. छताकडच्या खिडकीच्या धुरकट काचेतून चंद्रप्रकाश दिसतो, पण चंद्राचा आकार कळत नाही. शेननं भिंतीवर टांगलेली फूटबॉलर्सची चित्रं मला दिसतात. त्यातील खेळाडू चेंडू लाथेनं एकमेकांकडे ढकलत असतात.

डॅडी पिऊन तर्र झालेले नसले, तर ते गुत्ता बंद होण्याच्या वेळी परत फिरतील. माझं शरीर ताठरतं. पुन्हा कुणीतरी माझ्याभोवती दोऱ्या गुंडाळल्या आहेत. मी हलू शकत नाही. त्या दोऱ्या फार घट्ट आहेत. मी श्वासोच्छ्वासही करू शकत नाही. मी धडपडतो आणि हवा घेण्यासाठी धापा टाकतो. मला त्या दोऱ्यांतून सुटून खाली रस्त्यावर पळून जायचंय. मग मला इथे आणखी पडून राहावं लागणार नाही. मला माहीत आहे, की जॅक फ्रॉस्ट बागेच्या भिंतीवर माझी वाट पाहत आहे.

मग तो दरवाजा आपटल्याचा आवाज होतो आणि वाट पाहताना माझे स्नायू ताठ होतात आणि माझं शरीर थंड धातूसारखं होतं. माझा श्वासोच्छ्वासही थांबतो. माझा मोठा भाऊ एक शब्दही बोलत नाही; परंतु मला माहीत आहे, की त्याच्या बिछान्यात तोही कानोसा घेत आहे.

आता डॅडींचा आवाज ऐकू येतो. ते घरी जेव्हा रात्री आनंदात, मस्करी करत येतात, अशांपैकी कदाचित ही एक रात्र असावी; परंतु आरडाओरडा भराभर वाढतो. थोड्याच वेळात माझी ममा त्यांच्या अंगावर किंचाळू लागते. ती पुन्हा त्या बाईबद्दल बोलत असते. मग तिचं नेहमीचं जिहोवा, सैतान आणि जगाच्या अंताविषयीचं बोलणं सुरू होतं. मला वाटतं, की तिनं थांबावं. जर ती थांबली नाही, तर डॅडी तिला मारतील. ती थांबत नाही आणि कर्कश आवाजात बोलतच राहते. सरतेशेवटी तिचे शब्द ऐकू न येता नुसतं स्वरांचं वर-खाली होणं तेवढं ऐकू येतं. जेव्हा डॅडी रागानं उत्तर देतात, तेव्हा त्या दोघांचे आवाज एका विचित्र तऱ्हेनं गुंफलेले असतात. ऑपेरामधील गाणारे असं करतात. ममा आणि डॅडी हे रागाचा ऑपेरा गात असतात.

मग मला माझा भाऊ उठल्याचं ऐकू येतं. "तू कुठे जातोयस?" मी हळूच विचारतो; पण मला ते आधीच कळलेलं असतं. आम्ही दुबळे आहोत आणि पलंगावर पडून राहिल्यावर ते जास्तच जाणवतं. मी त्याच्याबरोबर जिना उतरून खाली येतो. आम्ही बैठकीच्या खोलीत घुटमळतो. सर्व दिवे जळत असतात आणि डॅडी आणि ममा तिथे उभे असतात. ममा किंचाळत असते. मग त्यात थोडा खंड

पडतो. कदाचित, ते संपलं असावं, पण नाही, डॅडी तिला बुक्के मारू लागतात. त्यांचे हात हे भले मोठे दाणगट असतात. पॉवर स्टेशनवर बर्फात, पावसात अति श्रम करणाऱ्या माणसाचे हे हात असतात. त्यांच्या डाव्या हाताच्या पंजावर **'प्रेम'** गोंदवलेलं आहे. कित्येक लोकांच्या हातावर हा **प्रेम** शब्द गोंदवलेला आहे आणि त्या लोकांच्या दुसऱ्या हातावर **द्वेष** गोंदवलेलं आहे; परंतु डॅडींच्या दुसऱ्या हातावर **द्वेष** गोंदवलेला नाही. ते म्हणतात, की त्याचं कारण म्हणजे ते कोणाचा द्वेष करत नाहीत, त्यामुळे त्यांच्या उजव्या हातावर क्रूसवरील ख्रिस्ताची मूर्ती गोंदवलेली आहे.

ते ममाला बुक्के मारायला तो **प्रेम** शब्द लिहिलेला हात वापरत नाहीत. त्या हातानं तिला घट्ट धरतात आणि दुसऱ्या हातानं तिला गुद्दे मारतात. ती किंचाळते. मला पळून जावंसं वाटतं;, परंतु मी हलू शकत नाही. मी दरवाजाची चौकट घट्ट पकडतो. मला ओकारी येईल असं वाटतं. अचानक, शेन खोलीत धावत जातो. तो त्या दोघांच्यामध्ये उभा राहतो आणि स्वत: ममाच्या पुढे, 'आता तुम्ही तिला कशी मारता' अशा आविर्भावात त्यांच्याकडे टक लावून पाहतो. त्याला एवढं धैर्य कुठून आलं? तो माझ्याहून फक्त दोन वर्षांनी मोठा आहे आणि अजून माध्यमिक शाळेतही नाही. माझं लक्ष डॅडींच्या चेहऱ्याकडे जातं आणि मग मी माझी दृष्टी तिथून फिरवतो, कारण डॅडींचा चेहरा इतका भयानक झालेला असतो. त्यांचे डोळे बर्फासारखे थिजलेले असतात. त्यांचा रागही बर्फासारखा झालाय आणि तो बर्फ जॅक फ्रॉस्टच्या बर्फासारखा चांगला नाही. जेव्हा डॅडींचा तो चेहरा मी पाहतो, तेव्हा मला शेनबद्दल भीतीच वाटते. शेन डॅडींकडे रोखून पाहण्याचा प्रयत्न करतो. तो जराच कचरतो. जणू काही डॅडींची नजर त्याला दिपवते. मग डॅडी शेनचा गळा त्या **प्रेम** शब्द लिहिलेल्या हातानं पकडतात आणि त्याच्या तोंडावर ज्या हातावर **द्वेष** लिहिलेलं नाही, त्याच्या मुठीनं ठोसा ठेवून देतात. त्यांच्या बोटांच्या सांध्यांच्या हाडांची थप्पड शेनच्या कोवळ्या चेहऱ्यावर बसल्याचा आवाज मी ऐकतो.

ममा किंचाळते आणि माझ्या भावाभोवती आपले हात टाकते. डॅडी मला धसमुसळेपणे बाजूला ढकलत घरातून बाहेर पडतात. मी अजूनही त्यांच्या तोंडाकडे पाहू शकत नाही.

ममा हुंदके देते. शेन हुंदके देत असतो. ममा त्याला थोपटते. मीही त्याला थोपटण्याचा प्रयत्न करतो; पण मला तिथे स्थान नाही. मग मी एकटाच रडत बसतो. मी आजूबाजूला पाहतो. ती बैठकीची खोली नेहमीसारखीच नीटनेटकी आणि आवरलेली आहे. तेथील तपकिरी खुर्च्या, सोफा आणि आरसे आणि डॅडींच्या काऊबॉय पुस्तकांनी भरलेलं ते शेल्फ आणि त्यांच्या त्या वेस्टर्न रेकॉर्ड्स सर्व जागेवर आहे, काहीही विस्कटलेलं नाही, पण येथील आत्ताचं वातावरण वेगळंच

आहे. सर्व जगच बदललंय.

दुसरा दिवस शनिवार आहे. जेव्हा मी डॅडी-ममाच्या खोलीवरून जातो, तेव्हा मला डॅडींचं बोलणं ऐकू येतं. स्वयंपाकघरात माझी मोठी बहीण केली बर्फात गोठवलेल्या वाटाण्याचं पाकीट शेनच्या वळांवर लावत आहे. अर्थात या आधीही त्यानं मार खाल्लेला आहे. तो लहान असताना रात्री अंथरुणात लघवी करायचा, यावरून डॅडींनी त्याला मारलेलं आहे; परंतु आताचा हा मार वेगळा आहे.

मी ममाकडे पाहतो. ती घरातील मोरीवर हातात सोलाणं घेऊन वाकलेली आहे आणि तिचे ते कुरळे केस तिच्या खांद्यावर रुळत आहेत. तिची देहयष्टी गोल आणि आरामदायी आणि कवटाळण्यास योग्य अशी आहे आणि या घडीला तरी मला तिनं जवळ घ्यावं, असं वाटतं. मी हळूच तिच्याजवळ जातो आणि तिच्याभोवती माझे हात टाकण्याचा प्रयत्न करतो.

"बाजूला हो." ती मला बाजूला ढकलते. मी तिला घट्ट पकडतो आणि माझं तिच्यावर प्रेम आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करतो. कालच्या प्रकारानंतर मला हे सांगण्याची गरज वाटते आणि जरी आमच्या कुटुंबात दुसऱ्या कोणी प्रेमाबद्दल बोललेलं मी कधीही ऐकलेलं नाही, तरी ममानं ते मला म्हणावं, असं वाटतं.

"ममा माझं तुझ्यावर प्रेम आहे."

'प्रेम!" ममा कर्कशपणे ओरडते.

"तू चांगला मुलगा कसा होशील आणि जिहोवाला तुझ्याबद्दल प्रेम कसं वाटेल, याचा तू विचार कर."

"मी चांगला मुलगा आहे आणि मी जिहोवावर प्रेम करतो."

खरं सांगायचं, तर मला जिहोवाची भीतीच वाटते. तो काहीसा ममा आणि डॅडी मिळून बनल्यासारखा आहे. त्याला मी केलेल्या चुका माहीत असतात आणि तो माझ्यावर चिडलेलाच असतो.

"हे ऐकून मला बरं वाटलं, मार्क. तू जिहोवावर प्रेम करतोस, हे ऐकून मला आनंद झाला. त्याच्यासाठी तरी तू चांगला मुलगा बनण्याचा प्रयत्न करशील, कारण तो तुझ्यावर सदैव लक्ष ठेवून आहे आणि हे तू विसरू नकोस."

"नाही ममा."

"जर तू माझ्याबरोबर त्या चर्चमधील सभांना वरचेवर आलास, तर मग तू जिहोवा आणि इतर प्राणिमात्रांबरोबर स्वर्गात राहशील."

मग मी लक्ष देत नाही. तुम्ही ममाला काहीही सांगितलंत, तरी त्याचा शेवट जिहोवा आणि स्वर्ग यावरच होतो.

गुत्ता उघडण्याच्या वेळेला डॅडी आपल्या झोपायच्या खोलीतून बाहेर येतात आणि ममा आणि ते स्वयंपाकघरात काही न घडल्यागत बोलत असताना मी पाहतो.

"ठीक आहे ना मुला?" जेव्हा ते माझ्या भावाला शेनला बघतात, तेव्हा प्रेमानं विचारतात. शेन मान हलवतो आणि लाल होतो.

"हो, डॅडी."

त्याला कसं वाटतं ते मी जाणतो, काहीसं अपराधी, कारण ज्या वेळी डॅडी मारतात, तेव्हा तुम्हाला माहीत असतं, की तुम्ही काहीतरी वाईट केलंय आणि तो तुमचा अपराध आहे, हे नक्की. दु:ख वाटतं, की तुमचं डॅडींवर प्रेम आहे आणि त्यांना तुमच्या प्रेमाची गरज नाही. डॅडींबद्दल काहीतरी शरमल्याची भावनाही असते, पण ती का, ते समजत नाही.

लवकरच पुढचा दरवाजा बंद झाल्याचा आणि कवाडी बंद झाल्याचा आवाज ऐकू येतो आणि ते गुत्त्यात गेले, हे आम्हाला कळतं. ते जेव्हा परत येतात, तेव्हा शांत असतात. ते मग सांगतात, की शनिवारची रात्र ही कुटुंबासाठी असल्यामुळे त्या संध्याकाळी आम्ही सर्व क्रिकेटियर्स आर्म्सला जाणार आहोत. तो वसंत ऋतू आहे आणि जर आम्ही कोट घातले, तर मोठ्यांना बाहेर बसायला आणि छोट्यांना हिरवळीवर खेळायला ते पुरेसे उबदार ठरतील. हे आम्हाला सांगून ते सोफ्यावर झोपी जातात.

जेव्हा डॅडींना दुपारी चहासाठी जागं करायची वेळ येते, तेव्हा मी धीरानं पुढे होतो. ते गुत्त्यातून परतले, तेव्हा चांगल्या मन:स्थितीत होते आणि ते माझे डॅडी आहेत आणि माझं त्यांच्यावर प्रेम आहे. आज सकाळी ममाजवळ वागण्यात मी तसा यशस्वी झालो नव्हतो; पण आता मी डॅडींच्या बाजूला अगदी सावकाश, काळजीपूर्वक आणि हळूवारपणे सोफ्यावर चढतो. ते हलत नाहीत. इथपर्यंत सर्व ठीक जमतं.

मी त्यांच्या मानेभोवती हात टाकण्याचा प्रयत्न करतो, कारण माझं त्यांच्यावर प्रेम आहे. यात कोणताही संशय, प्रश्न किंवा अटी नाहीत. मी त्यांच्यावर फक्त प्रेम करतो आणि जर मी हळूहळू त्यांच्याभोवती हात टाकले, तर त्यांच्या लक्षातही येणार नाही. हळूहळू ते एक डोळा उघडतात. मी थांबतो. माझं हृदय जोरात धडधडत असतं. त्यांना ते जाणवेल का? ते त्यांचा डोळा पुन्हा बंद करतात आणि बऱ्याच वेळानंतर हळूहळू त्यांच्याकडे नजर ठेवून मी माझे हात त्यांच्या मानेभोवती टाकतो. हे एखाद्या ज्वालामुखीवर बसण्यासारखं आहे. ते हलत नाहीत, की काही करत नाहीत. त्यांचे डोळे बंद असतात.

"डॅडी उठा, चहाची वेळ झालीय." मी कुजबुजतो आणि त्यांच्या मोठ्या उबदार शरीराला चिकटतो. ते जर का एवढे भीतिदायक नसते, तर इथे छान वाटलं असतं.

आम्ही मिनिटभर शांत पडून असतो आणि मी त्यांचे दाढीचे वाढलेले खुंट निरखत असतो. त्यांचे डोळे उघडतात आणि ते सावकाशपणे माझ्यावर स्थिर

होतात. झटक्यात ते मला खाली जमिनीवर ढकलतात.

"ऊठ." ते म्हणतात.

मी त्यांचा पाय पकडण्याचा प्रयत्न करतो आणि मी दूर फेकला जाईपर्यंत ते त्यानं मला ढकलतात. ते उठून उभे राहतात. मी पुन्हा त्यांच्याकडे सरकतो आणि ते मला लाथ मारतात. त्यांचा नेम चुकतो, पण तरी मी रडत असतो. त्यांचं माझ्यावर प्रेम नाही आणि त्यांना मी जवळ असलेला सहन होत नाही.

डॅडी माझ्या अश्रूंकडे तिरस्कारानं पाहतात.

"छोटा चोर," ते जेवणाच्या खोलीकडे वळताना म्हणतात. "छोटा पुटपुटणारा चोर."

मला शनिवारचा चहा नकोसाच वाटतो. मशरूम सूपमध्ये कॅम्पेल क्रीम घातलेलं आणि मांसाचा समोसा. आमच्या ममाच्यामते ते खाण्याची एकच पद्धत आणि ती म्हणजे तो समोसा मशरूम सूपमध्ये बुडवून खाणं. तो भयानक वाटतो. मला ते खायला नको वाटतं; पण डॅडींच्या रागीट नजरेमुळे मी तो कसाबसा गिळतो. ममाची आपला नवा स्वेटर शोधण्याची धावपळ सुरू होते. बाथरूममधील एका हिरव्या बाटलीचं बूच उघडलं जातं आणि एक गोड सुगंध घरात दरवळतो. डॅडींचं ब्रूट ३३ आणि त्या वासात बुडून आम्ही क्रिकेटियर्स आर्म्सच्या बागेकडे निघतो.

आम्ही मुलांनी लाकडी चेंडूनं खेळायचं, अशी कल्पना असते; पण मी थांबतो आणि डॅडकडे बघतो. काल रात्री वेडापिसा झालेला हाच का तो माणूस? ते उंच आणि देखणे आहेत. पेयांचे घोट घेताना इतर बायका ज्या तऱ्हेनं त्यांच्याकडे बघतात, त्यावरून आपण हे सांगू शकतो. डॅडी हे राक्षस आहेत आणि ममानं त्यांना सोडलं पाहिजे, हे नॅनजवळ सांगणारी तान्या मावशीही ते जेव्हा विनोदी गोष्ट सांगतात, तेव्हा मान डोलावते आणि खूप हसते. स्टीव्हकाकांबरोबर गप्पा मारताना ते आणखी काही विनोदी किस्से सांगतात आणि सर्वांना हसवितात. इतकंच नव्हे, तर ते आम्हा मुलांत येतात आणि लाकडी चेंडूनं जरा खेळतात आणि आम्हालाही हसवितात. मला त्यांच्याबद्दल प्रेम आणि अभिमान वाटतो. ते सर्वांत हुशार, मोठे मजबूत, कणखर आणि सर्वोत्कृष्ट आहेत. आज रात्री त्यांनी थोडीशीच दारू घेतलीय आणि त्यांची खिलाडूवृत्ती जागृत झाली आहे, असे हे दुसरेच डॅडी आहेत. दारू नसली, की ते चिडचिडे, घुमे आणि आम्हावर बरसणारे डॅडी असतात. दोन ते पाच पेले होईपर्यंत ते एखाद्या फळासारखे पक्व होतात. त्या चांगल्या काही मिनिटांच्या काळात आम्ही त्यांच्या वागण्याचा आनंद उपभोगायला शिकलो आहोत. पाच ते सहा प्याले झाले, की त्यांचं पिणं प्रमाणाबाहेर जातं. आता आमच्या घरात मारामारी आणि राग उसळेल. शेन किंवा मी किंवा ममाला मार

बसेल. यासाठी आमच्यापैकी कुणीही असेल आणि त्याला कारण असेल किंवा नसेलही. एक मात्र नक्की, हे केलीच्याबाबत घडणार नाही. मला यामुळे तिचा राग येतो. ती माझी मोठी बहीण आहे आणि ती चांगली आहे, यामुळेही मला तिचा राग येतो. मी तिचं वर्णन करू शकणार नाही किंवा ती कशी दिसते, तेही मी सांगू शकणार नाही किंवा ती काय कपडे वापरते तेही, कारण मी तिच्याकडे पाहतच नाही. ती तिथे नाही, असंच मी धरून चालतो.

आम्हाला इतकं घाबरवून दु:खी केल्यावर आम्ही आमच्या भीतीच्या जगात अडकून बसलोय. अशा वेळी आम्ही एकमेकांशी धड बोलतही नाही आणि आम्ही घराकडे हळूच परत फिरतो. त्यांचं लक्ष आमच्याकडे जाणार नाही आणि ते दुसऱ्या कोणाशी भांडण उकरतील, अशी आशा करतो आणि मग अचानक ते पुन्हा दूर जातात.

जेव्हा ते परत येतात, तेव्हा सर्व ठीकठाक असतं. ममा ज्युलिया अँड्रुस बनते आणि डॅडी जिहोवा. ते बाहेर गेल्यावर आम्ही केलेल्या चुका त्यांना कळतात आणि त्याबद्दल ते आम्हाला शिक्षाही करतात. काही दिवसांतच अव्यवस्था माजते आणि आम्ही भीतीखाली दडपून जगत असतो. भीती वाटत असते, की आमच्यापैकी कुणालाही काही कारणानं किंवा कारणाशिवाय ते बदडून काढतील.

जेव्हा डॅडी बाहेरगावी जातात, तेव्हा आम्हाला सुटल्यासारखं वाटतं. ते घरी नसताना त्यांच्यावर प्रेम करणं फार सोपं असतं. ममाच्या बहिणी त्यांच्या मुला-बाळांना घेऊन बऱ्याचदा भेटायला येतात आणि घर गप्पांनी निनादत असतं. माईकमामा काहीतरी गंमत म्हणून आमच्यासाठी सहल आयोजित केल्याचं सांगायला येतो. तो आम्हाला घेऊन वेस्ट मिडलँडच्या सफारी पार्कला जाणार असतो.

माईकमामाच्या मिनीमध्ये आम्ही सहा जण आहोत – ममा, केल्ली, शेन, मी माईकमामा आणि नॅन. मिनीला चारच सीट असतात, त्यामुळे आणखी मौज म्हणजे माईकमामा कार चालवत असताना मला आपल्या मांडीवर बसवतो आणि काही अंतरापर्यंत मला कार चालवायलाही मिळते.

ममानं चित्त्यासारखे ठिपके असलेला तिचा कोट घातलेला आहे आणि जेव्हा ती हात हलवते, तेव्हा कारमध्ये चित्ता आहे, असं आम्ही ओरडतो. जेव्हा मी वळण लांबून घेतो, तेव्हा तो चित्ता आणि नॅन किंचाळते. माईकमामा त्यांना म्हणतो, "काळजी करू नका. सर्व काही ठीक आहे." जरी ते ठीक नसलं तरीही. माझ्याभोवती माझं कुटुंब आहे आणि डॅडी बाहेरगावी गेलेले आहेत, त्यामुळे सहा वर्षांच्या माझ्यासारख्या मुलाला सुरक्षित वाटतं.

कार चालवणं तसं गमतीचं आहे आणि ते पार्कही छान आहे. आम्ही झेब्रा, माकडं बघतो आणि नंतर ज्या ठिकाणी सिंह आहेत, तिथे जातो. कार धडधडत

अचानक थांबते. आम्ही खिडकीतून बाहेर बघतो आणि ते सिंहही आमच्याकडे टक लावून पाहतात.

"कार बिघडली," माईक म्हणतो, "कदाचित माणसं जास्त झाली म्हणूनही असेल."

आम्ही सिंहाकडे बघतो आणि मग एकमेकांकडे.

"ठीक आहे, लॉरेन बाहेर जा आणि धक्का मार." माईकमामा माझ्या ममाला म्हणतो.

"मी ते करणार नाही." ममा किंचाळते. मला बरं वाटतं. त्या तिच्या चित्त्याच्या कोटामुळे हे दुखणं विकत घेतल्यासारखंच होणार होतं. सर्व खिडक्या लावलेल्या आहेत की नाही, ते आम्ही पाहतो. थोड्याच वेळात खिडकीच्या काचेवर वाफ साठते. मी त्यावर माझं नाव लिहू शकलो असतो. आतमध्ये गरम आणि कोंडल्यासारखं आहे. त्या धुरकटलेल्या पुढच्या काचेतून मला एक लाल ठिपका दिसतो. याचा अर्थ सूर्य मावळायला आलाय. कोणीतरी सांगतो, की आपल्याला पर्याय आहेत, सिंहानं आपल्याला जखमी करायचं किंवा रात्रभर कारमध्ये बसून आपण गुदमरून जायचं.

माईकमामा हसतो. नॅनपण हसू लागते. मग ममा खुदखुदू लागते आणि आम्हाला तेवढंच पुरतं. क्षणांत आम्हा तीन पोरांची हसून हसून मुरकुंडी वळते. जेव्हा वेस्ट मिडलँड सफारी पार्कचे नोकर आपल्या ट्रकमधून आम्हाला वन्य श्वापदांपासून सोडविण्यासाठी येतात, तेव्हा त्यांना हसणाऱ्या तरसांनी गच्च भरलेली मिनी कार सापडते. आमच्यापैकी एक एक जण जेव्हा हसत हसत बाहेर मोकळ्या हवेत येतात, तेव्हा ते आमच्याकडे बघतच राहतात.

सूर्य मावळत आहे. कुणीतरी आकाशात लाल शाईची बाटली फेकली आहे. लाल रंगाच्या आकाशात संथपणे फिरणाऱ्या प्राण्यांच्या छायांचे सौंदर्य क्षितिजाजवळ मी पाहतो. या घडीला वेस्ट मिडलँड्स पार्क ही जगातील सर्वांत सुंदर जागा आहे, असं मला वाटतं.

■

३

ममाला बाळ होणार आहे. ती आणखी गोल झाली आहे आणि त्याचं कारण म्हणजे तिच्या पोटात बाळ आहे.

ते बाळ सप्टेंबरमध्ये जन्माला येईल; पण त्याचा काही दर वर्षी वाढदिवस साजरा केला जाणार नाही. आम्ही वाढदिवस साजरे करत नाही, त्याचं कारण म्हणजे ममा जिहोवाची शिष्य आहे आणि तिचा जिहोवावर विश्वास आहे, वाढदिवसांवर नाही. माझी ममा फक्त ख्रिसमस साजरा करते, कारण डॅडी तो तिला साजरा करायला भाग पाडतात आणि तिला तो साजरा करायची इच्छा नाही, हे तुम्हाला दिसतंच.

या घडीला माझा सर्वांत जवळचा मित्र आहे अँगस. तो किती काळ माझा मित्र राहील, हे मी सांगू शकत नाही, कारण मी नेहमीच मारामारी करतो आणि मित्र बदलतो; पण या घडीला माझा मित्र अँगस आहे. त्याला चित्रं काढायला आवडतात, त्यामुळे आम्ही दोघं एकत्र चित्रं काढतो. आमचे शिक्षक मि. जेकब्स आम्हाला मोठ्यामोठ्या कागदाच्या गुंडाळ्या देतात आणि आम्ही त्याच्यावर रंगानं आणि फेल्ट पेननं सावकाश चित्रकथा काढतो. ती कथा आहे पुष्कळ लोकांची आणि अनोळखी जागेतील लढायांची. ते लोक आणि लढाया मुलांच्या कंपूंसारख्या सदोदित बदलतात. ती कथा त्या गुंडाळीतील कागदांप्रमाणे उलगडते आणि कधीही संपतच नाही. मी इतर मुलांच्या मानानं आर्ट सोडून प्रत्येक गोष्टीत मागे पडतो आणि ती मला सर्वांत आवडते. मी लालभडक रंगात एक हत्ती रंगवलाय आणि तो इतका पाहण्यालायक झालाय, की मि. जेकब्सनी त्या चित्राला वर्गाच्या भिंतीवर मानाचं स्थान दिलंय.

कदाचित, मला लढायांची चित्रं काढायला आवडतात, कारण मी स्वत: लढाऊ वृत्तीचा आहे. मी काही रागीट स्वभावाचा, मारामारी करणारा नाही आणि ममा जेव्हा आम्हाला मारते, तेव्हा ती जशी भयानक तोंडं करते, तशी मी करत

नाही. मी कोणाबरोबर मारामारी करत असलो, तरी मी हसत असतो. खेळाच्या मैदानावर गुद्दे कसे ठेवून द्यायचे, ते मला माहीत आहे आणि मी माझ्या मुठीचा अशा तऱ्हेनं उपयोग करतो, की लोक माझ्याशी जपून वागतात. एकदा मधल्या वेळात मारामारी झाल्यावर मला मि. जेकब्सकडे वर्गात परत पाठवलं जातं, परंतु वर्ग रिकामा असतो.

दुसरं कोणी इथे नसल्यामुळे हा वर्ग वेगळाच वाटतो. त्या खोलीत माझ्या चालणाऱ्या पावलांचा आवाज वेगळा येतो. येथील हवा वेगळी वाटते. इथे भिंतीवर टांगलेला माझा हत्ती आहे आणि मेजावर गणिताच्या वह्या उघड्या आहेत. मि. जेकब्सच्या खुर्चीवर ते नसून त्यांचं जॅकेट आहे.

मी हळूहळू मि. जेकब्सच्या जॅकेटजवळ जातो आणि माझ्या खांद्यावरून वळून पाहतो. कुणीही आत येत नाही. कुणीही दरवाजाबाहेर नाही. काहीही विचार न करता धडधडत्या हृदयानं आणि माझे हात कापत असताना मी मि. जेकब्सच्या जॅकेटच्या खिशात हात घालतो आणि पैशाचं पाकीट काढतो. मी एक कटाक्ष हळूच दरवाजाकडे टाकतो. तिथे कोणीही नाही. मी पाकीट उघडतो. तिथे नोटांच्या बंडलामध्ये एक जाड कागद आहे. माझं हृदय आता एवढं धडधडत आहे, की मी पार गर्भगळीत झालेला आहे, त्यामुळे जवळ येणाऱ्या पावलांचा आवाज मला ऐकू येणार नाही, अशी मला भीती वाटते. मी फक्त एक निळी नोट काढतो आणि माझ्या खिशात टाकतो, मग इतक्या घाईनं ते पाकीट बंद करतो, की माझे स्वत:चे हात मला दिसत नाहीत. मी पाकीट बंद करतो आणि ते मि. जेकब्सच्या जॅकेटमध्ये ठेवतो. त्या हत्तीशिवाय आणि जिहोवाशिवाय मला कुणीच पाहिले नाही.

त्या उरलेल्या दिवसात मी जरा उत्तेजित अवस्थेतच आहे. मि. जेकब्स पाकीट बाहेर काढून पैसे मोजतील का? एक निळी नोट कमी आहे, हे त्यांना कळेल का? सर्व वर्गाला त्या संबंधी प्रश्न विचारले जातील का? आणि कुणाला माझ्या खिशात पाहावंसं वाटेल का?

पण दिवस तसाच संपतो आणि काहीच घडत नाही. मि. जेकब्स त्यांचं पैशाचं पाकीट उघडत नाहीत किंवा ते उघडतात, पण एक नोट कमी आहे, हे त्यांच्या लक्षात येत नाही. घरी येताना मी ती नोट बघतो. ती पाच पौंडाची नोट असते. पाच पौंड! मी ती माझ्या उशीत दडवतो, कारण मला ती दुसऱ्या कोणाला सापडायला आणि त्यानं ती माझ्याकडून चोरी करायला नको असते. आमच्या घरात शाळा संपल्यावर मुलांचा वावर असतो. बहुतेककरून ही मुलं अनाथाश्रमातील असतात. तिथे माझी ममा स्वयंपाकाचं काम करते. ते तिची वेळ संपली, की तिच्याबरोबर येतात आणि आमच्या घरात काही काळ कौटुंबिक जीवनाचा अनुभव घेतात. त्यांना इथे आवडतं असं दिसतं. हे तसं विचित्रच आहे. मी बऱ्याचदा आपण अनाथाश्रमात

राहतोय, असं स्वत:ला भासवतो.

दुसऱ्या दिवशी भीतीनं गर्भगळीत अवस्थेत मी शाळेला जातो. आता या वेळेपर्यंत मि. जेकब्सना चोरी झाल्याचं नक्कीच लक्षात आलं असावं; परंतु नाही. त्यामुळे मला बरं वाटतं, उत्तेजितही वाटतं. मी तान्या मावशीकडे, जोक शॉपमध्ये आणि इतरही लोकांना माहीत नसलेल्या लहान-मोठ्या चोऱ्या केल्या आहेत; पण ही आजपर्यंतची सर्वांत उत्तम चोरी आहे. सबंध आठवडाभर मी वाट पाहतो; पण त्या हरवलेल्या पैशाचा उल्लेख होत नाही. ती पाच पौंडाची नोट आता माझी आहे! पाच पौंड म्हणजे नशीबच खुललं. मी ते कशावर खर्च करू शकेन? सरतेशेवटी मी मिठाई घ्यायची ठरवतो. मग मी सायकलीसाठी ब्रेक्स विकत घेतो. माझ्याजवळ सायकल नाही; पण एक दिवशी ती कदाचित माझ्याकडे असेल. सर्वांत उत्तेजित होण्यासारखी गोष्ट, म्हणजे जेव्हा पुन्हा कधी संधी मिळेल, तेव्हा मी त्यांच्याकडेच चोरी करीन आणि या सर्व वेळी माझ्या आतला एक लहानसा आवाज हे चुकीचं कृत्य न करण्यासाठी मला सांगत असतो आणि मी थांबू शकत नाही, हे त्या सर्व वेळ मला माहीत असतं.

ममाला लवकरच बाळ होणार आहे. ती आता सर्व वेळ आमच्यावर ओरडत असते. शेन आणि माझ्यामुळे तिला त्रास होतो, हे प्रत्येक दिवशी ती आम्हाला सांगते आणि तिच्या चर्चमधील मैत्रिणींनाही सांगते, कारण त्यांच्यापैकी एक तिला मदत करणार असते.

मॉरीनचा चेहरा हा चेटकिणीच्या चेहऱ्यासारखा उभट आहे. तिच्यामुळेच ममा जिहोवाची शिष्या झाली. मी बाळ असताना तिनं दाराची कडी वाजवली आणि ममाला शिष्या बनण्याचा आग्रह केला. माझे डॅडी कुणालातरी इजा केल्याबद्दल वर्षभर तुरुंगात होते, तेव्हा हे घडलं. ते जर घरी असते, तर त्यांनी हे सर्व थांबवलं असतं.

जेव्हा डॅडी त्या जिहोवाच्या शिष्यांपासून आमचं रक्षण करायला घरी नसतात, तेव्हा ममाच्या मैत्रिणी बऱ्याच वेळा घरी येतात. मॉरीनला आम्ही आवडत नाही. ती आमच्याकडे तुच्छतेनं पाहते. ममाच्या त्या नव्या चांगल्या मैत्रिणीसाठी आम्हाला मॉरीन आणि तिच्या स्कॉटलंडच्या सुटीचे आभार मानायला हवेत. मॉरीन तिथून आठवणीसाठी आणलेली वस्तू दाखवत येते. तो लाकडी चमचा असतो, पण नेहमीसारखा सर्वसाधारण चमचा नाही. तो गडद लालसर काळ्या रंगाचा आहे आणि तो वल्ह्याएवढा मोठा आहे. त्यावर शब्द कोरलेले आहेत जगातील सर्वांत मोठा ढवळणारा. ममानं त्याचा कशासाठी उपयोग करावा, हा मॉरीननं टाकलेला एक कटाक्षच सांगतो. जेव्हा गरज पडेल, तेव्हा तिला तो घेता यावा, यासाठी ती तो जेवणाच्या खोलीत टांगून ठेवते. आम्हाला या जगातील सर्वांत मोठ्या

ढवळणाऱ्या चमच्याचे हात आमच्या ढुंगणांवर बसायला फारशी दंगामस्ती करावी लागत नाही.

ममा जेव्हा त्या चमच्यानंच मला मारते, तेव्हा मी न रडण्याचा प्रयत्न करतो; पण जेव्हा ती शेनला मारते आणि जेव्हा मी त्याचे हुंदके ऐकतो, तेव्हा मलाही हुंदके द्यावेसे वाटतात. शेनमध्ये असं काहीतरी आहे, की त्याच्या दु:खामुळे मला दु:ख होतं. जेव्हा मी त्याच्या मोठ्या कानांकडे, मोठ्या डोक्याकडे, मोठ्या दातांकडे आणि त्याच्या उंच मानेकडे पाहतो, तेव्हा मी त्याला काहीसा खडबडीत, प्रेमाचा भुकेला आणि काहीसा दु:खी पाहतो. त्या वेळी मी त्याच्यावर प्रेम करतो आणि त्यामुळेच माझ्या हृदयात वेदना होतात. जेव्हा मला ती दुखावणारी, अश्रू आणणारी भावना जाणवते, तेव्हा मी काही काळ त्याच्याशी छान वागतो. त्यानंतर काही काळानं तो माझा मोठा भाऊ बनतो आणि मी त्याच्याशी मरेपर्यंत मारामारीची तयारी ठेवतो.

जेव्हा ममा आम्हाला मारते, तेव्हा ती किंचाळत असते. तिचा चेहरा वेडावाकडा होतो. ती इतकी रागावलेली असते, की आम्हाला मारणं ती थांबवू शकत नाही. एकदा तिला तो जगातील मोठा चमचा सापडला नाही, मग तिनं झाडू घेतला आणि आम्हाला एवढ्या जोरानं मारलं, की त्याचा दांडा शेनच्या डोक्यावरच फुटला. जेव्हा ती अशी रागावलेली असते, तेव्हा मला एक भयानक गुपित माहीत आहे आणि ते गुपित त्या चमच्याच्या आणि झाडूच्या मारापेक्षा जास्त दु:खदायक आहे. आम्हाला माहीत आहे, की आमची ममाही माथेफिरू आहे.

मी तिच्या पैशांच्याही चोऱ्या करायला लागतो. मि. जेकब्सना पाच पौंड नाहीसं झाल्याचं कळलं नव्हतं. मी ममाच्या पर्समधून लहानसहान रकमेच्या चोऱ्या करू लागतो. ती माझ्यावर चोरीचा आरोप करत नव्हती, मग मी मोठ्या रकमा उचलू लागतो. एक दिवस ती मला रंगे हात पकडते. ती माझ्यावर ओरडते. जगातील तो मोठा चमचा जेवणाच्या भिंतीवरून खाली येतो. त्यात आणखी भर म्हणजे ती डॅडींना सांगणार असते. मी पुन्हा चोऱ्या करू लागलो, हे जेव्हा त्यांना कळेल, तेव्हा ते काय करतील, याचा मी बिछान्यात पडून विचार करू लागतो. स्वत:ला चोरी करण्यापासून थांबवावं असं मला फार वाटतं; पण मी थांबवू शकत नाही. हे असं काही आहे, की ते मला केलंच पाहिजे. आता पुन्हा त्या दोऱ्या इथे हजर होतात. मला बिछान्याला बांधलेलं आहे आणि मी हलण्यासाठी धडपडत आहे, श्वास घेण्यासाठी तडफडत आहे आणि या घरापासून, माझ्या कुटुंबीयांपासून आणि स्वत:पासून दूर जाण्यासाठी धडपडतोय.

डॅडी येतात आणि घरात अशी काही खळबळ माजते, की मी गफल्यात अडकलोय हे सर्व जण विसरतात. ममा हॉस्पिटलला जाते. थोड्या वेळानं डॅडींचा

फोन येतो. आम्हाला छोटी बहीण झालीय, हे ते सांगतात.

डॅडी ममाला भेटायला हॉस्पिटलमध्ये जात नाहीत; परंतु त्या संध्याकाळी ते आपल्या एका मित्राला भेटायला जायचंय, असं म्हणतात. आता आम्ही त्यांच्या ताब्यात असल्यामुळे आम्हालाही जावं लागतं. तो मित्र म्हणजे बाई असते. शेन आणि मी त्या क्षणीच त्या कोटहँगरला ओळखतो. तीच ती बाई असते. जवळून तिचे केस काळे कुळकुळीत आहेत, असं आम्हाला दिसतं.

"ते रंगवलेले आहेत." केली सांगते. तिला या असल्या गोष्टींची माहिती आहे. "आणि तिचं तोंड रंगवल्यासारखं वाटतं, कारण ती चेहऱ्याला रंग फासते."

कोटहँगरचा चेहरा नक्कीच विचित्र आहे. जेव्हा मी तिला अगदी जवळून पाहतो, तेव्हा केलीबरोबर आहे, हे माझ्या लक्षात येतं. तिच्या चेहऱ्यावरही एक कसलातरी थर इतका दाट थापलेला असतो, की तो कदाचित तिला खरवडून काढावा लागत असेल. ख्रिसमस ट्रीवर जशी पदकं लावलेली असतात, तसे तिच्या अंगावर सोन्याचे दागिने लोंबत आहेत. केली आम्हाला सांगते, की ही स्त्री कुठेतरी गुत्त्यात काम करते.

ज्या वेळी ती आणि डॅडी घराच्या दुसऱ्या कोणत्यातरी खोलीत व्यग्र असतात, त्या वेळी आम्ही कोटहँगरच्या दिवाणखान्यात आरामात बसतो. झोपी जातो. सकाळी डॅडी आम्हाला घरी घेऊन जातात.

नंतर ते ममाला आणि नवीन बाळाला आगायला हॉस्पिटलला जातात. त्या बाळाला बेथनी म्हणायचं ठरलंय. तिचं ते रूप, तेही छोटंसं. तिची छोटी बोटं आणि तिचे मोठे डोळे, यामुळे मला तिच्याबद्दल प्रेम वाटतं.

जेव्हा कुणी पाहत नाही असं मला वाटतं, तेव्हा मी त्या बाळाला उचलून माझ्या हातात घेतो, पण सर्वच पाहत असतात... ममा, दाई आणि सर्व कुटुंबीय, अगदी नॅनसुद्धा... आणि अनेक हात तिला घेण्यासाठी ताबडतोब पुढे होतात. त्यांना त्या बाळाचं माझ्यापासून रक्षण करायचं असतं, कारण मी वाईट मुलगा आहे, हे त्यांना माहीत आहे. मी बेथनीला काळजीपूर्वक धरतो. मी तिच्या त्या सुरकुतलेल्या चेहऱ्याकडे पाहतो आणि हसतो. ती माझ्याकडे मोठ्या मोठ्या डोळ्यांनी पाहते. लोक माझ्याबद्दल काय म्हणतात, ते तिला काहीच कळत नाही. ती माझ्यावर विश्वास ठेवते आणि मी तिच्यावर प्रेम करतो.

■

४

मी पुढच्या खोलीत बसलोय. विस्तवाच्या तीन पट्ट्या पेटलेल्या आहेत आणि मी एका स्त्रीशी बोलतोय. ती ममा एवढी वयानं नाही; पण तशी मोठी आहे. ती मनोविकारतज्ज्ञ आहे. शाळेनं तिला पाठवलंय. मी इतर मुलांना मारण्याचा नेहमी प्रयत्न का करतो, हे ती मला विचारत आहे.

मी तिच्या प्रश्नांची उत्तरं सयुक्तिकपणे देण्याचा प्रयत्न करतो; परंतु मी खरोखरच इथे नाहीये. मी वर झाडाच्या उंच फांद्यांवर बसून आम्हाला पाहत आहे. तिथे एक स्त्री मांडीवर केशरी रंगाची फाईल घेऊन पुढे वाकलेली आहे आणि तिथे एक मूल खुर्चीत एकटं पडून आहे. जणू काही ते तिच्यापासून पुरेसं दूर जाऊ शकत नाहीये. ते मूल मी आहे; पण मी ते नाहीये, कारण ती सारखी हिंसेबद्दल बोलत आहे आणि हिंसा म्हणजे काय, हेच मला माहीत नाही. खेळायच्या मैदानात जो काही मारण्याचा प्रकार मी करतो तेवढाच; पण ते सर्व दुसराच कोणीतरी करत आहे. खरं तर मी तसा आतून नाही.

मी तिला काही वेळा भेटतो आणि ती माझ्या ममाला आणि डॅडींना काही सुचवते. ती अशी काही विलक्षण सूचना करते, की माझ्या डोळ्यांची बुबुळं बाहेरच येतात. तिला असं वाटतं, की मी बॉक्सिंग केलं, तर माझ्या आक्रमकतेला बाहेर पडण्यासाठी वाट मिळेल. मला यापुढे बॉक्सिंगचे धडे घ्यायचे आहेत, त्यामुळे आता माझं मारामारीतील कौशल्य दाखविण्याची संधी मला मिळणार आहे आणि त्यामुळे इतर मुलांना चांगलं ठोकून काढणं मला जमणार आहे. त्या मनोविकारतज्ज्ञ बाईमुळेच हे घडतं.

शेन आणि माझं त्या बाईबद्दलचं खासगीत एकच मत आहे. आम्हाला असं वाटतं, की मी तिच्याशी न बोलता ममानं तिच्याशी बोलायला हवं.

मला आमच्या रस्त्यावरील एका जोडप्याला भेटायला पाठवलं जातं. ममा त्यांच्या घरी साफसफाईचं काम करते आणि काहीतरी कारणानं ती मला त्यांच्याकडे

जायला सांगते. मी कारण विचारतो, पण ती एवढंच सांगते, की ती दोघं माझी वाट पाहत आहेत. ती दोघं शिक्षक आहेत आणि मिसेस ॲल्बट माझ्या शाळेत शिकवतात आणि त्या मि. जेक्बसच्या सहकारी आहेत. मी आता नवीन वर्गात आहे, त्यामुळे मि. जेक्बसच्या पाकिटाच्या आतल्या बाजूला होणाऱ्या माझ्या भेटी संपल्या आहेत. त्यांनी मला कधीच पकडलं नाही. मी त्यांच्याकडे कशी चोरी करत असे, हे काही वेळा मला आठवलं, की त्यातील सारी गंमतच संपल्यामुळे मला चुकल्याचुकल्यासारखं वाटतं.

मी जात असताना त्या रिकाम्या शाळेच्या आवारात एक मुलांची टोळी जमत आहे. मला रविवारची सकाळ त्या शिक्षक जोडप्याबरोबर फुकट घालवायची इच्छा नाही, त्यामुळे त्यांच्या दरवाजात उभं राहून त्यांना मी कशासाठी हवाय, असं विचारायचं ठरवतो; पण ब्रायन ॲल्बट जेव्हा दरवाजा उघडतात, तेव्हा ते माझं इतकं हार्दिक स्वागत करतात, की मी सरळ त्यांच्या घरात जातो. तेही मोठे आहेत, पण म्हातारे नाहीत. त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट रेषा आहेत, जणू काही त्या कुणी कोरून काढल्यात.

बाहेरून त्यांचं घर आमच्या घरासारखंच वाटतं. त्याच लाल विटा, तशाच खिडक्या, तसेच दरवाजे; पण मी आत जाताच त्याच क्षणी प्रत्येक गोष्ट वेगळी वाटते. त्या खोल्या उजेडानी प्रकाशित आहेत आणि त्यांच्या भिंतीवरील सुंदर चित्रांनी आणि पुस्तकांनी तुमचं स्वागत होतं. तेथे असलेल्या रेकॉर्ड्स स्वारस्यपूर्ण वाटतात. ममाच्या जॉनी मॅथीस आणि डॅडींच्या वेस्टर्नसारख्या त्या नाहीत. मला चित्र काढायला आणि रंगवायला आवडेल का, असं ते विचारतात आणि ते मला स्वयंपाक खोलीत घेऊन जातात. मला फुलांचा गंध येतो. रेडिओ चालू आहे, पण तिथे संगीत नाही, तर कोणीतरी बोलतंय.

"दि आर्चर्स," जिल ॲल्बट सांगते. ती माझ्याकडे बघून हसते. "नाहीतरी ते संपतच आलंय."

ती रेडिओ बंद करते. मला दिसतं, की बाहेर टेबलवर सर्व रंगवायच्या वस्तू ठेवलेल्या आहेत. ती दोघं मला कागद कसा रंगवायचा आणि त्याची वेगवेगळ्या आकारात कशी घडी घालायची ते दाखवतात. हे फारच स्वारस्यपूर्ण आहे आणि मी त्यात गुंगून जातो.

ती दोघं खूप छान आहेत. जेव्हा आम्ही खाण्यासाठी काम थांबवतो, तेव्हा ते मला प्रश्न विचारतात आणि माझी उत्तरं ऐकतात. मि. ॲल्बट काहीतरी म्हणतात. मग मिसेस ॲल्बट काहीतरी म्हणते, मी काहीतरी म्हणतो आणि आमचं बोलणं अगदी सहज चालू राहतं. हे चेंडू एकमेकांकडे टाकण्यासारखं आहे. आमच्या घरात, खेळायच्या मैदानावर नुसते हुंकार ऐकू येतात आणि लोक फक्त एकच

शब्द बोलतात किंवा काहीच बोलत नाहीत किंवा त्यांना जे वाटतं, ते तरी ते बोलत नाहीत. मग तुम्हाला गप्प राहायला सांगितलं जातं. शेवटचा माणूस काय बोलला, ते कुणी ऐकत नाही. जर त्यांनी त्यांच्याशी असहमत व्हायचं ठरवलं, तर मग खरं बोलणं सुरू होतं ते वादविवादाचं. या ॲल्बट्स प्रमाणे संवादाच्या जगात राहायचं, म्हणजे कसं असेल, याची मी कल्पना करण्याचा प्रयत्न करतो. असं जग, तिथे तुम्ही रेडिओवरील संवाद ऐकू शकता.

जेव्हा रविवारच्या रात्रीसाठी घरी जायची वेळ होते, तेव्हा मी आश्चर्यचकित होतो. मी पाच मिनिटांपूर्वीच त्यांच्याकडे आलो होतो, असंच मला वाटतं. ॲल्बट्स माझ्या कामाचं कौतुक करतात आणि मी तिथे गेल्यामुळे त्यांना आनंद वाटला, असंही सांगतात. ते मग मला परत जायला सांगतात आणि मीही मला घरी जायला आवडेल, असं सांगतो. त्या रेनॉल्ड स्ट्रीटवरून परत जाताना मला काहीतरी वेगळं वाटतं. शाळेच्या रिकाम्या पटांगणात मुलांची एक मोठी टोळी खेळत आहे. काही मुलं छपरावर बसली आहेत. हा खेळ अटीतटीचा आहे आणि त्यामुळे पोलिसांची गाडी येणार हे नक्की. अचानक मी आज लोकांना मारणाऱ्या आणि चोरी करणाऱ्या मुलाऐवजी चांगला मुलगा झालोय आणि मला ते आवडलंय.

ममा माझ्यासाठी पुढचा दरवाजा उघडते. ती माझ्याकडे बघतही नाही, हसतही नाही आणि स्वयंपाक खोलीकडे जाण्यासाठी वळते. मी तिच्या पाठोपाठ घरात शिरतो. बेथनी सोडून प्रत्येक जण माझ्याकडे दुर्लक्षच करतो. ती आता चालायला लागलीय आणि मी तिचा दुस्वास करायला शिकलोय. आम्ही सर्वच तिचा दुस्वास करतो, कारण प्रत्येक जण तिचे जरा जास्तच लाड करतात, अगदी डॅडीसुद्धा. ममा तिला जराही सोडत नाही. मला वाटतं, की ज्या मिठ्या आणि पाप्या मला मिळायला हव्यात, त्या सर्व बेथनीला मिळतात; परंतु आज जेव्हा प्रत्येक जण मी जणू अदृश्य असल्यागत माझ्याशी वागतोय, अशा वेळी बेथनी माझ्याकडे धावत येते. मी घरी आल्यामुळे ती ख़ूश झाली आहे, याचा मला आनंद वाटतो. मी ॲल्बट्स जसं घरी बोलतात, तसं तिच्याशी बोलतो. ते एकतर्फी आहे; पण तिला ते आवडताना दिसतं. जेव्हा केली आणि ममा ओव्हनमधून जेवण काढत असतात, तेव्हा मी स्वयंपाकघरात थांबतो.

"नुसता तिथे उभा राहू नकोस. ओव्हनचा दरवाजा लाव." केली माझ्यावर खेकसते.

"बाजूला हो." ममा सांगते.

त्या दोघी मग ते भाजलेलं मांस कसं कापायचं, यावर चर्चा करू लागतात. ज्या प्रकाशमय आणि मैत्रीपूर्ण वातावरण असलेल्या स्वयंपाकघरात मी सकाळ घालवली होती, त्याच्याशी तुलना करताना ही जागा अगदी निरस वाटते. मला

रविवारच्या जेवणाचा वास येत नाही. मला वास येतो, तो या घरातील नासलेल्या वातावरणाचा.

काही आठवड्यांनंतर मी त्या शाळेच्या रिकाम्या अंगणात रविवारी दुपारी घुटमळत असतो. त्या वेळी काही गोटे केलेली मुलं स्ट्रॉंग बोच्या काही बाटल्या घेऊन येतात. ती माझ्याहून चार-पाच वर्षांनी मोठी आहेत. खरं तर ती केलीच्या वयाची आहेत आणि ती शाळेत त्यांच्याबरोबर आहे, त्यामुळे एका तऱ्हेनं मी त्यांना ओळखतो.

"छोटेखानी चुत्या," ते म्हणतात. हे तसं मैत्रीपूर्ण स्वागतच. ते सफरचंदाच्या रसाची बाटली उघडतात आणि माझ्याकडे ती सारतात. मी हे असं बऱ्याच वेळा केल्याचं नाटक करत ती घेतो; परंतु मी हे केलेलं नाही आणि पहिला घोट घेतल्यावरच मी आश्चर्यचकित होतो.

स्ट्रॉंग बो हे पेय सफरचंद आणि लिंबाच्या सरबतासारखं गोड, पण त्याबरोबर कडूही आहे. ते माझ्या शरीरातून असं सरकत जातं, की त्याची सणक माझ्या हाता-पायांच्या बोटांपर्यंत आणि माझ्या डोक्यातही जाते. मी आणखी थोडी पितो. ती माझ्या पोटात ऊब आणते. मी आणखी पितो. कुणीतरी माझ्यापुढे सिगरेट सरकवतो. मी ती ओढतो आणि थुंकतोही. मी आणखी थोडी पितो. शाळेचं ते पटांगण आता अंधुक दिसू लागतं आणि शाळेची ती इमारत इतकी झुकल्यासारखी वाटते, की ती कोसळेलच. ही मोठी गंमत आहे. मी तसा आरामात आहे. मी हसतो. मला कशाचीच भीती वाटत नाही. मी मोठा आहे आणि काही गोटे केलेल्या मुलांबरोबर आहे.

आम्ही सर्वच झिंगलेलो आहोत; पण मी सर्वांत जास्त. ती मुलं माझ्याकडे बघतात आणि हसतात. मग आम्ही थुंकत, शिव्या देत, सिगरेट ओढत आणि रस्त्यावर येणाऱ्या-जाणाऱ्या लहान मुलांना मारत जातो.

वाटेत भेटणाऱ्या म्हाताऱ्या स्त्रियांना आम्ही, "चुत्यांनो जा." असं ओरडतो, मग हसतो आणि आणखी थुंकतो.

आम्ही कुठे जातोय, ते मला माहीत नाही. मला त्याची पर्वाही नाही. फरसबंदी आता घराशी काटकोनात नाही आणि रस्त्यालाही समांतर नाही. आता आमच्या डोक्यावर आकाश कॅलिडोस्कोपसारखं गोलाकार फिरत आहे. आम्ही लडखडतो आणि पडू नये म्हणून परस्परांना घट्ट पकडतो.

आम्ही त्या मुलांपैकी एकाच्या घरी येतो आणि त्याचा ड्रम घेऊन वाजवायला लागतो. आम्ही काही बेताल, माथेफिरूसारखं संगीत सुरू करतो आणि स्वत:लाच हसतो. मग मी हात वाजवणं थांबवतो आणि गालिच्यावर पडतो. तिथे एक मोठी बहीण माझ्यावर वाकलेली आहे आणि तिच्यामागे छत आहे आणि मग माझ्या

लक्षात येतं, की काहीतरी चुकलंय. मला ओकारी येईलसं वाटतं. ती मग मला बाथरूमकडे घेऊन जाते आणि माझी काळजी घेते.

जेव्हा मी घरी येतो, तेव्हा मी वेगळा असतो. मी माझ्या आयुष्यातील एका नव्या पर्वाची सुरुवात केलेली आहे. जरी मी आठच वर्षांचा असलो, तरी मी मोठा आहे, कारण मी त्या गुळगुळीत गोटेवाल्या मुलांबरोबर दारू घेतलीय. या संध्याकाळी माझ्या डोक्यात घाव बसतायत. जणू काही आम्ही अजूनही ड्रम वाजवतोय; परंतु मला त्याची पर्वा नाही. मला कसं छान, समाधानी वाटतंय. मी आता 'पहुंचा हुआ' झालोय. आता त्या घट्ट बांधलेल्या दोऱ्या आणि पळून जाण्याच्या भावनेनं मी रात्री जागा होत नाही.

मी बऱ्याच वेळेला ॲल्बट्सकडे जातो आणि त्यांच्याबरोबर मी पुन्हा लहान मुलगा होतो. हे बहुधा रविवारीच असतं, कारण मला रविवारी आमच्या घराचा तिटकारा येतो. किंकाळ्या आणि आरडाओरडीचे आवाज माझ्या कानात घुमत असताना मी नरकातून येतो आणि ॲल्बट्स दरवाजाशी येतात, हसतात आणि इतकंच नव्हे, तर ते असंही म्हणतात, "तुला पाहून बरं वाटलं. तू ताज्या हवेची झुळूक आहेस." जरी त्यांना मी युद्धभूमीतील निर्वासित आहे, असं समजलं, तरी ते तसं दाखवणार नाहीत.

मी त्यांच्या त्या शांत स्वयंपाकघरात जातो. आता मी वेगळ्या जगात असतो. इथे मी वेगळा मार्क असतो. जिल ॲल्बट माझ्यासाठी काहीतरी खाणं करते आणि ब्रायन कपाटाच्या डोक्यावरून एक विमानाचा संच खाली काढतात. पहिल्याप्रथम आम्हाला ते सर्व जोडावं लागतं आणि सर्वांत उत्तम म्हणजे आम्हाला ते रंगवावं लागतं. ते मला त्यांच्या स्वयंपाकघरातील टेबलवर सुरुवात करून देतात आणि मी माझं विमान पंखांच्या टोकावर छान गडद रंगात... चकित करणाऱ्या लाल आणि निळ्या रंगांचे गोल काढून रंगवतो. मी ते सर्व रंगवतो. याचा शेवट माझी बोटं रंगण्यात होतो. जेव्हा मी काही दिवसांनी परत येतो, तेव्हा विमानाचे रंग सुकलेले असतात. मग आम्ही आमचे कोट घालतो आणि बागेत ते विमान उडवतो. ते वर जातं. हिरवळीवरून पलीकडे जातं. इतकंच नव्हे, तर फुलांच्या ताटव्यावरून त्या मावळतीच्या संधीप्रकाशात ते वर जातं. जरी हिवाळा असला, तरी त्यांची बाग नीटनेटकी आणि झुडपांनी भरलेली आहे आणि इथे माती नीटपणे खणलेली आहे. ते विमान हळूच कुंपणाशी पडतं.

मी ते विमान घरी घेऊन जातो आणि ते तिथे उडवण्याचा प्रयत्न करतो. आमच्या घरात ते तसं जमत नाही. ममा आणि डॅडींची बागेची कल्पना, म्हणजे मोठा खड्डा खणायचा आणि सर्व घाण त्यात टाकायची आणि तो खड्डा बुजवायचा. तिथे हिरवळ नाही, झुडपं नाहीत आणि तिथे फुलं कधीच येत नाहीत. हे विमान

एका पडवीत आपटतं आणि गंजलेल्या कॉटच्या स्प्रिंगच्या आणि सायकलींच्या हँडलबारच्या राशीत अडकतं.

जेव्हा ॲल्बट्स त्या विमानाबद्दल विचारतात, त्या वेळी आमच्या बागेमुळे मला किती वाईट वाटतं, ते मी त्यांना सांगतो. ते बीज कॅटलॉग पुढे करतात आणि आमची बाग सुशोभित करण्यासाठी मी काहीतरी निवड करू शकेन, असं मला सांगतात. कदाचित, डॅफोडिल्स लावण्यासाठी अजून काही अवधी आहे, त्यामुळे मी काही डॅफोडिल्सचे कांदे आणि एक सुंदरसं रेड हॉट पोकर हे झुडूप निवडतो आणि ते डॅफोडिल्सचे कांदे ताबडतोब येतात आणि रेड हॉट पोकरचं झुडूप वसंत ऋतूत एखाद्या छोट्याशा बुचासारखं उगवेल. मी त्याच्यासाठी एक छोटा खड्डा खणेन आणि ते जेव्हा वाढेल, तेव्हा आमच्या बागेचं स्वरूपच पालटेल.

मी ते डॅफोडिल्सचे कांदे लावतो आणि वाट पाहतो. जेव्हा मी ॲल्बट्सकडे असतो, तेव्हा चांगलं वागणं सोपं असतं. त्यांच्याकडे चोरी करावी, असं माझ्या मनातही येत नाही; पण दुसरं कोणी त्या दृष्टीनं सुरक्षित नाही. प्रत्येक रात्री ममाला तिची पर्स उशाखाली ठेवून झोपावं लागतं. जेव्हा ती पर्स वर घेऊन जाताना मी पाहतो, तेव्हा मला वाईट वाटतं; परंतु ती योग्य करतेय, हेही मी जाणतो. जर तिनं पर्स खालच्या मजल्यावर ठेवली, तर मी चोरी करीन. मी स्वत:ला आवरू शकत नाही.

मी फारसा घरी नसतोच. रस्त्यावरची इतर भुलं, ही माझं एक प्रकारचं कुटुंबच आहे. मी शाळेच्या पटांगणात अवेळीही घुटमळत असतो. कोणीतरी लवकर किंवा काही वेळानं येईल, हे मला ठाऊक असतं आणि आज ट्रेव्हर आलाय.

ट्रेव्हर हा चांगल्या घराण्यातील मुलगा आहे. त्याची ममा घरीच असते आणि तिच्याकडे स्वत:बद्दल सांगण्यासारखं भरपूर आहे आणि त्याचे डॅडी एक भिकार जुनाट कार चालवतात. ट्रेव्हर माझ्याहून पाच वर्षांनी मोठा आहे. तो बहुधा तेरा वर्षांचा असावा. तो उंच, लुकडा आणि दात बाहेर आलेला आहे. तो जेव्हा माझ्याशी बोलतो, तेव्हा मी खुश होतो. मोठ्या मुलांबरोबर असताना मी फार महत्त्वाचा असल्यागत मला वाटतं. तो मला सिगरेट देतो. आम्ही बरोबर सिगरेट ओढतो आणि तो माझा मित्र असल्यासारखं दिसतं, त्यामुळे मला बरं वाटतं.

तो म्हणतो, की आपण गुरांच्या बाजाराकडे जायला हवं, कारण गुरांच्या गोठ्याच्या छपरावरून चालणं हे फार धोक्याचं आहे. मला धोकादायक गोष्टी करणं आवडतं आणि मी कधीही या आधी गुरांच्या बाजारात गेलेलो नाही. बाजाराच्या दिवशी हंबरण्याचा, बकऱ्यांच्या बेंबटण्याचा आणि ट्रक्स मागे घेण्याच्या आवाजाचा तिथे नुसता गोंधळ असतो; पण तो बाजार रिकामा असताना मी तिथे कधीच गेलेलो नाही.

आम्ही बराच लांबचा वळसा घेतो. रेनॉल्ड स्ट्रीट, मग क्रिकेटच्या मैदानावरून सरळ चेस्टर रस्त्यावर जातो. किड्डरमिन्स्टरमधील काही घरं लाल विटेची आहेत; परंतु बरीचशी आधुनिकही आहेत आणि घरं, दुकानं आणि फॅक्टरीज अगणित आहेत. मधली हिरवळ या खेळण्याच्या जागा आहेत आणि मध्येच पडीक जमीन आहे आणि सर्वांत सुरेख जागा, म्हणजे जिथे चेस्टनटची झाडं क्रिकेटमैदानाभोवती लावलेली आहेत ती जागा. मी तेथून जाताना त्यांच्या गुळगुळीत बुंध्यांना स्पर्श करतो. प्रत्येक ऑक्टोबरमध्ये मी त्यांच्यावर चढण्याचा प्रयत्न करतो, कारण त्यामुळे मला त्यांची फळं हलवून पाडता येतील; परंतु मी तेवढा मोठा कधीच झालेला नाही. आता मी आठ वर्षांचा आहे, त्यामुळे ते कदाचित जमेल. कदाचित, तो अजूनही माझा मित्र असला, तर ट्रेव्हर मला मदत करील. आम्ही गुरांच्या बाजाराकडे पोहोचतो. तिथे आम्हाला रिकाम्या कॉंक्रिटच्या शेड्स दिसतात. तो गोठ्यांबद्दल बोलला ते बरोबर आहे. आम्ही त्यांच्या छपरावरून चालत जाऊन कोपऱ्यावरून उड्या मारू शकतो आणि ती गंमतच आहे, ट्रेव्हरची गंमत. आम्ही थोडा वेळ खेळतो. मग ट्रेव्हर गोठ्यात जातो आणि मीही त्याच्याबरोबर उडी मारून आत जातो. मला वाटतं, की तो मला दुसरी सिगरेट देणार आहे; पण तो दुसरंच काही करतो. तो ते असे करतो की ते जणू आमचा खेळाचाच भाग आहे आणि तो ते इतकं अचानक करतो, की ते मी त्याला करू देतो. तो माझी पँट आणि आतली चड्डी खाली ओढतो.

मी आश्चर्यचकित होतो. मी माझं गुप्तेंद्रिय तिथे कसलातरी संसर्ग झाला होता, तेव्हाही माझ्या ममाला दाखवलं नव्हतं, मग ट्रेव्हरला ते का बघावंसं वाटतंय? तो जेव्हा माझं गुप्तेंद्रिय धरतो, तेव्हा मी त्याच्या डोक्याकडे टक लावून पाहतो. तो ते त्याच्या तोंडात धरतो. मी काय करायचं, ते मला समजत नाही. मला काय वाटायला हवं, तेही मला समजत नाही. मला काहीच वाटत नाही. जेव्हा डॅडी मला मारतात आणि मी हवेत तरंगतो, तेव्हा एक माणूस एका मुलाला मारताना एका मोठ्या झाडाच्या फांद्यांतून मी पाहतो, तसंच हे आहे. आता मी तसाच आमच्या डोक्यांच्यावर आहे आणि जेव्हा तो माझं गुप्तेंद्रिय तोंडात धरतो, तेव्हा ट्रेव्हरचं काळं डोकं मी पाहत आहे.

तो ते जोरानं चोखतो. मी त्याच्याकडे पाहतो. काही मिनिटांनंतर तो थांबतो. तो जेव्हा उभा राहतो, तेव्हा त्याच्याकडे बघणं मी टाळतो. मी माझ्या पँट पटकन वर घेतो. मला माझा श्वासोच्छ्वास ऐकू येतो. तो जोरात आणि भरभर येतो. माझा मित्र ट्रेव्हरनं घाणेरडं कृत्य केलंय, हे मी जाणतो. ते का, त्याची मला कल्पना नाही.

ट्रेव्हर माझा खांदा धरतो आणि हलवतो. तेव्हा मला त्याच्याकडे पाहावं लागतं.

"तू कुणालाही सांगू नको बघ." तो मला म्हणतो. आता तो मला माझ्या मित्रासारखा वाटत नाही. "त्याचा विचारही करू नको, कारण ते तुझ्यावर विश्वासही ठेवणार नाहीत."

त्याचं म्हणणं बहुतेक बरोबर आहे. कुणीही माझ्यावर विश्वास ठेवत नाही.

"तू सांगितलंस, तर मी म्हणेन, की मी कधीच केलेलं नाही आणि ते माझ्यावर विश्वास ठेवतील."

मी वाईट आहे आणि सर्वांना ते माहीत आहे. मी खोटारडा आहे, हेही सर्वांना माहीत आहे, त्यामुळे कोणालाही हे सांगण्यात अर्थ नाही आणि सांगायचं तरी काय? गुप्तेंद्रिय हे लघवी करण्यासाठी आहे, असं मला वाटायचं; पण आता मला माहीत झालंय, की ते असं काही आहे, जे इतर लोक तोंडात धरतात. ही आणखीन एक बर्थ डे पार्टीसारखी विचित्र गोष्ट आहे, जी लोक करतात. शिवाय ते तसं नाही. वाढदिवसांच्या पार्ट्यात कदाचित गंमत नसेल; परंतु ट्रेव्हरनं ज्याप्रमाणे केलं त्याप्रमाणे तिथे मला खूप खालच्या पातळीवर आणून दुःखी केलं जात नाही.

मी जेव्हा घरी जातो, तेव्हा मी नेहमीसारखाच अदृश्य असल्यासारखा आहे. माझ्याकडे दुर्लक्ष केलं जातं. केली आणि शेनची टीव्ही चॅनेलवरून वादावादी चालू आहे. ममा बेथनीचं करण्यात गर्क आहे. मी आता वेगळा आहे, हे कुणास समजत नाही आणि मलाही मी कसा आणि का वेगळा आहे, त्याची खात्री नाही.

■

५

माझी डॅफोडिल्स फुलली आहेत आणि ती विलक्षण सुंदर दिसतायत. मला त्यांचा अभिमान वाटतो आणि रेड हॉट पोकरचा कांदा आल्यावर तो लावताना मी विशेष खबरदारी घेतो. ममाला त्या डॅफोडिल्सबद्दल फारसं प्रेम वाटत नाही. उन्हाळ्यात तो जेव्हा शेवटी फुलतो, त्या वेळी डॅफोडिल्सचा बहर संपलेला असतो. ते रेड हॉट पोकर हे एकच फूल शिल्लक आहे आणि त्या विध्वंस झालेल्या वल्ह्यांच्या राशींत, कुत्र्यांनी केलेल्या घाणीत आणि बिन चाकी सायकलींच्या ढिगाऱ्यात ते अगदी दयनीय दिसतं, हे मला माहीत आहे. मी निराश होतो. शेन मिस्कील हसतो आणि केलीला स्वारस्यच नाही. ममा त्याचा फोटो घेते, पण ती माझ्याकडे विचित्र नजरेनं बघते. मला ॲल्बट्स यांच्या घरी जायला आणि त्यांच्या बागेतील फुलं पाहायला बरं वाटतं. ब्रायन ॲल्बट्स कात्रीनं काही झुडपं कापत असतात आणि काही बांधत असतात. ते पुढच्या वर्षीच्या फुलांबद्दल जिल ॲल्बटशी चर्चा करत असतात आणि त्यामुळे मला बरं वाटतं, कारण मला माहीत आहे, की ब्रायन ॲल्बट्स हे मूर्ख नाहीत.

जेव्हा डॅडी घरी परततात, ते जास्त वेळा बाहेर जातात आणि ते नेहमीपेक्षा जास्त पितात. माझी ममा नेहमीच त्यांच्यावर रागावलेली असते. ती आणि नॅन स्वयंपाकघरात बरंच काही हळू आवाजात बोलत असतात. एका रात्री डॅडी इतकं पितात, की ते स्टील वर्कर्स क्लबवरून कार चालवत घरी येऊ शकत नाहीत आणि माझी मोठी बहीण केली त्यांच्यासाठी कार चालवते. ती बारा वर्षांची आहे आणि ती त्यांची तपकिरी कॅप्री कार सर्व रस्ताभर चालवून रेनॉल्ड स्ट्रीटला घेऊन येते. मला ते करायला परवानगी मिळायला हवी होती, असं वाटतं. दुसऱ्या एका वेळी ते कॅप्री घेऊन घरी येतात; पण त्यात जिकडेतिकडे ओकारी केलेली असते. ते शेनला साफ करण्यासाठी पाच पौंडाची नोट देऊ करतात; पण ममा रागावलेली असते आणि ती ते त्याला करू देत नाही.

मी त्यानंतर ट्रेव्हरला फारसं कधी पाहिलेलं नाही; परंतु एकदा तो एका दुपारी दिसतो, तेव्हा मी नेहमीप्रमाणे रेनॉल्ड स्ट्रीटवर घुटमळत असतो. मला ती गुरांच्या बाजारात घडलेली गोष्ट आठवते; पण तो एक विचित्र, क्वचित घडणारा प्रसंग होता आणि त्याबद्दल कुणालाच न सांगितल्यामुळे जणू काही तो घडलाच नाही, असं मला वाटतं. मला त्याच्याशी बोलताना लाज वाटते. तो माझा मित्र आहे, याबद्दल मला खात्री नाही; परंतु तो आज माझ्याशी छान वागतोय आणि तो मला काही सिगरेट देईल, असं सांगतोय. आम्ही शाळेच्या पटांगणात जातो. तिथे दुसरं कोणीच नसतं. मला उगाचच भीती वाटू लागते. आम्ही एका उतारावर बसतो आणि सिगरेट ओढतो.

मग अचानक तो मला धरतो आणि जमिनीवर पाडतो. तो एका झटक्यात माझी पँट आणि चड्डी खाली ओढतो आणि त्याबरोबर त्याचीही. मग तो माझ्यावर पालथा होतो. आता तो काय करतोय? आम्ही मारामारी करणार, असं काही वाटत नाही आणि माझी सिगरेट अजूनही हातात जळत आहे.

तो आपला देह माझ्या देहावर फेकतो. मी डोळे बंद करतो. मी नेहमीसारखा शाळेच्या छपरावर, एका उंच झाडावर जातो आणि आम्हाला तेथून पाहतो.

तो माझ्यावर लोळतो. आमची गुप्तेंद्रियं एकत्र येतात आणि तो माझ्या देहावर वर-खाली होण्याची क्रिया सुरू करतो. जर मी डोळे उघडले, तर मला त्याच्या चेहऱ्यावरची सर्व हाडं दिसू शकतील. मी डोळे पुन्हा बंद करतो आणि पुन्हा एकदा वरून खाली त्या दोन मुलांकडे पाहत राहतो. त्यांचे देह एकमेकांवर चेपलेले आहेत. तो खाली असलेला मुलगा इतका छोटा आहे, की तो जवळजवळ झाकला गेलेला आहे. कदाचित, जिहोवा असणं म्हणजे असंच असेल, नेहमी पाहत राहायचं. तो त्या क्षणी आमच्याकडे पाहत असणार.

थोड्या वेळानं ट्रेव्हर थांबतो. त्याचा चेहरा लाल झालेला असतो. मी माझी पँट कशीबशी वर ओढतो.

"सांगू नको." ट्रेव्हर मला कठोर आवाजात आठवण करून देतो. "कारण मी सांगेन मी असं कधीही केलेलं नाही आणि तुझ्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही."

आम्ही काय करत होतो, हे मला समजत नाही. माझे डॅडी मला नेहमीच मूर्ख म्हणतात. त्यांच्या म्हणण्याचा हा तर अर्थ नसेल?

आम्ही आपापल्या घरी जातो. मी कुणाला काही सांगत नाही. इतकंच नव्हे, तर मी हा प्रयोग लहान मुलावर करतो. मी ट्रेव्हर असतो आणि तो मुलगा मी असतो. तो शाळा सुटल्यावर आमच्या घरी असतो, कारण माझी ममा त्याला बघेल, असं ठरलेलं असतं. जेव्हा आम्ही झोपायच्या खोलीत येतो, तेव्हा ट्रेव्हरनं

मला जसं शाळेच्या मैदानावर उताणं पाडलं आणि पँट काढली, तसं मी करतो. त्याची पँट काढतो आणि त्याच्यावर चढतो आणि जसं ट्रेव्हरनं केलं, तसा मी थोडा पुढे-मागे होतो. मी हे असं का करत आहे, हेही मला समजत नाही. मला काही जाणवत नाही. त्या मुलाच्या चेहऱ्यावर नजर टाकल्यावर त्यालाही काही न जाणवल्याचं मला समजतं.

"कुणालाही दुसऱ्याला सांगू नको." मी मागाहून म्हणतो. "कुणीही तुझ्यावर विश्वास ठेवणार नाही. मी तुझ्याहून मोठा आहे आणि मी सांगेन, की मी कधीही..."

तो हळूच मान हलवतो. मला त्याच्या डोळ्यांत काहीही भावना दिसत नाहीत.

पण आता माझी उत्सुकता जागी झालीय. ट्रेव्हरनं एका दरवाजाचं कुलूप काढलंय आणि तो माझ्यासाठी उघडलाय. फक्त फटच उघडली आहे; पण माझी खात्री आहे, की आत काहीतरी आहे.

शाळा सुटल्यावर आमच्या घरी येणारी एक मुलगी आहे आणि का, ते न समजता मी ब्लँकेट घेऊन तिला बागेतील कुत्र्यांच्या घरात घेऊन जातो. आम्ही ब्लँकेटवर झोपतो. कुत्र्याचा वास आमच्या अवतीभवती असतो. मी तिच्या कपड्यांत हात घालून चाचपडतो. मी तिची चड्डी काढतो. तिचा देह निराळाच आहे. तो माझ्या देहाहून वेगळा आहे. माझ्याहून मांसल आणि तिच्या दोन पायांमध्ये एका गोष्टीची उणीव जाणवते. माझी बोटं तिचं सर्व शरीर चाचपडून पाहतात. ती पाण्यासारखी मऊ आहे आणि उत्तेजित करणारी आहे. माझं हृदय जोराजोरात धडधडत असतं. मला तिला पुन्हा पुन्हा स्पर्श करावासा वाटतो. माझ्यात खोलवर छोट्या छोट्या तारा आहेत आणि त्यावर काहीतरी जोराजोरानं वाजतंय, त्यामुळे बरं वाटतंय. आता मला समजतं, की हीच ती भावना जिच्या शोधात ट्रेव्हर होता.

त्यानंतर जेव्हा शक्य होईल, तेव्हा मी मुलींना स्पर्श करतो. माझ्या लक्षात येतं, की माझ्या वयाच्या मुली, या मोठ्या मुलींपेक्षा कमी उत्तेजित करतात. जशा मुली मोठ्या होतात, तशा मांसल होतात आणि त्या जवळजवळ नेहमी मला स्पर्श करून देतात. माझ्या बहिणीची मैत्रीण तेरा, कदाचित चौदा वर्षांची आहे. ती मला रेनॉल्ड स्ट्रीटच्यामागे एका गल्लीत गाठते. तिला माझं वय माहीत असणार; पण तिला त्याची पर्वा नाही.

"तुझ्याकडे काय आहे, ते तू मला दाखव." ती मला सांगते, "आणि मग मी माझं तुला दाखवीन."

ती कशाबद्दल बोलतेय, ते मला माहीत आहे. मी तिच्या गुळगुळीत तांबूस कातडीकडे टक लावून पाहतो. मला तिच्या कातडीला स्पर्श करायला आवडेल, तिच्या सर्वांगाला मला स्पर्श करायला आवडेल. ती मला शाळेच्या निर्जन पटांगणात घेऊन जाते. आम्ही आग लागल्यावर बाहेर पडण्याचं दार असलेल्या उतारावर

जातो. तिथे जुन्या विटांच्या कमानी आहेत. तिथे तुम्ही लपू शकता. अशा ठिकाणी ती मला नेते. मला भिंतीशी दाबून ठेवते. ती जेव्हा माझी पँट आणि चड्डी आणि स्वत:ची पँट आणि चड्डी खाली ओढते, तेव्हा मला थोडी भीती वाटते. तिला कशाचीतरी तीव्रतेनं जरूर आहे आणि ती रागावली आहे, असं वाटतं. जेव्हा आम्ही आमचे गुह्यभाग एकमेकांवर घासतो, तेव्हा मला खूप उत्तेजित आणि खोडसाळ वाटतं. माझ्या देहाला गुदगुल्या होतात. माझं रक्त धावत असल्यासारखं वाटतं आणि माझ्या हृदयाचे ठोके आक्रमक सैन्यासारखे आवाज करतात. मग अचानक हा खेळ संपल्याचं ती ठरवते. आम्ही आमच्या चड्ड्या, पँट्स घालतो आणि गल्लीकडे वळतो आणि ज्या दिशेला आम्ही जायचे असतो, तिकडे चालू लागतो. आम्ही एकमेकांशी जराही बोललेलोही नसतो.

मी मॅथ्यूबरोबर म्हणजे या क्षणीच्या आताच्या माझ्या मित्राबरोबर रेनॉल्ड स्ट्रीटच्या मागच्या बाजूला असलेल्या पडीक जमिनीवरच्या खाजकुयलीच्या जागेत खणतो आणि आम्हाला एक मासिकांनी भरलेली बॅग सापडते. त्यात चित्रंही आहेत. ती चित्रं मोठ्या माणसांची आहेत आणि तीसुद्धा संपूर्ण नागड्या अवस्थेतील. त्यातील स्त्रियांची मोठ्यामोठ्या फळांसारखी लटकणारी वक्षस्थळं आहेत आणि ते पुरुष काहीसे विचित्र आणि केसाळ आहेत. ते एकमेकांशी त्याच प्रकारचे उद्योग करत आहेत, जो मी मुलींशी करतो. बरंचसं जास्ती, कारण ते पुरुष आपली इंद्रियं आत घालत आहेत. होय, त्या गुलाबी स्त्रियांमध्ये. मासिकानं जवळून चित्रं घेतल्यामुळे ते कसं करतायत, ते दिसतं. त्यांची इंद्रियं माझ्याहून वेगळी आहेत, एखाद्या मोठ्या ध्वजस्तंभासारखी.

"हे सेक्स आहे." मॅथ्यू माहीतगारासारखं सांगतो. "हे सेक्स आहे, कदाचित संभोग असेल किंवा दोन्ही."

मॅथ्यू आणि मी पानं उलटवतो आणि बघत राहतो. आम्हाला हसावं, बोट दाखवावं, की लाज वाटावी हे कळत नाही. ती चित्रं भुरळ पाडतात आणि त्यामुळे मला नवीन ज्ञान मिळतं. जेव्हा मी मुलींना स्पर्श करतो, तेव्हा मी करतो ते सेक्स आहे. सर्व मोठी माणसं हेच करतात. माझे डॅडी करतात, ते हेच.

आता मला समजतं, की ममा त्यांच्यावर का रागावते ते. केवळ त्यांच्या पिण्यामुळे नव्हे, तर बाईमुळे ती रागावते. काही वर्षांपूर्वी बेथनी जन्माला आली, तेव्हाची ती रापलेली बाई नव्हे, पण त्यांच्याबरोबर आम्ही पाहिलेली ती दुसरी बाई. डॅडी तिच्याबरोबर सेक्स करतात आणि जेव्हा ममा डॅडींच्या दुष्टपणाबद्दल किंचाळते आणि ओरडते, तेव्हा ती सेक्सबद्दलच बोलत असते. हे असं काही आहे, जे पुरुष वेगवेगळ्या लोकांबरोबर करत असतात आणि त्या वेळी त्यांच्या बायका घरी मुलांजवळ राहतात. हे आता मला समजलंय. ममाला त्याचा इतका का राग येतो,

हे मात्र गूढ आहे.

आमचं घर आतल्या आत शिजत असतं. जेव्हा मी दरवाजातून आत जातो, तेव्हा मला त्या संतापाचा वास येतो. मी तिथे झोपायचं आणि जेवायचं एवढंच करण्याचा प्रयत्न करतो आणि बाकी इतर वेळी मी रस्त्यावर असतो. कधी कधी मी ॲल्बट्सकडे जातो. ते मला त्यांच्या दिवाणखान्यात बसवतात. मी हेडफोन लावून मार्टी फेल्डमन या विनोदी माणसाच्या रेकॉर्ड्स ऐकतो. त्यांच्या सोफ्यावर हसत लोळतो किंवा मी काही चित्रं काढतो. एकदा मी जिलबरोबर केक बनवले आणि एक संत्र्याची बी लावली. जेव्हा जेव्हा मी त्यांच्या घरातून बाहेर पडतो, तेव्हा मी चांगला, छान मुलगा आहे, अशी विचित्र जाणीव मला पुन्हा होते. रात्रीच्या वेळी पलंगावर पडून मी त्यांचा मुलगा आहे, अशी कल्पना करतो.

आता मी नऊ वर्षांचा आहे, जवळजवळ दहा. आता क्रिकेटच्या मैदानाजवळ असलेल्या त्या अवाढव्य चेस्टनटच्या झाडावर मी मदतीशिवाय चढू शकतो आणि त्याची फळं हलवून पाडतो. त्या वेळी इतर मुलं खाली वाट बघत असतात.

मी त्या झाडांच्या वर उंच उंच शेवाळाच्या आणि रुपेरी सालीच्या आणि धावपळ करणाऱ्या कीटकांच्या खासगी जगात जातो. मी हात पुढे कुठे ठेवायचा किंवा पुढचं पाऊल कुठल्या खाचेत ठेवायचं, यावर लक्ष केंद्रित करतो. हे काम इतकं मन गुंतवून ठेवणारं आहे, की जेव्हा मी आजूबाजूला बघतो आणि मी किड्डरमिन्स्टरमध्ये एका झाडावर आहे आणि मी मार्क आहे, तेव्हा याचं मला आश्चर्य वाटतं. मला असं वाटतं, की मी काही वेळ दूर गेलेलो आहे.

मी इतका वर चढतो, की मला थोडी भीती वाटते; पण प्रत्येक जण मला पाहत असतो, म्हणून मी माझ्या पोटावरून पुढे सरकतो आणि फांदीवरून सरकतो. माझ्या अवतीभवती तांबूस होणारी पानं असतात. या पानांचे घोस हातासारखे रचलेले असतात. या झाडावर दहा लाख तरी अशी हिरवी तांबूस बोटं असतील. कदाचित, मी पडलो, तर ती मला धरतील. जेव्हा मी वाकून पाहतो, मला किड्डरमिन्स्टर येथील उंच इमारती, मोडकळीला आलेले गॅस टँक आणि मोडतोड झालेल्या फॅक्टरीज दिसतात. मी पुढे जातो. माझ्या पायांखाली मला एक मोठी पोकळी जाणवते.

मी जेव्हा त्या फांदीच्या टोकाशी जातो, तेव्हा तेथील फळं पाडण्यासाठी काठीनं मारतो. मला ती छोटी टणक फळं खाली दूरवर पडल्याचं ऐकू येतं. मी खाली उतरत नाही. इतर मुलं ती उचलतात आणि मला खाली येण्यासाठी हाका मारतात; परंतु मी काही वेळ थांबणार असल्याचं त्यांना सांगतो.

त्यांच्या पावलांचा आणि बोलण्याचा आवाज लवकरच त्या रहदारीच्या आवाजात नाहीसा होतो. आता मी त्या झाडाबरोबर एकटाच आहे. ते हॉर्स चेस्टनटचं जग

मला आवडतं. कदाचित, मी इथे झोपू शकेन आणि कायमचा इथे राहू शकेन. आता अंधार पडू लागला आहे; परंतु मी हलत नाही. ते झाड मला गुंतवून ठेवतं. जणू काही ते माझ्यावर माया करतं, माझी काळजी घेतं. छोटे प्राणी भरभर माझ्या जवळून पुढे जातात. त्यांना वाटतं, की मी त्या खोडाचाच भाग आहे. मला घरी जाण्याची इच्छा नाही.

जेव्हा खाली असलेल्या गाड्यांचे दिवे लागतात आणि पानांच्या फटीतून आकाशातील तारे दिसू लागतात, तेव्हा मी खाली उतरतो. माझ्या पायांना जमिनीवर आपटल्यामुळे झिणझिण्या येतात. मी उरलेली फळं गोळा करतो आणि ती पोतडीत भरतो. ती मी पाळण्याच्या चाकं लावून केलेल्या ढकलगाडीत घालून घरी घेऊन जातो. मला आत जाऊ नये, असं वाटतं. मी ती फळं पुढच्या वाटेवर ठेवतो. त्यांना चुंधडतो आणि त्यांच्या त्या सुंदर तांबूस दिव्याच्या उजेडात चमकणाऱ्या देहातून त्यांच्या हिरव्या भागातून मोत्यासारखी काटेरी कवचं बाहेर येतात.

ममा दरवाजाशी येते आणि ती माझ्या डोक्यावर फटका मारते.

"त्या येण्याच्या वाटेवर काय घाण केली आहेस ते बघ." ती ओरडते.

मी तिथे जमलेला हिरवा चिखल पायानं दूर सारण्याचा प्रयत्न करतो.

बऱ्याच वेळानं मी ती फळं आत घेऊन जातो. ती माझी वाट पाहत असते. तिच्या मागे घर स्तब्ध असतं. ती आता रागावलेली नसते. तिचा आवाज विचित्र असतो. मी तिच्याकडे पाहतो आणि मला तिचे लालभडक झालेले डोळे आणि सुजलेलं लाल तोंड दिसतं. ती रडत असावी आणि ती भयानक दिसते. मी जायला निघतो, कारण आमच्या घरात भावनेनं उचंबळणं माहीत नाही.

पण मी तेवढा चपळ नाही. ममा मला पकडते आणि आपले हात माझ्याभोवती टाकते आणि आपल्या लोकरीच्या स्वेटरजवळ मला घट्ट धरून ठेवते. मी श्वासोच्छ्वास करू शकत नाही. ती मला गुदमरवतेय. माझी फळं खाली जमिनीवर पडतात. मी तिच्यापासून दूर व्हायचा प्रयत्न करतो; पण ती मला जाऊ देत नाही. आता ती रडत आहे आणि तिचे अश्रू माझ्या डोक्यावर पडत आहेत. मला ते जाणवतात. मी हवा घेण्यासाठी धापा टाकतो. मला तिरस्कार वाटतो, ओकारी येईल असं वाटतं. मला तिला मारावंसं, कापावंसं आणि तिच्यावर ओकारी करावी, असं वाटतं. डोक्यानं दुशी मारावी, काहीही करावं, ज्यामुळे मी तिच्यापासून दूर होईन. हे काही ममाचं माझ्यावरचं प्रेम नव्हे किंवा ते माझ्याबद्दलही नाही. ती मला चिकटलीय, ती निराश आहे म्हणून; पण हेही बरोबर नाही, कारण मी फक्त नऊ वर्षांचा आहे आणि अशा तऱ्हेनं कोणी मिठी मारत नाही.

मी श्वासासाठी धडपडतो आणि शेवटी दूर होतो. मला तिरस्कार वाटतो आणि जसे माझे डॅडी तिला मारल्यावर सोफ्यावर रडत सोडून जातात, तसा मी माझी

सुंदर चमकणारी फळं उचलतो आणि तिला तशीच रडत सोडून सरळ वरच्या मजल्यावर जातो.

शेन तिथे आहे. तो पलंगावर पडून संगीत ऐकतोय आणि स्वत:च्या जगात वावरतोय. तो मी आल्याचं जाणवलं, असंही दाखवत नाही. मी पलंगावर पडतो. मी लहान असताना ममानं मला जवळ घ्यावं, म्हणून मी नेहमी प्रयत्न करायचो, ते आठवतं. आता तिनं मला कवटाळलं होतं; पण मला ते भयानक वाटलं.

■

६

जिल, ममा, बेथनी आणि मी लंडनला जातो. आम्ही जिलच्या बेटी मावशीला भेटायला उपनगरात जाणार आहोत; परंतु दिवसाचा पहिला भाग आम्ही मध्य लंडनमध्ये घालवणार आहोत. मी यापूर्वी लंडनला आलेलो नाही. मी येतो आणि रस्त्यावरचा गजबजाट मला जाणवतो. ज्या तऱ्हेनं लोक घाईनं जात असतात, त्यांचे वेगवेगळे रंग आणि उच्चार, सदैव तिथे असणारी खुणांची, चेहऱ्यांची आणि दुकानांच्या खिडक्यांची होणारी पुनरावृत्ती. मी या जागेच्या प्रेमात पडलोय. त्या इमारतींचा वरचा भाग पाहण्यासाठी मी मान उंचावतो आणि अडखळतोच. मी चेंजिंग ऑफ गार्ड्स ही परेड पाहतो. ट्रॅफल गार्ड्स स्क्वेअरमधील त्या बलाढ्य सिंहावर मी आरूढ होतो. बिगबेन घंटेचे टोले ऐकतो. वेस्टमिनिस्टर पुलाजवळ असलेल्या बौडीकाच्या रथाच्या चाकाखाली बसून मी सँडविचेस खातो. पिकॅडलीला बसेस आणि टॅक्सीज या प्रेमाचा देव, एरॉसच्या पुतळ्याला वळसा घालून जात असताना बघतो. जेव्हा मी परत जाईन आणि मला लंडनमधलं सर्वांत जास्त काय आवडलं, असं विचारलं, तर मी सांगेन, की तेथील पुतळे. मी जिल ॲल्बटला सांगतो, की मी एक दिवस लंडनला परत येईन.

माझ्या उत्साहानं बेटी मावशी प्रभावित होते आणि त्या वेळेपासून लंडनची माहिती असलेली आणि आठवणींसाठीची पदकं असलेली पार्सल्स नियमित येतात. माझ्याकडे लंडनच्या कात्रणांचं पुस्तक आहे आणि त्यात मी सर्व काळजीपूर्वक चिकटवतो. हे काम करताना खोलीत एकटं राहणं मला आवडतं किंवा रस्त्यावर माझ्या मित्रांबरोबर असायला आवडतं. मी हल्ली घरात फारसा असत नाही, कारण आता डॅडी नेहमीच घरी असतात.

आमची नवीन पंतप्रधान मिसेस थॅचर आहे. जिल ॲल्बट म्हणते, की सामूहिक बेकारीचे हे दिवस आहेत. आमचे डॅडी हे त्यातील एक संख्या झाले आहेत. त्यांना काम नाही आणि घरात पैसे पुरेसे नाहीत. ममा जेवण करणं,

साफसफाई करणं जिथे मिळेल तिथे जाऊन करते; परंतु सगळ्यात मोठी अडचण ही आहे, की डॅडींना दारू प्यायला पैसे नाहीत आणि डॅडींचं गुत्त्यात जाण्यापेक्षा वाईट गोष्ट, म्हणजे ते गुत्त्यात न जाणं.

आज रविवार आहे आणि ते ड्रिंकसाठी आसुसलेले आहेत. रविवार असल्यामुळे त्यांना ड्रिंक हे हवंच. पिंजऱ्यात असलेल्या एका मोठ्या धोकादायक गोरिलासारखे ते घरात आरडाओरड करत फिरतात. ममाकडे ते पाच पौंड मागतात. ती ते नाकारते. पाच पौंड तिला वाणसामानासाठी गरजेचे आहेत. ते तिच्याकडे दुर्लक्ष करतात आणि तिच्या पर्सकडे जातात. ती त्यांना अडवून त्यांच्याकडून पर्स खेचण्याचा प्रयत्न करते. तो गोरिला आपल्या भल्या मोठ्या पंजानं तिला भिंतीशी खिळवून ठेवतो आणि दुसऱ्या हातानं तो तिच्या पर्समधून पाच पौंड काढतो. ती हरकत घेते आणि त्यामुळे त्यांना खरोखरच राग येतो.

ते ती निळी नोट तिच्या तोंडात कोंबतात आणि दोन बोटांनी ती तिच्या घशात जोरात कोंबतात. आम्ही घाबरून पाहत राहतो. ममा धडपडायची थांबते. ती लालबुंद होते आणि श्वासासाठी धापा टाकू लागते. आम्ही वेड्यासारखे पाहत राहतो. काही करत नाही. आम्ही शक्तिहीन आहोत. आम्ही ममाला मरत असताना पाहत असतो. ती धापा टाकायची थांबते. तिचा देह शिथिल होतो, मग तो गोरिला अचानक तिच्या घशापर्यंत पोहोचतो आणि एखाद्यानं पत्रांच्या पेटीतून पत्र काढावं, तशी ती नोट मिळवतो. ती नोट बहुतेक करून ओली झालेली आहे; पण त्याची तो पर्वा करत नाही. तो गोरिलाच्या भाषेत गुरगुरतो, शिव्या देतो आणि जोरानं दरवाजा बंद करून गुत्त्यात निघून जातो. आता ममा रडायला लागण्याच्या बेतात आहे. शक्य तेवढ्या लवकर मी तेथून निसटतो.

मी माझ्या मित्रांबरोबर कालव्याकडे जातो. जेव्हा मी परत येतो, तेव्हा आमच्या रस्त्यावर मुलं गोळा होत असल्याचं मला दिसतं. मी त्यांच्यापैकी एका गटात जातो आणि आमचा गट दुसऱ्या गटाबरोबर शाळेच्या रिकाम्या मैदानावर एकत्र येतो. तिथे एक वातावरण तयार झालेलं आहे. मुलं एकमेकांवर ओरडतात. मारामारी सुरू होते. मी ते पाहत आजूबाजूला फिरतो. त्या मारामारीच्या भरात मला एक उंच, हाडक्या, काळ्या केसांचा, माझ्याहून मोठा असलेला मुलगा मुठी वळवत असताना दिसतो. तो ट्रेव्हर आहे.

ज्या क्षणी मी त्याला पाहतो, त्या वेळी मला जराही विचार न करता माहीत होतं, की मला त्याच्याशी मारामारी करायचीय. मला त्याला मारायचंय. त्याचा चेंदामेंदा करायचाय.

मी त्या धक्केबुक्के मारणाऱ्या जमावाकडे लांब पावलं टाकत जातो आणि कोपरानं ढकलत वाट काढतो. इतर मुलांना माझ्या चेहऱ्यावरचे भाव दिसतात

आणि ते मागे होतात. काही ओरडतात, "जा, मार्क जा."

जेव्हा तो माझ्या अगदी समोर येतो, तेव्हा तो घाबरलेला वाटतो. त्याला एक दात विचकत असलेला, पिसाळलेला कुत्रा दिसतो. मी त्याच्यावर चालून जातो आणि काही क्षणांत तो जमिनीवर पडतो. मी त्याच्या चेहऱ्यावर बुक्के हाणतो आणि त्याला बुकलतो. माझे हात त्याच्या पोटावर पडतात आणि ते खोल आत जातात, मग त्याची छाती आणि हनुवटीही. त्याचे डोळे बंद झालेले आहेत. मी त्याचं डोकं जमिनीवर आपटतो. तो बढाया मारत असलेला, स्क्रूनं बसवलेला महागडा दात तोडतो आणि खात्री करण्यासाठी तो गोंधळून पडलेला असताना मी एक वीट घेऊन त्याच्या तोंडात कोंबतो.

मुलं माझ्याकडे आश्चर्यानं पाहत राहतात. प्रत्येक जण आमच्याकडे पाहत असतो. आता तिथे कोणतीही मारामारी चालू नसते. असते ती फक्त आमची. मग जल्लोष सुरू होतो.

ट्रेव्हर सावकाशपणे पायांवर उभा राहतो. तो आपलं तोंड चाचपतो आणि ज्या ठिकाणी त्याचे दात होते, तिथे आपली बोटं फिरवतो. जेव्हा तो आपल्या हाताकडे पाहतो, तेव्हा त्याला रक्त आढळतं आणि आपले दात तुटले आहेत, हे त्याला समजतं.

तो चिडतो. माझ्यावर ओरडतो आणि मग रस्त्यावरून माझ्या घराकडे जातो. मी त्याच्या पाठोपाठ जातो. माझे आई-बाप काय म्हणतील, म्हणून मी घाबरलेला असतो. मी त्याला आत जाऊ नको म्हणून सांगतो. तो गोंधळल्यागत बोलतो. "यासाठी तुला किंमत मोजावी लागणारच."

त्याच्या दाताची काय किंमत असावी, याचा मी मनाशी विचार करत असतो. डॅडींनी ती पाचची नोट संपवून ते गुत्त्यातून अजून परत आले की नाही, याचा मी मनात विचार करत असतो.

ट्रेव्हर आमच्या पुढच्या दरवाजावर ठोकतो आणि ममा बाहेर येते. ती एका मुलाच्या तोंडातून रक्त बाहेर येत असल्याचं आणि मी त्याच्यामागे असल्याचं पाहते. तिचा चेहरा पांढरा पडतो.

"तुमच्या मार्कनं हे केलं." ट्रेव्हर आपल्या रक्त येत असलेल्या तोंडानं ओरडतो. "माझ्याकडे बघा."

ममा बघत राहते. मी काही बोलत नाही. ट्रेव्हर मग त्या स्क्रूनं लावलेल्या दातासाठी ममाकडे पैसे मागतो. माझ्या लक्षात येतं, की ती बहुधा माफी मागून पैसे देणार. ट्रेव्हर काळा-निळा झालेला असतो. तो ओरडत असतो आणि अचानक डॅडी तिच्या मागे दरवाजात उभे असलेले दिसतात.

"काय झालं?" ते विचारतात. ट्रेव्हर रक्त थुंकत त्यांना सांगतो.

डॅडी त्याला विचारतात. "तू किती वर्षांचा आहेस?" त्यांचा आवाज धोकादायक वाटतो. तो आवाज काहीसा शांत, जरा जास्तच शांत आहे. हा डॅडींचा आवाज धोकादायक आहे, हे ट्रेव्हरला माहीत आहे का? का हे ओळखण्यासाठी तुम्हाला आमच्या कुटुंबाचा सदस्य असायला हवं?

"पंधरा, मी पंधरा वर्षांचा आहे आणि माझे स्क्रूनं बसवलेले दात तुटले आहेत. त्यासाठी तुम्हाला पैसे मोजावे लागणार." ट्रेव्हर किंचाळतो. मी चळचळ कापतो. अशा तऱ्हेनं मी माझ्या डॅडींवर ओरडणं कधी शक्य नाही.

"पंधरा?" त्यांचा स्वर आता खाली आहे; पण त्यात दहशत आहे. "पंधरा आणि माझा मुलगा दहा वर्षांचा आहे. तू त्याची तक्रार घेऊन इथे आलायस. तू स्वत:ला आणि येणाऱ्या रक्ताला माझ्या दरवाजापासून दूर घेऊन जा आणि घरी चालता हो. तू एक मूर्ख मुलगा आहेस."

ट्रेव्हर दात तुटलेलं तोंड उघडं ठेवून बघत राहतो. मग तो वळतो आणि निघून जातो.

डॅडी दरवाजा लावण्याआधी मी कावेबाजपणे त्यांच्याकडे बघतो. डॅडी बडबडतात, "तो मूर्ख मुलगा." आणि हा त्या अनेक क्षणांपैकी एक क्षण आहे, जेव्हा मी त्यांच्यावर मनापासून प्रेम करतो. त्यांनी माझ्यासाठी काय केलं, हे त्यांना माहीत नाही. मी ट्रेव्हरचा रस्त्यावर पाठलाग करतो आणि त्याला चिडवतो. "जा चुत्या, चुत्या ट्रेव्हर."

पुढच्या वेळी जेव्हा मी ॲल्बट्सकडे जातो, तेव्हा ते मला एक वाईट बातमी देतात. आम्ही स्वयंपाकघरात खात असतो आणि सर्व ठीकठाक असल्याचं दिसतं. मग जिल म्हणते, की त्यांना मला काही सांगायचं आहे. मी खाणं थांबवतो. मी त्या दोघांकडे संशयानं पाहतो. त्यांच्या मायाळू गुळगुळीत चेहऱ्यावर काळजीच्या रेषा दिसतात. जिल मला हळूच सांगते, की ते इथून निघून जात आहेत.

माझा पहिला विचार असतो, की मी त्यांच्याबरोबर जायचं आहे. मलाही हा रेनॉल्ड स्ट्रीट सोडायचा आहे. मला वाटतं, की ते किड्डरमिन्स्टरच्या दुसऱ्या भागात जात आहेत. ब्रायन आपली मान हलवितात. ते दुसऱ्या शहरात रेड्डीचमध्ये जात आहेत. मी तिथे कधी गेलेलो नाही; पण तरीही मला ते आवडत नाही. मी त्या शहराचा द्वेषच करतो. मग कळतं, की ते शाळा बदलत असल्यामुळे जात आहेत.

मी माझं खाणं संपवत नाही. मी ते चघळू शकत नाही, गिळू शकत नाही; परंतु मी काही बोलत नाही. प्रश्नही विचारत नाही. मी त्यावर काही भाष्य करत नाही. ते माझं आश्रयस्थान आहेत आणि त्यांच्याशिवाय माझं जीवन असह्य होईल, हे मी त्यांना सांगत नाही. ज्याला पेंटिंग करायला, बोलायला आवडतं आणि ज्याच्या जवळ प्रेमानं बोललं जातं, तो मार्क मी असणार नाही.

मग मी पुन्हा त्यांना भेटायला जात नाही. ज्या दिवशी ते निघतात, त्या दिवशी ते निरोप घ्यायला येतात आणि सांगतात, की ते मला रेड्डीचला येण्यासाठी व्यवस्था करतील आणि तीही शक्यतो लवकर. मी मान डोलावतो, पण जास्त काही बोलत नाही. त्यांचं शेवटचं दर्शन, म्हणजे दोन दु:खी काळजीत असलेले चेहरे. मी दरवाजा लावतो आणि वर माझ्या खोलीत जातो आणि काही वेळ बाहेर येत नाही, कारण त्यांच्या दरवाजाशी उभी असलेली सामान घेऊन जाणारी व्हॅन त्यात मार्टी फेल्डमनच्या रेकॉर्ड्स आणि लोकांशी संवाद साधणारा रेडिओ असेल. ते मला पाहायचं नाही. तिथे असलेली ती चित्रं आणि चालणारं संभाषण गाडीत भरून नेत असताना मला पाहायचं नाही. त्या रात्री जेव्हा मी पलंगावर पडतो, तेव्हा मला वाटतं, की आज कुणीतरी मृत झालं आहे.

■

७

जेव्हा मी घरी असतो, तेव्हा तिथे करायला काहीच नसतं. तेथील वातावरण गुदमरवणारं असतं आणि मला त्याचा तिटकारा येतो; पण जेव्हा मी रस्त्यावर ज्यांच्याबरोबर वाढलोय, त्या स्थानिक मुलांच्या मोठ्या कुटुंबात असतो, तेव्हा मग ते सारं शहर हे आमच्यासाठी धुमाकूळ घालायला, चोऱ्या करायला आणि धावाधाव करायला एक खेळाचं मैदान असतं.

माझा सगळ्यात चांगला दोस्त आहे, रस्त्यावरचा दोस्त, जो आमच्या शाळेतही जात नाही. डॅनियल. हा एका मोठ्या आरडाओरड करणाऱ्या कुटुंबातील आहे आणि नवीन नवीन वाईट गोष्टी शोधण्यात तो पटाईत आहे. त्याचा चेहरा लहान बाळासारखा निरागस आहे. त्याचा बांधा बारकासा आहे, त्यामुळे मारामारी करण्यास तो फारसा उपयोगाचा नाही; पण तो सगळ्यांत भाग घेतो. तो योग्य कपडे वापरतो आणि जिथे लोक बुक्क्यानं काम करतात, तिथे हा डोकं लढवतो. आम्ही भेटताच परस्परांचे जानी दोस्त होतो.

आता घरी पुष्कळ मुलं आहेत. त्यांनी आमच्या घराची वसाहत केली आहे. शाळा सुटल्यावर आणि त्यांच्या आया कामावरून घरी परतेपर्यंत ममा नुसती या मुलांचा सांभाळ करत नाही; तर अनाथाश्रमातून अनेक मुलं रेनॉल्ड स्ट्रीटवरील तिचं तेथील स्वयंपाकघरातील काम आटपल्यावर तिच्या मागून येतात आणि ती त्यांचाही भार वाहाते. अनाथाश्रमातील मुलं आमच्याबरोबर शाळेत आहेत, म्हणून आम्ही त्या सर्वांना ओळखतो. ती मुलं कपड्यांसाठी दिलेला भत्ता सिगरेटवर उडवतात आणि धर्मार्थ दुकानातून मिळालेले जुने सूट, जॅकेट्स आणि फाटलेल्या जीन्सचे कपडे वापरतात. शेन आणि मला ते भयानक दिसतात असं वाटतं.

कपडे आमच्या दृष्टीनं महत्त्वाचे आहेत. शेन आधुनिक आहे आणि मी गुळगुळीत गोटेवाले आणि आधुनिक यांच्या मधला आहे. याचा अर्थ मी नंबर एकचं मशीन मारून केस बारीक करतो आणि ते नुकतेच उगवल्यागत दिसतात. मी नरम

चामड्याचं जॅकेट वापरतो आणि एक लालभडक पोलो शर्ट आणि जीन्स आणि डॉ. मार्टिन्स किंवा मऊ शूज वापरतो. आमचा वेष हा असा असतो आणि संगीत असतं ते द बीट, द सिलेक्टर, द जॅम आणि यु बी ४०. शेन आधुनिक असल्यामुळे ब्लेझर वापरतो, जणू काही तो आता बोटिंगसाठी बाहेर पडत आहे. तो खालपर्यंत बटणं असलेला चमकदार शर्ट वापरतो.

"मी तरुण असताना हिप्पी होते." ममा आम्हाला सांगते. आम्ही तिच्या गरगरीत देहाकडे आणि सुरकुतलेल्या चेहऱ्याकडे अविश्वासानं पाहतो. आमचं घर तिच्या त्या जॉनी मॅथीस रेकॉर्ड्सच्या नादावर बरेचदा निनादत असतं. ते हिप्पी संगीत नक्कीच नव्हतं. ती मग एका सुंदर तरुण मुलीचं चित्र बाहेर काढते.

"ही मी आहे." ती सांगते. "तेव्हा मी सतरा वर्षांची होते." आमची ममा आणि त्या मुलीत काही साम्य आढळत नाही. त्या फोटोतील मुलगी स्वप्नाळू असल्यागत दिसते; पण ममाचं तर डॅडींशी लग्न झालंय.

ती नॉर्थ इस्टर्न क्लबजवळ घुटमळत असायची, असं ती आम्हाला सांगते. ते क्लब त्या वेळी लोकांच्या आवडीचे होते. त्या वेळी ते अंडरग्राऊंड होते. तिनं द ॲनिमल्स, गेरी आणि पेसमेकर्स आणि द हू ऐकले होते, असं ती सांगते आणि आम्ही तोंडं वेडीवाकडी करतो. गेरी आणि पेसमेकर्स खरोखरच त्या वेळी प्रचलित होते का? अंडरग्राऊंडची तर बातच सोडा.

"हो, खरंच." ममा सांगते. ते काही संगीताच्या मुख्य प्रवाहात नव्हते. ते हिप्पी संगीत होतं. विशेष करून ॲनिमल्स. तिथे न्यू कॅसलचा आवाज होता आणि ते संगीत अगदी भरात होतं.

आणि ममा तिथे होती. व्हॅक्युम क्लीनरवर वाकलेली ममा तिथे होती, यावर विश्वास बसणं अशक्य आहे.

डॅडी नेहमी टेडी बॉय असायचे, असं ती सांगते आणि ते आणखीनच गमतीदार वाटतं.

आम्ही विचारतो, "तू कधी बिटील्सना पाहिलंस का?"

ती मान डोलावते आणि स्वप्नाळू असल्यागत दिसते. "मी रात्रभर न्यूकॅसलमधील सिटी हॉलच्या बाहेर, आत जाण्याची संधी पाहत थांबून राहिले होते आणि मी आत गेले." ती हसते. "जेव्हा ते स्टेजवर आले, तेव्हा माझ्या मनात आलं, की आयुष्य याहून चांगलं असूच शकत नाही."

आम्ही ममाकडे पाहतो. तिचं डॅडींशी लग्न झाल्याला इतकी वर्षं झाली आहेत आणि ती दुःखी आहे, हे तुम्ही तिच्या तोंडावरून ओळखू शकता. दुसऱ्यांच्या घरी साफसफाई करून आणि आमची काळजी घेण्यात तिचे हात सुरकुतले आहेत आणि ती थकलेली वाटते. बिटील्सना पाहिल्यानंतर आयुष्यात आणखी काही

चांगलं घडू शकत नाही, हे तिचं म्हणणं बहुतेक खरं होतं आणि आम्हाला तिच्याबद्दल दु:ख होत नाही. ती तरुण, सुंदर आणि स्वप्नाळू होती, याबाबत आम्हाला फारशी पर्वा नाही. आम्ही आमच्या स्वत:च्या मित्रांच्या आणि संगीताच्या विश्वात वावरत आहोत आणि तिला मागे सोडत आहोत. ममा आणि डॅडी आम्हाला गमवत आहेत आणि त्याच वेळी त्यांना पॉल सापडतो.

तो अनाथाश्रमातील एक मुलगा आहे आणि तो आमच्या घरी बराच वेळ घालवतो. तो माझ्याहून चार वर्षांनी मोठा आहे. सर्वांना तो आवडतो, अगदी डॅडींनासुद्धा. ते एकमेकांशी चेष्टा-विनोद करतात आणि बरोबरीनं हसतातही. ते मी करणं शक्य नाही, अगदी मी पॉलच्या वयाचा झालो तरीही. शेनचंही त्याच्याकडे लक्ष असतं आणि त्याच्याही मनात हाच विचार आहे, हे मी जाणतो. शेन आणि माझ्याऐवजी पॉल हा डॅडींचा मुलगा असता तर? हा विचार डॅडींच्या मनात येतोय, असं आम्हाला वाटतं.

जेव्हा ममा पॉलला दत्तक घेण्याचा विषय काढते, तेव्हा आम्हाला आश्चर्य वाटत नाही. आश्चर्य वाटतं, ते पॉलला आमच्या कुटुंबात येण्याची इच्छा आहे त्याचं. माझ्या कल्पनाचित्रात नेहमीच इच्छा होती, की आपण अनाथाश्रमात राहावं. विशेष करून ॲल्बट्स गेल्यावर हे जास्त वाटायचं. कदाचित, अशी अदलाबदल आम्ही करावी, मग मी अनाथाश्रमात जाईन आणि डॅडी आणि ममाला नेहमी हवा असलेला मुलगा पॉल मिळेल.

मग ती दत्तक घेण्याची प्रक्रिया सुरू होते. पॉल बहुतेक वेळ आता आमच्याच घरी राहत आहे. तो पोटमाळ्यावरच्या खोलीत शेन आणि माझ्याबरोबर झोपतो. आता ख्रिसमस जवळ आल्यामुळे तो सुट्टीसाठी इथेच राहणार आहे. पैशाची चणचण आहेच. आमच्यासाठी ख्रिसमसच्या भेटवस्तू घेतल्यानंतर डॅडींकडे पैसे नाहीत, असं डॅडी सांगत आहेत; परंतु ते काही पैसे मागे ठेवतील. त्यातून सणासुदीच्या दिवसांत त्यांना थोडी दारू पिता येईल. जेव्हा पॉल आजूबाजूला असतो, तेव्हा डॅडी असंच काहीबाही बोलतात. ज्यामुळे ते एखाद्या सर्वसामान्य डॅडींसारखे वाटतात.

डॅडी पाच पौंड बाजूला ठेवतात. ती नोट अगदी काळजीपूर्वक रुपेरी रंगाच्या लोण्याच्या भांड्यात ठेवतात आणि ते भांडं बैठकीच्या खोलीतील फडताळ्याच्यावर ठेवतात. मी असताना घरात कुठेही पैसा ठेवणं सुरक्षित नाही, हे प्रत्येकाला माहीत आहे. कदाचित, डॅडींना वाटत असेल, की मी त्यांना इतका घाबरतो, की मी ते चोरणार नाही; पण ज्या क्षणी त्यांनी ती पाच पौंडाची नोट त्या लोण्याच्या भांड्यात ठेवली, तेव्हापासून मला त्या नोटेनं घेरून टाकलंय. जरी मी पकडला जाण्याची खात्री असली, तरीही ती मला मिळालीच पाहिजे.

काही तासांतच मी संधी शोधतो. चहा आटपतो; परंतु ममानं आवराआवर केलेली नाही. पॉल, केली, शेन, ममा आणि डॅडी अजूनही टेबलभोवती बसलेले आहेत. जेव्हा पॉल तिथे असतो, त्या वेळी माझे आई-वडील चांगले वागतात. त्यांच्या फारशा मारामाऱ्या होत नाहीत आणि त्यांचं एकमेकांशी बोलणं वाढतं.

मी कंटाळा आल्यागत तेथून निघतो आणि बैठकीच्या खोलीत जातो. टीव्ही सुरू करतो, पण बसून तो पाहत नाही. त्याऐवजी मी त्या आरामखुर्चीच्या तपकिरी हातावर हळूच चढतो. मला तोल सावरण्यासाठी थांबावं लागतं. नाहीतर मी जिथे रेकॉर्ड्सचा साठा ठेवलेला आहे, त्यावर कोसळेन आणि अशा तऱ्हेनं जॉनी मॅथीसचा शेवट होईल. माझं हृदय धडधडत असतं आणि नजर खोलीभर भिरभिरत असते. मी लोण्याच्या भांड्यापर्यंत पोहोचतो. अगदी आवाज न करता त्याचं झाकण उघडतो आणि ती पाचची नोट घेऊन माझ्या जीन्सच्या खिशात कोंबतो. ते झाकण पुन्हा भांड्यावर ठेवतो आणि आरामखुर्चीत पडतो. मी टीव्ही पाहत असल्याचं नाटक करतो. माझं हृदय एवढ्या जोरात धडधडत असतं, की तो कार्यक्रमही मला ऐकू येत नाही.

पुरेसा वेळ गेल्यावर मी वरच्या खोलीत जातो. ती पाचची नोट मी माझ्या पलंगाखालच्या गालिच्याखाली सारतो. नंतर मी पॉलला ते पैसे दाखवतो. तो झटकन ते सर्व आपल्या ताब्यात घेतो.

"तू ती तशीच दाबून ठेव. आठवड्याच्या सुट्टीत ती आपण खर्च करू या." तो मला सुचवतो.

मग आठवड्याच्या सुट्टीत आम्ही बरीच मिठाई खरेदी करतो. पॉलच्या त्या अनाथाश्रमातील भावासाठी, शेन आणि केलीसाठी, आमच्या मित्रमंडळींसाठी आणि आमच्यासाठी. ममाचा हात धरून जिहोवाच्या सभांसाठी जाणाऱ्या लाडावलेल्या बेथनीसाठी मात्र मी काहीच घेत नाही. तिला माझ्या मिठाईतील काही मिळणार नाही.

बॉक्सिंग डेच्या दिवशी ते लोण्याचं भांडं रिकामं असल्याचं ममाच्या लक्षात येतं. ती डॅडींना सांगते. ती पाचची नोट कुणी घेतली, याबद्दल कुणाला संशय नाही.

"मी घेतलेली नाही."

"हरामी चोर," ते त्यांच्या धोकादायक आवाजात गुरगुरतात. "मी आता तुला ठारच मारतो."

आणि जेव्हा ते मला जेवणाच्या खोलीत झोडपत असतात, तेव्हा मी, 'मी ती घेतलेली नाही' असं ओरडत राहतो आणि डॅडी माझा किती तिरस्कार करतात, हे सांगत राहतात आणि असं वाटतं, की जणू आम्ही या गोष्टी नेहमीच उगाळत आलो

आहोत; परंतु आमच्यापैकी एकच खरं बोलत आहे आणि ते म्हणजे डॅडी. ते खरोखरच माझा तिरस्कार करतात आणि जेव्हा ते घरी असतात, तेव्हा मला स्वास्थ्य नसतं. मी त्यांच्या मार्गात येत नाही आणि त्यांना तेच आवडतं. त्यांना मला बघायची, माझा आवाज ऐकण्याची इच्छा नाही. मी तिथे अजिबात नसलो, तर ते त्यांना जास्त पसंत पडेल.

"आता सांग," मला झोडपल्यावर ममा विचारते. "तू डॅडींकडून चोरलेल्या त्या पाच पौंडातून काय विकत घेतलंस?"

"मिठाई," मी कबूल करतो.

"मिठाई? ती तू सर्व खाल्लीस?"

"नाही, मी ती त्याच्याबरोबर विकत आणली." मी पॉलकडे बोट दाखवून सांगतो.

प्रत्येक जण जेव्हा पॉलकडे वळतो, तेव्हा तिथे एक भयंकर शांतता पसरते. तो लाल होतो.

"त्याला हे पैसे कुठून आले, हे माहीत होतं का?" ममा विचारते. तिचा आवाज एकदम खाली जातो. मी नाही म्हणेन, अशी ती अपेक्षा करत असते. डॅडी पॉलकडे बघतात आणि मग माझ्याकडे. त्यांनाही हे खरं असायला नको, असं वाटतं.

"हो," मी ओरडतो आणि माझ्या आवाजात काहीसा विजयाचा सूर असतो. "हो, त्याला माहीत होतं, की ती पाचाची नोट तुमची होती."

आणि त्या दत्तक प्रकरणाचा असा शेवट होतो आणि आमच्या घरात घालवलेली पॉलची ती शेवटची रात्र ठरते. ममा त्याची बॅग भरायला जाते आणि त्याला ताबडतोब अनाथाश्रमात परत पाठवलं जातं. त्यानंतर कधी कधी तो मला शाळेत दिसतो; पण आता आमच्यापैकी तो एक नसतो. अनाथाश्रमात मलाही पाठवण्याची चर्चा सुरू असते. मला वाटतं, की त्यांनी मला पाठवावं.

■

८

मी अधून मधून दारू पितो. वयानी मोठ्या असलेल्या मुलांबरोबर, विशेषत: माझी बहीण केली, हिच्या पार्ट्यांमध्ये मी चिक्कार दारू पितो. मी त्या पार्टीचं चैतन्य असतो; पण हे कुठपर्यंत, मी दारू पिऊन अगदी मद्यधुंद होत नाही तोपर्यंत. त्यानंतर मी काय करतो, ते मला समजत नाही, कारण मला ते आठवतच नाही. जेव्हा मी पहिल्यांदा मद्यधुंद होतो, तेव्हा प्रत्येकाला वाटतं, की मी मजा करतोय आणि मी हुषार आहे. केली मात्र तिच्या मैत्रिणींशी मी माझं सूत जुळवतो, म्हणून नेहमीच माझ्यावर चिडते. सोळा वर्षांच्या कित्येक पोरी माझ्यासारख्या अकरा वर्षांच्या पोराला, मी मोठा दिसतो, म्हणून पकडतात, याचं मला आश्चर्य वाटतं.

केलीला मी तिच्या मित्र-मैत्रिणींत मिसळतो याचा राग येतो; पण जेव्हा मी पीट आणि त्याच्या घोळक्यात वेळ घालवताना तिला दिसतो, तेव्हा तिला ते अजिबात पसंत पडत नाही. केलीला भविष्यकाळात पोलीस फोर्समध्ये जाण्याची इच्छा आहे. तिचं तोंड गोल आणि सुंदर आहे आणि तिला वाटतं, की ती आमच्यापेक्षा समाजात एक-दोन पायऱ्या उंचावर आहे. ती पीटच्या अगदी विरुद्ध आहे. पीट गुळगुळीत गोटा करत असे आणि ज्यांच्याबरोबर मी पहिल्यांदा स्ट्रॉंग बो हे ड्रिंक घेऊन धुंद झालो होतो, त्या मुलांपैकी एक आहे. आता तो हिप्पी आहे आणि झोपडपट्टीत राहतो.

केलीला अशा झोपडपट्टीत राहणाऱ्यांची भीती वाटते; पण मला त्यांच्याबद्दल एक आकर्षण वाटतं. पीटला कुणी कुटुंबीय नसावेत असं दिसतं. त्या झोपडपट्टीत येणारे-जाणारे लोक तेवढेच. ते एक पुढच्या बाजूनं साधं लाल विटांचं घर वाटतं; परंतु आतल्या बाजूला त्याच्या भिंतीवर गरगर फिरणाऱ्या हिप्पींची चित्रं रंगवली आहेत. मागच्या बागेत तण वाढलेलं आहे आणि सायकलचे भाग पडलेले आहेत. त्याचं कुंपणही खाली कोसळत आहे. या घरात राहणारे लोक कोणतेही नियम पाळत नाहीत. त्यांना पाहिजे तेव्हा ते उठतात. काही वेळा संध्याकाळपर्यंतही ते

उठत नाहीत. त्यांना वाटेल, तेव्हा ते त्यांचे कपडे काढतात, अगदी आजूबाजूला इतर लोक असले तरीही. एका हिप्पी स्त्रीची वक्षस्थळं एवढी मोठी आणि जड आहेत, की त्याकडे टक लावून पाहणं मी आवरू शकत नाही. ती सबंध दिवस हा एवढा भार कसा काय वाहाते? दुसरे कोणी त्याकडे लक्ष देत नाहीत.

आता ॲल्बट्स निघून गेलेले आहेत, त्यामुळे ही झोपडपट्टीतील जागा मी गोंधळलेल्या अवस्थेत असतानाची माझी आश्रयाची जागा आहे. मला इथे छान वाटतं. इथे पत्र्याचे डबे हे लँपशेड म्हणून आहेत आणि पलंगाऐवजी नुसत्या गाद्या आहेत. मला पीटजवळ आणि त्याच्या मित्रांजवळ बोलायला आवडतं. इथे प्रत्येक जण दुसऱ्याला तो आहे तसा स्वीकारतो आणि कुणीही तू शाळेत का जात नाहीस, असे प्रश्न विचारत नाही. काही वेळा मी आमच्या स्वयंपाकघरातून वाणसामान चोरतो आणि आम्ही बोलत असताना जेव्हा पीट ते शिजवतो किंवा जेव्हा पीट आपले मोजे डेटॉलमध्ये धुवत असतो, तेव्हा आम्ही गप्पा मारतो. मी काही वेळा त्याला त्याची जुनी मोटरबाईक दुरुस्त करायला मदत करतो.

पीटनं मला अनेक नवीन गोष्टी शिकवल्या. त्यापैकी एक होती लायटरचा बुटेन गॅस हुंगणं. हे थोड्याच वर्षांपूर्वी मी शिकलो आणि मी तो प्रयोग बरेच वेळा घरी करतो. गॅस हुंगणं, ही दारू पिण्यासारखी चारचौघांत करण्यासारखी गोष्ट नाही. हे दुसऱ्या विश्वात गुंग होण्याचं तिकीट आहे आणि हा प्रवास मला एकट्यानं करायला आवडतो. एकच दम मारायचा आणि मी सर्वांतून सुटतो. सहसा माझं ममाच्या कुंडी असलेल्या झाडांकडे लक्ष जात नाही; पण जेव्हा मी गॅसचा दम मारतो, तेव्हा मी त्या झाडांच्या कुंड्यांतच जातो आणि वीस मिनिटं त्या झाडांशी बोलत राहतो किंवा एखाद्या धुलीकणावर बसेन आणि विटेच्या तुकड्याजवळ बोलत राहीन. मला जेव्हा शुद्ध येते, तेव्हा माझ्या तोंडातून लाळ गळत असते आणि माझं डोकं भिंतीला टेकलेलं असतं; परंतु मला त्याची पर्वा नाही. मी घराच्या दिवाणखान्यात असतो आणि तो सर्व वेळ मी दिवाणखान्यात नसतोही. दरवाजा न उघडता हे घराबाहेर पडणं तसं मस्तच आहे.

माझ्या बहिणींचं वागणं एवढं चांगलं आहे आणि डॅडी त्यांच्याशी एवढं चांगलं वागतात, की मला माझ्या बहिणींची साथ नकोशी वाटते. मला माझ्या बहिणींचा रागच येतो. अर्थात, मी सर्व मुलींचा रागराग करत नाही, कारण मला मुली कशासाठी असतात, हे माहीत झालंय. हे अशा तऱ्हेचे लागलेले शोध मला फारच उत्तेजित करतात. आमच्या शेजारी राहणारे इटालियन्स यात माझे वाटाडे आहेत.

किडुरमिन्स्टरमध्ये बरेच इटालियन्स राहतात. ते सिसीलीमधून आलेले आहेत. सिसीली हे अत्यंत उष्ण असं बेट आहे, जिथे माणसं सर्व दिवसभर टोमॅटो

खातात. त्यांच्या कॅथलिक शाळा आहेत. स्वत:ची दुकानं आहेत. त्या दुकानात छतापासून सॉसेजेस टांगलेले असतात आणि ऑलिव्हनी भरलेल्या टोपल्या प्रत्येक टेबलखाली असतात. जेव्हा या कुटुंबांनी इटली सोडली, तेव्हा त्यापैकी काही किड्डरमिन्स्टरला आले आणि काही अमेरिकेत न्यू जर्सीला गेले. त्यांच्या या दोन शाखा नेहमी एकमेकांना भेटण्यासाठी विमानानं पुढे-मागे जात-येत असतात.

माझी काही इटालियन मुलांबरोबर दोस्ती आहे. माझी अंटोनियोबरोबरची दोस्ती शिवीगाळ आणि मारामारी यावर उभी आहे. कॅथॉलिक युथ क्लबमध्ये (मी आणि माझा भाऊ आणि माझा मित्र डॅनियल, आम्हा तिघांना इतर युथ क्लबमधून वाईट वर्तणुकीसाठी बाहेर घालवण्यात आलेलं आहे; परंतु कॅथलिकांचं तसं काही नाही.) इटालियन्स विरुद्ध इंग्लिश असं आहे. मी आणि अंटोनियो एकमेकांना बेदम चोपतो आणि प्रत्येक शनिवारी रात्री एकमेकांना शिव्याही देतो; पण तरीही आम्ही चांगले मित्र आहोत.

मी मुलांबरोबर ज्या गोष्टी झुंडीनं करायच्या असतात त्या करतो. मुलींविषयी बोलायचं, तर त्या संभोगासाठी आहेत. जितक्या मुलींशी संभोग करता येईल आणि जितक्या वेळा करता येईल, तितका तो तुम्ही करायचा असतो आणि मग त्याबद्दल आपल्या मित्रांना सांगायचं असतं. ट्रेव्हर नंतर मी अनेक मुलींशी चाळे केले आहेत, त्यांना बिघडवलंय, चाचपूनही पाहिलंय, बोटांनी चाळेही केले आहेत; परंतु अजूनपर्यंत मी खऱ्या अर्थानी एकीशीही संभोग केलेला नाही; परंतु मी आता अकरा वर्षांचा झालो आहे आणि आता इथे बिनाका आहे. त्या कॅथलिक युथ क्लबमध्ये प्रत्येक जण हे करतोय. आम्ही मुलं एकत्र बसून गप्पा करत असतो आणि डॅनियल आणि मी एकमेकांना सिगरेट देत असतो. पलीकडे मुली खोलीत आहेत. मुष्टीमैथुन सोडलं, तर मुला-मुलीत जराही संबंध येत नाही. सर्व वेळ एकमेकांना पाहत राहून आम्ही या पायरीपर्यंत पोहोचतो.

मी बिनाकाला पाहत असतो. तिच्या काळ्या केसांचा बॉब आहे आणि तिची कातडी तपकिरी आहे. डोळे मोठे आहेत आणि ओठ भरीव आहेत. ती उंच आणि सडपातळ आहे, पण खूप बारीक नाही. तिच्या त्या फॅशनेबल स्कर्ट आणि काळ्या टॉपमध्ये आणि काळ्या लोकरीच्या टाईट्समध्ये ती मस्त दिसते. ती अतिसुंदर आहे, आणि आता कमीत कमी चौदा वर्षांची असावी.

मी अकरा वर्षांचा आहे; पण वयाच्या मानानं भरलेला आहे. तिला माझ्याकडे पाहताना मी पकडतो. ती पटकन आपली नजर फिरवते. मग मी जवळीकीचा प्रयत्न करतो.

"तू ठीक आहेस?"

"हो,"

"फिरायला येतेस?"

याचा अर्थ एकच असतो. ती काय ते समजते.

"ठीक आहे."

आम्ही त्या युथ क्लबच्या हॉलमधून बाहेर पडतो. त्या खेळण्याच्या आणि बार फुटबॉलच्या जागा ओलांडून आम्ही बाहेर पडतो. आमच्या अंगावर जरी कोट आहेत, तरी थंडी आम्हाला जाणवतेच. बाहेर पाऊस पडत आहे आणि तो थंड आहे. मी तिचा हात धरतो. आम्ही काही बोलत नाही. मी त्या हॉलला वळसा घालून कॉन्व्हेंटच्या प्लॅस्टिक कमानीखाली तिला घेऊन जातो. या वाटेनं ती लहान असताना जेव्हा तिला नन्स शिकवायच्या त्या वेळी हजारदा तरी गेलेली असेल; परंतु आता ती काही वेगळ्याच गोष्टीसाठी इथे आहे.

मी तिची चुंबनं घेऊन सुरुवात करतो. ते ती मला करू देते. मग मी माझे हात तिच्या कपड्यांत घालतो आणि जेव्हा ती प्रतिकार करत नाही, तेव्हा मी माझा कोट खाली टाकतो आणि तिला जमिनीवर ओढतो. आज रात्री तसं फारच थंड असल्यामुळे मी माझे हातमोजे तसेच ठेवतो. ती तिचा कोट अंगावर ठेवते. डोक्यावरच्या त्या कमानीवरच्या प्लॅस्टिक छतावर पाऊस तडतड आवाज करत असतो. मी तिचा स्कर्ट वर करतो. माझे हातमोजे असल्यामुळे मला तिच्या कातडीचा स्पर्श जाणवत नाही. मी मग माझ्या तोंडानं तिला जिकडेतिकडे स्पर्श करतो. ती फार सुंदर आहे. तिला इटालियन वास आहे. तो वास तसा काही वाईट नाही. तो कांदे-लसूण आणि मसाल्याचा वास मला शहरातील इटालियन रेस्टॉरंटची आठवण करून देतो. मी तिच्या जाड टाईट्स खेचण्याचा प्रयत्न करतो. सुरुवातीला ती माझा हात झिडकारते. मी पुन्हा तो ठेवतो आणि काही क्षणांत माझ्या लक्षात येतं, की ती ते मला करू देईल. ती ते मला करू देणार.

ती स्तब्धपणे पडून राहते. जेव्हा मी तिच्यात शिरतो, तेव्हा तिचं शरीर लाकडा-सारखं ताठरलेलं असतं. माझ्या कौमार्याचा शेवट होतो. ती हलत नाही की आवाजही करत नाही. कदाचित, तिचीही ही पहिलीच वेळ असावी. ती आनंदित झाल्याचं काही दाखवत नाही आणि तिनं असं करावं, अशी माझी अपेक्षाही नाही. याला फारसा वेळ लागत नाही.

त्यानंतर मग आमचा काही संवाद होत नाही. मला तिच्याबरोबर बोलण्याची किंवा राहण्याचीही इच्छा नाही. मला तेथून दूर जायचंय आणि तेही ताबडतोब. मला युथ क्लबमध्ये माझ्या मित्रांत जायचंय. मी तिला उभी करतो आणि माझा कोट घालतो आणि आम्ही लवकरच त्या उबदार, माणसांच्या आवाजानं गजबजलेल्या क्लबमध्ये परत फिरतो, फक्त मी आता वेगळा आहे. मी खरोखरच एकीशी संभोग केलेला आहे.

मी पहिली गोष्ट करतो, ती डॅनियलला त्याबद्दल सांगण्याची. तो त्याचं ते लहानग्याचं निरागस हास्य करत माझ्याकडे बघून हसतो. मग मी माझ्या इतर मित्रांना सांगतो. ती माझी पहिली वेळ होती, हे सोडून त्यांना सर्व सांगतो.

उन्हाळ्याच्या सुट्टीत आजूबाजूच्या रस्त्यावरील सर्व पोरं रेनॉल्ड स्ट्रीटवरच्या शाळेच्या मैदानात एकत्र जमतात. ती एक जुनी लाल विटांची प्राथमिक शाळेची इमारत आहे. मैदानाचा हा एवढाच भाग सोडला, तर जमायला कुठेच जागा नाही. फुटबॉल खेळायला तर नक्कीच नाही. मी तिथे घुटमळत राहायचं, एवढंच करायला हवं. लवकरच तिथे मग अनेक मुलं येतील, आम्ही सिगरेट ओढू आणि आज काय करायचं ते ठरवू.

आणि कुणीतरी म्हणतं, की आपण पोहायला जाऊ या.

आम्ही पांगतो आणि आमचे टॉवेल्स आणि स्विमिंग सूट आणि पोहोण्यासाठीची फी आणि मागून एखादं चिप्सचं पाकीट घेण्यासाठी पैसे घेऊन येतो. आमचा दहा-पंधरा इटालियन आणि इंग्लिश मुलांचा गट दरवाजावर ठोकत, कणगी लाथेनं उडवत आणि मोठ्या मोठ्यानं घाणेरडं ओरडत डोल ऑफीसजवळच्या पोहण्याच्या तलावाकडे वळतो. अंटोनियो आणि मी हे सर्वांत लहान आहोत. कार्लो हा बहुतेक सर्वांत वयानं मोठा आहे. तो सतरा वर्षांचा आहे आणि आता कामालाही जातो. तो सर्वांना हुकूम सोडतो. "हे छोट्या मादरचोद, इकडे ये. मी जे काही सांगतो, ते साल्या तुला करायचंय."

आणि आम्ही तसं करतो, कारण तो आमचा हिरो आहे. आम्ही त्याला ग्रॅनी शॅगर म्हणतो, कारण एकदा तो आठवड्याच्या सुट्टीत बुटालिंगला गेला असताना त्यानं एका म्हाताऱ्या बाईशी धंदे केले आणि ते सिद्ध करण्यासाठी तिच्या संडासाची साखळी तिच्या बंगलीतून त्यानं पळवली. ती साखळी आपल्या खिशात ठेवून तो आजूबाजूला फिरतो.

कार्लोला माझी मोठी बहीण आवडते; पण तिला तो आवडत नाही. जेव्हा तो आपला पोहण्याचा पोशाख घालतो, तेव्हा त्याची वरच्या बाजूची सुटलेली चरबी दिसते.

तलावावर आम्ही सर्व नियम धाब्यावर बसवतो. तुम्ही इथे उड्या मारायच्या नाहीत; पण आम्ही त्या मारतो. तुम्ही आपल्या मित्राचं डोकं पाण्याखाली धरायचं नाही, पण आम्ही ते धरतो. तुम्ही धावायचं नाही, मारामारी करायची नाही आणि लोकांना आत ढकलायचं नाही; पण आम्ही ते सर्व करतो. हा सर्व वेळ मी कार्लो आणि त्याचा धाकटा भाऊ जिन्नी यावर लक्ष ठेवून आहे.

कार्लोला एक मुलगी भेटते. मी पाहिलेल्या मुलीत ती बहुधा सर्वांत कुरूप आहे. तिचा चेहरा मोठा आहे आणि तोंड घोड्यासारखं आहे. तिनं काल रात्री

घेतलेल्या जेवणाचा बराचसा भाग अजूनही तिच्या तोंडाला लागलेला आहे. कार्लोला या मुलीत सेक्सशिवाय दुसऱ्या कशाचंही स्वारस्य असण्याची शक्यता नाही. तो तिच्याशी अगदी मन:पूर्वक बोलत आहे. त्याचा एक हात तिच्यामागे तलावाच्या कठड्यावर टेकलेला आहे आणि दुसऱ्या हातानं त्यानं तिच्याभोवती वेढा घालून कठडा पकडला आहे. तो काय म्हणतोय कुणास ठाऊक, पण ती खुदखुदत आहे. जेव्हा मी तिच्याकडे नीटपणे पाहतो, तेव्हा माझ्या लक्षात येतं, की ती कुरूप आहे एवढंच नव्हे, तर ती मतिमंदही आहे. ती चौदा वर्षांची आहे आणि बहुतेक करून अशा मुलांच्या विशेष शाळेत जात असावी.

काही अंतरावर जिन्नी हा पण असंच काही तिच्या मैत्रिणीशी करत आहे. ती रूपानं थोडी बरी आहे, पण एका दृष्टिक्षेपातच तुम्ही सांगू शकाल, की तीसुद्धा अशा मतिमंद मुलांच्या शाळेत असावी. जिन्नीनं त्या मुलीला थोडं घाबरवलं आहे. ती त्याच्याकडे पाहत नाही आणि त्याला ढकलण्याचा प्रयत्न करत आहे; पण तो तिला पुन्हा घट्ट धरतो. तो वरचढ आहे आणि तिच्या खनपटीला बसलाय; परंतु ती त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करत नाही. पुढच्या वेळी जेव्हा मी त्यांच्याकडे पाहतो, तेव्हा पाण्यात त्यानं आपले पाय तिच्याभोवती गुंडाळले आहेत आणि थोड्याच वेळात मला दिसतं, की तो तिचं सर्व अंग चाचपडत आहे.

आम्ही अगदी स्वच्छ होऊन बाहेर येतो. आमची बोटं चिरमली आहेत आणि केस विस्कटलेले आहेत. मी आणि अंटोनियो इतरांची वाट पाहत कार पार्कशी थांबतो. ती जागा रस्त्याच्या खालच्या बाजूला आहे आणि तिथे कोपऱ्यावर एक लहान चौकोनी पंप हाऊस आहे. आमच्यातील मोठी मुलं या पंप हाऊसजवळ जाताना दिसतात. आम्ही त्यांच्यापाठोपाठ जातो. ते आता रांगेत उभे आहेत. जेव्हा आम्ही जवळ जातो, तेव्हा ते कशाबद्दल वादविवाद करत आहेत, ते आम्ही ऐकतो. त्या सर्वांना पुढच्या नंबरावर जायचंय. कशासाठी त्यांना पुढच्या नंबरवर जायचंय? आम्ही त्या पंप हाऊसला वळसा घालून जातो. तो रस्ता तिथे आमच्या वर आहे. तिथे काँक्रीट तुटलेलं आहे आणि त्यातून गवताचं तण उगवलेलं आहे. लोकांनी त्या रस्त्याच्या कडेवरून सामानाच्या ट्रॉलीज खाली टाकलेल्या आहेत आणि त्यांचे ते लोखंडी पिंजरे जिकडे तिकडे पडलेले आहेत. त्या पंप हाऊस आणि रस्त्याला मजबुती देण्यासाठी असलेल्या भिंतीमध्ये एक कुस्ती चाललेली आहे.

मी पाहतच राहतो. कार्लोची त्या घोडमुखी मुलीशी कुस्ती चाललेली आहे आणि ती कुस्ती नाही. तो तिच्याशी संभोग करतोय. ती भिंतीला पाठ करून उभी असताना त्यानं तिचे पाय वर धरले आहेत आणि त्याचा देह लयबद्धतेनं तिच्यावर आपटतोय. ती मला दिसणं कठीणच आहे, कारण दुसरा एक मुलगा तिच्या शरीराच्या वरच्या भागावर काहीतरी करत आहे. त्यानं तिच्या त्या घोड्यासारख्या

तोंडाचं चुंबन घेणं बंद केलंय आणि त्याचे हात आता तिच्या वक्षस्थळांवर आहेत. कार्लो आपलं काम संपवतो आणि तो दुसरा मुलगा धडपडत त्याची जागा घेण्यासाठी पुढे होतो. आता संभोग करण्याची त्याची वेळ असते. रांगेत असलेला पहिला मुलगा आत येऊन त्या मुलाची जागा घेतो.

ती सुंदर मुलगी काही यार्डांवर आहे आणि तिलाही भिंतीशी धरून दोन दुसरी मुलं काम उरकत आहेत. मला तिचा चेहरा दिसू शकतोय. त्यावर काही भावभावना नाहीत. तो अगदी कोरा आहे. ती प्रतिकारही करत नाही किंवा त्यातून तिला सुखही मिळत नाही. त्या मुलाच्या लयबद्धतेनं तिचं डोकं थोडं थोडं हलतं. ती मनानं तिथे आहे, असं मला वाटत नाही. कदाचित, ती उंच झाडावरून स्वत:ला पाहत असेल. तर प्रत्येक जण करतो ते हेच का?

प्रत्येक रांगेत दहा मुलं आहेत, त्यामुळे त्या मुली बराच वेळ व्यग्र असतील. आम्ही काही वेळ भुरळ पडल्यागत पाहत राहतो. मग आम्ही तेथून भटकत दूर जातो आणि सिगरेट शिलगावून त्या मोठ्या मुलांची वाट पाहतो. मला उगाचच उदास वाटतं, का ते कळत नाही.

सरते शेवटी प्रत्येक जण येतो. ती मुलं पुढे आहेत. ती हसतात, बोलतात आणि उड्या मारतात. त्या मुली मागाहून येत आहेत. आपले स्कर्ट त्यांनी खाली ओढले आहेत. कुणी त्यांच्याशी बोलत नाही आणि त्याही आपसांत बोलत नाहीत. जेव्हा मी चिप्स घेण्यासाठी जातो, तेव्हा त्या मुली एका हाऊसिंग इस्टेटकडे वळलेल्या दिसतात. तेथील हिरवळ जुन्या गाद्यांनी आणि जळलेल्या मोटारींनी भरलेली आहे. त्या मुलींना कुणी निरोप देत नाही.

शाळेमध्ये बायोलॉजीचे शिक्षक जरा शरमल्यागतच आम्हाला सेक्सच्या शिक्षणावरचे धडे देतात. ते आम्हाला शास्त्रीय पद्धतीनं आमच्या इंद्रियांच्या आकृत्या दाखवतात आणि व्हजिना आणि पेनिस अशा शब्दांचा वापर करतात. ते स्त्री, पुरुष संबंधाबद्दल बोलतात आणि त्यांना खोकल्याची वारंवार उबळ येते. आम्हाला हे संभोगाविषयी आहे, हे माहीत आहे; परंतु आम्ही ती भाषा, त्या आकृत्या किंवा ते नातं याची आणि आम्ही प्रत्यक्ष जे करतोय किंवा जे आम्ही तलावाजवळ पाहिलंय, त्याची सांगड घालू शकत नाही.

■

९

मी रेड्डीचमध्ये ॲल्बट्स यांच्या घराला भेट देतो. ते नेहमीप्रमाणे माझं प्रेमानं स्वागत करतात आणि मग त्यांच्या घरामागे काय आहे, ते दाखवतात – झाडं. त्या झाडांच्या मधून ओढा वाहात आहे. माझा झाडांच्या बाबतीतील अनुभव हा सफरचंदापुरता आणि ते क्रिकेटमैदानाजवळील मोठं हॉर्स चेस्टनट या झाडापुरता मर्यादित आहे; पण ही झाडं वेगळी आहेत.

सुरुवातीला जिल आणि ब्रायन त्या कुंपणातून माझ्याबरोबर आत घुसतात आणि आम्ही सर्वच त्या जागेचा मागोवा घेतो. त्या झाडांचे बुंधे जाड आहेत, पण ते तसे ठेंगणे आहेत आणि केसांसारखी गुंडाळीची वाढ त्यातून बाहेर येत आहे. ब्रायन सांगतात, की ती सर्व विलोची झाडं छाटलेली आहेत. याचा अर्थ, की ती पूर्वीच कापलेली आहेत. जरी ती झाडं उंच नसली, तरी ती खूप जुनी आहेत. सुकलेली गुंडाळी झालेली पानं पायांखाली चुरडत आहेत. त्यांचा तो आवाज मला आवडतो. मी ती झाडं बघत, त्यांच्या रुंद खोडाच्या विचित्र पाळण्यात चढत आणि त्यांच्या रसरशीत फांद्यांवर टणत्कार करत पानं पायांखाली चुरडत हिंडतो. या नवीन जागेत मी इतका गुंगून जातो, की ॲल्बट नवरा-बायको मी याचा आस्वाद घ्यावा, यासाठी मला सोडून गेली आहेत, हेही माझ्या लक्षात येत नाही.

त्या आठवड्याच्या सुट्टीत मी एकही सिगरेट ओढत नाही. मी माझा बहुतेक वेळ जंगलात त्या झाडांच्या घनदाट झाडीत राहुट्या बनवत आणि काड्यांच्या छोट्या बोटींची शर्यत नदीवर लावण्यात घालवतो. रविवारची सकाळ ही तशी आरामदायी आहे. ८९, रेनॉल्ड स्ट्रीटवरच्या गुत्ता आणि चर्चच्या दुःखांपेक्षा अगदी विरुद्ध आहे. जिल आर्चर्स ऑम्निबस ऐकत आहे आणि मी आणि ब्रायन या घराच्या मागच्या बाजूला हिंडतो. पूर्वी आम्ही जसं बोलायचो, तसं बोलतो. सुरुवातीला माझी सवय मोडलेली आहे; पण नंतर हे कसं करायचं ते मला आठवू लागतं.

या स्वच्छ नवीन दिवशी सूर्यप्रकाश तीव्र आहे. मी माझा श्वासोच्छ्वास बघू

शकतो. आम्ही त्या जंगलातून पलीकडे असलेल्या शेतात जातो. त्यातील एक शेत नांगरलेलं आहे. त्या लालसर तपकिरी, नांगरलेल्या उंचवट्यांवर उजेड जणू काही जमिनीत सोनं असावं, अशा तऱ्हेनं परावर्तित होत आहे. मग मी एक ससा पाहतो. तो त्या नुकत्याच नांगरलेल्या आणि चमकणाऱ्या जमिनीवरून वेगानं आणि आनंदानं धावत आहे. या दृश्याच्या सौंदर्यानं मी पार भारावून जातो. तो ससा जेव्हा नाहीसा होतो, तेव्हा मी त्याच्या जाण्याकडे टक लावून पाहतो, कारण तो ज्या जागेवर पळाला, त्या जागेकडे पाहून मला आनंद होतो. त्याचं ते सौंदर्य मी कधीच विसरणार नाही.

ब्रायनचं माझ्याकडे लक्ष आहे. एखाद्या शेतातील प्राण्यानं माझ्या डोळ्यांत अश्रू येईपर्यंत माझं मन कसं हेलावलं, हे त्यांनी सांगावं असं मला फार वाटतं.

"तू कलाकार आहेस मार्क." ते मला म्हणतात.

मी ते विसरलोच होतो. मी रंगकाम, चित्रकारिता आणि इतर मला आवडणाऱ्या गोष्टी बहुतेक विसरलोच आहे. त्या माझ्या आयुष्यातून पिळून बाहेर काढण्यात आल्या आहेत. या अशा गोष्टी तुम्ही शांत, निरव जागेत करता. माझ्यासारख्याला शांत, निरव अशा जागा यापुढे नाहीत. त्या सर्व जागा मी भरतो आणि भरतो ते त्रास आणि कटकटींनी.

मला नेहमीच पोलिसांनी ताकीद दिलेली आहे, चोरी, शॉपिंग सेंटरमध्ये मित्रांबरोबर गुंडागर्दी करणं, मारामाऱ्या करणं, इमारतींच्या वरच्या छपरांवर चढणं, अशा विविध गुन्ह्यांबद्दल. घरात याबद्दल वाईटात वाईट शिक्षा होते आणि पुन्हा एकदा कधी मी चोरी करताना पकडला गेलो, तर घरातील त्या ओरड्याला तोंड द्यायची माझी तयारी नाही. त्याऐवजी मी पीटच्या झोपडपट्टीत जातो.

तो तिथे नाही आणि तिथे असलेल्या लोकांना मी ओळखत नाही. ते वयानं मोठे आहेत; पण ते मला आत घेतात आणि मी शांतपणे पीटची वाट बघत थांबतो. त्यांनी हिप्पी संगीत लावलंय. ते धूम्रपान करत आहेत. ते खुर्चीवर बसलेले आहेत किंवा जमिनीवर गुडघे टेकून बसलेले आहेत. तिथे काहीतरी अपेक्षित आहे. ते एकमेकांकडे तपकिरी थेंब असलेला स्वयंपाकघरातील वर्खाचा तुकडा फिरवत आहेत. वर्तुळात तुमच्या मागे असलेला माणूस तो तुकडा एका हातानं धरतो आणि दुसऱ्या हातानं त्याखाली सिगरेट लायटर धरतो. तो तपकिरी थेंब हळूहळू त्या वर्खावरून खाली येताना त्याचा धूर होतो आणि हा धूर तुम्ही एका नळीतून ओढता.

मी पीटची वाट बघत बसलो आहे, पण त्या वर्तुळाचाही मी एक भाग आहे असं दिसतं. जेव्हा माझी वेळ येते, तेव्हा माझ्या उजव्या बाजूचा माणूस ते वर्ख आणि लायटर धरतो आणि मी इतरांचं अनुकरण करत धूर ओढतो.

मी धूर आत घेतो आणि एका क्षणात काहीतरी उबदार माझ्या शरीरात शिरतं.

ते माझ्या पायांच्या बोटांपर्यंत आणि माझ्या हातांच्या बोटांपर्यंत द्रवासारखं झिरपत जातं. मी पुन्हा ते ओढतो आणि जेव्हा ते माझ्या डोक्याच्या मागच्या बाजूला जातं, त्या वेळी एक प्रकारच्या प्रेमळ उबेत मी गुंडाळला जातो आणि माझ्यासाठी सर्व काही ठीक होतं. मी आणखी थोडं ओढतो आणि माझ्या काळज्या मला छळायच्या थांबतात. माझी भीती नाहीशी होते. आता कशाचं काही वाटत नाही. मी ते सर्व सोडून देतो. थंडीच्या सर्वांत थंड दिवशी सहा मोज्यांचे जोड घालावेत, तसे मोजे माझ्या मेंदूभोवती व्यवस्थित घातले जातात आणि सर्व विचार तिथे सुरक्षित आणि उबेत ठेवले जातात.

तो तपकिरी थेंब तीन वेळा गोल फिरून माझ्याकडे येतो. मग मी पीटच्या खोलीत जातो. मी त्याच्या जमिनीवर अंथरलेल्या चटईवर एका करड्या रंगाच्या खाज येणाऱ्या अशा ब्लँकेटखाली झोपतो. तिथे दिव्यावर जुना डबा घातलेला आहे आणि त्याच्या पत्र्याला उजेड बाहेर येण्यासाठी एक लांब चीर पाडलेली आहे. रात्रभर मी त्याकडे पाहत, ओकत पडून असतो. ती ओकारी इतर वेळच्या ओकाऱ्यांपेक्षा छान आहे, कारण जे काही बाहेर येतं, त्याच्या वेदना जाणवत नाहीत.

पीटला जेव्हा मी बऱ्याच उशिरा नंतर सापडतो, तेव्हा तो आपल्या मित्रांवर चिडतो. त्याला ओरडताना मी ऐकतो. ते का, ते मला कळत नाही. मला त्याची पर्वाही नाही. त्या तपकिरी थेंबानं सर्व काही ठीक होईल, अशी मला खात्री पटवून दिलेली आहे.

दुसऱ्या दिवशी मी उठतो, पण मला विचित्र वाटत असतं. मला काहीसा झोपाळूपणा जाणवतो आणि माझी संवेदनाशक्ती मंद झालेली आहे; परंतु कालची ती ऊब अजूनही माझ्या आतमध्ये आहे. मी जेव्हा दुकानांच्या रांगेत घोटाळत असतो, तेव्हा माझे काका तिथे असतात. ते मला सांगतात, की प्रत्येक जण रात्रभर मला शोधत आहे, पोलीससुद्धा. काहीसं विचित्र वाटत असताना मी पोलीस स्टेशनला जातो. तिथे काही मी नवीन नाही. नेहमी ते मला सरळ घरी घेऊन जातात; पण या वेळी ते मला कोठडीत टाकतात. मी आत जाताच माझ्यामागे ते दरवाजा बंद करतात. मला काही ते आवडत नाही. त्या किल्ल्यांच्या आवाजानं मला भीती वाटते. मी नेहमीच लफड्यात अडकतो; पण यापूर्वी पोलिसांनी मला कधी अडकवून ठेवलेलं नव्हतं.

इथे कुठे बसायला जागा नाही. ती कोठडी अगदी रिकामी आहे. वरच्या बाजूला थोडा उजेड येण्यासाठी जाड काचांचे चौकोन आहेत. भिंतीचा रंग तंबाखूच्या रंगाचा आहे, त्यामुळे मला सिगरेट हवीशी वाटते. मी काँक्रीटच्या जमिनीवर टेकतो आणि वाट पाहतो.

माझी ममा मला सोडवते. ती रागावलेली नाही. पांढरीफट्ट पडलीय आणि

भयानक दिसतेय. आम्ही घरी जातो. ती ओरडतही नाही किंवा मला मारतही नाही; परंतु घरातील निर्जंतुक जीवघेणं वातावरण हीच एक मोठी शिक्षा वाटते.

मी मायकेल जॅक्सनचा 'मून वॉक' टीव्हीवर पाहतो. प्रत्येक जण ते पाहतो आणि प्रत्येकाला ते करावंसं वाटतंही. संध्याकाळी शाळेच्या पटांगणात आम्ही मून वॉकींग करून गोंधळ घालतो. मग आम्ही *टॉप ऑफ दी पॉप्स* आणि जॅफ्री डॅनियलला *सोल ट्रेन* मध्ये पाहतो. मग मला आणि माझ्या मित्रांना तिकडे काहीतरी चालल्याचं जाणवतं आणि आम्ही त्यात भाग घ्यावा असं वाटतं. ते हिप्पी संगीत आहे. ती हालचालही ब्रेक डान्सिंगची आहे आणि हे सर्व अमेरिकेतील ज्यूंच्या राहत्या भागातून रेनॉल्ड स्ट्रीटवर आलेलं आहे. माझा मोठा भाऊ शेनसारखी काही मोठी मुलं *रॅमोन्स* पसंत करतात; पण आमचा इंग्लिश आणि इटालियन मुलांचा एक छोटा गट ब्रेक डान्सिंगवर भाळलेला आहे. आम्ही टीव्ही वर *ब्रेक डान्स* आणि *बीट स्ट्रीट* या सिनेमांतील त्यांच्या हालचालींचा अभ्यास करतो आणि त्या हालचाली करण्याचा प्रयत्न करतो. सुरुवातीला आमच्या हालचाली सावकाश होतात. हात हलविण्याशिवाय आम्ही काहीच शिकू शकणार नाही, असं वाटतं. त्यांच्या काही हालचाली अशक्यप्राय वाटतात. उदाहरणार्थ, एका दंडावर वळणं किंवा तुमचे पाय मागे घेऊन खेकड्यासारखं चालणं आणि जमिनीवर डोकं टेकवून गरगर फिरणं; परंतु इतर अनेक हालचाली सराव केला, तर आम्ही करू शकू आणि आम्ही तेच करतो. तासन् तास, रोज आणि आठवडेन् आठवडे आम्ही सराव करतो. त्यात वाटणाऱ्या गोडीनं आम्हाला पछाडलंय. जेव्हा आमचे हात-पाय आमच्या सूचना पाळू लागतात, तेव्हा आमची योग्यतेची पातळी वाढते. आम्ही ती हालचाल पक्की झाल्याशिवाय रस्त्यावर नाचत नाही.

ब्रेक डान्ससाठी तुम्हाला खूप बळकट असायला हवं, त्याशिवाय लवचिकही, कारण त्यातील प्रत्येक हालचाल ही संयमित असते. तुमच्या शरीराचा वरचा अर्धा भाग, हा मजबूत असायलाच हवा, कारण तुमच्या दंडांना बऱ्याचदा तुमचं वजन पेलावं लागतं. मी माझ्या शरीराच्या गुरुत्वाकर्षणाला झुगारायला शिकत आहे. मी उडायला शिकत आहे.

अमेरिकेत हा ब्रेक डान्स टोळी युद्धातून जन्मला. ज्याचे स्नायू मारामारीत अगदी तरबेज आहेत, ते सर्वोत्तम ब्रेक डान्सर ठरले. इथे इंग्लंडमध्ये हा डान्स आम्हाला त्रासांपासून दूर ठेवतोय. मी माझ्या सवंगड्यांबरोबर या ब्रेक डान्समध्ये इतका गुंतलोय, की मला यापुढे चोऱ्या करायला किंवा शॉपिंग सेंटर्समध्ये दंगे करायला वेळच नाही. आम्ही आता आमच्या लिनोच्या तुकड्यांची गुंडाळी आमच्याबरोबर काखेत घेऊनच हिंडतो. आम्ही कुठेही थांबू शकतो, अगदी रस्त्याच्या फरसबंदीवर, शाळेच्या पटांगणात किंवा शॉपिंग सेंटर्सजवळ. मग ते लिनो खाली ठेवतो आणि

बाहेर येतो, तो ज्यूंच्या पाइपसारखा वाद्यांचा आवाज आणि आम्ही नाचू लागतो. अनेक लोक आम्हाला बघतात, अनेक आमचं कौतुक करतात. यात मुलीही असतात. जेव्हा हालचाली जास्त कठीण होतात, तेव्हा आम्ही जास्त सराव करतो. आमचे हात जमिनीवर टेकून शरीर ताठ ठेवून आणि हवेत पाय उचलून आम्ही पवनचक्की शिकतो. तीन माणसांचं हेलिकॉप्टर आम्ही व्यवस्थित करतो. उड्या मारतो. गरगरतो. आम्ही सदैव काही ना काही हालचाली करत राहतो. जेव्हा मुलांचे थवे आम्हाला पाहत असतात, संगीताचा आवाज येत असतो आणि माझं शरीर जवळजवळ नसल्यागत होतं, तेव्हा मला वाटतं, की मी किड्डरमिन्स्टर मागे टाकत आहे. मी अमेरिकेच्या रस्त्यावर ब्रेक डान्स सिनेमात आहे आणि तिथेच मला जायची इच्छा आहे.

कपडे हे आम्हाला महत्त्वाचे आहेत. योग्य मापाचा ट्रॅक सूट, उत्तम बूट यावर आमची ब्रेक डान्सर म्हणून योग्यता ठरते. मी हिप्पींच्या संगीतात बुडालोय आणि ब्रेक डान्सर असल्यामुळे मी कोण आहे, याची मला पुरेपूर जाणीव आहे. मी चोऱ्या करणाऱ्या, दारू पिऊन झिंगणाऱ्या आणि चुत्या मार्कपेक्षा जास्त ताकदवान आहे.

■

१०

मी तेरा वर्षांचा असताना एक दिवस शेन आणि मी शाळेतून घरी आलो आणि पुढच्या दरवाजावर ठोकलं. एक विचित्र सावली पुढे येताना पाहिली. ती ममा किंवा नॅन नव्हती. डॅडी घरी असावेत. आम्ही त्यांना कारमधून जाताना पाहिलं होतं; परंतु ती सावली त्यांची नव्हती. एका मोठ्या भांडणानंतर ते घरी राहत नाहीयेत. काहीतरी घडलंय, हे मला ताबडतोब कळतं.

दरवाजा उघडला जातो. तिथे उभी आहे, ती लंबाड्या नाकाची, खप्पड गालांची मॉरीन. माझ्या ममाची जिहोवाच्या शिष्यगणातील एक मैत्रीण. **द वर्ल्डस ग्रेटेस्ट स्टरर** हे देणारी दुष्ट बाई. ती आमच्याकडे कडवटपणे पाहते. आमच्यात काही अभिवादन वगैरे होत नाही.

"ममा कुठे आहे?" शेन विचारतो.

मॉरीन थांबते. तिचा चेहरा लाल होतो. "ती हॉस्पिटलमध्ये आहे."

आम्ही आमच्या घराच्या उंबरठ्यावर तिच्याकडे पाहतो आणि तिच्या मागून हॉलमध्ये ममा दिसते का ते पाहतो.

"तिनं काही गोळ्या खाल्ल्या. झोपेच्या गोळ्यांचा तिनं ओव्हरडोस घेतला."

म्हणजे ममा जिवंत नाही. ती स्वर्गात प्राण्यांबरोबर सदैव राहणार, असं ठरलेलं असताना त्याऐवजी ती मेली आहे. मला संशय येतो, की मुडदेचोर मॉरीननं तिला मारली असावी.

"ती अजून जिवंत आहे." मॉरीन बऱ्याच वेळानंतर सांगते, कारण तिला चांगली बातमी घाईनं सांगण्याची इच्छा नाही. "परंतु ती हॉस्पिटलमध्ये आहे आणि तुम्हाला आपल्या बॅग्ज भरून माझ्याबरोबर राहायचंय."

त्या बातमीचे मथळे मी मनात वाचतो. ममा हॉस्पिटलमध्ये आहे. तिनं झोपेच्या गोळ्या जास्त घेतल्या आहेत. या शब्दांचा मला बोध होत नाही.

"तिनं स्वत:ला मारण्याचा प्रयत्न केलाय," मॉरीन जरा जोरात सांगते.

आम्ही घरात जातो आणि आम्हाला तिथे डॅडी दिसतात. तिथे केली आणि बेथनीही आहेत. बेथनी रडतेय. मागच्या त्या कडाक्याच्या भांडणानंतर डॅडी इथे आलेले नाहीत; परंतु त्यांना तिथे पाहून आम्हाला आश्चर्य वाटत नाही, कारण आमच्याकडे आश्चर्यच शिल्लक नाही. आपण काय करावं, हे डॅडींना समजत नाही. ते उठतात आणि पुन्हा बसतात असं चाललंय.

केली सांगते, की ममा झोपेच्या गोळ्यांचं औषध लिहून घेण्यासाठी गेल्याचं नॅनला माहीत होतं. जेव्हा तिनं घरी फोन केला आणि कुणी फोन उचलला नाही, तेव्हा नॅनला काळजी वाटू लागली. ती तडक इकडे आली आणि तिला पलंगावर थंड पडलेली आपली ममा सापडली. मग दिव्यांचा झगझगाट करत ॲब्युलन्स आली आणि ममाला घेऊन गेली. मी तिचे शब्द काहीही न वाटता ऐकतो. मी अगदी क्रूर,भावनाशून्य रोबॉट झालोय. जेव्हा मी ब्रेक डान्स करतो, तेव्हा रोबॉटसारखे कपडे करतो आणि तो असल्याचं नाटक करतो; पण आता मी खराखुरा रोबॉट आहे.

ममा बरी होईल, याची केली आम्हाला खात्री देते. "ते तिच्या पोटातून झोपेच्या गोळ्यांचे अवशेष बाहेर काढतायत."

"च्यायला नरकच आहे." आम्ही म्हणतो.

ममानं स्वत:ला मारण्याचा प्रयत्न केला, ही अत्यंत वाईट गोष्ट आहे, असं मॉरीन आम्हाला सांगते. जिहोवाचे शिष्य जरी जगाच्या अंताचं भविष्य नेहमीच सांगत असले, तरी त्यांनी तो स्वत: आणायचा नसतो. परमेश्वर, ज्यांचे आत्मे वाचलेले नाहीत, त्यांची स्वत:च योग्य वेळी व्यवस्था करील. अशा तऱ्हेची गोष्ट मॉरीन स्वत: देवाच्यावतीनं करायचा प्रयत्न करील, असा मला संशय येतो. ज्या वेळी तिनं ममाला जिहोवाची दीक्षा दिली, तेव्हापासून एखाद्या दुष्ट मावशीसारखा तिचा ममावर प्रभाव आहे.

आमची काळजी घेऊ शकतील, असं मॉरीनला खात्रीपूर्वक सांगून, डॅडी आम्हाला तिच्या तडाख्यातून वाचवतात. ती त्यांच्याकडे मण्यासारख्या डोळ्यांनी चौकसपणे पाहते. ममानं झोपेच्या गोळ्या प्रमाणाबाहेर खाल्ल्या, हा डॅडींचा दोष आहे, असंच ती नजर सांगते आणि मग ती त्या तशाच मण्यांच्या डोळ्यांनी आमच्याकडे पाहते आणि त्याचा अर्थ, हा आमचाही दोष आहे. ती आपली मोठी हँडबॅग उचलते आणि चालू लागते.

'चेटकिणी चालती हो' असं मी मनात म्हणतो. 'या जागी माझे डॅडी हे प्रमुख आहेत, तू नाहीस.'

घर शांत आहे. काय घडलं, यावर मी विचार करत नाही. ते का घडलं आणि त्याचे काय परिणाम झाले असते, याचाही विचार करत नाही. मी कशाविषयीच विचार

करत नाही. या अशा परिस्थितीत मी ब्रेक डान्सचे कपडे घालून ज्यूंचं ते पाइपचं वाद्य आणि लिनोलिअयमचा तुकडा घेऊन बाहेर जाणं कितपत योग्य ठरेल, याचा मनाशी विचार करत असतो. बाकी सर्व कुटुंबीय तिथे गुपचूप बसलेले आहेत. शेन वरच्या मजल्यावर संगीताची रेकॉर्ड ऐकत आहे. मग मी कपडे बदलतो आणि बाहेर जातो. बाहेर सर्वांना आमच्याबद्दलची बातमी कळलीय, हे उघड दिसतं. वडीलधारी माणसं माझी विचारपूस करतात आणि नंतर नजर फिरवतात. मुलं टक लावून पाहतात. त्यापैकी काही प्रश्न विचारतात, त्याकडे मी दुर्लक्ष करतो. आज माझं नाचणंही फारसं चांगलं नाही. माझ्या शरीराला तो नेहमीचा उठाव नाही. माझ्या हालचाली हलक्या नाहीत. मी यंत्रमानवाच्या काही हालचालींचा प्रयत्न करतो आणि मी यंत्रमानवासारखा दिसत नाही, हे मला माहीत होतं. हे जरा विचित्रच आहे, कारण पूर्वी कधी मला वाटलं नव्हतं, तेवढं आज यंत्रमानवासारखं वाटतंय.

दुसऱ्या दिवशी ममा परत येते. ती निस्तेज वाटते. ती जास्त काही बोलत नाही किंवा स्पष्टीकरण देत नाही आणि सरळ झोपायला जाते. आम्ही टीव्ही लावतो. बेथनी वरच्या मजल्यावर जाते आणि ममाच्या बाजूला झोपते. मग डॅडी ममासाठी चहाचा एक कप घेऊन जातात आणि वर बरीच बोलणी होतात; परंतु आज त्यांचे आवाज कधी नव्हे ते शांत असतात. नॅन येते, आपलं डोकं हलवते आणि ममानं हे निराशेपोटी केलं असं म्हणते; परंतु आम्हा सर्वांना सत्य माहीत आहे. ममाचं ते भयानक किंचाळणं, तिचं रडणं आणि जीवनाचा शेवट जवळ आल्याच्या सदोदित केलेल्या सूचनेवरून आम्हाला हे बराच काळ आधी माहीत आहे. आता त्या रेनॉल्ड स्ट्रीटवरील सर्वांनाच ते माहीत आहे, कदाचित सर्व किडरमिन्स्टरलाही. ममाचं डोकं फिरलंय.

सप्टेंबर महिन्यात मी माध्यमिक शाळेत जाईन. आता मी तेरा वर्षांचा आहे; परंतु त्या आधी उन्हाळ्याच्या सुट्ट्या आहेत आणि ममाला विश्रांती हवी म्हणून त्या मला डॅडींबरोबर घालवायच्या आहेत. न्यूकॅसलजवळच्या लाईटपॉवर स्टेशनवर डॅडी काम करणार आहेत आणि आम्ही एका चाकांच्या घरात समुद्राजवळ राहणार आहोत.

पहिल्या दिवशी आमच्या त्या चाकांच्या घरातून डॅडी कामावर जातात. दुधासाठी किंवा कडक पावासाठी ते एक पौंड मला देऊन जातात. डॅडींचा सिगरेट बनवण्याचा कागद घेऊन मी माझ्यासाठी एक सिगरेट तयार करतो आणि पलंगावर पडतो. रेडिओ चालू करतो आणि पाठीवर पडून सिगरेट ओढतो आणि सिमॉन बेट्स वरच्या प्रणयकथा ऐकतो. मला हसू येतं, कारण यातील पुरुष हे अगदीच भोळे आणि मूर्ख असतात. मी जेव्हा बाहेर जातो, तेव्हा तिथे जंगलात मुलांचा एक गट असतो आणि मी त्यांच्यात जातो. समुद्रकिनाऱ्यावर शेकोटी करण्यासाठी ते

लाकडं जमवत आहेत. ते मला ठीक वाटतं. पुढच्या महिन्यात ही सर्व मुलं आणि मी शेकोट्या पेटवतो, दिवसातून तीनदा पोहायला जातो आणि मासे पकडणं आणि ते शिजवणं, दारू पिणं, धूम्रपान करणं आणि वाळूच्या ढिगात मुलींशी धंदे करतो. हे आयुष्य मस्त आहे.

सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे डॅडी. रोज ते बाहेर जाताना मला एक पौंड देऊन जातात. प्रत्येक रात्री घरी परतताना माशांचं मिष्टान्न आणि चिप्स घेऊन येतात आणि ते काय ते आम्ही खातो. रोजचं आमचं हे अन्न बदलत नाही. डॅडींचं पिणं हे कॅनपुरतं मर्यादित आहे आणि ते पिऊन तर्र होत नाहीत. आता प्रत्येकाला एक कप आणि एक प्लेट आहे. ती आम्ही धुतो आणि वाळण्यासाठी ठेवतो. आमच्याकडे एक प्लेट पुसायला टॉवेल आहे आणि तो न धुता उन्हाळाभर पुरतो आणि याची आम्हाला पर्वा नाही. हे सर्व अगदी सोपं आहे. मला हे आयुष्य आवडतं. डॅडीही आवडतात. सर्व चांगल्या गोष्टी कधी ना कधी संपायला हव्यात आणि सरतेशेवटी ममा सहा वर्षांच्या बेथनीला घेऊन हजर होते. ममा आणि डॅडी एकत्र आल्यावर त्या चाकाच्या घरातील हवा बदलते. डॅडी बेथनीच्या कौतुकात नेहमीप्रमाणे दंग आहेत आणि ते त्रासदायक वाटतं; परंतु ममाचं तिथं राहणं, हे खरं संकट आहे. आम्हाला तिचा राग येतो. ती नकोशी वाटते आणि डॅडी असं सांगतातही. "आपण सर्व ती येईपर्यंत ठीक होतो नाही का रे मुला?"

सप्टेंबरमध्ये अनेक गोष्टी बदलतात. डॅडींना नॉर्थ सीवरील गॅसच्या रिगवर काम मिळतं. दोन आठवडे काम आणि दोन आठवडे विश्रांती आणि पगारही भरपूर असतो. आयुष्यात पहिल्यांदा आमच्याकडे खऱ्या अर्थानं पैसा येतो. माझ्या माध्यमिक शाळेची सुरुवात होते आणि सहामहीसाठी मला तान्या मावशीकडे पाठवलं जातं. ती आणि स्टीव्ह काका हे काही वर्षांपूर्वी, जेव्हा किड्डरमिन्स्टरमधील कार्पेट फॅक्टरीपैकी एक बंद झाली, तेव्हा लेक डिस्ट्रीकला गेले आहेत. केंडॉल हे छोटं शहर आहे आणि कंटाळवाणं आहे. तिथे ब्रेक डान्स करायला कोणी नाही. जेव्हा ममा त्या जागेबद्दल मला काय वाटतं, असं विचारते, तेव्हा मी तिला हे सांगतो. जणू काही माझं उत्तर महत्त्वाचं आहे.

काही दिवसांनंतर मी शाळेतून घरी येतो आणि आमच्या घराबाहेर विकायचं आहे, अशी पाटी पाहतो.

मला भयानक मोठा धक्का बसतो. मला केंडॉलला जायचं नाही. कुणालाच जायचं नाही. केली अठरा वर्षांची आहे आणि ती गरोदर असल्यापासून आपल्या मित्राबरोबर राहत आहे. ममानं तिला घालवून दिली आहे. याचा अर्थ ती नक्कीच जाणार नाही. शेनची शाळा आता संपणार आणि तो आता एका परातीचं काम करणाऱ्या कंपनीत काम करणार आहे आणि तोही जाणार नाही आणि तो त्याऐवजी नॅनबरोबर राहणार,

असं जाहीर करतो; परंतु न जाण्यासाठी असलेली माझी कारणं म्हणजे मित्रांची गैरहजेरी वगैरे याला महत्त्व दिलं जात नाही.

काही लोक ते घर बघायला येतात आणि ते जवळजवळ ताबडतोब विकलंही जातं. त्यानंतर डॅडी नॉर्थ सीवरील गॅस रिगवर जातात आणि आम्ही निघतो.

आमचं सामान व्हॅनच्या मागच्या बाजूला ठेवलेलं आहे. मी आणि बेथनी व्हॅनमध्ये जातो. मी तपकिरी रंगाच्या आरामखुर्चीवर आराम न करता बसतो आणि बेथनी सोफ्यावर बसते. ममाची जेवणाच्या खोलीतील झोपड्यांची चित्रं फुटू नयेत, म्हणून बेथनीच्या मांडीवर ठेवलेली आहेत आणि मी मोठा आरसा धरून बसलोय. मी रेनॉल्ड स्ट्रीटवर दुतर्फा असलेल्या लाल घरांच्या रांगांकडे ती वळणावरून दिसेनाशी होईपर्यंत पाहतो. केली आणि शेन आमचा निरोप घेतात आणि दरवाजे बंद होण्याआधी त्यांचे चेहरे मी शेवटचे पाहतो. आम्ही अंधारात बसतो आणि बाहेरचे निरोपाचे शब्द ऐकतो. मग लॉरी सुरू होते आणि आम्ही अंधारात लडखडत जात आहोत. ती दिशा उत्तर आहे, हे मला माहीत आहे.

आम्ही पोहोचतो. कुणीतरी दरवाजा उघडतं. आता मी अशाच एका रस्त्यावरील गच्चीच्या घराकडे पाहतोय; पण या वेळी ती करड्या रंगाची आहेत. ती दगडांची छोटी घरं करडी आहेत. पाऊस पडतोय आणि तोही करड्या रंगाचा आहे. काही अंतरावर हिरवळ आहे. ती टेकडी आहे. त्यावर एक करड्या रंगाचा किल्ला आहे आणि त्यावरचं आकाश करड्या रंगाचं आहे. मला त्या व्हॅनमधून उतरायची इच्छा नाही; परंतु एका माणसानं आता सामान काढायची सुरुवात केलेय आणि तान्या मावशीचा आवाज बाहेर ऐकू येतो. माझ्या ममाची बाहेर धावपळ सुरू आहे. बेथनी तिला शक्य आहे, तेवढी मदत करत आहे.

मी पावसात सिगरेट ओढण्यासाठी जातो. केंडॉलच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चालत जातो. त्याला फक्त पाच मिनिटं पुरतात. रस्ते शांत आहेत. कुठेही मुलं नाहीत. पावसामुळे तिथे मुलं ब्रेक डान्स करत असतील असं आच्छादित शॉपिंग सेंटरही मला दिसत नाही. मला भेटणारा प्रत्येक जण गोरा आहे. काळे चेहरे नाहीत, इटालियन्सही नाहीत. स्वारस्यपूर्ण दिसणाराही कोणी नाही. पादचाऱ्यांसाठी खालून जायचे रस्तेही नाहीत, की रेल्वेचे पूलही नाहीत किंवा कालवे किंवा जिथे मी माझ्या मित्रांबरोबर गोंधळ घालायचो, अशा जागाही नाहीत. इथे मित्रही नाहीत. केंडॉल हे दुसरं जग आहे. ते मृतवत आहे. कदाचित, मीच मृतवत असेन.

मी शांतपणे चालतो आणि मग आमच्या नवीन घरात शांतपणे शिरतो.

मी माझ्या नव्या खोलीत जातो आणि तान्या मावशीला भेटायला जाण्याशिवाय आठवडेन् आठवडे मी त्या खोलीतून बाहेर पडत नाही. तिची लहान मुलं भोवती उड्या मारत असतात. ती मला सिगरेट ओढू देते. इथे थोडाफार जिवंतपणा आढळतो.

मी शेनला फोन करतो; पण आम्हाला काय बोलावं ते समजत नाही. कदाचित, आम्ही एकमेकांशी फारसं बोललेलोच नाही; परंतु आम्ही एका घरातच राहत असल्यामुळे हे आमच्या लक्षातच आलं नव्हतं. मी डॅनियलला फोन करतो. तो मला काही बातम्या देतो. त्याचा आवाज ऐकल्यावर मला तिथे असण्याची फार इच्छा होते.

माझी नवीन शाळा तशी आधुनिक आहे. ती आयताकृती असून, शहराच्या टोकाला आहे. पहिल्या दिवशी मी घाबरतच तिथे प्रवेश करतो. मला माझ्या वर्गात नेलं जातं. माझ्या मागच्या शाळेसारखाच इथे गंध आहे. तो गंध म्हणजे खडूचा वास, लांबीचा वास, निर्जंतुकाचा वास आणि मुलांचा वास याचं मिश्रण आहे. केंडॉलमधील शाळेला पावसाचाही वास येतो. मी चांगलं दिसण्याचा प्रयत्न केलाय. या लाल मानवाल्या मागासलेल्या मुलांना मी एक कणखर शहरी मुलगा आहे, हे मला दाखवून द्यायचंय. यासाठी मी गडद करड्या रंगाची आतून लाल कापड लावलेली आणि लाल रंगाचे खिसे असलेली पँट घातली आहे. या पँटला थोडीशी चकाकी आहे. ज्याला काही माहीत आहे, त्यालाच त्याचा अर्थ कळेल, की मी शाळेत नसतो, तेव्हा मी ब्रेक डान्सर आहे. अर्थात केंडॉमधील मुलांचं त्या पँटकडे लक्ष जातं, पण त्यांना त्याच्या मागचा अर्थ कळत नाही, कारण या वेडपटांच्या राज्यात ब्रेक डान्सिंग घुसलेलंच नाही.

"हा कोणीतरी वेडपट असला पाहिजे."

मी जेव्हा माझ्या नव्या शिक्षकांना भेटायला वर्गाच्या पुढच्या बाजूकडे जायला निघतो, तेव्हा वाटेत एक मुलगा त्याच्या बाकाजवळून जाताना हे मला उद्देशून म्हणतो. मी चालताना थांबतो. शिक्षकांना आश्चर्य वाटतं. मी जेव्हा वळतो, तेव्हा त्यांचे स्वागताचे शब्द अडखळतात आणि डोळे सताड उघडतात. मी त्या बडबडणाऱ्या मुलाजवळ जातो आणि त्याला एक ठोसा ठेवून देतो. सर्व वर्ग आश्चर्यानं गप्प राहतो. इतकंच नव्हे, तर शिक्षकांनाही काय करावं, ते समजत नाही. शिक्षक मला वर्गाबाहेर जायला सांगतात आणि मी त्या वर्गात अजून बसलेलोही नाही.

या अशा भव्यदिव्य प्रवेशानंतर माझ्या शालेय जीवनाची शांतपणे सुरुवात होते. माझं सर्व जीवनच शांत आहे. ते इतकं शांत आहे, की मी खरंच मेलेलो असू शकेन असंच मला वाटतं. हळूहळू माझी दुसऱ्या मुलांशी ओळख होते आणि आम्ही नदीशेजारी एकत्र सिगरेट ओढतो. पाय घसरल्यामुळे मी पडतो आणि पाण्याचा वास घेतो. त्या पाण्याच्या प्रवाहात मी दिसेनासा होतो. आता मी नदीत आहे. मग मी जमीन होतो. हा चांगला अनुभव आहे आणि यासारखे बरेच अनुभव आहेत; परंतु तरीही माझी मन:स्थिती चांगली होऊ शकत नाही. डॅडी परत येत आहेत आणि आम्ही सर्व जण इस्टरच्या सुट्टीसाठी किड्डरमिन्स्टरला दोन आठवड्यांसाठी

जात आहोत. या बातमीनं मी आनंदित होतो. या दोन आठवड्यांसाठी मी जगतो आणि मी तिथे नॅनबरोबर राहू का, असं ममाला पुन्हा पुन्हा विचारत असतो. ती नाही म्हणते.

आम्ही जसं किड्डरमिन्स्टरजवळ पोहोचतो, मला ते जुने गंध येतात, जुनी दृश्यं दिसतात आणि कित्येक महिन्यांनंतर माझ्या चेहऱ्यावर हसू येतं. काहीही बदललेलं नाही. माझे मित्र तेच आहेत आणि ते नाचणंही तसंच आहे. मी माझ्या त्या जुन्या भूमिकेत चपखलपणे बसतो. ते दोन आठवडे मी भर वेगानं जगतो. जणू मी त्या सुट्टीत एक वर्ष बसवण्याचा प्रयत्न करतो.

मी त्या शहराच्या मध्यभागी डॅन आणि इतर मुलांबरोबर भटकत आहे. बालसॅल हिथमधील वेश्यांबद्दल एक मुलगा बोलू लागतो. दहा पौंडात तुम्ही तुमच्या पसंतीच्या स्त्रीशी संभोग करू शकता. त्याला हे माहीत आहे, कारण तो तिथे गेलेला आहे. आम्हा सर्वांना त्याची भुरळ पडते; पण एका नोकरी करणाऱ्या मुलाला त्याची जास्तीच भुरळ पडते. तो त्या कल्पनेनं पछाडलेला आहे. तो इतकं प्रश्न विचारतो, की सरतेशेवटी आम्ही जायचं ठरवतो. हा अशा तऱ्हेचा अनुभव आहे, जो तुम्ही केंडॉलमध्ये घेऊ शकणार नाही. बर्मिंगहॅमला कारनं जाताना तो नोकरी करणारा मुलगा उत्तेजित होऊन आपल्या मजुरीचे पैसे बाहेर काढतो. तो आम्हा प्रत्येकाला दहा पौंड खर्चायला देतो.

आम्ही अशा रस्त्यावर येतो, जिथे कपडे काढून वेश्या लाल उजेडाखाली बसलेल्या आहेत. त्या स्वप्नातीत वाटतात. काही हिरव्या उजेडाखाली आहेत आणि त्या दुसऱ्या ग्रहावरून आल्यासारख्या वाटतात. फारसे कधी आंघोळ न करणारे लोक इकडेतिकडे घोटाळत आहेत. दुसरे स्वच्छ दिसतायत; पण त्यांच्या हालचालीत एकप्रकारचा चोरटेपणा आहे. कार्स तेथून जातात, वळतात आणि पुन्हा वळून येतात. स्थानिक लोक डावीकडे किंवा उजवीकडे न बघता त्या फरसबंदीवरून चालत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर एक तऱ्हेचा दुःखी, हतबलतेचा भाव आहे. आम्ही मुलं त्या तऱ्हतऱ्हेच्या स्त्रिया, त्यांचे आकार, त्यांचं रूप, त्यांचे रंग आणि वय आणि ज्या तऱ्हेनं त्या आम्हाला खुणावतायत, त्यावरून उत्तेजित झालो आहोत. कँडी विकत घेणाऱ्या मुलांसारखे आम्ही आहोत, पण पुरुषांसारखं बनण्याचा आम्ही प्रयत्न करतोय. "च्यायला नरक, तिकडे बघा."

"हां,"

"च्यायला, चुत्या, साल्या."

त्यातील काही वेश्या तरुण आणि सुंदर आहेत. काही मग्रूर आहेत. बहुतेक सर्व जणी जेव्हा आम्ही तिथून जातो, तेव्हा आकर्षक नवीन ढब घेऊन बसतात. त्यातील काही किळसवाण्या म्हाताऱ्या आहेत. त्या बहुतेक पन्नाशीच्या तरी

असतील. त्यांनी कोळ्यांच्या जाळ्यांचा पोशाख घातलाय आणि त्यांच्या चेहऱ्यावरची रंगरंगोटी ओठांवरून पसरून त्यांच्या कडक, सुरकुतलेल्या चेहऱ्यावर आली आहे. त्या सिगरेट ओढत बसल्या आहेत. त्यांचे पाय फाकलेले आहेत. तो सर्व रस्ता जणू काही सर्कशीचा अनैसर्गिक असा खेळ आहे.

जो मुलगा इथे आला होता, तो माहीतगारासारखी माहिती देतो. "तुम्ही त्यांना किती ते विचारा. तुम्ही इथे असंच करायचं असतं."

ते कसं, ते तो आम्हाला दाखवतो. तुम्ही त्यांच्याकडे सरळ पाहायचं आणि मान हलवायची. त्या बायका आकर्षक हसू चेहऱ्यावर आणतील आणि दहा बोटं वर करतील किंवा कमीही.

शेवटी आम्ही एकीची निवड करतो. ती मोठ्या बाईच्या वयाची आहे. कदाचित, तिशीची असेल. तशी ती गुबगुबीत आणि सुंदर आहे आणि ती ज्या तऱ्हेनं आमच्याकडे पाहते, ते आम्हाला आवडतं. तिचं हास्य आश्वासनपूर्ण आहे. ती आकर्षक आणि अनुभवी आहे आणि एवढं नक्की, की ती आमचा वेळ चांगला घालवील.

एका मागोमाग आम्ही आत जातो. ज्या मुलानं आम्हाला पैसे दिले, तो पहिल्यांदा जातो. तो दरवाजातून आत जातो आणि ती स्त्री पडदे लावते. आम्ही वाट पाहत असताना मादक द्रव्य ओढतो. काही मिनिटांनंतर तो पुरुषासारखे आणि प्रशंसेचे आवाज करत येतो. त्याचा हात स्प्लीफ हातात घेताना थरथरत असतो.

त्यानंतर डॅनियल जातो. तो हसत बाहेर येतो. आता माझी वेळ.

मी जरा घाबरलोय. आत शिरताना तेथील रंगाचे पोपडे ज्या तऱ्हेनं सुटलेयत आणि पोस्टाची पेटी टेप लावून बंद केलेली आहे, हे पाहण्याची मला इच्छा नाही. मी आत जातो, तेव्हा ती माझी वाट पाहत उभी असते. मी झटकन त्या खोलीच्या आजूबाजूला पाहतो. पडदे ओढलेले आहेत. तिथे एक खुर्ची आहे. डाग पडलेल्या त्या भिंती उघड्याबोडक्या आहेत. त्या लाल उजेडात त्या वेश्येच्या सिगरेटचा धूर हळूहळू गोलाकाररीतीनं वर जातो. ती पोशाख करून पलंगावर कोपरे टेकून झोपलेली आहे. तिची ढोपरं एकमेकांजवळ आहेत आणि तिथे एक दरवाजा आहे. तो पलंगाजवळ आहे आणि सताड उघडा आहे. मी ताबडतोब सावध होतो. त्याच्या मागे काय आहे? तिथे कोण आहे?

मी त्या वेश्येकडे पाहतो. ती माझ्याकडे पाहते. ती आपले पाय फाकवते, तेव्हा तिथे काळ्या केसांची भरपूर वाढ दिसते. मला भीती वाटते. मी काही सराईत नाही. मी एक मुलगाच आहे आणि ती स्त्री मोठी आहे. ती माझ्याहून मोठी आहे आणि माझ्यातून आरपार पाहू शकते आणि जेव्हा आम्ही तो उद्योग सुरू करू, त्या वेळी तिचा ती सिगरेट विझवण्याचा विचार नाही, हे उघड आहे.

ती मला कपडे काढायची सूचना करते. अचानक, मला लाज वाटते आणि मी जॅकेटपासून सुरुवात करतो. ती हात हलवून मला थांबवते आणि त्या धुराची एक पातळशी रेषा हवेत तिच्या बोटांचा मागोवा घेते.

"फक्त तुझी पँट," ती मला सांगते.

"फक्त माझी पँट?" मी कोट पुन्हा माझ्या खांद्यावर चढवतो आणि माझी पँट खाली करतो. मला अगदी खरं मूर्खासारखं वाटतं. माझ्या त्या जाडजूड कोटाखाली असलेले ते बारकेसे मुलाचे पाय खरं सांगायचं, तर हास्यास्पद वाटतात. पेटलोय का? सेक्स ही माझ्या मनात शेवटची गोष्ट आहे. मी या स्त्रीबरोबर या जागेत... त्या पडद्यामागे कुणीही मला पाहत असेल किंवा मला सुरा भोसकण्याच्या तयारीत असेल, हे जाणून मी ते करणं शक्य नाही. ही काहीशी अवघड आणि प्रतिकूल परिस्थिती आहे आणि मला यातून बाहेर पडायचंय. मी खिशातून दहा पौंडाची नोट काढतो आणि मला तिचे डोळे चमकताना दिसतात.

"हे बघ, हे सर्व ठीक आहे." मी म्हणतो. "हे तू घे, ठीक आहे?"

ती हसते. ते हास्य ती खिडकीत असताना होतं ते नाही. ते हास्य जाणीवपूर्ण, अप्रसन्न हास्य आहे. ती नोट घेते. मी त्या उघड्या दरवाजाकडे नजर टाकतो. त्या तिथे काहीशी हालचाल झाल्याचं मला जाणवतं. मी शक्य तेवढ्या लवकर माझी पँट चढवतो.

"ठीक आहे, बाय बाय." मी त्या वेश्येला म्हणतो.

ती माझ्याकडे दुर्लक्ष करते. मग माझ्या मनात येतं, की इतर मुलांनीही तेच केलं असावं. ती वेश्या त्या एकेरी पलंगावर सिगरेटचा धूर काढत बसलेली आहे आणि आम्ही एका मागोमाग येतो आणि प्रत्येक जण तिला काही न करण्याबद्दल दहाची नोट देतो. हा विचार मला बाहेर घेऊन जातो ते हसतच. मी सिगरेट पेटवतो आणि पुढचा मुलगा आत जातो. घरी परत येत असताना कारमध्ये आम्ही काय केलं त्याबद्दल फुशारक्या मारतो. ती कशी विव्हळली आणि आम्ही कशी बोटं घुसवली. आम्ही एकमेकांच्या बोटांचा वास घेतो. तिथे कसलाच वास नाही.

काही दिवसांनंतर आम्ही केंडॉलला परत येतो. परत आल्यावर भयंकर वाटतं, पहिल्यापेक्षाही भयंकर, कारण तिथे माझी काय वाट पाहतंय, याची मला जाणीव आहे. नक्की काहीच नाही.

■

११

काही महिन्यांनंतर डॅडी गॅस रिगवरून मोठ्या खुशीतच परत येतात. त्यांना काही सांगायचं आहे. आम्ही पुन्हा इथून चाललोय.

येथील आर्ट सेंटरमध्ये मी ब्रेक डान्सिंग शिकवायची सुरुवात केलीय. मला मित्रांचा नवीन गट मिळालाय. मला काही नवीन मैत्रिणीही मिळाल्यात. काही मारामाऱ्या मी जिंकलो आहे. आता सरतेशेवटी मी केंडॉलमध्ये स्थिरस्थावर झालोय आणि आता आम्ही पुन्हा येथून निघणार. आता या वेळी कुठे?

"एका शेतावर," डॅडी सांगतात.

"शेत? आम्हाला शेतावर जायचं नाही, कारण आम्ही शेतकरी नाही."

"पण आता आहोत."

परंतु आम्ही शहरातून आलो आहोत. आम्ही शहरातील आहोत. या छोट्या शहरात आलो, हेच चुकीचं होतं. डॅडींना आम्ही खेडेगावात राहावं, असं नक्कीच वाटत नसेल?

डॅडी म्हणतात, "मला नेहमीच शेत घ्यायची इच्छा होती आणि ते विकत घेणं आता मला परवडतंय आणि मला ते मिळालंय. मी ते विकतही घेतलंय आणि आपण तिथे जात आहोत."

परंतु आम्हाला जायचं नाहीये.

"आपण जातोय ते येथून दहा मैलांवरच असल्यामुळे तुम्हाला काही फरक पडणार नाही."

"दहा मैल!"

"तू तरीही केंडॉलमध्ये शाळेसाठी येशील." त्यांना वाटतं, की यामुळे मला दिलासा मिळेल.

यात वादविवाद करण्यात अर्थ नाही. ममालाही यावर तक्रार करण्यात अर्थ नाही. डॅडींनी ठरवलंय आणि पसंतीचा अधिकार असलेली तीच एक व्यक्ती

इथे आहे. ते सारखं त्या शेताबद्दल बोलतात आणि जेव्हा मी माझ्या ममाकडे त्याबद्दल तक्रार करतो, तेव्हा ती शांतपणे म्हणते, "त्यांना पछाडलंय."

मला असं वाटलं होतं, की गेल्या उन्हाळ्यात त्या चाकांच्या घरात डॅडी आणि माझी काहीशी जवळीक जमली होती; पण त्या उन्हाळ्यानंतर डॅडी एक शेत पाहत असतील आणि ते विकत घेण्याच्या विचारात असतील, तर त्यांनी मला ती जागा दाखवायला न्यायला हवं, अशी मी अपेक्षा करतो किंवा त्याबद्दल बोलायला तरी हवं होतं; परंतु आता आम्ही त्या चाकांच्या घरात नाही आणि ते पुन्हा जुने डॅडी झाले आहेत.

त्यामुळे एक दिवस आवराआवर करून आम्ही व्हॅनमध्ये सामान भरतो आणि निघतो. मग अर्ध्या तासानंतर आम्ही थांबतो आणि दरवाजे उघडतात. पहिली गोष्ट आम्हाला दिसते, ती पाऊस. पाऊस इतक्या जोरात कोसळत आहे, की आजूबाजूचं काही दिसत नाही. फक्त खाली आलेले ढग आणि हिरवीगार दरी.

"हे फार सुंदर आहे." डॅडी म्हणतात. "हे घर सोळाव्या शतकातील आहे."

आम्ही त्या सोळाव्या शतकातील फार्महाऊसकडे बघतो. ते लांबच्यालांब आणि बैठं आहे आणि ते दोन घरांत विभागलेलं आहे. डॅडींनी एक बाजू विकत घेतली आहे आणि दुसरी बाजू विकत घेण्याचा त्यांचा बेत आहे. म्हणजे लवकरच हे सगळं आमचं होणार आहे. त्या घरात शांतता इतकी दाट आहे, कारण या घराच्या भिंती काही फुटांनी जाड आहेत. येथील शांतता माझ्या आत असलेल्या शांततेसारखी आहे. ही जागा अगदी निर्जन, एकाकी आहे. मीही अगदी एकाकी आहे. घराच्या मागच्या बाजूला असलेल्या माझ्या झोपण्याच्या खोलीतून काहीतरी लाल इतक्या झटकन जातं, की मी खिडकीजवळ जाईपर्यंत ते गेलेलं आहे. ते काय होतं?

पाऊस जरा कमी होतो आणि मी बाहेर भटकतो. मला झोपड्या दिसतात आणि दूर अंतरावर पसरलेल्या सततच्या पावसानं हिरव्यागार बनलेल्या टेकड्या दिसतात. त्या दरीच्या टोकाशी आकाश करडं आहे आणि घराजवळ आणखी पाणी आहे. एक नदी आहे.

"आपल्याला ही नदी तीन मैलांपर्यंत मिळालेली आहे." डॅडी अभिमानानं सांगतात. "आणि इंग्लडमधील ताज्या पाण्यातील मासळीसाठी सर्वोत्तम अशा जागांपैकी ही एक जागा आहे. गुत्त्यातील प्रत्येक जण हेच सांगतोय."

मी माझ्या सिगरेट्स घेतो आणि घराच्या मागच्या बाजूला जातो आणि पुलाखालून जाऊन टेकडी चढतो. अचानक तिथे विजेसारखा गडगडाट ऐकू येतो. तो इतका मोठा, जोरदार आणि धक्कादायक असतो, की मी खाली वाकतो. मग मला पुन्हा ती लाल हलती ज्योत दिसते. ती ट्रेन आहे. अत्यंत जलद जाणारी ट्रेन.

तो पूल रेल्वेचा पूल आहे आणि रेल्वेचा मार्ग घराच्या मागच्या बाजूनं जातो. मी त्या टेकडीवर चढत राहतो. मला दूरवरून घूं घूं आवाज ऐकू येतो आणि तो त्या रेल्वेचा नाही. मी जेव्हा खाली त्या दरीपलीकडे पाहतो, तेव्हा एका दृष्टिक्षेपात मला ते फार्महाऊस आणि तिथे अंगणात फिरणारे आणि त्यांचं जे काही आहे, त्याचं निरीक्षण करणारे डॅडी, ती रेल्वे आणि त्या रेल्वेपलीकडे असलेला मोटारींचा रस्ता दिसतो. तो एम ६ हा रस्ता त्या दरीच्या बाजूनं एखाद्या करड्या सापासारखा विळखे घालत गेलेला आहे. दुरून ऐकू येणारा तो घूं घूं आवाज उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे जाणाऱ्या किंवा दुसऱ्या कुठे जाणाऱ्या ट्रक्स आणि कार्सचा आहे. लंडनहून ग्लास्कोला जाणाऱ्या त्या जलद गती रेल्वेच्या आणि एम ६ रस्त्याच्या अस्तित्वानं त्या जमिनीच्या रम्य देखाव्याला गालबोट लागल्यासारखं बऱ्याच लोकांना वाटेल; परंतु मला त्यामुळे बरं वाटतं, कारण ते दुसरीकडे तुम्हाला कुठेतरी घेऊन जातात.

डॅडी पुन्हा त्या गॅस रिगकडे निघून जातात. मी सकाळी त्या खडकाळ टेकड्यांवरून शाळेला जातो आणि जेव्हा मी तिथे पोहोचतो, मी सदैव गोत्यातच येतो. मला नेहमी हेडमास्तरांकडे पाठवलं जातं. एके दिवशी त्यांच्या ऑफिसबाहेर त्यांच्या उपदेशाचे डोस ऐकण्याच्या तयारीत असताना माझ्यासारखा वागणारा दुसरा खोडसाळ मुलगा मला भेटतो. ती मैत्री अशा तऱ्हेची होते, की जिची सुरुवात बघताक्षणीच होते आणि ती बराच काळ टिकणार, हेही तुम्हाला समजतं.

इयानचे केस काळेभोर आहेत आणि भुवया मध्यावर मिळतात. तो चांगलाच मोठा आहे आणि जर त्याचे गाल गोलमटोल नसते, तर तो पुरुषासारखाच वाटेल. अनेक दृष्टीनं पाहिलं, तर त्यानं पुरुषच असायला हवं, कारण त्याला एक लहान भाऊ आणि बहीण आहे आणि त्याचे वडील हयात नाहीत. त्याची आई सुधारण्या-पलीकडे गेलेली दारुडी आहे. ती अंथरुणातच लघवी करते. तो एका घाणेरड्या, गालिच्यावर सिगरेट आणि बीअरचे डाग पडलेल्या अव्यवस्थित घरात राहतो. इयान त्याला हवं ते करतो, कारण त्याच्याबद्दल त्याची नॅन सोडली, तर कोणीच पर्वा करत नाही आणि ती नेहमी तिथे नसते.

मग आम्ही एकत्र उलाढाल्या करायचं ठरवतो. शिक्षक रजिस्टर घेतात, मग आम्ही एकमेकांकडे पाहतो आणि मग शाळेच्या खेळण्याच्या पटांगणातून पलीकडे निघून जातो. शिक्षक आम्ही दिसेनासे होईपर्यंत उभे राहून पाहत असतात.

आम्ही शेतात जातो किंवा नदीवर जातो आणि उंच गवतात पडून राहतो आणि नेहमी सिगरेट्स ओढतो. कधी कधी मादक पदार्थही. आम्ही गप्पा मारतो. आम्ही ज्या ज्या गोष्टी एक दिवस करणार आहोत, ज्या ठिकाणी आम्ही जाऊ, त्याबद्दल बोलतो. माझ्यासाठी ती जागा म्हणजे लंडन. जिल ॲल्बटनं मला तिथे नेल्यापासून मला तिथे परत जाण्याची इच्छा आहे.

आम्ही आपल्या बापांबद्दल बोलतो. माझे डॅडी जरी क्वचितच त्या फार्महाऊसवर असले, तरी जेव्हा ते असतात, तेव्हा ते पूर्वी होते त्यापेक्षाही भीतिदायक वाटतात. ते खूप पितात आणि जरा काही झालं, की किंवा कधी कधी काही न होताही ते मला जोराजोरात गुद्दे मारतात. एखाद्या बाईवरून भांडण झाल्यावर ते जसे गुत्त्यात गुद्दे मारतील, अशा तऱ्हेचे ते गुद्दे असतात आणि जेव्हा ते चिडतात, त्या वेळी फुत्कारत, धमकीवजा खालच्या आवाजात त्यांना माझा किती तिरस्कार वाटतो, त्याची आठवण करून देतात.

बेथनीबरोबर ते अगदी वेगळेच बनतात. ती गोड आहे, मोकळ्या स्वभावाची आहे आणि तिचं डॅडींवर प्रेम आहे आणि डॅडींचं तिच्यावर प्रेम आहे, हे अगदी उघड आहे. डॅडींनी तिच्यासाठी याआधीच एक घोडा आणलाय आणि तो रस्त्याच्या वरच्या बाजूला तबेल्यात ठेवलेला आहे. आणखी दोन घोडे शेतावर आहेत. ते जितके बेथनीजवळ छान वागतात, तितकेच माझ्याजवळ आणि ममाशी ते वाईट वागतात. मला त्यामुळे बेथनीचा रागच येतो. जरी बेथनी ही चांगली मुलगी आहे आणि ती जिहोवाच्या सभेला जाते, तरी असं वाटतं, की ममानंही तिचा रागराग करायला सुरुवात केलेली असावी. नंतर जेव्हा डॅडी निघून जातात, तेव्हा सर्व ठीकठाक होतं आणि आम्ही तिघं व्यवस्थित जगू लागतो.

इयान मला सांगतो, की डॅडी हवेत यासाठी तो काहीही देईल. तो लहान असतानाच त्याचे डॅडी वारले आणि मी त्याला सांगतो, की डॅडी नसावेत म्हणून मी काहीही देईन. त्याच्या आठवणीत ज्यांना तो आदर दाखवू शकेल, असे डॅडी आहेत. निदान तो असं म्हणू शकतो, की त्याला एक चांगले डॅडी होते.

हल्ली माझी ममा काही पैसे मिळवत आहे. ज्या वेळेपासून त्यांनी शेजारचंही घर घेतलंय, ती त्याचा उपयोग सुट्टीत भाड्यानं देण्यासाठी करायची. लेकची सफर करणारे लोक एक रात्र किंवा जास्त तिथे राहतात. ते घर तसं परिपूर्ण आहे आणि ममा त्यांना स्वत:चा नाश्ता करण्यासाठी लागणारं सामान तिथे ठेवते. त्या पैशांतून तिनं एक छोटी गाडी, लाल रेनॉल्ट विकत घेतलीय. प्रत्येक दिवशी ती मोटार वे सर्व्हिस स्टेशनच्या मागच्या दरवाजाकडे घेऊन जाते. तिथे तिनं एका रेस्टॉरंटमध्ये एक नवं काम सुरू केलंय.

डॅडी आज परत यायची वेळ झालीय; परंतु जेव्हा मी घरी येतो, तेव्हा पहिली गोष्ट पाहतो ती रेनॉल्ट ५. ती तिच्या नेहमीच्याच जागी उभी आहे; पण ती आता वेगळी आहे. तिची मोडतोड झालेली आहे. तिच्यावर मोठमोठे ओरखडे आहेत आणि तिचं बॉनेट लोंबकळतंय. टप खालच्या सीटवर पडत आलंय आणि तिच्या बाजूंचे मोठेमोठे तुकडे नाहीसे झालेले आहेत. तिचे दिवे फोडलेले आहेत, काचा तोडलेल्या आहेत आणि आजूबाजूला त्यांचे तुकडे पडलेले आहेत. मी काहीशा

अविश्वासानं त्या कारचं निरीक्षण करतो. या अशा तऱ्हेचं नुकसान कोणत्या टकरीमुळे झालं असावं, याचा अंदाज मी बांधू शकत नाही.

आत घरामध्ये असलेली शांतता मी ताबडतोब ओळखतो. मी रेनॉल्ड स्ट्रीटपासून ती ओळखत आलेलो आहे. तुम्ही राग, वेदना आणि दुःख याचा वास घेऊ शकता. याचा अर्थ डॅडी घरी परत आले आहेत.

मला ममा दिसते. तिचे डोळे, चेहरा लाल झालेला आहे आणि ती थरथर कापत अवतारात आहे.

"काय झालं?" मी विचारतो. "तू कार कुठे आपटलीस का?"

ती मान हलवते. "तुझ्या डॅडींनी हे केलंय."

"हे केलं? त्या कारला केलं?"

ती मान हलवते. मी खिडकीतून त्या मोडतोड झालेल्या रेनॉल्टकडे पाहतो.

"कुऱ्हाडीनं," ती सांगते. "त्यांनी तिच्यावर सपासप घाव घातले. ते त्या कारच्या छतावरही चढले."

नंतर मी डॅडींबद्दल तो प्रश्न विचारतो, ज्याचं उत्तर देणं कठीण आहे.

"का?"

ती रडणं आवरते. "माझं नवं काम."

"त्या मोटर वे सर्व्हिसेस मधलं?" अर्थात डॅडी ममाच्या नव्या कामाच्या बातमीनं घरी आलेत.

"मी तिथे काम केलेलं त्यांना पसंत नाही."

"का नाही? तू इतर ठिकाणीही कामं केली आहेस."

"ते म्हणतात, की तिथे गुत्त्यातील बरेच लोक काम करतात आणि डॅडींना त्याबद्दल सर्व माहिती आहे. ते म्हणतात, की मी ट्रकवाल्यांची रखेल आहे. त्यांना मी तिथे माझी नोटीस द्यायला हवीय."

मग पुन्हा तिचे हुंदके सुरू होतात. मी ममाचे हुंदके इतके बघितलेले आहेत, की मला दया-माया येत नाही; परंतु मला धक्का बसलाय. तिच्या कारचे कुणी वेड्यानं तुकडे तुकडे केलेत.

"ते आता कुठे आहेत?" मी जरा घाबरतच ममाला विचारतो. "गुत्त्यात गेले आहेत का?"

"ते बेथनीबरोबर खाली तबेल्यात गेले आहेत."

मी गप्प बसतो.

"त्यांनी तिच्यासाठी प्यालोमिनो घोडा आणलाय. सर्व मुलींना प्यालोमिनो हवा असतो."

यावर बोलण्यासारखं काहीच नाही.

मी वर टेकडीवर फिरायला जातो आणि सूर्यास्त पाहतो. त्या खडकाळ टेकड्यांच्या मागे असलेलं पश्चिमेकडचं आकाश, हे पेटलेल्या विस्तवासारखं आहे आणि पूर्वेकडे मोटर वे आपला लाल दिवा प्रतिबिंबित करत आहे. तो रस्ता एखाद्या लाल लांब मांजरासारखा आळसावून वेटोळं करून बसला आहे आणि त्यावर सहज ओळखता न येण्यासारखी रहदारी आहे. ती सर्व रहदारी त्यांच्या स्वत:च्या काही कारणानं कुठेतरी जात आहे. मी पाहिलेल्यापैकी हा सर्वांत सुंदर रस्ता आहे.

मी अंगण ओलांडत आहे, त्या मोडक्यातोडक्या रेनॉल्टजवळून जात आहे. त्या रात्रीची ती थंड हवा जाणवते. तेव्हा मला घरातून किंकाळ्या ऐकू येतात. मला ममा हॉलच्या जमिनीवर पडलेली आढळते. ती त्या दगडी फरशीवर पडून किंचाळत आहे. डॅडींनी तिला मारलं का, हे मला माहीत नाही. ते गोंधळलेले दिसतात. ते तिथे बाजूला उभे राहून इतकं असहायपणे पाहत आहेत, की त्यांनी तिला गुद्दे मारणं असंभव आहे. ती त्यांच्या पायांशी वळवळतेय. मला तिचं बोलणं समजत नाही. जेव्हा माझे आई-वडील भांडतात, तेव्हा मला कधीच ते शब्द समजत नाहीत. मी माझी कातडी वाचवण्याचा फक्त प्रयत्न करतो. मला माहीत आहे, की काहीसे भावनाप्रधान, आरोप करणारे रागाचे शब्द सुरात येत आहेत. ते आकलनापलीकडे आहेत. कदाचित, ते बोलणं वेडपटही असेल. मी ते ऐकत नाही.

डॅडी माझ्याकडे बघून खांदे उडवतात. मला बाहेर असलेली, कुऱ्हाडीचे घाव बसलेली रेनॉल्ट कार आठवते. जमिनीवर पडून किंचाळत असलेल्या ममाकडे मी टक लावून पाहतो. हे घर म्हणजे एक वेड्यांचं हॉस्पिटल आहे.

"तुझ्या ममाला मदत कर, करशील ना?" डॅडी माझ्याजवळ पुटपुटतात. "मला सांगायचंय, की तिला जरा आवर."

ते निघून जातात. बेथनी दारामागून घाबरून वाकून बघताना मला दिसते.

मला गुदमरल्यासारखं वाटतं; पण मी खाली पडलेल्या, किंचाळणाऱ्या, हुंदके देणाऱ्या, लोळागोळा झालेल्या ममाच्या बाजूला ढोपरांवर बसतो. खरं सांगायचं, तर ती मला घाबरवून सोडते. मला तिला लाथ मारावीशी वाटते; पण त्याऐवजी मी तिला हात देतो.

"चल, ऊठ ममा." मी म्हणतो. माझ्या आवाजातील अनिश्चितता मलाही जाणवते. वेड्या लोकांजवळ ज्या आवाजात बोलायचं असतं, ते मला माहीत आहे. त्यांच्याशी दृढपणे आणि सणसणीत आवाजात बोलायचं असतं, पण मी ते करू शकत नाही आणि काही वेळ तिचं गळा काढणं चालूच राहतं.

शेवटी आपल्या पायांवर धडपडत ती उठते आणि मी तिला बैठकीच्या खोलीत बसवतो. बेथनी तिला कपभर चहा करून देते. ममा रडायचं थांबते; पण अजूनही वेडी असल्यागत दिसते. ती बेथनीला सांगते, "तू जा आणि तुझी बॅग भर.

आपण घर सोडून जात आहोत.''

''ती नेहमीच मला बॅग भरायला सांगते.'' बेथनी शांतपणे म्हणते. ''पण आम्ही कधीच जात नाही.''

आज लवकर झोपायचं, असं मी ठरवतो. मी माझ्या खोलीत जातो आणि ग्लास्को ते लंडनला जाणाऱ्या एक्स्प्रेस ट्रेनचे दिवे रात्र उजळून टाकतात आणि नाहीसे होतात, तेव्हा मी जोरात सिगरेट ओढत असतो.

मी डॅडी आणि बेथनीकडे दुसऱ्या दिवशी लक्ष ठेवतो. ते ज्या तऱ्हेनं तिच्याभोवती चेष्टा करत फिरत असतात, तिची मस्करी करत असतात, ते मी बघतो. ते माझीही चेष्टा करतात; पण ती मनापासून नसते. मी आधीच ठरवलंय, की मला आर्ट्स कॉलेजला जायचंय; पण ते मला 'बावळट' असंच म्हणत राहतात. जेव्हा ते बेथनीबरोबर असतात, तेव्हा तिनं कौतुक करावं, यासाठी आज्ञाधारक अशा मोठ्या घोड्यासारखे वागतात. त्यांचं तिच्याजवळचं वागणं खास हातोटीचं असतं आणि त्यांचे ते मोठे हात बेथनीच्या भोवती असतानाच फक्त हळूवार असतात. मला असं दिसतं, की त्या दोघांचं एक वेगळं जग आहे आणि तिथे ज्या अडचणी आहेत, त्या ती दोघं कुजबुजत, चर्चा करून त्यात ते सहभागी होतात.

■

१२

ममा आपलं काम सोडते आणि आपल्या रेनॉल्टच्या जागी दुसरी कार घेते. बेथनी आपल्या घोड्यावरून रपेट करते. डॅडी निघून जातात आणि पुन्हा ते घर शांत होतं. या उन्हाळ्यात मी शाळा सोडू शकतो आणि माझा तो बेत आहेच. माझा मुख्य उद्देश आहे, तो त्या फार्महाऊसपासून दूर जायचं. आता मला वेस्ट मिडलँडमधील स्टाऊरब्रिज येथील आर्ट्स कॉलेजमध्ये प्रवेश मिळालाय. मला काही परीक्षा उत्तीर्ण कराव्या लागतील आणि जूनमध्ये मी स्वतंत्र होईन.

पण जेव्हा डॅडी रिग्जवरून परत येतात, तेव्हा मी त्यांच्या तंबाखूतील काही तंबाखू चोरल्याचं त्यांच्या लक्षात येतं. अजूनही ती सवय मला सोडत नाही. कित्येक वर्षं माझी ममा उशीखाली पर्स घेऊन झोपलीय, कारण तिला माहीत आहे, की जेव्हा शक्य होईल, तेव्हा मी चोरी करीन. मी सांगतो, की डॅडींची तंबाखू मी परत खरंच पुन्हा ठेवणार होतो, पण मी विसरलो. डॅडी ऐकत नाहीत. ते चिडतात. म्हणतात, की ते माझा समाचार घेणार आहेत आणि मग ते गुत्त्यात जातात. त्याचा अर्थ मला समजतो. त्यांना मला शिक्षा करण्यासाठी पोटात थोडी व्होडका जायला हवीय.

सर्व संध्याकाळभर मी ताणतणावाखाली आहे. आम्ही सर्वच आहोत. बेथनी नाखुशीनंच झोपायला जाते. मी विस्तवाजवळ ममाबरोबर बसून आहे. बऱ्याच उशिरानंतर मी दरवाजा उघडल्याचा आवाज ऐकतो. ज्या तऱ्हेनं तो आपटून बंद होतो, त्यावरून त्यांच्या पावलांच्या आवाजावरून एक रासवट घरात शिरलाय आणि तो बळी शोधतोय, हे मला जाणवतं. तो मी आहे. मी त्यांचीच, दरवाजाची आणि त्यांच्या पावलांच्या आवाजाची वाट पाहतो. ते सरळ आत येत नाहीत. आजूबाजूला ठोकतात आणि तयार होतात. या अशा तऱ्हेचं कुटुंब त्यांना शोभण्यासारखं नाही. त्यांच्या नशिबी असा चोरटा मुलगा कसा आला आणि इतकी वर्षं त्यांनी मला त्यांच्याबरोबर का ठेवलं?

वादळ... वादळ तयार होत आहे. काळ्या ढगांचे थरांवर थर तयार होत आहेत आणि नंतर ते इथे येतात. एक दांडगं अस्तित्व बैठकीच्या खोलीत आलं आहे. मी त्यांच्याकडे पाहतो. ते खोली ओलांडून माझ्याकडे येतात. मला पकडतात आणि गुद्दे मारायला सुरुवात करतात.

त्यांची कपाळावरची केसांची रेषा तणावामुळे मागे जाते. त्यांचे डोळे त्वेषानं पेटतात. त्यांच्या श्वासाला व्होडकाचा वास येतो आणि त्यांच्या तोंडातून थुंकी बाहेर येते. आपल्या उजव्या हातानं ते मला जोराजोरानं बुक्के मारतात. त्यावरील क्रूसाची मूर्ती मला एकदम दिसते. ज्यावर **प्रेम** गोंदवलेलं आहे, अशा त्यांच्या डाव्या हातानं ते मला घट्ट धरतात. माझ्या गळ्याभोवती अगदी घट्ट पकडतात. त्यांच्या त्या दणकट बोटांच्या आकाराची जाणीव मला होते. मी घाबरलोय. मी अगदी निव्वळ भीती अनुभवत आहे. त्यांच्या त्या द्वेषाला, रागाला अचानक सामोरं जाताना माझ्यात भीतीशिवाय दुसरं काही नाही आणि त्या नेहमीच्या अनुभवातीत रीतीनं मी आम्हाला त्या हिरव्या उंच झाडावरून या माणसाला माझा रागराग करताना पाहतोय आणि स्वत:ला हे विचारत नाही, की तो हे मला का करतोय? पण त्याला हे का करावंसं वाटतंय?

बेथनी पायजम्यात आलेली दिसते. ती हुंदके देतेय. ममा किंचाळत आहे. डॅडींचे ते दाणगट हात पुन्हा पुन्हा मागे जातायत आणि प्रत्येक वेळा जेव्हा ते सरळ होतात त्यांची मूठ माझ्या चेहऱ्यावर आपटते.

त्यांच्या हाताच्या मुठीची हळू हालचाल मला दिसते. माझं नाक मोडल्याचा आवाज मी ऐकतो आणि तोंडात धातूची चव अनुभवतो.

आणि नंतर ते जेव्हा मला सतत आणि असे सतत ठोकत राहतात, मी आमच्यावर तरंगत असतो, वर घरावर. ते मला ढोपरांवर उभं करतात. माझी मान त्यांच्या हातात आहे. ते माझं तोंड विस्तवाजवळ खेचतात. भयंकर भीतीमुळे येणारी शरणागती मला जाणवते. हे सर्व आता मर्यादेपलीकडचं आहे, काहीही होईल. विस्तवावर आता थोडी राख जमलीय आणि तो धुमसतोय. मी सर्व शक्तीनिशी प्रतिकार करतो; परंतु लोखंडी सळ्यांनी बनलेल्या माणसाशी मी लढा देऊ शकत नाही.

तोंड लाल झालेल्या, अश्रूंनी चेहरा ओला झालेल्या, बेथनीला सेटीवर उभी राहून किंचाळत असताना मी पाहतो. माझी ममा घाबरून भोवती गोल फिरत असते आणि तिच्या चेहऱ्याच्या त्या विचित्र आकारावरून आणि माझ्या बहिणीच्या ओरड्यावरून मला जाणवतं, की याचा शेवट वाईट होणार आहे. जेव्हा डॅडी माझा चेहरा विस्तवाजवळ धरतात, तेव्हा मी डोळे बंद करून घेतो. त्या विस्तवाची धग माझ्या गालांवर मला जाणवते. त्या उष्णतेनं माझ्या कातडीतून जे काही मऊ आणि

मर्मभेद्य आहे, तिथे झिरपायला सुरुवात केली आहे. ते मला ठार मारणार आहेत. याचा शेवट नाहीतर दुसरा काय होणार, हे मला दिसत नाही.

मी ममाला फोनवर बोलताना ऐकतो. पोलीस... तिनं त्यांना यायला सांगितलंय.

त्यांची पकड अचानक सैल होते आणि तो क्षण मी त्यांच्यापासून बाजूला होण्यासाठी घेतो. एखाद्या पिंजऱ्यात सापडलेल्या रानटी प्राण्यासारखं वळवळत मी त्यांच्याभोवती झोंबाझोंबी करतो. त्यांचे दाणगट हात माझ्यावर मला पकडण्यासाठी खाली येतात. ते माझ्यापेक्षा मजबूत आहेत, पण मी त्यांच्यापेक्षा चपळ आहे. मी बूट न घालता तसाच बाहेर पडतो. मला जाणीव आहे, ती स्वत:च्या भीतीची. मी त्या जागेत, त्या वेड्या लोकांच्या घरात कधीही परत जाणार नाही, कारण आता पुन्हा काहीही पूर्ववत होणार नाही. या खोलवरच्या जाणीवेशिवाय मला काही माहीत नाही. मी दुसरा कशाचा विचार करत नाही. मी यापुढे कोणीही नाही.

पोलिसांना मी मोटर वेच्या बाजूनं ओल्या मोज्यात फिरताना आढळतो. ते मला आपल्या कारमध्ये घालतात आणि घरी घेऊन जातात. डॅडी बाहेर येत नाहीत. ममा पोलीस ऑफिसरजवळ बोलते आणि मग ती बाहेर त्या दुसऱ्या घराजवळ जाते आणि तिथे झोपायला आणि नाश्त्याला राहणाऱ्या लोकांना सांगते, की ती त्यातील एक झोपायची खोली वापरणार आहे. मला त्या खोलीत ठेवलं जातं.

जोपर्यंत डॅडी आसपास राहतात, मी तान्या मावशीच्या बरोबर राहतो. जेव्हा ते गॅस रीग्जवर परत जातात, मी घरी जातो. बेथनी माझं प्रेमळ स्वागत करते आणि त्यामुळे माझे डोळे ओलावतात. मी हॉलमध्ये जातो, तेथील दाट शांतता ऐकतो आणि घराचा वास घेतो आणि अचानक आणि धक्कादायक रीतीनं मला रडू येतं. माझी ममा किंवा बेथनीच्या हे लक्षात येण्याआधी मी सरळ माझ्या खोलीत जातो. मला बालपणीचे दोर आठवतात. ते माझ्याभोवती असे घट्ट जखडलेले होते, की त्यामुळे मी हलू शकत नव्हतो, की श्वासोच्छ्वास घेऊ शकत नव्हतो. ठीक, ते परत आलेत.

खिडकीजवळ एखाद्या भुतासारखी एक्स्प्रेस ट्रेन दिसते आणि नाहीशी होते. मी माझे अश्रू आवरण्याचा प्रयत्न करतो. मी भिंतीवर कोरून काढलेल्या चित्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यावरून माझे डोळे फिरवतो. जेव्हा त्याचाही उपयोग होत नाही, तेव्हा मी माझ्या अश्रूंना बांध घालायचा प्रयत्न करतो. जणू काही मी आता मारामारी करणार आहे, अशा तऱ्हेनं मी देह ताठ करतो, नंतर माझा देह त्या प्रयत्नात हलत राहतो तोपर्यंत मी माझे डोळे घट्ट बंद करतो; परंतु काही उपयोग होत नाही. मी माझ्या अश्रूंच्या शक्तीला शरण जातो. मी रड रड रडतो आणि थांबू शकत नाही. मी दिवसेन् दिवस रडतो. मिनिटं किंवा तास नव्हे; पण आठवडे.

माझी ममा म्हणते, की ती समजू शकते. ती म्हणते, की मी निराश झालोय

आणि ते तिला समजतं, कारण ती स्वत:ही भरपूर रडते. मी तिच्याकडे पाहतो आणि विचार करतो, तू तुला या परिस्थितीत गुंतवून घेतलंस आणि तू मलाही तुझ्याबरोबर ओढलंस.

मी जेव्हा केंडॉलला असतो, तेव्हा बरा असतो. मी तिथे जायला नेहमी उत्सुक असतो; पण जेव्हा मी त्या आमच्या फार्महाऊसच्या तुरुंगात परततो, अश्रू पुन्हा वाहायला लागतात आणि लेक जिल्ह्यातील पावसाप्रमाणे एकदा का पाऊस सुरू झाला, की तो बराच काळ थांबत नाही.

मी नक्कीच मूर्ख असणार, कारण मी बडबडतोय.

डॅडी घरी येतात. मी त्यांच्या मार्गातून बाजूला राहतो. मग सर्वांत वाईट गोष्ट घडते, की ते मला रडताना पकडतात. माझी ममा हुंदके देते, किंचाळते किंवा जमिनीवर लोळागोळा होऊन पडते, तेव्हा जसा त्यांचा चेहरा तिरस्कारानं वेडावाकडा होतो, तसा मला रडताना पाहून होतो. तिथे दया-माया नाही. तिथे मला फक्त तिरस्कार दिसतो. त्यांना माझा तिरस्कार वाटतो. जेव्हा ते माझ्याकडे पाहतात, त्यांचे डोळे गोठलेल्या निळ्या बर्फासारखे होतात.

तो निळा बर्फ मला शांत, स्पष्ट अशा निर्णयाप्रत पोहोचवतो. मी माझ्या झोपायच्या खोलीत आहे. तिच्या जाड भिंतींमुळे त्या वेगानं जाणाऱ्या ट्रेन्स तुम्हाला ऐकू येत नाहीत. मी पलंगावर पडलोय. आजूबाजूला मोठी मोठी कोरलेली चित्रं आहेत. येथील शांतता इतकी जडशीळ आहे, की जवळजवळ ती मला दिसते. मी तिला स्पर्श करतो.

मी रडणं थांबवायचं ठरवतो. यापुढे असले गरम अश्रू माझ्यासाठी नाहीत. मी यापुढे रडणार नाही. डॅडी माझा तिरस्कार करतात आणि त्याला कारण आहे, मी तिरस्करणीय आहे. मी माझा तिरस्कार करतो. डॅडींना मला संपवायचंय, कारण माझ्यासारख्या मुलाबाबत करायला हीच उत्तम गोष्ट आहे. आता इथपासून पुढे मी स्वत:चा नाश करणार.

परीक्षा संपताच मी माझी बॅग भरतो. मी सोळा वर्षांचा आहे आणि ते फार्महाऊस कायमचं मागं सोडत आहे. मी आर्ट्स कॉलेजला जात आहे. मी आर्टिस्ट होणार आहे. डॅडींना ते कितीही मूर्खपणाचं वाटलं तरीही. जेव्हा मी जायला निघतो, तेव्हा ममा सुटल्यासारखी वाटते. डॅडी तिथे नाहीत, फक्त बेथनी रडते.

■

१३

हिवाळ्यापर्यंत आर्ट्स कॉलेजची सुरुवात होत नाही. आता जून आहे. मला दुसरीकडे कुठे जायला जागा नाही, त्यामुळे मी केलीकडे जातो. माझी ही मोठी बहीण काहीशा बाजूला असलेल्या या नगरपालिकेच्या घरात किड्डरमिन्स्टरच्या अगदी फालतू अशा वस्तीत राहत आहे. तिला एक मूल आहे आणि ती माझ्यावर ममागिरी करते. मला ते आवडतं. या पूर्वीही तिनं माझ्यावर ममागिरी करण्याचा प्रयत्न केल्याचं मागे बघितल्यावर माझ्या लक्षात येतं; परंतु मी ती डॅडींची लाडकी असल्यामुळे आणि माझी मोठी बहीण असल्यामुळे नेहमीच तिचा राग राग केला. निदान बेथनी जन्माला येईपर्यंत तरी. आता ती एखाद्या मित्रासारखी वाटते.

ती अशी चांगली मुलगी असतानासुद्धा एका महागुंड आणि ज्यांची भीती वाटेल, अशा आमच्या भागातील मुलांपैकी एका मुलाच्या नादी लागते. तो सुरुवातीला माझ्याशी मित्रत्वानं वागतो; पण काही काळातच माझं तिथे असणं त्याला नकोसं होतं आणि ते तो दाखवूनही देतो. मला केलीबद्दल वाईट वाटतं आणि मला माहीत आहे, की माझी जाण्याची वेळ झालीय.

मी तो उन्हाळाभर, ज्यांना मी चालेल त्यांच्या सोफ्यावर झोपून दिवस काढतो. नॅन, मावश्या, डॅनियल, शेन... आणि मला उन्हाळ्यातील सुट्टीतलं एक छान काम मिळतं.

मला नेहमीच वेस्ट मिडलँडचा सफारी पार्क आवडायचा. आम्ही माईक मामाच्या मिनीमध्ये, तिथे अडकल्यापासून तर जास्तच. त्या बाष्पानं भरलेल्या गाडीत आम्ही कसं हसत बसलो होतो आणि त्यावेळी सर्व जगच जणू काही लाल रंगाच्या आकाशाचा देखावा बनलं होतं आणि आता मी तिथे काम करतोय. त्या जत्रेच्या मैदानावरील भुतांच्या गाडीवर. मला त्या जत्रेच्या मैदानावरील भिंतींवरची कलाकुसर आवडते. तेथील त्या वळणावर असणाऱ्या कोरीव कामात मी रुची घ्यायला शिकलोय. त्या भुतांच्या गाडीचे रंग ठसठशीत आहेत, त्यांचे जांभळे,

लाल रंग इतके गडद आणि जवळ आहेत, की त्यामुळे त्याच्या निर्मितीसाठी लागलेलं उच्च दर्जाचं कसब आपल्या सहज लक्षात येत नाही. माझं काम आहे ती फेरी चालवण्याचं आणि तिची काळजी घेण्याचं मी ते अगदी उत्साहात करतो. मी मुलींना घ्यायचं काम करतो. तेथील संगीत, आवाज आणि रंगामुळे सर्व जण आपल्या स्वत:ला अगदी मोकळं सोडतात. मी त्या भुतांच्या गाडीच्या बाजूला रांगेत उभ्या असलेल्या सुंदर मुलींशी बोलत उभा असतो.

"गेल्या आठवड्यात एक धिप्पाड, जॉर्डी पद्धतीनं उच्चार करणारा, मोठ्या, अगदी मुठीपर्यंत गोंदवलेल्या हातांचा, बहुतेक धातूचं काम करणारा आणि काऊबॉय-सारखे कपडे घातलेला, भल्यामोठ्या मिश्या असलेला एक माणूस इथे होता..."

मी त्यांच्याकडे पाहतो. त्या अजून घाबरलेल्या नाहीत, याचं मला आश्चर्य वाटतं.

"तो या भुतांच्या गाडीवर गेला आणि खूप घाबरला. मला असं म्हणायचंय, की त्याच्यावर दया करावी म्हणून चालणारं त्याचं ओरडणं अगदी किड्डरमिन्सटरलाही ऐकू येत होतं. त्यानं ही फेरी संपवली. त्याचे केस पांढरे झाले होते, नुसते पांढरेशुभ्र आणि मिश्याही."

त्या आश्चर्यचकित होऊन गाडीत बसतात.

"मुलींनो धीरानं राहा." मी गंभीरपणे सांगतो.

जर मला त्यांचं रूप आवडलं, तर मी फेरी अर्धी झाल्यावर दिवे बंद करतो. त्या किंचाळतात. त्यांचं किंचाळणं ममासारखं नाही. त्यात खरी भीती नाही. उत्तेजना आणि आनंद यांचं मिश्रण त्यात असतं. जेव्हा त्यांचा डबा शेवटाला पोहोचतो, तेव्हा त्यांना मदत करण्यासाठी मी तिथे उभा असतो. मी हसत असतो.

"गंमत आली?" मी सहजपणे विचारतो.

त्या माझ्याकडे बोट दाखवतात. "तिथे असताना तू दिवे बंद केलेस!"

आणि मग खेळाची सुरुवात होते. त्या पुन्हा पुन्हा त्या भुताच्या गाडीनं प्रवास करायचं ठरवतात आणि दिवसाच्या शेवटी माझ्याकडे त्यांचे फोन नंबर असतात.

टर्म सुरू होण्यापूर्वी मी स्टोअरब्रिजमध्ये छोटीशी जागा शोधत असतो. मी कुणावर अवलंबून नाही, स्वतंत्र आहे आणि मोठा झालोय. फक्त खरं गुपित असं आहे, माझं अंतर्मन हे मान्य करू शकत नाही. माझ्या ममानं मला मदत करावी, असं वाटतं. अर्थात, ती करत नाही; परंतु तिनं मला काही उत्पन्न मिळावं यासाठी व्यवस्था केलीय. तिनं सोशल सर्व्हिसेसवाल्यांना सांगितलंय, की मी जरी सोळा वर्षांचा असलो, तरी माझ्या बापाच्या हिंसाचारामुळे मी घरी राहू शकत नाही. आता ते मला आठवड्याला तीस पौंड देतायत.

इतर मुलांपेक्षा मला मी वेगळा वाटतो. त्यांच्यापैकी बहुतेक सर्व अजून

आपल्या आई-वडिलांबरोबर राहत आहेत. कॉलेज संपलं, की ते त्यांच्या बसमध्ये बसतात आणि गरम जेवणासाठी आणि मायेसाठी घरी जातात. मी त्यांच्यापैकी बहुतेकांपेक्षा लहान आहे; परंतु असं दिसतं, की मी फार प्रौढ आहे.

माझा एकाकीपणा दूर करण्यासाठी माझे जुने मित्र अजूनही आहेत म्हणून मला बरं वाटतं. सोशल सर्व्हिसवाल्यांकडून येणारे तीस पौंड सोमवारी सकाळी येतात आणि मग मी सोमवारी रात्री मुलांबरोबर क्लबला जातो. आम्ही ते सर्व पैसे खर्चून वाया घालवतो. नंतर आठवड्याभरात माझ्या मित्रांचे पैसे आणि पगार येतात. आम्ही ते सर्व उडवतो, पण या वेळी पैसे ते खर्च करतात. आम्ही कोण आहोत, ते आम्ही दारू प्यायल्यावर आणि ड्रग घेतल्यावर लक्षात येतं. आम्ही वाईट आहोत. आमच्या आयुष्याचे आम्ही मालक आहोत. इथे कुणी आम्हाला प्रतिबंध करायला नाही आणि आम्हाला पाहिजे ते आम्ही करू शकतो. मग जेवणासाठी पैसे नसले म्हणून काय झालं? जेवण तसं महत्त्वाचं नाही आणि ते महत्त्वाचं आहे, असं सांगायला आजूबाजूला कोणी नाही.

सुरुवातीला मी प्रत्येक दिवशी कॉलेजला जातो. सकाळी लवकर उठायचं आणि बाहेर पडायचं हे भयानक आहे. मला खरंच आर्टिस्ट बनायचं आहे का? कदाचित सर्वांतून बाहेर पडण्यासाठी हे मी करतोय. मला काय निर्माण करायचंय, कसं आणि का? याबद्दल मी फारसा विचार केलेला नाही.

मी एका मागोमाग अशा सहा स्वत:च्या तसबिरी शाईनं काढतो. मला शाईबद्दल सर्व माहीत आहे, कारण माझे केंडॉलमधील आर्ट्सचे शिक्षक, त्यांना ती जास्त आवडायची. ते एक असंदिग्ध, पारंपरिक पद्धतीनं जाणारे लेकलँड आर्टिस्ट होते. त्यांनी हुबेहूब जमिनीचे देखावे काढलेले आहेत आणि मग प्रत्येक ओळीओळीत मेंढीची लोकर भरली आहे. त्यांना माझं कोरीवकाम आणि ॲब्स्ट्रॅक्ट ड्रॉईंगमधील रुची पसंत नव्हती. आता मी शाईसारखं पारंपरिक सामान माध्यम म्हणून कल्पकतेनं उपयोगात आणण्याचा प्रयत्न करतोय. ओलियोपेस्टो या चिकट पांढऱ्या रंगाच्या पेस्टच्या प्रेमात मी पडलोय. माझ्या कामाच्या स्तरासाठी मी त्याचा माध्यम म्हणून उपयोग करू शकतो.

मला तेथील काही शिक्षक आवडतात; परंतु माझं मन त्या कॉलेजच्या भिंतीत रमत नाही. ते बाहेर लोकांच्या जगात आणि कल्पनेत आहे. हळूहळू माझी इतर विद्यार्थ्यांशी ओळख होते आणि ते त्या कल्पना उचलून धरतात. बरेचसे माझ्याहून मोठे आहेत आणि काही खरे आर्टिस्टही आहेत, जे प्रामाणिकपणे अनेक माध्यमांतून काम करत आहेत. ते काहीसे सौम्य, दयाळू लोक आहेत. काही हिप्पींसारखे आहेत आणि काही हिप्पी आहेत. आम्ही चर्चा करतो. मी या पूर्वी आर्ट्सबद्दल बोललेलो नाही. फक्त लहान असताना ॲल्बट्सजवळ बोललोय तेवढाच. इथे प्रत्येकाकडे आर्ट्सबद्दल

आणि राजकारणाबद्दल सांगण्यासारख्या कल्पना आहेत. जिथून मी आलोय, तिथे तुम्ही अव्यक्त राहायचं, हेच अपेक्षित आहे. अचानक लोक माझ्याशी बोलतायत आणि माझ्या लक्षात येतंय, की माझ्याकडेही सांगण्यासारखं बरंच आहे. जिथे मुलांना बायका स्वत:चं दूध पाजतात, त्या स्टोनहेंजला ते मला जुन्या बसनं नेतात. ती जागा पीट्सच्या झोपडपट्टीसारखी आहे. असंच एक गोंधळलेलं कुटुंब. ज्याचा मी सदस्य आहे, अशी मी स्वत:ची फसगत करून घेतो; परंतु मी किड्डर-मिन्स्टरमधून आलेला आहे. मी त्यांची माझ्या जुन्या मित्रांशी ओळख करून देऊ शकत नाही. जर डॅननं आमचं काही संभाषण ऐकलं, तर तो इतका कंटाळेल, की तो तिथेच मुतेल.

डॅनियल आणि इतर आजूबाजूला असताना आर्टिस्ट होणं सोपं असणार नाही. एका संध्याकाळी काही मुलांचा घोळका बर्मिंगहॅमला जायला निघतो. ती सूर्यास्ताची वेळ आहे. पश्चिमेकडे आकाशाला जणू काही आग लागलीय. अनैसर्गिक लाल, केशरी आणि पिवळे आणि निळे रंग त्या ढगांमागे रेशमी अस्तरांसारखे पसरलेले असतात.

"तिकडे बघा." मी म्हणतो.

ते खिडकीतून बाहेर पाहतात. मी कशाबद्दल बोलतोय, याचं त्यांना नवल वाटतं.

"सूर्यास्त! किती सुंदर!"

ते वळून माझ्याकडे टक लावून बघतात, तो ड्रायव्हरसुद्धा.

"काय?" ते विचारतात.

माझा सर्वांत चांगला मित्र डॅनियल मला गुद्दा ठेवून देतो. तो म्हणतो, "तू चुत्या, विलक्षण माणूस आहेस."

ठीक आहे, मी पुन्हा असं म्हणणार नाही. त्यांना सौंदर्याबद्दल रसिकता नाही किंवा ती ते दाखवणार नाहीत. जेव्हा त्यांच्याबरोबर असेन, तेव्हा आर्ट्सबद्दल कमी बोलायचं, हे मी लक्षात ठेवावं, हे नक्कीच. मी त्यांच्याबरोबर बराच काळ असतो.

त्या किड्डरमिन्स्टरमधील घोळक्यात आणि आर्ट्स कॉलेजमधील घोळक्यात एकच साम्य आहे, ते म्हणजे ड्रग्ज. आडदांड मुलं ड्रग्ज घेतात, कारण त्यामुळे त्यांना पटकन सारं विसरून जाता येतं. कलात्मक प्रोत्साहन मिळून काही सीमारेषा बदलतील, वाढीस लागतील, यासाठी कॉलेजची मुलं ड्रग्जकडे पाहत असतात. प्रौढ आणि गंभीर प्रकृतीचे आर्टिस्ट ती परिवर्तनं आपल्या कामात समाविष्ट करतात. मी नेहमी हेच करायचं म्हणतो आणि मला ड्रग्ज घेणं खरोखर क्रियाशील अनुभव वाटतो; परंतु येणाऱ्या कल्पना या स्वप्नांच्या तुकड्यागत माझ्या हातून निसटतात आणि मी सारं विसरतो, कारण मी किड्डरमिन्स्टरमधील एक आडदांड मुलगा आहे, हे आतून जाणवतं.

माझ्यासारखे लोक कॉलेजमध्ये आहेत. आडदांड मुलं ज्यांना आर्टिस्ट व्हायचंय, ते माझे खास मित्र बनतात. एक दगडकाम करणारा गवंडी आहे. त्याला कोरीवकाम इतकं आवडलं, की तो इथे दुसऱ्या माध्यमांचा अभ्यास करण्यासाठी आलाय. तो माझ्याहून दहा वर्षांनी मोठा आहे आणि तो माझी ओळख ब्ल्यूजशी करून देतो. ब्ल्यूज म्हणजे हँडस्वर्थ येथील दंगे झाल्यानंतरचे काळ्यांचे पिण्याचे अड्डे. ते रेगी आणि हॅशच्या मधुर वासानं भरलेले आहेत. एकदा हँडस्वर्थ वरून आम्ही त्याच्या ब्लॉक कंट्री फ्लॅटवर तपकिरी पावडर असलेली एक छोटी पुडी घेऊन गेलो. ती उपयोगात आणण्यासाठी मी उत्तेजित झालोय. हा माल हा सैतानाचाच ड्रग आहे. त्याला काळिमा लागलेला आहे आणि त्याला लोक घाबरतात. ते हेरॉईन आहे.

मी अर्धवट पुऱ्या दगडी कलाकृती पाहत असताना तो रुपेरी कागदाची स्वयंपाकघरातील टेबलवर घडी घालतो. जणू काही तो छोटं कागदाचं विमान करत आहे. मग ती घडी त्याची सुरळी व्हावी म्हणून पेनभोवती गुंडाळतो. तो आणखी काही रुपेरी कागदाच्या घड्या घालतो. स्वयंपाकघरातील सुरीनं ती पुडी फाडतो आणि त्यातील भरावण त्या पोकळीत ओततो. तो आपला लायटर घेतो आणि त्या रुपेरी कागदाखाली ज्योत फडफडते. त्या पावडरला बुडबुडे येतात आणि मग ती त्यापुढे पावडर राहत नाही. तो एक चकचकीत पदार्थाचा थेंब होतो. आपलं डोकं एका बाजूला करून तो ती सुरनळी ओठांशी धरतो आणि श्वास आत घेतो. हेरॉईन आता द्रव झालाय. खोलीत आता एक विचित्र वास आहे. मी तो ताबडतोब ओळखतो. कुठून बरं? त्या कडवट हेरॉईनचा तो रासायनिक वास मला कसा माहीत आहे?

माझ्याकडे तो ती सुरनळी सारतो. सुरुवातीला एक घाणेरडी चव माझ्या घशात मागच्या बाजूला जाणवते. जेव्हा मी त्या थेंबाचा तीन घड्यांतून पाठलाग करतो, तेव्हा एक गरम लोकरी हातमोज्यांची जोडी माझ्या मेंदूभोवती घट्ट बसते आणि मला माहीत आहे, की सर्व काही ठीक होईल, सर्व ठीक होईल. माझ्या लक्षात येतं, की हा ड्रग मी यापूर्वी वापरलाय. त्याचा वास, त्याचे परिणाम, तो रुपेरी वर्खाचा कागद यांना मी अकरा वर्षांचा असताना पहिल्यांदा भेटलो होतो. किड्डरमिन्स्टरमधील पीटच्या झोपडपट्टीत, ज्या रात्री मी पळालो होतो आणि पीट घरी नव्हता. मी अनोळखी लोकांच्या वर्तुळात बसलो होतो आणि त्यांनी ते वर्तुळाकार फिरवलं होतं. ते हेरॉईन होतं, म्हणून तर पीट घरी आल्यावर त्यांच्यावर ओरडला होता, कारण मी अकरा वर्षांचा होतो आणि ड्रॅगनचा पाठलाग करत होतो.

आर्ट्स कॉलेजमध्ये मला मैत्रिणी आहेत आणि त्यांपैकी क्रिस्ती नावाची एक हेअरड्रेसर आहे. त्या भीतिदायक अशा आर्ट्सच्या विद्यार्थ्यांबरोबर भटकायला तिला आवडतं. आम्ही दोघांनी काही खास जागा शोधल्या आहेत. आम्ही सॅल्व्हेशन

डिझास्टर या बर्मिंगहॅममधील क्लबला जातो. या ठिकाणी सर्व जण विचित्र पोशाख करण्याचा प्रयत्न करतात. सर्व शेरॉन्स आणि केव्हीन्स हे त्यांच्या झगझगीत कपड्यांत पॉवरहाऊस या तळमजल्यावरच्या क्लबसाठी रांगेत उभे आहेत. क्रिस्ती आणि मी आम्ही विचित्र पोशाख करणाऱ्या लोकांच्या बाजूच्या जिन्यावरून वर जाणाऱ्या रांगेत उभे आहोत. आम्ही पोशाख केलाय तो निव्वळ मनावर दडपण आणण्यासाठी. मोठ्या हॅट घातलेल्या, ड्रेसना झालरी लावलेल्या मुली, जोधपुरी घालून हातात चाबूक घेतलेले पुरुष, त्यांच्या झालरी या नीटपणे नव्वद अंशाच्या कोनात कापून सरळ असलेले पेन्सिल स्कर्ट घातलेले, भविष्यात डोकावणारे क्राफ्टवर्कचे चाहते आणि रुंद हॅट घालून चामड्याचं आणि चित्त्याचं कातडं घातलेले काळे लोकही तिथे आहेत. मी आताच्या आधुनिक काळ्या आणि चौकडीच्या पँटमध्ये आहे, तसंच मी लाल मोजे आणि ओबडधोबड बूट घातलेयत. लाल हॅट, पुढचे लाल पट्टे लावलेली पँट आणि पांढरा शर्ट घातलाय.

केव्हीन्स सारखे बडबडत असतात. आम्ही त्यांची पर्वा करत नाही. त्यांचा फाजिल हटवाद, त्यांच्याकडे असलेला कल्पनाशक्तीचा अभाव आणि जेव्हा आम्ही आमच्या विचित्र कपड्यांत रात्रीची बस घ्यायला जातो, तेव्हा ज्या तऱ्हेनं ते सर्व भांडतात या सर्वांवरून आम्ही त्यांची किंमत आमच्या लेखी कमीच मानतो. मी आर्ट्सचा विद्यार्थी आहे आणि मी त्यांच्यासारखा नाही. आम्ही दुर्लभ अशा चाकोरीत आहोत आणि आमचा ड्रग आहे स्पीड, फक्त दारूच नव्हे, जी त्यांना थोड्याच वेळात हिंसक बनवेल.

जेव्हा सॅल्व्हेशन डिझास्टर बंद होतं, क्रिस्ती आणि मी रात्रभर चालणाऱ्या ॲस्टॉन युनिव्हर्सिटीतील जग या क्लबला येतो. ही जागा उत्तेजित करणारी आणि वेगळी आहे. ती पार्टी क्लबपेक्षा डान्सिंग पार्टीसारखी आहे. तिथे एक फ्युचरची रेकॉर्ड आहे. 'फ्युचर ॲसिड ट्रॅक्स' आणि इतरांना ती आवडते. तो मला कसलातरी इशारा वाटतो. ते अशा खुणा करतात, की काहीतरी संगीतात, समाजात नवीन घडणार आहे; परंतु ते काय, ते मला समजत नाही. आमच्या त्या आजच्या डरावण्या पोशाखांत आम्ही गर्क आहोत.

ॲम्फेटामाईन्समुळे सर्व रात्र अशी काढणं सोपं जातं. स्पीड आपल्याला खूप प्यायला मदत करतो आणि ते घेतल्यावर दारू इतकी निस्तेज वाटत नाही. तुम्ही रात्रभर नाचू, बोलू आणि काहीही करू शकता. तुम्ही रात्रभर भराभर बोलता आणि जरी तुमची मित्रमंडळी ऐकत असली वा नसली, तरी त्यांच्याशी चार तास बोलू शकता. त्यांनी उत्तर द्यायला हवं किंवा प्रश्न विचारायला हवा, अशी अपेक्षा न ठेवता बोलू शकता. स्पीड घेतल्यावर भिंतीशीही तुम्ही बोलू शकता आणि काही वेळानं बोलून बोलून ती भिंत आहे, हे तुम्ही विसरता आणि ती खरंच कुंपण आहे,

असं मानू लागता.

ड्रग्ज घेतल्याशिवाय जगणं, हे माझ्या विचारांच्या पलीकडचं आहे. ते घेऊन जगणं, हेच मला माहीत आहे. आठवड्याला तीस पौंड, त्यामुळे मला जास्त विकत घेता येत नाही; पण आता मी हेरॉईन घेतलंय आणि नियमित हेरॉईन, ओपियम, ॲम्फेटामाईन्स, ॲसिड, कोकीन, मॅजिक, मशरूम्स, हॅश आणि माझा जुना मित्र दारू यांचा उपयोग केलाय. शेवटची दोन मी रोज घेतो. मला दारू लागते आणि हॅश एकदातरी ओढायला लागते. त्याच्याशिवाय मी झोपूच शकत नाही.

पुरेसे ड्रग्ज न परवडणारा मी काही एकच माणूस नाही. किड्डरमिन्स्टरमधील पोरंही नाहीत आणि याला उपाय एकच. चोऱ्या करणं. आम्ही बहुतेक एकत्रच चोरी करतो. चोरी करणं ही एकच गोष्ट मला त्या आडदांड मुलांच्या घोळक्यात ठेवते. मी त्यांच्यापैकी एक आहे. ती काही आर्ट्स कॉलेजमधली गोष्ट नाही; पण मनात खोलवर कुठेतरी वाटतं, ते असंच असायला हवं. कदाचित, मी आर्ट्सचा विद्यार्थी असल्याचं नाटक करतोय. माझ्या जुन्या मित्रांबरोबर मी रेल्वेच्या रुळांवर आहे आणि मी कितीही जोराचा प्रयत्न केला तरी मी त्यातून बाजूला होऊ शकत नाही. माझ्याबरोबर वाढलेले सर्व याच मार्गावर आहेत आणि हा मार्ग ड्रग्ज आणि गुन्ह्यांकडे तुम्हाला नेतो. शाळा संपली, की पुढच्या स्टेशनवर ते तुमची वाट पाहत असतात. जेव्हा मी आर्ट्स कॉलेजला आलो, तेव्हा मी काही निव्वळ डॅडींपासून सुटायला पाहत नव्हतो; पण ती रेल्वेसुद्धा. नंतर जेव्हा मला ती धडाधडा जाणारी लंडन ते ग्लास्को एक्स्प्रेस ट्रेन त्या लेकच्या दरीतून टाइम-ट्रव्हलर सारखी वेगानं धडधडत जाताना आठवते, तेव्हा सत्यस्थिती माझ्या लक्षात येते. यातून उतरणं कुणालाच शक्य नाही.

एका रात्री मी किड्डरमिन्स्टरमधील मुलांबरोबर आहे आणि आम्ही स्पीड घेतलं आहे, दारूही आणि मॅजिक मशरूमही घेतली आहे. यामुळे आम्ही पार झिंगलो आहोत; पण आम्हाला एका गोष्टीची खात्री आहे. प्यायला आणखी दारू हवीय आणि ती मिळवण्याचा एकच मार्ग आहे. एक मुलगा लायसन्स नसलेल्या खिडकीजवळ कॅन्व्हास धरतो आणि मी आणि माझा मामेभाऊ उत्तेजित होऊन त्या खिडकीवर लाथ मारतो, काच ढकलून आत जातो आणि काही बाटल्या घेतो; पण हे करायला आम्ही समर्थ नाही, आम्ही पडतो. बाटल्या जमिनीवर पडून फुटतात. ते दिवे फिरल्यासारखे वाटतात आणि हे सर्व घडतं ते तासाला शंभर मैलांच्या वेगात.

आम्हाला जरी वाटत असलं, की आम्ही अट्टल गुन्हेगार आहोत, तरी आम्हाला हे माहीत आहे, की योजनाबद्ध नसलेले, आणि घ्यायचं आणि पळायचं, असे गुन्हे फारसे यशस्वी होत नाहीत. आमची याची खात्री पटते, कारण काही

मिनिटांतच पोलिसांच्या गाड्यांनी आम्हाला गराडा घातलाय. आम्ही केलेला डझनभर दुकानातला हा हल्ला आणि सिटी सेंटरमधील कॅमेऱ्यांमुळे पकडले गेलो. आमच्या डोक्यातून असं काही घडेल, याची आठवणच पुसून गेली होती, की त्यामुळे आम्हाला आमचे चेहरे झाकून घेण्याचंही मनात आलं नव्हतं.

बालगुन्हेगारीचा माझा आधीचा इतिहास आहेच, त्यामुळे माझ्यावर हा काही पहिला आरोप नाही; परंतु शांतता राखण्यासाठी मी जामीन घेण्याची ही आजची माझी पहिलीच वेळ आहे आणि माझे मित्र बरोबर असताना शांतता, ही गोष्ट अशक्य आहे.

आर्ट्स कॉलेजच्या वर्षाचा तो शेवटचा सोमवार आहे आणि नेहमीप्रमाणे सोमवारी डॅनियलबरोबर सोशल सिक्युरीटीकडून मिळालेले पैसे मी उडवत आहे. आम्ही माझा भाऊ शेन, माझा मामेभाऊ आणि इतर दुसरे मित्र यांना भेटणार आहोत. शेन चित्रविचित्र, डरावणे कपडे वापरत नाही. तो फुटबॉलप्रेमी गुंड आहे. त्याच्या बरोबरीचे आताचे मित्र हे मध्यमवर्गातील इस्त्रीचे कपडे घालणारे आणि दाढीनंतर कौरी क्रीम लावणारे आहेत.

आम्ही एका किड्डरमिन्स्टरमधील वाईन बारशी भेटतो. ही काही माझ्या आवडीची जागा नाही; पण हल्ली हल्ली या अशा जागा फोफावल्यात. जणू काही मिसेस थॅचरनी या सर्व देशभर वाईन बारचं बी पेरल्यागत त्या अचानक उगवल्यात.

"तुझ्या जंपरवर काय आहे?" डॅनियल विचारतो.

मी माझ्या कपड्यांत हात घालतो आणि आजच्या शेवटच्या धड्यात मी काय वापरत होतो, ते बाहेर काढतो. मला माझ्या त्या फ्रेंच कर्व्हज ठेवायला दुसरी कोणतीही जागा नव्हती. फ्रेंच कर्व्हज म्हणजे परस्पेक्स आकाराचं ते खुणा लिहिण्यासाठी वापरलं जातं. मुलं ते एकमेकांना देतात. ते आर्ट्स शाळेतून आलंय, त्यामुळे ते काहीसं अपरिपक्व आणि विचित्र असणार.

शहराबाहेरचा एक घोळका त्या वाइन बारमधून बाहेर पडतोय. त्यांनी एका गरोदर बाईला रस्त्यातून बाजूला ढकललंय. तिनं त्याला हरकत घेतलीय, तिच्या मित्रानंही आणि इतर काही लोकांनीही; परंतु हा वाइन बार आहे, गुत्ता नाही, त्यामुळे कुणीच मारामारी करत नाही. याला जी जबाबदार मुलं आहेत, ती बहुधा उत्तरेकडची आहेत आणि ती क्षमा मागत नाहीत.

मी दारू पीत आहे आणि स्पीडही घेत आहे. हे ड्रग्ज मी कॉलेज पार्टीच्या वेळी घेतो; परंतु मी इथे तो दुसरा मार्क आहे आणि त्यामुळे त्यांचा परिणाम वेगळा होतोय. जेव्हा शेन, माझा मामेभाऊ आणि त्याचे मित्र त्या गडबड करणाऱ्या लोकांच्या पाठोपाठ बाहेर जाण्यासाठी उठतात, मी माझ्या त्या फ्रेंच कर्व्हज पुन्हा माझ्या जंपरमध्ये टाकतो आणि डॅन आणि मीही जातो.

आम्ही त्या उत्तरेकडून आलेल्या घोळक्याचा पाठलाग दुकानाच्या हद्दीपर्यंत करतो आणि सरतेशेवटी मारामारी करतो. माझी कोपरं वाकतात आणि एखाद्या पिस्टनसारखी सरळ होतात. माझ्या मुठी मांसात घुसतात. जेव्हा माझ्या फ्रेंच कर्व्हज खाली पडतात, तेव्हा मी थोडा थांबतो, मग मी त्या जंपरमध्ये टाकतो. ज्या माणसाशी मी मारामारी करत असतो, तो तेवढ्यात पळून जातो. इथे बूट, मुठी, रस्त्यावरचे दिवे आणि रस्त्याची दगडी कड हे सारं अंधुक होतं. मी डॅनला पाहतो. तो मारामारी करण्यास अगदी लुकडा आहे. दुसरा कोणी गुद्दे मारत असला, तर हा तिथे घुटमळतो आणि सरळ लाथ मारता येईल का, म्हणून वाट पाहतो. सरतेशेवटी रस्त्यावर रक्त सांडतं आणि माणसं रस्त्यावर पडतात. माझा भाऊ त्यातील एकाच्या डोक्यात लाथ घालतो आणि तो माणूस एकदम आचके द्यायला लागतो, मग आम्ही पळतो.

त्या रात्री पोलीस येतात. त्यांना माझ्या मुठीवरच्या जखमांबद्दल वेगळंच स्वारस्य वाटतं. मी त्यांना सांगतो, की बिअरचा कॅन उघडताना हा अपघात झाला. कॅन दाखवण्यासाठी मी त्यांना आत बोलावतो. मी त्यांना सांगतो, की मला आशा आहे, की त्या कॅनमुळे मला पकडून दिलं जाणार नाही. ते माझ्याकडे बारकाईनं पाहतात. मी त्या संध्याकाळी काय करत होतो, कुठे होतो, याची माहिती त्यांना हवीय. मी खोटं बोलतो आणि आता मी मारामारी करणारा नाही, हे सिद्ध करण्यासाठी मी आर्ट्स कॉलेजला आहे, हेही सांगतो. त्यांना इतकं आश्चर्य वाटतं, की त्यांची खात्री करण्यासाठी आज वर्ग संपल्यावर जे मी माझ्या जंपरमध्ये टाकलं होतं, ते पुढे करतो.

"हे काय आहे?" नेहमीच जिज्ञासू असलेले पोलीस विचारतात.

"फ्रेंच कर्व्हज," मी स्पष्टीकरण देतो. "त्यांचा उपयोग खुणा लिहिण्यासाठी करतो."

तो पोलीस आपल्या दाणगट हातानं ते फ्रेंच कर्व्हज हळुवारपणे उचलतो, त्याकडे पाहतो आणि हातात फिरवतो. त्या फ्रेंच कर्व्हजच्या मागच्या बाजूला रक्त आहे आणि मला आठवतं, की मारामारी करताना ते खाली पडलं आणि माझ्या पोटात खड्डा पडतो. त्या रक्ताचा संबंध मी बिअर कॅनशी लावतो; परंतु त्याआधीच पोलीस मला बेड्या ठोकतात. मला काही माहीत नाही, असा मी आग्रहच करत असल्यामुळे ते मला, त्या वाइन बारमध्ये तो प्रसंग घडल्यानंतर रात्री मारामारी झाल्याचं सांगतात. या मारामारीत दोन माणसं बेशुद्ध झाली आणि काहींची हाडं मोडली. जेव्हा शेननं लाथ मारली, तेव्हा जमिनीवर पडलेल्या त्या माणसानं कसे आचके दिले, त्याची मला आठवण झाली. मला ओकारी येईल असं वाटतं.

एका पाठोपाठ एक करत आम्हा सहा जणांना पोलीस कोठडीत अडकवलंय.

दूरवर कुठेतरी रेडिओ गातोय. ते आत्ताचं आवडतं गाणं आहे. "डोन्ट वरी, बी हॅपी."

पुढच्या तीन दिवसांच्या चौकशीनंतर मी हळूहळू खोटं बोलण्याचं थांबवतो. माझ्या भावाच्या त्या मध्यमवर्गीय मित्रानं आम्हाला ग्रास दिलं होतं, त्यामुळे खोटं बोलण्यात काही अर्थ नाही. त्याशिवाय त्या रात्री आम्ही किती प्यायलो होतो, हेही पोलिसांनी शोधून काढलंय, त्यामुळे आमच्या घोळक्याची मारामारीची आठवण अस्पष्ट झाली असावी आणि या कारणास्तव त्यांनी आमच्यावर आरोपपत्र दाखल केलं आहे. व्हॉयलंट डिसऑर्डर सेक्शन २ खाली दंगा केल्याचा गुन्हा आमच्यावर आहे. मी सतरा वर्षांचा आहे.

■

१४

आम्ही नक्की अडकलोय, हे आम्हाला आमचा सॉलिसिटर सांगतो. फुटबॉलप्रेमी गुंड आणि बिअर पिऊन आडमुठेपणी वागणाऱ्यांवर जनमत अगदी प्रक्षुब्ध आहे आणि सरकार आमच्यासारख्यांच्या केसेस धडा शिकवण्यासाठी दाखल करून घेत आहे. आमच्यापैकी एकही त्या मारामारीत काय घडलं, याचा सुसंगत असा खुलासा देऊ शकलेला नाही. काहींना त्याची आठवणही नाही, त्यामुळे आम्ही गुन्हा केलाय, हे गृहीत धरलं जात आहे, त्यामुळे ज्युरी न बसवता आम्हाला काही वर्षांची तुरुंगाची शिक्षा होईल. आमची शिक्षा शक्य तेवढी पुढे ढकलता यावी, अशी इच्छा आहे का, असं आम्हाला सॉलिसिटर विचारतो. आम्ही त्याला संमती देतो.

मी माझी झोपण्याची छोटी जागा सोडतो. आता माझं आयुष्य बदलणार आहे. आर्ट्स कॉलेज संपलंय. कदाचित, मी इथे आल्यापासून आर्ट्सचा विद्यार्थी असल्याचं नाटकच करतोय. मी आर्टिस्ट असल्याचा आव आणलाय. त्या कॉलेजच्या घोळक्यातील एक असल्याचं ढोंग करतोय. या इथला आहे, असं नाटक केलंय; पण मी एक निव्वळ आडदांड मुलगा आहे. ती ट्रेन आपल्या चाकोरीवर राहिलीय आणि मी इतरांबरोबर पुढच्या स्टेशनवर उतरलोय. मी तुरुंगात जाणार आहे. जो गुन्हा केल्याची मला आठवणही नाही, त्यासाठी मी तुरुंगात जातोय.

निदान यापुढे मला ढोंग तरी करावं लागणार नाही. मी वेगळा असल्याचं दाखवायचा प्रयत्न करणं मी थांबवू शकतो. मी वाईट, आडदांड आहे, निर्दय आहे आणि हे सिद्ध करण्यासाठी मला तुरुंगाची शिक्षा होणार आहे.

आमची मारामारी, कोर्टात जाणं यामधील उन्हाळ्याच्या त्या लांबलचक महिन्यात मी शरणागती पत्करतो. मी मग ड्रग्ज आणि गुन्हे यांकडे माझं आयुष्य वळवतो. यात डॅनियल आणि मी अविभाज्य मित्र बनतो. आम्हाला जायला कुठेही जागा नाही, त्यामुळे आम्ही कसंही जगतो. एखाद्या भटक्यासारखे शेतात झोपतो किंवा कधीमधी आम्ही दुसऱ्यांच्या फ्लॅटचा ताबा घेतो. हे फ्लॅट्स मुलींचे किंवा

दुर्बल मुलांचे असतात आणि आम्ही सरळ आत जातो आणि कोकिळेसारखं त्यांना बाहेर काढतो. आम्ही आडवयाच्या मुलींशी संभोग करतो. आम्ही त्यांच्याशी जे काही करतो, ते आम्हाला करू देतात आणि मग त्या उदास, नरमाईच्या स्वरांत आणखीची मागणी करतात. त्या आमच्याकडे लोहचुंबकासारख्या आकर्षित होतात. त्यांना असं वाटतं, की आमच्यासारखे तरुण त्यांना योग्य आहेत.

आम्ही गॅरेजेस फोडतो, कार आणि घरंही... नंतर त्याबद्दल काहीतरी आठवण्यासाठी धडपडतो. जो कोणी आमच्या जवळ येतो त्याला आम्ही बनवतो. आम्ही ज्या ठिकाणी मोठी जंगी मारामारी केलेली होती, त्या वाइन बारमधून खूप पिऊन लडखडत येणाऱ्यांना आम्ही गुंडाळतोच. जर त्यांनी प्रतिकार केला, तर आम्ही त्यांना कोपऱ्यावर घेऊन जातो आणि चांगलंच ठोकतो. मी या गुन्ह्यांना फूस देणारा नाही, मला त्यातून आनंदही मिळत नाही; पण त्या मुलांच्या घोळक्यातील मी एक आहे आणि आम्ही तेच करत आहोत. आम्ही आमच्याहून मोठ्या आणि आडमुठ्या असलेल्या लोकांत मिसळतो. मनातून मी घाबरलेला आहे. त्यांच्यासारखं होणं, हेच त्या रेल्वे रस्त्यावरचं पुढचं ठिकाण आहे का?

सगळ्यात भयानक आहेत ते जेक आणि ग्रेग हे भाऊ. आम्ही एका उंचावरच्या इमारतीत असलेल्या उघड्याबोडक्या घाणेरड्या खोलीत बसलेलो आहोत. ज्या लोकांनी खूप प्यायलेली आहे आणि जे धुंदीत पडलेले आहेत, अशा लोकांनी तो फ्लॅट भरलेला आहे. एक आपला चेहरा खाजवत आहे. तो ते टाळू शकत नाही. आपला चेहरा तो रक्त येईपर्यंत पुन्हा पुन्हा खाजवतो आहे. तो स्पीडचं इंजेक्शन घेत व्होडका पीत आहे. त्यानं बाटली संपवली आहे; परंतु तरीही तो रिकामा ग्लास तोंडाला लावत आहे आणि मिनिटा-दोन मिनिटांतच माझ्या लक्षात येतं, की तो ग्लासमधून काही पीत नाहीये, तर प्रत्यक्षात तो खात आहे. त्यानं त्या ग्लासचा तुकडा तोडला आहे आणि आता तो ते चघळत आहे. त्याचं तोंड रक्तानं माखलं आहे. क्रंच, क्रंच, क्रंच. मी त्याच्याकडे टक लावून बघण्याचं टाळण्याचा प्रयत्न करतो. मला खरं काय करावंसं वाटतं, तर येथून पळून जावं.

त्याचा भाऊ ग्लेन हा त्याच्याहून भीतिदायक आहे. जेव्हा एक काळा माणूस हॅश विकत घ्यायला येतो, तेव्हा मी त्याच्या फ्लॅटमध्ये आहे. तो माणूस आपली कृष्णकृत्यं गायची सुरुवात करतो आणि ग्लेन त्याला प्रोत्साहन देऊन सुरुवात करतो. त्या काळ्याला वाटतं, की त्यानं एक नवा मित्र जोडलाय.

तो मग त्या घाणेरड्या सोफ्यावर बसतो, सिगरेट ओढतो आणि थोडी दारू पितो आणि जसा जसा तो तर्र होतो, तो फुशारक्या मारत राहतो. मला माहीत आहे, की ग्लेन त्याच्यावर तोंडसुख घेणार. वातावरणात जडत्व आहे. जे घडणार आहे, त्याची वाट पाहणं भयंकर आहे. डॅडी तर्र होऊन घरी परत येण्याची वाट

पाहण्यासारखं आहे. तो काळ्या सारं विसरून, सारं फुगवून सांगतोय, हसतोय आणि ग्लेनबरोबर चेष्टामस्करी करतोय. मग ते घडतं. ग्लेन हसताना मध्येच थांबतो. त्याचा आवाज कठोर होतो आणि तो म्हणतो, "ए चुत्या, तुला काय वाटतं? तू कुणाशी बोलतोयस? मला तुझा तिरस्कार वाटतो चुत्या, काळ्या आणि तुझ्याकडे जे काही आहे, ते मी घेणार आहे."

तो त्या काळ्याला मारत असताना हे सर्व सामान्य आहे, असं दाखवत मी तिथे हतबल आणि तिटकारा येऊन उभा असतो. ग्लेनच्या विनंतीवरून मी त्याच्या त्या बळीला गुद्दा मारण्याचं नाटकही करतो. त्यानंतर मला आश्रयस्थान हवं असतं. मी सरळ व्हॅनिसाकडे जातो.

व्हॅनिसा ही माझी पहिली खरी मैत्रीण आहे. अर्थात, माझ्या आयुष्यात अनेक मुली आल्या होत्या; परंतु व्हॅनिसा वेगळी आहे. ती मला भेटली, तेव्हा मित्र-मैत्रिणींच्या घोळक्यात होती. त्या वेळी मी मुलांच्या घोळक्यात होतो. मला ताबडतोब कळलं, की इतरांपेक्षा ती चांगली आहे. मीही वेगळा आहे, हे मला तिला दाखवायचंय. मी एखाद्या गुंडासारखा दिसत असेन आणि गुंडासारखा वागत आणि बोलतही असेन; पण या मुलीला माझ्यात दुसरा कोणी आहे, हे समजावं, असं मला वाटतं आणि हळूहळू ती माझ्यावर विश्वास ठेवते.

व्हॅनिसा छोटीशी आणि सुंदर आहे. तिचे काळे केस नेहमी व्यवस्थित असतात. ती कपड्यांच्या दुकानात काम करते. मला माहीत असलेल्या लोकांच्या अगदी विरुद्ध. ती सकाळी लवकर उठते आणि कामावर जाते. एका नीटनेटक्या घरात आपल्या आकर्षक मम बरोबर राहते. तिची मम सहजासहजी वश न होणाऱ्या पुरुषांचा समाचार घेऊन, त्यांचा वापर करून, त्यांना बाहेर फेकू शकते; परंतु व्हॅनिसा तशी नाही.

मुली नेहमीच प्रेमाबद्दल बोलत असतात आणि व्हॅनिसा लवकरच मला सांगते, की तिचं माझ्यावर प्रेम आहे. तिला तुच्छपणे वागवण्यास हा आता परवानाच आहे. जेव्हा माणसाचे अवयव जायबंदी करण्याचं माझं काम माझ्याही आटोक्याबाहेरचं होतं, तेव्हा मी परत तिच्या बाहूत येतो. ती नेहमीच तिथे असते. माझ्यावर प्रेम करते, मला समजून घेते. मला पैसे आणि जेवण देते. त्या वेडेपणापासून सोडवण्यासाठी उबदार, नीटनेटकं आश्रयस्थान देते. मलाही वाटतं, की मी तिच्यावर प्रेम करतो. प्रेम म्हणजे काय, जे आहे ते.

सप्टेंबरमध्ये वोर्स्टेस्टरमधील क्राऊन कोर्टात हजर होण्याची आमची वेळ होते. डॅनियलची आई आम्हाला घेऊन जाते. कारमध्ये आम्ही सहमत होतो, की आम्हाला पकडल्यापासून आम्ही वेळ जास्तच मजेत घालवलाय. आम्ही आमचं स्वातंत्र्य उपभोगलंय. आम्ही खूप गंमत केलीय. जे काही आम्ही केलं, ते गंमत

न राहता त्याचं रूपांतर कदाचित एका नवीन विद्रूप परिस्थितीत झालं असेल; पण मला त्याची काळजी नसते, कारण ते माझ्या विस्मृतीपलीकडे गेलंय.

आत जाण्याआधी आम्हाला ड्रगचा झुरका घ्यायचाय, त्यामुळे डॅन आणि मला कोर्टात जायला उशीर होतो. आम्ही प्यायलेलो आहोत. मी मेंढराच्या कातडीचा कोट घातलाय. तो मागच्या बाजूला फाटलेला आहे. आम्ही रानटीपणे झोपलोय आणि रासवट दिसतोय. माझा भाऊ इथे छान शर्ट आणि पँट घालून आलाय. या मुलानं आपली व्यवस्थित काळजी घेतलीय. तो आठवडाभर परातीवर काम करतो आणि आठवड्याच्या नंतरच्या सुट्टीत तो पुन्हा फुटबॉलप्रेमी गुंड बनतो. माझा मामेभाऊ आणि त्याचे मित्र हे सर्व सन्माननीय सभ्य दिसतात. तेही पिणारे आहेत; पण ते माझ्यासारखे आणि डॅनियलसारखे नाहीत. ड्रग्जसाठी उद्युक्त होऊन केलेले गुन्हे, हे आमच्यासाठी मोजमाप आहे. इतरांच्या आयुष्यात ही कदाचित वेडाची लहर असेल; परंतु आमच्यासाठी ते जीवन आहे.

ती कोर्टाची खोली जुन्या व्हिक्टोरियन पद्धतीची आहे. ती खूप मोठी आहे, छत उंच आहे आणि तावदानं तपकिरी लाकडाची आहेत. आमचा कोर्टातील पिंजरा जमिनीपासून सोळा फुटांवर आहे आणि न्यायाधीश याहूनही उंचावर आहे, त्यामुळे कोर्टाच्या कामकाजाला एक विनोदी छटा आलीय. आमचे डॅडी, ममा आणि बहीण केलीचा मागमूस नाहीये. तीन नातवंडं नॅनची आज कोर्टात हजर आहेत, पण तरीही ती आलेली नाही. कोणी येईल, अशी आम्ही अपेक्षाच केली नव्हती; परंतु डॅनियलची मम्मी इथे आहे, त्यामुळे मला बरं वाटतं. ती अतिशय प्रेमळ स्वभावाची स्त्री आहे. जी मला कधीकधी कपडे देते किंवा मला तिच्या घरात झोपू देते. त्या स्त्रीचा जन्म काळजी करण्यासाठी झालाय. तिनं आपल्या कुटुंबाच्या सर्व पिढ्या मोहाला बळी पडून कोर्टात जाताना आणि पुढे तुरुंगात गेलेल्या पाहिल्या आहेत आणि आता डॅनही वयात आलाय.

आम्हाला बेड्या घालून पिंजऱ्यात उभं केलंय आणि डोक्यावर टोप घातलेला वयस्कर न्यायाधीश बोलू लागतो. माझे कान तापल्यासारखे होतात. जे शब्द न्यायाधीश बोलतो, ते मला नीट समजत नाहीत; परंतु मला माहीत आहे, की ते भयंकर आहेत. तो कदाचित दुसऱ्या कोणाबद्दल बोलत असेल. तो माझ्याबद्दल बोलत नसणार. मी आतून तसा हिंसक नाही, हे त्याला माहीत नाही का?

मग शिक्षा फर्मावली जाते. प्रत्येक जणाची प्रतिक्रिया वेगळी असते. माझ्या भावाचे ते दोन मध्यमवर्गीय मित्र खाली कोसळतात. ज्यानं ग्रास दिलं होतं, तो रडतो आणि मग दुसरेही कोसळतात. त्याने केलेल्या हिंसक गुन्ह्यासाठी त्याची अनपेक्षितपणे उघड्या तुरुंगात रवानगी होते. माझा भाऊ, मामेभाऊ आणि डॅनियल त्यांची शिक्षा ऐकल्यावर हसतात. मी खिळून उभा राहतो. मला हसण्याची किंवा

हलण्याची शक्ती राहत नाही.

मला साडेएकोणीस महिन्यांची शिक्षा होते.

आम्हाला त्या पिंजऱ्यातून, त्या खोलीतून बाहेर काढून फरफटत बेड्या घालून दोन्ही बाजूला पोलिसांच्यामधून रांगेत खाली नेलं जातं, तेव्हा मला वाटतं, गाडी थांबावी. मला खाली उतरायचंय; परंतु सगळ्याला उशीर झालाय.

बाहेरच्या बाजूला एक गाडी आम्हाला तुरुंगात नेण्यासाठी थांबलेली असते हातात बेड्या असताना आम्ही त्यात शिरतो.

■

१५

दुसऱ्या तुरुंगात टाकण्यापूर्वी आम्हाला ग्लोसेस्टर तुरुंगात राहायचं आहे. मी माझ्या भावाबरोबर तुरुंगाच्या एका कोठडीत राहतोय. मी घाबरलोय, पण तिथे काही वेगळं असं नाही. प्रत्येक कोपऱ्यात एक पलंग आहे, एक छोटी खिडकी. त्यांच्या भिंतीवर काटकोनात ओरखडे आहेत. तिथे काही गुप्त जागा नाहीत आणि लपायलाही जागा नाहीत. इतर कैद्यांची आरडाओरड, कुलूप लावणं किंवा काढणं यासाठी किल्ल्यांचे आवाज जवळून किंवा बोळाच्या टोकातून येतात. तो शाळेसारखाच वास, फक्त इथे निर्जंतुक द्रवाचा वास जास्त उग्र आहे.

आम्हाला तुरुंगाचे कपडे घालायला दिलेले आहेत आणि आमचे स्वत:चे कपडे उशीच्या कव्हरांत घालून आमच्याकडे दिलेले आहेत. माझा भाऊ त्याच्या उशीच्या कव्हरातील वस्तू त्याच्या पलंगावर ओततो. त्यात त्याचं नसलेलं काहीतरी आहे. त्यात एक भलीमोठी जांग्यांची जोडी आहे. तो ती वर उचलतो. ती फाटलेली आहे आणि त्यावर रक्त आहे. आम्ही भयभीत होऊन एकमेकांकडे पाहतो. आम्ही तुरुंगातील धाकटदपटशाबद्दल बरंच ऐकलंय. हा असला प्रकार तर आमच्यासाठी वाट पाहत नाही ना? का ही एक तऱ्हेची पोलिसांची मस्करी आहे?

एका दिवसातच शेनचे आणि माझे वादविवाद सुरू होतात आणि आम्ही दोघंही कोठडीत आमच्याबरोबर दुसरा कोणी असावा, अशी मागणी करतो. शेन आमच्या मामेभावाबरोबर राहायला जातो आणि डॅनियल माझ्या कोठडीत येतो. तो आता उंच झालाय, तरीही निस्तेज दिसतो. त्याचं शरीर अगदी बारीक आहे आणि त्याच्या चेहऱ्याच्या बाजूला निळ्या नसा दिसतात. अजूनही त्याचे डोळे लहानपणी होते, तसे मोठे आहेत, लहान बाळासारखे आहेत, त्यामुळे तो चौदा वर्षांचा वाटतो. सबंध उन्हाळाभर आम्ही ड्रग्जनं भरलेलं गुन्ह्याचं जग निर्माण केलं होतं. दुसऱ्यांनी त्या जगाला भेट दिलीही असेल, पण इथे आम्ही एकत्र राहिलो होतो, त्यामुळे डॅन माझ्यासारखा सूर्यास्ताचं कौतुक करत नसला म्हणून काय बिघडलं?

आम्ही मित्रांपेक्षा जास्त जवळचे आहोत. आम्ही भाऊ आहोत.

चोवीस तासांपैकी एक तास बाहेर उंच भिंतीनं वेढलेल्या एका अंगणात आम्ही गोलगोल चालू शकतो. एक दिवस चेहऱ्यावर व्रण असलेला एक मुलगा आमच्याबरोबर चालत असतो आणि ही आमची पहिली वेळ आहे, हे कळल्यावर आम्हाला काही उपदेश करतो. तो सांगतो, की तंबाखू हे येथील चलनाचं नाणं आहे. जर तुम्हाला लोकांवर वर्चस्व गाजवायचं असलं, तर तुम्ही तुमचा तो चुत्या तंबाखूचा भत्ता ओढून संपवू नका. फक्त अर्धाच ओढा आणि आठवड्याच्या शेवटी जेव्हा तुरुंगातील इतर कैदी सिगरेटच्या झुरक्यासाठी हवालदिल झालेले असतील आणि तुमच्याकडे त्या भडव्यांना द्यायला पाव औंस असेल, तर जेवढी देता तुम्ही तंबाखू, त्याच्या दुप्पट तुम्हाला परत मिळेल. बघा, दुप्पट.

हा व्याजाचा अगदी भयानक दर आहे. आम्ही लघवीचं भांडं असलेल्या आमच्या रिकाम्या कोठडीत रिकाम्या वेळासाठी परत येतो, ते या विचाराचं खाद्य घेऊनच. आम्हाला पटतं, की जर तंबाखू हा येथील पैसा असला, तर ही येथील वर्चस्वासाठी असलेली किल्ली आहे.

प्रत्येक दिवशी आम्हाला लायब्ररीतून एक पुस्तक निवडता येतं आणि मी ऑर्वेलनं लिहिलेलं सर्व काही वाचतो. जरी ते निबंध कंटाळवाणे आहेत तरीही. जर शक्य झालं असतं, तर जॅमच्या बाटलीवर मागे लिहिलेलंही मी वाचेन, त्यामुळे माझं मन या कोठडीतून काही काळ बाहेर जाईल. लायब्ररी प्रत्येक कैद्याला एक खूणपट्टी देते, त्यावर भिंतीवर चढणाऱ्या माणसाचं चित्र आहे आणि त्यावर शब्द आहेत 'पुस्तकांच्या मदतीनं निसटा.'

मी तयारी करतो. ही तयारी म्हणजे तू तुरुंगात आहेस आणि इथून लवकर सुटणार नाहीस, ही जाणीव. मी माझं आयुष्य या छोट्या भिंतीभोवती आणि दुसऱ्यांनी केलेल्या नियमांनुसार जगतोय. मी काही तसा स्थिरस्थावर होत नाही, कारण मला माहीत आहे, की मी इथेच राहणार आहे.

एका पंधरवड्यात आम्हाला पुकल चर्चला नेण्यात येतं. इथे सर्व देशांतील कैदी एकत्र येतात आणि मुक्कामाच्या तुरुंगाप्रमाणे त्यांची गटागटानं वर्गवारी केली जाते. मला हे माहीत नव्हतं, ही सर्व ब्रिटनभर गुपचूप आणि न दिसणारी अशी सर्व वेळ माणूसरूपी माल हलवण्याची यंत्रणा आहे आणि हा त्याचा भाग आहे.

डॅनियल, मी आणि शेन डोरसेट येथील पोर्टलँड तुरुंगात जात आहोत.

"पोर्टलँड!" इतर कैदी म्हणतात.

"पोर्टलँडमध्ये काय वाईट आहे?" आम्ही विचारतो. ते खांदे उडवितात.

सरतेशेवटी एक म्हणतो, "त्या जागेला एक खास वैशिष्ट्य आहे बघा."

आम्हाला एवढंच माहीत आहे, की तो व्यवस्थित आणि शिस्तबद्ध तुरुंग

आहे. याचा अर्थ हा तुरुंग, ज्यांची शिक्षेची मुदत ठरलेली नाही, अशा तरुण मुलांसाठी आहे. आम्हाला तो फार फार दूर असल्यासारखा वाटतो. जेव्हा बस दक्षिणेच्या किनाऱ्याजवळ येते, तेव्हा संध्याकाळ झालेली असते. सूर्य पश्चिमेकडे बुडतोय आणि पाण्यावर त्याचा लाल प्रकाश पडलाय. सुंदर सूर्यास्तांपैकी आणखी एक; परंतु डॅनियल किंवा दुसऱ्या कोणाजवळ हे सांगण्याइतका मी मूर्ख नाही. तो समुद्रकिनारा हा दगडांच्या राशींचा आहे आणि दूरवर पसरलाय आणि ती बस सरळ त्या तिकडे वळली. दगड चुरडल्याचा आवाज येईल, म्हणून मी वाट पाहतो; पण मग माझ्या लक्षात येतं, की आम्ही मधल्या रस्त्यावरून जातोय. आमच्या दोन्ही बाजूला सूर्यास्तामुळे लाल झालेलं पाणी आहे.

पोर्टलँड हे एखाद्या बेटासारखं दिसतं. ते आमच्यासमोर अस्पष्ट दिसतं. त्यावर करड्या रंगाचं धुकं आहे. ज्या ठिकाणी ते समुद्राला मिळतंय, तिथे ओस पडलेले उद्योग आहेत. आरमाराच्या इमारती, गॅसच्या टाक्या, मोठ्या वखारी आणि अनेक मोठ्या करड्या चौकोनी जागा, या बहुतेक कैद्यांच्या जागा आहेत; परंतु बस इथे थांबत नाही. ती एक उंच टेकडी चढते. करड्या रंगांच्या उदास दिसणाऱ्या घरांच्या मधून वाट काढत असताना तिचं इंजिन खालच्या गिअरमध्ये रोरावत असतं. मग आम्ही त्या टेकडीच्या माथ्यावर जातो आणि मागे वळून पाहतो. आमच्या लक्षात येतं, की आमच्याभोवती समुद्रानं वेढलेलं आहे. खूप खाली पेन्सिलीसारखी दिसणारी किनारपट्टी आहे, ती पोर्टलँडला मुख्य भूखंडाशी जोडते.

अचानक बस एका उंच कड्याच्या तोंडाजवळ थांबते. जेव्हा आमच्या लक्षात येतं, की आम्ही शिखरावर आहोत आणि तो कडा खाली आहे, तेव्हा प्रत्येक जण एक खोल श्वास घेतो. पुढच्या बाजूला मोठ्या मोठ्या भिंती आहेत. करड्या भव्य पांढऱ्या भिंती.

त्या भिंतीतील एक मोठं कवाड उघडतं आणि बस आत जाते. मला खचल्यासारखं वाटतं. आमच्यामागे कवाडं बंद होतात. आम्ही गडद सावल्या असलेल्या दमट हवेत बसमधून बाहेर येतो. धुकं अगदी तळमजल्यापर्यंत पसरलेलं असतं.

माझे पाय त्या अनंत अशा जागेच्या जमिनीवर लागतात, तोच एक आवाज ओरडतो. "ए चुत्या, ओळीत उभा राहा."

याचा अर्थ आम्ही बोरस्टालमध्ये आलोय. एक मोठा रागीट दिसणारा पोलीस आमच्या वेड्यावाकड्या ओळीकडे पाहतो आणि ओरडतो. "या इथे येण्याआधी जे काही तुम्हाला माहीत आहे, तुम्ही चुत्यांनो ते विसरा."

आम्हाला गणवेश दिले जातात. लाल केकच्या रंगाचे टाय, निळ्या रंगाचे शर्ट, डेनिमच्या जीन्स आणि गोल गळ्याची डेनिमची जाकिट्स. मग आम्हाला

आमच्या कोठडीत पाठवलं जातं. पोर्टलँड हे तसं पाहिलं तर बेट नाही; पण जेव्हा मी माझ्या हार्डी ब्लॉकमध्ये समुद्राचं दृश्य पाहत एकटाच कोठडीत असतो, तेव्हा ते बेट असल्यासारखं भासतं. मी माझ्या छोट्या गजांच्या खिडकीतून ते रागीट, कधी शांत तर कधी भीती दाखवणाऱ्या दृश्यांचं बदलतं रूप पाहतो. तर हा खराच तुरुंग आहे. ग्लोसेस्टर तशी एकतऱ्हेची मनमिळावू जागा होती आणि तेथील शिपाई हे तसे ढिले ढिले असायचे. एकटा, भविष्याची काही खात्री नसलेला असा मी अगदी एकटा त्या छोट्या खोलीत आहे. काळाच्या सुरुवातीपासूनच हे असंच कैद्यांच्या वाटणीला आलेलं आहे.

ग्लोसेस्टरमध्ये डॅनियल आणि मी जेव्हा शक्य होतं, तेव्हा इतर कैद्यांना प्रश्न विचारले होते आणि त्या वेळी आमच्या लक्षात आलं होतं, की तुरुंग ही एक प्रणाली आहे आणि ती आपल्या फायद्यानुसार आपण चालवायला शिकलं पाहिजे. त्या इतर दुर्बल, धाकात असलेल्या व्यक्तींत न राहता आपण वर उंच उठलं पाहिजे. आम्हाला समजलं आहे, की इथे एका पातळीवर अनेक नियम आणि कायदे आहेत ते तुम्ही तोडलेत, तर तुम्हाला 'ब्लॉक' या जागी पाठवलं जातं आणि अगदी निर्दयातील निर्दय मुलाला त्याची भीती वाटते. रोजच्या पातळीवर पाहता तिथे रोजच्या जीवनासाठी नियम नाहीत. ते एक जंगल आहे.

डॅनियल आणि मला दोन गोष्टी हव्या आहेत, एकत्र असणं आणि स्वयंपाकघरात काम करणं. स्वयंपाकघराची बाजू ही सर्वांत उत्तम जागा आहे. त्यात आठवड्याला ५.६०पौंड म्हणजे सर्वांत उत्तम भत्ता मिळवून देणारी ही जागा आहे, हे आम्हाला कळायला फारसा वेळ लागला नाही.

आम्ही शिपायांना सांगतो, की आम्ही दोघं दूरचे भाऊ आहोत आणि डॅनियलला वाचायला येत नाही, त्यामुळे त्याची व्यक्तिगत पत्रं वाचायला त्याला माझी जरुरी लागेल आणि मी आचारी असल्याचं सांगतो. आमची युक्ती सफल होते. आम्ही दोघंही समुद्रापासून दूर असलेल्या स्वयंपाकघराच्या बाजूला जाणार आहोत. शेनला कामकाजाच्या बाजूला टाकलंय. आम्ही परेडवर आहोत. जेव्हा आम्ही चालत जातो आणि रांगेत उभे राहतो त्यालाच परेड म्हणतात. ते शेनचं नाव घेतात आणि त्याला दूर घेऊन जातात. मी रांगेत उभा राहिलेला असताना त्याला पाहतो. त्याचे कान अजूनही बाहेर आहेत आणि जरी तो वयानं वाढलेला असला, तरीही अजूनही तो उंच मानेचा, प्रेम न केला गेलेला असा छोटा मुलगा वाटतो. मला आठवतं, की डॅडींनी त्याला शाळेच्या फुटबॉल मॅचमध्ये बघावं, यासाठी तो त्यांच्या विनवण्या करायचा. आमचे डॅडी कधीच यायचे नाहीत. मला वाटतं, की शेननं मागे वळून आता माझ्याकडे बघावं; परंतु तो पाहत नाही. मला पुन्हा ती वेदना जाणवते. अगदी अतीव दुःखाची वेदना, जी फक्त शेनसाठीच आहे. मी तो अंगणातून जाताना

पाहतो. सरतेशेवटी त्याची डेनिम घातलेली आकृती इतरांपासून वेगळी दिसत नाहीशी होते. आमच्या स्वयंपाकघरातील कामाच्या पहिल्या दिवशी समजतं, की डॅन हा साफसफाई करील आणि मी नाश्ता तयार करीन.

ही स्वयंपाकघरं खूप मोठी आणि चकचकीत आहेत आणि त्यांच्या मध्यभागी एक लाकडी टेबल आहे. काचेच्या केबिनमधून एक शिपाई आमच्यावर लक्ष ठेवून आहे. मला स्थिरस्थावर होण्यासाठी काही अवधी दिला जातो आणि जेव्हा मध्यंतर होतं, तेव्हा मुलं हत्यारं खाली ठेवतात आणि सांगतात, "आता सुरुवात."

कांगारू कोर्टची वेळ झालीय. मला कशातरी तऱ्हेनं आणि माझ्या मुठींचा उपयोग करून स्वत:ला सिद्ध करायला हवं. ते ऑफिसकडे नजर टाकतात. तिथे शिपाई त्या काचेच्या भिंतीपलीकडे काम करत आहे. संडासांची रांग तो बघू शकत नाही; पण आम्ही सर्व तिथे एकमेकांना पाहतो, कारण तेथील त्या छोट्या खोल्यांना दरवाजे नाहीत. तो शिपाई ज्या तऱ्हेनं आपल्या कामावर अगदी एकाग्रतेनं वाकलाय, त्यावरून माझी खात्री होते, की पुढे काय घडणार, हे त्याला माहीत आहे.

ती मुलं मला निवड करायला सांगतात. मी माझ्या आकाराच्या आणि माझ्या वजनाच्या एखाद्या मुलाला निवडायचं आणि आमच्यापैकी एक रक्तबंबाळ होईपर्यंत मारामारी करायची.

मी एका वेल्स मुलाची निवड करतो. तो माझ्याहून थोडा मोठा आहे. त्याच्या दंडावर आणि चेहऱ्यावर गोंदवलेलं आहे. ती मुलं मला ओव्हनसाठी वापरतात, ते पातळ हातमोजे बॉक्सिंगसाठी म्हणून देतात. लहानपणी मी गिरवलेले बॉक्सिंगचे धडे मला आठवतात आणि पुन्हा एकदा मी शाळेतील त्या मनोविकारतज्ज्ञाचे आभार मानतो.

आम्ही त्या शिपायाच्या दृष्टिआड होऊन संडासांच्या कोपऱ्यात जातो. तिथे मुतारीचा वास आहे. जमिनीवर थुंकी आणि रक्त आहे. आम्ही एकमेकांसमोर बेकरच्या पांढऱ्या कपड्यात हातात मोजे घालून उभे ठाकतो. मी घाबरलोय. एक प्रस्ताव हळू आवाजात मी त्याच्या पुढे ठेवतो. "हे बघ मित्रा, आपण जराशीच मारामारी केल्यासारखं करू या. जर तू मला दुखापत केली नाहीस, तर मी तुला इजा करणार नाही."

पण तो वेल्स मुलगा खोटं खोटं मारल्याचं नाटक करत नाही आणि माझं बोलणं संपतंय न संपतंय तोच तो मला माझ्या तोंडावर एक जोराचा गुद्दा मारतो. आता मी रागावलोय, रागानं जळफळतोय. मग मीही मारामारी करतो. मीही त्वेषानं आणि भीती बाजूला सारून मारामारी करतो. माझ्या मनात इतका संताप धुमसत असेल, हे मला माहीत नव्हतं. त्या ओव्हनच्या हातमोज्यांतून मारलेले गुद्दे मला जाणवतात, त्याच्या चेहऱ्यावरील कातडी आणि हाडं माझ्या मुठीखाली मला जाणवतात. त्याच्या डोळ्यांत असलेली ती थिजलेली भीती मी ओळखतो. जेव्हा मी हात मागे

घेतो, तेव्हा माझ्या हातातील स्नायू हजारो रबरबँडसारखे आकुंचन पावतात आणि प्रत्येक गुद्द्याबरोबर ते पोलादी होतात.

"जॉन-सन," ती मुलं ओरडतात. तुरुंगामध्ये पहिली नावं नाहीत आणि हळूहळू ती ओरड, "जॉन-ओ जॉन-ओ" अशी होते आणि त्यांच्या त्या स्वरांच्या लयीत त्या वेल्स मुलाचा चेहरा मी बुकलतो. त्याचं शरीर माझ्या खाली कोसळून पडतं. मी त्याच्यावर उडी मारतो आणि त्याला मारतच राहतो. एक राक्षस माझ्या खोल मनातून उडी मारून बाहेर पडलाय. एक शुद्ध, पांढरा उष्ण रागाचा राक्षस.

माझा द्वेष त्याच्यातून पुरेसं रक्त बाहेर येईपर्यंत टिकतो. त्याच्या त्या बेकरच्या मोज्यांवर त्याचं रक्त आणि संडासाजवळील मूत लागलंय. मी जिंकलोय. मी वर पाहतो. ती मुलं जल्लोष करतच असतात. तो शिपाई बहिरा झाल्यासारखं दाखवतो. मी मागे होतो. खरं सांगायचं, तर मी आश्चर्यचकित झालोय. तो रागीट जॉन-ओ कुठून आला आणि आता तो कुठे गेला? मला आता जराही राग नाही. मी माझ्या बळीला हात देऊन उभा करतो.

त्या सबंध उरलेल्या दिवसभर प्रत्येक जण हळू आवाजात "जॉन-ओ जॉन ओ"चा मंत्र म्हणत असतो. तर मी माझी दीक्षा उत्तीर्ण झालोय आणि मी त्या मुलांपैकी एक आहे. हे एका तऱ्हेचं पुन्हा आश्वासन देणारं कवच आहे. मी फक्त सतरा वर्षांचा आहे आणि बोरस्टालमध्ये एकवीस वर्षांपर्यंतची मुलं घेतात. त्यातील बहुतेक मुलं दाणगट आणि माझ्यासारखी खडतर जागेतून आलेली आहेत; पण त्यातील काही फारच धोकादायक आहेत आणि ती कोण, हे एका दृष्टिक्षेपात तुम्ही सांगू शकता. तिथे सैन्यातून आलेला एक धिप्पाड माथेफिरू आहे. त्याला त्याच्या एकविसाव्या वाढदिवसाच्या जरा आधी शिक्षा झालीय आणि तो बावीस वर्षांचा झालाय, तरी अजून इथेच आहे. तो भयानक कणखर आहे आणि तो दुर्बल असलेल्यांशी किंवा त्याला जो आव्हान देईल, त्याच्याशी मारामारी करील. मी त्याच्या मार्गात येणार नाही.

पहिल्या आठवड्यात, डॅन आणि मला आठवतंय, की इथे तंबाखू हा पैसा आहे. आम्ही आम्हाला दिलेल्या तंबाखूचा अर्धा भत्ता वापरतो आणि बाकीचा उधारीनं देतो आणि काही थोड्या अवधीतच त्या जागेतील सर्व मुलं आमच्या ऋणाखाली येतात. ती ऋणात इतकी बुडली आहेत, की ती आमची परतफेड करू शकणार नाहीत. ती आता आमच्या अगदी खिशात आहेत. काही काळानंतर आमच्याकडे इतकी तंबाखू येते, की ती आम्ही सर्व ओढू शकत नाही. मग आम्ही मुलांना त्याऐवजी बिस्किटं, स्क्वॅश किंवा शांपू द्यायला सांगतो आणि ते टिमोटी आहे, याची खात्री करून घेतो. ही आमची ताकद आहे.

जेव्हा डॅनियलची ममा इथे येते, तेव्हा ती शिपायांना सांगते, की ती आम्हा

दोघांसाठी आलीय. त्या भेटायच्या खोलीत टेबलांची रांग आहे; परंतु कोणतंही टेबल ती आणि तिच्या मुलात आडवं येऊ शकत नाही. ती स्वत:ला त्यावरून पलीकडे घेते. आम्ही या बराच काळ त्रास सोसणाऱ्या काहीशा धसमुसळ्या प्रेमळ बाईला पाहून खुष होतो. आपल्या सुरकुत्यांवरून अश्रू पुसत ती आपल्या तोंडातून एक लहानशी भेटवस्तू काढते. डॅन याआधीच आपली पँट सोडून तयार आहे. तो ती वस्तू घेतो आणि घाईनं ती त्याच्याकडे असलेल्या एकमेव लपविण्याच्या जागेत, आपल्या गुदद्वारात कोंबतो. त्यासाठी ही जागा बेबी लोशन लावून त्यानं आधीच तयार ठेवलेली असते. आम्ही ती उरलेली भेटीची वेळ एक प्रकारच्या आशेखाली आणि विभ्रमावस्थेत काढतो.

डॅनची ममा हळू आवाजात सांगते, "मी या जागेत पुन्हा कधीही चोरून हॅश आणणार नाही, कधीही."

कुटुंबातील पुरुषांनी ते तिला आणायला भाग पाडलं. ती करूनसवरून भागलेली माणसं आहेत. त्यांना सर्व माहीत आहे.

"मी पंधरवड्यात परत येईन." डॅनची ममा आम्हाला सांगते, "आणि मी त्यासारखी कोणतीही गोष्ट पुन्हा इथे आणणार नाही."

परंतु आम्हाला माहीत आहे, की ती आणेल. तिचा चेहरा काहीसा उग्र आणि तिचे केस बाटलीसारख्या रंगाचे इतरांना वाटत असतील; परंतु आम्हाला ती राजकन्येसारखी वाटते. जेव्हा आम्ही ते सुरक्षितपणे आमच्या कोठडीत नेतो, तेव्हा आम्ही अगदी खुष असतो. आम्ही ते सर्व आमच्यासाठी ठेवतो आणि नंतर जेव्हा शिपाई आम्हाला रात्रीसाठी बंद करतील, तेव्हा मी सिगरेटचा झुरका ओढून आरामात असेन आणि मला खात्री आहे, की मी झोपेन.

त्या वेळेनंतर डॅनची ममा आम्हाला व्यवस्थित पुरवठा करते. जेव्हा प्रेमळ व्हॅनिसा भेटायला येईन, असं म्हणते, त्या वेळी मी तिची मनधरणी करतो, की आमच्यासाठी थोडं हॅश आणणं, ही तशी धोकादायक गोष्ट नाही.

मला बेकिंग आवडतं आणि मी उत्तम केक बनवतो. आम्ही सकाळी साडेचार वाजता उठतो, आमच्यापैकी दहा जण. त्या भल्यामोठ्या टेबलवर आम्ही एकत्र नाश्ता करतो. आम्ही डुकराच्या मांसाची सँडविचेस खातो आणि चहा पितो. टेबलच्या मध्यभागी दुधानं भरलेली एक मोठी बादली आहे. त्यात आम्ही आमचे मग्ज बुडवू शकतो. ती गचाळ लोकांची टी-पार्टी आहे. जेव्हा माझी वेळ संपते, तेव्हा मी काही केक्स आणि कॉर्नफ्लेक्स बाहेर चोरून पाठवतो आणि ते माझ्या कोठडीत नेण्यासाठी तेथील शिपायांना पैसे देतो. मी दिवसभर झोपतो. जेव्हा जागा होतो, त्या वेळी भेटण्याची वेळ होते. भेटण्याची वेळ, म्हणजे एकमेकांत मिसळून जाण्याची. आम्ही स्नूकर हा खेळ खेळू शकतो. शेवटी मी दारू पिऊन खूप तर्र होतो; परंतु

ते नेहमी झोपायच्या आधी. मी जेव्हा झोपी जातो, त्या वेळी माझ्या दिवसाच्या हालचालीमुळे मला त्यात एक प्रकारचं सुख मिळू शकतं. जोपर्यंत तुम्ही ब्लॉकच्या बाहेर आहात, तोपर्यंत तुरुंग तसा वाईट नाही.

परंतु तरीही बाहेरच्या जगाची उणीव मला भासते, कारण मला माहीत आहे, की ते बदलतंय. मी नसताना बदलतंय. जेव्हा नवीन कैदी येतात, तेव्हा ते नवीन तऱ्हेच्या संगीताबद्दल, नव्या ड्रग्जबद्दल आणि नव्या वातावरणाबद्दल बोलत असतात. बाहेर आता एल. एस. डी. किंवा ॲसिड प्रचलित आहे. त्या संगीताला ॲसिड संगीत असं संबोधलं जातं आणि आता नवीन वातावरण आहे ते रेव्हचं. रेव्हज् म्हणजे खूप मोठ्या पार्टीज. बहुतेकदा त्या बाहेर घेतल्या जातात किंवा एअरक्रॉफ्ट हँगरसारख्या मोठ्या बंदिस्त जागेत आयोजित केल्या जातात. तिथे हजारो लोक ॲसिड घेतात आणि त्या संगीतावर नाचतात. सबंध रात्रभर जग मध्ये नाचल्याचं मला आठवतं. ती जागा काहीशी प्रत्येक जण मला रेव्हज्बद्दल सांगतायत तशी असावी असं वाटतं, फक्त काहीशी छोटीशी आणि ते संगीतही वेगळंच होतं. ॲसिडसंबंधी म्हणाल, तर तेही मी ओढलंय. ती तशी स्वारस्यपूर्ण ड्रग आहे. तिच्यामुळे सीमारेषा रुंदावतात. निरनिराळ्या रचनांना ती आव्हान देते. तुम्हाला दूरवरच्या भयानक सहलीला घेऊन जाते; परंतु अचानकपणे हजारो लोक ती एकत्र का घेतात, ते मला समजत नाही.

मुलं ज्या रेव्हज् पार्टीज् ते गेलेले असतात, त्याबद्दल बोलत राहतात आणि ते मला ॲसिड संगीताच्या टेप्स देतात. मी त्या टेप्स पुन्हा पुन्हा ऐकतो, अगदी काळजीपूर्वक ऐकतो; पण त्या मला समजत नाहीत. मला हे समजत नाही, की हे संगीत; ते ड्रग्ज आणि ती पार्टीची जागा हे सर्व एकत्रपणे कसं सामावून घेतात? तिथे काय घडतंय, हे शोधण्यासाठी तिथे जाण्याची मी वाट पाहू शकत नाही.

■

१६

एका सकाळी कोणीतरी स्वयंपाकघरातून सँडविच चोरून आणण्याचा प्रयत्न करतो. शिपायाला तो लिफ्टच्या जागेत लपविलेला आढळतो. तो चिडतो. आम्ही सर्व यात अडकतो. आम्हाला आज नाश्ता मिळू शकणार नाही, असं तो सांगतो; पण आम्हाला आमचा नाश्ता हवाय. आम्ही भुकेले आहोत.

आम्ही त्या मुत्रीजवळच्या जागेत, जिथे मी वेल्सला ओव्हनचे हातमोजे बॉक्सिगचे मोजे म्हणून घालून मारलं होतं, तिथे जातो. काही मिनिटांच्या रागाच्या वादावादीनंतर आम्ही एका गोष्टीवर सहमत होतो. आम्ही काम करायचं नाकारणार.

ते शिपाई आपल्या ऑफिसच्या काचेवर आपटून आवाज करत आम्हाला काम करायला सांगतात. आम्ही म्हणतो, "जा चुत्यांनो,"

ते मग जोरात ठोकतात. अचानक त्यांचे चेहरे बदलतात. ते जास्त लाल, रुंद आणि गडद वाटतात.

आम्ही म्हणतो, "जर आम्हाला नाश्ता मिळाला नाही, तर आम्ही काम करणार नाही."

दोन शिपाई त्यांच्या ऑफिसमधून बाहेर येतात. ते मजबूत पावलं टाकत त्या मुत्रीच्या मोकळ्या जागेकडे येतात. त्यांच्या किल्ल्या आणि साखळ्या ते चालताना आवाज करत असतात. ते दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करतात. आम्ही आमचे पाय त्यावर दाबून ठेवतो. एक अडथळा. खरं तर नाश्ता हवी असलेली आम्ही दहाच मुलं आहोत; परंतु पोर्टलँड अधिकाऱ्यांच्या दृष्टीनं पाहता आम्ही दंगेखोर आहोत.

ते शिपाई दंगा झाल्याची घंटी वाजवतात आणि अचानक त्या दरवाजाजवळ मोठ्या पावलांच्या मोठ्या बुटांचा आवाज होतो. तो दरवाजा उघडला जातो आणि अचानक ते आमच्या अंगावर येतात. बूट, शिरस्त्राण, ढाली, दंग्यासाठी खरोखरच सर्व जामानिमा केलेला.

आम्हा एकेकाला त्या मोकळ्या जागेतून तीव्र वेदना देत जोरात बाहेर खेचलं

जातं आणि जमिनीवर फेकलं जातं. जेव्हा माझी वेळ येते, माझी ढोपरं माझ्या खाली एका झटक्यात हिंसक हालचाल करून दुमडली जातात आणि एक काठी त्या पोकळीत घुसवली जाते. एक दुसरी काठी वेदना देत पाठीवरून हातांमध्ये टाकली जाते आणि मला जमिनीपासून थोड्या अंतरावर उचलून माझ्या कोठडीत आणलं जातं. मला ब्लॉककडे पाठवलं जाणार असल्याचं ते सांगतात.

मी माझं सर्व सामान कुलपात जाणाऱ्या गादीच्या कव्हरात टाकतो. मला त्या ब्लॉकमध्ये टुथपेस्ट किंवा टुथब्रशही न्यायची परवानगी नाही. दोन शिपाई माझ्यासाठी येतात. ते आम्हाला एकटं पाडून प्रत्येकाचा स्वतंत्र रीतीनं समाचार घेणार आहेत. मी एकटा आहे आणि घाबरलोय. माझ्या पुढे काय ताट वाढून ठेवलंय देवजाणे! पण मला माहीत आहे, की ते वाईट आहे.

ते मला ब्लॉकमध्ये घेऊन जातात आणि तिथे जाणं हे खंदकात जाण्यासारखं आहे, कारण हा तुरुंगाचा सर्वांत जुना भाग आहे. त्याच्या पायऱ्यांवर बरीच वर्षं घासलं गेल्यामुळे खाचा पडल्या आहेत आणि बाहेरची पाटी कोरी करकरीत आहे, कारण अनेक उद्योगी हातांनी ती पुसून टाकलीय.

त्या दरवाजातून जाण्यासाठी त्या पायरीवरून खाली जावं लाग़तं. शिपायांची रांग वाट पाहत असलेली मला दिसते.

"ये, ये हरामी मुला!" ते ओरडतात. तो दरवाजा माझ्यामागे बंद होतो आणि माझे पाय जमिनीला लागत नाहीत. ते शिपाई माझ्या अंगठ्यांनी ओढत मला नेतात. मला एका कोठडीत फेकण्यात येतं आणि मी भिंतीवर आदळतो. मी त्यावरून घरंगळत खाली येतो. उभं राहण्यासाठी ते माझ्या अंगावर ओरडतात. जेव्हा मी उभा राहतो, तेव्हा मला दिसतं, की माझ्या त्या छोट्याशा कोठडीत त्यांच्यापैकी सहा शिपाई आहेत. ते माझ्यावर हल्ला करतात. माझा शर्ट माझ्या डोक्यावरून ओढतात आणि माझी मनगटपट्टी माझ्या मनगटावर ओढतात. ते माझी पँट आणि आतली चड्डी माझ्या घोट्यापर्यंत ओढतात. मी नागडा आणि असहाय असताना ते मला मारतात. ते मारणं खरंखुरं असतं. ते आपल्या ढोपरा, कोपरांचा आणि मुठींचा वापर करतात. एकदा मी वर पाहतो आणि एक ओळखीचा शिपाई मला दिसतो. तो ख्रिश्चन आहे. तो ख्रिश्चन तत्त्वज्ञान नेहमीच सांगत असतो; परंतु आता तो छद्मीपणे हसत आहे. त्याच्या टायवरचा पवित्र छोटा क्रूस चमकत आहे. त्याला याचा आनंद होतोय. कदाचित एक आडवयाचा, नागडा, अपमानित जीव यातना भोगतोय, हे पाहताना त्याला एक प्रकारचं लैंगिक समाधान मिळत असावं. मी माझे डोळे बंद करतो, इथे काहीही घडू शकतं, कारण आता माझ्या लक्षात येतं, की मी त्या तुरुंगाच्या शिस्तबद्ध अमदानीपासून बराच दूर आहे. मी तुरुंगाच्या आत असलेल्या एका तुरुंगात आहे. काही शिपायांनी त्यांच्या स्वत:च्या अशा जागा तयार केल्या आहेत. तिथे त्यांचे

नियम चालतात. तिथे त्यांना पाहिजे ते मला करू शकतात आणि ते कुणालाही कळणार नाही. मी माझे डोळे घट्ट बंद ठेवतो. मी उंच उंच झाडांच्या फांद्यावर आहे आणि अगदी खाली सहा माणसं घाबरलेल्या एका मुलाला मारताना पाहत आहे.

ते मारणं चालूच राहतं आणि जेव्हा सरतेशेवटी ते थांबतं, तेव्हा ते मला काय करायचं, त्याच्या सूचना देतात. तिथे जमिनीवर लाद्या घातलेल्या आहेत. त्यांनी दरवाजे उघडल्याचं ऐकू येताच, मी डावीकडच्या दोन लाद्यांवर उभं राहायचं. मी अगदी दक्षपणे माझ्या हाताचे अंगठे पायांशी झुकवत जणू काही मी परेड करत असल्यागत उभं राहायचं आणि मी माझं नाव, नंबर, हाऊस गट सांगायचा.

मग ते मला नागडा टाकून निघून जातात. मी कापत असतो. तो डिसेंबरचा महिना आहे. वरची छोटी खिडकी सताड उघडी आहे. ती एका पिंजऱ्यानं झाकलेली आहे आणि मी कितीही आणि कसाही प्रयत्न केला, तरी त्या पिंजऱ्यातून हात घालून ती खिडकी बंद करणं अशक्य आहे.

त्याच्या भिंती या करड्या-पांढऱ्या रंगाच्या पोर्टलँड दगडाच्या आहेत आणि कमोड, एक जमीन पुसायची चिंधी आणि काही पुठ्ठे याशिवाय ती कोठडी रिकामी आहे. तिथे पुठ्ठे आहेत, कारण मानवी हक्कांच्या नियमानुसार प्रत्येक कोठडीत एक खुर्ची आणि टेबल असावं, असा बहुधा नियम आहे आणि तो पुठ्ठा खुर्चीच्या आणि टेबलच्या आकारात दुमडलेला आहे; परंतु तुम्ही पुठ्ठ्याच्या खुर्चीवर काही बसू शकत नाही आणि माझ्या त्या पुठ्ठ्याच्या टेबलचा मी काय उपयोग करणार आहे?

मी सिगरेट ओढू शकत नाही. मी काही करू शकत नाही आणि जेव्हा रात्रीची जेवणाची वेळ होते – ते मला माझ्या पोटामुळे कळतं. इथे जाणारा वेळ मोजण्याचा दुसरा मार्ग नाही – मी दरवाजाचा आवाज ऐकतो आणि माझ्या त्या दोन लाद्यांवर ताठ उभा राहतो.

"जॉन्सन डब्ल्यू एम १७०२ रॅले हाऊस सर!"

"जेवण," तो शिपाई ओरडतो. तो आत येतो. माझं डोकं धरतो. ते मागे ढकलतो आणि माझ्या कानशिलावर इतक्या जोरात दाबतो, की मला वाटतं, की त्याचे अंगठे माझ्या मेंदूतून बाहेर येतील. तो माझ्यापासून इंचभरच दूर उभा आहे. तरी तो ओरडतच असतो.

"तुझं जेवण घे! आत्ता!"

मी त्या कोठडीतून बाहेर जाण्याचा प्रयत्न करतो; परंतु तो मला ताबडतोब थांबवतो.

"ठीक, जेव्हा मी धाव म्हणेन, तेव्हा मला तू धावायला हवायस आणि मी धाव म्हणेन, ते मला तुझ्या चुत्या चेहऱ्यावर दिसलं पाहिजे. तू, छोटा हरामी चुत्या!"

मी पुन्हा माझ्या त्या दोन खास चौरस लाद्यांकडे जातो आणि धावण्याच्या तयारीत उभा राहतो. माझं शरीर धाव म्हणतं, माझा चेहरा धाव म्हणतो. तो ओरडतो आणि मी दरवाजाकडे धावतो; परंतु मला ताबडतोब थांबवलं जातं.

"थांब! या चुत्या कोठडीतून मी तुला धावत जायला सांगितलं नव्हतं, सांगितलं होतं? तू माझ्याकडे धावत ये. तू माझ्याकडे तडक धावत ये. जितक्या जोरात धावता येईल तेवढं चुत्या – आणि लक्षात ठेव आणि ते मला तुझ्या चुत्या चेहऱ्यावर दिसलं पाहिजे."

मी जरा घुटमळतो. हा काय प्रकारचा खेळ आहे, हे मला समजत नाही; परंतु मला सूचना मिळाल्या आहेत आणि मला पुन्हा मार खायचा नाही. मी खूप घाबरलोय. मी शून्यापासून साठच्या वेगानं त्या जागी जातो आणि त्याच्यावर कोसळतो. माझं नाक फेंदरलेलं आणि दात विचकलेले असतात. तो माझा देह पकडतो आणि यासाठी माझ्याच गतीचा फायदा उठवून तो मला कोठडी बाहेर फेकतो. मी भिंतीवर आदळून पुन्हा धावतो, आता धावतो ते वेड्यासारखं त्या प्राचीन दरवाजातून. दुसऱ्या शिपायाकडे तो पुन्हा मला फेकतो आणि मग पुढच्याकडे. या भर वेगानं धावाधावी-नंतर जेवण मिळतं. एक शिपाई ते माझ्याकडे फेकतो आणि आता ते घेऊन मला परत जायचंय. ते अन्न जिकडेतिकडे पडतं. ते अंगावर, जमिनीवर सांडतं; परंतु मी धावत राहतो. मी नागडा आहे आणि ते शिपाई मला हसत आहेत.

"त्याच्या गुप्तेंद्रियाचा आकार बघ," ते ओरडतात. "छोटंसं इंद्रिय! छोटंसं चुतं इंद्रिय."

मग माझ्या मागे ते माझ्या कोठडीचा दरवाजा बंद करतात आणि मी नागड्यानंच माझं जे काही उरलंसुरलं जेवण आहे, ते खातो.

आता बाहेर अंधार पडलाय आणि मी थंडगार पडलोय. मी प्रयत्न करतो आणि पुन्हा ती खिडकी लावण्यात अयशस्वी ठरतो. तिथे कोठडीत एक गरम पाइप आहे. तो खिडकीखाली मागच्या भिंतीवरून गेलाय. मी त्या पाइपवर माझं शरीर उबेसाठी ढकलतो, त्यामुळे माझ्या शरीराच्या कातडीचे काही इंचच एका वेळी गरम होतात; परंतु तरीही ते काहीसं बरं आहे.

ते नंतर येतात आणि पाइपमुळे उठलेले लाल पट्टे पाहतात, त्यामुळे ते मला पुन्हा मारतात. तुम्ही ऊब घ्यायची नाही, हे ठरलेलं असतं.

पुन्हा एकदा दरवाजा उघडतो आणि मी त्या लाद्यांकडे जातो. माझं नाव, नंबर म्हणतो. आता मी भीतीनं आणि थंडीनं कापत आहे. जेव्हा ते दरवाजे उघडतात, तेव्हा काय घडेल, हे तुम्ही सांगू शकत नाही; पण या वेळी एक लहानशी आकृती सावधपणे आणि हळूच आत येते. ते पाद्री आहेत.

ते माझी भीती पाहतात. त्यांनी ती याआधी प्रत्येक कोठडीत प्रत्येक रात्री

पाहिलेली आहे.

"ठीक आहे." ते म्हणतात. "मी तुला काही इजा करणार नाही."

ते माझ्या अंगावरचे वळ बघतात. त्यांच्या डोळ्यांत काळजीचे भाव असतात. या वेळेपर्यंत त्यांनी मला व्यायामशाळेत वापरतात, तशी आखूड चड्डी दिली आहे. बाकी सर्व मी उघडाच आहे. ते पाद्रीही थंडीनं कापत आहेत. मी ठीक आहे का, मला काही सांगायचंय का आणि ते माझ्यासाठी काही करू शकतील का, असं ते मला विचारतात. पाहिजे तर त्यांची माझ्याबरोबर प्रार्थना करण्याची तयारी असते. मी नकार देतो. त्यांचे आभार मानतो. ते जातात, तरीही ते काळजीत असतात.

ते शिपाई आतमध्ये एक ब्लँकेट आणि गादी टाकतात. ती गादी दोन इंचच जाड आहे. मी ती जमिनीवर पसरतो आणि त्या ब्लँकेटखाली काकडतो. माझ्या वळांवर चोळत राहतो. आता तिथे निरव शांतता आहे. तिचा भंग होतो तो कधी-मधी येणाऱ्या किंकाळ्यांनी. त्या बोळाच्या पुढच्या टोकाला कोणालातरी चोप मिळत आहे. नंतर दूरवरून मला एखाद्या श्वापदाचा किंवा एखाद्या लहान मुलाच्या कण्हण्याचा आवाज ऐकू येतो; परंतु मी रडत नाही. मला माहीत आहे, की लवकरच ख्रिसमस येईल आणि त्याचा अर्थ माझा अठरावा वाढदिवस होईल.

सकाळी सांडपाणी पुसण्याचा कार्यक्रम असतो. हा कार्यक्रम घाणेरडा आहे, कारण मला जो कपडा टॉयलेट पेपर म्हणून दिलाय, तो मला धुवायचा आहे.

"ए चुत्या, गादी आवर!" एक शिपाई ओरडतो. मला सर्वांची घडी घालावी लागते, माझ्या कपड्यांचीही आणि हे सर्व चौकोनी आकारात आणि त्याच्या कडा अगदी व्यवस्थित हव्यात.

"पुस्तकं!" तो शिपाई ओरडतो आणि मला त्या बोळाच्या शेवटाकडे धावत जाऊन पुस्तकांचं कपाट उघडून त्या पुस्तकाचं नाव पाहण्यात वेळ न घालवता एक पुस्तक घेऊन परत धावावं लागतं.

ती पुस्तकं या सर्व कादंबऱ्या आहेत आणि मी शपथपूर्वक सांगतो, की त्यातील एकही न वगळता सर्वांची दहा पानं कापून काढलेली आहेत. हरामी साले!

प्रत्येक वेळी मी बोळातून वेगानं धावत जातो. मला एक लहानसा क्षण त्याची स्वच्छता वाखाणण्यासाठी मिळतो. मला फक्त वर बघितलं, की दिसतं, की छतावरचे ते तांब्याचे पाइप्सही चकचकत आहेत. मला जरा हे समजायला वेळ लागतो, की गुपचूप आणि व्यग्रपणे माझ्या कोठडीबाहेर एक गट घासत आणि पुसत असतो. त्यांना नॉन्स म्हणतात. ते लैंगिक गुन्हेगार आहेत. त्यांच्या संरक्षणासाठी त्यांना ब्लॉकमध्ये ठेवलेलं आहे; परंतु त्या तिथे त्यांना मोकळीक दिलेली आहे. त्यांना ती जागा चकचकीत स्वच्छ ठेवायला आवडते.

या धावायच्या किंवा क्षणिक मध्यंतरानंतर मला माझ्या कोठडीत एकटं

कपड्यां-शिवाय ठेवलं जातं. काही दिवसांनंतर मी सकाळी आणलेलं पुस्तकही वाचू शकत नाही. मन कुठेही एकाग्र करू शकत नाही. मी त्या भिंतीवरचे दगड पुन्हा पुन्हा मोजतो. (प्रत्येक बाजूला एकशे बेचाळीस) मी कोठडीत गोल धावत मला येणारं प्रत्येक गाणं म्हणतो आणि काही स्वत: रचतो. मी ओरडतो, नाचतो, गातो, उड्या मारतो. ब्रेक डान्स करतो. शरीर उडवतो. यंत्रमानवासारख्या हालचाली करतो. मी आणखी थोडा वेळ गातो. मग माझं मन थंडावतं आणि मी शरीर गरम राहावं म्हणून गुपचूप उड्या मारतो. कोठडीतील ती खिडकी बंद करण्याचा मी प्रयत्न करतच असतो; परंतु मला यश येत नाही.

एक दिवस ते मला पत्र लिहिण्याची परवानगी देतात. मला नेहमी व्हॅनिसाकडून बरीच पत्रं येतात आणि मी तिला पत्र लिहिण्याचा प्रयत्न करतो. अशी पत्रं नव्हेत ज्यात मी माझं प्रेम व्यक्त करतोय आणि तिला वाट बघायला सांगतोय. (अशा या गोष्टीत मी तसा निर्दयच आहे.) परंतु व्हॅनिसा ही त्या काही लोकांपैकी आहे, ज्यांना दुसरा मार्क माहीत आहे आणि जेव्हा मी लिहितो, तेव्हा तिला असं दाखविण्याचा प्रयत्न करतो, की एखाद्या मारेकऱ्यापेक्षा मी वेगळा आहे. मला कसं बदलायचंय, तेही मी सांगतो आणि तिला ते समजतं असं दिसतं. आज मी तिला अगदी उघडपणे आणि जेवढ्या प्रामाणिकपणे शक्य आहे, तेवढं लिहितो. मी क्रिस्तीलाही, माझ्या आर्ट्स कॉलेजमध्ये ओळख झालेल्या मुलीलाही लिहितो. आमचं नातं हे फार काळाचं नव्हतं; परंतु या कोठडीत मला संवाद साधण्याची गरज आहे. क्रिस्ती ही नुसती हेअर ड्रेसरच नाही, तर ती केशरचनेबाबत सल्लाही देते. ती लाल लिपस्टिक वापरते आणि आखूड कपडे वापरते. ती वुल्व्हर हॅम्टन येथे आपल्या श्रीमंत आई-वडिलांबरोबर राहते. मी क्रिस्तीलाही मरेपर्यंत प्रेमाची ग्वाही देत नाही; परंतु बाहेर पडल्यावर तिला भेटायची इच्छा मी व्यक्त करतो.

अर्थात, ते शिपाई माझी ही पत्रं वाचतात आणि ते एक गंमत करतात. ते व्हॅनिसाचं पत्र क्रिस्तीच्या पाकिटात टाकतात आणि क्रिस्तीचं पत्र व्हॅनिसाच्या. काय घडलं, ते मला कळतं, कारण मला आलेली प्रिय जॉन, अशी पत्रं. एक काहीसा आनंदी आणि हसरा शिपाई ती घेऊन येतो. मी रडण्याच्या बेतात येतो. आता मी खरंच एकटा असा या थंड उघड्या खोलीत आहे. मी व्हॅनिसाला गमावलंय.

माझी ममा बेथनीबरोबर भेटायला येते. मी घर सोडल्यापासून त्यांना क्वचितच पाहिलंय; परंतु मी ब्लॉकमध्ये असल्यामुळे आम्हाला एकूण पंधरा मिनिटांपेक्षा जास्त वेळ दिला जात नाही. ममा आणि बेथनीला एक हजार मैलांचा वळसा घालून लेक्सपासून पोर्टलँडपर्यंत ट्रिप करावी लागते आणि त्यांना माझ्याबरोबर फक्त पंधरा मिनिटं दिली जातात. जेव्हा मला आत नेलं जातं, तेव्हा शेन या आधीच त्यांच्याबरोबर बसलेला असतो. ममा आणि बेथनी माझ्या अंगावरचे वळ, ओरखडे

आणि माझा काळा पडलेला डोळा याकडे बघतच राहतात. त्या रडू लागतात. मी त्या ब्लॉकबद्दल त्यांना स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करतो. शेनला त्याबद्दल माहिती आहे, अर्थात तरीही त्याला ऐकून धक्काच बसतो.

ममा रडत असताना सांगते, की ती याबद्दल पंतप्रधान मार्गरिट थॅचरना पत्र लिहिणार आहे. तिनं असं करू नये असं मी तिला सांगतो, त्यामुळे माझी अवस्था आणखीनच बिघडण्याची शक्यता असते.

केलीनं आपल्या मित्राला सोडलंय आणि ती लेक्समध्ये राहायला आलीय, हे सांगण्यापुरता तिला वेळ मिळतो. ममा आणि डॅडी आता कायदेशीररीत्या विभक्त झाले आहेत. याआधी जणू काही हजार वर्षांपूर्वी जेव्हा मी कॉलेजला होतो, त्या वेळीच मला कळलं होतं, की त्यांनी एकमेकांना त्रास द्यायचा नाही असं ठरवलंय. डॅडींना एक मैत्रीण आहे आणि ती गरोदर आहे, हे कळल्यावर ममानं डॅडींना घराबाहेर काढलं म्हणून नव्हे; परंतु त्यांनी केलीला ममाला निरोप द्यायला सांगितला, की ते घरी परत येणार नाहीत. आता ते डरहॅममध्ये आपल्या नव्या मैत्रिणीबरोबर आहेत. ममा सांगते, की ते फार्महाऊस विकलं गेलंय. ती आणि बेथनी केंडॉलमध्ये राहतात. माझी एकांतवासात परतण्याची वेळ होते. जेव्हा शिपाई मला बाहेर घेऊन जातो, तेव्हा मी त्यांच्याकडे पाहत नाही.

माझ्या ब्लॉकमधील दहा दिवसांच्या वास्तव्यात मला दहा मिनिटं त्या छोट्या व्यायामाच्या मैदानात दिली जातात. पाऊस पडत आहे. मला आत बंदिस्त केलं जातं. तेथील शांतता अमर्याद आहे. येणारा कंटाळा, नैराश्य, दु:ख आणि भीती, हेही अमर्याद आहे.

माझा सर्वांत आनंदाचा क्षण असतो, जेव्हा शिपाई मोड आलेलं कडधान्य सोलायला घेऊन येतो तो. याचा अर्थ ख्रिसमस आलाय, मी कृतज्ञ आहे, की त्यानं मला काहीतरी काम करायला दिलंय आणि म्हणून तो दयाळू आहे असं वाटतं; परंतु बहुतेक सर्व शिपाई हे क्रूर, दुसऱ्यांच्या वेदनांनी आनंदित होणारे आणि ते काय करतील ते सांगता येणार नाही, असे असतात. ते सतत हिंसेची भीती दाखवून दबदबा निर्माण करतात. हे सर्व नित्याचं वाटतं.

जेव्हा सरतेशेवटी मला माझ्या जुन्या ब्लॉकमध्ये जाण्याची परवानगी मिळते, तेव्हा माझ्या लक्षात येतं, की डॅनियलनं अशा काही गोष्टी फिरवल्यात, की मी त्याच्या शेजारच्या कोठडीत आहे. ती नवी कोठडी वेगळी आणि अयोग्य वाटते. सुरुवातीला मला ठीक वाटत नाही. मी काहीसा विभ्रमावस्थेत आहे. तुरुंगात कोणताही बदल जीवघेणा ठरतो, अगदी चांगल्या कोठडीत जाणंही, कारण त्यामुळे आपलं डोकं जागेवर ठेवणारा कार्यक्रम बदलतो. मग तुमच्या लक्षात येतं, की तुमचा तुमच्यावर ताबा नाही. कुणीतरी दुसऱ्यानं या कोठडीत भिंतीवर त्यांची

चित्रं टूथपेस्टनं काढून ठेवली आहेत आणि त्यामुळे त्यांचं अस्तित्व तुम्हाला जाणवतं. त्या चित्रांबरोबर राहण्याची तुम्हाला सवय करावी लागते.

जेव्हा एक शिपाई माझ्या वस्तू असलेली गादीची खोळ घेऊन येतो, तेव्हा मला काहीसं रुळल्यासारखं वाटतं. मी माझा छोटा रेडिओ काढतो. तो लावतो आणि पलंगावर पडतो. त्यांनी सीनेड ओ कॉनरचं नथींग कंपेअर्स टू यू गाणं लावलंय. मी डोळे बंद करतो आणि आरामात पडतो. मला असं वाटतं, की जणू काही मला आता तुरुंगातून बाहेर सोडलंय.

■

१७

मी निराळा होणार आहे. बदलणार आहे. मी वेमाऊथच्या बसमध्ये आहे. तिथून कैद्यांना मोकळं सोडलं जातं. मी निराळा होणार आहे. बदलणार आहे. आम्ही त्या बीच रोडवरून जातो आणि मी अविश्वासानं क्षितिजाकडे पाहतो. पृथ्वी ग्रह यापूर्वी एवढा मोठा होता? त्याचे रंग एवढे चकचकीत होते? त्या समुद्राची भव्यदिव्यता, माझं जग गेले आठ महिने किती छोटं होतं, त्याची आठवण करून देते. मी एक दीर्घ श्वास घेतो आणि स्वातंत्र्याचा वास घेतो.

त्या मिनी बसमध्ये आम्ही सहा जण आहोत आणि आम्हा प्रत्येकाच्या खिशात तपकिरी रंगाचं आत तीस पौंड असलेलं पाकीट आहे. मी भयानक दिसतो, कारण मला शिक्षा झाली, तेव्हा मी वापरत असलेले कपडे माझ्या अंगावर आहेत. तो फाटलेला मेंढ्यांच्या कातडीचा कोट आणि ट्रॅकसूटची पँट. आम्हाला वेमाऊथच्या रेल्वे स्थानकावर सोडलं जातं. मला अगदी काही ओझं नसल्यासारखं वाटतं. गेले आठ महिने मी जड ओझं वागवत आलो होतो आणि आता ते ओझंच नाहीये. आमच्यापैकी बरेच जण ताबडतोब त्या कारपार्कच्या पलीकडे असलेल्या, सोयिस्कर-रीत्या ठेवलेल्या, लायसन्सची गरज नसलेल्या दुकानाकडे वळतात. मी खास दारू घेतो. डोळे बंद करतो आणि ते थंडथंड पेय माझ्या घशातून खाली उतरण्याचा अनुभव घेतो. ते इतकं चांगलं यापूर्वी कधीच लागलं नव्हतं. हे म्हणजे तुमच्या जुन्या मित्राला, तुमच्या दुरावलेल्या प्रेमिकेला भेटल्यासारखं, तुमचे आरामदायी कपडे पुन्हा घातल्यासारखं किंवा तुमच्या आवडत्या जागेत पुन्हा गेल्यासारखं होतं. माझा देह सुखावतो. मला एक ओळखीचा, स्वागतार्ह फेसाळपणा माझ्या देहात आणि माझ्या डोक्यात पसरल्या-सारखा वाटतो आणि मी बर्मिंगहॅमची ट्रेन पकडतो.

जेव्हा मी सुटेन, तेव्हा कुठे जायचं, हे ठरविण्यासाठी मला पुष्कळ वेळ होता. डॅन हा याआधीच किडरमिन्स्टरला गेलाय, कारण स्वयंपाकघरातील दंगलीनंतर माझी शिक्षा वाढवण्यात आली होती. जर मी तिथे गेलो, तर काय होईल, हे मला

माहीत आहे. मी जे मागे सोडलंय, त्या डोकं फिरवणाऱ्या चमत्कारिक आयुष्यात मी पुन्हा जाईन. बहुधा योग्य गोष्ट करायची, म्हणजे ममाकडे परत जायचं आणि केंडॉलमध्ये माझं बेकिंगचं कौशल्य वापरून काम मिळवायचं आणि स्थिरस्थावर होण्याचा प्रयत्न करायचा; परंतु सर्वप्रथम मी एका मुलीला भेटणार आहे. व्हॅनिसा मी किर्स्ती लिहिलेलं पत्र वाचल्यामुळे अजूनही माझ्यावर रागावलेली आहे; परंतु किर्स्तीनं मला क्षमा केलेली आहे. मी काय गमावलंय, ते दाखवण्याचं तिनं वचन दिलंय. ती मला माझं नवीन रूप, माझे केस, मी कोणते कपडे वापरावे, हे ठरविण्यासाठी मदत करणार आहे. हे १९८९ आहे. मला वाटतं, की मी आयुष्यभर तुरुंगात आहे. आम्ही भरपूर संभोग करतो; परंतु तो काही चांगला संबंध नाही. ते काहीसं चमत्कारिक आणि गैरसोयीचं होतं, कारण मला ती खरोखर आठवत नाही किंवा तिचा देहही; परंतु जेव्हा मी मऊ आच्छादनं आणि मऊ उशी असलेल्या पलंगावर पडतो, तेव्हा मला वाटतं, की माझं एकरंगी आयुष्य हे बदलून बहुरंगी झालंय.

किर्स्ती माझे केस नव्या पद्धतीनं कापते, पुढच्या बाजूला काहीशा बटा. आम्ही खरेदीला जातो आणि एक आखूड कोट आणि टोपी घेतो आणि मोठ्या पायांची पँट. मला अशा रुंद पँट्स हव्या आहेत. सरतेशेवटी माझी सामग्री मला मिळते, तेव्हा मी माझ्या पहिल्या रेव्ह पार्टीसाठी तयार होतो; परंतु आता किर्स्ती आणि मी दु:खी आहोत. आम्हा दोघांनाही समजलंय, की आमचं नातं फार पूर्वीच संपलंय आणि आम्ही हे का करतोय, ते आम्हाला कळत नाही. मी केंडॉलला जायला निघतो.

ममा आणि बेथनी एका छोट्या दगडांची फरसबंदी असलेल्या शांबल्स या गल्लीतील एका घरात राहतात. मला पाहून त्यांना आनंद होतो. बेथनी बारा वर्षांची आहे; परंतु अजूनही ती लहान मुलीसारखी उत्तेजित होऊन माझ्यावर उड्या टाकते. मला ही सर्व माया पसंत नाही. आमच्या कुटुंबात आम्ही अशी माया दाखवत नाही आणि जेव्हा बेथनी मला मिठी घालते, मला विचित्र वाटतं. मी तिच्याकडे पाहतो, एक दुर्बल मूल आणि काही वर्षांपूर्वी मला, शेन आणि केलीला कसं वाटायचं, त्याची ती आठवण करून देते. मी केलीला भेटतो. ती पण केंडॉलमध्येच आहे. ती आता स्वतंत्रपणे जगतेय आणि तिला दोन मुलं आहेत. त्यातील एक नवीन जन्मलेलं आहे.

मी कुटुंबीयांना सांगतो, की मी बदलणार आहे आणि ताबडतोब नोकरी शोधू लागतो. माझा मित्र इयन हा आपल्या कुटुंबीयांसह येथून निघून गेलेला आहे; इथे इतर मित्र आहेत. जेव्हा आम्ही ब्लॅकबर्नमधील एका जागेभोवती रेव्ह पार्टीसारखे झेंडे पाहतो, तेव्हा आम्हाला जावंच लागतं.

आम्ही ब्लॅकबर्नजवळ जातोय न जातोय, तोच आम्ही रहदारीच्या कोंडीत सापडतो.

मर्सिडीजपासून बिटलपर्यंत प्रत्येक तऱ्हेची कार यांनी त्या शहरात गर्दी केलीय. साऊंड सिस्टिमचे आवाज वाढतात. लोक कारच्या टपावर उभे राहतात किंवा त्या तिथेच रस्त्यावर अमली पदार्थ घेऊन झिंगतात. त्यातील काही आपले कपडे उतरवतात. त्या स्लीफ नावाच्या अमली पदार्थाचा गोड वास हा रहदारीपेक्षा जास्त वेगानं पसरतो. तिथे शिट्ट्या, गाणी, ओरडा आणि मिठ्या चालू असतात. ट्रॅफिक सिग्नल लालवरून हिरवा होतो; परंतु कुणी हलत नाही. आमची पार्टी या इथेच चाललीय.

पोलीस गोंधळून गेलेत. आज रात्री ब्लकबर्नमध्ये काही घडणार, असं कुणीच सांगितलेलं नाही.

सरतेशेवटी आम्ही एका मोठ्या अंधेऱ्या शेताकडे येतो. कुणी आमच्याकडे पैसे मागत नाही. मी इतकी माणसं कधी पाहिलेली नाहीत. त्यातील सर्व माझ्यासारखे तरुण आहेत आणि ते सर्व ॲसिड घेत आहेत आणि त्या संगीतावर नाचत आहेत. मला ते आवडतं. मी त्याच्या प्रेमात पडतो. त्यात सामील होतो.

मी ॲसिड घेतो. जे मला माहीत होतं, असं मला वाटत होतं, ते अपरिचित होतं. माझं आयुष्य क्षुद्र कंटाळवाणं यापेक्षा जास्त काही नव्हतं. त्यावर अधिपत्य होतं ते तुरुंगातील त्या छोट्या मूर्ख नित्यक्रमांचं आणि आता त्यांची जागा घेतलीय एका विस्मयकारी, महत्त्वाच्या अशा प्राचीन रंगीत जगानं. असं वाटतं, की सत्य, ही उघडी केली जात आहेत. त्या इतक्या महिन्यांच्या तुरुंगाच्या विचारानंतर मी मनाच्या एका नवीन अवस्थेत, नव्या शक्यता, नवीन आशा घेऊन सामोरा जातोय. मी त्या संगीतानं भारावून जातो. त्याचे ते प्राचीन पुन्हा पुन्हा येणारे स्वर, तो अनुभव मोहीत करणारा आहे. काही वेळा तो अलौकिक वाटतो. दारू पिणं, मारामारी करणं आणि ज्या व्यक्तीशी तुम्ही संभोग केलात, अशा व्यक्तीची तुम्हाला सकाळी आठवण न राहणं, हा सर्व जुन्या संस्कृतीचा भाग वाटतो. यापुढे ते सर्व तिरस्करणीय आणि उथळ वाटतं. आता मला रेव्ह म्हणजे काय ते समजतं. त्या नवीन आहेत. त्या आताच्या आहेत. हा एक मोठा बदल आहे.

यानंतर कामधंदा शोधायला जाणं, हे तसं अवघड बनतं; परंतु मला लवकरच एक काम मिळतं. मी एका हॉटेलमध्ये बेकर म्हणून काम करणार आहे. प्रत्येक सकाळी मी लवकर उठतो आणि नंतर उशिरापर्यंत मी माझी मिळणारी मजुरी पिण्यात घालवितो. मी खूप पितो. पिऊन तर्र होतो. एका रात्री मी गादीतच लघवी करतो. ममाला हे पुरेसं होतं.

"तू तुझ्या बापाच्या वळणावर गेलायस." ती दुःखी स्वरात सांगते आणि ती मला जायला सांगते.

काही रात्री मी कारमध्ये झोपून काढतो आणि मनातून आश्चर्य करत असतो.

तेही माझं दुखरं शरीर सांभाळून एका कंटाळवाण्या कामावर, इतर अशाच उदास लोकांबरोबर काम करण्यापेक्षा जीवनात इतर काही नाही का? मग मी विचार करतो, गेले उडत. मी ब्लॉकमध्ये होतो, म्हणजे मी नक्कीच खरोखर वाईट असणार, इतका वाईट, की बदलू शकणार नाही. मग मी किड्डरमिन्स्टरला जाणारी पुढची ट्रेन पकडतो. तिथे माझा मित्र आणि भाऊ डॅनियल ज्यामुळे आम्ही तुरुंगात गेलो होतो, ते वेडं आयुष्य जगण्यासाठी माझी वाट पाहत आहे.

डॅनची ममा मला पाहून खुष होते आणि मला राहायला देते. मी आणि डॅन हे खरे भाऊ आहोत, कारण आम्ही एका कोठडीत होतो, हे तिला समजतं असं दिसतं. त्यानंतर आम्ही दोघं एकत्र असतो.

आम्ही पुन्हा चोऱ्या करतो आणि माल विकायला लागतो. आता आम्ही निर्दय बनतो – फारफार निर्दय आणि आमचे गुन्हेही विचित्र स्वरूपाचे असतात. मी बदललोय आणि मला ते माहीत आहे. आर्ट्स कॉलेज? आर्टिस्ट बनायचं ते माझ्या डोक्यात भरलेलं खूळ! ते माझ्या डोक्यातून पार काढून टाकलंय. तुरुंगात आम्ही आमच्या बुद्धीचा उपयोग करून जगायला शिकलोय. लोकांना बनवणं, हिंसा आणि सूड याचा वापर, हे आमचे जगण्याचे नेहमीचे मार्ग आहेत. मला क्रौर्यात तरबेज केल्याबद्दल मी तुरुंगातील त्या ब्लॉकचे आभार मानतो. गुन्हेगाराचं जीवन जगण्यासाठी पोर्टलँड ही किती मोठी प्रशिक्षण देणारी जागा होती. आता या असल्या गोष्टी करणं आणि त्याबद्दल काही न वाटणं हे अगदी सहज आहे.

काही दिवसांतच मी त्या माथेफिरू भावांच्या संगतीत पुन्हा येतो. जेक, ग्लेन आणि त्यांचे मित्र. मला असहाय वाटतं. मला या लोकांची संगत नकोय आणि मला हे असं वागायचंही नाही; परंतु माझा दुबळेपणा माझ्यावर मात करणार याची भीती मला वाटते.

सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे व्हॅनिसा मला माफ करते. मी तिच्या त्या गोड, प्रमाणबद्ध चेहऱ्याकडे पाहतो आणि माफी मागतो. पुन्हा ती त्या धटिंगण मार्कच्यामधून तो दुसरा मार्क पाहते. ज्याला तिची गरज आहे; पण तो ते कबूल करत नाही. ती हसते. ती अजूनही माझ्यावर प्रेम करते. पुन्हा एकदा मला तिच्या घरात काहीसं आश्रयस्थान मिळतं; परंतु माझं विश्रामस्थान आहे ते ड्रग्ज. खास आवडीचे ड्रग्ज म्हणजे स्पेशल ब्रू आणि ॲम्फेटामाईन्स. स्पीड तुम्हाला हवं तेवढं ड्रिंक घ्यायला मदत करतो आणि तरीही तुम्ही लुळे पडत नाही. त्याशिवाय त्यातून तुम्हाला एक वेगळी नशा मिळते; परंतु यातील दुसरी बाजू अशी आहे, की हे मिश्रण मनावर दडपण आणणारं आहे. तुम्ही पिता, पण मजेत नसता. तुम्ही मनात वेडेवाकडे विचार आणता, विभ्रमावस्थेत जाता आणि ज्या गोष्टी तुम्ही सहसा करणार नाही, त्या करता.

एक दिवस आम्ही स्पेशल ब्रू हे ड्रग घेतलं आणि स्पीड घेऊन धुंद झालोय अशा वेळी आम्हाला माहीत असलेला एक माणूस पार्कमध्ये आमच्याकडे येतो. मायकेल हा तसा वयानं मोठा आहे, तिशी उलटलेली आहे आणि त्यानं सूट आणि सुरेख कफ्लिंग वापरलेली आहेत. तो एक प्रसिद्ध, स्थानिक प्रकारची टोपी घालणाऱ्यांपैकी आहे. एका धंद्याबद्दल त्याला आमच्याशी बोलायचंय, असं तो सांगतो. एक विमा कंपनीचा दलाल आज किड्डरमिन्स्टरमध्ये असेल, असं तो सांगतो, तेव्हा आमचे विचार धावू लागतात. त्याच्याकडे पुष्कळ पैसे, क्रेडिट कार्ड आणि काही धंद्याची उपयोगी चेकबुक्स असतील. या चेकबुक्सचं पैशात रूपांतर करणं मायकेलला सोपं जाईल.

आम्ही मान डोलावतो. हे नुसतं ऐकायलाही छान वाटतं. आम्ही वाईट आहोत आणि आम्हाला ड्रग्जसाठी पैसे हवेत, त्यामुळे या अशा सोप्या गुन्ह्यांसाठी आमची नक्कीच तयारी असते. आम्ही तुरुंगात गेलेलो आहोत, त्यामुळे आम्ही गुन्हेगार असल्याचं आम्हाला माहीत आहे.

मायकेल म्हणतो, की त्याला दोन चपळ आणि हुशार मुलं या विमा दलालाच्या खिशातील वस्तू काढण्यासाठी हवी आहेत. जर आम्ही हे काम केलं, तर आम्हाला बक्षीस दिलं जाईल.

सळसळत्या उत्साहात आणि शौर्याच्या कल्पनेनं आम्ही मायकेलच्या पाठोपाठ शहराच्या मध्यभागातील एका गुत्त्यात जातो. जेव्हा तो आत जातो, तेव्हा आम्हाला बाहेर थांबायला सांगतो. मग तो बाहेर येतो आणि मुख्य रस्त्यावरून खाली जाणाऱ्या माणसाकडे पाहून आम्हाला खूण करतो. तो माणूस उंच, ताठ आणि निळ्या रंगाच्या ब्लेझरमध्ये आणि करड्या पँटमध्ये आहे. त्याचे केस कानशिलाशी करडे आहेत.

आम्ही त्या रस्त्यावरून विमा दलालाचा पाठलाग करतो. आम्ही अगदी उत्तेजित आहोत. स्पीड ड्रगमुळे आमच्या शरीरातील रक्तप्रवाह जोरात होतोय. डॅनियल खुदखुदत असतो. तो जेव्हा घाबरतो, तेव्हा असाच हसतो. तो विमा दलाल टेकडीवरून खाली जात असतो. आम्ही त्याच्या पाठोपाठ सर्वसामान्य असल्यागत आणि त्याच्यावर घोळक्यानं हल्ला करण्याचा इरादा नसल्यासारखं दाखवत चालत जातो. त्या मोठ्या वळणावर तो पादचारी भू बोगद्याकडे जातो. या ठिकाणी लहानपणी ट्रेच्या मदतीनं घसरगुंडी केल्याचं मला आठवतं.

जेव्हा तो त्या वळणाच्या खाली येतो, तो तेथील सार्वजनिक स्वच्छतागृहाकडे जातो. आम्ही त्याच्या पाठोपाठ जातो आणि वातावरण बदलतं. ते काहीसं थंड, आवाज घुमणारं आणि घाणेरडं आहे. आम्ही जे काही करणार आहोत, त्यासाठी ही योग्य जागा आहे. तो मुत्रीकडे वळतो आणि तो तिथे पोहोचतोय न पोहोचतोय,

तोच आम्हीही तिथे त्याच्या पाठोपाठ जातो. मी त्याच्या मानेभोवती हात टाकतो आणि पाऊल त्याच्या पायाभोवती टाकतो. ही अशा तऱ्हेची चाल मी मागच्या काळात अनेकदा केलेली आहे. तो माणूस धडपडतो. मी त्याचं डोकं भिंतीवर जोरात आपटतो आणि तो थंड पडतो. मी त्याला घट्ट धरतो. त्याचं महागडं निळं ब्लेझर माझ्यावर दाबलं गेलेलं असतं आणि त्याची वीण मला स्पष्ट दिसते. मी म्हणतो, "जर तू हलला नाहीस, तर सर्व ठीक होईल." तो "ठीक आहे, ठीक आहे" असं म्हणतो आणि हलत नाही, तेव्हा डॅनियल त्याच्या कोटाच्या खिशाची झडती घेऊन त्याचं पैशाचं पाकीट काढतो. या सर्वाला काही सेकंद लागतात आणि रोलरकोस्टरसारखं ते उत्तेजित करणारं असतं.

मी त्याला सोडता क्षणीच तो माणूस मागे वळतो आणि मला धरण्याचा प्रयत्न करतो. डॅनियल त्याला पकडतो आणि सुरा काढतो. डॅन सुरा घेऊन आलाय, हे मला माहीत नव्हतं. तिथे रक्ताची चिळकांडी उडते आणि मग अचानक ते त्या स्वच्छता-गृहाच्या लाद्यांना लाल करत, भिंतीवर उडत आणि माझ्या कपड्यांवरही शिंतोडे उडवत सर्वत्र पसरतं. तो माणूस कोसळतो. आता तो उभा राहू शकत नाही. त्या मुत्रीपुढील फरशीवर तो खाली पडत असतो, तेव्हा आम्ही वळतो आणि त्या भू बोगद्यातून पळतो आणि पार्कमध्ये धावतो. त्या पार्कमधून एक स्त्री वाणसामान घेऊन जात असते. डॅन तिला भिंतीकडे ढकलतो. तिच्या पिशव्या पडतात आणि सामान इकडेतिकडे विखुरतं. डॅन हा एखाद्या मानसिक रुग्णासारखा हसत आहे.

आम्ही पार्ककडे येतो. झाडाखाली ते पैसे पाकिटातून बाहेर काढतो आणि ते आमच्यासाठी ठेवतो. आम्ही मायकेलला शोधायला जात नाही. घरी परततो आणि ते पैसे तसेच दाबून ठेवतो. जेव्हा आमची ड्रग्जची धुंदी थोडी उतरते, मला मनात टोचणारी भीती वाटू लागते, की आम्ही त्या विमा दलालाला ठार मारलं. मी पार घाबरलोय आणि दुसरंही काही मला घाबरवतंय. मी एका माणसाला जखमी केलंय, बहुतेक ठार मारलंय आणि मला त्याचं काही वाटत नाही. जणू काही हे सर्व दुसरा कोणी करत होता, मी नव्हे. जेव्हा माझे डॅडी किंवा पोर्टलँडमधील शिपाई मला मारायचे, तेव्हाही तसंच होत होतं. ते दुसऱ्या कोणालातरी होत होतं.

मायकेल दुसऱ्या दिवशी येतो. आम्ही त्याला कार्ड्स देतो आणि तो आम्हाला दुकानात घेऊन जातो आणि आमच्यासाठी हव्या असलेल्या कपड्यांसारख्या आणि सोन्याच्या दागदागिन्यांसारख्या वस्तू खरेदी करतो. मला एक गडद टी-शर्ट, पिवळ्या पँट्स आणि तपकिरी स्टीकर्स बूट मिळतात. आम्ही बर्मिंगहॅममधील हमिंगबर्ड क्लबला, जिथे रेव्ह पार्टीज होतात, तिथे जायला सुरुवात केली आहे. तेथील संगीत ॲसिड संगीत आहे आणि येथील ड्रगही ॲसिड आहे. प्रत्येक जण विक्षिप्त, रंगीत कपडे वापरत आहे.

दोन आठवड्यांनंतर मायकेल त्या विमा दलालाचा चेक वटवताना पकडला जातो. तो सर्व सांगतो. पोलीस स्टेशनला आल्यावर मला कळतं, की विमा कंपनीचा दलाल म्हणून दाखवलेला माणूस, हा पेन्शनर होता. खरं सांगायचं, तर तो एवढा वयस्कर दिसत नव्हता, जरी डॅनियलनं वरकरणी त्याच्या कानाचा काही भाग कापला होता, तरी तो मेला नाही हे देवाचे आभार. मग मायकेलनं एका विमा कंपनीच्या माणसाला निशाणा बनवायचं अशा थापा मारल्या होत्या, तो गुत्त्यात गेला आणि कुणीतरी श्रीमंत दिसणारा माणूस शिकार म्हणून निवडला. मायकेल हा धोकेबाज, टोप्या घालणारा माणूस होता. त्यानं निश्चित आम्हालाही गोत्यात आणलं.

मी दोन दिवसांच्या प्रश्नोत्तरानंतरही या गुन्ह्याची मला काही माहिती असल्याचं नाकारलं; पण दुसऱ्या दिवसानंतर मात्र मी पुन्हा तुरुंगात जाणार, ही वस्तुस्थिती असल्याचं समजून चुकलं. पोलीस जेव्हा सांगतात, की ज्या दुकानातून मायकेलनं आम्हाला कपडे घेऊन दिले, त्या ठिकाणी ते जाणार आहेत, तेव्हा मी शरणागती पत्करतो. मला माहिती आहे, की आमचं सिटी टीव्हीवर चित्रीकरण झालेलं आहे.

मी जे काही घडलं, ते पोलिसांना सांगतो; परंतु आम्ही केलेल्या ड्रग्जच्या वापराबद्दल सांगत नाही. मी गेल्या शिक्षेपासून हे शिकलो आहे, की तुम्ही थोडं जरी विसंगत सांगितलंत, तर मग ते तुमच्यावर काहीही ढकलण्याचा प्रयत्न करतात. ही एक पद्धत आहे आणि त्या पद्धतीनं मी खेळी खेळत आहे.

आमच्यावर आरोप आहे हिंसक पद्धत वापरून केलेल्या चोरीचा. आम्हाला तीन न्यायाधीशांसमोर नेण्यात येतं. ओएपीची मुख्य आहे एक जख्खड म्हातारी बाई. ती नव्वद वर्षांची तरी आहे. हे एखाद्या सिनेमासारखंच आहे, कारण मला असं वाटतं, की मी तिथे असण्याऐवजी दुसऱ्या कोणालातरी मी बघतोय. ती न्यायाधीश मला सांगते, की एक भयानक गुन्हा केल्याचा आरोप माझ्यावर आहे आणि रस्ते माझ्या-सारखा माणूस मोकळा सुटला असताना रस्ते सुरक्षित नाहीत. ती म्हणते, की मी हिंसक माणूस आहे. मी तिच्याकडे अविश्वासानं पाहतो. मी विचार करतो; पण तुम्ही मला ओळखत नाही!

ती म्हणते, की आमच्या गुन्ह्याची दाद घ्यायला हे कोर्ट योग्य नाही. याचा अर्थ आमची एक वर्षासाठी तरी आत रवानगी होणार. पोलीस पाच वर्षांच्या तुरुंगवासाबद्दल बोलत असतात. अचानक मला श्वासोच्छ्वास घेणं कठीण झालंय. मला पिंजऱ्यातून बाहेर पडायला वेळ लागतो. डॅन माझ्याबरोबर आहे आणि तो स्वत:ला प्रथम सावरतो. जेव्हा आम्ही वळतो, आम्ही पुन्हा फुशारकीनं वागतो. कुणीतरी हसतो. त्या न्यायाधीशेला जा... असं सांगितल्याचं मी ऐकतो. तो कोणाचा आवाज आहे, ते मला माहीत नाही, डॅनचा का माझा. आतून मात्र मी उद्ध्वस्त झालोय.

सुटल्यापासून दोन महिन्यांच्या आतच मी तुरुंगात आलोय. आता पुन्हा कैदेची जागा रेड्डीच. गेल्या वेळी मी रेड्डीचला गेलो होतो, ते ॲल्बट्सना भेटण्यासाठी आणि त्या वेळी मी सबंध दिवस जंगलात खेळलो होतो आणि नांगरलेल्या शेतावरून धावणारा ससा पाहिला होता. त्या प्रतिमेचं सौंदर्य अजूनही मला आनंद देतं. अजूनही तिथे ॲल्बट्स राहतात का, याचा मी मनाशी विचार करतो. ते काही मैलच दूर आहेत; पण जणू काही दुसऱ्या खंडावर आहेत.

चार महिन्यांनंतर मला अडीच वर्षांची शिक्षा होते. न्यायाधीश म्हणतात, की हा गुन्हा तिरस्करणीय होता.

■

१८

मला रुग्बी तरुण गुन्हेगारांच्या तुरुंगात घातलंय. मला स्वत:ला स्वतंत्र कोठडी आहे. मी व्हॅनिसा, माझा भाऊ शेन आणि डॅनीची ममा, यांच्या भेटीवर मला प्रत्येक दिवसासाठी लागणाऱ्या स्लीफसाठी अवलंबून आहे. हा चांगला तुरुंग आहे. येथील शिपाईही चांगले आहेत. काही वेळा येथे स्वच्छतागृहाच्या टाकीला पाणीही असतं; पण वर्षाच्या शेवटी तुरुंगवास मला असह्य वाटू लागतो. मला चिडचिडल्यासारखं होतं. मी इथे स्थिरस्थावर होऊ शकत नाही. आता स्लीफ ओढणं तेवढा आरामदायी अनुभव वाटत नाही, त्यामुळे उलट अस्वस्थता वाढते. मला घाबरल्यासारखं वाटतं आणि कोठडीत मी भीतीनं घामेजून जातो. माझ्या सुटकेविषयी मी काळजीत आहे. मी बदलेन कसा, हे मला माहीत नाही. व्हॅनिसा माझी मैत्रीण आहे. मी तिच्याबरोबर किड्डरमिन्स्टरला जाईन का? जर मी तसं केलं, तर सरळ पुन्हा इथे येईन.

इथे एक वर्षाच्या शेवटी प्रोबेशन ऑफिसर माझी मुलाखत घेतो, तेव्हा मी हे सर्व प्रश्न विचारतो. ती मध्यमवयीन आहे, मध्यमवर्गातील आहे आणि मुलकी अधिकारी आहे. ती पुढे वाकते.

"कबूल कर मार्क, तुझी जी काही अडचण आहे, ती ड्रग्जची आहे." मी तिच्याकडे पाहतच राहतो.

"नाही, असं काही नाही."

"तू जो गुन्हा केलायस, तो तुला धड आठवत नाही. तू दोन महिने बाहेर होतास आणि चिक्कार ड्रग्ज घेत होतास. तू दुसरा गुन्हा केलास. तुझ्या या ड्रग्ज घेण्यामुळे तुला तारुण्यातील दोन वर्षांची किंमत मोजावी लागली आहे. तर अशी काही अडचण आहे, हे तू कबूल करू शकत नाहीस का?"

मी आवंढा गिळतो.

"ठीक आहे," मी खोकतो. मध्ये काही काळ शांतता पसरते. ती वाट पाहते.

"तुम्ही अशा तऱ्हेनं म्हणत असाल, तर मला ती अडचण आहे."

"आणि तू बाहेर पडलास, की पुन्हा ते सर्व घडू शकेल. तुला मदतीची गरज आहे, हो की नाही मार्क?"

तिच्या आवाजावरून ती काही प्रस्ताव पुढे मांडणार असं वाटतं. मला याचा वास येतो. घुमून फिरून ती पुन्हा याच मुद्द्यावर येणार, हे मला कळतं.

"हो," मी म्हणतो, "मला मदतीची गरज आहे."

"तुझ्या हातून पहिला गुन्हा होण्याआधी तू काय करत होतास? तुला काही काम होतं का?"

मी आर्ट्स कॉलेजमध्ये होतो, हे तिला सांगतो. जेव्हा मी आर्टिस्ट होण्याबद्दल तिला सांगतो, त्या वेळी मला स्वत:लाच हसावंसं वाटतं, हसावं आणि रडावंही.

ती ऐकते. मग ती असं सुचवते, की माझी शिक्षा इथे तुरुंगात पुरी करण्याऐवजी मी बर्मिंगहॅममधील पुनर्वसन केंद्रात जावं. ती बाई सांगते, की मी तुरुंग सोडू शकेन. माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नाही.

"त्यासाठी काही अटी आहेत." ती स्त्री बजावते. "त्या पुनर्वसन केंद्रात तू दारू पिऊ शकत नाहीस किंवा काहीही घेऊ शकत नाहीस आणि तू जर असं केलंस, तर तुला इथे परत तुझी शिक्षा पुरी करण्यासाठी पाठविलं जाईल."

मी म्हणतो, "मला प्रयत्न करायचाय." आणि ते खरं असतं. मला नुसतं तुरुंगातून बाहेर पडायचं नाहीये. मला खरंच बदलायचंय. मला अशा कुठल्यातरी ठिकाणी जायचंय, की ज्या ठिकाणचं जीवन हे मी ज्या रेल्वेनं प्रवास सुरू केलाय, त्यापेक्षा पार वेगळं असेल. ती प्रोबेशन ऑफिसर मला एक सुरक्षित घर देत आहे.

जेव्हा डॅन हे ऐकतो, तेव्हा तो ताबडतोब त्या प्रोबेशन सर्व्हिसला त्यालाही ड्रग्ज घेण्याची सवय असल्याची आणि त्यालाही पुनर्वसनाची निकडीची गरज असल्याबद्दल सांगतो. ते त्याच्याकडे दुर्लक्ष करतात.

तुरुंग सोडताना मला जाणवणारी अस्वस्थता, ही भयानक असते. मी घाबरलेल्या अवस्थेत ट्रेनमध्ये आहे आणि ट्रेनच्या खिडकीतून जगाच्या त्या विस्मयकारी ताजगीकडे पाहतो. तुरुंगातील प्रत्येक गोष्ट शिळी असते आणि इथे रंग एवढे उठावदार असतात, की ते अंगावर आल्यागत वाटतात.

ती प्रोबेशन ऑफिसर मला एज्बास्टन येथील एका मोठ्या सुंदर घरात घेऊन जाते. या घराची नुकतीच पुन्हा सजावट केलेली आहे. ती सजावट केलीय टर्निंग पॉईंट या ड्रगसाठी देणगी देणाऱ्या संस्थेनं आणि याचं उद्घाटन प्रिन्सेस डायनानं केलंय. त्याचं छत उंच आहे आणि खिडक्या जमिनीपासून छतापर्यंत आहेत. गच्च्या आहेत आणि बागाही. कुणीतरी मला सांगतं, की जे. आर. आर टॉल्कीननं *द लॉर्ड ऑफ रिंग्ज* हे त्या बागेत लिहिलं आणि मी जेव्हा बाहेर फिरतो, तेव्हा मला विलक्षण अलंकृत असे जुने दिवे त्या मोठ्या वाढलेल्या झुडपांखाली दिसतात.

त्या घराच्या केवळ आकारानं दडपून जाऊन मी माझ्या खोलीत जातो आणि पलंगावर पडतो, कारण तीच एक सुरक्षित जागा आहे, असं मला वाटतं. दुसऱ्या पलंगावर एक माणूस आहे. तो थरथरत आहे, विव्हळत आहे. आपले पाय पकडून आहे, डुलत आहे आणि स्वत:शी बोलत आहे.

हे काय आहे, मला माहीत आहे. ते मी आधी पाहिलेलं आहे. तो हेरॉईनचं व्यसन लागलेला आहे आणि यातून बाहेर पडण्यासाठी ते न घेतल्याची ही लक्षणं आहेत. याला रॅटलिंग असं म्हणतात.

"गेला आठवडाभर मी काही घेतलेलं नाही." तो सांगतो. माझा मार्गदर्शक ह्यूज येतो आणि मी काहीशा अपराधी भावनेनं उठून उभा राहतो. माझ्या चादरींच्या तुरुंगात असताना घालायचो, तशा माझ्या चादरींच्या घड्या घालायला लागतो.

"ओहो..." ह्यूज हसत सांगतो. तो माझ्याहून दहा वर्षांनी मोठा आहे. त्यानं नवीन पद्धतीनं केस कापलेले आहेत आणि जीन्स घातलेल्या आहेत. "जरा धीमे! हा काही तुरुंग नाही. ज्या तऱ्हेच्या आर्ट्समध्ये तुला स्वारस्य आहे, त्याबद्दल मला तुझ्याशी बोलायचंय. मी नुकताच आर्ट्समध्ये खराखुरा बी.ए. झालो."

मी पलंगावर बसतो.

ह्यूज हे केंद्र कसं चालतं, त्याची माहिती देतो. इथे काम करणारे सर्व सामाजिक किंवा मानसिक आरोग्याचं काम करणारे आहेत. ड्रग्जचं व्यसन लागणं, हे कौटुंबिक आणि आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम आहे, असा त्यांचा विश्वास आहे.

"व्यसन ही प्रतिक्रिया आहे." तो मला सांगतो. "आम्हाला असं वाटतं, की ते योग्य उपचारानं दूर करता येईल."

हे तसं ऐकायला सोपं वाटतं; परंतु ड्रग्जचा व्यसनी असं मी स्वत:ला पाहतच नाही. जो बाजूच्या कॉटवर तऱ्हेतऱ्हेचे आवाज करत पडलाय, कारण त्याला हेरॉईन मिळत नाहीये, तो ड्रग्जचा व्यसनी आहे. मी अनेक ड्रग्ज वापरली आहेत. कदाचित, इतर लोकांपेक्षा जास्त; परंतु मी त्यांच्यासारखा नाही. यात आणखी म्हणजे माझा ड्रग्जचा उपयोग कायमचा बंद करण्याचा माझा विचारही नाही.

ड्रिंक किंवा ड्रग्जशिवाय राहणं, म्हणजे पाय किंवा बोटं नसल्यागत जगणं आहे. हे विचारांपलीकडचं आहे, माझ्या कल्पनाशक्ती पलीकडचं.

ह्यूज जेव्हा म्हणाला, की ही जागा तुरुंग नाही, ते बरोबर आहे. इथे दरवाज्यांना कुलपं नाहीत. मी बाहेर जाऊ शकतो. पैशांसाठी काम करायला भाग पाडण्याऐवजी ते आम्हाला पैसे देतात. इथे बाहेर जाणं असतं. जीवनाची गोष्ट सांगणारे गट, ज्यांच्याशी तुम्ही तुम्हाला कसं वाटतं, यावर चर्चा करता. मला एक प्रश्नावली भरायला दिली आहे. त्यात डाव्या बाजूला शब्दांची सूची आहे. त्याच्या उजव्या बाजूला हे

शब्द मला काय सांगतात, ते लिहायचं आहे. ते शब्द आहेत शक्तिहीनता, असहायता, अप्रामाणिकपणा...

मी गोंधळलोय. अप्रामाणिकपणाबद्दल त्यांना मी काय लिहायला हवंय, हे मला माहीत नाही. माझ्या उजवीकडे असलेल्या माणसाकडे मी वळतो आणि परीक्षेत फसवण्याची शिकलेली युक्ती, जी मी शाळेत आत्मसात केलीय, ती म्हणजे त्याच्या कागदावर एक नजर झटकन टाकायची. ती युक्ती मी वापरतो. मी त्यानं त्या चौकोनात लिहिलेल्या उत्तरांची दुरुस्त आवृत्ती खरडतो. अप्रामाणिकपणा म्हणजे काय, तर हे...

सुरुवातीचे महिने मी तसा अस्वस्थ असतो. तुरुंगातील त्या राहण्याच्या पद्धतीनंतर इथल्या मोकळ्या जगाची मला भीती वाटते. मी त्या तुरुंगाच्या कोठडीत इतका काळ एकटाच जेवत आलोय, की दुसऱ्या लोकांबरोबर जेवण घेण्याची मला भीती वाटते. कसं वागायचं, ते मला समजत नाही आणि तुरुंगातील वागणुकीशिवाय तेथील इतर रहिवाशांशी कसे संबंध ठेवायचे, ते मला समजत नाही. तुरुंगातील वागणूक, म्हणजे हवं तसं करून घेणं, धमक्या आणि हिंसा. त्याशिवाय गेला कित्येक काळ मी आणि डॅन जगाविरुद्ध उभे होतो आणि आता फक्त मी आहे.

मी हळूहळू सरावतो आणि या केंद्रातील आयुष्यात रुळतो. ते सामाजिक कार्यकर्ते हे काहीसे प्रेमळ, निरुपयोगी आई-वडिलांसारखे आहेत; परंतु आतील रहिवाशांचे संबंध हे गुंतागुंतीचे आहेत. बरेचसे एकमेकांजवळ झोपतात. यात एक गुंतागुंतीचा पुरुष मित्र आणि स्त्री मित्र असा प्रकार आहे आणि मग काही आठवड्यांनंतर हे सर्व बदलतं आणि काही रहिवासी दुखावले जातात, काही रागावतात आणि येथील प्रेरकशक्ती काही काळ बदलते. मग पुन्हा पुढच्या बदलासाठी आम्ही तयार होतो. व्हॅनिसा, जिनं त्या दोन तुरुंगांत मला हॅशचा पुरवठा केला होता, मला अनेकदा भेटायला येते. आम्ही एकत्र झोपतोही; परंतु या केंद्रातही मला मैत्रिणी आहेत आणि त्यातील एक फार मोठी मैत्रीण आहे जॉडी.

जॉडी ही अत्यंत देखणी आणि काळी वेश्या आहे आणि तिला क्रॅकचं व्यसन आहे. ती विनोदी आणि आनंदी आहे. ती खूप हसते आणि प्रत्येकाशी चांगलं वागते. ती माझ्याहून पाच वर्षांनी मोठी आहे; परंतु लवकरच माझ्या लक्षात येतं, की त्या खुदखुदणाऱ्या, खुशालचेंडू जॅमेकीयन बाह्य आवरणाखाली खोल दुःख आहे. त्या दुःखाचं काहीतरी माझ्या स्वतःच्या आतील दुःखाशी जोडलं जातं.

जॉडी ही अत्यंत कामोत्तेजक पद्धतीनं वागते. बहुतेक करून ती जे काही म्हणते किंवा करते याला एक लैंगिक भाषा असते. तिच्या आयुष्यभर तिचा अत्यंत वाईट तऱ्हेनं शारीरिक आणि लैंगिक दुरुपयोग केला गेलेला आहे आणि आता

तिला क्रॅकचं व्यसन असल्यामुळे ती वेश्यागिरी करते. ती एकमेव संधी तिला उपलब्ध आहे, की ज्यातून तिला या व्यसनाला लागणारा पैसा मिळू शकेल. ती पुनर्वसन केंद्रात आहे, कारण प्रत्येक व्यसनी माणसाप्रमाणे तिला खरंच थांबायची इच्छा आहे किंवा व्यसनाच्या या रोजच्या दु:खातून तिला काही काळ मुक्त व्हायचंय; परंतु प्रत्येकाला हे दिसतं, की जॉडीची बरी होण्याची संधी ही तशी जवळजवळ नाहीच. खरंतर ही जागा तिला काही काळ विश्रांती घेण्याची आहे. जरी ती या पुनर्वसनाचा उपयोग करत नाही, तरी आमच्यासारख्या बहुतेक लोकांप्रमाणे ती येथून सुटकेच्या दिवसाची वाट पाहत आहे. ज्यानंतर ती पुन्हा ड्रग्ज घेऊ लागेल.

जॉडीशिवाय या पुनर्वसन केंद्रातील दुसरी उत्तम गोष्ट म्हणजे आर्ट्स विभाग. मी बराच वेळ तिथे घालवतो. ह्यूज माझ्याबरोबर काम करतो.निरनिराळ्या कल्पनांवर चर्चा करणं, यासाठी माध्यम निवडणं वगैरे. मी रेखाचित्र काढतो, चित्रं रंगवतो आणि काही मातीचं काम करतो; परंतु आता मला छंद जडलाय तो फोटाग्राफीचा. ह्यूजच्या सांगण्यावरून मी प्रिन्स ट्रस्टकडे चांगला कॅमेरा विकत घेण्यासाठी देणगी मिळावी, म्हणून अर्ज करतो. या कॅमेऱ्यानं मी बर्मिंगहॅमच्या आजूबाजूचे फोटो काढतो आणि त्यातील काही प्रदर्शनासाठी स्वीकारले जातात. माझा सर्वांत आवडता फोटो आहे तो बाकावर एकमेकांच्या आधारासाठी वाकलेल्या तीन भिकाऱ्यांचा. त्यांचा कुत्रा तिथे आहे आणि आंबवलेला सफरचंदाचा रस बाजूला आहे. तुम्ही त्यांच्या चेहऱ्याकडे पाहा आणि प्रत्येक जण एक कथा सांगतो आणि ते या रस्त्यावर कसे येऊन कसे राहू लागले याचं तुम्हाला आश्चर्य वाटतं. त्यांनी अनेक निवडी केल्या की चुका?

मला एक फोटोग्राफीचं काम दिलं जातं. तिथे बर्मिंगहॅममध्ये एक मोठा फॅशन शो आहे आणि मला अधिकृतरीत्या फोटो घेण्यासाठी पैसे दिलेले आहेत. जॉडी माझ्याबरोबर येते. तिनं एक काळा छोटे मोती लावलेला पोशाख घातलाय आणि त्यात ती खूपच सुंदर दिसते. थोड्याच वेळांत तिच्याभोवती काळे टाय लावलेल्यांचा गराडा पडतो. मी तेथील मॉडेल्सचे फोटो घेतो आणि नंतर काही फोटो शँपेन रिसेप्शनसाठी जमलेल्या श्रीमंत लोकांचे घेतो. त्या सर्वांनी डायनॅस्टीमधल्या पात्रांसारखा पोशाख केलाय. जेव्हा माझं काम संपतं, मी सरळ माझ्या डार्करूमकडे जातो. जॉडी माझ्याबरोबर येत नाही. ती तिथे फुकट मिळणाऱ्या शँपेनचे ग्लासवर ग्लास रिचवीत असते. दुसऱ्या दिवशी अस्ताव्यस्त आणि अंगाला दारूची घाण येत असलेल्या अवस्थेत ती पुनर्वसन केंद्रात येते. दारू पिणं हे पुनर्वसन केंद्रात चालत नाही. ते तिला बाहेर फेकतात.

जेव्हा माझी जाण्याची वेळ येते, मी सरळ त्या बिनापरवाना दुकानाकडे वळतो.

आम्ही सर्वच असं करतो. बाहेर पडल्यावर काय करणार, याची चर्चा पुनर्वसन केंद्रात करण्यात आम्ही दिवस घालवले आहेत. आमच्यापैकी कुणीही हे कायमचं सोडण्याचा विचार केलेला नाही. त्या प्रेमळ, परंतु चुकीचं मार्गदर्शन मिळालेल्या सामाजिक कार्यकर्त्यांनी आम्ही बदलावं, म्हणून खूप प्रयत्न केलाय; परंतु अजूनपर्यंत मला वाटतं, की ते आमच्या कुणाहीबाबत यशस्वी झालेले नाहीत. आम्ही आमचं ड्रगचं व्यसन हे आटोक्यातील आहे असं मानतो. आम्हाला ड्रग्ज ही समस्या नाही जी सोडवायची जरुरी आहे.

तरीसुद्धा या पुनर्वसन केंद्रात संपूर्ण वेळ फुकट गेलाय असं नाही. हे तुरुंगापेक्षा खूप छान आहे. मला जॉडी इथे भेटते. मी पुष्कळ कलाकृती केल्यात. या पुनर्वसन केंद्रानं, मी एखाद्या चोरासारखा डॅनबरोबर यापुढे किड्डरमिन्स्टरला राहणार नाही, हे निश्चित ठरवायला मला वेळ दिलाय. मला माझं उरलेलं आयुष्य तिथे मी वाढलो, टेर प्यायलो आणि चोऱ्या केल्या, त्या घाणेरड्या वस्त्यांत घालवायचं नाही. मी जाणीवपूर्वक निर्णय घेतलाय, की त्या रेल्वेतून उतरायचं आणि ट्रेन बदलायची.

मी डॅनियलला पत्र लिहितो. तो अजूनही तुरुंगात आहे. 'मी बर्मिंगहॅममध्ये राहतोय आणि आयुष्य बदलतोय,' असं त्याला लिहितो. आम्ही नक्कीच नेहमी मित्र राहू, पण माझं आयुष्य आता वेगळं वळण घेणार आहे. मी व्हॅनिसालाही तिला सोडतोय, असं सांगतो. ती रडते. तिचा गोड चेहरा ढेपाळतो. गेली काही वर्षं तिनं मला तुरुंगात भेटण्यात घालवली आहेत. आता मी बाहेर आलोय आणि तिला सांगतोय, की मी निघून जात आहे.

"का?" ती विचारते. तिचा चेहरा ओला झालेला असतो.

मी तिच्याकडे पाहू शकत नाही. तिचा मार्ग वेगळा आहे आणि माझा मार्ग वेगळा आहे, याचं स्पष्टीकरण कसं द्यायचं, ते मला समजत नाही. मी तिला हे सांगू शकत नाही, की ती असलेल्या ट्रेनवर मला आता राहायचं नाही. मला एका दुकानदाराची सहायक म्हणून काम करणाऱ्या स्त्रीपासून, जास्त उत्तेजित करणाऱ्या दुसऱ्या स्त्रीकडे जायचं आहे. क्रॅकचं व्यसन असलेल्या एका वेश्येबरोबर.

■

१९

एक हाऊसिंग असोसिएशन मला बर्मिंगहॅमध्ये फ्लॅट देतं. मला इथे आवडतं. या शहराचा, माझ्या आजूबाजूला असलेला आवाज मला आवडतो आणि बराच काळ दूर राहिल्यामुळे माझी भरपूर ड्रग्ज घ्यायची तयारी आहे.

मी सरळ जॉडीकडे जातो. ती काही आठवड्यांआधी बाहेर पडलीय. मला माहीत आहे, की आम्ही पहिली गोष्ट काय करू, तर क्रॅक ओढू.

तिची छोटीशी दमट खोली एका मोडकळीला आलेल्या मॅरडॉक रस्त्यावरील हॅन्डवर्थ येथे आहे. तेथील जिन्यावर एक जाडजूड गालिचा आहे. त्याला खवट वास आहे आणि ती छोटी खोली घाणेरडी आहे आणि बहुतेक रिकामी आहे. मी असं म्हणू शकणार नाही, की ती प्रत्यक्षात इथे राहतेय, कारण घर असणं ही रुढीनुसार कल्पना जॉडीच्या आयुष्यक्रमात बसत नाही. क्रॅक या व्यसनामुळे सर्व गोष्टी तशा धावपळीच्या होतात. ती कदाचित क्रॅक ओढलं जातं त्या घरात, रस्त्यावर, पुरुषांच्या घरात, कारमध्ये कुठेही झोपत असेल.

ती छोटीशी खोली आहे, जिथे जॉडी काम करत असावी. तिनं वापरलेल्या कंडोमची कचऱ्याच्या डब्यात रास पडलेली आहे. त्या पलंगावर कव्हर आहे; पण खाली चादर किंवा ब्लॅंकेट नाही. भिंती उघड्याबोडक्या आहेत. दिव्याचा बल्बही उघडाच आहे. तिथे फक्त एक फ्रीज आणि स्टिरीओ आहे.

क्रॅक हे कोकीनपासून काढलेलं आहे. तो एक छोटा दगड आहे, पांढरा, पिवळा किंवा करडा. मी नग्न, काळ्या आणि सुंदर जॉडीला पाइप बनवताना पाहतो. त्या पलंगाच्या टोकाला असलेल्या फ्रीजवर तिची जळती सिगरेट ठेवलेली आहे आणि जेव्हा राख पुरेशी होते, तेव्हा ती त्या पाइपमध्ये घालते. फुटलेली छोटी बॅकार्डी बाटली, ब्ल्यू टॅग, रबरबँड आणि धातूची पातळ पट्टी यांच्या मदतीनं बनवलेला हा पाइप तसा गुंतागुंतीचा आहे. ती राख जरा बसवते आणि त्यावर काळजीपूर्वक क्रॅक ठेवते. मग भिंतीशी उभी राहते आणि तो पेटवते. ती तो

काळजीपूर्वक आणि जपून धरते, कारण आतील माल हा किमती आहे, सोन्याहूनही जास्त किमतीचा, हिऱ्याहूनही जास्त किमतीचा. ती तो धूर आत ओढते. जेव्हा त्याचा झुरका ती तोंडात धरण्याचा प्रयत्न करते, तेव्हा तिचे गाल फुलतात. त्यातील काही तिच्या नाकातून बाहेर पडतो. तिचं डोकं मागे त्या भिंतीशी जातं. डोळे बंद आहेत; परंतु तिची बुबुळं मागं सरकलेली आणि तिच्या पापण्या अस्थिरतेनं आखडताना मी पाहतो. ती तो धूर छोट्या गुटक्यांनी गिळते. मग दोन मिनिटांनी ती शुद्धीवर येते.

जेव्हा ती फ्रीजजवळ जाते, तेव्हा ती अजूनही धुंदीत असते. मी पलंगाच्या टोकावर नग्नावस्थेत बघत, वाट पाहत, अपेक्षा करत बसून असतो. ती पाइपमध्ये राख आणि कोकीन पुन्हा काळजीपूर्वक घालून पाइप तयार करते. मी हळूहळू तो त्या भिंतीशी नेतो, वळतो आणि तो अगदी काळजीपूर्वक उचलतो, ज्यामुळे तोंडात काही पडणार नाही. त्यासाठी मी लायटरची वरची बाजू खाली करतो आणि तो पाइप तडतडल्याचा, दात नसलेल्या माणसाच्या हास्यासारखा आवाज करतो. हे क्रॅक गरम काचेसारखं वितळताना मी पाहतो आणि तो पाइप हळूहळू चमकदार, पांढऱ्या धुरानं भरतो. माझे डोळे त्यावर खिळलेले आहेत. मग मी माझी बोटं त्या वर्खावरून काढतो आणि श्वास आत घेतो.

जसा मी धूर आत घेतो, तसा माझ्या छातीत जणू स्फोट होतो. माझे केस ताठ उभे राहतात. बुबुळं विस्तारून माझ्या डोक्यात जातात. माझे हात थरथरतात. मला ते सर्व जाणवतं. मला माझं हृदय, रक्त जाणवतं. माझ्या डोक्याच्या मागच्या बाजूला एक प्रवाह माझ्या मेंदूपर्यंत जाताना समजतो आणि तेव्हा परमसुख मिळतं. हे सुख या पूर्वीच्या कोणत्याही सुखासारखं नाही. हे एक उत्तम सेक्ससारखं सुख आहे. यात विमानाशिवाय उड्डाण करता येतं. तो जन्माचा सुखसोहळा आहे. ती चंद्रावर जायची सहल आहे. ते ऑलिंपिक जिंकण्यासारखं आहे. ते एक सुंदर स्वरैक्य आहे. हे एक प्रेम आहे. हे एक तुम्ही अनुभवाल, असं अत्युत्कट सुख आहे आणि त्याशिवाय इथे आणखीही सुख आहे. ते अतुलनीय आहे आणि हे सर्व टिकून राहावं यासाठी मला तो धूर तोंडात ठेवायला हवा. मला कानांतून श्वास घ्यायला हवा, त्यामुळे यातील काही तोंडातून बाहेर पडणार नाही. मला याची खात्री करायला हवी, की मी पाइपमधील काही क्रॅक हरवणार नाही, जागेवरून निघू देणार नाही किंवा सांडणार नाही, कारण ते हरवणं म्हणजे जीवन हरवण्यापेक्षाही वाईट आहे.

तीन मिनिटांनंतर मी ऑक्सिजनच्या अभावामुळे जेव्हा निळा पडतो, तेव्हा मी टोकावरून खाली येताना जाणवतं. सुरुवातीला ती माझ्या उन्मादात एक छोटीशी भेग आहे.

मग ती मोठीमोठी होत जाते आणि मग माझ्या त्या क्रॅकच्या उन्मादाला एक

छोटंसं भोक पडतं. मग मी एक पॅराशूटशिवाय खाली पडणारा माणूस असतो. हवेत हात-पाय झाडत, त्या पातळ हवेत लोंबकळत तो ड्रग आणखी काही सेकंद, काही क्षण जास्त टिकावा, म्हणून प्रयत्न करत असतो.

मग ती धुंदी ओसरायला लागते. मी निराशेच्या आणि खोल दु:खाच्या गर्तेत जोरात खाली येतो. अस्वस्थता मला वेढते. काहीतरी भयानक घडणार आहे. पोलीस येणार आहेत आणि मला घेऊन जाणार आहेत. प्रत्यक्ष सैतान माझी वाट पाहत आहे. काहीतरी सुनामीच्या आकाराचं संकट, जगाचा अंत, माझ्या जगाचा अंत जवळ आला आहे, असं मला सांगणारे आवाज मी ऐकतो. अस्वस्थतेचं रूपांतर भीतीत होतं.

म्हणजे ही ती क्रॅकमुळे येणारी प्रसिद्ध विभ्रमावस्था. आता मला या ड्रगबद्दलचं सर्व समजतं. क्रॅक म्हणजे निर्दयता, क्रॅक म्हणजे गुन्हा, क्रॅक सर्वांचा नाश करील. क्रॅक घ्या आणि तुम्ही तुमच्या बायकोची, तुमच्या मुलांची, पैसे कमावण्याची किंवा इभ्रतीची पर्वा करणार नाही. तुम्ही धुंदीशिवाय कशाचीच, काहीही पर्वा करणार नाही आणि ते मिळवण्यासाठी तुम्ही चोरी कराल, खून कराल, काहीही गुन्हा कराल.

आम्ही आणखी थोडा वेळ ओढतो; परंतु लवकरच किंवा नंतर अपरिहार्यपणे ते क्रॅक संपतं. आमची ती धुंदी उतरते. त्यातून सुटका नाही. मग येणारा हँगओव्हर, एक प्रकारची विमनस्कता. ही विमनस्कता आपली थरथर न थांबवणाऱ्या, वाजणाऱ्या चिमट्यासारखी आहे. विमनस्कता ही दोन वेगानं जाणारे महारथ रस्त्यावर एकमेकांवर आपटल्यावर होणाऱ्या आवाजासारखी आहे. ही अवस्था म्हणजे कचऱ्याच्या धातूच्या झाकणावर पडणारी बोटांची नखं आहेत. ही अवस्था म्हणजे तुमचं शरीर आणि मन कापून उघडं करून जगातील प्रत्येक धारदार वस्तू जवळ ठेवल्यासारखी आहे.

जॉडी मला या दु:खातून मुक्त होण्यासाठी व्हॅलियम देते. मी एखाद्या लहान आणि घाबरलेल्या बालकासारखा आहे आणि ती मला जवळ घेते. ती बडबडत भविष्य सांगत तिच्या जॅमेकन जूच्या गोष्टी करत धुंदीतून खाली येते, मग जमिनीवर हात-पाय टेकून ओणवी होते आणि विव्हळू लागते. ती क्रॅकचे लहान तुकडे कुठे जमिनीवर पडलेले आहेत का, हे शोधत असते आणि यात गुंगून ती काहीही ते क्रॅक असेल म्हणून उचलते. देव तिला मदत करो. ती त्या चुत्या गालिच्याचाही धूर घेण्याचा प्रयत्न करते. सरतेशेवटी ती तो पाइप धुते आणि ते द्रव आरशावर टाकते, पेटवते आणि क्रॅक पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करते. तिनं तयार केलेलं हे दयनीय भूतच ठरतं, कारण ते फक्त थोडा कंप देतं, पण शेवटच्या टोकाला पोहोचवत नाही. कदाचित धुंदी ओसरण्याची क्रिया ते ओढल्यावर एखादं मिनिट थांबवते.

ती ओसरणारी धुंदी आवरण्यासाठी मी झोपायचा प्रयत्न करतो. पडून राहण्याचा प्रयत्न करतो. मी उभं राहण्याचा, डोक्यावरून पाणी घेण्याचा प्रयत्न करतो. ते पाणी माझ्या डोक्यावरून धबधब्यासारखं खाली येतं आणि त्याचा स्पर्श ते जेव्हा माझ्या शरीरावरून खाली जातं, तेव्हा माझं मन दुसरीकडे वळवतो आणि क्षणभर मला काही समजत नाही. ही नशा उतरायला दहा मिनिटं लागतात आणि नंतर माझ्या मनात विचार येतो ते पुन्हा करण्याचा आणि मग ते आम्ही अनेकदा करतो. जॉडीबरोबर क्रॅक ओढणं हा जीवनाचा क्रम बनतो. ती एक कामोत्तेजक ड्रग आहे; पण जवळीक साधणारी नाही. त्यात खरी जवळीक आहे, ती नशा उतरताना हवी असणारी जवळीक. मी इतका ताणतणावाखाली असतो, की मला मैत्रीची गरज भासते आणि ते जॉडीच्या बाबतीतही घडतं आणि या गरजेमुळे आम्ही एकत्र बांधले गेलो आहोत.

परंतु मला दुसरंही आयुष्य आहे. मी अवघा वीस वर्षांचा आहे आणि मला काही वर्षं आत डांबवलं होतं आणि आता मला आयुष्यात काही गंमत हवी आहे. जॉडीबरोबर क्रॅक ओढणं हा एक भावनायुक्त असा अनुभव आहे; पण त्याला काही तुम्ही गंमत म्हणू शकणार नाही. गंमत करण्यासाठी असतात ते क्लब्ज. मी त्या पुनर्वसन केंद्रातून बाहेर पडतोय न पडतोय तोच माझ्या भावानं मला बर्मिंगहॅममधील तळघरात असलेल्या त्या नव्या क्लबची ओळख करून दिली आहे आणि त्याच्या काही मित्रांशीही, ज्यांना त्याची आवड आहे.

ती मुलं काही एकदम उच्चभ्रू वगैरे नाहीत; पण स्टाफोर्डशायरमधील स्थिरस्थावर असलेल्या घरातील आहेत. ते दिसायला चांगले आहेत, क्लबमध्ये जाणारे उच्च दर्जाचे लोक. त्यांचे केस लांब वाढवलेले आहेत आणि ते डिझायनरनं केलेले कपडे वापरतात. त्यांच्यापैकी एक मार्क डाऊन्स आहे, हा माझा ताबडतोब चांगला मित्र होतो. तो उत्तम दर्जाच्या कार्स विकतो. नेल मॅसी हा डि. जे. म्हणजे डिस्क जॉकी आहे. तो विशीत असताना एक रेकॉर्ड कंपनी चालवत होता आणि मला भेटलेल्या कोणापेक्षाही त्याला संगीतातील जास्त कळतं. मी त्याला भेटलो आहे. तो तसा रासवट दिसतो; परंतु इतरांना नोकऱ्या आहेत, खऱ्याखुऱ्या नोकऱ्या, म्हणजे डिझाईन करायच्या किंवा वस्तू विकायच्या. याचा अर्थ ते सोमवार ते शुक्रवार कामावर जातात. यापूर्वी असे नोकऱ्या करणारे माझ्या मित्रांत कोणी नव्हते आणि त्यांच्याकडे सुंदर कार्स आहेत आणि त्यापैकी काहींनी स्वत:ची घरं विकत घ्यायलाही सुरुवात केलेली आहे.

मी त्यांना भेटता क्षणीच माझ्या लक्षात येतं, की माझे कपडे बरोबर दिसत नाहीत. मी तुरुंगातून आणि पुनर्वसन केंद्रातून बाहेर पडल्यापासून मला त्या सर्वांची कल्पनाही नाही आणि ते विकत घेण्यासाठी पैसेही नाहीत. मी थोड्या पैशांत घेतलेला जंपर वापरतो. तो गडद रंगाचा असल्यामुळे तसा चांगला आहे. त्यावर

एक आडवा पट्टा आहे. तो वाईट दिसतो आहे, हे मला कळतं.

आम्ही एकत्र क्लबला जातो. त्या क्लबच्या उबदार असलेल्या जागेत बसतो. मला एक छोटी, करडी आणि ठिपकेदार असलेली डाव्ह नावाची गोळी दिली जाते. माझी पहिली इ, म्हणजे इस्टसी. ती मी घेतो आणि मला ताड्कन छताशी पोहोचल्याचा भास होतो.

कुणीतरी माझ्या डोक्याची चेन सोडून माझी कवटी बाहेर काढलीय. ती इतकी प्रभावी आहे, की मिनिटभर माझा जबडा बंद होतो. मी तो हलवू शकत नाही. मग मी धावत मागे जातो आणि ओकारी टाकायला सुरुवात करतो, कारण जे काही घडतंय, ते विलक्षण आहे.

मी इस्टसीच्या उन्मादाच्या शिखरावर आहे. प्रत्येकावर, प्रत्येक वस्तूवर मी प्रेम करतो. मला शेन आणि माझ्या नव्या मित्रांजवळ बोलायचंय. प्रत्येकाशी ओळख असो वा नसो मला बोलायचंय. मला शंभर तरी लोकांत मिसळायचंय. त्या सर्वांना मी त्यांच्यावर प्रेम करतो, हे कळायला हवंय आणि ते संगीत आहे ४:४ तालाचं. ते पुरातन काळातील आहे. ती संमोहित करणारी लय ही इतिहास कालापासून अस्तित्वात आहे. ॲसिड हाऊसलाही लय होती; पण आता इस्टसी ही चालू ड्रग आहे. ॲसिड हाऊस हे टेन्को हाऊससारखं वरचं घर, गॅरेज असं आपलं रूप बदलतंय. इस्टसी संगीत ४:४ लयीचं आहे. ते इतकं जबरदस्त आहे, की ते तुमचा कब्जा घेतं आणि त्या प्रवाहात आपल्याला सामील करून घेतं, आपल्याला ताल धरायला लावतं. त्याच्या त्या उबदार आरंभस्थानात ते तुम्हाला इतकं गुंडाळून टाकतं, की जसं काही तुम्ही घरीच परतला आहात, त्यामुळे मी माझ्या नव्या मित्रांबरोबर रात्रभर अव्याहत नाच करू शकेन, असं मला वाटतं माझं त्यांच्यावर प्रेम आहे. मी माझे हात वर करतो आणि घामेजतो, माझे डोळे बंद करतो. आणि प्रेमाशिवाय मला काही जाणवत नाही. खरोखर मी उत्साहपूर्ण असा अनुभव घेत असतो. माझा पांढरा पट्टा असलेला जंपर ही आताची फॅशन नाही, हे काही महत्त्वाचं आहे का? नाही, ते नाही, कारण मी सर्वांवर प्रेम करतो. हे अतिशय छान आहे. मी चुत्या होतो तरी कुठे? मी इथे असायला हवं होतं! मी तुमच्यावर प्रेम करतो! आणि अहो, तुम्ही तिकडे असलेले, मी तुमच्यावरही प्रेम करतो!

मला रात्रभर नाचायचंय. मी त्या नाचाच्या जागेवरील दिव्यांकडे पाहतो आणि त्यांच्या शुभ्रतेचा आनंद लुटतो. मी माझ्या भावाकडे पाहतो. मी सुखात आहे, कारण मला भाऊ आहे. आम्ही ठीक आहोत आणि आमचे नातेबंध तसे घट्ट आहेत. मार्क डाऊन्सही इथे आहे. माझे मित्र माझ्याभोवती आहेत. इस्टसी हा जीवनाचा सोहळा आहे. इतर ड्रग्जसारखं हे नाही, त्यामुळे जगाची किंमत वाढते. हे ड्रग सामाजिक आहे. ते लोकांना एकत्र आणतं. ते टोळीयुद्धाच्या आणि फुटबॉलमुळे

होणाऱ्या हिंसेचा शेवट करतं. आपल्याला प्रेम हे काय आहे, याची आठवण करून देतं. ते फक्त आपल्यासाठी, थॅचरच्या पिढीतील लोकांसाठी आहे.

जेव्हा क्लब बंद होतो, आम्ही दुसरीकडे जातो. मग एका पार्टीला जातो. या वेळेपर्यंत शनिवारची दुपार होते. आम्ही झोपतो आणि जेव्हा जागे होतो, तेव्हा शनिवार रात्रीसाठी तयार होण्याची वेळ होते. आम्ही ते सर्व पुन्हा करतो आणि रविवार रात्री ते संपतं. त्या सर्व मुलांना सोमवारी सकाळी कामावर जायचं असतं.

माझं आयुष्य त्या स्टॉफोर्डशायर मुलांच्या क्रमात व्यवस्थित बसतं. आठवड्याच्या सुट्ट्या या पार्टीसाठी आणि करमणुकीसाठी असणारे ड्रग्ज घेण्यासाठी आहेत; परंतु जेव्हा ते त्यांच्या आठवड्याच्या कामावर जातात. माझं मन हळूहळू त्या नशेच्या उतारावर विरघळतं आणि मी आठवडाभर जॉडीबरोबर क्रॅक घेतो. ती तो ड्रग मला देते आणि ते इतकं चांगलं आहे, की ते विकत घेण्यासाठी ती अनेक विवाहित घाणेरड्या लोकांबरोबर झोपलीय, याकडे मी दुर्लक्ष करतो. तिचं काय काम आहे, याची मी पर्वा करत नाही. उन्मादाची उतरण, हा एक दुःखदायक अनुभव असून, त्यामुळे जीवनाचा अर्थच हिरावला जातोय, याची मी पर्वा करत नाही. ते ड्रग्ज आम्ही घाणेरड्या, तुच्छ जागेत ओढतोय, याचीही मला पर्वा नाही. ज्या धोकादायक लोकांकडून आम्ही ते रस्त्यावर विकत घेतोय, याचीही मला पर्वा नाही. मला काळजी वाटते, ती ते कसं मिळेल याची.

मागे त्या पुनर्वसन केंद्रात सांगितलं होतं, की क्रॅकची हेरॉईनसारखी शरीराला सवय लागत नाही. तुमच्या शरीराला क्रॅक घेण्याची गरज भासत नाही; परंतु त्याची मानसिकदृष्ट्या सवय जडते. एकदा ते घेतल्यावर तुमचं मन उन्मादाच्या टोकाला पोहोचतं आणि त्या ठिकाणावर तुम्हाला पुन्हा पुन्हा जावंसं वाटतं आणि माझ्या मनालाही तसंच वाटतं. आता मी स्वतःला त्याचं व्यसन जडलंय, असं मानत नाही. मी जॉडीकडे पाहतो आणि मला माहीत आहे, की ते व्यसन आहे.

आठवड्याच्या सुट्टीच्या वेळी मी पूर्णपणे नवा मार्क बनतो. माझ्या या नव्या आयुष्यासाठी पैशाची जरुरी असते. मग मी शहराच्या मध्यावर असलेल्या पेट्रोल स्टेशनवर काम पकडतो. ते भुयारातील पेट्रोल स्टेशन आहे. मी रात्रपाळी करतो. मी माझ्या काचेच्या बूथमधून रात्रीच्या जगाचा वेडेपणा पाहतो. मग बसमधून जाताना ते शहर जागं होताना पाहतो. मी एका आशियन गटाकडून चोरलेली क्रेडिट कार्ड्स विकत घेऊन, त्यांना काहीतरी विकलंय असं दाखवून पैसे घेतो आणि माझी मजुरी तिप्पट करतो.

त्यामुळे मी आता माझ्यावर खर्च करू शकतो. माझे कपडे गडद आणि रंगीत असतात. मी काळे कॅटरपिलर बूट, गडद रंगाच्या कॅन्व्हासच्या पँट्स आणि निळा बंद गळ्याचा शर्ट वापरतो. तो पांढरा पट्टी असलेला जंपर टाकून देतो. नेल मग

त्याबद्दल मस्करी करू लागतो, त्यामुळे मी त्यांच्यातील एक आहे, असं मला वाटू लागतं. प्रत्यक्षात मी नाहीये. ते सर्व एकत्र वाढले आहेत. मी नुकताच आलोय. त्यांच्याकडे चांगल्या नोकऱ्या आहेत, चांगल्या कार्स आहेत. मी पेट्रोल स्टेशनवर काम करतोय. माझ्याकडे कार चालवण्याचा परवानाही नाही. त्यांना गुन्हे केल्याबद्दल शिक्षा झालेली नाही आणि मी दोनदा तुरुंगवास भोगलाय. मला त्यांच्यासारखं व्हायचंय; पण मी तसा कधीही बनू शकणार नाही, कारण माझ्या जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात, ज्यामुळे मी आर्ट्स कॉलेजला गेलो होतो, त्या माझ्यात असलेल्या निर्मितीच्या लहरीमुळे मी त्यांच्यापासून मूलभूतच वेगळा आहे.

एका आठवड्याच्या सुट्टीत मी त्या मुलांबरोबर क्लबमध्ये गेलोय. क्लब बंद होतो आणि आम्ही सर्व कार्समध्ये जाऊन बसतो. नेलला माहीत आहे, की एका शेताच्या मध्यावर कुठेतरी पार्टी आहे. प्रत्येक जण तिचा शोध घ्यायला निघाले आहेत.

असं दिसतं, की आमच्यासारखे शेकडो कार्सच्या ताफ्यात बसून ती शोधत आहेत. फक्त आमच्यापैकी थोडेच तिथे पोहोचतात. बाकी सर्व जण गोल गोल फिरतात आणि घरी जातात; परंतु आम्ही गल्ल्या कुच्यातून टेकडीवर वर-खाली, अंधारात कुठेही न जाणाऱ्या लोकांसारखे कार चालवितो. मग आम्ही थांबतो आणि एका शेताजवळ कार्स थांबवितो. आम्ही नो व्हेअरला पोहोचलो आहोत.

ग्रामीण भागात हवेचा वास वेगळा येतो. तो काहीसा स्वच्छ आणि पातळ वाटतो, त्यामुळे तुम्ही लहानसाही वास एखाद्या झुडपाचा, झाडाचा, या रस्त्यानं गेलेल्या एखाद्या प्राण्याचा वास ओळखू शकता. माझी जाण तीक्ष्ण झाली आहे. मी शोधतोय, ऐकतोय. नीट लक्ष देऊन आहे, कारण मला माहीत आहे, की तिथे काहीतरी आहे. डोक्यावर आकाश काळं आहे, खरंखुरं काळं आहे. शहरात असतं तसं काळं नव्हे. मी वर पाहतो आणि मला तारे दिसतात.

आम्ही त्या गल्लीतून अडखळत दुसऱ्या उभ्या असलेल्या कार्सच्या बाजूनं खाली जात असताना एका कोपऱ्यावर वळतो. मग ताबडतोब आम्हाला ते संगीत जमिनीतून आल्याचं जाणवतं. आम्हाला ती थरथर जाणवते. ते उत्तेजित करणारं आहे. जणू काही काहीतरी विशेष घडण्याच्या बेतात आहे. आम्ही त्या आवाजाच्या दिशेनं जातो. हळूहळू आम्हाला जास्त जास्त ऐकू येतं. मी ते पार्टीचे दिवे बघण्याआधीच हळू आवाजात गात आहे. या संगीतात काहीतरी नवं आणि वेगळं आहे. त्याचा पाया ॲसिड हाऊसच्या संगीताचा आहे; पण ते जास्त खोल, जास्त ताजं आणि यापूर्वी मी ऐकलेल्या संगीतापेक्षा जास्त मधुर आहे. तो आवाज संमोहित करणारा आहे. मी त्यामुळे इतका आश्चर्यचकित झालोय, की क्षणभर मला चूपचाप राहावं लागतं. हे काहीतरी नवीन आहे. ते शुद्ध आहे आणि त्यात एक

विशेष स्वच्छता आहे.

सरतेशेवटी आम्ही ती पार्टी पाहतो. ती अतिशय सुंदर आहे, हे तुम्ही दुरूनही सांगू शकता. तिथे एक मोठा तंबू शेताच्या मध्यभागी आहे आणि कदाचित तीनशे चमकणाऱ्या सावल्या त्याभोवती चालत आहेत. आम्ही त्याकडे आकर्षले जातो, एखाद्या पतंगासारखे. त्या मोठ्या चमकणाऱ्या तंबूकडे आमचे डोळे लागलेले आहेत. आता आवाज मोठा आहे. त्याचा ठोका माझ्या सर्व शरीरातून जातो. ती थरथर जमिनीतून येते. ते उंच स्वर माझ्या डोक्यातून आरपार जातात आणि जेव्हा तो तंबू पडदे खेचून उघडतो, ते संगीत आम्हाला घेरा घालतं. मी एका नव्या जगात आहे.

एका बाजूला स्पिकर्सची भिंत आहे. तो डिस्क जॉकी हा चौकोनी, कठीण आणि थडग्याच्या दगडांसारख्या मजबूत असलेल्या मोठ्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर काहीसा चिमुकला वाटतो. बाकी सर्व हलत आहे. सर्व लोक एकत्र नाचत आहेत. ते सर्व एका मोठ्या प्राणिजीवनाचा भाग आहेत. त्यांना एकत्र घट्ट धरून ठेवलंय, ते ४:४ या लयीनं. त्यांचे चेहरे वेडेवाकडे झालेले आहेत. त्यांचे डोळे गरगरत आहेत. त्या सर्वांनी इस्टसी घेतलेली आहे आणि ते स्वत:च्या डोक्याच्या आतल्या बाजूला नाचत आहेत; परंतु ते एकत्रपणे मानवतेचा समुद्र आहेत. एकत्र हातवारे करत आहेत. प्रत्येक जीभ, हात, डोकं, पाय हा त्या मानवतेच्या समुद्राचा भाग आहे आणि त्या लयीवर तो हलत आहे. आम्ही इस्टसी घेतो आणि त्यांच्यात मिसळतो. मग आम्हीसुद्धा इथले होतो. आम्ही त्या लयीत आम्हालाही घेऊन जायला लावतो आणि ती आम्हाला पृथ्वीच्या कडेला नेते.

मी काही मायक्रोडॉट्स वाटतो. मायक्रोडॉट्स हे ॲसिड आहे; परंतु त्या गोळ्या आकारानं लायटरमध्ये असलेल्या गारगोटीच्या तुकड्याच्या एकचतुर्थांश आहेत. त्या आधीच असलेला विलक्षण अनुभव तीव्र करतात. मी जमिनीशी चिकटून राहतो. मी बुद्धिविभ्रमाजवळ गेलोय. तो उजेड, तो रंग, ते लोक यांचं सौंदर्य अलौकिक आहे. मला कळत नाही, की ही पार्टी कुठे थांबेल आणि मग माझी विभ्रमावस्था कुठे सुरू होईल.

माझे हात दुखताय का? एक माणूस काहीशा गूढ, प्रमाणबद्ध हातांच्या हालचाली पुन्हा पुन्हा करत आहे. जणू काही तो मोठ्या कॅनव्हासवर चित्र काढत आहे. जेव्हा तो जमिनीवर आपली बोटं फिरवतो, तेव्हा धुळीचे छोटे ढग वर उठतात. तो कित्येक तास असं हवेत चित्र काढत आहे. माझ्या लक्षात येतं, की मीही तेच करत होतो. नंतर माझे घोटे दुखतात का? मी खाली पाहतो. मला दिसतंय, की माझी पावलं आता दुमडलेली आहेत आणि मी घोट्यावर नाचत होतो. किती वेळ? कदाचित पाच मिनिटं, कदाचित पाच तास. हे त्या तंद्रीतील नाचणं आहे. मी त्या तंद्रीत आहे. तिथे त्या तंबूत पलीकडे एक मुलगी आहे. ती अतिशय सुंदरतेनं

नाचत आहे, की ज्यामुळे श्वास रोखला जातो. मी तिच्याकडे पाहतो आणि ती सांगत आहे, इकडे ये आणि मी तिला सांगतो, तेही माझे ओठ न हलविता किंवा न बोलता फक्त विचारानं, नको. मी जर असं केलं, तर सर्वांचाच नाश होईल आणि मी नाश नाही करू शकत. मी काय म्हणतोय, ते तिला समजतं आणि ती हसते. आम्ही न बोलता एकमेकांशी संवाद साधलाय. इस्टसी आणि ॲसिड यामुळे ज्या गोष्टी तुम्ही साधारणपणे पाहू शकणार नाही, त्या तुम्हाला दिसतात आणि तुम्ही काही लपवू शकत नाही. जर तुम्ही तिरस्कार करत असलात, तर तो दिसतो, जर तुम्ही कल्पक असाल, तर ते उघड होतं. दु:ख, आनंद, राग हे सर्व तिथे कुणालाही दिसण्यासारखं आहे, कारण तुमचं मन उघडं आहे.

जेव्हा सूर्य वर येतो, उजेड बदलतो आणि वातावरण बदलतं. गती मंदावते आणि त्या संगीतात एक नवीन माधुर्य येतं. त्यातील प्रत्येक स्वर वेगळा होतो. तो प्रत्येक स्वर माझ्या कण्याच्या हाडांना चिकटतो, त्यामुळे मी जेव्हा मान खाली-वर हलवतो, मला वेगवेगळे स्वर जाणवतात.

येथील प्रत्येक जण माझ्यासारखा आहे, तरुण आणि सुंदर. आमचे चेहरे जीवनरसानं उजळलेले आहेत. मुलींचे कपडे त्यांच्याभोवती एका खास नजाकतीनं गुंडाळलेले आहेत. त्या बेफामपणे जलदपणे किंवा मंद नाचतात; पण विक्षिप्तपणे कधीच नाही. ते प्रवासी आहेत, हिप्पींसारखे किंवा हिप्पी आहेत आणि त्यापैकी बरेचसे दुसरीकडे ठार वेडे ठरतील; पण इथे त्यांचा हा रासवटपणा योग्य आहे आणि सुंदर आहे.

त्या तंबूत खांबाखांबापासून रेशमी कनाती निरनिराळ्या रंगात लावलेल्या आहेत. पहाटेचा उजेड त्या रेशमातून, त्या नाचणाऱ्यांभोवती चमकत आहे. ते दृश्य मोठं सुंदर आहे. मी इथला आहे. ही माझी जागा आहे. मी इथेच असायला हवं, क्लबमध्ये नव्हे, कारण क्लब हे निवडक असतात; परंतु ही जागा आणि हे लोक समावेश करून घेणारे आहेत आणि त्यांनी माझा समावेश करून घेतलाय. जेव्हा एक मुलगा शेतकरी असल्याचा बहाणा करत त्या तंबूत ट्रॅक्टर घुसवतो, आम्ही त्याला हसतो, तेही आम्हाला रडू फुटेपर्यंत, कारण तो शेतकरी नाही, तर आमच्यापैकी एक आहे.

ते संगीत डीप हाऊसचं आहे. अमेरिकेतून नुकतंच आलेलं. एक दिवस आणि रात्रीनंतरही ती पार्टी इतकी जादूमयी आहे, की मी तिचा तिरस्कार करतो. मला हा अनुभव दूर सारायचा आहे, कारण मला माहीत आहे, की तो माझं आयुष्य बदलून टाकणार आहे. केवळ बदलून नव्हे, तर नष्ट करून. मला माहीत आहे, की हे माझं प्रारब्ध आहे आणि मला यात काही पर्याय नाही.

■

२०

बर्मिंगहॅम शहराच्या मध्यावर जॉडीला शोधण्यासाठी मी बसमध्ये आहे. ही रविवारची थंड रात्र आहे. मी क्लबमध्ये नाचत होतो. मग एका फुकट पार्टीसाठी गुरुवारपासूनच गेलो होतो. आता ते सर्व संपलंय. ती सर्व मुलं त्यांच्या स्टाफोर्डशायरला असलेल्या घराकडे रात्रीच्या झोपेसाठी आणि उद्या नोकरीवर जाण्याआधी ठीक होण्यासाठी परतलीयेत. माझ्या बाबतीत म्हणाल, तर मी थांबू शकत नाही. जर करमणुकीसाठी घेतलेले ड्रग्ज संपले, तर मग मी जॉडीला शोधेन आणि त्याऐवजी थोडं क्रॅक ओढेन. मला जॉडी हवीय. आणि या घडीला ती एका निवृत्त पाद्री असलेल्या आपल्या ममाला भेटायला गेलीय. ती शहराच्या खालच्या बाजूला असलेल्या घाणेरड्या काँक्रीट हाऊसिंग इस्टेट इथे राहते.

माझं डोकं तसं आतून ठीक वाटत नाहीये. या आठवड्याच्या सुट्टीत मी जरा जास्तच ड्रग घेतलं असावं. गुत्त्यात आम्हाला बिनो नावाचा एक दांडगा काळा, ड्रगचा व्यवसाय करणारा माणूस भेटतो. त्याला मी माहीत आहे, कारण मी त्याच्याबरोबर तुरुंगात होतो. जेव्हा तो मला प्रेमानं भेटतो, तेव्हा इतर जॅमेशीयन्सना त्याचं आश्चर्य वाटतं.

तो जेव्हा माझ्या हातात पटकन काहीतरी सारतो, तेव्हा मला आश्चर्य वाटतं. तो क्रॅकचा मोठा दगड आहे.

"घे, नाही म्हणू नकोस." तो आग्रह करतो. "जुन्या मैत्रीसाठी."

मी त्याचे आभार मानतो आणि जॉडीच्या ममाच्या फ्लॅटवर जातो. जॉडी त्या काँक्रीटच्या परिसरात जवळजवळ नाचतच वर जाते; पण मला संशय येतो, काहीसा रागही.

"बिनोनं हे मला का द्यावं?" मी सारखा विचारत असतो.

"कारण त्याला तू आवडतोस! त्याला तू इतका आवडतोस, की त्यानं ती स्वीटी तुला दिलीय." जॉडी आनंदानं ओरडते. ती अजूनही नाचत असते, हसत

असते. ती क्रॅकला स्वीटी म्हणते. तिचा क्रॅकसाठी हा खुणेचा शब्द आहे.

मी माझी मान हलवितो.

"नाही, चूक करत आहेस. त्यानं हे दिलंय ते मी त्याला आवडतो, म्हणून नव्हे, त्यानं हे दिलंय ते मला व्यसन लागावं म्हणून. त्यानं तो दगड मला दिलाय, कारण मी त्याच्या नियंत्रणाखाली यावं म्हणून."

"त्याला तुझ्यावर ताबा मिळावा असं त्याच्याकडं काय आहे? आपण दोघं ते एकत्र ओढणार आहोत. तू आणि मी." जॉडी माझा हात हातात घेत म्हणते. मी तो दगड खिशात ठेवतो आणि तिला दूर सारतो.

ती मोहकपणे सांगते, "आपण तुझ्या फ्लॅटवर जाऊ आणि...."

"नाही,"

ती माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पाहते. तिच्या बोलण्याच्या प्रयत्नांना मी काही दाद देत नाही.

तिची ममा दिवाणखान्यात टीव्ही बघत असते. तिच्या अवतीभवती जॅमेकन स्मरणार्थ वस्तू आणि फोटो आहेत. आम्ही तिच्याकडे दुर्लक्ष करतो. मी बाथरूमकडे जातो.

"तू काय करतोयस?" जॉडी विचारते. ती माझ्या पाठोपाठ येते. जणू ती नाळवारेनं त्या दगडाला जोडलेली आहे.

"या इथे कुणाचा प्रभाव आहे, ते मी त्याला दाखवून देणार आहे." मी म्हणतो. मला अजूनही ठीक वाटत नाहीये. मला ओकारीही येईल. माझे डोळे दुखत आहेत. माझ्या शरीरातून सर्व अवयवांत रक्त एवढ्या जोरात वाहत आहे, की जेव्हा ते माझ्या कानांतून जातं, तेव्हा ते बधीर होतात.

"थांब," जॉडी ओरडते. मी काय करणार आहे, याची तिला कल्पना नाही; परंतु तिचा अंदाज बरोबर आहे. "थांब, थांब. हा चुता वेडेपणा थांबव. ती जी माथेफिरू गोष्ट तू करणार आहेस, ती थांबव, थांबव."

मी जेव्हा तो दगड संडासच्या भांड्यात टाकतो, तेव्हा जॉडी तो पकडायला पुढे होते. मी तिला मागे खेचतो. मी संडासची साखळी खेचून त्याचा निचरा होऊ नये, म्हणून मला अडवायचा ती प्रयत्न करते. या वेळेपर्यंत ती किंचाळत आणि हुंदके देत असते. मी तो दांडा खेचतो आणि नंतर जॉडीला घट्ट धरून ठेवतो, की त्यामुळे ती संडासाच्या भांड्यात हात घालणार नाही, त्या पाइपात बर्मिंगहॅमच्या गटारात, आम्ही तो जाताना बघतो, खिळून उभे राहतो. तो दगड जेव्हा काही वेळ गरगर फिरून नाहीसा होतो, तेव्हा मला हरवल्याची तीव्र भावना जाणवते.

जॉडीला तर भयंकर वाटतं. अगदी नरकच. एखाद्या कंजूषानं वीस पौंडाची नोट वाऱ्यानं दूर जाताना पाहावी, तसं हे आहे. एखाद्या खाण कामगारानं सोन्याची

लगड खाली भगदाडात टाकण्यासारखं हे आहे. ते म्हणजे जीवनच त्या भांड्यात नाहीसं होण्यासारखं आहे. ती जमिनीवर पडून फेफरं आल्यागत किंचाळत आणि रडत असते. मी खाली पडलेल्या तिच्याकडे पाहतो. मला तिला लाथ मारावीशी वाटते. हे मला याआधी कधी वाटलं होतं? हं, बरोबर, घरी. जेव्हा मी लहान होतो, तेव्हा. डॅडी एखाद्या खडकासारखे स्तब्ध उभे असतात आणि त्या वेळी ममा त्यांच्या पायाशी किंचाळत, वळवळत असते. मी जॉडीकडे बाजूला थंड उभा राहून पाहतो. मी स्वत:ला प्रश्न विचारतो, की मी डॅडी झालोय आणि जॉडी ममा बनलीय. नंतर मी वर पाहतो आणि जॉडीची ममा दरवाजाशी उभी असलेली पाहतो. तिच्या गोल, काळ्या चेहऱ्यावर गोंधळल्याचे भाव आणि प्रश्नचिन्ह आहे.

मग बऱ्याच वादावादीनंतर आम्ही घरी जायची बस पकडतो. जॉडी माझ्याशी बोलत नाहीये. त्या बसच्या वरच्या मजल्यावर आम्ही दोघंच असल्यामुळे आम्ही स्लीफ ओढतो.

मला भयानक वाटू लागतं. मी डोळे बंद करतो आणि काही क्षण मला काही समजत नाही.

"तू ठीक आहेस ना?" जॉडी काळजीच्या स्वरात विचारते. ती माझ्याकडे टक लावून पाहतेय.

मी माझ्या तोंडाला हात लावून पाहतो. ते ओलं झालंय. मी माझ्या बोटांकडे पाहतो. त्यावर रक्त आहे. ते कुठून येतंय?

जॉडी घाबरते आणि न थांबता हसत सुटते. ती माझ्याकडे नजर टाकते आणि पुन्हा ती नजर फिरवते. त्याचा निष्कर्ष मी एवढाच काढतो, की मी ठीक दिसत नाही. मला खरंच बरं वाटत नाहीये. मला असं वाटतंय, की मी आतून पेट घेतोय. माझ्यातून काहीतरी फुटून बाहेर पडणार, अशी भावना एवढी तीव्र होते, की जर मी त्या बसची खिडकी सताड उघडू शकलो असतो, तर ते बाहेर पडावं यासाठी मी बाहेर उडी मारली असती.

मी त्या जिन्यावरून कसाबसा खाली उतरतो. ती अजूनही हसतेच आहे. माझे दात वाजत असतात. माझं तोंड ओलं असतं. ड्रायव्हर बस थांबवतो. तो त्याच्या जागेवरून खाली उतरतो. तो माझ्याकडे काळजीनं येतो.

"हे पाहा मित्रा, तुला हॉस्पिटलमध्ये जायला हवं." तो म्हणतो.

जॉडी त्याला खात्रीनं सांगते, की मी इथून अर्ध्या मैलावरच राहतो आहे आणि तरीही ती वेड्यासारखी हसतच असते आणि तो तिच्याकडे दुर्लक्षच करतो.

"इथे पलीकडे टॅक्सीज विडी-काडी आणि चहासाठी थांबतात." तो रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका छोट्या झोपडीकडे बोट दाखवतो. "त्यापैकी एक तुला हॉस्पिटलला घेऊन जाईल."

परंतु मला माहीत आहे, की मी जाऊ शकणार नाही. हॉस्पिटल हे मला काहीसं हुकूमशहा वाटतं आणि मी हुकूम टाळतो. मी जॉडीच्या मदतीनं लडखडत खाली उतरतो. ती अजूनही वेड्यासारखी हसत आहे. ती घाबरलेली आहे; पण तिचं हसू त्या स्वप्नातीत जगाला अद्वितीय असं तत्त्व जोडत आहे. तरीही ती मला टॅक्सीचालकांच्या त्या झोपडीकडे घेऊन जाते. तिथे एक चालक दोन पट्ट्या असलेल्या विजेच्या शेगडीवर स्वत:ला शेकवत असतो. मी तेथील फुटक्या आरशात माझ्या चेहऱ्याकडे बघतो. तिथे जिकडेतिकडे रक्त आहे आणि ते माझ्या डोळ्यांतून येतंय.

तो ड्रायव्हर मला म्हणतो, की तो मला सरळ ए ॲन्ड इ कडे घेऊन जाईल.

मी हरकत घेतो आणि जॉडीही खिदळण्याच्या उकळीवर उकळी येत असताना हरकत घेते, त्यामुळे तो ड्रायव्हर मला त्याऐवजी घरी घेऊन जातो आणि जॉडी मला रजईत गुंडाळून झोपवते. मला सकाळपर्यंत जास्त काही आठवत नाही. मी जागा होतो. जॉडी गेलेली असते. मला खात्री आहे, की मी मेलो असं वाटल्यामुळे ती गेलीय. मी जेव्हा मेलो, तेव्हा तिला तिथे थांबायचं नव्हतं.

माझे डोळे अजूनही रक्ताळलेले आहेत; पण बाकी मी ठीक आहे. ही समस्या कशामुळे उद्‌भवली असेल? मी गुरुवार ते रविवारच्या दरम्यान दहा इस्टसी घेतल्या आहेत, त्याशिवाय काही वीड आणि कोक. कदाचित, इस्टसी गोळ्यांची वाईट बॅच आली असावी. इस्टसी गोळ्यासंबंधी तुम्ही काही सांगू शकत नाही. ते मिश्रण एमडीएमए या रसायनापासून बनवलेलं आहे आणि त्या रसायनाची अनेक शेकडो भावंडंही आहेत. त्याचा हा असा गुंतागुंतीचा कुटुंबवृक्ष असल्यामुळे तुम्हाला तुम्ही नक्की काय घेताय, ते कशापासून बनवलंय, ते नक्की समजू शकत नाही.

त्या बसवरच्या प्रसंगानंतर मी खूप घाबरलोय. प्रथमच मी मनाशी विचार करतोय, की ही ड्रग्ज मला काय करतायत? मी इस्टसी सोडायचं ठरवतो. माझा हा निश्चय आठवडाभर टिकतो. त्या आठवड्यात जेव्हा जेव्हा मी डोळे बंद करतो, मला त्या करड्या रंगाच्या दगडाचं घाणेरडं प्रतिबिंब पाण्यात गरगर फिरत असल्याचं आणि त्या भांड्यातून खाली खेचलं गेल्याचं दृश्य दिसतं. मी ते का केलं? मला काहीतरी हरवल्याची, पश्चात्तापाची भावना सतावू लागते. जणू काही कुणीतरी माझ्या जवळचं त्या रविवारी मृत झालंय. दुसरा आठवडा येतो आणि पुन्हा मुक्त पार्टी आणि अर्थात इस्टसीच्या आणखी गोळ्या. शेतातील तंबूतील त्या आश्चर्यकारक अनुभवानंतर मी जेव्हा शक्य होतं, तेव्हा प्रत्येक मुक्त पार्टीला गेलोय आणि त्या पार्ट्या, पहिल्या पार्टी इतक्याच चांगल्या आहेत. जो गट ही पार्टी चालवतो, त्याचं सामूहिक नाव आहे डीआयवाय. तो जरी गट असला, तरी ते सर्व स्वभावानं

बंडखोर आहेत. तिथे कुणीही काही चालवत नाही. डीआयवाय याचा अर्थ डु इट युवरसेल्फ म्हणजे स्वत:च नियम करा आणि तुम्हाला हव्या तशा गोष्टी करा किंवा डीआयवाय म्हणजे तुमच्यातील सैतान असाही अर्थ असेल. या पार्टीमधून कोणीही फायदा कमावत नाही : हे लोकांनी केलेलं आहे, लोकांसाठी आहे. मग हे दिवसें दिवस चालतं आणि त्याला काही ओळखू शकाल, अशी सुरुवात किंवा शेवट नाही. तेथील संगीत हे इलेक्ट्रॉनिक आहे आणि त्याची उत्पत्ती ॲसिड हाऊसपासून झालीय; परंतु त्याला त्याचे खोल, वेगळे असे गुणधर्म आहेत. विशेषकरून तिथे खालच्या स्वरांमुळे जाणवणारा थरकाप. आम्ही दहा किंवा शेकड्यांनी एकत्र जमतो. जे काही आम्हाला एकत्र आणतं, ते घट्ट पकडून ठेवतं आणि त्याचं रूपांतर आमच्यासाठी अद्वितीय शैलीत होतं. आता इथे, अगदी आता डीआयवाय हे आमच्यासाठी आहे. आम्ही थॅचरची मुलं आहोत, आता मोठी झालेली आणि १९८० मागे टाकणारी.

या आधीच्या पिढीला संगीत म्हणजे बँडवादन; परंतु आमच्यासारख्या मुलांना डिस्क जॉकी हा देव आहे. त्यानं योग्य असं संगीत योग्य वेळी निवडलं पाहिजे. तो जमलेला जमाव ओळखतो आणि त्यांना त्या संगीताच्या प्रवासाला घेऊन जातो. तो बासरीवाला आहे आणि आम्ही त्याच्यामागून जाणारी मुलं. एखादा चांगला डिस्क जॉकी तुम्हाला नाच करायला लावेल, मग तो तुमची गती कमी करेल, सुखाकडे नेईल आणि दरवाजातून अंधारात. तो तुम्हाला शांत करील, उत्तेजित करील आणि तुम्हाला मार्गही दाखवील. प्रत्येक रात्र ही वेगळी आहे आणि प्रत्येक रात्र ही जिवंत कलेचा नमुना आहे, ज्याची पुनरावृत्ती होऊ शकत नाही किंवा ते पुन्हा निर्माण करता येत नाही. जरी तुम्ही ते रेकॉर्ड केलंत, तरी त्याची पुन्हा प्राप्ती करता येत नाही, कारण ती कलाकृती त्याच वेळी, त्याच ठिकाणी घडते आणि काही डीआयवायचे डिस्क जॉकी सर्वांत उत्तम अशी कलाकृती उत्पन्न करतात.

हळूहळू माझी त्या लोकांशी ओळख होते. तिथे एक डिस्क किंग, सायमन हा संचाचा जुना जाणता महापितासमान माणूस आहे. तो चालण्याच्या काठीसारखा बारीक आहे; परंतु तो आकर्षक आहे, कारण त्याचा स्वभाव तुम्हाला त्याच्या चेहऱ्यावर दिसतो, गोड आणि दयाळूपणाचं टोक. अन्यथा डिग्ज आणि बुश नावांनी ओळखले जाणारे रिक आणि पीट हेही हात सैल सोडणाऱ्या आणि पैशाबाबत आणि जीवनाबाबत बेफिकीर असलेल्या व्यक्ती आहेत. रिक हा खूप उंच आहे. तो फिजिक्सचा गॅज्युएट आहे आणि पीटसुद्धा ग्रॅज्युएट आहे; पण तो लहानखुरा आहे. अवघा पाच फूट. ते नेहमी एकत्र वाजवतात, त्या वेळी त्यांच्या उंचीतील फरक काहीसा विचित्र वाटतो. त्यानंतर तिथे आहे शेफिल्डचा डिस्क जॉकी. त्याला कॅलम म्हणतात. दुसरा आहे जॅक. आश्चर्य म्हणजे तो केंडॉलकडचा आहे आणि तो तिथे

असताना मला माहीत नव्हता. लाल केसांचा कुकी, पहिल्या पार्टीच्या वेळी तंबूत ट्रॅक्टर घुसवून ज्यानं आम्हाला हसवलं होतं तो हॅरी, त्याची मैत्रीण बार्बारा आणि दोन डिस्क जॉकी असलेल्या मुली पिप आणि एमा. हे सर्व बहुतेक ग्रॅज्युएट आहेत. काही नॉटिंगहॅम युनिव्हर्सिटीचे आहेत. ते सर्व आकर्षक, संगीताची जाण असलेले, निर्मितीक्षम, काहीसे बेबंद आणि हुशार आहेत. ते प्रश्न विचारत नाहीत किंवा निवाडा करत नाहीत. वर्तमानात कसं जगायचं, ते त्यांना माहीत आहे. माझं सामाजिक जीवन मुक्त पार्ट्यांच्याभोवती गुंफलेलं आहे.

आज रात्री डीआयवाय हे बर्मिंगहॅम क्लबसाठी वाजवतायत. ते असं क्वचितच करतात. याला ॲटीक असं म्हणतात. तिथे समलिंगी लोकांचा एक मोठा गट आहे. आम्ही मायक्रोडॉट्स गोळ्या घेतल्यात. मी नाचत असताना मला असं वाटतंय, की मी तलवार आणि भाला घेतलेला झुलू योद्धा आहे. मी अडखळून पडताना जमिनीचा आधार घेतो. मी नाचतो, एखाद्या वेड्यापिशासारखा.

अचानक, मला इथल्या वातावरणाशी विसंगत असा कसलातरी विचित्र वास येतो, गाईचं शेण... गाईचं शेण? ते संगीत तीव्र होतं आणि त्यात एक वेगळी पारदर्शकता येते, त्यामुळे मी हिंदकळतो. मी वर पाहतो आणि माझ्या लक्षात येतं, की त्या डिस्क जॉकीच्या आणि त्यांच्या त्या स्पीकर्सच्या भिंतीमागे एक खूप मोठी काळसर आकृती अस्पष्टपणे दिसत आहे. तो डिस्क जॉकी कदाचित सहा फूट उंच असेल. त्याच्या मागे असलेली ती अंधुक आकृती कमीत कमी नऊ फूट तरी असावी. मला तिची बाह्यरेषा स्पष्ट दिसते. ती माणसाच्या आकारात आहे. केस कुरळे आहेत आणि त्या आकृतीला शिंगं आहेत. दुसऱ्या कुणीतरी ते पाहिलं असावं, या आशेनं मी आजूबाजूला पाहतो; परंतु ते नाचणारे त्या संगीताच्या गहनतेत गुंतलेले आहेत.

मी पुन्हा स्टेजकडे पाहतो. ती खूप मोठी अर्धमानवी, शिंगं असलेली अंधुक आकृती अजूनही तिथे वर उभी आहे. मी टक लावून पाहतो. ती तशी क्रूर आकृती तिच्या असण्यामुळे पण ती तिथे असल्यामुळे मला काहीसा दिलासा मिळतो. मला वाटतं, मला तू माहीत आहेस. मी तुझ्यापैकी एक आहे आणि तू माझी काळजी घेशील. तो तसा म्हातारा आहे, माणसासारखा कदाचित त्याहूनही म्हातारा आहे.

मी जेव्हा पुन्हा पाहतो, ती गडद सावली गेलेली असते.

घरी जाताना मला आठवतं, की अनेक वर्षांपूर्वी मी जिन्यावरून खाली आलो होतो. तेव्हा जॅक फ्रॉस्टला बागेच्या भिंतीवर बसलेला आणि माझ्याकडे त्याच्या त्या बर्फाच्या खड्यासारख्या डोळ्यांनी बघत असताना पाहिलं होतं. तो जॅक होता याबद्दल मला कधीच संशय नव्हता किंवा मी त्याला पाहिला, याबद्दलही. ॲटिकमधली ती सावली कोण आहे? जेव्हा इतर सर्व कामावर जातात, मी बर्मिंगहॅमच्या सार्वजनिक लायब्ररीत जातो. एक ग्रीक पुराणावरचं पुस्तक मिळवतो, कारण

तेथील लायब्ररीयन मला ते सर्वांत प्राचीन अशा आख्यायिकांवरचं पुस्तक असल्याचं सांगते. आणि जी छाया मी पाहिली, ती अत्यंत प्राचीन आकृत्यांपैकी होती, हे मी जाणतो. मी संगीताचा देव पॅन आणि दूरवरच्या टेकड्यांविषयी वाचतो. तो देव स्पष्ट संगीत ऐकू आल्यावर दिसतो. पॅन बासरी वाजवतो. पॅन नेहमी ॲटिकला, जिथे तरुण मुलं आपलं बौद्धिक कसब आणि शारीरिक शक्ती दाखवायची तिथे बरेच वेळा हजर असायचा. ॲटिक क्लब आणि तेथील समलिंगी अनुयायी यांचं एक नातं. जेव्हा ते संगीत एका टिपेला पोहोचेल, त्या वेळी दिसलेली ती छाया आणि पुस्तकात दिसलेलं माणसासारख्या, पण शिंग असलेल्या प्राण्याचं चित्र या सर्वांमुळे माझी खात्री पटलीय, की मला पॅन देवाचं दर्शन झालंय. तो आमच्या पार्ट्यांना हजर असतो.

त्या हिवाळ्याच्या शेवटी एका बर्फानं भरलेल्या दरीत शेफिल्डला एका पुरातन धान्याच्या कोठारात भरलेल्या डीआयवायच्या मुक्त पार्टीला मी हजर आहे. ढोलाच्या थरथरण्यानं त्या जागेला स्वत:ची अशी एक ऊब येते. मी नाचत आहे. ते संगीत मला जाणवत आहे. अचानक, ते पारदर्शकतेच्या एका नव्या टिपेला पोहोचतं. अचानक, पॅनची बासरी ऐकू येते. त्या खोलीच्यामध्ये जाणवणाऱ्या तीव्रतेत आणि त्या आवाजाच्या धुमश्चक्रीत ते मधुर स्वर आलेले मला जाणवतात. मी वर पाहतो आणि तो तिथे आहे. सायमन डिस्क किंगच्या मागे त्याची मोठी छाया दिसते. त्यापुढे सायमन डी के आणि त्याचे ते स्पीकर्स हे छोट्याशा कापलेल्या पुठ्ठ्याच्या प्रतिकृतीसारखे वाटतात. पॅनचा चेहरा दिसत नाही; पण तो तोच आहे, हे मी जाणतो.

मी ॲसिड घेतलंय. मी काही उन्मादित झालेलो नाही आणि जे माझ्या हृदयाला भिडतं आहे, ते मी पाहतोय. मी आजूबाजूला पाहतो. ती सर्व जागा एका विभ्रमावस्थेच्या आणि भावनातिशयाच्या टोकाला पोहोचलीय. प्रत्येक जण आपल्या त्या बेफाम नाचात दंगलंय. ते संगीत इतकं कर्णभेदक आणि सुंदर आहे, की ते मला रडू आणतं. मी पुन्हा पॅनकडे पाहतो आणि काही मिनिटं तो तिथे आहे. तो काहीसा क्रूर आणि गूढ आहे, तरी मला माहीत आहे, की तो आपल्या मुलांकडे पाहून हसत आहे. तो आमचा मित्र आणि संरक्षक आहे. नंतर तो जातो. कुणीतरी माझी काळजी करतोय, अशी उबदार भावना मला देऊन तो निघून जातो. मी त्या प्राचीनतेचा एक भाग आहे आणि हे अगदी थोड्या लोकांनी थोड्या पिढ्यांत अनुभवलेलं असेल. मला खात्री वाटते, की या बेफाम, सुंदर आणि अमर्यादित पार्ट्या या अनंत अशा दंतकथेतून आलेल्या आहेत. मी इथे असल्याचा मला विशेष हक्क असल्यासारखा वाटतो. मला माहीत आहे, की या इथल्या लोकांबरोबर मीही त्या प्राचीन देव पॅनचा आहे.

■

२१

एका रविवारी रात्री बर्मिंगहॅममध्ये जॉडी पाइप तयार करत आहे. मी ती काय करतेय, ते पाहतो. माझं मन मी आठवड्याची सुट्टी घालवली, त्या बाहेरच्या रानटी जागेतून या आत्ता मी असलेल्या जागेकडे वळतं.

जॉडीनं आणलेलं क्रॅक आम्ही संपवतो. मला आणखी हवंसं वाटतं. मला नेहमीच आणखी हवं असतं; पण या वेळी मला त्याची तीव्रतेनं गरज आहे. मला आणखी हवंय. त्या मुक्त पार्टीच्या आश्चर्यजनक अशा अनुभवानंतर मी क्रॅक उतरण्याच्या वेळेला तोंड देऊ शकत नाही. ॲसिड, इस्टसी यांच्या गेल्या कित्येक दिवसांच्या उन्मादानंतर मी जिवंत असल्यासारखं मला वाटत होतं; पण या क्रॅकची नशा उतरण्याच्या प्रक्रियेला मी तोंड देण्याचा प्रयत्न करतो; पण हे सारं माझ्या आवाक्याबाहेरचं आहे.

"जा मग," मी तिला सांगतो, "आणखी घेऊन ये." मी तिला काय करायला सांगतोय, ते तिला कळतं. रस्त्यावर जा आणि एखाद् दुसरी युक्ती वापर.

ती कपडे करते. जॉडीला पुरुषांना आकर्षित करायला एखाद्या वेश्येसारखे कपडे करायला लागत नाहीत. ती आपल्या जीन्स घालते आणि सुंदर दिसते. ती रमतगमत रस्त्यावर फिरते. कोपऱ्यावर वळून पार्ककडे जाते. मी वाट पाहतो. अंघोळ करतो. मी आणखी वाट पाहतो. माझा घसा कोरडा झालाय. त्यावर आम्ही ओढलेल्या राखेचा थर झालाय. फ्लॅटमधील शांतता, नशा उतरतानाची खोलवरची भीती आणि भयानक विचार वाढवत आहे. आता मला संशय येतो, नाही मला खात्री आहे, की जॉडी मला फसवत आहे. ती तीन गिऱ्हाईक पटवील आणि मला दोनच मिळाली असं सांगेल किंवा ती कोणाबरोबर तरी कारमध्ये बसेल आणि ते गुप्त ठेवील. मग ती क्रॅक घेऊ शकेल, यापेक्षा कमी क्रॅक घेऊन परतेल किंवा ती क्रॅक विकत घेईल आणि त्यातील अर्धंही मला देणार नाही.

या शक्यतेमुळे मला कुणीतरी शारीरिक पकड घातल्यासारखं वाटतं. जणू

काही एक पोलीस हळूच आलाय आणि त्यानं मला हाताची पकड घातलीय. मी मागे वळतो. तिथे कुणीच नाहीये. मी पुन्हा वळतो. कुणीही नाही. फक्त शांतता. मला हे माहीत आहे, की हा मंकीज पॉ आहे. क्रॅकची नशा उतरत असतानाच्या कोणत्याही क्षणी तुम्हाला कुणीतरी पकडणार या भावनेला दिलेलं हे नाव. त्या शांततेत माझी विभ्रमावस्था ठिबकत असते. माझी पोलिसांची भीती, माझ्या विश्वास-घाताची भीती. जॉडी ही राक्षसी, हावरट, व्यसनी कुत्री आहे. ती नक्कीच मला फसवण्याची योजना आखत आहे.

मी उठून ती काय करतेय, हे पाहण्यासाठी जाणार, तेवढ्यात मला तिचा आवाज खालून ऐकू येतो. तिला कोणीतरी गिऱ्हाईक मिळालंय. मी ऐकतो. तो तिच्यापुढे काही अडचणी उभ्या करत नाही ना, याबद्दल मी खात्री करून घेतो. मग तो माणूस गुपचूप निघून जातो. मग आणखी एक गिऱ्हाईक येतं. मग थोड्या वेळानं जॉडी ड्रग घ्यायला जाते. या क्रॅकच्या प्रत्येक व्यवहारातील प्रत्येक क्षण हा धोक्याचा आहे. हे काही पोलिसांच्यामुळे नव्हे. त्याची घासाघीस धोक्याची असते. पैसे देणं धोक्याचं असतं. क्रॅकच्या ऐवजी त्यानं पोलोच्या गोळ्या दिल्या आहेत, ही भीती आणि याबद्दल तुम्ही काहीही करू शकत नाही, कारण तुम्हाला सुरा भोसकला जाईल. हे धोक्याचं आहे. रस्त्यावर ड्रग घेणारा कोणीही धोक्यात असतो, कारण ते वापरणार आहे म्हणून तो विकत घेतो. क्रॅकचा धंदा करणारे अनेक, अगदी जुन्या जमेकन्सपासून ते काळी बीएमडब्ल्यू कार वापरणारे, नवीन पांढरी कॉलर वापरणारे तरुण हे क्रॅक न वापरण्याचा प्रयत्न करतात. जेव्हा ते विकत असतात, तेव्हाच त्याला स्पर्श करतात. जोपर्यंत ते आपल्याकडे माल दाबून ठेवतात त्यांना त्याचा फायदा घेता येतो. मला त्यांच्या या ताकदीचा राग येतो.

जेव्हा ती परत येते, तेव्हा मी जॉडीसाठी आणि क्रॅकसाठी तयार असतो.

ती आपले कपडे काढते. तिनं किती पैसे मिळवले आणि किती खर्च केले, याची मी उलट तपासणी घेतो. मी ते कंडोम्स मोजतो आणि तिनं मला बनवलं नाही, याबद्दल जेव्हा माझी खात्री पटते, तेव्हा ती शेवटी पाइप तयार करते.

मी काही मला ड्रगचं व्यसन आहे, असं मानत नाही. जंकी लोक आहेत, जे त्याची इंजेक्शन्स घेतात आणि रस्त्यावर राहतात; पण काही वेळा माझ्या लक्षात येतं, की मी काही मुलांपेक्षा जास्त ड्रग घेतोय. मी त्यांच्याहून बारीक आहे आणि निस्तेज आहे. मी त्यांच्यापैकी एक दिसत नाही. स्टॉफोर्डशायरचा घोळका हा फक्त करमणुकीसाठी ड्रग घेतो. हल्ली त्यांच्या पार्ट्याही कमी झालेल्या आहेत.

मार्क डाऊन्स माझ्याकडे बारकाईनं पाहतो.

"मित्रा, जरा बेतानं," तो सांगतो.

मी त्याच्याकडे पाहून डोळे मिचकावतो, "खरं?"

मला आता निर्बंध लावायचे नाहीत. मला नेहमीच आणखी ड्रग हवे असतात. मला ती पार्टी कधी संपू नये, असं वाटतं. मी माझ्या ड्रगच्या वापरावर बंधन घालू शकत नाही. मला इच्छाही नाही. जे काही मिळतंय, ते मला हवंय. माझे नवे मित्र, प्रवासी आणि पार्टीतील लोक, हे असेच बेबंद आहेत. त्यांच्या जीवनाला काही शिस्त नाही किंवा रचना नाही.

चाकांवरची घरं काही पार्टीजच्या ठिकाणी असतात. तिथे बहुतांशी कॅक्र असतं. या मुक्त पार्ट्यांमध्ये जडशीळ अशी ड्रग्ज घुसू लागली आहेत आणि आता आम्ही क्रॅक ओढतोय. आमच्यापैकी काही नशा उतरण्याच्या वेळी सोपं जावं, म्हणून हेरॉईन ओढतात, इंजेक्शन्स घेत नाहीत. आम्ही हेरॉईनचा नेहमी उपयोग करतो. हेरॉईनच्यामुळे होणाऱ्या रॅटलचं दशहतीचे इशारे मिळेपर्यंत. काही दिवस आम्ही ते ओढतोही – रॅटेल म्हणजे जेव्हा तुम्ही ते थांबवता, तेव्हा होणारी थरथर आणि वेदना. व्हॅलियम किंवा दुसऱ्या काही ड्रिंक्सनी या रॅटलला तोंड देता येतं; पण वेदना टाळता येत नाही. यातून बाहेर पडायचं असेल, तर स्वत:लाच आश्वासन द्यायचं, की थोड्याच वेळात मी हेरॉईनचा डोस घेईन.

आता ख्रिसमसची वेळ आहे. हा काळ तसा मला कधीच आवडलेला नाही. मी इथे माझ्या भावाच्या घरी आहे. शेन आणि त्याच्या मैत्रिणीनं ॲसिड ओढलंय आणि जेव्हा मी आणि जॉडी जातो, तेव्हा दिसतं, की ती आधीच नशेत आहेत. आता आम्ही पीत आहोत आणि आरामात बसलो आहोत. यापेक्षा सामान्य ख्रिसमस तो काय असणार? टी व्ही वर काहीतरी विनोदी रेखाचित्र आहे. टर्की ओव्हनमधून उड्या मारत बाहेर पडत राहतो आणि प्रत्येक जण भरपूर हसतो. हे सर्व सामान्यच आहे. फक्त एक गोष्ट सामान्य नाही, मी वेडा होत चाललोय.

मी खुर्चीचे हात घट्ट पकडून बसलोय आणि टीव्हीच्या पडद्याकडे पाहतोय. त्या उड्या मारणाऱ्या टर्कीला पाहून घाबरलोय. सर्वच गोष्टींनी मी घाबरलोय. माझं मन ड्रग्जच्या प्रवाहाखाली असताना जिथे जातं, तिथे आता खाली खोलवर जातंय. आज मी नेहमीसारखा पितोय आणि ड्रगही घेतलेली नाही.

निरनिराळे आवाज माझ्याशी बोलतायत. ते मला धमक्या देत आहेत. मला हसतयात. इथे काहीतरी दुष्ट आहे. ते भयानक आहे. ते माझ्या जगात घुसतंय. मी थरथरू लागतो, ओरडतो, किंचाळतो.

टी व्ही च्या पडद्यावरून वळून डोळे माझ्याकडे आश्चर्यानं पाहू लागतात.

"तू काय घेतोयस?" शेन हळूच विचारतो. जॉडी चिडलेली दिसते, म्हणजे मला वगळून मार्क क्रॅक घेतोय.

आता मी मला सांभाळू शकत नाही. ती भावना आणखी तीव्र होते. तिनं माझा कब्जा घेतलाय. काहीतरी दुष्ट शक्ती माझ्या जीवनाचा ताबा घेण्यासाठी लढतेय.

"तो सैतान आहे!" मी ओरडतो. "तुम्हाला दिसत नाही का, की सैतान मला घ्यायला येत आहे?'

ते माझ्याकडे पाहतच राहतात. क्रॅकमुळे हे बोलणं. ते याआधी त्यांनी ऐकलंय.

"शांत हो," शेनची मैत्रीण सांगते.

ती नक्कीच काहीतरी बेत करतेय. ती बहुधा सैतानाला मी कुठे आहे, ते सांगणार आहे. मी तिला धरतो आणि हाताची पकड घालतो. शेन उडी मारतो.

"मार्क, चुत्या, काय झालंय काय?"

परंतु मी थरथरतोय आणि उत्तर द्यायला घाबरतोय. हा क्रॅकची नशा उतरताना होणारा सर्वांत वाईट प्रकार आहे आणि मी क्रॅक घेतलेलीच नाहीये.

मी त्या सर्वांच्यावर ओरडतो. मी त्यांच्यावर दहशत बसेल असं आणि घाणेरडं ओरडतो. मग जेव्हा मी थोडा वेळ शांत होतो, तेव्हा प्रत्येक जण माझ्याकडे दुर्लक्ष करतो. मला इथून बाहेर पडायला हवं, या भावना आता इतक्या जोरदार आहेत, की मी त्या आवरू शकत नाही. माझी भीती आवरू शकत नाही. मी माझ्या घरी रिकाम्या फ्लॅटवर परततो; पण या वेळी तिथे मला अभय मिळत नाही. इथे राक्षसी आणि दुष्ट काहीतरी आहे. ते पुढे होतंय, लपतंय; पण ते इथे आहे, कारण त्याला मी काय आहे, ते माहीत आहे. किंचाळत, ओरडत मी माझ्या वस्तू एका काळ्या प्लॅस्टिकच्या बॅगेत भरतो. हुंदके देत मी त्या दुष्ट वृत्तीला तेथून जाण्यासाठी ओरडतो; परंतु ते अजून इथे आहे आणि मी काय आहे, हे ते जाणतंय.

"तू माझा आहेस, माझा आहेस." तो सैतान हसतो. "एक दुष्ट हरामी, माझ्यासारखा दुष्ट हरामी."

आता मला काय घडलं ते कळतं. मी त्या नशेच्या शेवटच्या अत्युच्च टोकाला पोहोचलोय आणि स्वत:ला पोळून घेतलंय. डीआयवाय त्या सुंदर, वेडपट गोंधळात इतका बेफाम होतो, की तिथे कधी कधी पॅन दिसतो. त्याला हे मंजूर असल्यासारखं तो हसतो. मी हे उन्मादाचं टोक गाठलंय. आता सैतान माझ्यासाठी आलाय, कारण कुणालाही उन्मादाचं शेवटचं टोक गाठून जिवंत राहणं शक्य नाही.

विभ्रमावस्था माझी पकड घेते. ती माझं छिद्रन् छिद्रं घट्ट धरते. मला लुळाही करते आणि मी धडपडत फ्लॅटभर फिरतो. माझं डोकं रागानं आणि भीतीनं फुटत आहे. मला वेड लागलंय. ड्रग्जनी काही वेळा मला या स्थितीला आणलंय; परंतु मी आता गोळी हुंगणं किंवा ओढणं याशिवायही या नरकात स्वत:ची वाट शोधत आलोय.

मला मदत हवीय. कुणीतरी मला मदत करायला हवंय. शेन आता ड्रग्जच्या

नशेत अडकून बसलाय. जॉडीचा काही उपयोग नाही – माझ्या डोळ्यांतून रक्त येत होतं, पहा त्या वेळी ती कशा तऱ्हेनं हसत होती, – ख्रिसमस असल्यामुळे माझे सर्व मित्र घरात गुंतलेले आहेत आणि मी इथे एकटा वेडा होण्याच्या मार्गावर आहे.

एकटा असल्यामुळे मला रडू येतं. भीती वाटते. मी वेडा झालोय. मला कोण मदत करील? मग मला आठवतं, की दुसऱ्या कोणापेक्षाही माझी काळजी करणारी एक व्यक्ती आहे. एक व्यक्ती आहे, जी माझे डोळे पुसेल आणि मला शांत करील.

फोनपर्यंत जाणंही कठीण वाटतंय. त्या रस्त्यावर रात्री सर्वत्र राक्षसी छाया आहेत. त्या माझी वाट पाहतयात. त्या माझ्यावर उड्या मारतायत आणि मला त्यांच्या छायेत ओढण्याचा प्रयत्न करतायत. मी चालताना ओरडतो, शिव्या देतो, त्यांना टाळण्यासाठी पळतोही. काही वेळा मी लपतो. त्या फोनबूथचा दरवाजा फार जड वाटतोय. जणू काही मोठ्या शक्ती तो माझ्या विरुद्ध दिशेला खेचतायत.

आतल्या बाजूला हवा अनैसर्गिकरीत्या स्तब्ध आहे. माझे हात इतके कापतायत, की तिचा नंबर फिरवायला मला दोनदा प्रयत्न करावा लागतो.

"ममा? मी मार्क."

माझा आवाज ऐकून तिला आश्चर्य वाटतं. आम्ही बोलल्याला बरेच दिवस झालेत. जेव्हा मी तिला नशेच्या अत्युच्च शिखराला पोहोचल्याचं सांगतो, ती गप्प होते. सैतान या सर्व वेळ मला पकडण्याच्या प्रयत्नात आहे आणि आता तो यशस्वी झालाय, असं मी सांगतो. आता हे असलं बोलणं ती समजते. ममा ही त्या सैतानाची गेली कित्येक वर्षं मान हलविण्याइतपत ओळखीची आहे. जेव्हा त्याच्याबद्दल बोलायची वेळ येते, ती नेहमी तयार असते.

तिचा आवाज मला सुखावतो. मी जन्मभर ऐकलेली ती नेहमीची वाक्यं, की जिहोवाचं माझ्याकडे लक्ष आहे. त्याचं माझ्यावर प्रेम आहे आणि जे त्याच्यावर विश्वास ठेवतात, त्यांना शाश्वत आयुष्य मिळतं. या गोष्टी आज रात्री छान वाटतात. मी ऐकतो, विश्वास ठेवतो.

मी फ्लॅटकडे परततो, प्रत्येक कपाट पुन्हा पुन्हा उघडतो आणि बंद करतो. प्रत्येक कोपरा तपासतो. तो सैतान त्या पडद्यामागे किंवा सिंकखाली लपला नसल्याची खात्री करून घेतो. मी रग्ज गुंडाळतो. पेट्यांत आणखी वस्तू भरतो आणि रडतो.

जेव्हा दरवाज्यावर कोणीतरी ठोकतं, तेव्हा मी आणखीनच घाबरतो. मी दिवे बंद करतो, सावधपणे खिडकीजवळ जातो. बाहेर पाहतो. सूट घातलेल्या दोन काळ्या व्यक्ती, एक स्त्री आणि पुरुष हातात पुस्तकं घेऊन आहेत. त्यांचं रंगरूप जिहोवाच्या शिष्यासारखं आहे. त्यांना नक्कीच माझ्या ममानं पाठवलंय. मी त्यांना

आत घेतो आणि ते एकसष्टाव्या सूत्रावर बायबल उघडतात.

"हे देवा माझं रडणं ऐक..."

ते हळू सांत्वनपर आवाजात बोलतात. ते जातात, तेव्हा मी ते बायबल खाली ठेवत नाही. मी ते सूत्र पुन्हा पुन्हा एखाद्या मंत्रासारखं म्हणतो. दुसऱ्या दिवशी ममा शिष्यांपैकी एकाला घेऊन येते. तो मित्र माझ्याशी शांतपणे बोलतो. त्या वेळी ममा सामान भरलेल्या माझ्या बॅगा कारमध्ये टाकते.

प्रवासात माझ्या ममाचं अस्तित्व विचित्र वाटतं. ती कोण आहे? ती मला आठवणाऱ्या माझ्या ममासारखी आहे. कदाचित, तिच्याहून थोडी म्हातारी आणि गोल. का ती प्रत्यक्षात सैतान आहे? मी थरथरतो, घामेजतो. मला काही ड्रग्जची गरज आहे; परंतु ते घ्यायची मला भीती वाटते, कारण ड्रग्जचा वाईटातील वाईट अनुभव मी घेत आहे आणि तेसुद्धा एकाही ड्रगला स्पर्श न करता. आम्ही वायव्येकडे जायला निघतो. ते शहराचे रस्ते आणि उंच उंच इमारती इतक्या दिवसांचं मला दिसणारं हे दृश्य आता मागे पडलंय. मोटारीचा न संपणारा रस्ता पुढे पसरलाय. मग सरतेशेवटी आम्ही केंडॉलमधून जातोय. करडं शहर, करडा पाऊस असलेलं आणि मी पुन्हा चौदा वर्षांचा आहे.

आम्ही एका छोट्या घराबाहेर थांबतो. ती वॉचमनची खोली आहे आणि तेथून तो मोटाररस्ता टेकडीच्या बाजूला असलेल्या एका कमानी असलेल्या वाड्याकडे जातोय. कदाचित, तिथे सैतान राहत असावा; परंतु ममा स्पष्टीकरण देते, की ते तिच्या मालकाचं घर आहे आणि ती त्यांच्या घरी व्यवस्थापकाचं काम पाहते.

बेथनीही इथेच आहे. ती पंधरा वर्षांची आहे; पण अजूनही ती मला लहान मूलच वाटते. मी तिला पाहतो असं नव्हे. ममा किंवा दुसरं कोणी आणि इतर गोष्टीही मी धड पाहत नाही. सरतेशेवटी मी तर चक्रमच आहे.

जॉडी आणि मी फोनवर खूप अस्वस्थपणे एकमेकांशी बोलतो. मी नसल्यामुळे तिला चुकल्या चुकल्यासारखं वाटतंय. तिला माझ्याबरोबर राहायचंय. तिलाही क्रॅकचं व्यसन थांबवायचंय आणि त्यातून बाहेर पडायचंय. जर मी लेक भागात ड्रग्ज मागे टाकू शकतो, तर तीसुद्धा ते करू शकते आणि काही दिवसांतच ती यायला निघते.

ममा आणि बेथनी या क्रॅक घेणाऱ्या, काळ्या चक्रम वेश्येला पाहून हादरतात. इथे लेक भागात त्यांच्यासारखे पुष्कळ लोक नाहीत. प्रत्यक्षात तर बहुधा इथे तसं दुसरं कुणी नाही. त्याशिवाय ते घर छोटं आहे. तरीसुद्धा ममा आणि बेथनी समजुतीनं घेतात. त्यांना माहीत आहे, की आम्ही त्यात गोवलेले आहोत आणि आम्ही त्यातून बाहेर पडायचा प्रयत्न करतोय, जिहोवाच्या चांगल्या शिष्यांप्रमाणे. त्यांना इतरांचं दुःख ही एक संधी वाटते. चर्चचे सर्व गट माझं आणि जॉडीचं

मतांतर करण्यासाठी एकजुटीनं झटतात. आमची बालपणं ही चांगल्या आणि वाईटाच्या रस्सीखेचीत गेलेली असल्यामुळे आम्हाला समजणारी भाषा ते बोलतायत. त्यांनी दिलेल्या छोट्या आधारांनाही आम्ही पकडतो आणि त्या शिष्यांबरोबर नियमित अभ्यास करायचा ठरवतो. इतकंच नव्हे, तर सभांनाही जातो.

त्या छोट्या खोलीत जाणारं आयुष्य तसं आम्हा सर्वांनाच कठीण वाटतं. जॉडी आणि मी त्या खोलीचा ताबा घेतो. आम्हाला तिथे पूर्वी राहणाऱ्याचं अस्तित्व तसं क्वचितच जाणवतं, कारण क्रॅकच्या गैरहजेरीमुळे आम्ही पछाडलोय. आम्ही क्रॅक न घेण्याच्या मोहिमेवर आहोत. ते साध्य व्हावं यासाठी आम्ही दारू पितोय. झोपेच्या गोळ्या जास्त प्रमाणात घेतोय. आम्ही रागीट, चंचल, भांडखोर आणि काही वेळा हिंसकही होतो.

"मी तुला ओळखत नाही," एक दिवस मी तिच्यावर ओरडून तिला बाजूला सारतो, तेव्हा ममा दु:खित आवाजात म्हणते, "मार्क, तू कोण आहेस?" बेथनी तर पार आश्चर्यचकित झालीय. ती आणि ममा आता अडचणीत सापडल्यात. आम्ही त्या प्रत्येक खोलीचा ताबा घेतल्यावर त्या भुतासारख्या होतात. त्यांना माझी आणि जॉडीची भीती वाटते. त्या फिकुटलेल्या आणि निस्तेज वाटतात.

प्रत्येक आठवड्यात मी एका म्हाताऱ्या जोडप्याला, बायबलचा अभ्यास करण्यासाठी आणि शाश्वत जीवनाबद्दल बोलण्यासाठी भेटतो. ते दयाळू आहेत आणि त्यांचं तत्त्वज्ञान मनाला सुख देणारं आहे. डॉक्टरनी दिलेल्या ड्रग्ज आणि या शिष्याच्या स्थिर करणाऱ्या प्रभावामुळे मला पुन्हा सुरक्षित वाटू लागतं. माझ्या डोक्यात घुमणारे आवाज थांबतात.

काही आठवड्यांनंतर ममा अश्रूपूर्ण नजरेनं कामावरून घरी येते. ज्या जीपीनं आम्हाला ड्रग्ज दिलेली असतात, तो तिच्या मालकाचा मित्र निघतो. पोर्टचा ग्लास घेताना, त्या डॉक्टरनी मालकाला 'तुझ्या व्यवस्थापिकेच्या वॉचमनच्या खोलीवर दोन ड्रग्जचे व्यसनी लोक आहेत.' असं सांगितलं, त्यामुळे ममाला नोकरीवरून काढून टाकण्यात आलंय. आता तिचं घरही गेलंय आणि कामही.

आम्ही सर्वच निघतो. ममा आणि बेथनी केंडॉलमधील एका फ्लॅटवर जातात आणि मी शहराच्या टोकाला असलेल्या घराच्या भागात आणि जॉडी पेनरीथमध्ये एका छोट्या पलंगापुरत्या जागेत. तिथे ती सुपरमार्केटमध्ये काम पकडते आणि जिहोवाच्या शिष्यांबरोबर अभ्यासही सुरू ठेवते.

मी अजूनही कामावर जाण्याएवढा बरा झालेलो नाही. मी चित्रं रंगवायचा प्रयत्न करतो. काही चित्रं विकतो. मी एक डार्करूम सज्ज करतो. माझ्या आत खोलवर भीती आहे, एक अनियंत्रित असं दु:ख आहे. माझी खात्री आहे, की सैतान अजूनही माझ्यात आहे. मी अगदी तर्र होण्याएवढं पितो. बऱ्याचदा मी एखाद्या थंड

टेकडीच्या बाजूला वाइनची बाटली घेऊन पडलेला असतो आणि मी इथे कसा आलो, त्याची मला आठवणही नसते; परंतु तरीही मी बरा होतोय. हळूहळू मी स्थिर होतोय, हे मला जाणवतंय.

जेव्हा मला जरा ताकद येते, तेव्हा मी डीआयवायच्या मुक्त पार्टीसाठी दक्षिणेकडे जातो. मी त्या संगीतात, ड्रग्जमध्ये, त्या लोकांत आणि लहरीत स्वत:ला बुडवतो. इथे मी सुखी आहे. प्रत्येकाला पाहून मी खुष आहे. ती पार्टी कधीच संपू नये, असं मला वाटतं.

"तू ठीक आहेस ना?" लोक अनिश्चततेनं माझ्याकडे पाहत मला विचारतात.

"छान," मी त्यांना सांगतो. "अगदी उत्तम."

जेव्हा पार्टी संपते आणि माझं डोकं पुन्हा भरकटतं, मी केंडॉलला परत जातो आणि पुन्हा डॉक्टरनी दिलेली ड्रग्ज आणि जिहोवाचे शिष्य, हे नियमित आयुष्य सुरू करतो. मला पुन्हा बरं वाटताच मी दुसऱ्या पार्टीसाठी जातो; परंतु आता आम्ही जे ड्रग्ज वापरतोय, ते जास्त शक्तीचे आणि भरपूर आहेत. कदाचित, ते संगीतही मन हेलकवणारं असेल, त्या मुक्त पार्ट्याही आता बदलत आहेत. त्या महत्त्वपूर्ण होत्या; पण आता तो क्षण संपलाय, हे मी माझ्या मनातून ओळखतो; परंतु मला हे घडायला नकोय. मला वेळ पळायला नकोय. मला मोठं व्हायचं नाहीये. मला गंमत हवीय आणि अजूनही खूप गंमत आहे.

मी नेलबरोबर लिव्हरपूलच्या क्लबला जातो. मग बर्मिंगहॅमच्या आणि आम्ही नॉटिंगहॅमजवळच्या शेरवुड फॉरेस्टमधील डीआयवायच्या मुक्त पार्टीला शेवटी जातो. प्रत्येकाचं डोकं फिरलंय. माझ्यासाठी क्लबला जाणं आणि पार्ट्या करणं हे तीन दिवस आणि तीन रात्रींपर्यंत टिकलंय. मी माझा ड्रग्जचा उपयोग नियमित करू शकत नाही, कारण मला ते करायचं नाहीये. मला त्या पार्टीच्या अनुभवात स्वत:ला बुडवायचंय. जेव्हा मी केंडॉलला परत जाईन, तेव्हा बरा होईन.

आम्ही शेरवुड फॉरेस्टला येतो, तोपर्यंत माझ्या डोक्याचे तुकडे तुकडे होतात. नेलच्या कारमध्ये इकडे येत असताना मी गोळ्या आणि कोक, स्पेशल ब्रू घेतलंय आणि मूठभर तपकिरी स्पीड गोळ्या घेतल्यात; परंतु तरीही त्या जंगलाचं सौंदर्य मी वाखाणू शकतोय. स्मोकस्क्रीन ही दुसरी एक मुक्त पार्टी आहे. जिथे पार्टी आहे, त्या जागी झाडांतून ताडपत्री पसरलेली आहे आणि फांद्यांवरून दिवे लटकतायत. त्यांचा डिस्क जॉकी मंचावर आहे. त्या जंगलाच्या खूप आत एक खोल खड्डा आहे आणि त्यात मोठी आग आहे. लोक गवताच्या बैठकीवर बसलेत. त्या टेकडीच्या माथ्यावर डीआयवायचा तंबू, त्यात स्पिकर्सच्या भिंती आणि अदृश्य डी. जे. आहे. लोक त्या आवाजात आजूबाजूला फिरतायत.

नेल माझ्याबरोबर त्या झाडीतून चालतो. तो बहुधा पार्टीतच जन्मला असावा.

पार्टी, हे त्याचं आयुष्य आहे. आम्ही काही मित्र मुलांसारखे गप्पा मारत वळचणीवर बसलेले पाहतो.

"ही जागा आश्चर्यजनक आहे." नेल म्हणतो. "मी कित्येक दिवसांत ड्रग घेतलेली नाही; परंतु आज रात्री मी घेणार."

"मी तुझ्याबरोबर एक घेईन." मी म्हणतो. 'असा मागे राहणारा' म्हणून माझी ओळख नाही.

ती वळचणीवर बसलेली मुलगी हात पुढे करते आणि त्यात ॲसिड आहे.

"अमेरिकन," ती आम्हाला सांगते.

तिच्या तळव्यावरील चौकोनात ते ठेवलंय. त्यावर सेल्टीक गाठीचं काम केल्यागत असलेल्या त्या डिझाइनच्या गोळ्या जांभळ्या आणि सोनेरी रंगात चमकत आहेत. त्याचं वरचं ते डिझाइन हे गुंतागुंतीचं आणि सुंदर आहे. मी असं ॲसिड कधी पाहिलेलं नाही.

मी त्या सुंदर ड्रगकडे पाहतो आणि स्पीड घेतल्यानं आलेल्या आक्रमकतेमुळे ते तिच्या हातातून खेचतो आणि ते गिळतो.

ती माझ्याकडे पाहतच राहते. नेलही माझ्याकडे पाहत राहतो. प्रत्येक जण माझ्याकडे पाहत राहतो.

"जे आता तुझ्याबाबत घडणार आहे, ते असा अधाशीपणा केल्यामुळे योग्यच आहे." ती मुलगी हळूच म्हणते.

"अरे मित्रा! ते चार चौकोन होते, एक नव्हे." नेल मग सांगतो.

काही मिनिटांतच माझं त्यात मन राहत नाही. मला ते संगीत भावत नाही. मी कुणाशी बोलू शकत नाही, बोलणं मला सोडतंच. मी त्या टेकडीवर त्या दोन आवाजांमध्ये बसून असतो. डीआयवाय हे एका कानात आणि स्मोकस्क्रीनचं संगीत हे दुसऱ्या कानात. ते दोन्ही मध्यावर एकमेकांना भिडतात आणि मी माझं मन भिरकावतो. मला ते जाणवतं. मी त्या वेडेपणाच्या टोकाला पोहोचलोय. मला हात- पाय नाहीत आणि मी मार्क जॉन्सन नाही किंवा व्यक्तीही नाही. मी गेलोय, इतका गेलोय, की मला आता भीतीही वाटत नाही, मी काहीच नाही.

सूर्य वर येतो आणि तेथील पार्टीचा वेडेपणा मी न्याहाळतो. त्या विस्तवाच्या ज्वाळा, गुडघ्यापर्यंत वस्त्र खाली आलेले ते हिप्पी, अर्धनग्न कपड्यांत नाच करणारे ते वयस्कर, स्पीड घेणारे ते छांदिष्ट, ते लटकणारे दिवे, ते प्रवासी, ते रंग, ते झुळझुळणारे कपडे! मला माहीत आहे जिथे ते टोक होतं, ते मी ओलांडलंय.

मी केंडॉलला परत येतो. अजूनही बधीर असतो. मी इस्टसी, स्पीड, ॲसिड, कोक, स्पेशल ब्रू, वीड, एमडीएमए पावडर हे सारं घेतलंय. मी झोपू शकलेलो नाही. मी अन्न खाल्लं नाही आणि यात आणखी तो जीवघेणा पार्टी अनुभव आणि

मी आता काही करू शकत नाही. माझे डोळे हे कारचे पुढचे दिवे आहेत आणि मी जमीन सोडली, तर इतर कुठेही ते पेटवू शकत नाही. मी असं सांगितल्यावर जीपी मला मनोविकारतज्ज्ञाकडे पाठवतात. तो मनोविकारतज्ज्ञ मला आणखी कायदेशीर ड्रग्ज माझ्या बेकायदेशीर ड्रग्जच्या नियंत्रणासाठी देतात. मला स्वत:हून यातून कसं बाहेर पडायचं, ते समजत नाही.

मी काही काळ माझे क्लबचे आणि डीआयवायचे मित्र यांचा संपर्क सोडतो. जॉडी ही माझा आधार आणि सुख आहे आणि माझा कधीमधी येणारा जिहोवांच्या शिष्यांजवळचा संबंध, हे माझं ड्रग्जचं पुनर्वसन आहे, कारण इथे याच प्रकारचं पुनर्वसन शक्य आहे. जेव्हा शक्य होईल, तेव्हा जॉडी आणि मी भेटतो. आम्ही दोघंही इथले नाही. दोघंही परके आहोत.

■

२२

जेव्हा जॉडी माझ्या दरवाजाची घंटी वाजवते आणि आपण मँचेस्टरमध्ये आठवड्याची सुट्टी घालवू, असं सुचवते, तेव्हा मी तिच्याशी सहमत होतो. त्याचा अर्थ काय, ते मला समजतं. मी रेडिओ आहे आणि माझी अँटीना ड्रग्जकडे लागलेली आहे. जॉडी ही व्यसनी आहे, ती पेनरिथला होती. महिनाभर ती क्रॅकनं पछाडलेली आहे. आता ते पछाडणं तिच्या रंध्रारंध्रांतून बाहेर ठिबकताना मला दिसतंय. तिचा आता नुकताच पगार झालाय. मला माहीत आहे, की तिचा पगार आम्ही उडवणार आहोत.

आम्ही ट्रेन पकडतो. पिकॅडलीला एका हॉटेलमध्ये उतरता मग टॅक्सी घेऊन मॉसच्या बाजूला बागेकडे जातो. ही बाजू क्रॅक विकणाऱ्यांनी गजबजलेली आहे.

आमच्याकडे तिचा सर्व पगार खर्चाला असल्यामुळे आम्ही व्यवस्थित खरेदी करतो. मग ते ड्रग्ज हॉटेलमध्ये नेतो आणि ड्रग घेतो. आम्ही क्रॅक ओढतो आणि ती नशा उतरताना व्हॅलियम, ब्रॅन्डी किंवा हेरॉईन घेतो. हा कार्यक्रम शुक्रवारपासून रविवार रात्रीपर्यंत न झोपता चालू असतो आणि मग हळूच काहीशा शरमेनं घरी परतताना ट्रेनमध्ये एक शब्दही न बोलता आम्ही केंडॉलमधील आमच्या धार्मिक आयुष्याची सुरुवात करतो.

पुढच्या महिन्यात ते आम्ही पुन्हा एकदा करतो आणि त्या महिन्यानंतरही पुन्हा.

आम्ही मँचेस्टरमधील मोठ्या हॉटेलमध्ये आहोत. आम्ही खरेदी करून परत आलोय आणि वातावरणात एक प्रतीक्षा आहे. कोणताच चेहरा मोहरा नसलेल्या त्या खोलीत जॉडी कपडे काढते आणि क्रॅक पाइप बनवण्यात गर्क होते. आम्ही त्या दरवाज्याच्या फटीला आतून टॉवेल लावलेत, त्यामुळे आमच्या धुराचा तो गोड, कृत्रिम वास बाहेर जाणार नाही. पलंगावर आमचं सर्व सामान आहे. त्यात पातळ पत्र्यावर वितळलेलं हेरॉईनही आहे. जेव्हा नशा उतरू लागेल तेव्हा त्या

राक्षसाला पळवून लावण्यासाठी ते आहे.

आम्ही प्रत्येक जण एकदा ओढतो, जॉडी पुढचा पाइप करण्यात गुंतलीय. मी त्या पलंगाच्या टोकाला आखूड चड्डीत आहे. माझी नशा उतरत आहे आणि मी अनिश्चित अशा घाबरवून सोडणाऱ्या विभ्रमावस्थेत आहे. अशा वेळी माझ्या डोक्यातील आवाज मला धमकवतात. मी सावकाशपणे श्वासोच्छ्वास घेत आणि शांतपणे पडून राहत त्यांना अटकाव करण्याचा प्रयत्न करतो. बाहेरून मला काहीतरी ऐकू येतं.

मी म्हणतो, "ऐक,"

जॉडी माझ्याकडे रागानं पाहते. मी तिला न हलण्याची खूण करतो.

"ऐक! तुला ते ऐकू येतंय?"

मला खात्री आहे, की मी हळू आवाजातील बोलणं ऐकतोय.

'ए, च्यायला, पुन्हा आपण तेच करतोय." जॉडी चिडून म्हणते.

"मी विभ्रमावस्थेत नाही! मला काहीतरी ऐकू येतंय!"

जॉडी आता चिडलीय. ती माझ्याकडे पाहून वेडावते.

"जा... तू विभ्रमावस्थेतच आहेस." ती म्हणते आणि ड्रग ओढू लागते. मला तिचा राग समजतो. कुणाला आपल्या ड्रगच्या त्या धुंदी उतरण्याचा शेवट नशा उतरणाऱ्या विभ्रमावस्थेत असलेल्या व्यक्तीकडून झालेला आवडेल? परंतु ही विभ्रमावस्था नाही. मी खरंच काहीतरी ऐकतोय का? क्रॅकची ही खरी भीती आणि विभ्रमा-वस्थेतील भीती यातील सीमारेषा अंधुक करते. तुम्ही शंभर टक्के चुकीचे असू शकता, जेव्हा तुम्हाला शंभर टक्के खात्री वाटत असते, की कोणीतरी बाहेर आहे. तरीसुद्धा माझी खात्री आहे, की कोणीतरी बाहेर आहे.

मी ऐकण्यासाठी दरवाज्याशी जातो. जॉडी वैतागलेली आहे. तिला विभ्रमावस्था यापूर्वी जाणवत नसली, तरी आता तिला ती जाणवतेय.

ती आपले गोलाकार श्वासोच्छ्वास संपवते आणि तिची धुंदी खाली उतरते, तेव्हा ती हलत नाही; परंतु मला दिसतंय, की ती अगदी पार वैतागलेली आहे आणि माझ्यावर रागावलीय.

"कोणीतरी बाहेर कुजबुजतंय." मी माहिती देतो. तिचा माझ्यावर विश्वास बसत नाही; परंतु ती आता घाबरलेली आहे.

बाहेर जरा खालूनच एक विमान उडतंय, त्यामुळे तसं धड ऐकू येत नाही; परंतु मी कान टवकारून ऐकतो आणि नंतर त्या पॅसेजमध्ये खोलीच्या अगदी बाहेर मी पुन्हा ऐकतो. पोलीस तिथे असल्याची ती न चुकणारी खूण आहे.

"ते तिथे आहेत. ते चुत्ये पोलीस. ते इथे आहेत. मी त्यांचा रेडिओ एकदा खरखरताना ऐकला." त्या क्षणी खिडकीबाहेरचा तो आवाज शिगेला पोहोचतो.

बफ बफ बफ बफ... तो आवाज हेलिकॉप्टरसारखा येतो. जॉडी अगदी पुतळ्याच्या अवस्थेत आहे; पण आता मी खोलीच्या दुसऱ्या बाजूला धावतो. तिथे पडदे विचित्रपणे हलत आहेत आणि हुशारी दाखवण्यासाठी वेडाच्या लहरीत मी ते उघडतो. एक मोठा पांढरा प्रकाश आकाशातून माझ्यावर पसरतो. त्या हेलिकॉप्टरचा आवाज कानठळ्या बसवणारा आहे. त्याच्या प्रकाशामुळे काही दिसत नाही. हे एखाद्या युद्धावरच्या फिल्ममधील दृश्य वाटतं. च्यायला, पोलिसांना नक्कीच असं वाटत असावं, जॉडी आणि माझ्या ऐवजी इथे काही मोठे आंतरराष्ट्रीय ड्रग्जचा व्यापार करणारे लोक असावेत.

आम्ही एकमेकांकडे पाहतो. ती धुंदीत आहे. मीही धुंदीत आहे आणि हा विभ्रमावस्थेचा कहर आहे.

त्या क्षणाला तिथे आणखी आवाज येतो, बॅम बॅम बॅम बॅम. दरवाजा! मी स्वत:ला त्या खोलीतून पुन्हा परत जॉडीच्या हालचाल विरहित असलेल्या देहावरून फेकतो. एक दीर्घ श्वास घेतो. ते टॉवेल्स काढतो आणि तो दरवाजा उघडतो.

एक नव्हे, पोलिसांची टोळीच बाहेर उभी आहे. मला माहीत आहे, की माझ्यामागे त्या खोलीत निळा धूर पसरलाय आणि तो ओळखू येणारा आंबट गोड क्रॅकचा वास आहे. जॉडी नग्नावस्थेत आहे. खरं तर क्रॅकचा पाइप हातात असून, ती थिजल्यागत पडलेली आहे. त्या पलंगावर, आम्हाला बराच काळ तुरुंगात टाकतील, एवढे भरपूर ड्रग्ज आहेत, याचा अर्थ आम्ही चुत्ये अडकलोय.

कमीत कमी दहा पोलीस आत पाहत आहेत.

"तुम्हाला त्रास दिल्याबद्दल माफ करा सर." त्यांच्यापैकी एक सांगतो. "एक पळालेला संशयित माणूस तुमच्या खोलीच्या बाहेरच्या छपरावर आहे असं वाटतं." मी इतका टिपेला पोहोचलोय, की माझा आवाजही चढतो. "हं," मी किंचाळतो.

"मी आत येऊन तुमच्या खिडकीतून पाहिलं, तर तुमची हरकत नाही ना?"

मी दरवाजा उघडतो. तो पोलीस आत येतो. मग एका विलक्षण सावधनतेनं मी त्याच्यापुढे होऊन ती पलंगावरची चादर टाकतो. असं दिसतं, की मी विनयशीलपणे जॉडीच्या नग्नतेवर पांघरूण टाकतोय; परंतु खरं तर मी पलंगावरील ड्रग्जवर पांघरूण टाकतोय. इतकंच नव्हे, तर मी तो क्रॅक पाइप जो अजूनही न हलणाऱ्या जॉडीच्या बोटांत आहे, तोही लपवतो.

"या त्रासाबद्दल क्षमा करा मिस्," तो ऑफिसर नम्रपणे सांगतो. जॉडी काहीच उत्तर देऊ शकत नाही.

तो खिडकीकडे जातो आणि पडदे उघडे टाकतो. वर अजूनही घिरट्या घालणाऱ्या आणि आवाज करणाऱ्या हेलिकॉप्टरच्या प्रकाशाच्या मदतीनं तो त्या छपराचं निरीक्षण करतो. आपल्या रेडिओवर काहीतरी बोलतो आणि मग माझ्याकडे वळतो.

"ओके सर, तुमचे खूप खूप आभार. आम्ही इथून त्या छपरावर चढणार नाही." तो एका मिनिटानंतर सांगतो. "तुम्हाला त्रास दिल्याबद्दल क्षमस्व."

तो मग पॅसेजमध्ये असलेल्या आपल्या साथीदारांकडे जातो. ते सर्व जण या वेळेपर्यंत अखंडितपणे आत डोकावत असतात. मी त्यांच्यामागे दरवाजा लावतो. पॅसेजमधील पावलांचे आवाज दूर जातात. ते हेलिकॉप्टरही दूर जातं. काही मिनिटांनंतर तिथे शांतता पसरते. जॉडी अजूनही लोळागोळाच आहे.

आम्ही बोलत नाही. एकमेकांकडे पाहत नाही. काही करत नाही.

सरतेशेवटी मी म्हणतो, "ते आता माझ्यासाठी पुरे. मी संपलोय. यापुढे माझ्यासाठी क्रॅक नाही. आज रात्री नाही, कधीच नाही."

त्या पातळ धातूच्या पत्र्यावर हेरॉईनची असलेली ती लहान पुडी माझ्यातील वेडेपणा शांत करण्यासाठी मी उचलतो. मी शुद्ध विभ्रमावस्थेचा पाइप ओढला आणि तो संपतोय न संपतोय, तर पोलिसांचे विचार माझ्या डोक्यात आले आणि ते खोलीबाहेर होते. मी ती वस्तू पुन्हा ती भयानक भीती अनुभवल्याशिवाय कशी घेऊ शकेन? आणि जर आज रात्री मी आणखीन घेतलं, तर ती भीती वाढून नियंत्रणा-पलीकडे जाईल.

जॉडी हळूहळू आपल्या देहावरचं आणि मेंदूवरचं कुलूप काढते. ती बोलते. ती म्हणते, "मी थांबत नाही."

"पण जेव्हा ते पोलीस त्या गुन्हेगाराला पकडतील, तेव्हा परत येतील. त्यांना त्या क्रॅकचा वास आलाय."

"मी इथे थांबणार नाही." जॉडी म्हणते.

"तुला मग जास्त हँगओव्हर येईल आणि जास्त जास्त विभ्रमावस्था जाणवेल. थोडं ब्राऊन घे. त्याची तुला आता गरज आहे."

"मी थांबणार नाही." जॉडी म्हणते. ठीक आहे. तिचं डोकं फिरलंय.

मी झोपी जातो आणि ती धूम्रपान चालूच ठेवते. खात्री करून घेण्यासाठी ती मला बरेच वेळा उठवते.

"मला एकटा राहू दे." मी तिला सांगतो. "मला उद्या उठायचंय आणि हे घडलंय, हे विसरायचंय."

पण जॉडी घाबरलीय आणि प्रत्येक मिनिटाला ती अधिक घाबरतेय. ती सारखी मला धरून ठेवतेय.

"झोपू नको ना माऽ ऽर्क, प्ली ऽ ऽ ऽज."

"ते धूम्रपान बंद कर, मग तू ठीक होशील आणि तुला झोपही येईल."

"मला सोडून जाऊ नको."

ती मला ढकलते, ओढते, हुंदके देते आणि वेड्यासारखी रडते. मी माझे डोळे

उघडतो आणि तिच्या चेहऱ्याकडे पाहतो. माझ्या लक्षात येतं, की भीतीमुळे ती म्हातारी दिसतेय. ती आता पूर्वीची सुंदर जॉडी राहिलेली नाही. तिच्या भीतीनं तिला अनेक वर्षांनी म्हातारं केलंय. ती रडत पलंगावर पडलेली पाहून मला तिरस्कार वाटतो. मी तिला ढकलतो. अचानक कुणी फोटो दिल्यासारखे मला माझे डॅडी दिसतात. जेव्हा ममा वळवळते आणि हुंदके देत जमिनीवर त्यांच्या पायाशी पडते, तेव्हा ते आपले ओठ वीट येऊन दुमडत असत. हे पुन्हा कसं घडलं? जेव्हा मी तो क्रॅकचा दगड संडासात साखळी ओढून नाहीसा केला, तेव्हा हे घडलं आणि आता पुन्हा एकदा. मी माझ्या वडिलांसारखा निर्दय माणूस बनलोय आणि जॉडी माझ्या ममासारखी थलथलीत जेलीची रास झालेय. ती नेहमी अशीच होती, की मी तिला काही केलं?

वैतागून मी झोपण्याचा प्रयत्न करतो; परंतु पोलीस परत येण्यासाठी मी वाट पाहतोय. ते परत येत नाहीत. सकाळी आम्ही हॉटेल सोडतो. ट्रेनमध्ये बसतो आणि आमच्या रोजच्या शांत जीवनाकडे वळतो.

मी स्वत:ला डॉक्टरनी लिहून दिलेल्या ड्रग्जनी आणि पिऊन तर्र होऊन सावरण्याचा प्रयत्न करतो. मी धर्मार्थ पैशावर आणि अगदी तुरळक असा ड्रग्जचा व्यवसाय करून जगत आहे. माझं जीवन आणखी स्थिर करण्यासाठी मी नियमित नोकरी करायची ठरवतो. सुपरमार्केटमधील बेकरीमध्ये काम सुरू करणं, हे एक अर्थपूर्ण पुढे टाकलेलं पाऊल आहे. ममाचा केंडॉलमध्ये नवा फ्लॅट आहे. बेथनी आपल्या मित्रांपैकी एकाबरोबर राहत आहे आणि मी पॅकिंगसाठी असलेल्या खोक्यांनी भरलेल्या ममाच्या पुढच्या खोलीत राहत आहे.

मी एका शनिवारी उठतो. मला तो माझा भाग्यवान दिवस वाटतो. माझ्या पहिल्या पगाराचा चेक आलाय. मी पडदे मागे ओढतो. सूर्य तळपत आहे. बाहेर एक बाग आहे आणि तिथे एक सुंदर मुलगी आहे. मी तिला ताबडतोब ओळखतो... रोझी. मी तिच्याबरोबर शाळेत होतो. त्या वेळी जवळजवळ चौदा वर्षांची असताना ती कुणा प्रवाशाबरोबर पळून गेली होती आणि आता ती परत आली आहे. ती फार सुंदर दिसतेय. बागेत एक लहान मूल घेऊन ती उभी आहे आणि सूर्याचा प्रकाश तिच्या लांबसर, पिंगट केसांवर नाचत आहे.

मी कपडे करतो. बागेत जातो आणि आम्ही बोलतो. तिला मी आठवतो. ती सांगते, की ती केंडॉलला आलीये, ती हेरॉईनमधून मुक्त होण्यासाठी. मला तिच्याबद्दल सहानुभूती वाटते, कारण मीही केंडॉलमध्ये माझा स्वत:चा गुंता सोडवण्यासाठी आलोय. ड्रग्जमधून मुक्त होणं, हे कठीण काम आहे, याबाबत आम्ही सहमत होतो. मग आम्ही तिच्या बहिणीच्या कारमध्ये जातो. माझ्या पगाराचा चेक माझ्या खिशामध्ये आहे. तिच्या बहिणीचं छोटं मूल मागच्या बाजूला आहे

आणि आम्ही मॉसच्या बाजूला ड्रग्ज विकत घेण्यासाठी वळतो.

आम्ही कोकीन आणि हेरॉईन घेऊन परततो. ते आम्ही रोझीच्या घरी नेतो. तिचे आई-वडील बाहेरगावी गेलेले आहेत आणि ती आपल्या बहिणीचं मूल संभाळणार असल्याचं ठरलं आहे. आम्ही त्या मुलाला टीव्हीपुढे ठेवतो, ड्रग्ज घेतो आणि रोझीच्या पलंगावर एकत्र झोपतो. ती आमची पहिली भेट आहे.

■

२३

रोझी ही एका स्थिर अशा, पण श्रीमंत नसलेल्या घराण्यातून आलेय. तिचे वडील फॅक्टरीत कामगार आहेत आणि सहा मुलांत ती सर्वांत लहान आहे. ती लांब ड्रेसेस वापरते, पत्र्याची शिटी वाजवते आणि तिला लोकसंगीत आवडतं आणि ती हस्त व्यवसायिका आहे. तिनं काही जुन्या पद्धतीची, घोड्यांनी ओढली जाणारी लाकडी चाकांवरची घरं हातांनी तयार केली आहेत. तिनं त्यातून इंग्लंडमध्ये प्रवास केला आहे. रोझीच्या मते अशा प्रवासासाठी घोडे उत्तम. नंतर तिनं ते लाकडी घर पुष्कळ किमतीला विकलं. बहुधा तिनं तो सर्व पैसा ड्रग्जवर उडविला.

रोझीनं घर सोडल्यापासून तिचं आयुष्य तसं सोपं नाही. पोलिसांजवळ लढाया झाल्यात. ती शेतात झोपली असताना कुणीतरी तिच्यावरून कार नेली, तेव्हा झालेला एक भयानक अपघात आणि आता तिला हेरॉईनचं व्यसन लागलंय.

आमचं नातं पटकन घट्ट जुळतं. आता माझ्या जगात यापुढे जॉडीला स्थान नाही. रोझी ही माझ्या जीवनाची प्रेमज्योत आहे. आमचा एकत्र वेळ सुंदर जातो. आम्ही केंडॉलमधील एका फ्लॅटमध्ये जातो आणि मी बेकरीत काम करतो. माझा रिकामा वेळ एक कॅम्पर व्हॅन दुरुस्त करण्यात घालवतो. काही वेळा आम्ही त्यातून प्रवास करतो. आम्ही जंगलात ती थांबवितो आणि रात्रीसाठी दरवाजे उघडे टाकतो, त्यामुळे तारे अगदी आत आल्यासारखे वाटतात. त्यांना एक स्वच्छ झाडांच्या सरपणासारखा गवताळ जमिनीचा वास आहे. आम्ही आमच्या बिछान्याजवळ मेणबत्त्या लावतो आणि रोझीचं सुंदर शरीर त्या सौम्य प्रकाशानं न्हाऊन निघतं. जे ड्रग्ज आम्ही घेतो, त्यामुळे आमच्या एकमेकांविषयीच्या भावना अधिक खोल होतात. ती सुंदर आहे आणि सर्व गोष्टी आमच्यासाठी ठीक आहेत.

रोझी हेरॉईनचं इंजेक्शन घेते. ती स्वत:ला रोखू शकत नाही आणि त्याशिवाय जगण्याचा तिनं प्रयत्न केला, तर खरंच ती आजारी होते, त्यामुळे ती जेव्हा आजूबाजूला असते, तेव्हा हेरॉईनही असतं. मी ते त्या आधीच वापरलंय; परंतु ते

माझ्या आयुष्यात रोझीबरोबर पुन्हा येतं.

हेरॉईन हे चांगलं ड्रग आहे. ते मला उबदार मिठी घालतं आणि ती ऊब माझ्या शरीरातून प्रेमासारखी घिरट्या घालते. लवकरच अगदी लवकरच मला ते नुसतं आवडत नाही, तर मला त्याची गरज वाटू लागते. ते जर मला मिळालं नाही, तर मला आजारी असल्यासारखं वाटतं; परंतु रोझीसारखं मला त्याचं व्यसन नाही. व्यसन हे कमकुवत माणसांसाठी आहे आणि मी मनानं ठाम आहे आणि एक चूक आहे, ती मी कधीच करणार नाही. मी त्याचं इंजेक्शन घेत नाही. मी कशाचंच इंजेक्शन घेत नाही. मला मनातून जे कोणी असं इंजेक्शन घेऊन धुंद होतात, त्यांचा तिरस्कार वाटतो. त्यांना हे कळत नाही का, की एकदा तुम्ही इंजेक्शन घेऊ लागलात, की त्याला शेवट नाही? उदाहरणार्थ, कधी कधी लोकांच्या घरी असताना माझ्याभोवती अशा इंजेक्शन घेणाऱ्यांचा गराडा असतो. मी त्यांच्याबरोबर ड्रग ओढतो; परंतु मी सुईला स्पर्शही करणार नाही, कारण या सुयांच्या सापळ्यात न अडकल्याबद्दल मला स्वत:चा अभिमान वाटतो.

परंतु त्याच वेळी ते काय आहे, हे जाणण्याची मला उत्सुकता आहे.

मला म्हणायचंय, की ते चांगलं असणारच, त्याशिवाय ते लोक असं करणारच नाहीत.

मी बेकरीमध्ये कामाला जाण्यासाठी पहाटे तीनला उठतो, तेव्हा बाहेर अंधार आणि थंडी असते आणि मी स्वत:ला विचारतो, की मला अंथरुणातून उठून जायची काय गरज आहे? मी एक पाय बाहेर ढकलतो आणि वातावरणातील सकाळची कडक थंडी जाणवते. मी तो पाय पुन्हा पांघरुणात ओढतो. रोझी झोपलेली आहे. बिछाना उबदार आहे. मी माझे डोळे बंद करतो आणि झोपी जातो.

जेव्हा मी दुसऱ्यांदा जागा होतो, तेव्हा खिडकीतून येणाऱ्या सूर्यप्रकाशानं खोली भरून गेलेली आहे. खोली उबदार आहे. मी हात-पाय लांब करतो. मला माझ्या बाजूला असलेली रोझी जाणवते. जेव्हा दोन व्यक्तींना ड्रग हवं असतं, तेव्हा ते मिळवण्याचा उत्तम मार्ग, मध्यरात्री उठून कंटाळवाण्या लोकांबरोबर छोट्या पगारासाठी काम करून नव्हे, तर उत्तम मार्ग म्हणजे ती ड्रग्ज खरेदी करून विकायची. या अशा व्यवसायात तुम्हाला पुरवठ्याची आणि उत्पन्नाचीही खात्री असते. नियमित काम हवंय कुणाला? कुणाला सबंध दिवस हातावर पीठ हवंय? गेले उडत.

रोझी आणि मी त्या जुन्या सुंदर कॅम्पर व्हॅनमधून ड्रग्ज विकण्यासाठी निघतो. आम्ही निरागस विद्यार्थी असल्यागत दिसतो, अशी आशा करतो. इतके निरागस, की कुणीही त्या व्हॅनचा तपास करण्याच्या भानगडीत पडणार नाही. जर त्यांनी असं काही केलं, तर आसापासून (गाडीच्या चाकाच्या कण्यापासून वर) ती खचाखच

क्रॅक, हेरॉईन आणि इस्टसीनं भरलेली आहे.

आम्ही दक्षिणेकडे जातो, सॉमरसेटमधील फ्रोमला. आता उन्हाळा आहे आणि गाई गुडघ्यापर्यंत गवतात बुडून पिवळ्या फुलांनी पिवळ्या झालेल्या कुरणात उभ्या आहेत. त्या वेल गुलाबांच्या मधुर वास असलेल्या कुंपणावरून आमच्याकडे पाहतात. रोझीला इथल्या प्रवाशांच्या जागा माहीत आहेत आणि तिचे सर्वदूर मित्र आहेत. ड्रग्जची मागणी एवढी आहे, की जास्त पुरवठा हवा, म्हणून मला बर्मिंगहॅमला वारंवार खेपा घालाव्या लागतात. जेव्हा इथल्या बाजारात मालाचा खच्चून पुरवठा आहे, हे लक्षात येतं, तेव्हा आम्ही ब्रिस्टॉल आणि बाथच्या आजूबाजूला असलेल्या जागांकडे वळतो. रोझी माझ्या आधी जाऊन प्रवाशांच्यात मिसळते, मैत्री करते आणि त्यांना सांगते, "एक ब्रुमी ड्रग्ज विकण्यासाठी येणार आहे. कुणाला काही हवंय?" कोण विकत घेईल, हे तुम्हाला नेहमीच समजतं. हेरॉईनचं व्यसन असलेले हे, इतर सामान्य लोकांप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतात; पण त्यांचे ते डोळ्यांतील मृतवत भाव, त्यांची करडी कातडी आणि त्यांचे किरकोळ देह त्यांचं बिंग फोडतात.

जेव्हा उन्हाळा जवळजवळ संपतो, आम्ही केंटमध्ये सफरचंद वेचण्यासाठी जातो. सफरचंदांचे ते हजारो लाजरे चेहरे रांगेरांगेतून एकसारख्या दिसणाऱ्या झाडांवरून लोंबत असतात. त्या शेताच्या जुन्या पुराण्या बागेच्या कडेला प्रवासी जमतात. ज्या तऱ्हेनं त्यांच्या लॉरीज, बसेस आणि चाकांवरची घरं येतात आणि त्यातून माणसं आणि त्यांची मुलं बाहेर पडतात, हे मला आवडतं. ते चेरी, हॉप्स आणि सफरचंदाच्या कापणीच्या हंगामात शेतावर येणारे लोक आहेत. ही अगदी फार फार पूर्वीपासूनची प्रथा आहे.

हे साधेसुधे प्रवासी शिड्यांवरून चढून फळं काढण्याचं आणि ते पेट्यांतून भरण्याचं खडतर काम दिवसभर करतात आणि जेव्हा ते संध्याकाळी आपल्या जागेवर आपल्या श्रांत अवयवांचं दु:ख कमी करण्यासाठी परततात, तेव्हा त्यांना जेवण, काही करमणूक आणि धूम्रपान हवं असतं. ते जेव्हा त्यांची मजुरी या हेरॉईनच्या पुड्या आणि काही गोळ्यांसाठी मला देतात, तेव्हा ते माझा किती तिरस्कार करतात!

तो शेतकरी त्या कामगारांवर नजर ठेवून असतो. तो रोज सकाळी कॅम्पर व्हॅन बघतो आणि मी बाहेर येण्याची आणि इतरांबरोबर सफरचंदाच्या झाडांवर चढण्याची वाट बघतो. त्याला हे समजत नाही, की तो जेवढी मजुरी मला देऊ शकेल, त्याहूनही जास्त मी कमावतोय.

"आज काम करण्याचा विचार आहे की नाही?" तो खुशीत विचारतो. तो व्हॅनच्या दरवाज्याजवळ उभा राहून माझ्या वागणुकीचं कोडं सोडवील, असं काही

आतमध्ये दिसतं, म्हणून आत चोरून नजर टाकतो.

"तब्येत बरी नाही. मी उद्या ठीक होईन." मी त्याला आश्वासन देतो; पण मला त्याच्या कामगारांना पिळून पैसे मिळत असताना मला त्याची ती सफरचंदं तोडण्याची इच्छा नाही. तो शेतकरी माझ्याकडे संशयानं पाहतो; परंतु माझ्यावर काय आरोप करायचा, ते त्याला समजत नाही. तो दुसऱ्या जगात वावरत आहे.

केन्टनंतर तिथे विल्टशायर आहे. मग ग्लोसेस्टर आणि मग पुन्हा फ्रोमला. आता हिवाळा सुरू झालाय आणि रोझी आणि मी वादविवाद करतोय, नेहमी ड्रगवरून. जर आम्ही हेरॉईनची पुडी उघडत असलो, तर मला रोझीनं त्याचे बरोबर दोन भाग केले आहेत, याची खात्री नसते आणि मी तिला या ड्रग्जचा पुरवठा करत राहावा, या तिच्या अपेक्षेचा मला रागच येतो; पण ते तिला मिळालं नाही, की ती रडते, विव्हळते.

आमच्या आयुष्यावर तिच्या त्या फालतू नसांचं राज्य आहे. त्या वर याव्यात म्हणून ती त्यांना अंघोळीवेळी वाफ देते किंवा ती आतल्या गरम हवेची रचना एवढी वाढवते, की मी जवळजवळ गुदमरतो. त्या नसांसाठी ती काहीही करील. मी त्या क्रूर, घाणेरड्या, समाजद्रोही ड्रगची इंजेक्शन्स घेण्याच्या पद्धतीकडे तिरस्कारानं पाहतो. त्या व्हॅनच्या बाहेर जी ही जागा चालवते, ती म्हातारी हिप्पी शेतकरीण दंतहीन तोंडानं आणि तिची पोरंबाळं इकडेतिकडे धावत असताना कलकल करत असते. जेव्हा मी हेरॉईन ओढत असतो आणि रोझीला नसा न मिळाल्याचं पाहत असतो, तेव्हा माझी वाट पाहत असलेल्या कुणा व्यक्तीशी ती म्हातारी बोलत असते. नंतर रोझी त्या नसेतून थोडं रक्त काढू शकते. तिला ते इंजेक्शन घ्यायला इतका वेळ लागतो, की ते रक्त गोठू लागतं. ती बहुधा हे इंजेक्शन घेऊ शकणार नाही.

हेरॉईनचं व्यसन असलेल्या आणि ज्याला ते घेता आलेलं नाही, अशा व्यक्तीच्या आजूबाजूला असायला तुम्हाला नको वाटेल, म्हणून मी उठतो आणि बाहेर जातो आणि तिथे जॉन माझी वाट पाहत असतो. तो उंच भुऱ्या केसांचा वेस्ट कंट्रीचा मुलगा आहे. तो माझ्याकडून ठोक माल खरेदी करतो आणि नंतर ते प्रत्यक्ष वापरणाऱ्यांना विकतो. तो माझ्यासारखा आहे. त्याची ड्रग्जची सवयही तशी आटोक्यात आहे आणि ते ड्रग्ज विकून तो ती भागवतो. ग्लासटॉन फेस्टीव्हला ज्यानं माझे ड्रग्ज विकले, त्या समूहातील तो एक होता. तो तंबूच्या मधून ओरडत फिरायचा. "एस, ॲसिड, स्पीड हे इथे विकत घ्या."

माझ्या जुन्या क्लबच्या दिवसांत मी एस आणि स्पीडचा व्यापार केलाय, कारण ती गंमत होती. आता मी व्यापार करतोय, कारण खरंच मला त्या ड्रग्जची आणि पैशाची जरुरी आहे आणि मी त्यात तरबेजही होतोय. त्या बाजारात किती

तुटवडा आहे, ते मी अगदी पटकन ओळखतो आणि त्याप्रमाणे किंमत लावतो. मला पुरवठा करणारेही पुरेसे आहेत, त्यामुळे मला गरज असेल, तसे ड्रग्ज पटकन खात्रीनं मिळतात. मी शाळेत असताना गणितात एवढा पक्का नव्हतो; परंतु आता माझ्या लक्षात येतंय, की मी अगदी या बाबतीत उत्तम आहे. माझी आठवण तशी पक्की आहे. लोक माझं किती देणं लागतात, ते मी लिहू नये, पण मी ते छोट्या कागदाच्या तुकड्यावर गिचमीड अक्षरात कसंही करून लिहितो आणि मग ते व्हॅनभर लपवून ठेवतो. अर्थात, हे करण्याची खरंच मला गरज नाही. जेव्हा मला कोणी ड्रग्जचं किंवा पैशाचं देणं लागतात, मी ते अजिबात विसरत नाही.

आम्ही अशी भटकंती करत आहोतच आणि आमची भांडणंही विकोपाला जातात. आम्हाला परस्परांचा राग येतो. आम्ही नेहमी परस्परांवर बनवण्याचा, पुड्या लपविण्याचा, त्यांची वाटणी बरोबर न करण्याचा किंवा ते न वाटण्याचा आरोप करत असतो. आम्ही भांडतो. वेगळे होतो. वेगवेगळ्या दिशांना प्रवास करतो. मी सर्वदूर ड्रग्ज विकतो. दुसऱ्या बायकांशी संभोग करतो. सारखा फिरतच असतो. मी अनेक जागी स्वत:ला गुंतवितो; परंतु मी सर्वस्वी असा एका जागी नसतो आणि हेच जे लोक मला भेटतात त्यांच्याबाबत घडतं; परंतु काहीही घडत असलं, तरी रोझी आणि मी पुन्हा एकमेकांना शोधतो, कारण आम्हाला एकमेकांची गरज आहे. कधी कधी प्रवाशांच्या ज्या जागा आहेत, तिथे मी तिच्या नावानं हाका मारत फिरत असतो.

"रोझी, रोझी तू इथे आहेस का? बाहेर ये. माझं तुझ्यावर प्रेम आहे."

आम्ही एकत्र उत्तरेकडे जायला निघतो. जिकडेतिकडे थंडी आहे; पण इथे जास्तच थंडी आहे. आकाश निरंतर करडं आहे. मॉरकॅबेत समुद्र करड्या रंगाच्या भिंती कोसळाव्या, तसा खाली कोसळत पडतो. तो तसा ओला वाऱ्याचा दिवस आहे. त्या व्यापाऱ्याकडे फक्त एकच पुडी आहे. आम्हा दोघांत एक पुडी... आम्ही सार्वजनिक स्वच्छतागृहात जातो.

त्या पुडीकडे आणि मग परस्परांकडे पाहतो. "जर तू ते ओढलंस, तर तुला काही नशा येणार नाही." रोझी मला ताकीद देते.

मी डोळे मिटतो. मला त्या नशेची गरज आहे.

ती म्हणते, "यातून तुला काही हवं असेल, तर ते तुला इंजेक्शननं आतच घ्यायला हवं."

मला हेरॉईनची गरज आहे. ती त्याचं इंजेक्शन घेते, मी ते ओढतो; परंतु या रसायनामुळे आम्ही एकत्र बांधले गेलो आहोत.

"हे तुझ्यावर अवलंबून आहे." ती वाट पाहत म्हणते. तिचं नाक वाहत आहे. डोळ्यांतून पाणी येत आहे, कारण तिच्या देहाला हे माहीत आहे, की नशेची

शक्यता आता जवळ आली आहे.

"ठीक आहे. तुझ्या चुत्या मनानं काय ते ठरव."

त्याचं इंजेक्शन घेणं हे जास्त काटकसरीचं आहे, हे खरं आहे. तुम्ही ते ओढा आणि त्यातील अर्धा भाग मग वातावरणातच नाहीसा होतो. त्याचं इंजेक्शन घ्या, ते सर्व तुमच्या देहात जातं.

"तुला काय करायचंय?" रोझी विचारते. ती आता थरथरत आहे. ती त्या नशा करण्याच्या इतकी जवळ आलेली आहे, की ती कमोडवर झाकण टाकते आणि त्यावर बसते.

परंतु मी नेहमी असं म्हटलं नव्हतं का, की मी हे करणार नाही? मी नेहमीच म्हणत नाही का आलो, की मी इंजेक्शन घेणार नाही?

ती जेव्हा इंजेक्शन करण्याची तयारी करते, तेव्हा मी रोझीकडे नीट पाहतो. ते भारतीय दुकानात घेतलेलं लिंबूफूल, पाण्याची बाटली, तिचा तो मिष्टान्न खायचा चमचा आणि तिचा लायटर बाहेर काढते. जेव्हा रोझीला नशा करायची असते, तेव्हा आम्ही किती वेळा चमच्याशिवाय राहिलो आहोत. व्हॅनमध्ये रोझी घामेजून थरथरत असताना मी किती वेळा जुना माल विकणाऱ्या किंवा कोणत्याही दुकानात चमचा घेण्यासाठी गेलोय आणि शेवटी बारा चमच्यांचा संच घेऊन आलोय. तिची पुडी उघडी आहे आणि तिला गरज असलेली प्रत्येक गोष्ट तिथे आहे. ती ते सर्व अचूकपणे त्या कमोडच्या टाकीवर मांडतेय.

"काय?" रोझी विचारते.

मी त्या घाणेरड्या दमट स्वच्छतागृहाच्या जागेकडे पाहतो. मला थोडं हेरॉईन हवंय आणि अर्धी पुडी ओढल्यामुळे माझं भागणार नाहीये.

मी म्हणतो, "ओ, गेलं..." जर का मला हे इंजेक्शन घेण्यानं जास्त काय होत असेल, हे शोधायचं असेल, तर हा करडा, दु:खदायी उत्तरेकडचा दिवस हीच खरी वेळ आहे.

"मी तुझ्यासाठी ते तयार करते." ती म्हणते. ती तिचा पट्टा काढते आणि माझ्या बाहुभोवती ती रक्तवाहिनी दाबण्यासाठी गुंडाळते. हे वैयक्तिक आहे. हे अगदी जवळीक साधणारं आहे; परंतु तिचे हात थरथरतायत. त्यांच्यावर तिचं नियंत्रण नाही.

"मला आधी इंजेक्शन घ्यायला हवं." ती सरतेशेवटी म्हणते. रक्तवाहिनी दाबण्यासाठी पट्टा आपल्या मनगटाभोवती इतका घट्ट बांधते, की तिचा हात लालभडक होतो आणि ती आपल्या बोटांमध्ये नसा शोधण्यासाठी चाचपते. ती सुई आत घालून बाहेर ओढते. आत-बाहेर, आत-बाहेर. ती काही रक्त बाहेर काढते आणि रक्त गोठण्याआधी ती आत जायला हवी म्हणून धसका घेते. सरतेशेवटी

ती यशस्वी होते. तो बांधलेला पट्टा ती सोडते. तिचे डोळे बंद आहेत आणि जसं ते हेरॉईन तिच्या देहातून पसरतं, तशी ती खाली बसते. तिचे डोळे आणि नाक गळत होतं; परंतु सेकंदातच ती पुन्हा कोरडी होते. हेरॉईनमुळे ती पुन्हा सामान्य होते.

"तर मग ये," मी म्हणतो. ती माझ्यासाठी नशा तयार करत असताना मी घायकुतीला येऊन पाहत असतो. ती चमचा घेते आणि त्यात हेरॉईन टाकते. ती तपकिरी विटेच्या धुळीसारखी पूड आहे. त्यात ते फोडलं जावं, यासाठी ती काही अगदी थोडे लिंबूफूलाचे कण टाकते आणि मग पाणी घालते. ती त्या चमच्याखाली लायटर धरते. ते ती शिजवत आहे. जेव्हा त्याला बुडबुडे येतात, तेव्हा ते निर्जंतुक बनतं.

मी एका सिगरेटमधून फिल्टर काढतो. सर्व नव्हे, अगदी थोडे मिलिमीटर्स, त्यामुळे तो माझ्या बोटामध्ये कापसाचा बोळा असल्यासारखा वाटतो. मी तो फिल्टर त्यावर टाकतो. ती त्यावर सुई ठेवते आणि त्या फिल्टरमधून ती ते ड्रग चाळते. जेव्हा ती हे स्वत:साठी करत असते, त्या वेळी ती हे सर्व एका हातानं करू शकते; परंतु माझ्यासाठी ती दोन्ही हात वापरते.

माझ्या हातावरील गोंदवलेल्या भागात ती एक नस शोधते, मग ती सुई झटकन बोचली जाते. मी नशेची वाट बघतो. मला पहिल्यांदा ती मानेच्या मागच्या बाजूला जाणवते. मग माझ्या शरीरातील सर्व नसांत. मी पेटलोय. मला कापरं भरलंय. मला आता झटका येतोय. च्यायला नरकच. काहीतरी वेडपणानं माझ्या शरीराचा ताबा घेतलाय आणि ते मला स्त्रियांच्या स्वच्छतागृहात जिकडेतिकडे धडका देतंय. माझ्या नसांत हवेच्या प्रवाहानं भोकं पाडण्याचं हत्यार घुसवलंय. मला माझ्या तोंडात एक चामड्याचा तुकडा ठेवायला हवाय, जेणेकरून मी माझी जीभ चावणार नाही. मी फुटतोय. काय झालंय? इंजेक्शन घेणं, म्हणजे हे असं नव्हे. ही रोझीची काहीतरी चूक असावी. ती बहुधा मला मारण्याचा प्रयत्न करत असावी.

चिडलेला, मग रागावलेला आणि रागानं हिरवा-पिवळा झालेला मी तिचा गळा पकडतो. तिचा चेहरा बघतो. तिचे डोळे भीतीनं मोठे झालेत आणि तिच्या चेहऱ्यावरील वांगही पांढरे पडलेत.

"सॉरी, सॉरी." ती म्हणते. "मी बहुधा त्यात कचरा घातला असावा... चुतं ते घाणेरडं इंजेक्शन असावं. छी, छी..."

मी तिला ठार मारण्यासाठी हात उचलतो; पण ती याआधीच निघाली आहे.

"मी आणखी थोडं मिळवते. हा एकच मार्ग आहे."

मी तिच्या पाठोपाठ व्हॅनकडे जातो. मला वाटतं, की मी आता मरणार. जेव्हा

ती दुसऱ्या विक्रेत्याकडे व्हॅन घेऊन जायला निघते, तेव्हा शरीराला त्या झटक्यामुळे कापरं भरलंय, माझी दातखिळी बसलीये. ती आत जाते आणि मी व्हॅनमध्ये माझं शरीर धरून वाट बघत बसतो. मला वाटतं, हे घाणेरडं इंजेक्शन, ही सूचना आहे. याचा अर्थ यापुढे मी इंजेक्शन घेण्याचा प्रयत्न करू नये. मला माहीत आहे, या अशा तऱ्हेच्या अनुभवानंतर दहा पैकी नऊ जण पुढे जाणार नाहीत; परंतु याआधीच मला व्यसन जडलेलं आहे आणि मला माहीत आहे, की रोझीचं बरोबर आहे. या वेदना, दु:ख थांबवायचं असेल, तर दुसरं इंजेक्शन, हाच फक्त मार्ग आहे. या वेळी ते स्वच्छ घ्यायचं.

रोझी एक पुडी घेऊन येते आणि आम्ही समुद्रकिनाऱ्यावर जातो. सार्वजनिक स्वच्छतागृहाजवळ व्हॅन थांबवतो. तिथे या अशा थंडीच्या दिवसांत आजूबाजूला कोणी नाही. आम्ही त्या स्वच्छतागृहाच्या दमट शांततेत शिरेपर्यंत रोझीचे केस वाऱ्यामुळे सर्व दिशांना उडत आहेत आणि अचानक त्या केसांची हालचाल बंद होते. मी अजूनही थरथरतोय. माझे दात वाजतायत.

ती पुन्हा इंजेक्शन तयार करते आणि या वेळी जेव्हा ती सुई टोचल्याचं समजतं, या पावसाळी दिवसांत मोरकाँबे किनाऱ्यावरील त्या स्त्रियांच्या स्वच्छतागृहात काहीतरी आश्चर्यजनक घडतं. ते इतकं आश्चर्यजनक असतं, की मला माहीत आहे, की ते माझं आयुष्य बदलेल आणि आता परत फिरणं नाही.

क्रॅक हे तसं भडक आणि मिणमिण जळणारं आणि उत्तेजित करणारं आहे. ते जॉडी आहे. हेरॉईन ही उबदार मिठी आहे. ती आग आहे, एक आरामदायी खुर्ची, एक जाडजूड रग आणि खूप खूप प्रेम. ते म्हणजे रोझी. हेरॉईनमुळे सर्व शारीरिक आणि मानसिक व्यथा दूर होतात. हेरॉईन घ्या, म्हणजे सर्व काही ठीक होईल. रोझी ही सुई माझ्या दंडात टोचते, ती जणू शुद्ध मखमली पाणी माझ्या नसांत त्यातून आत घालत आहे आणि जेव्हा ती तो बांधलेला पट्टा सोडते, तेव्हा ती मखमल माझ्या सर्व शरीरभर पसरते आणि तिची ऊब माझ्या प्रत्येक नसेभोवती गुंडाळत असल्याचं मला जाणवतं. मी अनेकदा धूम्रपान करून हेरॉईन ओढलंय; पण हा अनुभव त्या इंजेक्शननं हजारो पटीनं वाढलाय. आता मला कळतं, की लोक हे का करतात. आता माझी उत्सुकता शमते. हे असं करतात, कारण हा अनुभव सुंदर आहे. रोझी सुंदर आहे आणि हे चुतं, मोरकाँबेही सुंदर आहे.

सुरुवातीला मला काही कळत नाही, म्हणजे मी झटकन एका झोपाळू उबदार विस्मृतीत जातो. हे रोझीनं केल्याचं मी पाहिलंय. तिचं डोकं छातीवर टेकतं. तिची बुबुळं टाचणीएवढी छोटी होतात. तिची लाळ गळते. ते अत्यंत किळसवाणं आहे. ते स्वत:चं समाधान करणारं आहे आणि ते कसं, ते आता मला समजतं. च्यायलाइ विलक्षणच!

जेव्हा मी जागा होतो, मला अजूनही छान वाटत असतं. मला त्या उरलेल्या दिवसातही छान वाटतं आणि रात्रीच्याही बराच काळात. माझी ती सर्व ठीक असल्याची भावना नाहीशी होत नाही. माझे दिवसाचे छान भाग आणखी वाढतात आणि वाईट भाग झटकन संपतात. खरं सांगायचं म्हणजे प्रत्येक गोष्ट ही इतकी चांगली आहे, की मला माहीत आहे, हे इंजेक्शन घेणं मला थांबवायला हवं आणि तेही आताच. हेरॉईननं माझ्या आत्म्याला पडलेलं भोक बुजवायला हवं. ते माझ्या त्या कोड्यातील हरवलेला तुकडा आहे. मी पुन्हा ते इंजेक्शन घेऊ नये आणि ते धूम्रपानही करू नये. हे सर्व कठीण जाणार आहे; परंतु मला माहीत आहे, की मी जर आता थांबलो नाही, तर मला फार मोठा धोका आहे.

तो शनिवार आहे. रविवारी रोझीला दुसरी पुडी लागते आणि ती माझ्यासाठीही एक आणते.

नाही. मी कालच स्वत:ला सांगितलंय, की मी पुन्हा त्याला स्पर्श करणार नाही, कधीही.

माझ्याकडे पुडी आहे.

आता मी हे सर्व नक्कीच थांबवणार आहे. सोमवारी माझ्याकडे आणखी एक पुडी आहे.

ठीक! हे तेवढंच. इंजेक्शन घेणं हे स्वारस्यपूर्ण होतं; पण आता ते माझ्याबाबत संपलंय.

मंगळवारी मी आजारी होतो. माझं नाक वाहत राहतं. माझ्या जांभया देणं आणि शिंका थांबत नाहीत. मला ओकारीही होते. माझी हाडं जळजळतात. मी दु:खी आहे आणि ते दु:ख खोलवरचं आहे. जीवन भयानक आहे आणि ते अगदी संथगतीनं चाललंय. काही ठीक होत नाहीये. हे जगच कंटाळवाणं आहे. प्रत्येक गोष्ट उदासवाणी आहे. ते चुतं घड्याळ पुढे जाण्याऐवजी मागे चाललंय. काही ठीक होत नाहीये. त्या सबंध दिवस जोराचा पाऊस पडतोय. मला पुन्हा ओकारी होते. माझी हाडं जळजळतात आणि माझा देह या वेदनांनी भरला आहे. इंजेक्शन घेऊन आता ते सोडल्यानंतरच्या या भावना एवढ्या जोरदार आहेत, कारण इंजेक्शनमुळे ते सर्व ड्रग तुमच्या शरीरात जातं आणि जितकं ते इंजेक्शन चांगलं, तितके त्या नंतरचे परिणाम वाईट; परंतु मी जर हे थांबवणार असेन, तर मला माहीत आहे, की ही ती वेळ आहे आणि मला यातून जायला हवं.

रोझीनं नशा केलीय आणि तिला बघणं मला नकोसं वाटतंय. माझ्या शरीरातून जोरात घाम येतोय. माझ्या शरीरातील स्निग्ध भागात वणवा गेलाय. मला एखादी विणायची सुई माझ्या हाडांत बोचावीशी वाटतेय आणि तिथे जे काही जळणारं आहे ते ओढून काढावंसं वाटतंय. मी थरथरतो. मला थंडी भरते. मी बोलू शकत

नाही, खाऊ शकत नाही आणि स्तब्धही राहू शकत नाही आणि ते दु:खही टाळू शकत नाही.

रोझी मला एक पुडी देते. त्याची किंमत दहा पौंड आहे. फक्त दहा पौंडात मी माझं दु:ख संपवू शकेन आणि दहा पौंडात मी ते करतो.

ते अविश्वसनीय आहे. मला हेरॉईनबद्दल सर्व माहिती आहे आणि तरीही मी त्या गर्तेत कोसळलोय. मला माहीत आहे, की सर्व व्यसनी माणसांना हा मधुचंद्राचा काळ वाटतो आणि ते त्याच्या लोभानं त्यात ओढले जातात आणि त्यामुळे अत्यंत उशीर होईपर्यंत त्यांना तो सोडवत नाही. मी ती वेळ धूम्रपान करून घालवली आणि त्या वेळी मला तेही सोडावंसं वाटत होतं. आता मला इंजेक्शन घ्यायचं थांबावंसं वाटतंय; परंतु मला याआधीच माहीत आहे, की मी ते करू शकणार नाही.

मी स्वत:शी कबुली देतो, की हेरॉईनही माझ्या आयुष्यातील एक गरज होती आणि मी इंजेक्शन घेण्याआधी मला ती समस्या वाटत होती; परंतु आता ती निकड आहे. ही निकड अन्नापेक्षाही जास्त आहे. पाण्यासारखी ती निकड आहे. त्याशिवाय मी सकाळी उठू शकत नाही. बोलू शकत नाही. हालचाल करू शकत नाही. जिवंत राहू शकत नाही. जर मला भयानक वाटू नये, असं वाटत असेल, तर मला ते घ्यायला हवं. असं काही नाही, की हेरॉईन मला यापुढे जास्त सुख देतंय. मी त्यासाठी दुसऱ्या ड्रग्जकडे वळतो, त्यामुळे हेरॉईन न घेतल्यामुळे झालेले दुष्परिणाम कमी होतात एवढंच. ते इंजेक्शन, मला त्याची गरज असता आधीच्या स्थितीला आणून सोडतं.

आता रोझी आणि मी एकत्र इंजेक्शन घेतो; परंतु त्यामुळे काही आम्ही जवळ आलेलो नाही. त्याऐवजी कुणी पुडी आणायची आणि त्यासाठी कुणी पैसे द्यायचे आणि त्या पुडीची कशी वाटणी करायची यावरून भांडतो. तरीसुद्धा माझं तिच्यावर प्रेम आहे. त्याचं असं आहे, की कधी कधी माझं रोझीवरचं प्रेम आणि हेरॉईनवरच्या प्रेमाची सरमिसळ होते.

■

२४

माझा जुना मित्र डॅनियल मला पत्र लिहितो. आम्ही काही काळ परस्परांशी बोललेलो नाही, कारण आमच्या आयुष्याचे मार्ग बदललेले आहेत. बर्मिंगहॅममध्ये तो माझ्याकडून अधूनमधून ड्रग्ज विकत घ्यायचा; परंतु तो त्या संगीतातील नाही. तो नेहमीच डीआयवायच्या मुक्त पार्टींजना जायचं म्हणतो; पण कसंही करून तो ते करू शकलेला नाही. कदाचित, तो गेला, तरी त्याला ते संगीत समजणार नाही. आता तो पुन्हा एका जबर चोरीबद्दल तुरुंगात आहे. आता तो बदलणारही नाही; परंतु आमची मैत्री अजून तशीच दाट आहे. आता अवघ्या पाच वर्षांपूर्वीच आम्ही तुरुंगातील एकाच कोठडीत होतो आणि तो बंधुत्वाचा बंध अजूनही तेवढाच खरा आहे.

डॅनचं पत्र वरून साधंच वाटतं; परंतु आम्ही वरून असे दिसलो, तरी आम्हाला सर्व गुप्त खुणा समजतात. त्यानं मला बर्मिंगहॅमला ताबडतोब बोलावलंय.

"जाऊ नको." रोझी सांगते, "मला हे काही पसंत नाही. तिथे काहीतरी विचित्र चाललंय."

"तुला हे समजणार नाही." मी तिला सांगतो. "तुला माझ्या आणि डॅनियलविषयी समजणार नाही, कारण तुझे कुटुंबाचे बंध घट्ट आहेत; पण जेथून मी आणि डॅनी येतोय, तिथे तुम्हाला स्वत:चं कुटुंब बनवावं लागतं. आम्ही दोघांनी एकत्र खूप सोसलंय आणि आम्ही एकमेकांसाठी काहीही करू."

"तू मला सांगितलं होतंस," रोझी म्हणते, "की यापुढे तुम्हा दोघांत काहीही समान नाही."

डॅन हा सूर्यास्ताची वाखाणणी करू शकत नाही किंवा त्याच्याकडे काही निर्मिती-क्षमता किंवा कल्पनाशक्ती नाही, हे मी कधी तिच्याजवळ बोललोय का? ठीक आहे, ते सर्व सोडलं, तरी तो माझा भाऊ आहे. माझा खरा भाऊ. शेन एका वर्षापूर्वी अमेरिकेला अटलांटामध्ये साऊंडसिस्टीम चालवण्यासाठी गेलाय; परंतु शेनपेक्षा

माझी डॅनजवळ जवळीक होती आणि डॅन आता सुचवतोय, की त्याला माझी गरज आहे.

मग आणखी विरोध होत असताना मी सरळ बर्मिंगहॅमकडे व्हॅन नेतो. डॅन आणि चार-पाच कैदी माझी वाट पाहत आहेत. ते दुसरे लोक हे मोठे गँगस्टर आहेत, हे उघड आहे आणि आता ते आत असल्यामुळे ते एका विश्वासू ड्रग विकणाऱ्याच्या शोधात आहेत आणि त्यांना हवा असलेला तो माणूस मी आहे, हे डॅनियलनं त्यांना सांगितलंय.

मी ते गँगस्टर आजूबाजूला असताना शांत राहण्याचा प्रयत्न करतो. डॅनही शांत आहे; पण जेव्हा ते त्या कामाचं वर्णन करतात, तेव्हा आम्ही आमची उत्तेजितता कशीबशी दाबून ठेवतो.

"आपण आता त्यांच्याबरोबर आहोत," मी तेथून बाहेर पडताना डॅनियल कुजबुजतो. त्याच्या त्या पांढऱ्या चेहऱ्यावर ते बाळासारखे मोठे डोळे चमकत आहेत. तुम्ही त्याला हिशेब करताना, योजना आखताना आणि विचार करताना जवळून पाहू शकता. त्याच्या डोक्याच्या बाजूला असलेली ती निळी नसही उडताना दिसते, कारण ती त्याच्या कामानं व्यग्र असलेल्या मेंदूला तडक जोडलेली आहे.

"आपली आता चंगी आहे मित्रा, आपण आता लक्षाधीश ड्रग्जचे व्यापारी होणार." आणि मग तो हसू लागतो. मी ते हास्य ओळखतो. ते त्याचं नेहमीचं घाबरून उत्तेजित झाल्यावर येणारं हसू आहे. जेव्हा आम्ही लोकांच्या चोऱ्या करायचो, तेव्हा मी ते ऐकलंय.

हे गँगस्टर हे इस्टर्न युरोपमधील मालाच्या पुरवठ्याच्या स्रोतापासून फक्त एक पायरी दूर आहेत आणि त्यांना तुरुंगातून एक मोठा धंदा साकारायचा आहे. याचा विक्रेता म्हणून माझं काम. सर्वसामान्य दिसणारे लोक, म्हणजे छपरावर काम करणारे किंवा रस्त्यानजीक नळाचं काम करणारे, जे आपल्या कारमधून धंद्यांना लागणारे ड्रग्ज घेऊन येतील, त्यांना गाठायचं. मी ते ड्रग्ज माझ्या रहिवासी व्हॅनमध्ये भरायचं. त्या रहिवासी व्हॅनमध्ये झोपायची जागा म्हणून गुंडाळलेल्या गाद्या असतील, पण मी त्यात एस भरलेल्या असतील. सांगाचंय, की हजारोंनी एस. मला त्या बर्मिंगहॅममधून इस्ट आणि वेस्ट मिडलँड्समधील विक्रेत्यांकडे न्यायच्या आहेत.

हे मोठे पैसे मिळवून देणारं; पण धोक्याचं काम आहे. ते उत्तेजित करणारं आहे, घाबरविणारं आहे. मला केवळ त्या ड्रग्जची ने-आण करण्यासाठी पैसे मिळणार नाहीत, तर स्वत:साठीही. प्रत्येक गोळीची किंमत पन्नास पेन्सनी वाढवून व्यवस्थित नफा मिळवता येईल. याचा अर्थ पाचशे पौंड हे प्रत्येक हजारांवर किंवा काही गोळ्या माल पुरवताना हरवल्या, असं सांगून त्या डॅनच्या घराजवळ किडुरमिन्स्टरला गटारात लपवायच्या. मग माझ्याकडे स्वत:चा असा खास वैयक्तिक

ड्रग्जचा माल असेल आणि जेव्हा मी तो विकेन, तेव्हा त्यातील अर्धा पैसा मी डॅनला देईन.

रोझी माझ्या या फेऱ्या चालू असताना माझ्याबरोबर येते. आम्ही ज्यांची व्हॅन वरपर्यंत इस्टसी या ड्रगनं भरलेली आहे, अशा विक्रत्यांऐवजी आम्ही चिंतामुक्त विद्यार्थ्यांसारखे दिसतो. रोझीला हे काम काही उत्तेजित करणारं वाटत नाही. ती अगदी तणावाखाली असते. तिचे केस गळू लागतात आणि आतून मीही घाबरलेला आहे; परंतु मी ते कबूल करणार नाही.

"लोकांना जर वाटलं, की यापुढे तुझा उपयोग नाही, तर ते तुझे पाय तोडतील." आम्ही जेव्हा ड्रग्जचा साठा खडखडवीत व्हॅन चालवत असतो, तेव्हा ती मला हे सांगते.

मी खांदे उडवितो. तिला हे समजत नाही का, की मी आता त्यांच्यापैकीच एक मोठा गुंड आहे.

"आणि जर पोलिसांनी तुला थांबवलं, तर यासाठी तुला जीवनभराची शिक्षा होईल."

"ते असं करणार नाहीत."

"डॅनियल पर्वा करणार नाही."

"तो माझा मित्र आहे."

"तो मग पुढची वीस वर्षं तुला तुरुंगात भेटत राहील का? मैत्री म्हणजे असं आहे का?"

"तुला आमची मैत्रीच कळत नाहीये. हा प्रश्न आहे विश्वासाचा." विश्वास? ज्या गँगस्टरसारखं व्हावं, असं मला वाटतंय, त्यांच्यासारखाच मी बोलतोय; परंतु हे नक्की, की डॅनियल आणि मी एकमेकांचा हात धरून नरकात जाऊ.

"मला एक गोष्ट कळतेय, तो जन्मठेप मिळणाऱ्यांपैकी एक नाही."

मी अर्थात व्यसनी आहे; परंतु माझी ही सवय इतकी नियंत्रणाखाली आहे, की मी ते गुप्त ठेवू शकतो. काही अंशी रोझीपासूनही. माझ्यासारख्याची ही सवय आयुष्य कठीण बनवते. मला ते ड्रग्ज गुप्तपणे मिळवावे लागतात, लपवावे लागतात आणि ते घेण्यासाठी खास गुप्त जागा शोधाव्या लागतात. आता मी हेरॉईनचीच नव्हे, तर कोक आणि क्रॅकचीसुद्धा इंजेक्शन्स घेत आहे. एकदा तुम्ही सुरुवात केलीत, तर तुम्ही कशाचंही इंजेक्शन घ्याल. यापुढे धूम्रपान करणं, वास घेऊन ओढणं आणि गोळ्या खाणं हे पुरेसं नाही. तुमची अर्धी ड्रग ही त्या क्रॅकच्या पाइपच्या टोकाला वातावरणात नाहीशी होते. हे बघणं सोसण्यासारखं नाही. तुम्हाला ती सर्व नशा पूर्णपणे घेण्यासाठी ड्रग्ज तुमच्या नसेतच जायला हवी.

सदैव कुरकुरत असलेल्या रोझीच्या तावडीतून सुटण्यासाठी मी घायकुतीला

आलोय. मला शांत, सुरक्षित नशा हवी, म्हणून प्रत्येक दिवशी सकाळी जेव्हा कुणी अवतीभवती नाही, तेव्हा मी बर्मिंगहॅममध्ये एका वेश्येला भेटतो. मी त्या बॉलसल हॉलमधील फालतू मुलींविषयी बोलत नाहीये. त्या वाढत्या वयाच्या तारुण्यरेषेपासून मी खूप दूर आलोय. मी सांगतोय ते एका दर्जेदार मुलीबद्दल. ती सुंदर आहे आणि चिनी आहे. जेव्हा मी तिला सांगतो, की मी ड्रग विक्रेता आहे, ती माझ्यावर विश्वास ठेवत नाही. तिला मी पाचशे इस्टसीज बरोबर घेऊन फिरतो हे दाखवतो आणि अचानक ती माझ्यावर भाळते. हा असा व्यापार करणं, हे अहंकाराला फार छान आहे. वेश्या आणि मी सकाळ एकत्र घालवितो. मी तिच्या त्या सुंदर खासगी जागेत क्रॅक आणि हेरॉईनचं इंजेक्शन घेतो, मला छान वाटतं. मला एकट्याला ड्रग घेणं आवडत नाही; परंतु हल्ली ड्रग घेणं हा माझा एकट्याचा उद्योग झालाय.

परंतु रोझीचीही गुप्त गोष्ट आहे. एक विक्रेता त्याबद्दल मला सांगतो. जेव्हा मी ड्रगचा माल पुरवत असतो, तेव्हा रोझी नेहमी हळूच आत येते आणि हेरॉईन मागत असते, असं तो सांगतो. मी खूप चिडतो. मला खूप काळजीही वाटते. प्रत्येकाला हे कळेल, की माझी मैत्रीण ही जंकी आहे आणि त्यामुळे त्यांना असंही वाटेल मीही जंकी आहे. कुणीही जंकीवर विश्वास ठेवत नाही, तो ड्रग्जचा व्यापार करणारा असूच शकणार नाही.

रोझी काय करते ते मला कळतं, मी तिला केस धरून ओढत नेतो आणि सर्वांसमोर तिच्यावर खूप चिडतो. तिला शिव्या देतो. हे महत्त्वाचं आहे, की मी तिच्या त्या सवयीपासून दूर आहे, हे त्यांना कळायला हवं. शिवाय मी खरंच चिडलोय. आयुष्यात मला पहिल्यांदा चांगलं काम मिळालंय. त्यात भरपूर पैसा मिळतोय आणि मला हवे असलेले ड्रग्जही मिळतायत आणि रोझी या सर्वांत मला संकटात ओढतेय.

मी तिला त्या व्हॅनमध्ये बंद करतो आणि तिला बाहेर जाऊ देत नाही.

"तू माझं चुतं आयुष्यच बरबाद केलंयस." मी गुरगुरतो.

ती रडते आणि जेवढी वेड्यासारखी वागते, तेवढा मी आणखीन वाईट वागतो. ती बेफाम रडत रडत व्हॅनच्या बाजूवर हात आपटते. मला तिरस्काराशिवाय आणखी काही वाटत नाही. मी पुन्हा तेच चित्र पाहतो. त्याचा मला राग येतो. ते मला नको असतं, तेव्हा डोक्यात येतं. माझी ममा वळवळत आणि किंचाळत त्या फार्महाऊसच्या जमिनीवर पडलीय आणि एखाद्या खडकासारखी माझ्या डॅडींच्या चेहऱ्यावर दिसणारी ती अरुची. ममा वेडी होती. डॅडी वेडे होते. मग हे कसं घडलं? हे कसं शक्य आहे, की मी डॅडींसारखा झालोय? रोझी माझ्या जीवनाचं प्रेम, कशी का होईना माझ्या ममासारखी झालेय? आम्हीही वेडे आहोत का? ही

रोझी मला भेटली, तेव्हा अशी होती, की मी तिला असं केलंय?

मला आशा वाटते, की मी ज्या विक्रेत्यांबरोबर काम करतोय, त्यांची भीती घालवण्यासाठी मी पुरेसं काय ते केलंय. त्यांची खात्री केलीय, की मला या गोष्टींचं व्यसन नाही आणि मी विश्वासपात्र आहे आणि माझी मैत्रीण काहीही ड्रग घेवो, मी अशा तऱ्हेचा जंकी नाही; परंतु लोक माझ्याबद्दल कुजबुजतायत. मला ते जाणवतंय. प्रत्येकाचं मानसिक असंतुलन वाढत चाललंय आणि याआधी अशा तऱ्हेचं मानसिक असंतुलन होतंच, कारण यात गुंतलेला पैसा बराच आहे. पोलिसांची सदैव धास्ती आहे आणि ते गँगस्टरही धोकादायक आहेत.

मला माहीत आहे, की माझ्याविषयीची ही कुजबूज, डॅन आणि हा व्यवसाय तुरुंगातून योजनाबद्धतेनं चालवणाऱ्या गँगस्टर्सच्या कानांवर गेलीय, कारण काहीतरी विचित्र घडतं. मी नेलजवळ मोबाईलवरून बोलतो. थोड्या वेळानं तो मला फोन करतो.

"एका माणसानं आपलं बोलणं संपताच मला फोन केला. तो तुझ्याबद्दल विचारत होता."

"काय विचारत होता?"

"आपण जे काही आता बोलत होतो, त्याबद्दल त्यानं आपलं बोलणं कसं ते ऐकलं?"

याचा अर्थ माझा फोन टॅप केलाय. ते गँगस्टर लोक माझ्या प्रत्येक व्यवहारावर लक्ष ठेवून आहेत. मला संकटाची चाहूल लागते.

"तो कशा तऱ्हेचा माणूस होता असं तुला वाटतं?" मी नेलला विचारतो.

"अशा तऱ्हेचा, की याबाबत निर्दयच म्हण ना."

"अरे देवा!" जेव्हा मी रोझीला सांगतो, तेव्हा ती म्हणते. "आपल्याला यातून बाहेर पडायला हवं." तिचे डोळे काळजीनं विस्फारले आहेत. ती आपले केस निराशेच्या हालचालीत मागे ओढते आणि ते तिच्या हातात येतात.

मला माहीत आहे, की ती बरोबर आहे. त्या गँगस्टर्सचं माझ्याविरुद्ध मत झालंय. डॅनही माझ्याविरुद्ध झाला आहे. याचा अर्थ हे सर्व सोडायचं आणि पळायचं.

मी डॅनसाठी आणि माझ्यासाठी चोरलेल्या अर्ध्या इस्टसीज विकतो आणि आम्ही व्हॅन घेऊन उत्तरेकडे वळतो. मी जोरात व्हॅन चालवतो. थोड्या वेळानं फोन वाजतो. त्या आवाजात भीती आहे.

"मला तू ज्या चुत्या इस्टसीज विकल्यास, त्या द्याव्या लागल्या!" मी आताच ज्या विक्रेत्याला त्या विकल्या होत्या, तो सांगतो. "बऱ्याच गुंडांनी घराला वेढा घातला. त्यांनी पत्राच्या पेटीतून पेट्रोल आत ओतलं आणि म्हणाले, की जर मी

त्यांना त्या परत केल्या नाहीत, तर ते ही जागा पेटवून देतील. ते म्हणाले, की त्या तुला विकण्यासाठी दिलेल्या नाहीत.'' आम्ही मग एक क्षणभरही गमावला नाही.

आता आम्ही एम ६ या मोटार रस्त्यावर बरेच दूर आलो आहोत. रोझीनं जे काही भविष्य केलं होतं, ते खरं ठरलंय. माझा भाऊ डॅन हा माझ्या विरोधात गेलाय. तो त्या गँगस्टरबरोबर गेलाय.

आता व्हॅनमध्ये शांतता आहे. ती अशी कित्येक मैल टिकलीय. जेव्हा नंतर आम्ही केंडॉलजवळ असल्यामुळे आम्हाला पुन्हा सुरक्षित वाटू लागतं, तेव्हा आम्ही भांडायलाही लागतो. आम्ही एकमेकांना वाटेल ते बोलतो. भांडण झालं, की आम्ही असंच बोलतो. मी त्या रस्त्यावरून व्हॅन बाजूला घेतो आणि निर्जन अशा ठिकाणी थांबवतो, त्यामुळे मी एकाग्रपणे ओरडू शकेन. रोझी रडू लागते. मी आणखीन मोठ्यानं ओरडतो.

''तुला झालंय तरी काय?'' मी वैतागून तिच्यावर ओरडतो. ''तू हल्ली काय करतेस, तर रडारड.''

''मी...'' हुंदके, ''मी....'' मग मोठे हुंदके, ''मी ''काय ते सांग...'' गरोदर आहे.''

ओ, पुन्हा शांतता. आम्ही आता त्या व्हॅनमध्ये शांत गल्लीत, कोणत्यातरी शांत निर्जन जागी कुठेतरी सायलेन्सशायरमध्ये आहोत.

गरोदर.

याचा अर्थ तिला बाळ होणार आहे. कदाचित, एक मिनिटभर या बातमीचं गांभीर्य मला पार गुंडाळून टाकतं. बाळ, त्याला तुम्हाला खायला घालायला हवं, कपडे करायला हवेत, दिवसाचे चोवीस तास त्याची काळजी घ्यायला हवी, मग नंतर ते मोठं मोठं होतं आणि त्याच्या गरजा बदलतात आणि या सर्व गोष्टी पुरवाव्या लागतात. ते बाळ मग अर्धवट वयाचं होतं आणि त्यावर तुम्हाला प्रेम करावं लागतं, त्याची काळजी घ्यावी लागते आणि जगायचं कसं ते त्याला शिकवावं लागतं. जर तुम्हाला बाळ असेल, तर तुम्ही स्वार्थी, बालिश आणि एकटे असू शकत नाही. माझे डॅडी तसे होते आणि ते काही पुरेसे चांगले नव्हते.

ते ज्ञान, ती जबाबदारीची जाणीव या सर्वांची भव्यदिव्यता ही क्षणभंगुर आहे.

''तुला आनंद झाला नाही का?'' रोझी हुंदके देत विचारते.

''अर्थात मला झालाय.'' मी तिच्याभोवती हात टाकत म्हणतो, ''बाळ, हं मला खूप आनंद झालाय.''

''तुला ते हवंय, हवंय ना?''

''हो, हवंय. ही खूप छान बातमी आहे.''

रोझीला बराच काळ मूल हवं होतं. ती मला सांगत होती; पण माझ्या

गरजांपलीकडे आणि सवयींपलीकडे मी पाहू शकत नव्हतो. त्या शब्दांचा असा काही अर्थ असेल, असं वाटलं नव्हतं; परंतु आता मला समजतंय, की बाळ हे तिच्या दृष्टीनं एक उत्तर आहे. आम्ही सारखा प्रवास करतो. हेरॉईनची गरज ही फसवी आहे आणि ती आम्हाला सारखं फिरवत असते. सदैव आम्ही वादविवाद करत असतो. आता रोझीला स्थैर्य हवंय. तिला असं वाटतं, की मुलामुळे तिला ते मिळेल.

मी मात्र संशय आणि काळजीनं ग्रासलोय. मी ती व्हॅन पुन्हा सुरू करतो. जेव्हा आम्ही केंडॉलला आमच्या फ्लॅटकडे जायला निघतो, तेव्हा तिचा आवाज त्या शांततेत भरून राहतो. ममा अजूनही लेक्समध्ये राहतेय आणि माझ्या दोन्ही बहिणीही. बेथनी आपल्या मार्गानं जातेय. ती पार्ट्यांचा आस्वाद घेतेय आणि केली लहान मुलांत पार गुंतलीय. मी त्यांना कधीमधी भेटतो. जेव्हा डॅडींचं घरावर वर्चस्व होतं, तेव्हाही आम्ही एकाच घरात वेगवेगळं राहायला शिकलो होतो. आता आम्ही एकाच शहरात वेगळं राहतोय. आमच्यापैकी केलीशिवाय कुणालाच डॅडींशी काही कर्तव्य नाही. ते जेव्हा डुरहॅमवरून केलीला भेटायला येतात, बेथनी त्यांना टाळते. जर ते शहरात असले, तर ती घरातून बाहेर पडत नाही.

"काय घडलंय काय?" मी विचारतो. माझे डोळे कित्येक वर्षांत पहिल्यांदा बेथनीवर स्थिर असतात. ती फार सुंदर आहे आणि एका नजरेत तुम्ही सांगू शकता, की ती स्वभावानं गोड आहे आणि मनमोकळी आहे. डॅडींची मुलगी. मला त्यांच्या त्या विशिष्ट नात्याबद्दल, ते घोडे, ती चेष्टामस्करी, त्यांचे ते तिच्याभोवती असताना हळुवार होणारे दाणगट हात, याबद्दल नेहमीच हेवा वाटायचा आणि त्यांना रस्त्यावरही भेटायचा धोका ती पत्करणार नाही.

बेथनी माझ्या दृष्टीला दृष्टी भिडवू शकत नाही. मला दिसतं, की तिला याबद्दल बोलायचं नाही. मी आणखी चौकश्या करत नाही. माझ्या स्वतःच्या आयुष्यात जे येणार आहे, त्याबद्दल मी आधीच मग्न आहे.

रोझीचं पोट वाढतंय आणि मी आमच्या पुढ्यात असलेल्या त्या जबाबदारीनं हादरलोय. मी एका श्रीमंत माणसाच्या गावातील इस्टेटीवर अर्धवेळचं काम पकडतो आणि बाळासाठी आम्ही हेरॉईनचं प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करतो; परंतु आता मला माझी सवय लपवून ठेवावी लागत नसल्यामुळे एखाद्या कपाटाच्या खणात असलेल्या किंवा कपाटाच्या मागे असलेल्या गोष्टीसारखी ती वाढते. ती इतकी वाढते, की त्यानं फ्लॅट भरून जातोय, माझं जीवन भरून जातंय. ती इतकी वाढते, की माझ्या लक्षात येतं, की मला त्याच्यावर नियंत्रण ठेवता येत नाही, तर ते माझ्यावर नियंत्रण ठेवतंय.

रोझी आठ महिन्यांची गरोदर आहे आणि सफरचंदासारखी गरगरीत आहे. ती

घेत असलेल्या हेरॉईनचा कोटा धूम्रपानातच वापरते. मेथॉडीनचा उपयोग ती मदतीसाठी करते. मी हेरॉईन पूर्णपणे सोडण्याचा प्रयत्न करतो; पण ते न घेतल्यामुळे होणारी प्रक्रिया, ही भयंकर आहे. आम्ही प्रक्रियेला तोंड देतो. आमचे डोळे आणि नाक वाहत असतं आणि डोकं भयानक दुखतं. आम्ही जळजळतो, ओकतो, कापतो, आम्हाला थंडी लागते, आम्ही रडतो. दोघं परस्परांना असह्य होतो. दिवसें दिवस आमच्या देहाचे तुकडे होणार, असं वाटतं. सरतेशेवटी आम्ही शरण जातो. पहिल्या इंजेक्शनचा परिणाम ताबडतोब होतो. माझं रडणारं शरीर अचानक कोरडं होतं. मी पुन्हा तरुण होतो आणि माझा देह पुन्हा नीट होतो. माझ्या डोक्यातील कल्पना आणि विचार हे पुन्हा एकदा फिरू लागतात, कारण कुणीतरी पुन्हा विजेचा प्रवाह सुरू केलाय.

आता मी ड्रग घेतलंय. आम्ही बाळ आणि हेरॉईनची सांगड कशी घालू, हा विचार संपलाय आणि मला उत्तेजित झाल्यासारखं वाटतंय. तो आत असलेला एकटेपणा जो मी लहान मुलगा असल्यापासून अनुभवलाय, तो हेरॉईननं भरून काढण्यासाठी बरंच काही केलंय. असा एकटेपणा, त्याबद्दल मला विचार करायचा नाही किंवा त्याच्याशी लढा द्यायचा नाही. जर मी त्याभोवती कुटुंब उभं केलं, तर मग तो एकाकीपणा संपेल. मूल होणं हा एक विलक्षण अनुभव असेल.

एप्रिल १९९६मध्ये बाळाचा जन्म होतो, तोही सिझेरियननं आणि तेही एका दीर्घ भावनामय रात्रीनंतर. मी रोझीच्या डोक्याशी तोंडावर मास्क घालून आणि गाऊन घालून उभा आहे. तेथील नोकर एक चादर वर धरतात आणि अचानक ती मानवाची किंचाळणारी प्रतिकृती खाली डोकं, वर पाय करून माझ्यासमोर लोंबकळत धरतात.

हा माझा मुलगा आहे, यावर मी विश्वासच ठेवू शकत नाही. माझ्या मनात भावनांचं वादळ उठलंय आणि ते मी सहन करू शकत नाही. खोल, खोल प्रेम, यापूर्वी वाटलेल्यापैकी कशाहूनही जास्त खोल. इतकं खोल, की मला त्याची भीती वाटते. मला त्याला धरायला दिलं जातं. तो माझ्या डोळ्यांत बघतो आणि क्षणभर गप्प होतो. त्याचं वजन अगदी कमी आहे. त्याचं शरीर माझ्या शरीरावर विश्वासानं दबलेलं आहे. त्याला असं वाटत नाही, त्यानं त्याच्या आयुष्याची सुरुवात केलीय. कदाचित, त्याला असं वाटतंय, मी माझ्या आयुष्याची पुन्हा सुरुवात करावी. मला आनंद होतो. मी उन्मादाच्या शिखरावर आहे.

आम्ही त्याला जॅक म्हणणार आहोत आणि हॉस्पिटलमध्ये मी माझ्या त्या लहान मुलाबरोबर एक बंधन बांधतो, एक प्रेमाचं बंधन. जे मला माहीत असलेल्या इतर बंधनांहून मजबूत आहे. आतापर्यंत ड्रग्ज या फक्त एकाच गोष्टीचं मला खरोखर महत्त्व वाटत होतं. आता तिथे जॅक आहे.

ते आम्हाला एका खोलीत घेऊन जातात आणि रोझी ताबडतोब झोपी जाते. जॅक आपली लहानगी बोटं माझ्या बोटांभोवती गुंफतो. त्याच्यावर कसं प्रेम करायचं, हे मला माहीत आहे का, या भीतीमुळे हळूहळू माझा आनंद कमी होतो. जॅक हा एवढा असहाय आहे आणि आम्ही त्याला जबाबदार आहोत. मी स्वत:च एखाद्या लहान मुलासारखा स्वत:चाच विचार करणारा असताना त्याची काळजी कशी घेणार? त्याच्यावर प्रेम कसं करायचं, हे मला माहीत आहे का? तो भिरभिरत संडासाच्या भांड्यात नाहीसा होणारा क्रॅकचा दगड आठवतो. ते असं काही होतं, ते मला प्राणप्रिय होतं आणि मी ते पाण्यात घालवून दिलं. ती आठवणही मला घाबरवते.

मी त्या हॉस्पिटल वॉर्डमध्ये आमच्या बाळाशी बोलतोय. जणू काही त्याला मी काय बोलतोय ते समजतंय. जरी तो एका व्यसनी माणसाकडे जन्मलाय, तरीसुद्धा त्याच्यापुढे पसरलेलं आयुष्य हे अनेक शक्यतेनं भरलेलं आहे. मी त्याला सांगतो, की माझ्याबाबतीत सर्वच चुकलंय; परंतु मी त्याच्याबाबत खराखुरा बाप होण्याचा प्रयत्न करणार आहे, माझ्या बापासारखा नव्हे. मी त्याला सांगतो, की माझ्या बाबतीत जे काही घडलं, ते त्याच्या बाबतीत घडणार नाही, याची मी काळजी घेणार आहे. मी एक योग्य काम करायला सुरुवात केली आहे. मी ड्रग्ज घेणंही थांबवणार आहे. मला यापुढे माझ्या उत्पन्नाला ड्रग्ज विकत घेऊन आणि ते विकून जोड द्यावी लागणार नाही. आम्ही एक चांगलं कुटुंब बनू.

मी त्याला हॉस्पिटलमध्ये सोडतो आणि घरी फ्लॅटवर जातो. फ्लॅट तो स्वच्छ करू लागतो. मला वाईट वाटतं. मी एक लहान बालक आहे, ज्याला अचानक मोठं व्हावं लागलंय; पण ते गरजेचं आहे, कारण मी आता बाप आहे.

मी जॅकला दिलेली वचनं पाळण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. तो सहा महिन्यांचा होईपर्यंत हेरॉईन न घेतल्यामुळे जाणवणाऱ्या प्रतिक्रियेचा त्रास मी अनुभवत असतो; परंतु प्रत्येक वेळी मी माघार घेतो आणि ती दुष्ट मालकीण माझ्यावर सूड उगवते आणि मला व्यसनाच्या आणखी खोल गर्तेत घेऊन जाते. मी अशा चक्रात अडकलोय, की त्यातून सुटका नाही. हा सर्व वेळ तिथे बाळाचं रडणं चालू असतं.

मी स्वार्थी आहे. जेव्हा जॅक झोपण्याचा प्रयत्न करत असतो, तेव्हा मी संगीताचा आवाज कमी करत नाही. त्याला बाहेर घेऊन जाण्याऐवजी मी पलंगावर पडून राहतो. त्याला अन्न देण्यास मदत करण्याऐवजी मीच ड्रग घेतो. त्याला अशा जागी घेऊन जातो, जिथे सुया पडलेल्या आहेत. रोझी नेहमीच मला सोडून त्याला घेऊन आपल्या आईकडे जाते; पण तोंडानं सांगता येणार नाही, इतकं जॅकवर माझं प्रेम आहे. जेव्हा त्याचा देह माझ्याभोवती गुंडाळतो, जेव्हा मी त्याच्या मऊमऊ

डोक्याला स्पर्श करतो, जेव्हा प्रेमानं मी त्याचा विश्वासघात करणार नाही, अशा विश्वासानं तो माझ्या डोळ्यांत बघतो, तेव्हा मी एक निश्चय करतो.

एक बदलण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून मी माझ्या जुन्या फोटोंचा गठ्ठा ब्लॅकपूलमधील एका प्रसिद्ध फोटोग्राफी कोर्सला दाखवतो आणि ते माझा विद्यार्थी म्हणून स्वीकार करतात. मी आता फोटोग्राफर होणार आहे. जेव्हा ब्लॅकपूलला आम्हाला परवडेल, अशी राहायला जागा मिळत नाही, तेव्हा मग मी न्यूकॅसलला अपार्टमेंट घ्यायचा विचार करतो. तेथील युनिव्हर्सिटीत दुसरा एक चांगला फोटोग्राफी कोर्स आहे. तिथे त्या मोठ्या शहरात राहायच्या जागा स्वस्त आहेत. मी माझा फोटोंचा गठ्ठा त्या युनिव्हर्सिटीच्या आर्ट शाखेला दाखवतो आणि ते माझ्या बदलीला मान्यता देतात. आता मी न्यूकॅसलला चाललोय. जिथे मी आणि त्या आधी माझे आई-बाप जन्मले आहेत. माझ्या आयुष्यातील सारं ड्रग्जमुळे आणि ते मिळवायच्या गरजेमुळे अंधुक झालंय; परंतु त्या धुक्यातून मी काहीतरी भक्कम पाहू शकतोय. एक कोर्स, त्यामुळे मिळणारी नोकरी, त्यामुळे मिळणारं वेतन... मी आता ड्रग्ज विकणं, घेणं थांबवणार आहे आणि जगायची सुरुवात करणार आहे. माझं कुटुंब माझ्याभोवती असणार आहे.

माझी मोठी बहीण केली मग यात येते. ती आणि मी कधी डॅडींचा उल्लेख करत नाही. मला एवढंच माहीत आहे, की डुरहॅममध्ये त्यांच्या नव्या कुटुंबाबरोबर ते राहतात; पण आता केली मला सांगते, की त्यांच्या घटस्फोटानंतर त्यांनी ताबडतोब न्यूकॅसल इथे आपलं घर केलं आहे आणि त्यांच्या सहचारिणीचा अजूनही तिथे मालकीचा छोटा फ्लॅट आहे. तिथे ते आम्हाला राहायला द्यायला तयार आहेत.

रोझी, मी आणि जॅक त्या कॅम्पर व्हॅनमध्ये बसतो आणि पेनाईन्सवरून आमच्या नव्या जागेकडे येतो. ते फार उंचावर आहे. उदास देखावे आणि बोचरे थंड वारे आणि हिम पडतंय. जॅक मागे रडतोय आणि आम्ही डॅशबोर्डवरचं कोकीन हुंगतोय. ही नव्या आयुष्याची सुरुवात आहे, असं वाटत नाही.

मी घाबरलोय, पण उत्तेजितही आहे, कारण मी डॅडींना भेटणार आहे. माझं त्यांच्यावर प्रेम आहे, कारण ते माझे डॅडी आहेत. आमच्यात जे काही घडलं, ते सर्व न जुमानता मी त्यांना भेटायला उत्सुक आहे. मी चोवीस वर्षांचा आहे आणि सोळा वर्षांचा असल्यापासून त्यांना भेटलेलो नाही.

ते डुरहॅमवरून आलेत आणि फ्लॅटवर आमची वाट पाहतायत. ते पूर्वीसारखेच दिसतायत. एक काऊबॉय आणि रस्त्यावरच्या फलकावर मालबरो कंट्री जाहिरातीत दाखवतात, त्याच्याहून तिप्पट ते जाड झालेत. त्यांच्याकडे एक नजर टाकतो आणि मी पुन्हा घाबरून जातो. जसा जॅक त्याचे छोटे हात माझ्याभोवती टाकतो, तसं मला माझ्या वडिलांकडे जायचंय. मला जायचंय; पण मी जाऊ शकत नाही.

एक भलं मोठं नाकारलेलं बालपण आमच्या दोघांच्यामध्ये पसरलंय. ते पोलादी निळे डोळे आणि कठोर तोंड, त्यांच्या हातावरील ते गोंदवलेलं मी पाहतो आणि मागे सरकतो. मी सहा वर्षांचा होतो आणि घाबरतो. ते क्षणभर मला वरपासून खालपर्यंत बघतात आणि त्यांच्या डोळ्यांना जे दिसतं, ते मी पाहतो. बुबुळांचे ते छोटे पिनसारखे ठिपके, डोळ्यांतून येणारं पाणी, वाहणारं नाक, सारखं हलणारं आणि खाजणारं शरीर. व्यसनी माणसाच्या सर्व खुणा डॅडी जाणतात. त्यांना माझ्याबद्दल सर्व माहिती होते. ते रोझीच्या हातात असलेल्या जॅककडे पाहतात.

"ठीक आहे, बाळा?" ते जॅकला विचारतात. जॅक त्यांच्याकडे पाहतो. डॅडींनी त्याला स्पर्श करायला मला नकोय.

त्यांची सहचरी येते. ती चहा करू लागते. ती चांगली आहे. तिला ते कसे आहेत, हे माहीत नाही का? आम्ही आमचा चहा पितो. संभाषण तसं सहजपणे होत नाही. जेव्हा प्रत्येक जण जायला निघतो, तेव्हा क्षणभर डॅडी आणि मी स्वयंपाकघरात एकटेच असल्याचं मला जाणवतं. ते माझ्याकडे त्या तीक्ष्ण बर्फाळ नजरेनं पाहतात आणि एखाद्या लहान मुलासारखा मी त्यांच्यापुढे कचरतो.

ते म्हणतात, "तू मला दोष देऊ शकणार नाहीस. तू ज्या तऱ्हेनं झालायस त्याबद्दल तू मला दोष देऊ शकणार नाहीस."

आणि मग ते आपल्या सहचरीबरोबर निघून जातात.

■

२५

मी आणि रोझीनं आमच्याबरोबर आणलेलं सर्व हेरॉईन संपवलं. आमची हेरॉईन नसतानाची प्रतिक्रिया म्हणजे रॅटेल सुरू होतं.

"आपल्याला माहीत होतं, की ही वेळ नरकातून जाण्यासारखी आहे; पण जर तू मला आता पाठिंबा दिलास तर," मी रोझीला म्हणतो, "मग या पायरीनंतर सर्वच गोष्टी बदलतील."

मला तिच्या मदतीची गरज आहे. या मार्गावर प्रत्येक पायरीवर माझ्या मागे मला तिची गरज आहे. नाहीतर यातून मी बाहेर पडणं अशक्यच आणि रोझी मला तो पाठिंबा देऊ शकत नाही. ती आपल्या व्यसनाच्या आणि वेडेपणाच्या स्वत:च्या जगात आहे. या अवस्थेत जॅकची काळजी घेण्यासाठी अतिमानुष प्रयत्नांची गरज आहे. ती त्याची काळजी घेते आणि ती अतिमानुष आहे. माझ्याबाबतीत विचाराल, तर मी त्याचं काहीही करू शकत नाही. मी फक्त त्याच्यावर प्रेम करतो; परंतु या पलीकडे या मुलाला ज्याची गरज आहे, ते काही मी देऊ शकत नाही. मी स्वत:साठी ते देऊ शकत नाही, तर इतरांचं काय!

रोझी आणि माझे वादविवाद चालतात. जॅक बघतो. त्याचा गोल चेहरा एकाकडून दुसरीकडे पाहतो आणि मग तो रडू लागतो; परंतु यामुळे आमची भांडणं थांबू शकत नाहीत. आमची भांडणं म्हणजे माथेफिरू आणि हिंसक प्रकार आहेत. त्यात प्रेम आहे, राग आहे आणि संतापही आहे. खरं सांगायचं, तर प्रत्यक्षात ती असह्य आहेत. एक दिवस रोझी ते सहन करू शकत नाही. ती जॅकला घेते आणि जाते. यापूर्वीही ती गेलेली आहे; पण या वेळी तिच्या जाण्याला एक नवीन अंत आहे आणि झालेलं नुकसान अनंत आहे, कारण तिनं जॅकला बरोबर नेलंय.

माझा हेरॉईन न घेण्याचा निश्चय डळमळतो. थोड्याच दिवसांत मी पुन्हा ड्रग घेऊ लागतो; परंतु न्यू कॅसलमध्ये ड्रग्ज घेणं एवढं सोपं नाही. हेरॉईनचा माग घेत ईशान्येकडे जाण्याआधीच तो संपतो. आता काही मी पहिल्यांदा दुहेरी आयुष्य जगत

नाहीये. सारा दिवस मी कॉलेजात माझ्या फोटोग्राफीच्या कोर्सचा आनंद लुटत आणि छान मध्यमवर्गीय मुलांच्यात मिसळत काढतो. रात्री ईशान्येकडे व्हाईट भागात असलेल्या व्हाईट हाऊसिंग सोसायटीच्या भोवती चकरा मारत, हेरॉईनच्या शोधात असतो.

मी सबंध संध्याकाळ एका उंच इमारतीत वरच्या फ्लॅटमध्ये इतर व्यसनी माणसांबरोबर विक्रेता परत येईल, म्हणून वाट पाहत घालवतो. ती विक्रेत्याची बायको वैतागलेली वाटते. ती तिचं इस्त्रीकाम करण्याचा प्रयत्न करत असते. तिथे वीस व्यसनी माणसं त्या दोन खोल्यांच्या छोट्या उकडत असलेल्या जागेत कोंबलेली आहेत; परंतु त्या विक्रेत्याला आम्ही असं बाहेर रस्त्यावर घोटाळत उभं असलेलं परवडणार नाही, कारण त्यामुळे लोकांचं लक्ष जाईल. आम्ही जमिनीवर, सोफ्यावर, खुर्चीवर आहोत आणि सर्व त्रास भोगत आहोत. जेव्हा माहीत असतं, की आता ड्रग मिळणार आहे, तेव्हा ती चिन्हं अधिक त्रासदायक होतात. आम्हाला वेदना होत आहेत, आमची जळजळ होत आहे. आमच्या नाकांतून पाणी येत आहे. काही व्यसनी लोकांची नॅपी लावलेली मुलं आजूबाजूला दुडदुडतायत आणि त्यांना घरी जायचंय. लोकं रडतायत, डुलतायत, खाजवतायत. ज्या वेळेपासून मला हेरॉईनचं व्यसन लागलंय, माझं आयुष्य म्हणजे नुसता वाट बघण्याचा खेळ झालाय. वाट पाहणं, वाट पाहणं आणि ड्रगसाठी वाट पाहणं. ते ड्रग यावं आणि त्यासाठी वाट पाहणाऱ्यांचा वेळ पटकन जावा. मी न्यूकॅसलच्या नगरपालिकेच्या फ्लॅटमध्ये बसलोय आणि एकाच गोष्टीचा विचार करतोय, ते म्हणजे मी किती वेळ वाट पाहतोय. आम्ही सर्व वैतागलेले आहोत. आम्ही वीस जणं आणि ती मुलंही. मला त्या सर्वांचा तिरस्कार वाटतो. मी विचार करतो, आणखी दहा मिनिटं. मी दहा मिनिटं आणखी वाट पाहीन. मग आणखी दहा. शेवटी मी कित्येक तास थांबतो आणि मला त्या विक्रेत्याचा राग येतो, कारण त्याच्याकडे पुडीची सत्ता आहे. ते कुठेतरी झोपून राहिलेत. या सर्व आजारी माणसांना त्यांना हव्या असलेल्या गोष्टीसाठी वाट बघत ठेवतायत, कारण ते स्वार्थी आहेत. त्यांनी ते ड्रग्ज घेतलंय, ते बहुतेक त्या धुंदीत झोपलेत. आम्ही मात्र इथे वेदना सहन करतोय, घरघरतोय आणि आमच्या नाका-तोंडातून पाणी येतंय. मला माहीत आहे, कारण मी विक्रेता असताना स्वत: हेच केलंय आणि आता मी गिऱ्हाईक म्हणून विचार करतोय, ते कुठे आहेत, ते परत का येत नाहीत आणि मला ड्रग का देत नाहीत? माझ्या हातावरच्या सुया बोचलेल्या जागा, या तोंडाएवढ्या मोठ्या होतात आणि त्यातील प्रत्येक तोंड म्हणतंय, "मला भरव, चुत्या मला भरव." मला या छिद्रांत बोटं घालावीशी वाटतात आणि येणारी ती खाज थांबवावीशी वाटते; परंतु मी वाट बघत बसतो. तू नेहमी चुत्या वाटच बघत असतोस.

आणि नंतर जेव्हा ते येतं, मी आज आणि उद्यापुरतं विकत घेतो; परंतु मला माहीत आहे, की आज रात्री ते घेण्यापासून मी स्वत:ला वंचित ठेवणार नाही. नंतर मी इथे परत येईन किंवा अशाच एखद्या एकाकी जागेत.

इथे न्यू कॅसलला असलेला हेरॉईनचा तुटवडा मला प्रत्येक आठवड्याच्या सुट्टीत दूर घेऊन जातो. मी बरेच वेळा नॉटिंगहॅमला जातो. इथे कुठे ड्रग्ज विकत घ्यायची, ते मला माहीत आहे. माझ्या आठवड्याच्या सुट्ट्या मित्रांबरोबर तशा आरामदायी असतात, तिथे बेफाम पार्टीही असते. मी अँगेच्या अगदी जवळचा होतो. अँगे ही कलाकार आहे आणि ती पार्टीसाठी डिझाईन तयार करते. हेरॉईन ही आता माझी रखेल आहे आणि त्यामुळे पूर्वीसारखं सेक्समध्ये आता मला स्वारस्य नाही; परंतु मी अँगेजवळ एखादा व्यसनी जाऊ शकेल, तेवढा जातो. ती माझी ओळख तिचा मित्र सीनशी करून देते. त्याचे केस काळे आहेत, डोळे काळे आहेत आणि तो समलिंगी विद्यार्थी आहे. तो सोशिऑजीच्या डिग्रीसाठी अभ्यास करत आहे. मी काढलेल्या फोटोत त्याला स्वारस्य आहे.

जेव्हा डीआयवाय जाहीर करतात, की ते अमेरिकेच्या टूरवर जात आहेत, तेव्हा तो डिग्ज आणि हूश या डिस्क जॉकींना ताबडतोब सांगतो, "माझ्याकडे एक कल्पना आहे. ती छान आहे. तुम्हाला एक अधिकृत फोटोग्राफर लागेल."

त्यांना यात स्वारस्य दिसतं.

"मि. मार्क जॉन्सन हा तुमचा माणूस आहे!" सीन जाहीर करतो. त्याची बोलण्याची एक वेगळीच पद्धत आहे.

त्याचं असं आहे, की काही मासिकांनी त्या टूरच्या फोटो डायरीबद्दल विचारलेलं आहे.

"तुम्ही स्टेट्समध्ये किती काळ असाल?" मी विचारतो.

ते खांदे उडवतात. ते किती काळ असतील किंवा ते कुठे जातील, हे त्यांना माहीत नाही, कारण याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन अंदाधुंदच आहे.

मी सांगतो, "माझा भाऊ साऊंडसिस्टिम चालवतो. तो अटलांटात आहे."

सर्वांना वाटतं, की ही सुरुवात करायला छान जागा आहे. काही कळण्याआधीच मी त्या टूरमध्ये गुंतलोय आणि थोड्याच काळात मी जाणारही आहे. एक अधिकृत फोटोग्राफर याचा अर्थ युनिव्हर्सिटी आणि माझा कोर्स सोडणं. मला त्याचं वाईट वाटतं; परंतु ही टूरही मी सोडू शकत नाही आणि काही झालं, तरी अमेरिका हाही अनुभव एक तऱ्हेचा फोटोग्राफी कोर्स असेल. मी माझ्या भावाला, शेनला काही वर्षांच्या अवधीनंतर पहिल्यांदा भेटेन, कारण न्यूकॅसलच्या एकटेपणापेक्षा जिथे सर्वच एक काम करतायत, अशा नव्या मित्रांत, नव्या वातावरणात हेरॉईनचं व्यसन सोडणं सोपं जाईल.

माझ्यासाठी अमेरिकेची टूर सात महिने म्हणजे १९९७च्या उन्हाळ्यापर्यंत टिकते. सर्वनाश! मी जे काही मिळेल, ते ड्रग घेतो. यात दोन नव्याही आहेत, क्रिस्टलमेथ आणि डीएमटी. या दोन्ही माझं मन उद्ध्वस्त करतात; परंतु मी हेरॉईन घेत नाही. मला जर ते मिळालं असतं, तर मी ते नक्कीच घेतलं असतं; परंतु इथे हेरॉईन कुठे मिळतं, ते मला माहीत नाही आणि इथे ते विकत घेणं अशक्य आहे. मी जेव्हा प्रयत्न करतो, त्या वेळी बंदूक दाखवून माझे पैसे चोरले जातात, त्यामुळे त्या ऐवजी मी जास्त पितो. क्रॅक, कोकीन आणि काहीही घेतो, जे माझी हेरॉईन घेण्याची भयंकर इच्छा कमी करतील. काही मित्रही याच तऱ्हेची व्यसनं सोडताना होणारी प्रतिक्रिया अनुभवत आहेत. जेव्हा हे संगीत आम्हाला ॲटलांटावरून सॅनफ्रान्सिसकोला घेऊन जात असतं, तेव्हा मी भरपूर प्रमाणात ड्रग घेतो. व्यवस्थित अमेरिकन तरुणांना आमची विचित्र इंग्लिश वागणूक, आमचं संगीत आणि ते वातावरण आवडतं. गंमत म्हणजे डीप हाऊस हे स्टेट्समधून आलंय; परंतु इंग्लंडला पोहोचेपर्यंत त्याचा एवढा बोलबाला झाला नव्हता. आम्ही आता ते परत आणलंय आणि त्यांच्यासाठी आम्ही तो प्रवाह पुन्हा चालू केलाय. अमेरिकन्सना यातील काही ड्रग्जचा शोध लागलाय. या मुक्त पार्टीज आणि त्यासाठी आम्ही अनेक वर्षांपूर्वी शोधलंय ते वातावरण, याचाही शोध लागलाय आणि त्यांना उन्हाळ्याबद्दल वेड लागलंय. आमचं उन्हाळ्याचं वेड, हे अनेक वर्षांपूर्वीच संपलंय. टूर फोटोग्राफर असल्याबद्दल म्हणायचं असलं, तर मी माझा कॅमेरा थोड्या कोकीनच्या बदल्यात केव्हाही देईन.

एका रात्री मी एका क्लबमध्ये कोकीन घेणं थांबवू शकत नाही. जेव्हा जेव्हा संगीत थांबतं. माझ्या जगात शांतता पसरते. मी पार्टीतील बेफाम माणूस न राहता एक घाबरलेलं, जुन्या भीतीनं, गरजांनी पाठलाग केलेलं एक पोर बनतो. तिथे अजूनही संगीत आहे, अजूनही बेताचा उजेड आहे आणि आजूबाजूला कोकीनही आहे; माझे पैसे संपलेत पण मला ते कोकीन हवंय. मी टेबल सोडू शकत नाही, त्यामुळे एक विक्रेता मला लैंगिक उद्योगांच्या बदल्यात जास्त कोकीन देण्याचं कबूल करतो, मी ती मागणी स्वीकारतो. मला ती ड्रग्ज हवीच आहेत. माझ्या मेंदूत ती थरथर जाणवते. मला त्याच्या डोक्यावरील काळे केस दिसतात; पण त्याचं तोंड दिसत नाही. मला त्याची गरजही नाही. मला माहीत आहे, की हा किड्डरमिन्स्टरमधील ट्रेव्हर आहे. काही क्षण मला त्या शेतावरील जनावरांचा चिखलाचा गुळमट वास येतो. त्या गाईंच्या गोठ्याभोवती असलेल्या त्या करड्या काँक्रीटच्या विटा आठवतात आणि त्या क्लबच्या संगीताऐवजी तिथे त्या गुरांच्या मोठ्या, रिकाम्या बाजारातील शांतता आठवते. मी ते सांगायचं नाही, कारण ट्रेव्हर ते नाकबूल करील आणि कुणीही माझ्यासारख्या वेडगळावर विश्वास ठेवणार नाही. छोटा मूर्ख!

त्यानंतर मला अपमानास्पद वाटतं. मी काही समलिंगी नाही. मग मी त्याला ते का करू दिलं? मला पर्वा आहे? मी पर्वा करावी? मी इतक्या तऱ्हेचे ड्रग्ज घेतलेत, की यापुढे मी कोण आहे, हे मला माहीत नाही आणि मला काही प्रमाण वगैरेही नाही. मी हरलोय. मला लाज वाटते. मी लंडनला जाणारं पुढचं विमान घेतो. पुन्हा माझा प्रियकर आणि माझं सांत्वन करणाऱ्या हेरॉईनच्या बाहूत विसावतो.

ज्या देशात हेरॉईन भरपूर प्रमाणात मिळतंय, अशा ठिकाणी मी लवकरच पोहोचणार, या विचारानं मला ती रॅटेलची प्रतिक्रिया जोरात येते. तो हँगओव्हर सोसत मी विमानात थरथरत आणि वणव्याची उष्ण तीव्रता अनुभवत बसतो. जरी मी हेरॉईन सोडण्याचा भयानक प्रयत्न आठ महिन्यांपूर्वी केलाय, तरी माझ्या देहाला माहीत आहे. माझ्या आत्म्याला ठाऊक आहे, प्रत्येक अणू आणि रक्ताच्या अंशाला माहीत आहे, की या प्रवासाच्या शेवटी हेरॉईन मिळेल. मी काय केलं आणि काय केलं नाही, याच्या आठवणीनं पछाडून, माझ्या विमानातील आसनाला चिकटलोय, घाम येतोय, नाक, डोळे वाहातायत आणि मी वाट पाहतोय, वाट पाहतोय. विमान उतरण्याची. मी नेहमीच चुत्या ड्रगसाठी वाट पाहत असतो; पण ही आताची वाट पाहण्याची वेळ सर्वांत वाईट आहे.

मी एअरपोर्टवरून बाहेर पडतो. तिथे रोझी आहे. पुढच्या सीटवर ड्रगची सर्व सामग्री आहे, जॅक मागे आहे आणि मी त्याला पाहतही नाही. मला फक्त ती सामग्री दिसते. थोड्याच वेळात ती सुई माझ्या बाहूत जाते. काहीसा दिलासा, ऊब, एक तऱ्हेचा आराम. ते ड्रग त्याच्या राज्यात माझं स्वागत करतं. ती भीती आणि स्वत:विषयीची घृणा जी विमानात माझ्या बाजूच्या आसनावर असते, ती उडून जाते. मी पुन्हा माणूस आहे आणि प्रत्येक गोष्ट ठीक होणार आहे.

आता मी माझ्या जॅकला मिठी घालतो आणि त्याच्याकडे नीट पाहतो. तो अठरा महिन्यांचाही नाही, तरी तो लहान बालक नसून मुलगा वाटतो. भुरे केस आणि निळे डोळे, मलाही तो माझ्यासारखा दिसतो हे जाणवतं. मी जसा लहान मुलगा होतो, आता तो आहे. तो माझ्याकडे शहाणपणानं बघतो. त्याच्या डोळ्यांत ओळख नाही, माझा देखणा मुलगा.

आम्ही केंडॉलला परततो. आम्ही नेहमीच केंडॉलला परततो. ते करडे रस्ते आणि तो करडा पाऊस बदललेला नाही आणि आमचे संबंधही बदललेले नाहीत. ते पूर्वीसारखेच स्फोटक आणि रागीट आहेत. रोझीला माझी अंदाधुंद ड्रगमुळे होणारी वेडपट वागणूक पसंत नाही. ती जॅकला घेऊन आई-वडिलांकडे जाते. मला एका हेअरड्रेसरच्या वरच्या मजल्यावर एक झोपण्यापुरती छोटी जागा मिळते.

मी हेरॉईनशिवाय जगू शकत नाही, या गोष्टीचा मी आता स्वीकार करतो. मला त्याची गरज आहे. त्याशिवाय क्रॅक माझ्या जीवनात पुन्हा आलंय, कारण मी

अमेरिकेत असताना सर्व वेळ ते माझं हेरॉईन ऐवजीचं ड्रग होतं.

जवळजवळ ताबडतोब मी हेरॉईन विकण्याचा धंदा सुरू करतो आणि ते घेतोही. पूर्वीपेक्षा कमी नव्हे, तर त्यापेक्षा खूप जास्त.

जर मला माझ्या ड्रगसाठी वाट पाहावी लागली, तर त्याची प्रतिक्रिया-रॅटेल-भयानक होते. हेरॉईन हे माझं प्रेम आहे. ती माझी प्रयसी आहे. जर मी तिच्यापासून फार वेळ दूर गेलो, तर ती म्हणते, "मला तू सोडलंयस का? मला सोडू नको." आणि ती मला इतकं सोसायला लावते, की ती जो दिलासा आणते, तो अनुभवण्यासाठी मी तिच्याकडे परत जातो. ती मला ठीक करते, मला एकसंध बनवते, मला सामान्यत्वाकडे आणते. तीच फक्त मला कार्यान्वित करते. ती मला फारसं काही जास्त देत नाही, सुख नाही, फक्त तिच्या गैरहजेरीमुळे होणाऱ्या दुःखातून सुटका. जर मला सुखही हवं असेल, तर मी हेरॉईनबरोबर क्रॅकही घेतो. जर मला ती विभ्रमावस्था ज्याला गौचिंग असं म्हणतात, ती हवी असेल, तर मी व्हॅलियम किंवा मोर्गडॉन हेरॉईनबरोबर घेतो, कारण माझी प्रेयसी दयाळू नाही. तिला मी परत हवाय; पण ती मला काही देत नाही.

मी माझ्या बहिणीकडून माझ्या रेकॉर्ड्सचा साठा उचलतो आणि ती छोटी जागा घर वाटेल, असा प्रयत्न करतो. तिथे एक पलंग आहे आणि टीव्ही. रोझी कधी कधी जॅकला माझ्या तिथे ठेवते आणि आज रात्री आम्ही दोघं पलंगावर पडून झोपी गेलोय. मी हेरॉईनच्या धुंदीत आहे, टीव्ही चालू आहे. रात्री मी अर्धवट जागा होतो आणि कुणीतरी तातडीच्या आवाजात प्रिन्सेस डायनाच्या मृत्यूची बातमी जाहीर करत असतं. मी पुन्हा झोपतो. मला बहुधा हे स्वप्न पडलं असावं; परंतु सकाळी कित्येक गंभीर चेहरे तिच्या मृत्यूची बातमी खरी असल्याची पुष्टी देतात. लोक रडत आहेत. जॅकची नॅपी भरल्यामुळे त्याच्या ढुंगणावरून खाली येत आहे; परंतु ती बदलण्याचीही ताकद मला नाही, कारण माझं सर्व अंग दुखतंय. जर कार्यान्वित व्हायचं, तर मला ड्रग विकत घ्यायला हवी; पण मला उठण्याचीही शक्ती नाही. काही लोक रडत असतात. खिडकीतून मला दिसू शकतं, की जग ही उदास, दमट आणि निराशाजनक जागा आहे.

जॅक माझ्याकडे सरकतो आणि मी त्याला दूर ढकलतो. मग तो कॉट टाकलेल्या जागेत धावू लागतो आणि झोपण्याच्या व्यवस्थेची मोडतोड करतो. मला ओरडण्याशिवाय काही करण्याची ताकद नाही. तो आवाजाचा प्रतिध्वनी माझ्या डोक्यात घुमतो आणि मला आणखी वेदना होतात.

"गप्प राहा!" मी ओरडतो. डोळे बंद करतो. आता तिथे शांतता असते. मी एक डोळा उघडतो. जॅक माझ्याकडे पाहत आहे. मी तो बंद करतो. मला जाणवतंय, की तो पलंगावर चढतोय. मला त्याचे ते लहानगे हात ती चादर

ओढतायत, ते जाणवतं. मग हळूहळू तो माझ्या अंगावर चढतो. त्याची बोटं सावध आहेत. तो आपलं वजन व्यवस्थितपणे विभागून ठेवतो, जणू काही मी उद्रेक होऊ घातलेला ज्वालामुखी आहे. माझ्या लक्षात येऊ नये, म्हणून तो आपले हात अलगद माझ्याभोवती टाकतो.

हे जरा जास्तच होतंय, मी हे सहन करू शकत नाही. माझ्यावर कुणाचं इतकं लक्ष असणं मला सोसवत नाही. मला पकडणारे, वस्तू मागणारे, लक्ष हवे असणारे त्याचे हात, त्याची प्रेमाची मागणी, हवं असणं, मागणं, गरज असणं, हे मला सोसवत नाही. मला याचा खूप त्रास होतो. मला त्रास होतो, कारण मी त्याला काही देऊ शकत नाही. माझ्या स्वत:च्याच गरजा खूप मोठ्या आहेत. माझ्या गरजाच मला खाऊन टाकतात.

मी त्याला मागे खेचतो. तो माझ्याकडे पाहतो आणि तसा तो आश्चर्यचकित झालेला नाही. त्याची बहुधा हीच अपेक्षा होती. आमच्या कुटुंबातील डॅडी, हे असंच करतात.

मी आम्हाला बाहेर काढतो, ज्यामुळे मी ड्रग्ज घेऊ शकेन. मी ती सामग्री घेतो, तेव्हा एका गल्लीत कार पार्क करतो. तिच्या टोकाला दूर एक ट्रक आहे, नाहीतर ती गल्ली रिकामी आहे. काही अंतरावरून कार्स आमच्याजवळून जातात. त्या आमच्याकडे दुर्लक्ष करतात.

जॅकला भूक लागलीय आणि तो रडतोय. माझ्याकडे मिठाईनं भरलेली पिशवी आहे. मी त्याला पुढच्या सीटवर पट्ट्यानं बांधून ठेवतो आणि मागे जातो. माझे हात इतके थरथरत आहेत, की चुती मिठाईची पिशवी मी कशीबशी उघडतो. एखाद्या प्राण्यासारखी मी ती दातांनी फाडतो, मग एक तुकडा मी त्याच्याकडे टाकतो. तो त्याच्याकडे बघतो आणि रडणं थांबवतो. आता त्याची ती निकड पुरी झालीय. तो त्यावरचा कागद काढण्यात दंग आहे. या वेळेपर्यंत मी माझ्या पुडीशी धडपडत आहे. माझ्या नसा चांगल्या आहेत. माझ्या मित्रांना त्याचा हेवा वाटतो. मी माझ्या हातावरील त्या गोंदलेल्या ठिकाणी दोन वर्षं सुई टोचत आहे आणि त्यासाठी मला पट्टेही बांधावे लागत नाहीत. रोझीचं ते नसा शोधण्यासाठी सुई टोचणं माझ्यासाठी गरजेचं नाही.

मी चमचा चाचपत आहे. जेव्हा मी वर पाहतो, मला जॅकचं छोटं तोंड दिसतं. तो कारच्या पुढच्या सीटवरून मान वळवून माझ्याकडे पाहतो. मी लायटर ठेवतो आणि त्याच्याकडे आणखी एक मिठाईचा तुकडा टाकतो. तो तुकडा घेतो आणि डॅडी काय करतात, ते बघण्याचं थांबवतो. मी सुई आत टोचण्याआधी त्याच्याकडे आणखी एक मिठाईचा तुकडा टाकतो, ज्यामुळे मला आणखी काही मिनिटं शांततेत घालवता येतील. तो जेव्हा ती मिठाई घ्यायला जातो, मला त्याचा चेहरा दिसतो. तो फिक्कट,

थकलेला आणि रोगट आहे. एक मूल, ज्याच्या आई-बापांना त्यांची ड्रग्जची इंजेक्शन्स घेण्यापलीकडे काही दिसत नाही. माझ्या आतमध्ये एक भलं मोठं उदासीनतेचं आणि लज्जेचं विवर उघडं होतं आणि ते बंद करण्याचा एकच मार्ग आहे, त्या इंजेक्शनबद्दल देवाचे आभार.

रोझीला दिसतं, की माझं आयुष्य म्हणजे फक्त ड्रग घेणं. ती त्या घाणेरड्या झोपायच्या जागेकडे तिरस्कारानं पाहतं.

"ते काय आहे?" कोणीतरी बाहेर रस्त्यावर पुन्हा पुन्हा शीळ घालताना ऐकून ती विचारते. ती त्या खिडकीवरचा काळा, घाणेरडा कपडा ओढते. खाली त्या हेअरड्रेसरच्या चकचकीत पांढऱ्या उजेडात हेरॉईनचं व्यसन असलेल्या एका माणसाचा नाक, तोंड गळणारा चेहरा वर माझ्या त्या छोट्या जागेकडे पाहत असतो. त्याचे डोळे त्या हेरॉईनच्या गरजेमुळे निस्तेज असतात. केंडॉल ही आता ड्रगपासून मुक्त असलेली जागा उरलेली नाही. आमच्या पिढीत अनेक व्यसनी आहेत आणि त्यासाठी कुठे जायचं, हे त्यांना माहीत आहे.

"गिऱ्हाईकाची शीळ, दरवाजाच्या घंटीऐवजी," मी सांगतो.

तिचं ड्रग घेणं चालेपर्यंतच मग ती जॅकला माझ्याजवळ ठेवायला जास्तच काकू करू लागते. त्यापेक्षा त्याला ती जास्त वेळ माझ्याबरोबर राहू देत नाही. मग बऱ्याच मोठ्या बोलाचालीनंतर ती पुन्हा त्याला दिवसभर ठेवू लागते. मी तिला सर्व काही ठीक होणार असल्याची खात्री देतो. मी खोटं बोलतो. खरं सांगायचं, तर मला खूप आजारी वाटतंय, खूपच आजारी; परंतु मला माझं इंजेक्शन घेता आलं, की मी ठीक होईन. मी तिला सांगतो, की मी जॅकला पार्कमध्ये घेऊन जातो; पण मी त्याला घेऊन मोरकाँबेला ड्रग्ज घ्यायला जातो. मी अर्धा ग्रॅम घेऊन परततो.

जॅक कंटाळलाय. तो कारमध्ये बसून होता आणि आता परतल्यावर त्या माझ्या छोट्या खोलीत, त्याला बघणं, हेही दमछाक करणारं आहे. त्याला हे हवंय, ते हवंय. तो मिनिटभर एखादी वस्तू घेऊन खेळतो, मग पळतो. रडतो. त्याची नॅपी घाण करतो. एखाद्या वेड्यासारखा मोठ्यानं ओरडतो आणि शहाणपणानं काही सांगितलं तरी ऐकत नाही किंवा ओरडलं, तरी दाद देत नाही. दोन वर्षांच्या या मुलाबरोबर मी काही जमवून घेऊ शकत नाही. माझं त्याच्यावर, त्याच्या डोक्यावरच्या भुऱ्या केसांवर प्रेम आहे; परंतु मी त्याच्यावर जास्त प्रेम करतो तो झोपलेला असताना, त्याचा तो निरागस गोल चेहरा, त्याचा शांत देह... तो गडबड करत असताना त्याच्याशी मला जमवून घेता येत नाही.

मी स्वयंपाकखोलीत जातो आणि ती सबंध अर्धा ग्रॅम हेरॉईन शिजवतो, सर्वच्या सर्व. एकप्रकारचा दिलासा माझ्या शरीराला मिळत असताना मला जॅकचं कशाबद्दल तरी ओरडणं ऐकू येतं. जेव्हा त्याचं ओरडणं वाढतं, मी डोळे उघडतो.

मी जमिनीवर पडलेला आहे. मी इथे कसा आलो? या खोलीत भरपूर आवाज येतायत. ती सुई अजूनही माझ्या दंडात आहे; परंतु बाहेर आकाश काळं आहे. आता संध्याकाळ झाली असावी. देवा रे देवा, मी धुंदीत बराच वेळ काढलेला असावा. मी किती काळ इथे आहे?

याक्षणी माझ्या लक्षात येतं, की मी सबंध दिवस या छोट्या जागेत कुलूप लावून जॅकबरोबर पडलेला आहे; परंतु मला त्याची शुद्ध नाही. तेव्हा माझ्या ध्यानात येतं, की माझ्या कानांत येणारे आवाज हे अनेक आवाज आहेत. तिथे किंकाळ्या, ओरडा, रडणं आहे. कुणीतरी दारावर घाव घालतंय, ठोकतंयही. मी स्वत:ला उभा करतो. जॅक दरवाज्याजवळ टेकून उभा आहे. त्याची नॅपी सुटलीय. मी त्याला उचलतो. मुतामुळे आणि अश्रूंमुळे त्याचं अंग ओलं झालंय. मी दरवाजा उघडतो, तिथे रोझी आहे, रागावलेली पांढरीफट्ट पडलेली आणि किंकाळ्यांमुळे तिचं तोंड खूप फाकलेलं आहे अशी. ती माझ्यावर घसरते आणि मला गुद्दे मारण्याचा प्रयत्न करते. तोंडानं जोरजोरात तारस्वरात आवाज काढत ती जॅकला धरते. तिच्यामागे आमचे अनेक शेजारी माझ्याकडे बघत असतात. ते गप्प आहेत.

"डॅडी काय करत होते?" रोझी विचारते. जॅकच्या ओल्या तोंडातून येणाऱ्या हुंदक्यांतून कसेबसे येणारे शब्द शेजाऱ्यांना कळणार नाहीत, अशी मला आशा वाटते. तो सांगत आहे, "डॅडी जमिनीवर झोपले होते."

मला खूप शरम वाटते. काही आठवडे ती आठवण विसरण्यासाठी मी ड्रग घेतो. मी रोझीबरोबर आता वाद घालू शकत नाही, कारण जॅकबरोबरचे माझे संबंध तिनं तोडलेत, अगदी ख्रिसमसलासुद्धा.

ख्रिसमसच्या सकाळी मी साडेसहाला उठतो. बाहेर अंधार आहे, थंड आहे आणि आतून मला तसंच वाटतंय. मी लोखंडाचा माणूस आहे. त्या थंड धातूपासून बनवलेला, अंधाऱ्या सकाळी चालणारा, पोकळ आणि खणखण आवाज करणारा. रस्ते रिकामे आहेत. कोणीही त्या लोखंडी माणसाला पाहत नाही.

मी रोझीच्या आई-वडिलांच्या घरी जातो. खालच्या मजल्यावर दिवे लागलेले आहेत. मी आशा करतो, की मला फार उशीर झालेला नाही. मी बागेत चोरून घुसतो आणि स्वत:ला बाहेरून त्या पडद्याच्या फटीशी उभा करतो. मला जास्त काही दिसत नाही. मी माझं नाक काचेवर दाबतो. बाहेर फार थंड आहे आणि मी श्वासोच्छ्वास घेऊ शकत नाही, कारण माझ्या श्वासोच्छ्वासाचं धुकं होऊन माझ्या दिसण्यात अडथळा येतोय.

एक झाड खोट्या कलाबुतीचं. तिथे छोटे चकचकीत अनेक रंगाचे दिवे आहेत. मग मी उजवीकडे, डावीकडे होतो. माझा चेहरा काटकोनात ठेवून माझे गाल त्या तावदानावर चिकटवतो, ज्यामुळे मी एका डोळ्यानं पाहू शकेन. मला

जॅक पायजम्यात दिसतो. तिथे रोझीही आहे. ती वर पाहते आणि मी झटकन मागे होतो; परंतु तिनं मला पाहिलेलं नाही. ती जॅकला एकामागोमाग भेटवस्तू देते आणि तो त्यावरील कागद फाडतो आणि चुरडतो. त्या कागदांनी तो मोहित झालाय, उघडण्याच्या त्या क्रियेनं. रोझी प्रेमानं त्याला आतल्या भेटवस्तू दाखवते. तो इतका उत्तेजित झालाय, की त्याचं लक्ष भेटवस्तूंकडे नाही. तो उड्या मारतोय. त्याचा तो लहान कृश देह उन्मत्त झालाय. मी हसतो आणि त्यामुळे माझे दातही थंड पडतात. जर का मी आत त्याच्याबरोबर असतो, तर मी त्याला उचलेन, त्याचे ते छोटे हात-पाय मिठीत काही क्षण घट्ट धरेन, त्यामुळे त्याला शांत राहणं आणि वळवळ न करणं म्हणजे काय, ते समजेल.

मला त्याचा कर्कश आवाज ऐकू येतोय आणि रोझी त्याला गप्प करताना मला दिसते. ख्रिसमसबद्दल कळायला तो फारच छोटा आहे, भेटवस्तूंबद्दल कळायलाही तो बहुतेक छोटा आहे; परंतु असं असलं, तरी माझी भेटवस्तू उघडताना, मला त्याला पाहायचंय. त्याच्यासाठी मी स्पायडरमॅनचा सूट आणलाय.

ते नजरेच्या टप्प्यातून दूर जातात. माझा धातूचा देह फारच थंड झालाय. इतका थंड, की मला त्याची संवेदना जाणवत नाही. मला काहीच वाटत नाही. मी वाट पाहतो, ऐकतो, अचानक स्पायडरमॅन पुढे येईल म्हणून वाट पाहतो, मग तिथे उजेड वाढतो. तो वरच्या मजल्यावरून येत आहे. रोझीचे आई-वडील उठत आहेत. आजूबाजूच्या हवेतील होणारा बदल मला सांगतो, की आता पहाट झाली. मला जायला हवं, नाहीतर त्यांना मी सापडेन. मी पुन्हा एकदा शेवटच्या वेळी त्या उबदार खोलीत बघतो. मला रोझी दिसत नाही आणि माझा स्पायडरमॅनही दिसत नाही. माझं त्याच्यावर किती प्रेम आहे, हे त्याला माहीत नाही आणि मी इथे आहे, हेही त्याला माहीत नाही.

■

२६

लेक जिल्हा हा जंगलांनी भरलेला आहे. तिथे काही प्राचीन, मोठ्या पानांच्या झाडांची जंगलं आहेत आणि ती वन्य श्वापदांनी भरलेली आहेत. काही आधुनिक सूचीपर्णी वृक्षांची जंगलंही आहेत. त्यांचे सरळसोट बुंधे असून, ती लांबलचक रांगेत आहेत आणि त्यात आतमध्ये क्वचितच उजेड किंवा प्राणी येतात. मला या झाडांच्या जागा आवडतात आणि मी तिथे जास्त वेळ घालवणार आहे. मला काम मिळालंय. काही जुन्या शाळामित्रांच्या मदतीनं जंगलात काम करणाऱ्या एका कंपनीनं झाडांचा ट्रेनी सर्जन म्हणून मला घेतलंय. मी हेरॉईन सोडण्याचं ठरवलंय, म्हणजे मी झाडांचा उत्तम सर्जन बनू शकेन. शेवटचा उपाय म्हणून मी केंडॉलमधील ड्रग काउन्सलरला भेटतो. तो मला मदत व्हावी, यासाठी एक पुस्तक देतो. पुस्तकाचं नाव आहे, *व्हॉट टू डू इफ यू आर हेरॉईन ॲडीक्ट*. त्यात पुष्कळ हास्यचित्रं आहेत. ड्रग न घेतल्यामुळे येणारी प्रतिक्रिया, रॅटेल ही कमी करण्यासाठी ते चहा आणि चॉकलेट घेतात किंवा गरम पाण्यानं अंघोळ करतात, असं दाखवलं आहे. ती हास्यचित्रं मला जे काही वाटतं, तशी दिसत नाहीत. ती मजेत असल्यासारखी वाटतात. मी अशी कल्पना करतो, की मी त्यातील एक आहे. मी गरम पाण्यानं अंघोळ करतो, त्याची काही मदत होत नाही.

ड्रग काउन्सलर मला डॉक्टरकडे पाठवतो. ते मला मेथॉडीन औषध लिहून देतात. त्या औषधामुळे तुम्हाला व्यसन मागे घ्यायला मदत होते, असं मानतात; परंतु माझ्या पूर्वीच्या व्यसन सोडण्याच्या प्रयत्नांनंतर येणाऱ्या प्रतिक्रियेच्या, रॅटलच्या अनुभवानं मला शिकवलंय, की मेथॉडीनचं नशा उतार हे हेरॉईनच्या रॅटलपेक्षा जास्त वाईट आहे, तरीही मी ते घेतो. यासाठी माझी दिलासा देणारी दुसरी गोष्ट आहे दारू.

मला माझं नवं काम आवडतं. मी लहान असताना किडरमिन्स्टरमध्ये झाडांची फळं गोळा केली आणि ज्या वेळी मी ॲल्बट्सच्या घराजवळील जंगलाला भेट

दिली, तेव्हापासून मला झाडांबद्दल माया वाटते. मला जंगलाची स्तब्धता, त्यांच्या गडद आणि हलक्या रंगाच्या निरनिराळ्या छटा, त्यांचा तो सौंदर्याचा देखावा आवडतो आणि आता झाडं मला नीट व्हायला मदत करणार आहेत.

जेव्हा तुम्ही मोठ्या झाडावर चढता, तेव्हा दुसऱ्याच जगात जाता. जंगली श्वापदांनी भरलेला आणि काटेरी निवडुंग, कीटक आणि चिवचिवणाऱ्या पक्ष्यांच्या थव्यांना आधार देणारा तो एक लहानसा भोवतालचा प्रदेश आहे. त्या झाडाचं खोड हे खूप मोठं आणि खडबडीत आहे. ते इतकं मजबूत आहे, की तुम्ही त्याच्या जगात प्रवेश केल्यावर ते तुम्हाला आधार देतं. मी दोर बांधतो आणि त्याला कोयंडे अडकवितो.

एकदा का मी जमिनीवरून वर गेलो, की माझं सर्व लक्ष मी पुढच्या उंच पातळीवर कुठे जाणार, माझे हात कुठे जातायत, माझे पाय कुठे जातायत, दोर कुठे जातायत आणि मी दुसऱ्या फांदीवर फास व्यवस्थित टाकतो की नाही याकडे असतं. वर चढायचं ही क्रिया आहे आणि मला किती हँगओव्हर असला किंवा मला किती जोरात ती ड्रग सोडण्याची प्रतिक्रिया, रॅटल सतावत असली, तरी मी वर चढण्याचाच विचार करत असतो. मला एक माहीत आहे, की तुम्ही फिरता ते कारणा- साठीच आणि कारण असल्याशिवाय तुम्ही काही करत नाही. झोंबाझोंबी नाही की धावपळ नाही. मला ते आवडतं. मला फक्त उंचावरच जायचंय. हेच माझं जीवन आहे.

आणि जेव्हा मी तिथे वर असतो, शंभरहून अधिक फुटांवर, मी मनातून घाबरलेला असलो, तरी मी थांबतो. एखाद्या फांदीवर विसावतो आणि त्या झाडांच्या जगातून बाहेर पाहतो. जे सर्वांनाच नेहमी माहीत आहे, ते मला पहिल्यांदा जाणवतं. लेक जिल्हा हा सुंदर आहे. या जागेचं सौंदर्य समजायला मला कित्येक वर्षं गेली आहेत, कारण लहान असताना झालेली तुरुंगाची शिक्षा आणि दु:ख आणि जेव्हा माझं डोकं फिरायचं, तेव्हा मी इथे परत यायचो. आता झाडांमधून या जागेचं कौतुक करताना त्या सौंदर्यानं मी पार भाळलोय.

मी त्या जंगलाच्या छतावरून पाहतो. तिथे दुसरी झाडं आहेत आणि तिथे दुसरे कदाचित तीस एक लोक असतील. तुम्हाला त्यांच्या डोक्याच्या शिरस्त्राणाचा पांढरा भाग दिसतो. त्यांच्या साखळीचा, करवतीचा आवाज ऐकू येतो आणि मला आठवतं, की मीही झाडांत राहणारा, त्यांची निगा ठेवणारा एक ट्रेनी सर्जन आहे आणि त्यामुळे मला बरं वाटतं. आज आम्ही नॅशनल ग्रीड येथील झाडांची छाटणी करतोय. विजेचा दाब हा ४,००,००० व्होल्ट्स आहे आणि वरच्या लोंबकळणाऱ्या फांद्या कापत असताना तो बंद केलेला आहे; परंतु तरीही त्या झाडांच्या फांद्यांवर दोर टाकून आणि तेथील विजेच्या लाइनला स्पर्श न करता त्यांना खाली घेणं, हे काम आम्हाला काळजीपूर्वक करावं लागतं. नॅशनल ग्रीडचं काम, म्हणजे एखादं झाड कापण्याचा परवानाच. मला ते मान्य नाही; पण या एकाच मार्गानं मला माझं

प्रमाणपत्र मिळणार आहे. हे काम झाडाला दुखापत न होईल एवढ्या प्रेमानं मी करतो. मी अशा मुलांच्या घोळक्यात आहे, की त्यांनाही तसंच वाटतं.

मी माझ्या या प्रशिक्षणाच्या काळात खूप प्रयत्न करतो आणि संध्याकाळी अभ्यास करतो. या देशातील सर्वोत्तम ट्री सर्जनकडून शिक्षण मिळण्याचं भाग्य मला मिळालंय. या कामामुळे माझी स्वत:ची काय किंमत आहे, ते मला समजतंय. या कामात मी अगदी हुशार आहे, फक्त एकच समस्या आहे, की मी हेरॉईनशिवाय जगू शकत नाही, अगदी मेथॉडीन घेऊनही. दारूचाही उपयोग नाही. मी सकाळी जागा होतो, तेव्हा डोळ्यांभोवती काळंनिळं झालेलं असतं आणि मी कोणाजवळ तरी मारामारी केली होती, हे मला माहीत पडतं; परंतु मी इतका प्यायलेला होतो, की कोणाजवळ आणि का, हे मला आठवत नाही. माझ्याच आतमध्ये एक भगदाड उघडं होतं आणि मी कोण आहे, हे स्वत:ला विचारतो, एक दारुड्या, ज्याची आई त्याला भेटायला येत नाही, जो बायकांजवळ झोपतो; पण त्याला खऱ्या अर्थानं खास मैत्रीण नाही, जो तिऱ्हाइतांशी कारण नसताना मारामाऱ्या करतो, जो स्वत:च्या मुलाला भेटण्याच्या योग्यतेचा नाही. हे भगदाड बघताबघता एक मोठं विवर बनतं आणि मग हे सहन करणं अवघड होतं. हेरॉईन न घेतल्यामुळे होणाऱ्या शारीरिक यातना, रॅटलशी मी कदाचित जुळवून घेईनही; परंतु मानसिक यातना मला पराजित करतात. यासाठी एकच मार्ग आहे आणि माझा पहिला पगार येताच ते शक्य आहे. मी पुन्हा इंजेक्शन घेतो.

त्यामुळे आता मला हे स्वीकारणं भाग आहे, की मी एक जंकी आहे आणि मी तो तसा राहणार हे ठरलेलं आहे. आता ही सवय वागवत मला जगायला हवं. काही लोक अशी सवय अनेक वर्षं वागवतात. त्यांचे मित्र किंवा शेजाऱ्यांनाही ते व्यसनी आहेत, हे माहीत नसतं. ते गुपचूप इंजेक्शन्स घेतात आणि त्यांच्या आयुष्यात एक तऱ्हेचा समतोल असतो आणि जर मी हे करू शकलो, तर मी जॅकला भेटू शकेन, त्याचा खरा बाप बनू शकेन, माझं काम राखू शकेन, ट्रेनी सर्जन हे प्रमाणपत्र मिळवू शकेन आणि कदाचित एखादी मैत्रीणही मिळवू शकेन. या सर्व गोष्टी मग सामान्य होतील आणि हेरॉईन फक्त मग त्या एकाकी जागा भरेल.

नेहमीप्रमाणे त्या ड्रग न घेण्याच्या प्रतिक्रियेनंतर मी जरा जास्तच प्रमाणात इंजेक्शन्स सुरू करतो. माझ्या गरजा आता भरपूर आहेत. मला एकच काम नाही, मला तीन कामं आहेत. मी सबंध दिवस जंगलात काम करतो, मग मी कामावरचे कपडे अंगावर असताना लँकेस्टरला ड्रग विकत घेऊन इंजेक्शन घेतो. माझा पगार पुरत नसल्यामुळे मला ड्रगविक्रेता म्हणूनही काम करावं लागतं. मग मला स्वत:ची काळजी घ्यावी लागते, म्हणजे अभ्यास, जेवण, मला लिहून दिलेल्या गोळ्या आणणं, अंघोळ करणं आणि लोकांत मिसळण्याचा प्रयत्न करणं आणि मग

झोपणं. हा सर्व वेळ जरी मी हेरॉईनला माझ्या जीवनात पुन्हा आणलं असलं, तरी क्रॅक या ड्रगजवळ माझं रंगेल प्रेमप्रकरण अजून चालूच आहे.

परंतु हे सर्व मी नेहमीच व्यवस्थित घेऊ शकत नाही. असे काही दिवस येतात, की मला हेरॉईन मिळत नाही आणि माझी ती रॅटल, प्रतिक्रिया एवढी वाईट असते, की मला कामावर जाण्यासाठी ड्रग विकत आणावी लागते. मग मी आजारी असल्याचा फोन करतो आणि माझ्या मित्रांना यावर पांघरूण घालावं लागतं; परंतु जर मी जंगलात जाऊ शकलो, तर ती मोठी झाडं माझ्यावर काहीतरी जादू करतात आणि मी त्यावर चढतो. मी कामावरून इतक्यांदा सुट्टी घेतो, की जेव्हा मी कामावर असतो, तेव्हा मला सर्वांत चपळ, सर्वांत उमेदीचा आणि सर्वांत शूर असा ट्री सर्जन असल्याचं दाखवून द्यायचं असतं. आमचा साहेब विचार करताना मला दिसतो. तो जरी मुडद्यासारखा दिसत असला, तरी निदान उमेद बाळगून आहे.

अजून डीआयवाय पार्टीज आठवड्याच्या सुट्टीत होतात. त्यांना आता तो पूर्वीचा बेफाम अस्सलपणा नाही; पण काहीही नवं आणि वेगळं असेल, त्याचा व्यापार होणं किंवा त्याच्या त्या गतीत त्यानं स्वत:ला हरवणं, हे ठरलेलंच आहे. थोडक्यात ती पार्टी संपत आलेली आहे.

तर मग आता मी काम करत आहे, ड्रग घेण्यासाठी आणि ड्रग घेऊन काम करत आहे. मी लहरी, आतल्या आत घुसमटणारा आणि बऱ्याच वेळा आजारी पडणारा आहे; परंतु अजून झाडांचा उत्तम सर्जन आहे. मी ड्रग सोडणार आणि बदलणार, असं वचन मी स्वत:ला आणि इतरांना देत आहे. माझी बहीण केली आणि तिचा आताचा जोडीदार मला मदत करतात. ड्रग मिळवणं आणि ते घेणं, या पलीकडे मी स्वत:ची काही काळजी घेत नाही, हे त्यांच्या लक्षात आल्यावर मी आता त्यांच्याकडेच राहतो आणि संध्याकाळी मला जेवण मिळेल, याची केली दक्षता घेते आणि तिचा जोडीदार पॉल एक आनंदी खाटीक माझ्यासाठी सकाळी सँडविचेस बनवतो; परंतु त्यांच्या घरात एक निरुपयोगी, असहाय असा माणूस राहतो. ड्रग विकत घेण्यासाठी मग मी अनेकदा तिची कार चोरून नेतो. जेव्हा मी केलेली प्रतारणा तिच्या लक्षात येते, तेव्हा आश्चर्यानं ती पांढरीफट्ट पडते आणि कोसळते. ती एकाच वेळी रडते आणि ओरडते. मी तिच्या ओरड्याशी जुळवून घेऊ शकेन; पण तिची निराशा मला पार दुखावते. मी ती जागा सोडतो. तिच्या दयाळूपणाचा पुरेपूर फायदा घेतलाय मी.

आता मला माझी जागाही परवडत नाही, कारण माझा सर्व पगार ड्रगवर जातो. इतर मुलांकडे तीन बेडरूम्स असलेली घरं आहेत, सुंदर कार्स आणि मजेदार सुट्ट्याही. मला मात्र माझं जेवणही स्थानिक दुकानातून चोरावं लागतं.

मला असं जगायचं नाही. केलीकडे चोरी केल्याबद्दल मला स्वत:चा तिरस्कार

वाटतो; पण मी स्वत:ला थांबवू शकलो नाही. ड्रग्जमुळे माझ्या अंगावर मांस नाही. जे काही चांगलं आहे आणि कसं वागावं, हे जे मी कधी शिकलो होतो, ते माझ्या माणुसकीबरोबरच संपलंय. जे काही मागे उरलंय, ते निर्दय, रानटी आणि स्वत:च्या जगण्याची फक्त पर्वा करणारं.

मला कुठेतरी जाणं जरुरीचं आहे आणि जेव्हा एक मुलगा आयर्लंडवरून हाय व्होल्टेज लाइनवर काम करण्यासाठी एका शिक्षित चढणाऱ्याची जागा तिथे असल्याचं सांगत येतो, तेव्हा माझ्या सर्व समस्यांवर हा तोडगा आहे, हे मी जाणतो. आयर्लंड हा सुंदर प्रदेश आहे. तेथील देखावे सुंदर आहेत. तेथील लोक हे प्रेमळ आणि त्यांचा इतिहास हा संगीतमय आहे. आयर्लंडमध्ये मी एक नवीन आयुष्य सुरू करणार. आयर्लंडमध्ये मी स्वत:ला ड्रग्जमधून बाहेर काढणार.

मी मँचेस्टर विमानतळाच्या प्रसाधनगृहात शेवटचं इंजेक्शन घेतो आणि ते सर्व सामान संडासाच्या भांड्यात टाकून देतो. मग मी माझ्या नव्या आयुष्याकडे जायला निघतो. मी संध्याकाळी पोहोचतो आणि मला माझा साहेब भेटतो. तो मला काऊंटी-विक्लोमधील आम्ही राहणार असलेल्या विश्रांतिगृहात घेऊन जातो. ती जागा खूपच सुंदर आहे. मी त्या जागेवरील हिरव्या दऱ्यांतून आणि सरोवरावरून फिरतो, कारण मला माहीत आहे, की उद्या जेव्हा मी शेवटचं मेथॉडीन घेईन, मी कशाचीही प्रशंसा करण्याच्या पलीकडे गेलेलो असेन.

मला ड्रग्ज न घेतल्यावर होणारी प्रतिक्रिया, रॅटल ही वेदनामय आणि नियंत्रणा-पलीकडे जाते आणि हे सर्व मी आठवडाभर सोसतो. मी माझ्या सहकाऱ्यांना सांगतो, की मला खूप सर्दी झाली आहे. मी त्यांच्याबरोबर चिक्कार पितो आणि सातव्या दिवशी आमचा पगार होतो.

परंतु आता त्या गरजेमुळे माझी सर्व संवेदनाशक्तीच हरवते. मध्यरात्री जेव्हा बॉस झोपलेला असतो, तेव्हा मी कंपनीची व्हॅन घेतो आणि डब्लीनला जातो. मी कुठे जातोय, ते मला माहीत आहे. सर्वांत वाईट, घाणेरडी जागा. माझ्या ड्रग्जसाठी मला अशाच ठिकाणी जावं लागतं.

मला काही घाणेरड्या जागा सापडतात आणि संशयास्पद लोकांकडून मी पत्ता विचारतो. माझी ही शोधाशोध मला लवकरच उंच इमारती असलेल्या इस्टेटींकडे घेऊन जाते. त्या जागा अजूनपर्यंत मी पाहिलेल्या जागांपेक्षाही एकाकी आहेत; परंतु ही जागा स्वप्नातीत आहे. त्या गल्लीत त्या मध्यरात्री एक लहान मूल एका भल्या दांडग्या घोड्यावर बसून हिंडत आहे.

आयआरए, ही तुम्ही ड्रग्जचा व्यापार करताना सापडलात, तर तुमचं घर पेटवून देत असल्यामुळे इथे सौदा करणं, हा कार्यक्रम इंग्लंडपेक्षा फारच चोरटा आहे. त्या उंच इमारतींच्या भोवती पडीक जमीन आहे. तिथे घोडे दोरानं बांधलेले

आहेत आणि आतमध्ये नॅपीज, ओकारी आणि मुताचा वास आहे.

एक सात वर्षांचा लहान मुलगा सीट नसलेल्या दुचाकीवरून जोरात येतो. तो मला काय हवंय म्हणून विचारतो. मला हेरॉईनची गरज आहे, म्हणून तो उद्धटपणे माझ्याशी वागतो आणि तो घाबरलाय, कारण जर तो सापडला, तर आयआरए हे त्याच्या तंगड्याच तोडतील. तो नाहीसा होतो आणि मी त्या निर्जन, मोठ्या घोड्यांची, मोडलेल्या फ्रिजची आणि चिखलाची पार्श्वभूमी असलेल्या एकाकी जागेत वाट पाहत असतो. थोड्याच वेळात तो मुलगा सामान घेऊन येतो. मग मी एका झाडाखाली इंजेक्शन घेतो. मी जायला निघतो, तेव्हा मला इतरही व्यसनी लोक त्या सावल्यांमध्ये घोटाळताना आणि दुचाकीवरून जाणाऱ्या मुलाचा पाठलाग करताना दिसतात.

या वेळेपासून रात्रीच्या वेळी बॅलीमून लाक्लोंडालकीन, फातिमा मॅन्शन्स, टॉलगट, फिनग्लस या आयर्लंडच्या शहरीकरण न झालेल्या ठिकाणी मी सापडेन. जेव्हा जेव्हा माझा पगार होतो, मी इथे तडक येतो आणि जे काही मला मिळतं, ते मी ताबडतोब घेतो. याचा दर्जा बेकार आहे आणि किंमत इंग्लडपेक्षा चौपट आहे आणि इथे स्वच्छ सुया मिळणं अशक्य आहे. सरतेशेवटी मी एका केमिस्टला मी मधुमेही असल्याचं सांगतो आणि नंतर एकच सुई ती बोथट झाली, तरी पुन्हा पुन्हा वापरतो. आमच्या तळावर परत आल्यावर मी त्या व्हॅनवरचे किती मैल झालेत ती नोंद बदलतो. सकाळी बॉस माझ्या थकलेल्या चेहऱ्याकडे पाहतो आणि काय ते समजतो.

मी असं जगू शकणार नाही. माझ्या सवयीसाठी पुरे पडतील इतकं ड्रग आयर्लंडमध्ये मिळणं कठीण आहे. मी आता झाडावर चढण्यात कुशल आहे आणि उंचात उंच झाडावर जाऊन त्याची छाटणी करू शकतो किंवा त्याचा काही भाग कापू शकतो. माझ्या या कसबाला जिकडेतिकडे मागणी आहे. मला इथे राहून सोसत बसायची गरज नाही. मी केंडॉलला परत जातो आणि स्वत:ची झाडावर चढण्याची सामग्री घेतो. रोझी आणि मी जॅकला फिरायला पार्कमध्ये घेऊन जातो. तोच तो पार्क, जिथे आम्ही त्या दिवशी भेटलो होतो, लाखो वर्षांपूर्वी आणि कित्येक ग्रॅम हेरॉईनच्या सेवनापूर्वी.

माझा मुलगा किती देखणा आहे, हे मी विसरलोच होतो. तो छोटा आहे आणि त्याचा चेहरा गोड आहे. जेव्हा मी त्याला पहिल्यांदा घेतलं आणि मला आशेचे किरण आणि शक्यतेचा आनंद दिसला, त्या वेळी त्यानं जसं माझ्याकडे प्रेम आणि विश्वास याबद्दल जराही शंका न घेता पाहिलं होतं, तसंच तो पाहतो.

जॅक खेळत नाही. तो आमच्यामध्ये गंभीरपणे आमच्या दोघांच्या हातात आपले चिमुकले उबदार हात देत चालतो. मुलांना आपल्या बापाचा भलाभक्कम हात पकडायचा असतो, याचा अर्थ सुरक्षितता आणि प्रेम असतो; पण जेव्हा मी माझ्या बापाला हे निरागस प्रेम दाखवलं, त्यानं ते नाकारलं. आता मी जॅकला घट्ट

धरतो. ड्रग्जनी त्याला माझ्या आयुष्यातून जवळजवळ काढून टाकलं आहे; परंतु माझं त्याच्यावर प्रेम आहे आणि मला ते दाखवायचं आहे. त्याला असं वाटायला नको, की तो मला नको आहे. तो माझ्या हातातून त्याचा हात काढण्याचा प्रयत्न करतो.

रोझी ड्रग्ज सोडण्याबद्दल अगदी गंभीरपणे विचार करतीय. वेस्ट कंट्रीमधील एका पुनर्वसन केंद्रात जिथे ती जॅकला घेऊन जाऊ शकेल, अशा ठिकाणी जागा मिळेल म्हणून वाट पाहत आहे. ती मला एक फोन नंबर देते आणि सांगते, की ती आठवड्याभरात तिथे गेलेली असेल. मला मी बर्मिंगहॅममधील अशा एका पुनर्वसन केंद्रात फुकट घालवलेला वेळ आठवतो. मी तिला यश इच्छितो.

मग मी लंडनमधील कामासाठी निघतो. मला सहजासहजी मिळणाऱ्या दोन गोष्टी हव्यात. काम करण्यासाठी झाडं आणि घेण्यासाठी ड्रग्ज. लंडनला दोन्ही आहेत आणि स्वच्छ सुया कोणत्याही केमिस्टकडे फुकट मिळतात.

लंडनच्या पूर्व भागात असलेल्या एका कंपनीत मला काम मिळतं आणि ते मला राहण्याचीही जागा देतात. ते एक अडगळीचं सामान ठेवलेल्या अंगणातील चाका-वरचं घर आहे. तिथे ते आता त्यांचे ट्रक्स आणि सामान ठेवतात. रात्रीच्या वेळी मी या जागी लांडग्यांची शिकार करणाऱ्या कुत्र्यांच्या झुंडीबरोबर एकटाच आहे.

माझं पहिलं काम आहे ११, डाऊनिंग स्ट्रीटवरील रोगट झाडं तोडण्याचं. मग आम्ही सेंट पॉल कॅथेड्रॉलभोवती काम करतो. नेहमीप्रमाणे काम संपताच मी ड्रग घ्यायला जातो. माझं आयुष्य ड्रगवर केंद्रित आहे, कामावर नाही. उठण्याआधीच मला हेरॉईन लागतं. असे काही दिवस येतात, की साखळीची करवत उचलायलाही ताकद मिळवण्यासाठी मी धडपडतो.

एका दुपारी बॉस मला बोलावतो.

"हे बघ मार्क, मला तुझ्याशी काही बोलायचंय."

तो काय बोलणार आहे, ते मला माहीत आहे. मी वाट पाहतो.

"मार्क, मला तुला कामावरून काढून टाकायला हवं."

मी मान डोलावतो. मला धक्का बसतो; पण आश्चर्य वाटत नाही.

"मला वाईट वाटतं, फार वाईट वाटतं मित्रा."

मग मी वाद घालू लागतो. मला त्याला अडचणीत आणायचं नाही. जर मी आणखी जोरदार प्रयत्न केला... परंतु तो आपला मोठा गट्टे असलेला हात वर करतो. "हे बघ, दुसऱ्या मुलांना तुझ्याबरोबर काम करायचं नाही. तुला उचलून आणण्याचा त्यांना कंटाळा आलाय, तर तू तुझी काय ती नीट व्यवस्था कर. मार्क, जरा वजन वाढव, बरा हो, जरा स्वत:ला मजबूत कर; परंतु तोपर्यंत तुझा यापुढे मला काहीही उपयोग नाही."

■

२७

मला अपमानास्पद वाटतं. इतर मुलं येण्यापूर्वी आणि मला कामावरून काढून टाकलंय, हे त्यांना कळण्यापूर्वी मला इथून जायचंय. मी त्या चाकाच्या घरात जिथे माझं सामान ठेवलंय, त्या अडगळीच्या अंगणातून आणि त्या लुकड्या लांडगे पकडणाऱ्या कुत्र्यांपासून चालत दूर जातो आणि ज्युबिली लाइनकडे वळतो. या अशा परिस्थितीत एक गोष्ट करण्यासारखी आहे, ते म्हणजे ड्रग घेणं.

जेव्हा ट्रेन वॉटरलूकडे खडखडत जाते, मला माहीत आहे, की मी त्या चाकांच्या घराकडे परत जात नाहीये. मी कुठेही परत जात नाहीये, कारण कुठे जायलाच मला जागा नाहीये. मी असलेले सर्व विकल्प पडताळून पाहतो. ज्यांनी मला दया दाखवली किंवा ज्यांनी मला राहायला जागा दिली, ती सर्व माणसं मला आठवतात. त्यांचे दरवाजे मला आता बंद आहेत, कारण मी त्यांचा विश्वासघात केलाय. ते जे काही देऊ शकतात, ते सर्व मी जास्त घेतलंय. मी आयुष्यभर त्या रेल्वे मार्गावर आहे आणि हा त्या मार्गाचा शेवट आहे.

मी वॉटरलूला पोहोचतो.

मला झोपायला आज रात्री किंवा उद्याच्या रात्री किंवा त्यानंतरच्या रात्रीनंतरच्या कोणत्याही रात्री जागा नाही. माझ्या खिशातील पैसा हेरॉईनवर आणि क्रॅकवर खर्च होणार आहे. ज्यांना कुठे राहायला जागा नसते, ते बेघर असतात. मला रस्त्यावरच झोपायला हवं. मी बेघर आहे. मला फार भीती वाटतेय. मी बेघर आहे.

मी नॉदर्न लाइनवर जातो.

मी जंकी आहे. मला असं वाटत होतं, की मी जंकी नाही, कारण मी इंजेक्शन्स घेत नव्हतो. मग नंतर मला वाटत होतं, की मी जंकी नाही, कारण मला माझी सवय सांभाळता येत होती. सामान्य जीवन जगता येत होतं. मला वाटलं, की मी जंकी नाही, कारण मी रस्त्यावर राहत नव्हतो आणि आता मला माहीत आहे, की मी जंकीच आहे. मी आजारी आहे, बेघर आहे.

मी दुसऱ्या प्रवाशांकडे पाहतो. ते त्यांच्या भरगच्च आयुष्यातील कार्यक्रमांचा विचार करतायत आणि माझं आयुष्य रिकामं आहे. ते सर्व बाबतीत रिकामं आहे, फक्त ड्रग्ज सोडून. त्या प्रवाशांच्या छोट्या बॅगेत आणि हातातील बॅगेमधून किल्ल्या आहेत. फ्लॅटच्या किल्ल्या, घराच्या किल्ल्या. ते घरी चालले आहेत, कामावर चालले आहेत. सभांना जात आहेत. त्या सर्वांना कुठेतरी जायला जागा आहे.

ट्रेन टॉटनहॅम कोर्टरोडला पोहोचते. दरवाजे सरकन उघडतात. मी पटकन बाहेर पडतो. जरी मी त्यांच्यातला नसलो, तरी मी तेथील गर्दीत मिसळतो. जणू काही मी त्यांच्यातला एक आहे. मी एकटा आहे आणि कुणाला माझी काळजी नाही. मला घर नाही, डोक्यावर छप्पर नाही, माझ्या शरीरात वेदना होतायत, पाय जड झालेत. माझ्या हाडांतील चरबी घट्ट झालीय. असह्य वेदना होतायत. माझं नाक वाहातंय. डोकं दुखतंय. मला भीती वाटतेय आणि मला ड्रग अगदी गरजेची आहे. आता मला ड्रग्जची अगदी निकड आहे.

मी बाहेर रस्त्यावर येतो. रहदारीचा तो जुना आवाज तसाच आहे. अनेक वर्षांपूर्वी जिलबरोबर असताना जो मी ऐकला होता तो. लंडनच्या त्या ट्रीपच्या आठवणीनं मी क्षणभर थांबतो. ती आठवण त्या तिथे फरसबंदीवर मला थांबवते आणि माझं मन दुःखानं भरून जातं. जिलनं मला लंडनला आणलं होतं. ती माझ्याशी दयाळूपणे वागली होती आणि मला सुरक्षित वाटलं होतं आणि आता दया-माया कुठेही नाही, सुरक्षितता नाही आणि त्यांच्या प्रेमाच्या उबेची मला जाणीव झाल्याला बरीच वर्षं झाली.

मला आठवतं, लंडनमुळे मी कसा उत्तेजित झालो होतो ते. रस्त्यावरची ती अव्याहत रहदारी आणि तेथील पुतळ्यांचे आणि इमारतींचे आकार. पुढे मग केंडॉलला आल्यावर मी त्या नदीच्या बाजूला असलेल्या उंच गवतात धूम्रपान करत आणि ड्रग घेत माझ्या इयान नावाच्या मित्राबरोबर बसायचो मग त्याला सांगायचो, मी कसा लंडनला जाईन ते. ते सर्व एक हजार वर्षांपूर्वी होतं आणि आता हजार वर्षांनंतर, मी इथे आहे. त्या मोठ्या शहराचा आवाजही मला अजून जाणवतोय; परंतु या अशा तऱ्हेनं माझं येणं कधीही मनात नव्हतं. मी कसा असेन, या माझ्या मनातील कल्पना अशा कधीच नव्हत्या.

आता मी इथे आहे आणि आज रात्री मला कुठेही जायला जागा नाही. मी रस्त्यावर झोपेन, ही जाणीव मला हालचाल करायला भाग पाडते. भीतीचा थंड हात मला जाणवतो, त्यामुळे मी ड्रग्जच्या शोधात हिंडत आहे.

मला एक लहान कुबड असलेला माणूस रस्त्याच्या फरसबंदीच्या कडेनं जाताना दिसतो. मला तो माहीत आहे. तो स्टीव्ह आहे. सुटका... प्रतीक्षा...

स्टीव्हकडे नक्कीच ड्रग असतील. मी वेस्ट एन्डच्या ट्रीपला जाण्यापूर्वी अनेकदा त्याच्याकडे ड्रग्ज घेतलेत.

तो बराच काळ रस्त्यावर राहतोय, हे तुम्ही सांगू शकाल. तो माझ्या वयाचा आहे; पण त्याच्या कपड्यांच्या चिंध्या झालेल्या आहेत, ते तेलकटही आहेत आणि त्याच्या बुटांची टोकं वळलेली आहेत. त्याचा चेहरा घाणेरडा आहे आणि मी त्याला तसा जास्त ओळखत नाही; पण या घडीला जगातील हा माझा प्रेमाचा मित्र आहे, असं वाटतं.

तो माझ्याकडे बघतो आणि आमच्यात काही अभिवादन वगैरे होत नाही.

मी म्हणतो, "मला आता तू ड्रग दे." जर त्यानं हे आता केलं, तर तो माझ्याबरोबर सहभागी होऊ शकेल; पण तो मान हलवतो.

"माझ्याकडे काहीच नाही." तो मला सांगतो.

"मला आता ड्रगसाठी लागणाऱ्या सामग्रीचीही जरुरी आहे. मी त्यासाठी पैसे देईन."

मग तो जरा स्वारस्य असल्यागत दिसतो. तो व्यसनी आहे. त्याला माहीत आहे, की जर दुसरे स्वत:साठी पैसे देऊ शकत असले, तर ते त्याच्यासाठीही पैसे खर्च करण्याची शक्यता आहे.

"आपण त्या इटालियन्सचा शोध घेऊ या." तो म्हणाला, "लुका, तो नेहमीच मिळवू शकतो."

लुका हा इटालियन जंकी आहे, त्यामुळे आम्ही आता लुकाला शोधत आहोत. ऑक्सफर्ड स्ट्रीट, डीन स्ट्रीट, ओल्ड कॉम्पटन स्ट्रीट, फ्रिद स्ट्रीट. मला ती ड्रग-सेवनाआधी येणारी प्रतिक्रिया, रॅटल सुरू झाली आहे. मी मला आठवण करून देतो, की माझ्या खिशात थोडे पैसे आहेत, त्यामुळे मला हे रॅटल जास्त वेळ सहन करावं लागणार नाही; परंतु पुन्हा वाट पाहण्याचा प्रकार. वाट पाहणं, शोधणं, इंजेक्शन घेण्यासाठी वाट पाहणं. मी किती शेकडो वर्षं वाट पाहण्यात घालवली आहेत? आता माझी थरथरायला सुरुवात झालीय. मला आठवतं, की आज रात्री जायला मला कुठेही जागा नाही. मग मी आजारी असल्याची, रिकामी, हरवल्याची जाणीव माझ्या आत्म्याला फटी पाडते आणि ते रॅटल या भगदाडातून एखाद्या विषासारखं घुसतं आणि ते माझ्या हाडांत, माझ्या हृदयात भोक पाडून आत जातं. माझं हृदय, त्यालाही त्या रॅटलचा संसर्ग झालाय.

मी अगदी हैराण झालोय. फ्रिद स्ट्रीट, मॅनेट स्ट्रीट, चेरिंग क्रॉस रोड, सट्टन रो. सरतेशेवटी आम्हाला लुका सोहो स्क्वेअरमध्ये दिसतो. तो आपल्या मोबाईल फोनवरून बोलतो आणि ज्याच्याकडे हेरॉईन आणि क्रॅक आहे, त्याला भेटण्याचं ठरवतो. तो माझे पैसे घेतो; परंतु स्टीव्हच्या नजरेत एक लबाड आणि

रस्त्यावर राहिल्यामुळे आलेला शहाणपणा असतो. मी लुकावर विश्वास ठेवू नये, कारण आम्ही त्याला धड ओळखत नाही, असं तो सांगतो. मग आम्ही सोहोच्या गर्दीच्या रस्त्यावर वर-खाली काही अंतरावरून त्याचा पाठलाग करतो. तेही सावकाशपणे, कारण स्टीव्ह त्या कुबड्यांमुळे फरफटत चालत असतो. आम्ही फक्त तेल चोपडलेल्या केसांच्या, घाणेरड्या लुकाला पाहत असतो. इतर अनेक लोक आमच्या बाजूनं जातात; पण आम्ही दुसऱ्या कुणाला पाहत नाही. आम्ही वाट पाहतोय. बांधले गेलोय. शेवटी तो व्यवहार होताना आम्ही पाहतो आणि लुका पुन्हा चालत सोहो स्क्वेअरला येतो आणि आम्हीही. तो ते सर्व सामान आम्हाला देतो.

विनोद म्हणजे सेंट्रल लंडनमध्ये ड्रग्ज मिळणं, हे अगदी सोपं काम आहे आणि ते घेण्यासाठी जागा शोधणं, हे मात्र कर्मकटकटीचं काम आहे. मी बेफामपणे त्या चौकातील झुडपांकडे बघतो; परंतु स्टीव्ह मला बाजूला घेतो. आता आमच्या चालण्यात बदल झालाय. आमच्या चालण्यात एक उत्साह आहे. आम्ही विनोद करतो. आम्ही आता ड्रग्ज घेण्याच्या मार्गावर आहोत.

कार्लीसल स्ट्रीट, वॉरडाऊर स्ट्रीट, ब्रुअर स्ट्रीट आणि नंतर आम्ही पिकॅडली सर्कसच्या भू-बोगद्यात शाफ्टस्बरी ॲव्हेन्यूच्या बाहेर पडणाऱ्या रस्त्याजवळच्या स्वच्छतागृहात आहोत. जिन्यावरून खाली, दरवाजातून आत आणि मग खालच्या जगात. धंदेवाले, समलिंगी दरवाजे उघडतात, बंद होतात. माणसं भरकन आत येतात आणि जातात आणि त्यांचे चेहरे खाली वळलेले असतात. फक्त एक माणूस शांतपणे उभा असतो.

"तो डेव्ह आहे." स्टीव्ह सांगतो.

डेव्ह हा तिथे वॉशबेसिनजवळ आहे आणि एक कुत्रा त्याच्या पायाशी शांतपणे वाट पाहत आहे. डेव्हनं वरचा अंगरखा काढलाय आणि त्याच्या हातात एक स्पेशल ब्रूचा डबा आहे. तो तिथे काही धुण्याचं काम करीत असायला हवा; परंतु ड्रग घेतल्यानंतरच्या परमानंदात तो आहे. त्याचे डोळे बंद आहेत आणि तो विव्हळतोय. मला ते रडणं समजतं. त्याला फार शारीरिक वेदना होतायत असं नव्हे, त्यानं नुकतंच ड्रग घेतलय; परंतु ते घेऊनही त्याला वाटणारा खोलवरचा मानसिक त्रास ते कमी करू शकलेलं नाही.

उचललेला कोकचा डबा आणि थोडं लिंबूफूल घेऊन स्टीव्ह आणि मी सरळ एका छोट्या खोलीकडे आम्ही रस्त्यातून जातो. आम्हाला त्याचीच सामग्री वापरायला हवीय, कारण माझ्याकडे काहीच नाही. दुसऱ्याची सुई वापरायची, याची मी पर्वा करत नाही. आम्हाला थोडं पाणीही हवंय; परंतु आमची ड्रग घेण्याची इच्छा इतकी अनावार झालीय, की आम्ही बर्गरकिंगकडे जाण्याच्या भानगडीत पडत नाही.

स्टीव्ह संडासाची साखळी ओढतो आणि मग त्या पात्रातून थोडं पाणी घेतो. मी हे पूर्वी कधीच केलेलं नाही.

मी त्या टाकीवर बसतो आणि स्टीव्ह त्या कमोडवर. जर कुणी त्या दरवाजाच्या खालून पाहिलं, तर इथे एकच माणूस आहे, असं दिसेल. आम्हाला शक्य तेवढ्या लवकर इथून बाहेर पडायचंय, कारण स्टीव्ह म्हणतो, की जे ऑफ्रिकन्स या जागेची देखरेख करतात, ते जर आपण बराच वेळ आत राहिलो, तर दरवाजा ठोकतात.

आमच्याकडे क्रॅक आणि हेरॉईन या दोन्ही ड्रगचा एक गोळा आहे. मी माझ्या कानांतून आणि डोळ्यांतून श्वासोच्छ्वास घ्यायचा प्रयत्न करतो आणि मला स्वत:ला घट्ट मिटून घेतो, की ज्यामुळे मला तो झुरका जोरात आत घेता येईल. माझ्या शरीरात ते क्रॅक कुठे आहे, हे तुम्ही जवळजवळ बघू शकता, कारण जसं ते शरीरात जातं, माझे केस टोकावर उभे राहतात. आता तो आलाय, क्रॅकचा परमबिंदू. तो गरगरणारा भोवरा आहे. जोरात उड्या मारणारा, फारसा न माणसाळलेला घोडा आहे. ते चंद्रावर जाणारं रॉकेट आहे. त्याचा माझ्या डोक्यात स्फोट होतो आणि ते माझ्या मेंदूशी प्रेमाचे चाळे करत नाही, तर चक्क संभोगच करतं. ओ, ते फार छान आहे. हे इतर ठिकाणी असलेल्या कोणत्याही गोष्टींपेक्षा जास्त चांगलं आहे. नंतर थोड्या मिनिटांतच ते संपतं आणि हेरॉईनची उबदार जाणीव ती जागा घेते आणि पुन्हा येणाऱ्या वेदनांवर दिलासा आणते आणि त्यामुळे ड्रग्ज घेतल्यानंतरचा तो काळ सोपा होतो.

पण अजूनही आम्ही वेदना आणि भीतीनं ग्रासलो आहोत. क्रॅकमुळे वाटणारी भीती, काही कारण नसताना वाटणारी घबराट. आमचं हृदय धडधडतंय. इकडेतिकडे सर्वांकडे पाहत आम्ही ती छोटी जागा सोडतो, तिथे डेव्ह आणि त्याचा कुत्रा आरशासमोर आहेत. ते हललेही नाहीत. या वेड्यापिशा चालणाऱ्या गडबडीत ते अगदी पुतळ्यासारखे आहेत.

आम्ही पायऱ्या चढून वर पिकॅडलीला माणसांच्या त्या गोंधळात आणि त्यांच्या पायरवात जातो. डोक्यातील ते आवाज पुटपुटतायत, आमच्या दोन कानांमध्ये पुटपुटतायत आणि आमच्या मेंदूच्या बोळातून कुणीतरी घाईनं चालल्यासारखी ती पावलं... आम्ही हे सहन करू शकत नाही. ड्रग्ज घेतल्यानंतर आम्हाला शांतता हवीय. आम्ही एका गल्लीत वळतो आणि चालत राहतो.

ग्लास हाऊस स्ट्रीट, गोल्डन स्क्वेअर, बीक स्ट्रीट, लेक्सींग्टन स्ट्रीट, ब्राडविक स्ट्रीट, बेरवीक स्ट्रीट, रूपर्ट स्ट्रीट, कॉन्व्हेंट स्ट्रीट, लैस्वेस्टर स्क्वेअर क्रामबॉर्न स्ट्रीट.

इथे एक कॅथॉलिक चर्च आहे. मी त्या संगमरवरी पायऱ्यांवरून वर जातो आणि दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करतो. तो आतून बंद आहे; परंतु स्टीव्ह

याआधीच उजवीकडे वळलाय. तिथे एक जाळीचा दरवाजा आहे. तो नेहमी येणारा आहे, त्याला माहीत आहे. तो त्या जाळीमागे असलेल्या स्त्रीला विचारतो, की त्याच्या मित्राला एक कपभर चहा आणि सँडविच मिळू शकेल का? ती बहुधा स्वयंसेविका असावी. माझ्या ममाच्या चर्चला जाणाऱ्या स्त्रियांसारखी ती दिसते. तिचे केस करडे आहेत. ती माझ्याकडे बघून हसत किंवा बोलत नाही किंवा प्रेमळ दिसत नाही. ती अगदी व्यवहारी आहे. मला त्यामुळे बरंच वाटतं. ती मला एका पॉलिस्टेरीन मगमध्ये चहा देते आणि एक कागदात गुंडाळलेलं सँडविच देते.

आम्ही त्या पायऱ्यांवरून खाली जातो आणि मी स्टीव्हला माझं सँडविच देतो. मला माहीत आहे, की मी जरी त्या धुंदीतून बाहेर आलो असलो, तरी मी ते खाऊ शकणार नाही. मी खूपच घाबरलेला आणि दु:खी आहे. स्टीव्ह ते सँडविच आपल्या खिशात कोंबतो. आम्ही इकडेतिकडे हिंडतो आणि वेळ जातो, एक मिनिट, एक तास, तीन तास, ते सर्व सारखेच वाटतात. मला दुसरं इंजेक्शन हवंय आणि आता वाट बघायला नकोय, कारण मी लुकाकडून जास्त पुड्या आणल्यात.

ते इंजेक्शन घेतल्यावर आम्ही पुढे चालत जातो आणि नंतर एका कोपऱ्यावर काहीही न सांगता किंवा निरोप न घेता स्टीव्ह निघून जातो. तो अचानक गेला आहे. मी एकटाच आहे. रात्र होत आहे. मी घाबरतो. माझ्यापेक्षाही माझं एकाकीपण मला जास्त मोठं वाटतं. मला आठवतं, की मला एक मुलगा आहे आणि त्याला मी भेटत नाहीये. ही चांगली गोष्ट आहे, की तो आता मला पाहत नाहीये. मी अश्रू आवरतो.

मी भटकतो. मी घाबरलोय. ही आजूबाजूची परिस्थिती प्रतिकूल आहे. इथे राहायचं, म्हणजे तुमचं डोकं फिरलेलं असायला हवं आणि तुमच्याकडे काही असता कामा नये, नाहीतर ते तुम्हाला शोधतील. ते आवाज, ते पदरव आणि ते तुमचे कपडे काढतील आणि सर्व घेऊन जातील.

वॉरडॉवर स्ट्रीट, ब्रॉडविक स्ट्रीट, पोलंड स्ट्रीट, ऑक्स्फर्ड स्ट्रीट, ब्रुअर स्ट्रीट, वीक स्ट्रीट, ब्रॉडविक स्ट्रीट, बरवेक स्ट्रीट, ब्रुअर स्ट्रीट, ग्लास हाऊस स्ट्रीट.

पिकॅडलीला मी जिने उतरतो आणि तिथे पुन्हा डेव्ह दिसतो. तो ट्यूब स्टेशनमध्ये हातात कप घेऊन भीक मागतोय. त्याच्या कुत्र्याचे डोळे त्याच्या मांडीवर आहेत आणि त्याचं डोकं प्रार्थना करत असल्यागत वाकलेलं आहे आणि तो विव्हळायचं थांबलाय. मी त्याच्याशी थोडं बोलतो.

आम्हा दोघांना ड्रग्जची जरुरी आहे, त्यामुळे मी माझे शेवटचे पैसेही दोन पुड्या घेण्यात घालवतो. तो म्हणतो, की जेव्हा मला गरज असेल आणि भीक मागून त्याला पैसे मिळतील, त्या वेळी ड्रग्जसाठी तो मला मदत करील.

आता अंधार पडलाय. ही माझी रस्त्यावरची पहिली रात्र आहे, हे त्याला सांगताना मी संकोचतो. तो दयाळू आहे. या रस्त्यावर राहणाऱ्या लोकांत एक पारदर्शकता असते. त्याच्या शरीराचा भाग, नाक किंवा बोटं जितक्या नीटपणे मी पाहू शकतो, तसा त्याचा दयाळूपणाही.

पिकॅडली स्टेशनच्या मागच्या बाजूला आम्ही पायऱ्यांच्या तळाला एकत्र बसतो आणि बोलतो. सुरुवातीला मीच सर्व बोलतो. मी ते थांबवूच शकत नाही. मला बोलायला हवं. ते सर्व बाहेर येतं. माझं कुटुंब, माझे वडील, माझी सवय, जॅक, मी व्यसन सोडायला अनेक वेळा केलेला प्रयत्न, कामासाठी घेतलेलं प्रशिक्षण आणि माझी ही ड्रगची सवय सांभाळून घेण्याचा केलेला प्रयत्न; परंतु कशाचाच उपयोग झाला नव्हता. मी यातून बाहेरच पडू शकत नाही. माझ्यासाठी कुणाचं असलेलं चांगलं मतही मी संपुष्टात आणलंय आणि त्यामुळे आज रात्री मला कुठेही जायला जागा नाही.

डेव्ह सहानुभूती दाखवतो. तो त्याचा कुत्रा बुट्स याला थोपटतो आणि स्वत:विषयी मला सांगतो. मला माहीत आहे, की ब्रिटनवरून जिकडून तिकडून आलेले लोक, हे रस्त्यावर राहतात. डेव्ह हा प्रत्यक्षात सेंट्रल लंडनचा आहे. त्याच्या उच्चारावरून ते जाणवतं. खरं लंडन अगदी हळुवार, अशा तऱ्हेची उच्चार पद्धती, जी मी जुन्या सिनेमातून ऐकलीय. तो बोलताना मी त्याचं निरीक्षण करतो. काळे दाट केस, तेही बारीक कापलेले, पापण्यांचे दाट केस आणि काही घरी गोंदवलेल्या खुणा. तो त्याला घरात किती भयानक वागवलं त्याबद्दल सांगतो. त्याचा बाप त्याला कुत्र्यासारखा चाबकानं मारायचा. हे सांगताना तो त्याच्या कुत्र्याला बुट्सला जवळ घेतो. एके काळी आमच्या दोघांचंही जीवन सामान्य होतं; परंतु आता हे काही सामान्य नाही, आम्ही सामान्य नाही. ज्या तऱ्हेनं डेव्ह आधी आक्रंदत होता, तसं माझं दु:ख सांगण्यासाठी मला रडावंसं वाटतं.

जेव्हा जिन्यावरची कवाडं रात्रीसाठी बंद करतात, आम्ही दोघं एकत्र निघतो. डेव्हकडे बरंच सामान आहे. स्लीपिंग बॅग, एक-दोन खांद्यावरच्या थैल्या आणि कुत्रा... तो रस्त्यावर बरेच दिवस राहतोय, हे तुम्ही सांगू शकाल; परंतु आजची माझी पहिली रात्र आहे आणि माझ्याकडे काहीच नाही. लंडनवर अंधार पसरलाय आणि पिकॅडलीच्या चकचकत्या दिव्यांनी त्याला मध्येच फट पडलीय. त्या दिव्यांचा उजेड अनैसर्गिक आहे. तो तसा निसर्गात मिळत नाही. ते दिवे काहीतरी संदेश, जो इतर लोकांसाठी आहे, तो उजळून दाखवतायत. तो आमच्यासाठी नाही. रस्त्यावर अजूनही रहदारी आहे; परंतु आता लोक आहेत ते बहुतेक तरुण आहेत. क्लब आणि पार्ट्यांना जाणारे लंडनचे लोक, परदेशी लोक त्यांना पाहतायत, एकमेकांना पाहतायत. कुणी आम्हाला पाहत नाही. आम्ही काय आहोत, ते त्यांना

माहीत आहे. मी डेव्हच्या आणखी जवळ राहतो. आजच्या या मन दुखावलेल्या रात्री मला कुणीतरी दयाळू भेटला, याचा मला दिलासा वाटतो. तो एखाद्या म्हाताऱ्या माणसासारखा हळूहळू चालतोय. त्याच्या आयुष्याच्या कथेवरून मी हिशेब केलाय, की तो तिशीचाही नाही. त्याचा कुत्रा शांत आणि मऊ केसांचा मिश्र जातीचा आहे. तो त्याच्या चालीनं चालतो.

डेव्ह हा मार्केट येथील सिनेमाच्या दरवाजाकडे घेऊन जातो. आम्हाला काही पुठ्ठे हवे आहेत आणि त्यासाठी मी काही करू शकेन. मी माझ्या भराभर चालीनं जातो आणि एका दुकानाच्या बाहेर ते सापडेपर्यंत त्यांच्या मागावर फिरतो. ते आम्ही फरसबंदीवर ठेवतो. त्यावर तो कुत्रा बुट्स मध्ये येऊन पडतो. डेव्हचं ब्लँकेट आमच्यावर आहे. जरी उन्हाळा असला, तरी आम्हाला थंडी वाजते. पाऊस पडायला लागतो; परंतु डेव्ह दयाळू आहे. तो बाहेरच्या बाजूला झोपतो, त्यामुळे तोच भिजतो. मी कोरडा असल्यामुळे मला झोप यायला हवी; परंतु माझ्यामागे असलेल्या दरवाज्याखालून वाऱ्याचा झोत घोंघावत येतोय.

आम्ही बोलत नाही. मी डोळे बंद करतो. बुट्स आपली कुत्र्याची स्वप्नं याआधीच पाहतोय आणि मध्येच जरा आखडतोय. मला खाली असलेला पुठ्ठा आणि त्याखाली असलेली टणक फरसबंदी जाणवते. मी डेव्हच्या ब्लँकेटखाली कुडकुडत असतो आणि सर्व भावभावना बोथट करणाऱ्या हेरॉईनमुळे मला बरं वाटतं. मला माझ्या भावना जाणून घ्यायच्या नाहीत. मला पर्वा करायची नाही.

मी सकाळी नऊ वाजता जागा होतो, तो थंड पडलेला, शरीर ताठ झालेलं, दमट आणि अतिशय दुःखी असा. जेव्हा मी डोळे उघडतो, तेव्हा पावसाची भुरभुर पाहतो. मला आठवतं, की मी आताच माझी पहिली रात्र रस्त्यावर काढलीय आणि पुन्हा ड्रगची ती प्रतिक्रिया, रॅटलिंग सुरू झालंय. माणसं जवळून जातायत. मला लंडनचं दर्शन होतं, ते किड्याच्या नजरेतून. टाचा, बूट, ढोपरं, कोटाची शिवण आणि ऑफिसच्या आणि हातातील बॅगा. चेहरे नव्हेत.

डेव्ह अजूनही झोपलाय. अंग ठणकत असताना मी मला माझ्या पायांवर उभा करतो आणि बँकेकडे निघतो. तेथील मुसंडी मारणाऱ्या घोड्यांच्या सोनेरी पुतळ्याच्या बाजूनं जातो. मला माहीत आहे, की माझ्याकडे थोडाच पैसा शिल्लक आहे. मी आशा करत होतो, की ते शंभर पौंड असावेत; परंतु ते फक्त पन्नास पौंड आहेत. मी ते बँकेतून काढतो आणि ताबडतोब एका माणसाकडून ड्रग विकत घेतो. तो मला सांगतो, की सकाळी बहुतेक वेळा तो मला सोहोमध्ये दहा वाजेपर्यंत सापडेल, त्यामुळे या वेळी वाट पाहणं नाही. मी पुन्हा डेव्हकडे परततो. आता जोरात पाऊस पडतोय. लोक बसथांब्याच्या शेडखाली उभे राहून माझ्याकडे पाहतायत. मी डेव्हला पुडी आणल्याचं सांगून उठवतो.

डेव्ह आणि त्याचा कुत्रा पिकॅडलीच्या स्वच्छतागृहाच्या जवळच्या भीक मागण्याच्या जागेवर जातात. तो म्हणतो, की त्याला नेहमी भीक देणारे काही लोक आहेत. ते त्याची काळजी घेतात.

"आता तू हे लक्षात ठेव." तो म्हणतो, "बँकांच्या सुट्ट्या या सर्वांत वाईट. रविवारही वाईट. बँकांच्या सुट्ट्या या च्यायला वैतागच."

बहुधा तो भीक मागण्याबद्दल सांगतोय; परंतु मला भीक मागायची नाही. मला लोकांना माझ्यावरून सरळ पुढे रस्त्यावर जाऊन माझं अस्तित्व नाकारायची संधी द्यायची नाही, शिवाय माझ्या या सवयीसाठी भीक मागून मी पुरेसा पैसा मिळवू शकणार नाही, कारण ती सवय एवढी वाढलेय, की ती सोहोहूनही मोठी वाटतेय, लंडनहूनही मोठी. जेवढं मिळेल तेवढ्या क्रॅकची मला गरज आहे. उत्तम उपाय म्हणजे मी संधी मिळताच इंजेक्शन घेईन, नक्कीच. जर शक्य असलं, तर तासाला एकापेक्षा जास्त. हेरॉईनच्या बाबतीत तर वरची मर्यादा नाही; परंतु दिवसाला दोन ग्रॅमपेक्षा कमी मिळालं, तर मी जगू शकत नाही. दोन ग्रॅमच्या एका पुडीला दहा पौंडपर्यंत पडतात. मी साधारणपणे त्या विक्रेत्याशी घासाघीस करून काही पैसे कमी करायला लावले तरच. अशी घासाघीस करूनही माझ्या या सवयीसाठी दिवसाला कमीत कमी तीनशे पौंड खर्च येतो, बऱ्याचदा जास्तीही आणि हा एवढा पैसा मिळवायचा एकच मार्ग आहे... चोरी.

ज्या क्षणी माझा पैसा संपतो, मी सारखा फिरतोय. सदैव सावध आहे. चोरीच्या संधी शोधत आहे. जसं निष्काळजीपणे टाकलेल्या हँडबॅग्ज किंवा कॅमेऱ्यात मग्न असलेले टुरिस्ट, ज्यांना त्यांच्या पैशाच्या पाकिटाचा विसर पडलाय. मी नेहमीच ड्रग्ज घ्यायची वाट पाहत असतो आणि मित्र शोधत असतो. आता रस्त्यावरील प्रत्येक जण माझा मित्र आहे आणि कुणी नाहीही. माझ्या लक्षात येतं, की आम्ही क्वचित वेड्यावाकड्या घोळक्यांनी एकत्र येतो किंवा एका चौकातून दुसऱ्या चौकात एकमेकांचा पाठलाग करतो.

"मला ड्रग दे भाऊ,"

"मला यातून सोडव भाऊ,"

"तुझ्याकडे काय आहे?"

"ठीक आहे ना भाऊ?"

आम्ही पार्कमध्ये पक्ष्यांप्रमाणे जमतो आणि कबुतरांसारखे काहीही सूचना न देता अचानक वेगवेगळ्या दिशेनं नाहीसे होतो. आम्ही दोघा-तिघांच्या किंवा जास्त लोकांच्या घोळक्यांनी चालत राहतो. येणारे आम्हाला अभिवादन करत नाहीत किंवा आमचा निरोपही घेत नाहीत. जेव्हा आम्ही एकत्र असतो, मला त्या मैत्रीच्या भावनेनं, बंधुत्वाच्या भावनेनं बरं वाटतं, मग अचानक मी स्वतःला

एकटाच सापडतो, वेदना बाहेर पडताना, भयभीत झालेला.

मी नवा असल्यामुळे जास्त काही बोलत नाही. इतर काय बोलतात ते ऐकतो. ते सर्व बोलणं असतं, ते कसं जगायचं यावर आणि मला बरंच शिकायचं आहे. निरनिराळ्या ड्रग्जच्या मिळण्याच्या जागा, कोणत्या दिवशी ऑक्सफर्डमधील कॉफीची दुकानं त्यांची जुनी बिस्किटं बाहेर फेकतात, ब्रॉडविक येथील रस्त्यावरची स्वच्छतागृहं, ही काळ्या बाईच्या, जिला मॉम असं म्हणतात, तिच्या देखरेखेखाली कशी आहेत आणि ती इतरांपेक्षा तुम्हाला तो दरवाजा ठोकण्याआधी, इंजेक्शन घ्यायला जास्तीत जास्त वेळ देण्याची कशी शक्यता आहे. सुशी हे एक जपानी अन्न कुठे चोरायचं, सुपरमार्केटनं फेकलेलं अन्न कसं मिळवायचं, कुठे झोपायचं आणि ड्रग घ्यायला कुठे जायचं, स्टोअरमध्ये असलेल्या गुप्तहेरांना कसं बनवायचं वगैरे वगैरे. मी काळजीपूर्वक ऐकतो, एक जागृत विद्यार्थी, कारण माहिती हे जीवन आहे.

रस्त्यावर दया-माया नाही. हे एक जंगलच आहे आणि आम्हा सर्वांना जगायचंय; परंतु पुष्कळ लोक माझ्याशी बरं वागतात, कारण मी नवा आहे. मला गरज असलेल्या ड्रग्जसाठी पुरेसा पैसा मिळवणं, हे फार कठीण जातं. मी बरेच वेळा आजारी असतो. मी एका सकाळी आजारी आणि दुःखी असताना मला एक माझ्याहून वयानं मोठा असलेला मुलगा शाफ्टस्बरी ॲव्हेन्यूला भेटतो आणि मी त्याच्याकडे आकर्षला जातो. गिन्ज जरा मो, अस्ताव्यस्त आणि चतुर आहे. तो मला माझी आठवण करून देतो. आम्ही दोघं एकत्र ड्रग घ्यायला रस्त्याच्या कोपऱ्यावर असलेल्या मोठ्या पेटीसारख्या, काँक्रीटच्या भयानक स्वच्छतागृहात जातो. आम्ही वीस पेन्स देतो आणि तो काँक्रीटचा दरवाजा आम्हाला त्या थडग्यात घेण्यासाठी उघडतो.

मुलांचे नॅपी बदलण्यासाठी असलेली एक फळी एका शेल्फवरून खाली येते आणि आम्ही आमची शस्त्रक्रियेसाठी लागणारी सर्व हत्यारं त्यावर ठेवतो. आमचा चमचा आणि लिंबूफूल, कोकचा डबा आणि ड्रग. जेव्हा गिन्जचं इंजेक्शन घ्यायचं असतं, तो त्याची पँट मांडीच्या मध्यावर ओढतो. त्याच्या जांघेवर असलेल्या भल्या मोठ्या जखमेवरची खपली काढतो आणि एका भल्या मोठ्या पिचकारीची बोथट सुई त्या भोकातून सरळ त्याच्या मुख्य रक्तवाहिनीत घालतो. लोक मला सांगतात, की माझ्या नसा चांगल्या आहेत. मी ती क्रिया भुरळ पडल्यागत इंजेक्शन घेताना पाहतो.

आम्ही त्यानंतर बोलत असतो. त्या ड्रग घेतल्यानंतरच्या धुंदीतून आम्ही काळजीपूर्वक उतरत असताना, कोणतीही सूचना न मिळता ते स्वयंचलित दरवाजे उघडतात. जाणाऱ्या-येणाऱ्यांना, आम्ही दोन जंकी आणि ड्रग घेण्यासाठी लागणारं सामान आणि त्यातील एकाची पँट उतरवलेली हे दृश्य दिसतं. आम्ही त्या दिवसाच्या उजेडाकडे डोळे मिटमिटत बघतो आणि ते लोक आमच्या अंधेऱ्या

अंडरवर्ल्डकडे पाहतात.

"च्यायला," गिन्ज म्हणतो, "इथे फक्त पंधरा मिनिटांचीच वेळमर्यादा असते, हे मी विसरलोच होतो."

"सूचना, हा संडास निर्जंतुक केला जाईल." ज्याला कधी ड्रग्ज घ्यावी लागलेली नाहीत, असा एक आत्माहीन आवाज जाहीर करतो. "हे निर्जंतुक करण्याचं काम केबिनच्या आतल्या बाजूनं करण्यात येईल. सूचना, केबिन ताबडतोब खाली करा."

"जरा पटकन बाहेर पडू या. नाहीतर आपण साले पार भिजून जाऊ." गिन्ज म्हणतो. "चल, ये."

मी त्याच्या पाठोपाठ जातो. तो काही मला निश्चित असा जगण्याचा मार्ग दाखवणार नाही. या जंगलात कोणीही हे करणार नाही; परंतु तो मला आपल्याबरोबर घेणार आहे.

शाफ्टस्बरी ॲव्हेन्यू आल्यावर गिन्ज नाहीसा होतो. जेव्हा माझ्या लक्षात येतं, की तो माझ्या बाजूला नाही, मी पुन्हा एकदा त्या उदास एकाकी जगात बुडतो. मग तो मला एका फोन बॉक्समध्ये दिसतो. तो परतीची चिल्लर येण्याच्या जागी विसरलेल्या नाण्यांची अगदी अस्वस्थपणे वाट पाहत असतो. हे असं नाहीसं होणं बऱ्याच वेळा चालतं. आम्ही सोहोजवळ या मोहाला बळी पडून भटकत असताना मला माहीत होतं, की टेलिफोन बॉक्सच्या बाजूनं आत न जाता बाजूनं जाणं त्याला शक्य नाही.

आता एका गल्लीतून आम्ही चेरिंग क्रॉस रस्त्याकडे जातो. आम्ही रेडलाइट भागात आलोय. तिथे काही मुली वरच्या मजल्यावरच्या खिडक्यांशी घोटाळत आहेत. त्या आमच्यात काही रस घेत नाहीत. खालच्या बाजूला काही दलाल उभे आहेत आणि ते लोकांच्या हातात कार्ड, नंबर आणि फोटो कोंबत आहेत. आम्ही जात असताना, ते काही कार्डासाठी हात घालत नाहीत. आम्ही एका पोपडे सुटलेल्या दरवाज्यातून आत जातो आणि मी त्या मोडक्या जिन्यावर वाट पाहत थांबतो. गिन्ज वर जातो आणि दार ठोकतो. मला दरवाजा उघडल्याचा आवाज येतो.

"काही हवंय?" तो विचारतो. दूरवर बोलण्याचा आवाज येतो. बायका एकमेकींना बोलावतात. थोड्याच वेळात गिन्ज उड्या मारत एक यादी घोकत येतो. निव्हिया, हाताचं क्रीम, लहान लाल टॉवेल, नेल व्हॉर्निश रिमूव्हर.

लैस्टर स्क्वेअर, रूपर्ट स्ट्रीट, रेमंड्स रेव्ह्यू बार, त्या गल्लीतून वर आणि त्या कोपऱ्यावर असलेल्या सशांच्या पिंजऱ्यांप्रमाणे असलेले कुंटणखाने. रात्रीच्या वेळेला या जागेला कदाचित तिथे असलेल्या काळ्या सावल्या आणि झगमगते, चमचमते दिवे यामुळे काही प्रलोभन असेल; परंतु दिवसाच्या उजेडात त्याला सर्व

घाणीचाच रंग आहे. इतकंच नव्हे, तर त्या मुलींची चित्रंही घाणेरडी दिसतात. त्यांची काळपट कातडी. आम्ही पुन्हा एकदा दुसऱ्या जगात, बोळांच्या, जिन्यांच्या, दरवाज्यांच्या आणि लाल अंधुक दिव्यांच्या चक्रव्यूहात सापडतो. काही थोडे लोक घाईनं जिन्यावरून पुढे जातात. त्यातील दोन-चार आधीच प्यालेले आहेत. ते बोळातून अडखळत जाताना भिंतीवर आपटत आहेत.

आम्ही आमच्या कामाची सुरुवात दरवाज्यांपासून करतो. जिथे लाल रंगाचा दिवा असेल किंवा ज्या ठिकाणी गुबगुबीत स्त्री असल्याचं सांगणारं कार्ड खोचलं आहे, तिथे दरवाजा ठोकतो. जेव्हा दरवाजा उघडतो, तेव्हा आतील स्त्रिया कार्डावर दाखवलेल्या मॉडेलसारख्या काही दिसत नाहीत. काही एकट्या असतात, काही घोळक्यात असतात, काही बसून गिऱ्हाइकांची वाट पाहत असतात, पीत असतात, केस विंचरत असतात किंवा मासिकं वाचत असतात. त्या मुलींचे आकार, आकारमान आणि रंग वेगवेगळे असतात. त्यातील काही फारच लहान, घाबरलेल्या पूर्व युरोपातील मुली आहेत. त्यांना त्यांच्या त्या दलालांमुळे पैसे खर्च करायला भीती वाटत आहे. काही सुंदर आहेत, काही म्हाताऱ्या आहेत. त्यांचं लिपस्टिक ओघळत आहे. सुकलेल्या मनुकांसारखी स्तनांची बोंडं त्यांच्या १९७०च्या पारदर्शक नाईटीमधून दिसत आहेत. प्रत्येक दरवाज्यावर त्यांच्या आयुष्याची कल्पना येते. ते रंग उडालेले लाल वॉलपेपर्स, ते चोवीस तास पोरींसारखं बोलणं, ती भीती, तो कंटाळा आणि दुसऱ्या कुठेतरी असावं, ही इच्छा.

आम्हाला ज्या वस्तू चोरायच्या यांची आठवण ठेवायला अवघड अशी भलीमोठी यादी मिळते... कॉस्मेटिक्स, टॉवेल्स, त्यांच्या मुलांसाठी खेळणी, आतले कपडे, केसांसाठी स्प्रे... ते आम्ही ऑक्स्फर्ड स्ट्रीटवरील दुकानांत यादीप्रमाणे चोरण्यासाठी जातो.

लहान असताना मी अगदी तरबेज चोर होतो आणि दुकानातून चोऱ्या करायच्या, हे एक त्यातलंच सायकल चालवण्यासारखं कसब आहे, जे तुम्ही विसरत नाही. गिन्ज यात तरबेज आहे; पण तो बराच काळ इथे आहे. तो प्रत्येक दुकानात आणि पोलिसांना माहीत आहे. तो काळं चामड्याचं वाटणारं फुगीर जॅकेट वापरतो. त्याच्या आतल्या बाजू फाडलेल्या आहेत, त्यामुळे चोरलेला माल तो त्यात भरू शकेल. त्याची पँटही काळी आहे, त्याचे बूट घाणेरडे आहेत. तो निस्तेज आणि तोंडावर डाग असलेला आणि अंघोळ न केलेला आहे. तो दुकानात शिरताच कुणीही गुप्तहेर सावध होणार, हे नक्की. त्याला हे माहीत आहे, त्यामुळे आम्ही पुढे जात, दुकानातून काम करत झपझप मार्ग काढत जातो.

आम्ही ते सामान त्या न हसणाऱ्या मुलींकडे घेऊन जातो आणि आमच्या या सर्व त्रासासाठी त्या फारच थोडा मोबदला देतात. आम्हाला दहा वस्तू चोरण्याबद्दल

फारतर पंधरा पौंड मिळतात. मला वाटतं, की हे फारच काम आहे आणि कौशल्याचं आहे आणि त्यात फारसे पैसेही मिळत नाहीत; परंतु गिन्जचं हे वैशिष्ट्य आहे आणि तो येथील सर्व मुलींना माहीत आहे. सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे जेव्हा आम्ही या वस्तू त्या खरोखर सुंदर असलेल्या वेश्यांना देतो, तेव्हा एक विचित्र आणि तीव्र असं दु:ख जाणवतं. त्या आमच्याकडे धड पाहतही नाहीत. जणू काही आम्ही सुंदर स्त्रियांच्या दृष्टीनं अदृश्यच असतो.

आमचं सार्वजनिक स्वच्छतागृहात इंजेक्शन घेणं, हे जेव्हा सर्व लोकांसमोर आलं, तेव्हा गिन्ज मला दुसरीकडे, जे चांगलं ठिकाण असल्याचं तो सांगतो, तिथे घेऊन जातो. ब्रुअर स्ट्रीट, ओल्ड कॉम्पटन स्ट्रीट, ग्रीक स्ट्रीट, सट्टन रो. रस्त्यात तो एका गल्लीतील जुन्या रेकॉर्ड विकत घेणाऱ्या दुकानाच्या दरवाज्यातून डोकावतो.

"हाय सायमन," तो काउंटरच्या मागे असलेल्या माणसाला हाक मारतो.

"माझ्यासाठी आज काही आहे का?" सायमन विचारतो.

"कदाचित मागाहून. हा मार्क आहे." गिन्ज सांगतो आणि मी सायमनकडे पाहून हसतो. नंतर आम्ही पुन्हा आमच्या रस्त्यानं पुढे जातो.

"सायमन डीव्हीडीज विकत घेतो." गिन्ज सांगतो, "तो काहीही घेईल."

आम्ही बाजूच्या रस्त्याकडे वळतो. तो मला एका इमारतीच्या मागे घेऊन जातो. पुढच्या बाजूला ऑफिसेस आणि दुकानं आहेत; परंतु इथे मागच्या घाणेरड्या बाजूला खिडक्या नाहीत. फक्त कचरा भरलेल्या पिंपांमागे काही जिने आहेत. ते जिने एका अरुंद वाटेकडे जातात. ती अरुंद वाट म्हणजे बहुतेक आग लागलेली असताना बाहेर पडण्याचा मार्ग आहे; परंतु तो जणू काही जंकीजसाठीच बनवलेला असावा. छपरा-खालील, काहीसा अंधारात असलेला, तेथून कोण येतं-जातं ते दिसणारा; परंतु वरून कुणाला न दिसणारा. फक्त कधी कधी डबलडेकरच्या वरच्या मजल्यावर बसलेल्या विस्मित प्रवाशाला ते दिसतं. तो जंकीजचा स्वर्ग आहे. वेस्ट एन्ड आमच्याभोवती फिरतंय; पण हे शांततेचं मेरूस्थल आहे. आता या क्षणी दुसरे दहा जंकीज आणि निवडक कबुतरं या जागेचा उपयोग ड्रग्ज घ्यायच्या सामानाच्या राशीत करतायत. ती सामग्री आहे स्पीट, सुया, कॅन्स आणि पाण्याच्या बाटल्या. "त्यांच्यापासून जपून." गिन्ज त्या अरुंद वाटेत पुढे बसलेल्या दोन जंकीजकडे बोट दाखवून सांगतो. ते इतके स्तब्ध आहेत, की ते मेलेलेही असण्याची शक्यता आहे. फक्त ते आमच्याकडे बघतायत. "जुळे, ते भयानक आहेत. वेड्यांची जोडगोळी."

जवळच सुया बदलण्यासाठी व्हॅन उभी आहे. हजारो लोक तिच्या बाजूनं अनेक रस्त्यांवरून जातात आणि बहुधा ती छोटी सामान्य व्हॅन त्यांच्या लक्षातही येत नाही. तुम्हाला व्हॅनवरची स्वच्छ सुयांची काळजीपूर्वक चिकटवलेली खूण ओळखू

यायला, तुम्ही जंकी असायला हवं. मी खिडकीशी जातो आणि आत असलेला माणूस मला काही सुया, पुसायला फडकं आणि एक छोटासा खोका, ज्यात मी वापरलेल्या सुया टाकायच्या आहेत, ते देतो.

"या सुया सुरक्षितपणे वापरणं, हे किती महत्त्वाचं आहे, हे तुला माहीत आहे का?" तो त्या देताना विचारतो.

"हो," मी त्याला खात्री देतो. मला हे माहीत आहे, की हे किती महत्त्वाचं आहे आणि मी स्वच्छ सुया वापरण्याचा प्रयत्न करतो; पण जेव्हा माझ्याकडे ड्रग आणि इतर वस्तू असतात, पण सुई नसते, तेव्हा मी काहीही करतो. मी यापूर्वी एक घाणेरडी सुई त्या घाणेरड्या खोक्यातून घेतलीय आणि ती या आधी कोणी वापरली होती, ते देवालाच माहीत. आज मी ही गिन्जबरोबर वापरलीय आणि त्याला नक्कीच लागण झालेली आहे. अर्थात, मी पर्वा करत नाही. मरण या गोष्टीचा मी विचार करत नाही किंवा ते मला समजत नाही. जगणं म्हणजे आता फक्त ड्रग्जचं इंजेक्शन घेणं, एवढंच आहे. मी त्या जत्रेत ठेवलेल्या मशिनसारखा आहे. आत पैसे टाका आणि सर्वत्र दिवे, रंग आणि संगीत आढळेल. पैसे संपताच ते थांबतं.

■

२८

रस्त्यावर झोपणाऱ्यांच्या तुलनेत माझी पहिली रात्र डेव्ह आणि त्याचा कुत्रा बुट्स आणि त्याचं ब्लँकेट यामुळे तशी आरामदायी झाली. आता रात्री आणखी थंड झाल्या आहेत आणि एकाकीही. असं दिसतं, की कित्येक रात्री मला झोप येत नाही. मी क्रॅक घेतल्यावर मला एवढा हँगओव्हर येतो, की मी फेऱ्याच मारतो. मी आता कचऱ्याचे डबेही शोधू लागलोय. त्या धुंदी उतरतानाच्या विस्मृतीच्या क्षणांना मला काहीतरी काम मिळतं. मी खरंच इतका भिकाऱ्यासारखा दिसतो, की कुणी मला त्रास देत नाही. समाज नाही की पोलीस नाहीत. ही शत्रुला फसवण्यासाठी युक्ती आहे किंवा अदृश्य होण्यासारखी. मी काळजीपूर्वक चालतो. माझा एक पाय गटारात, तर एक फरसबंदीवर असतो, त्यामुळे विस्मृतीतून बाहेर यायला आणि एक मूर्ख, अयशस्वी माणूस असं सांगणाऱ्या त्या दुष्ट, मला टोमणे मारणाऱ्या, डोक्यातून येणाऱ्या आवाजांकडे दुर्लक्ष करायला मला थोडी मदत होते.

जेव्हा मी कचऱ्याच्या डब्याजवळून जातो, मी थांबतो आणि धुंडाळतो. मला एक हँडबॅग सापडते. ती चोरली गेली असावी आणि चोरानं त्यातील सर्व पैसे काढून घेतले आहेत; परंतु त्यात अजूनही एक बँककार्ड आहे. मी ते कार्ड घेतो. मला दुसऱ्या एका कचऱ्याच्या डब्यात काही अर्धवट खाल्लेलं अन्न कागदाच्या पिशवीत मिळतं आणि मग माझ्या लक्षात येतं, की मला भूक लागलेली आहे आणि मी त्यात जे काही उरलंय सुरलंय ते खातो आणि पुढे चालणं चालू ठेवतो. आता जरा सावकाश, कारण माझे शूज पायांवर घासू लागलायेत.

मी आणि डेव्ह जिथे पहिल्या रात्री झोपलो होतो, त्या दरवाजाशी मी जातो. मला काही पुठ्ठे मिळतात; परंतु त्या दगडी फरसबंदीवर गादी म्हणून वापरायला ते पुरेसे नाहीत आणि डेव्ह, त्याचा कुत्रा बुट्स इथे नाहीये. त्या दरवाजातून आवाज करत बाहेर येणारा वाऱ्याचा झोत मी ओळखतो.

सकाळी मला उठणं अशक्य होतं. मला माहीत आहे, की माझं वजन बरंच

कमी झालंय; परंतु माझा देह हा शिशासारखा जड वाटतोय. मी मशीन आहे. मोठी मोठी पिस्टन प्रत्येक पाय वर-खाली, वर-खाली करतायत. माझ्या वेदनांना अशी लय दिल्यामुळे थोडं बरं वाटतं. ती भक्कम पिस्टन्स त्या रस्त्यावरच्या हळू चालण्यावर नियंत्रण ठेवतात. माझं डोकं ठणकतं. प्रत्येक भाग दुखतोय. माझ्या पायांवर कातडीच नसल्यासारखं वाटतं. मी आजारी आहे, आजारी आहे. मी वर पाहतो. त्या सोनेरी उड्या मारणाऱ्या घोड्यांजवळून जातोय. मला कसंही करून थोडा पैसा मिळवायला हवाय. मला ड्रग्जची तलफ आलेय. मला एक भयानक थकवा जाणवतोय. मग मला माझ्या पाकिटातील ते चोरलेलं बँककार्ड हाताला लागतं. माझी चाल झपझप होते आणि माझी थोडी शक्ती परत येते. इतकी, की मी धडपडत नॅट वेस्ट बँकेत जातो आणि तिथे असलेल्या शिष्ठ चेहऱ्याच्या काउंटरवरच्या बाईला, मला हे कार्ड कसं मिळालं, ते सांगतो. ती न हसता मान डोलावते. ती माझ्याकडे जाड चष्म्यातून पाहते. काउंटरवरची काच जी तिला जनतेपासून वेगळी ठेवते, तीही जाड आहे, त्यामुळे असं वाटतं, की ती माझ्यापासून खूप दूर आहे.

कॅशिअर ते कार्ड घेते आणि आपल्या कॉम्प्युटरवर त्या कार्डाचा इतिहास तपासते. टॅप टॅप टॅप बटणांचा आवाज येतो. त्या तिच्या बोटांखाली ती नाचल्यासारखी वाटतात. मी आजूबाजूला पाहतो. मी आत आहे, एका छपराखाली आहे. हल्लीच्या या दिवसांत मला जी काही छप्परं माहीत आहेत, त्यापैकी बरीच मोठ्या गर्दीच्या दुकानांची तरी असतात किंवा थंड दगडी दरवाजाची किंवा सार्वजनिक मुतारींची तरी असतात; परंतु बँक तशी उबदार आहे आणि शांत आहे. जेव्हा तिथे कधी लोक बोलतात, जणू जाड भिंती भोवताली असल्यागत आणि जाड गालिचे पायांखाली असल्यागत वाटतं. मी जिथे राहतो, तिथून कित्येक मीटर्स ते दूर आहे आणि कित्येक जग दूर आहे.

मला एक माणूस माझ्याकडे बघतोय, याची जाणीव होते. तो बाजूच्या काउंटरजवळ उभा आहे. तो त्याची कॅशिअर तिच्या की बोर्डवर काम करत्येय म्हणून वाट बघतोय; परंतु तो माझ्याकडे पाहतोय. खरं सांगायचं, तर जेव्हा मी माझी कहाणी सांगितली आणि ते बँककार्ड दिलं, तेव्हा तो चक्क ऐकत होता. तो एक ठेंगू पगडी बांधलेला शीख आहे आणि त्या घडीला तो काहीतरी आश्चर्यजनक करतो. तो माझ्याकडे पाहून हसतो.

माझी कॅशिअर परत येते. अजूनही तिचे ओठ मिटलेले असताना, न बोलता ती मला बक्षीस देते. ते वीस पौंड आहेत. मी मान डोलावतो आणि ते खिशात टाकतो आणि जायला वळतो. मी दरवाज्याशी पोहोचण्याच्या आधीच तो शीख मला थांबवतो.

"क्षमा करा," तो म्हणतो. त्याचा आवाज मृदू आहे, त्याच्या स्वरात निव्वळ दया आहे, "तुमची ती कहाणी मी ऐकणं थांबवू शकलो नाही. मला तुम्हाला सांगावंसं वाटतं, तुम्ही ते कार्ड परत केलेत म्हणून मी एवढा प्रभावित झालोय."

या कॅशरनं मला वीस पौंड बक्षीस दिल्याचं त्यानं बहुधा पाहिलेलं नसावं. त्याला बहुधा माहीत नसावं, की त्या चोरलेल्या कार्डाचा मी काही उपयोग करू शकणार नाही. नाहीतर मी ते नक्कीच उपयोगात आणलं असतं. त्याला बहुतेक कल्पना नसावी मी गुन्हेगारी करून त्याच्यावर जगतोय. तो साधा आहे आणि त्याचा हा साधेपणा ही माझी संधी आहे.

"मी बेघर आहे," मी सांगतो, "मला खरंच काम होतं; परंतु मला नोकरवर्ग अधिक झाला, म्हणून कामावरून काढण्यात आलं. मला कुणीच मदत करू शकत नाही, माझे मित्र, माझे कुटुंबीय आणि मी जोपर्यंत माझं काही नीट मार्गी लागत नाही, तोपर्यंत असा रस्त्यावर आहे."

माझी ती भरपूर बडबड ऐकताना तो सहानुभूतीपूर्वक माना हलवत राहतो.

"तू अशा परिस्थितीत प्रामाणिक राहू शकतोस, हे कौतुकास्पद आहे. मला तुला मदत करावीशी वाटतेय."

माझं नाक हुळहुळतं आणि ते मला ड्रग घ्यायला हवंय, यासाठी नव्हे. तो आपलं कार्ड काढतो. "हे माझं नाव आणि नंबर. मला फोन कर आणि तुला काम मिळावं, म्हणून मी जमेल ती मदत करीन."

"आभारी आहे, आभारी आहे." मी म्हणतो. "मला खरंच बदलायची इच्छा आहे. मी असा रस्त्यावर फार काळ राहू शकणार नाही. ते मला रसातळाला नेतंय; परंतु मला खायला हवं आणि कामावर हजर होण्याआधी स्वत:ला स्वच्छ करायला हवं, कारण असा दिसत असताना मी कुणालाच नकोसा वाटेन."

त्याच्या चेहऱ्यावर दयेनं सुरकुत्या पडतात आणि तो आपल्या पाकिटात हात घालून माझ्या हातात वीस पौंडाची नोट ठेवतो. मी त्याचे आभार मानतो आणि आम्ही दोघंही तेथील हवा, हालचाल, धूळ आणि वासाच्या त्या बाहेरच्या जगात पाऊल टाकतो. माझी राहण्याची जागा.

"गुड लक," तो शीख म्हणतो आणि आम्ही बाजूच्या रहदारीत मिसळतो.

माझ्या आतमध्ये कुठेतरी मी त्याला असं लुबाडलं, म्हणून थोडं वाईट वाटतं; परंतु मी व्यसनी आहे आणि गेली कित्येक वर्षं ज्या कुणी मला थोडीशी दया दाखवलीय, त्याला लुबाडत आलोय, यात माझे कुटुंबीयही आहेत. त्यानं माझा मानवतेवरचा विश्वास मात्र पुन्हा परत दिलाय. निदान या सकाळी तरी; परंतु त्याच्या दयेनं नवीन काही फटी उघड केल्यात आणि त्यातून मला खालच्या रिकाम्या जागेत पाहायचं नाही. मी माझं मन तसंच माझ्या देहासारखं सदैव ड्रग्जनी बंद

ठेवायला हवं, नाहीतर धसका, रिकामपण आणि एकाकीपण माझा ताबा घेतील आणि तीच वेळ आहे. मी इंजेक्शन घ्यायला हवं, घ्यायलाच हवं, घ्यायलाच हवं आणि ती भीती थांबवायला हवी.

हेरॉईनमुळे माझी शारीरिक पीडा बंद होते आणि माझ्या काळज्याही. क्रॅकचा तो उन्माद माझ्या मनावर पूर आल्यागत घोंघावतो. त्यानंतर जेव्हा माझी नशा त्या बेफाम अवस्थेतून कमी होते आणि ती जागा भ्रमानं व्यापते. मला बेन भेटतो. तो उंच आहे, चळवळ्या आहे आणि घाणेरडा आहे. या रस्त्यावर राहणाऱ्यांच्या घाणेरडेपणाच्या पायऱ्या आहेत आणि बेनची पायरी वरती आहे. त्याचे केस तेलकट आहेत. त्याच्या कातडीवर डाग पडलेले आहेत आणि मानेवर घाणीचा थर आहे आणि एखादी शूजची जोडी चोरण्याची शक्यता असताना त्याचे पाय त्याच्या फाटक्या शूजमधून बाहेर दिसतायत. याचा अर्थ तो भिकारी असला पाहिजे. कुणीही स्वच्छ भिकाऱ्याला पैसे देणार नाही.

तो विचारी आणि मृदुभाषी आहे. इतकंच नव्हे, तर व्यवस्थित बोलणारा, एक मध्यमवर्गीय निर्वासित. बेन हा अशांपैकी एक आहे, की ज्यावर तुम्ही विश्वास ठेवून काहीही सांगू शकाल; पण तो आपली कर्मकहाणी मला सांगत नाही आणि मी विचारत नाही. डेव्हबरोबरच्या त्या पहिल्या रात्रीपासून मी कोणालाच काही विचारलेलं नाही. मला माहीत आहे, की कुणीही आपल्या आवडीनं इथे येत नाही. आम्ही सर्व मित्रहीन आहोत आणि आम्हाला हे माहीत अहे. आम्हाला वाईट वागवल्याचा किंवा मानसिक आजाराचा किंवा कोणत्यातरी प्रकारच्या मनोवेदना, यातना यांचा इतिहास आम्हा सर्वांकडे आहे. आम्हाला एकमेकांचा स्वीकार करायलाच हवा, कारण दुसरा कोणी आमचा स्वीकार करणारच नाही. प्रश्न विचारण्याची गरज नाही आणि चौकशी करणं योग्य नाही.

मी बेनशी बोलू लागतो. झोपणं किती अवघड काम आहे आणि सकाळ या किती भयानक आहेत.

तो मान हलवतो. त्याला समजतं. मला या माणसाशी सवत:ला अडकवून घ्यायचंय, त्याला पकडायचंय आणि त्याला धरून ठेवायचंय; पण हे तुम्ही रस्त्यावर करू शकत नाही. ते तुम्ही कधीच करू शकत नाही. तुम्ही तुमच्या एकाकीपणाबरोबरच राहत असता.

तो मला मॉलवरून खाली नेतो. या जागी कार्स या अगदी अदबीनं फिरत असतात आणि कुणीही हॉर्न वाजवत नाही. त्याच्या टोकाला असलेल्या बकिंगहॅम राजवाड्यावरून आम्ही जातो. त्या कठड्याशी थांबतो. एक झेंडा वर फडकत आहे. एक काळी गाडी त्या दरवाज्यातून हळूच बाहेर येते. त्यात राणी असेलही किंवा नसेलही. पर्यटक जमतात. पोलीस आम्हावर नजर ठेवतात. थोडा वेळ मी त्या इतर

लोकांतील एक झाल्यासारखं मला वाटतं. राणी ही आपल्या अफाट संपत्तीमुळे आमच्या सर्वांच्या जीवनातून वेगळी झालेली आहे आणि आम्ही सर्व बघे एकत्र आहोत. मग आम्ही तेथून हलतो.

बेन मला व्हिक्टोरिया स्टेशनच्या मागे एका पांढऱ्या गुळगुळीत इमारतीकडे घेऊन जातो. तिथे श्रीमंत लोक शेकडो वर्षांपूर्वी राहत असावेत. त्याला पॅसेज वे असं म्हणतात. आम्हाला जेवणाच्या चार टणक चार टणक खुर्च्या एकत्र घेण्याची परवानगी आहे आणि त्यावर आम्ही दुपारी दोन वाजेपर्यंत झोपू शकतो. तिथे आणखी दहा वाशेळे लोक हेच करत आहेत आणि मी घोरण्याचा आवाज घेत झोपून जातो. जेव्हा आम्हाला जागं केलं जातं आणि दोन वाजता बाहेर फेकलं जातं, मी धड चालूही शकत नाही. माझे पाय हे मांसाच्या विटा झाल्या आहेत. माझं अंग तापलं आहे आणि माझं डोकं दुखतं आहे. मला इंजेक्शन घ्यायची गरज आहे आणि त्यासाठी लागणारे पैसे जमविण्याइतका मी धड नाहीये. माझ्या अस्तित्वाला असलेली ही भीती मला घाबरवून सोडते.

बेन म्हणतो, "मित्रा चल."

जेव्हा आम्ही व्हिक्टोरिया स्टेशनकडे आणि खाली गाडीकडे जायला फेंगडत निघतो, तेव्हा मी त्याच्या अंगावर भार टाकतो. तेथील तिकीट ऑफिसच्या जागेत प्रवासी सर्व दिशेनं मुंग्यांसारखे पाहत असतात. असं नुसतं स्तब्ध उभं राहणं, हे जणू गुन्हा केल्यासारखं वाटतं. बेन त्या गडबडीत एका प्रवाशामागे जातो आणि तिच्यामागून त्या तिकीट मशिनमधून पटकन सरकतो. तिच्या हे लक्षात येत नाही, की एका तिकिटाच्या किमतीत तिनं दोघांना आत आणलंय. बेनची हालचाल, ही जलद आणि पावसाचा थेंब पडल्यागत ऐटदार आहे. बेन वळतो आणि मागे पाहतो, माझी वाट पाहत. मी घाबरलोय. मी त्या छोट्याशा रांगेत उभा राहतो. पैसे देणारे प्रवासी त्यांची तिकिटं मशिनमध्ये सारतात आणि त्यांच्यासाठी मशिनचे बाहू उघडतात. जेव्हा माझ्यापुढची स्त्री मशिनमधून बाहेर पडते मी बेनची नक्कल करून पुढे जातो. तिच्यामागे जवळजवळ तिला चिकटून, पण तिला स्पर्श न करता.

माझी हालचाल बेनसारखी ऐटदार नाही; परंतु माझा देह त्या मोकळ्या जागेतून मी अदृश्य असल्यागत जातो. माझ्यामागे ते बाहू बंद झाल्याचं मी ऐकतो. याचा अर्थ मी अदृश्य आहे, त्या ट्यूब रेल्वेवरील एक भूत आहे.

त्या दक्षिणेकडे जाणाऱ्या फ्लॅटफॉर्मवर बेन एक कप सीटखालून घेण्यासाठी वाकतो आणि जेव्हा ट्यूब ट्रेन येते, तो त्यात उडी मारतो.

"आता मी काय करतो ते बघ." तो म्हणतो.

तो पहिल्या डब्यातून चालत जातो आणि जेव्हा ट्रेन सुरू होते, तेव्हा तो मधल्या जोड दरवाजातून दुसऱ्या डब्यात जातो. ते प्रवासी आम्हाला पाहताच

हवालदिल होतात. ते ताबडतोब दुसरीकडे पाहतात. त्यांची वर्तमानपत्रं वाचतात. डब्याचा खालचा तळ लक्षपूर्वक पाहतात आणि ते खिडकीतून दिसणाऱ्या अंधाराकडे पाहतात.

बेन आमच्या मागं दरवाजा लावतो आणि आपल्या तेलकट, भुरकट केसांतून हात फिरवतो. तो मोठ्या आवाजात म्हणतो, "मी बेघर आहे. काहीतरी खाण्यासाठी आणि रात्री झोपण्याच्या व्यवस्थेसाठी मला गरज आहे. तेव्हा प्लीज, मला तुम्हाला सांगायचंय, की मला मदत करा."

तो एका छोट्या गोल माणसाकडे जातो, जो आपलं वर्तमानपत्र बेनच्या तोंडाकडे बघण्यापेक्षा वाचणं पसंत करील. जोपर्यंत तो माणूस वैतागून आपल्या खिशात हात घालून चिल्लर काढत नाही, तोपर्यंत बेन तिथे उभा राहतो. त्यानंतर बेन त्या डब्यातून फिरतो. सर्व बाजूनं लोक त्याच्या कपात पैसे टाकतात. तो तसा धिप्पाड आणि भीतिदायक आहे. तो एखाद्या आततायी माणसासारखा दिसतो आणि त्यामुळे कुणीही त्याच्याशी वाद घालणार नाही.

पुढच्या स्टेशनवर आम्ही गाडीतून उतरतो.

"बघ, आहे ना सोपं!" बेन सांगतो, "तो सुटातील माणूस, जर त्यानं आपल्या खिशात हात घातला नसता, तर कुणी काही दिलं नसतं. पहिल्याला पकडा, मग बाकीचे त्याचं अनुकरण करतील."

तो मग तेथील एका घाणेरड्या पिंपात हात घालतो आणि एक कप त्यातील कॉफीचा अंश झाडत मला देतो. ती ट्रेन आमच्या तोंडावर खालच्या हवेचा झोत एखाद्या उबदार मिठीसारखा सोडत निघून जाते. माझे पाय एवढे दुखतात, की मी त्या प्लॅटफॉर्मच्या भिंतीशी टेकून सावरतो.

बेन म्हणतो, "मी ट्रेनच्या पुढच्या बाजूनं जातो आणि मग आपण भेटू."

मला भीक मागायची नाहीये; पण मला गरज असलेले पैसे मिळवण्यासाठी दुसरा कोणताच विचार माझ्या मनात येत नाही.

ट्रेन थांबते आणि मी आत जातो. काही क्षण मी आजारी आहे, हे विसरतो, कारण या घडीला मी दुसऱ्याच तऱ्हेनं आजारी आहे. मला भीती वाटतेय. मी जोडणाऱ्या दरवाज्याजवळ जातो. जेव्हा गाडी सुरू होते, तेव्हा मी त्यातून पुढच्या डब्यात जातो आणि माझ्यामागे दरवाजा लावतो. माझा घसा साफ करतो. बरेच लोक वर माझ्याकडे पाहतात. ते तोंड फिरवण्याचा प्रयत्न करतात; पण मी त्यांना तसं करू देत नाही. इथे पन्नास तरी लोक आहेत, कदाचित शंभरही. असं वाटतं, जणू मी रॉयल अल्बर्ट हॉलमध्ये सर्व लोकांना उद्देशून बोलतोय.

मी त्या सर्वांना सांगतो, "मी बेघर आहे."

माझं हे बोलणं ऐकताना, मी जगाला माझी शरम ओरडून सांगताना माझा श्वास

थांबल्यासारखा होतो. पुढे बोलण्याआधी मी एक आवंढा गिळतो. "मी बेघर आहे. माझ्याकडे काही खायला नाही आणि कुठे जायलाही जागा नाही. मला अन्न आणि निवाऱ्याची गरज आहे. प्लीज, तुम्ही मला मदत कराल का?"

मी उभा राहून ज्याप्रमाणे बेननं केलं, त्याप्रमाणे त्यांच्याकडे पाहत असतो. हे फार अवघड आहे. मी हवं तर त्या जमिनीकडे पाहीन; पण त्यामुळे माझ्या कपात काही नाणी पडणार नाहीत. ही अधोगती, पैशाबद्दल विचारायचं, पैसे मागायचे, यात असलेली लाज, मला स्वत:चा उद्वेग आलाय; परंतु यातून मला आता जायला हवंय.

तिथे शांतता इतकी निस्तब्ध आणि दाट आहे, की ते वातावरण तुम्ही सुरीनं कापू शकाल. मी एका मुलींच्या घोळक्याकडे पाहतो. त्या माझ्या जवळच बसलेल्या आहेत. त्या अठरा वर्षांच्या आहेत आणि माझ्यामुळे त्या घाबरल्या आहेत. याआधीच या ट्यूब रेल्वेत काहीशी भीती दडलेली आहे. कुणी कुणाशी बोलत नाही, कुणी कुणाच्या डोळ्याला डोळा देत नाही आणि कुठे पाहावं, हे कुणाला कळत नाही. जेव्हा त्यांच्याशी बोलाचाली होते, तेव्हा त्यांना वाटणाऱ्या भीतीचा फायदा मी उठवतो.

त्या मुली हळूच आपली हँडबॅग उघडतात. एक पौंड, पन्नास पेन्स, वीस पेन्स कपात पडतात. मला स्वत:चा तिरस्कार वाटतो. मला वाटणारी शरम, ही शारीरिक वेदनांसारखी आहे; परंतु अचानक प्रत्येकाचे हात हलत आहेत. ते आपल्या पाकिटं, पर्सेसकडे जात आहेत. मी त्यांना व्यवस्थित पकडलंय. मी त्या डब्यातून धन्यवाद पुटपुटत पुढे जातो. माझ्या कपात एकमेकांवर पडणाऱ्या नाण्यांचा मधुर आवाज येतोय. मी मधल्या दरवाजातून जातो आणि तिथे बेन आहे. तो त्या ट्रेनमधून चालत माझ्यापर्यंत आलाय. त्याचा तो डबा मी ज्यातून आलोय, त्या डब्यासारखा स्तब्ध आहे.

ती ट्यूब रेल्वे मंदावते. स्टेशनवर येताच आम्ही दोघं प्लॅटफॉर्मवर उतरतो.

"सोपं आहे बघ." बेन म्हणतो.

"च्यायला नरक," मी म्हणतो, "च्यायला नरक." मी पुन्हा पुन्हा ते घोकतो. माझे पाय अजूनही दुखत आहेत. माझं नाक वाहातंय; पण आता मी ते सांभाळीन, कारण माझा कप पैशांनी भरलाय. एक पाटी आम्ही ब्रिस्टॉनमध्ये आहोत, असं सांगते. आम्ही पलीकडे जातो आणि कदाचित आम्ही कॅमेरावर दिसलो असू, म्हणून दरवाजे बंद होताना उत्तरेकडे जाणाऱ्या ट्रेनमध्ये उड्या मारतो. आम्ही ऑक्सफर्ड सर्कसला उतरतो आणि टॉटनहॅम कोर्ट रोडवर चालत येतो. मी जेव्हा माझ्या मगमधील पैसे मोजतो, ते अठरा पौंड भरतात. आता घासाघीस करून एखाद्या विक्रेत्याला मी अठरा पौंड देऊन प्रत्येक ड्रगची एक पुडी विकत घेऊ शकेन.

बेन मला ड्रग घेण्यासाठी खाली असलेल्या कारपार्कच्या उतरणीवर घेऊन जातो. तिथे ड्रग घेतलेले किंवा नशेतून बाहेर आलेले खूप जंकीज, त्यांचं रक्त, डबे आणि सामानासकट जाणाऱ्या कार्सपासून काही फुटांवर बसलेले आहेत. त्या कार्स न बघता माझ्या चेहऱ्याभोवती हवेत अडथळा आणीत खाली जातात.

"ते तू बघितलंस का?" मी बेनला विचारतो.

"काय?"

"जेरेमी बिडल आता कारमधून गेला."

काही कारणास्तव आम्हाला त्यामुळे हसू येतं. जेरमी बिडल हा त्याच्या शानदार कारमधून आता बाजूनं गेला. आम्ही बसतो आणि हसतो आणि मग माझ्या लक्षात येतं, की बेघर झाल्यापासून आज मी पहिल्यांदा हसतोय किंवा स्मितहास्य केलंय आणि मी दुसऱ्या कोणालाही हसताना पाहिलेलं नाही.

बेनचा मित्र जॉन येतो. तो उंच आणि गवतासारखे केस असलेला आहे आणि त्याच्या खांद्यावरून दोरात अडकवलेली गिटार आहे.

"मी तुला ओळखतो." तो म्हणतो आणि मी त्याच्याकडे टक लावून पाहतो. अचानक त्याचा सुरकुतलेला चेहरा माझ्या माहितीतील चेहऱ्याशी जुळतो.

मी मग दुसऱ्या जगाकडे वळतो आणि दुसऱ्या काळाकडे, ते जग चांगलं आहे. तो रोझीचा काळ आहे. एक प्रवाशांचा अड्डा, जिथे मी ड्रग्ज विकत असे. भांडण झाल्यावर जिथे ती माघारी यायची, मी तिला शोधायचो, सामरसेटमधील एक जागा.

"फ्रोम!" मी म्हणतो. शेतं आणि झाडं आणि कॅम्पर व्हॅनच्या मागे बसलेली, आपल्या बोटांनी सुई बोचण्याची जागा शोधत असलेली रोझी आणि बाहेर आवाज आहेत.

जॉन छद्मीपणे हसतो. ज्याला मी ड्रग्ज विकायचो, तो जॉन होता.

"मला तुझी ती कॅम्पर व्हॅन आठवते." तो म्हणतो. "ओ, ती कॅम्पर व्हॅन, हजारो पौंड्स खर्च करून नीट केलेली आणि मी अमेरिकेतून परत आल्यावर शेवटी पाव औंस हेरॉईनसाठी विकलेली."

आम्ही तिघं उतरंडीवर बोलत बसतो. व्यावसायिक लोक, प्रसिद्ध लोक आमच्या बाजूनं जात असतात. या इथे माझ्या भूतकाळातील कोणीतरी सहभागी आहे, हे विचित्र वाटतं. त्या मागच्या काळात आम्ही दोघं ड्रग्ज विकत होतो. आम्हा दोघांनाही त्याचं व्यसन लागलेलं होतं; परंतु त्या वेळी आमचं व्यसन मर्यादित होतं. त्या वेळी मी इंजेक्शन्सही घेत नव्हतो. मी धूम्रपान करायचो. ते छान दिवस होते. त्या दुसऱ्या जगातील लोक, प्रसंग, तसंच जागा याबद्दल आम्ही बोलतो आणि मला बरं वाटतं. भूतकाळ असलेला मी एक व्यक्ती आहे आणि

नुसतं भूत नाही.

मला गिन्ज बरेच वेळा भेटतो. तो इथे आहे, तिथे आहे, जिकडेतिकडे आहे. चोऱ्या करत, सौदा करत, ड्रग घेत प्रत्येक वेस्ट लंडनमधील टेलिफोन बॉक्समधून आत-बाहेर करत असतो. मला त्याच्या अंदाधुंद जीवनाचा क्रम या आधीच कळलाय. कधी कधी त्याच्याकडे गरजेपेक्षा जास्त हेरॉईन असतं, कधी अजिबात नसतं, कधी कधी ते जास्त मिळवण्यासाठी तो वेडगळ कृत्य करतो. कधी कधी त्याची ताकद संपते आणि तो खाली पडतो. ड्रग्ज मिळवण्यासाठी तो बरीच शक्ती खर्च करतो. मी इथे भेटलेल्या दुसऱ्या कोणापेक्षा जास्त प्रमाणात गिन्जसारखा आहे. मी बेनसारखा नाही, कारण मी भिकारी नाही. ज्यानं आपलं जंकी म्हणून जीवन स्थिरस्थावर केलंय, त्या डेव्हसारखा नक्कीच नाही. डेव्ह हा पिकॅडली सर्कस येथील ट्यूब स्टेशनमध्ये त्याच जागेवर भीक मागतो. तो त्याच्या नेहमीच्या गिऱ्हाइकांवर त्याच्या कपात पैसे टाकायला आणि त्याला आणि त्याच्या बुट्सला जिवंत ठेवण्यासाठी अवलंबून आहे. तो जेवण जेवतो आणि सावकाश फिरतो. तो फेऱ्या घालतो. रस्त्यावरचा एक व्यसनी म्हणून पाहिलं, तर त्याची तब्येत बऱ्यापैकी आहे आणि तो फारच दयाळू आहे. मी त्याला माझ्याजवळ जसा प्रेमानं वागला, तसा इतरांजवळ वागताना पाहतो. तिथे एक मुलगी आहे, केटी. ती सतरा वर्षांहून जास्त नसेल. ती हेरॉईन आणि क्रॅकची व्यसनी आहे. बारीक आहे आणि तिचे भुरे केस मानेपर्यंत आलेले आहेत आणि जेव्हा मी त्या रस्त्यावर तिच्याबरोबर एक-दोन दिवस हिंडलो, फिरलो, तेव्हा माझ्या लक्षात आलं, की ती पुढे मोठाड, वाईट नजरेची आणि गलबली, दात तुटकी बाई होईल; पण आता ती तरुण आणि असहाय आहे. रस्त्यावर तिला घरी मिळाली होती, तशीच वाईट वागणूक मिळालेली आहे. दयाळू डेव्ह तिची काळजी घेताना मी कधी कधी बघतो.

एका गर्दीच्या शनिवारी रात्री गिन्ज हा नेहमीप्रमाणे सोहोमध्ये वावरत आहे आणि मी त्याच्याबरोबर आहे. तो म्हणतो, की आपण एखाद्या पुरुष वेश्येला, भाड्याला पकडायचं, तो पटकन पैसे मिळवण्याचा मार्ग आहे, कारण ते पऱ्याच आहेत आणि मारामारी करत नाहीत. आम्हाला असा एक मुलगा पिकॅडलीजवळ सापडतो. एक गुटगुटीत आणि चेहऱ्यावर हताश भाव असलेला, अठरा वर्षांचा मुलगा. तो घाणेरडा आहे; पण त्यानं चांगले कपडे घातले आहेत. आम्ही त्याला कठड्याशी ढकलतो आणि त्याच्याशी हलकटपणे वागायला लागतो.

"आज रात्रीसाठी तू बरंच कमावलंयस."

"नाही, मला एकही पेनी मिळालेली नाही." तो मोठे डोळे करून आम्हाला सांगतो.

"भडव्या, तू मिळवलं आहेस. तुझे हात चड्डीत घाल."

"मला खरंच आज रात्री काही मिळालेलं नाही."

"तू थापा मारतोयस. आम्हाला थोडं दे, चल."

आम्ही त्याला अंधेऱ्या कारपार्कमध्ये खेचतो. त्याला ओढताना आणि दम देताना लोक पाहतात; परंतु कोणीही आम्हाला थांबवत नाही. जणू काही आम्ही रस्त्यावरचे लोक धोक्याचे म्हणून लाल रंगात रंगवलेले आहोत. आम्ही त्या जमावात पाहतो, आम्हाला सामान्य लोक दिसतच नाहीत. आम्हाला इतर लोक लाल रंगात दिसतात. जंकीज आणि ड्रग विक्रेते, गुन्हेगार आणि रात्री धर्मशाळेत राहणारे आणि जेव्हा सामान्य लोक या जमावातून पाहतात, त्यांना फक्त तेच एकमेक दिसतात, लाल लोक नाहीत.

"तू तुझे हात तुझ्या ढुंगणाच्या आत घाल आणि ते पैसे बाहेर काढ." आम्ही त्याला सांगतो.

तो भाड्या आता घाबरलाय आणि इस्टरसाठी चॉकलेटची अंडी ठेवण्यासाठी जी छोटी डबी वापरतात, ती ढुंगणातून काढण्यासाठी तो बसतो. ज्यानं ही डबी बनवली, ती काही या उद्देशानं नक्कीच बनवली नव्हती; परंतु त्यात खरंच एक आश्चर्य आहे, काही कोकीन आणि साठ पौंडाच्या नोटा. ते सर्व आम्ही घेतो.

"चुते, भोसडे." तो रडवेल्या स्वरात आमच्या पाठीमागे ओरडतो. आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आम्ही ते पैसे वाटून घेण्यात गर्क आहोत.

मी फारसं काही खात नाही. मला अन्नात रुचीच नाही. एवढं नक्की, की मी वास घेत स्वयंपाकघराभोवती फिरत नाही. जेव्हा स्वयंपाकघरं बंद होतात आणि उरलं-सुरलं वाटत असतात, त्या वेळी मी बहुधा नशेतच असतो, त्यामुळे ही अशी स्वयंपाकघरं ही दुसऱ्या तऱ्हेच्या बेघर लोकांसाठी आहेत. ते लोक मुख्य रस्त्यावरील दरवाजात झोपतात. कुणीतरी आपल्याकडे लक्ष द्यावं, असं त्यांना वाटतं आणि आपण अदृश्य राहावं, असं ज्यांना वाटत नाही त्यांच्यासाठी ती आहेत. कधी कधी मी चर्चमधून एखादा कप चहा घेतो किंवा कधी कधी मी सेन्सबरीज्मधून सुशी नावाचा जपानी पदार्थ चोरतो. आठवड्यातील एका रात्री स्टारबकस् त्यांच्या जुन्या बिस्किटांच्या पोतड्या बाहेर टाकतात. प्रत्येक संध्याकाळी प्रेट अ मॅगर न विकलेली सॅलड्स देऊन टाकतो. दुसऱ्या लोकांनी टाकलेल्या वस्तूंवर तिथे एखाद्या राजासारखी आपली गुजराण होते; परंतु माझं खाणं म्हणजे स्निकर्स बार्स आहेत. माझ्या हे ध्यानात आलंय, की जोपर्यंत माझ्याकडे हेरॉईन आणि क्रॅक आहे, मला आठवडाभर जगायला काही स्निकर्सपेक्षा जास्त कसली गरज नाही.

दिवस जातात. मला आठवतं, की तुरुंगात तुमचा स्वीकार होणं, हे किती महत्त्वाचं होतं. स्वीकार म्हणजे तुम्ही इथे आहात आणि तुम्ही इथे राहताय, ही जाणीव. आता मी स्वीकारासाठी प्रयत्न करतोय; परंतु रस्ता आणि तुरुंग यात एक महत्त्वाचा फरक

आहे आणि शिक्षा संपताच मी तुरुंगातून बाहेर पडणार, हे मला माहीत होतं; परंतु हे कुठे संपणार, हे मला माहीत नाही.

बीक स्ट्रीटवर वापरलेल्या रेकॉर्ड्स विकणाऱ्या दुकानांपैकी एकावरून जाताना मी थांबतो. माझ्या पहिल्या काही आठवड्यांच्या रस्त्यावरच्या अस्तित्वात काय घडलं, ते मला आठवतं. मी गिन्जबरोबर होतो आणि त्यानं या इथेच दरवाज्यातून डोकावून डीव्हीडीज विकत घेणाऱ्या सायमन नावाच्या कुणालातरी हाक मारली होती. मी वळतो, त्या रस्त्यावरून ते दुकान सापडेपर्यंत फिरतो. त्या दरवाज्यातून आत डोकावतो.

"सायमन?" मी विचारतो.

"हां?"

मी आत जातो आणि सायमनला अजूनही डीव्हीडीज हव्या आहेत का, ते विचारतो. तो मान डोलावतो.

"प्रत्येकाला सात पौंड."

जणू काही मी एक जबाबदार, टाय लावलेला आणि ऑर्डर्स लिहून घेणारा विक्रेता असल्यागत, त्याला कशात स्वारस्य आहे, त्याबद्दल चर्चा करतो; परंतु हे उघड आहे, की मी काय आणीन त्याबद्दल त्याला पर्वा नाही.

सात पौंड प्रत्येकीला! मी हा प्रयत्न आधी का नाही केला? मी मग सरळ डीव्हीडीज विकणाऱ्या दुकानाकडे जातो आणि फारशी चिकित्सा न करता त्या शेल्फवरून उचलतो. मी त्यावर असलेल्या संरक्षक कवचावरून रेझर फिरवतो, त्या माझ्या खिशात टाकतो आणि त्या दुकानातून भर्रकन बाहेर पडतो. हे अगदी हास्यास्पदरीत्या सोपं होतं. दुकानातील डीव्हीडीजची किंमत प्रत्येकी वीस ते तीस पौंड होती आणि जेव्हा मी सायमनकडे जातो, तेव्हा माझ्या बॅगेत सहा असल्याचं मला आढळतं. प्रश्न न विचारता किंवा त्या काय आहेत, हे न बघता सायमन मला सत्तर पौंड देतो. मी श्रीमंत झालोय. बँकेचं कार्ड परत करणं किंवा वेश्यांसाठी नेलपॉलिश चोरणं किंवा ट्यूब रेल्वेत भीक मागणं हे दिवसभर करून मी जे मिळवायचो, त्यापेक्षा दहा मिनिटांत मी जास्त मिळवलंय.

त्यामुळे आता माझ्यापुढे हा मार्ग आहे. आता माझा मार्ग मोकळा आहे. वेस्ट एन्ड ही डीव्हीडीज चोरीसाठी मक्का आहे. तिथे दहा सुपर स्टोअर्स हाकेच्या अंतरावर आहेत. रेकॉर्ड्स स्टोअर्सपासून सेक्सच्या दुकानापर्यंत सोहोमध्ये किती दुकानं आहेत, याची पटकन छाननी केल्यावर माझ्या लक्षात आलं, की जेवढ्या मी चोरू शकेन, तेवढ्या इथे खपल्या जातील.

आता माझं जीवन बदलतं. ट्यूब रेल्वेवर भीक मागणाऱ्या बेन आणि पिकॅडलीला भीक मागणाऱ्या डेव्हसारखं आता मलाही काम आहे. मी जगण्यासाठी डीव्हीडीज

चोरतो आणि हे काम मी एखाद्या धंदेवाइकासारखं पद्धतशीररीतीनं करतो. भिकाऱ्यासारखं मी स्वत:ला खूप घाणेरडं आणि अव्यवस्थित ठेवू शकत नाही. मला कपडे तरी चोरायला हवेत, नाहीतर उसने तरी मागायला हवेत. ज्यामुळे मी वाईटातील वाईट परिस्थितीत एखाद्या मळकट पर्यटकाइतपत तरी दिसेन. मी माझे केसही जास्त लांब आणि तेलकट ठेवू शकत नाही. मानेच्या वरच्या बाजूला मी स्वच्छ असायला हवं, ही काळजी घ्यायला हवी. मला त्या मोठ्या दुकानांतून फिरायचं, ते वेगवेगळ्या कपड्यांत आणि वेगवेगळ्या वेळी, ज्यामुळे कोणत्याही गुप्तहेराच्या लक्षात माझा तोंडावळा राहणार नाही. मी खोट्या मिश्या विकत घेण्याचाही विचार करत आहे; परंतु काही आठवड्यांतच मला या तोंडावरच्या केसांपेक्षा काहीतरी जास्त उपयोगाचं सापडतं. ऑक्सफर्ड स्ट्रीटच्या टोकाला टॉटेनकोर्ट रोडच्या जवळ एका केमिस्टच्या मागे इंजेक्शन घेत असताना मला दिसतं, की संगीताच्या मोठ्या स्टोअर्सच्या मागच्या बाजूला एक बटवडा करणारी ट्रक आली आहे. जेव्हा माझी नशा कमी होते आणि हेरॉईनमुळे मला बरं वाटत असतं आणि क्रॅकची नशा माफक असते, मी जातो आणि त्या बटवड्याकडे पाहतो. तिथे मला थांबवायला कोणी नाही. मी एका पेटीत हात घालतो आणि काही काळे टी-शर्ट बाहेर काढतो. त्या एकावर दुकानाचा छाप आहे; पण त्यावर छाप मारलेला आहे तो जादूमयी शब्दांचा. सिक्युरिटी. हे टी-शर्ट स्टोअर्समधील गुप्तहेरांसाठी आहेत.

मी त्यातले काही घेतो आणि तेथून पळतो आणि मग माझे नवे शर्ट वापरून एक युक्ती उपयोगात आणतो. मी सकाळी लवकर दुकानात जातो. या वेळी तेथील दुकानातील नोकर तेवढे दक्ष नसतात आणि तिथे गिऱ्हाईकही फारसं नसतं. मग मी माझं जॅकेट उतरवतो आणि सिक्युरिटी लिहिलेला टी-शर्ट दाखवत बाहेर येतो. मग मी वाकतो आणि माझ्या बॅगेत सामान घालतो. मी निवडत किंवा चोखंदळपणा करत नाही. मी काही एक-दोन वस्तू उचलत नाही. माझा हात त्या शेल्फवरून फिरवतो आणि पुष्कळ डीव्हीडीज माझ्या बॅगेत जातात. बहुधा कुणी माझ्याकडे बघत नाही आणि जरी त्यांनी पाहिलं, तरी त्यांना वाटतं, की मी सिक्युरिटामधला माणूस आहे. रेझरनं कापण्यापेक्षा मी माझ्या बॅगेला रुपेरी वर्खाचं लाईनिंग लावलंय, त्यामुळे मी बाहेर पडताना तेथील धोक्याची घंटी वाजत नाही आणि मी सरळ सोहोला जाऊन त्याचे पैसे घेतो. अशा तऱ्हेनं मी दिवसाला ४०० पौंडही मिळवू शकतो. अशाच दुसऱ्या संगीताच्या मोठ्या स्टोअर्सच्या बाहेर उभं राहून त्याचे सिक्युरिटी टी-शर्ट केव्हा येतील, याची वाट पाहणं फायद्याचं ठरतं आणि आता मला गरज असलेले ड्रग्ज मला परवडू लागले आहेत. सकाळ मात्र तशाच भयानक आहेत. आजारी असल्यागत, गोठल्यागत मला जाग येते. मी त्या दरवाजातून मला कसाबसा खेचत माझ्या पिस्टनना काम करायला भाग पाडत त्या पावसातून

फेंगडत चालत डीव्हीडीज चोरायला जातो, कारण त्यामुळे ड्रग्ज घेता येतील आणि मला पहिली नशा करता येईल. अर्थात, माझं हे व्यसन तसं हातात आहे. मी सर्व मर्यादित करतोय, अशी मी स्वत:ला फसवायची सुरुवात केलेली आहे. मी स्वत:ला सांगतो, की या पद्धतीनं माझं आयुष्य जास्त चांगलं चाललंय. जगणं हा सरळ सरळ हेतू आहे आणि त्यामुळे ते सर्व काही सोपं करतं. मला ड्रग्ज मिळवायला हवीत आणि घ्यायलाही. बाकी इतर गोष्टी. संबंध व्यवस्थित ठेवणं, घर शोधणं, भाडं भरणं पगारासाठी वाट पाहणं, सामाजिक जीवन जगणं हे सर्व संपलंय. ड्रग्जमुळे माझं आयुष्य गुंतागुंतीपासून मुक्त झालंय. मला एवढंच करायचंय, की पैसे मिळवायचे, की ज्यामुळे मला ड्रग्ज, लिंबूफूल, चमचा आणि मॅक्डोनाल्डमधून पाणी घेता येईल आणि ते ड्रग स्वत:च्या आत घालायचं. साधं सरळ जीवन; फक्त प्रत्येक दिवशी माझे पाय आणखी दुखतात. प्रत्येक दिवशी नशेतून बाहेर पडताना जास्त त्रास होतो, ते घेण्याआधी होणारी प्रतिक्रिया, रॅटलही जास्तच वाईट झालंय. एकटेपणाचं, अपमानाचं आणि भीतीचं भगदाड माझ्या आत जास्तच आहे आणि ते भरण्यासाठी मला जास्त जास्त ड्रगची गरज भासते.

डेव्हचं रविवारसंबंधीचं बोलणं खरं होतं. मीही लवकरच त्याचा रागराग करायला शिकतो. शनिवारला वस्तू विकत घेण्याचा आणि रात्री क्लबला जाणाऱ्यांचा जोर असतो. नंतर रविवार येतो. त्या वेळी रस्ते शांत असतात आणि मोठी स्टोअर्स चारलाच बंद होतात आणि त्यामुळे माझं पैसे गोळा करण्याचं काम चालत नाही. आम्हा सर्वांनाच रविवारी निराशा येते. डेव्हसारखा एखादाच व्यवस्थित माणूस थोडेसे पैसे बाजूला ठेवतो, की ज्यामुळे त्याला रविवारी ड्रग घेता येईल; परंतु माझ्यासारख्या बेफिकीर व्यसनीला आता जे काही आहे, ते घ्यायला लागतं, त्यामुळे जेव्हा रविवार येतो, आमच्याकडे काही नसतं. नंतर मग देवाचे आभार, सोमवार उजाडतो आणि लोक कामात दंग होतात. दुकानं उघडतात आणि मग पुन्हा अनेक पायरव वाजतात; परंतु एका सोमवारी ही लय बिघडते. हा दिवस रविवारसारखा असतो. त्याहूनही वाईट, वाईट, वाईट.

ती बँकेची सुट्टी असणार. मी निराश आहे. कसंही करून मला पैसे मिळत नाहीत आणि मला ड्रग्ज तर घ्यायलाच हवं. मी इतर व्यसनी लोकांना मला मदत करायला विनवतो. मी त्यांना नेहमीच ड्रग्ज दिलेले आहेत आणि त्यांनी माझ्यावर मेहेरबानी करायला हवी; परंतु कुणाला त्याची आठवण नाही. या उलट प्रत्येकाला वाटतं, की मीच त्यांच्या ऋणात आहे. त्यामुळे आम्ही सर्व जण दिवसभर इकडेतिकडे इतर लोक आपलं देणं आहेत, या विश्वासात फिरत असतो.

दुपारनंतर सारं असह्य होतं. डीव्हीडीज चोरायला लागल्यापासून माझं ड्रग्जचं प्रमाण सोन्याची खाण मिळाल्यागत वाढलंय आणि त्याशिवाय राहणं हे सारं भयानक

आहे. मी ड्रग्जच्या सुनामीत वाहावतोय आणि सोमवारच्या त्या बँकेच्या सुट्टीनं मला एका निर्जन बेटावर कफल्लक अवस्थेत आणून सोडलंय. मी झोपू शकत नाही, उभा राहू शकत नाही. माझ्या मनाचं आणि शरीराचं काय करायचं, हे मी समजू शकत नाही, त्यामुळे मी एरॉसजवळ शरीराची गुंडाळी करून पडून आहे. या जागी आज जराही रहदारी नाही. मी तिथे पडून रडू लागतो. नीट न बसणारे शूज घातलेले पाय माझ्याजवळून जातात मग थांबतात आणि मागे वळतात. मी वर पाहतो. तो स्टीव्ह आहे, माझा रस्त्यावरचा पहिला मित्र.

"काय झालंय?" तो विचारतो; पण काय झालंय, हे त्याला माहीत आहे आणि उत्तर देण्याएवढाही मी धड बरा नाही. तो तसा आरामात दिसतो. जणू काही त्यानं आताच ड्रग घेतलंय.

"सार्वजनिक सुट्टीची ही प्रतिक्रिया, रॅटल."

"मला ड्रग दे." मी कुजबुजतो.

तो मान हलवतो. त्याच्याकडे नाही; परंतु तो मला पायांवर उभा करतो. स्टीव्हची मिळकत ही भीक मागून आहे आणि बहुधा आता आम्ही तेच करणार आहोत. मी खूप निराश आहे, आजारी आहे आणि विरोध करण्याएवढी माझ्या अंगात ताकदही नाही.

तो मला ओढत टॉटनहॅम रोडपर्यंत नेतो. आमची प्रगती अगदी हळू आहे. मी सर्व वेळ तक्रार करत आहे, ओरडत आहे आणि वेदनेनं रडत आहे. सेंटर पॉईंटजवळ स्टीव्ह कचऱ्याच्या डब्यातून मॅक्डोनाल्डचा कप बाहेर काढतो आणि तो मला फरसबंदीवर बसायला सांगतो. मी तो कप हातात घेत नाही. ते अगदीच भिकाऱ्यासारखं वाटतं. यामुळे मी तो माझ्या शेजारी ठेवतो. स्टीव्ह वीस मीटर्स दूर जातो. मला माहीत आहे, की यशस्वीरीत्या भीक मागायची, तर लोकांचं लक्ष जायला हवं; परंतु मी हे करू शकत नाही. मला माहीत आहे, की मी त्यांच्याशी बोलायला हवं.

"अहो, थोडी देण्यासाठी चिल्लर आहे का?" मी कोणाच्याही तोंडाकडे न पाहता पुटपुटतो. त्यांना माझी शरम ऐकू जायला हवी. येथून जाणारी प्रत्येक पावलांची जोडी मला नाकारते आणि त्याचं जास्त दुःख होतं. ते मला कापत जातं. सर्वांत वाईट गोष्ट आहे ती ही, की जर मी त्या सुंदर पावलांच्या जोडगोळीवरून वर पाहिलं, तर मला सुंदर मुली दिसतात. अशा तऱ्हेच्या मुली त्यांच्याबरोबर मी एकदा जाऊ शकलो असतो. आता त्या माझ्यापासून दूर वळसा घालतात, कारण त्यांना भीती वाटते, कारण त्यांना घाण वाटते.

कुणी मला पैसे देतं. मी त्याचे आभार मानू पाहतो, पण ते शक्य नाही.

मी स्टीव्हच्या दिशेनं नजर टाकतो. मी त्याला शेवटचं पाहिलं, तेव्हापासून

तो तसाच बसलेला आहे, हललेला नाही. म्हणजे त्यानं घेतलेले ड्रग गिअर नव्हते. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेले काही भिकारीही हललेले नाहीत. ते बहुतेक औषधांचा दुरुपयोग करणारे जंकीज असावेत. ते मेथॉडीनची इंजेक्शन्स घेतात. वेस्ट एन्डला भरभराटीत असलेल्या कपटी डॉक्टरांकडून लोक मेथॉडीनच्या ट्यूब्ज विकत घेतात आणि अशा तऱ्हेचा औषधांचा दुरुपयोग करणारे हे जंकीज ते घेतल्यावर तासन्तास न हलता भीक मागू शकतात.

परंतु मला हे शक्य नाही. मी आणखी काळ स्तब्ध बसू शकत नाही. मला तासन् तास कमीपणा वाटतो, माझी अधोगती झालीय. माझी रॅटलची अवस्था एवढी वाईट झालीये, की माझा देह तापलाय आणि मी पुरे आठ पौंड मिळवलेत आणि ते विक्रेत्यांशी घासाघीस केल्यावर फक्त एक पुडीपुरते पुरेसे आहेत. मी तो मॅक्डोनाल्डचा कप फेकून देतो आणि स्टीव्हच्या बाजूनं पुढे जातो. तो मला पाहत नाही. त्यानं घेतलेल्या त्या मेथॉडीनच्या इंजेक्शनमुळे तो आरामात आहे. तो तिथे आहे, पण नाहीही.

मी ट्यूब स्टेशनमध्ये जातो. माझे पाय ठणकतात. माझी हाडं दुखतात. माझं डोकं दुखतं. माझं हृदय दुखतं, दुखतं. आता दुपार टळून गेली. जमिनीवर जिकडेतिकडे तिकिटं पडलेली आहेत. जो कोणी ही जागा नेहमी झाडतो. तो आज बँकेच्या सुट्टीचा आनंद आपल्या कुटुंबीयांबरोबर लुटतोय आणि स्टेशनवर कचऱ्याचा ढीग वाढतोय. मी खाली वाकतो आणि माझ्या प्रत्येक सांध्यातून विस्तवाच्या नद्या वाहतात आणि मी न राहवून ओरडतो. जेवढी शक्य आहेत, तेवढी तिकिटं मी गोळा करतो. त्यातील बरीचशी वापरलेली आहेत; पण काही सबंध दिवसासाठी आहेत, अशाप्रकारची तिकिटं, की ज्यामुळे तुम्ही दिवसभर निरनिराळ्या भागात स्वतंत्रपणे फिरू शकाल. प्रवाशांनी एकतर चुकीनं ती टाकलीत किंवा त्यांना त्यांचा यापुढे उपयोग नाही.

मी सरळ तिकीट ऑफिसशी जातो आणि रांगेत उभ्या असलेल्या लोकांना थांबवतो. मी खरी तिकिटं कमी किमतीला देतो आणि हातातील तिकिटं संपवायला मला तसा फार वेळ लागत नाही. अचानक मी आनंदित होतो. माझ्याकडे जवळजवळ गिअर आणि क्रॅकची पुडी घेण्याइतका पुरेसा पैसा आहे. मी लॅसेस्टर स्क्वेअरला जातो. जिकडेतिकडे तिकिटं आहेत. मी तीच युक्ती करतो. मला सिक्युरिटी कॅमेऱ्यानं चित्रित केलं असलं, तरी पर्वा नाही. मी कशाचीच पर्वा करत नाही. मला आता इंजेक्शन घेता येणार आहे आणि उद्या बँकेची सुट्टी संपणार आहे.

■

२९

मी आता लोकांना अजमावयाला शिकत आहे. असं अंतर्ज्ञान वाढवतो आहे, की त्यामुळे कोण विश्वासपात्र आहे, कोणाला व्यसनापलीकडचा मानसिक आजार आहे. कोण धोकादायक आहे, हे मला समजू शकेल. धोकादायक लोकांमुळेच मी हॉस्टेलमध्ये जात नाही. मी स्वतंत्र आणि एकाकी राहतो. गिन्जनं जेव्हा मी पहिल्यांदा रस्त्यावर आलो, तेव्हा दाखवलेले ते धोकादायक जुळे मला मुळीच आवडत नाहीत. त्यांचं नाव आहे केथ आणि माल्क. ते इतर बेघरांच्या जिवावर जगतात. ज्यानं यापूर्वी कधीच क्रॅक घेतलेलं नाही, अशा एका साध्यासुध्या आयरीश मुलाच्या विभ्रमावस्थेला खतपाणी घालून असे डोक्याचे खेळ खेळून त्यांनी त्याचा ज्वालामुखी केलेला मी पाहिला आहे. तो त्यांच्यासारखा भयानक धोकादायक आणि हिंसक बनेपर्यंत त्यांनी हे केलं. मी त्यांना इतर बेघर लोकांना दम देताना आणि त्यांचं सामान चोरताना पाहिलं आहे. ते जुळे जवळ असताना मी ड्रग्ज घेईन; पण त्यांच्याजवळ मी झोपणार नाही.

सर्व वेळ इतर लोक येतात आणि जातात. तुमची त्यांच्याशी चांगली ओळख होते. त्यांच्याबद्दल तुम्हाला बंधुत्वाची भावना वाटू लागते आणि मग ते नाहीसे होतात. अशा बातम्या पसरतात, की ते मेले. मग अचानक ते परत येतात, कारण ते फक्त तुरुंगात होते. गिन्जच्या मृत्यूच्या बातमीची फार मोठ्या प्रमाणात अतिशयोक्ती झालेली आहे. तो त्या थडग्यातून किमान तीन वेळा तरी बाहेर आलाय; परंतु लोक अनेकदा चांगल्यासाठी गेलेले असतात. कसलीतरी जास्त मात्रा, हिपॅटिटिस सी आणि एचआयव्ही हे सोडलं, तर लोक मरतात ते रस्त्यावरील हिंसाचारानं आणि उपचार न केलेल्या दुय्यम आजारानं. तुम्ही इथे मरा, नाहीतर हॉस्पिटलला जा किंवा तुरुंगात जा. कुणी घरी मात्र जात नाही. हे घर आहे.

एकदा बसस्टॉपजवळ मी गवतासारखे केस असलेला फ्रोमच्या उंच हडकुळ्या जॉनवर आपटतो. त्याची गिटार नेहमीसारखी त्याच्या खांद्यावर आपटत आहे. त्यानं

कमीत कमी तीन कोट घातलेले आहेत. जॉन वेस्ट एन्डला येतो आणि जातो. कदाचित, तो त्याच्या सामरसेटमधील प्रवासी मित्राकडे जात असेल; परंतु तो तुरुंगातही जात असेल. काही झालं, तरी तो आता इथे बसस्टॉपवर आहे. बससाठी तो वाट पाहत नाहीये, तर ड्रग्जसाठी.

"माझ्याकडे फक्त नऊ पौंड आहेत." तो त्याच्या वेस्ट कंट्री उच्चारात सांगतो. "मला ड्रग घ्यायला मदत कर, करशील?"

त्याला क्रॅक आणि हेरॉईनसाठी पुरेसे पैसे हवेत. माझ्या यशस्वी चोऱ्यांनंतर माझ्या खिशात ६० पौंड आहेत, त्यामुळे आता मी खर्च करायला तयार होतो. आम्ही कुणी विक्रेता मिळतो का ते पाहतो.

रॅथबोन स्ट्रीट, पर्सी स्ट्रीट, टॉटनहॅम कोर्ट रोड, अडेलाईन प्लेस, ग्रेट रसेल स्ट्रीट, हॅन्वे प्लेस, ऑक्सफर्ड स्ट्रीट, ग्रेट चॅपेल स्ट्रीट.

आम्हाला जो विक्रेता भेटतो, त्याच्याकडे क्रॅकच्या चार पुड्या आहेत. तो त्या सुरक्षित जागी ठेवून आहे. त्याचं तोंड, त्या दोन चिकटपट्ट्यांच्या आत ठेवलंय, त्यामुळे जर पोलीस आले आणि त्याला त्या गिळाव्या लागल्या, तर त्या पुड्या जशाच्या तशा त्याच्या पचनेंद्रियांच्या मार्गाच्या शेवटी सापडतील. तो त्या आमच्यासाठी बाहेर काढतो आणि नंतर म्हणतो, की तो जेव्हा त्या पुड्या तिथे ठेवील, तेव्हा तो परत येईल. मला तो माहीत आहे आणि मी त्याच्यावर विश्वास ठेवतो; परंतु मी आमचे पैसे घेऊन त्या विक्रेत्याला जाऊ दिलं, यावर जॉनचा विश्वास बसत नाही. तो त्रासला आहे. येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाला तो सांगतो, की मी त्याचे पैसे देऊन टाकले. हे अपमानकारक आहे आणि खरंही नाही. तो मला चेरीक्रॉस रोडवरील आर्ट कॉलेज जवळच्या टेलिफोन बॉक्समध्ये ओढतो. मी नेहमीप्रमाणे सुट्ट्या पैशांसाठी टेलिफोनची नाणी परत येण्याच्या जागेवर तपास करतो. हे माझा मित्र गिन्ज याला जणू काही आदर दाखवण्यासाठीच. मग मी त्या विक्रेत्याला फोन लावतो. मी त्याला एकदा, दोनदा फोन लावतो. हे गरजेपेक्षा जास्तच आहे; परंतु त्याला मी पुन्हा फोन करावा, असा जॉन आग्रह करतो आणि या प्रकारानंतर प्रत्येक जणच चिडतो.

आम्ही पुन्हा चालत सोहोला येतो. तिथे लुका रमत गमत फिरत असतो. तो आम्हाला व्हॅलियम देऊ करतो. हे असं काही आहे, की ते क्रॅक घेतल्यानंतर नशेतून बाहेर पडायला चांगलं आहे. मी पाच पुड्या विकत घेतो आणि धुंदी उतरण्याच्या त्या भयंकर काळासाठी त्या खिशात टाकतो. जॉनही पाच पुड्या विकत घेतो आणि नंतर तो लुकाच्या पाठोपाठ धावत जातो आणि आणखी विकत घेतो. एकंदर तो किती विकत घेतो, हे मला माहीत नाही; पण मला अशी एक भयानक भावना आहे, की त्यानं ती सर्वच घेतली असावी.

जेव्हा तो विक्रेता परत येतो, तेव्हा माझ्यावर विश्वास न ठेवल्याबद्दल आणि रस्त्यावरून जाणाऱ्या सर्व लोकांसमोर माझा अपमान केल्याबद्दल, मी जॉनला क्षमा मागायला सांगायचा प्रयत्न करतो. तो काहीतरी पुटपुटतो. ते कदाचित "सॉरी!" असावं; परंतु ते दुसरंही काही असेल, कारण व्हॅलियम घेतल्यावर तो अर्धवटच शुद्धीत आहे. मी त्याच्या अंगावर त्याच्या क्रॅक आणि हेरॉईनच्या पुड्या फेकतो. तो अडखळत माझ्या मदतीची याचना करतो. मला त्याची दया येऊन आम्ही लडखडत टॉटनहॅम कोर्टवरच्या तळघरात असलेल्या कारपार्कच्या उतारावर जातो. मला त्याला अर्धवट उचलून आणावं लागतंच आणि त्याबरोबर त्याची ती वैतागवाणी दोरीवर टांगलेली गिटारही. एवढंच नव्हे, तर मला त्याची बॅगही घ्यावी लागते.

मी चांगलाच वैतागतो, कारण मला हे कळत नाही, की जॉनच्या अधाशीपणाचे आणि मूर्खपणाचे परिणाम मी का भोगावे?

"हे चुते, हरामी व्हॅलियमपासून दूर राहू शकत नाहीत." मी कुरकुरतो. "त्यांना कदरच नाही, जराही नाही."

जेव्हा तुम्हाला क्रॅक मिळण्यासारखं असतं, तेव्हा व्हॅलियम घेणं हा मूर्खपणाच आहे. कोणत्याही मूर्खाला माहीत आहे, की तुम्ही जास्त शक्ती असलेला ड्रग कमी शक्ती असलेल्या ड्रगच्या आधी घ्यावा. त्यानंतर त्यानं इंजेक्शन घेऊ नये. त्याला मध्येच वरच्या शक्तीच्या ड्रग्जची गरज लागेल. अशा तऱ्हेनं वागणारे अनेक मूर्ख मी पाहिलेत.

जेव्हा आम्ही उतारावर जातो, जॉन खाली कोसळतो आणि त्याच्या बॅगेतील सर्व सामान रस्त्यावर पडतं. वैतागून मी ते गोळा करतो- एक वही आणि पेपराचे तुकडे, काही फोटो, पाण्याची बाटली आणि थोडं लिंबूफूल. मी त्याला क्रॅकची पुडी देतो आणि हेरॉईन गरम करतो. आता मी त्याचं सर्व काम केलंय आणि मला हुतात्मा झाल्यागत वाटतंय. तो माझा मौल्यवान वेळ फुकट घालवतोय आणि माझी गतीही कमी करतोय. मी कामात आहे, ऐटदार आहे. मी सारखा फिरत असतो. एखाद्या खुजा माणसाची काळजी घेण्याऐवजी मला माझं इंजेक्शन घ्यायचंय.

मी त्याला सांगतो,"जॉन तुला क्रॅक आधी घ्यायला हवं, त्यामुळे तू शुद्धीवर येशील, समजलं? त्या सर्व व्हॅलियमनंतर तू जोपर्यंत क्रॅक घेत नाहीस तोपर्यंत हेरॉईन घेणं भयंकर धोकादायक आहे."

बोल, स्वत:शीच बोल.

"पहिल्यांदा क्रॅक, मग हेरॉईन. ठीक आहे?"

परंतु हे त्याला माहीत हवं, चुत्या साला.

मी उतारावरून वर जातो आणि माझी ड्रग घेतो. गुंई... ते अवकाशयान एका सेकंदात चंद्रावर जातं आणि दहा आकड्यांच्या आत ते सूर्यमालिकेतून जिथे जागा अमर्याद आहे आणि जिथे सीमा नाहीत, जिथे सुरुवात नाही, अंत नाही तिथे फिरतंय. ज्या वेळी नशा उतरते, तेव्हा मी सूर्याभोवती फेरी घालत असतो. मी डोळे बंद करतो.

मी त्या अरुंद जागेवर आजूबाजूच्या लोकांचं बोलणं ऐकत आणखी वीस मिनिटं बसतो. आज काही विद्वानमंडळी न्यूक्लिअर फिजिक्सवर चर्चा करतायत. ते बुद्धिमान शिक्षित आणि मालदार लोक वाटतात. या उतारावर त्यांचं लिंबूफूल आणि सुया घेऊन काय काम चाललंय?

माझ्यासारख्या उद्योगी माणसाची पुन्हा काम करायची वेळ झालेय. मी हळूच इकडेतिकडे हिंडत पैसे मिळवण्याची संधी शोधत असतो.

पुन्हा उतारावरून खाली जातो. मला जॉनकडे पाहायचं नाहीये; पण मी ते टाळू शकत नाही. मी जिथे त्याला सोडलं, तिथेच तो आहे. प्रत्यक्षात तो हललेला नाही आणि तो आताही हलत नाहीये. त्याचे ओठ निळे पडलेत. तो संपला की काय? वापर न केलेली क्रॅकची सिरींज तिथे पडलेली आहे. चुत्या, चुत्या, चुत्या. मी एवढ्या सूचना करूनही त्यानं हेरॉईन आधी घेतलं.

पहिला विचार माझ्या मनात येतो, तो ते क्रॅक स्वत:च्या वैयक्तिक वापरासाठी उचलायचं. मग मी सरळ चालत जातो. थांबत नाही, त्याच्याकडे पाहत नाही. त्याला सरळ करून तो श्वासोच्छ्वास करतोय, की नाही हेही पाहत नाही. मी सरळ समोर बघतो आणि चालत जातो, दूर.

टॉटनहॅम कोर्ट रोड, ऑक्सफर्ड स्ट्रीट, पोलंड स्ट्रीट, बीकस्ट्रीट, वॉरविक स्ट्रीट, ग्लास हाऊस स्ट्रीट, पिकॅडली सर्कस.

मी बेनशी संधान जोडतो. जॉनबद्दल बोलत नाही. आम्ही दोघं एकत्र पॉलमॉलला येतो आणि एका उंच लाल भिंतीशी थांबतो. त्याच्या मागच्या बाजूला काही एवढं प्रेक्षणीय आहे, की त्यामुळे माझ्या मनातील जॉनचा, त्याच्या निळ्या ओठांचा आणि न वापरलेल्या सिरींजचा विचार दूर होतो.

"प्लेनची झाडं," मी बेनला सांगतो. "च्यायला, जुनी प्लेनची झाडं. मी ही एवढी मोठी कधीही पाहिलेली नाहीत."

"ते क्लिअरन्स हाऊस आहे." तो सांगतो. "राणीची आई इथे राहते." आम्ही त्या झाडांकडे पाहतो, त्या भिंतीकडे, पहारा असलेल्या त्या उंच कवाडीकडे पाहतो. आम्ही दुसऱ्या जगात डोकावतो, मग आमच्या जगात परततो.

काही दिवस, काही आठवडे मी जॉनला शोधत राहतो. मला तो दिसत नाही. मी लोकांना सहजपणे विचारतो.

"जॉनला पाहिलंत का? तो गिटारवाला? जॉन?"

"नाही,"

"नाही भाऊ."

"नाही, कदाचित तो वेस्ट कंट्रीमध्ये असेल."

तो फ्रोममध्ये, त्या हिरव्या शेतांच्या आणि प्रवाशांच्या जगात असेल, अशी मी आशा करतो. वेस्ट एन्ड वरून तो नक्कीच गेलाय. कदाचित कायमचा. मी त्याचा तो निस्तेज चेहरा, निळे ओठ विसरण्याचा प्रयत्न करतो; कधी कधी रात्री उशिरा मी एक पाय गटारात टाकत, कचऱ्याचे डबे शोधत, माझ्या त्या विभ्रमावस्थेवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करत तो तेव्हा मला आठवतं. त्या दहा हजार आवाजांना त्याबद्दल काहीतरी सांगायचं असतं. हरामी, तू त्याला ठार मारलंस, तू त्याचं इंजेक्शन तयार केलंस, तुला माहीत होतं, की कोणतं योग्य इंजेक्शन घ्यायचं. हे समजायला तो शुद्धीवर नव्हता; परंतु तू ते त्याच्यावर सोडलंस, तू दुष्ट आहेस, हरामी खुनी.

आता मी रस्त्यावर राहू लागल्याला तसा काळ झालाय. मला खरंच असं वाटतंय, की इथे कसं राहायचं, ते मी शिकलोय. माझे उद्योग हे वेडेपिसे आहेत – चोरी, दुकानातील सामान उचलणं, दमदाटीनं पैसे काढणं, थोडी विक्री करणं आणि त्याच्या पाठोपाठ येतो तो संपूर्ण शक्तिपात; परंतु माझ्या व्यसनासाठी मी पुरेसं मिळवतोय. माझे पाय इतके दुखतात, की माझे शूज आणि मोजे न काढणंच बरं. माझं शरीर हडकलंय आणि त्यावर पापुद्रे आलेत; पण तरीही मी जगतोय, यशस्वी आहे.

"मित्रा, तुला डॉक्टरांची गरज आहे." डेव्ह सांगतो. रस्त्यावरचा तो एकच दयाळू आवाज आहे. तो अजूनही माझी काळजी घेण्याचा प्रयत्न करतो. गिन्ज आणि तो जेव्हा एकत्र असतात, तेव्हा चांगले आई-बाप असल्यासारखं वाटतं.

"मी ठीक आहे, माझं ठीक चाललंय."

"हो, मग तू खूप बारीक झालायस आणि तुझे पाय आणि त्यावरचे ते पापुद्रे..."

"त्याला च्यायला वेळच नाही रे मित्रा,"

मला कशालाच वेळ नाही. जर मी रसेल स्क्वेअरला गेलो आणि रांगेत तासन्तास उभा राहिलो, तर कदाचित मी काही मदतीचे पैसे मिळवीन; पण आता मला स्वत:चंच एक स्थान आहे आणि ते मला सोडायचं नाही. माझं जगण्यासाठीचं कसब वेस्ट एन्डच्या भोवतालच्या चौरस मैलात निश्चित आहे. यासाठी प्रत्येक रस्ता, प्रत्येक दुकान आणि प्रत्येक संधी माझ्या ओळखीची आहे. मला प्रत्येक दिवशी तीनशे पौंड, कदाचित चारशे पौंड व्यसनासाठी मिळतात आणि ते मिळवण्यात

मी इतका गर्क आहे, की माझ्या जागेतून चालत जाऊन जो पैसा मी अर्ध्या तासात चोरी करून मिळवतो, त्यापेक्षा कमी असलेला तो धर्मार्थ पैसा मिळवण्यासाठी लागणारा वेळ खर्च करायला माझ्याकडे नाही.

माझ्या डीव्हीडीज चौर्यकर्मामुळे मी गोंधळाची आणि ड्रग घेण्याची नवी उंची गाठली आहे. एका सकाळी मी जागा झालो, तो ऑक्सफर्ड स्ट्रीटवर, आडवातिडवा पडलेल्या स्थितीत. मी तिथे गेल्याचं मला आठवत नाही. कदाचित, मी इतका थकलो, की पुढे जाऊ शकलो नाही. कुणीतरी माझ्यापुढे सँडविच, कॉफी आणि तीन पौंड टाकले आहेत. आभारी आहे, मित्रा. सकाळभर माझ्या देहावरून जाणारे दुकानदार आणि व्यापारी यांना असं वाटतं, की मी आळशी माणूस आहे. त्यांच्या लक्षात येत नाही, की मी कोसळलोय, कारण त्यांनी आयुष्यात जेवढं काम केलं नसेल, त्याच्याहूनही जास्त मी करतोय आणि बहुतेक जास्त कमावतोयही. काही झालं तरी मी वर्षाला एक लाख पौंड मिळवतोय, नाही जवळजवळ दोन लाख पौंड; परंतु अर्थात त्यात पेन्शन आणि आजारपणाचा भत्ता येत नाही.

मी बाकावर बसून लुकाशी बोलत आहे. त्या वेळी काहीतरी भयानक त्याच्या गरम टोपीतून आणि त्याच्या थप्प बसवलेल्या केसांवरून तोंडावर सरपटत बाहेर येतं. ते नखाच्या आकाराच्या अर्धं आहे.

मी तो रेंगाळणारा कीटक त्याच्या तोंडावरून पकडतो आणि माझ्या बोटांत धरून दाबतो. त्यातून रक्त येतं.

"ते माझं रक्त आहे." लुका आपल्या मधुर इटालियन उच्चारात सांगतो. त्याची ही उच्चारपद्धती कधी कधी विलक्षण रीतीनं मला किड्डरमिन्स्टरमधील कॅथॉलिक युथ क्लबची आठवण करून देते.

"ते काय आहे मग?" माझ्या जीन्सवरचं रक्त पुसत मी विचारतो. लुकाला संसर्ग झालेला आहे; परंतु मला एड्सबद्दल विचार करायला आता जरा उशीर झालाय.

तो माझ्याकडे आश्चर्यानं पाहतो, "हे काय आहे, ते तुला माहीत नाही?"

"पिसू?"

"ही अंगावरची ऊ आहे. आपल्या सर्वांकडेच ती आहे. तुझ्याकडेही आहे."

आणि आता माझ्या लक्षात येतं, की त्याचं बरोबर आहे. माझ्या अंगावर जिकडेतिकडे चावल्याच्या खुणा आहेत आणि जर मी नीट पाहण्याचा त्रास घेतला, तर बारीक कीटकही आहेत. ते मला चावत किंवा त्रास देत नाहीत; परंतु आता मी अंगावर उवा घेऊन राहतोय, याची मला लाज वाटते.

"माझी खात्री आहे, की ब्रॉडविक स्वच्छतागृहात कपडे बदलताना त्यांचा संसर्ग झाला." ब्रॉडविक रस्त्यावरील स्वच्छतागृह ही एकमेकांना भेटण्याची जागा आहे, जिथे मी कधी कधी कपडे धुण्यासाठी जातो, तिथे जर इतर लोक पण

कपडे धूत असतील, तर आम्ही कपडे स्टोअर्सच्या गुप्तहेरांना बनवण्यासाठी बदलत असतो.

लुका खांदे उडवतो.

"यासाठी काही तुला ब्रॉडविक स्ट्रीटला जायला नको. ती चुती ऊ आता माझ्याशेजारी बसूनही तुझ्या अंगावर येईल. तू पोलिसांना सांग, की तुला त्याचा संसर्ग आहे आणि ते तुझ्याजवळ येणार नाहीत, कुणीही नाही."

"चिलखतासारखं?"

"हो, चिलखत, जे कुणाला दिसत नाही."

हा सर्व वेळ माझ्याकडे चिलखत होतं आणि ते मला माहीतही नव्हतं आणि मी पोलिसांच्या भीतीनं जगत होतो. जेव्हा नशा उतरते, तेव्हा ते मला पछाडतात आणि विभ्रमावस्थेतही मला सतावतात. जर मी एवढा हेरॉईन आणि क्रॅकचा साठा घेऊन फिरताना सापडलो, तर तुरुंगाची शिक्षा चुकणार नाही. माझ्या सर्व अंगावर लपविण्याच्या जागा आहेत, माझ्या ढुंगणात, गुप्तेंद्रियाच्या पुढच्या टोकाच्या कातडीत, तोंडात, माझ्या घशात. जर वाईटात वाईट घडलं, तर मी तो गिळू शकेन; परंतु हेरॉईन घेतल्यामुळे संडास होणं बंद होतं, त्यामुळे ती पुडी पटकन मिळवणं म्हणजे स्वत:ला गदगद हलवून शारीरिक व्यवहार उरकणं. नाहीतर मला आठवडे न् आठवडे ती बाहेर येईपर्यंत थांबायला हवं.

लवकरच एकदा पोलीस मला मी ज्या दरवाजाजवळ झोपत होतो, तिथून हलवायचं ठरवतात. ते आपले दंडुके माझ्या तोंडावर फिरवतात आणि माझं नाव आणि जन्मतारीख विचारतात. त्यांना ही माहिती पुरवल्यावर मी त्यांना जे काही सांगतो, ते ऐकण्याची त्यांची इच्छा असणार नाही.

"माझ्या अंगावर उवा आहेत."

मग ते एकदम एक पाऊल मागे घेतात.

"एबी-डी एबी-डी," ते आपल्या रेडिओवर सांगतात. त्याचा अर्थ हवेतून येणारा रोग. पोलिसांच्या प्रतिक्रियेवरून लुका खरं सांगतोय आणि उवा या भयंकर संसर्गजन्य आहेत, हे मला समजतं. कोणत्या पोलीस ऑफिसरला त्या आपल्या घरी मुलासाठी घेऊन जाव्याशा वाटतील? हे सर्व त्याच्या कर्तव्याच्या पलीकडचं आहे. पोलीस मला तिथून हलवतात; पण ते माझी झडती घेत नाहीत.

हवा थंड होत चाललीय. जेव्हा थोडं हेरॉईन माझ्या अंगात जातं, तेव्हा मी पुरेसा उबदार होतो आणि कमीत कमी जाडा कोट वापरू शकतो, त्यामुळे दुकानातून सामान चोरणं सोपं होतं. स्टोअर्समध्ये हॅलोविन साजरा करतात आणि मग ख्रिसमसचं सर्व सामान बाहेर येतं. मला नेहमी ख्रिसमसचा राग यायचा. ममा जिहोवाची शिष्या असल्यामुळे ज्या तऱ्हेनं त्यावर अविश्वास दाखवायची, त्याचा

मला राग यायचा; परंतु ती ख्रिसमस साजरा करायची, कारण डॅडी ते तिला करायला भाग पाडायचे. लोक सणाचा उत्साह वाढवण्यासाठी मदत करतात आणि सणाच्या दिवशी तसं काहीच घडत नाही, फक्त निराशाच, याचा मला राग येतो. या वर्षी मी ख्रिसमस साजरा करणार नाही, म्हणून खुश असायला हवं; परंतु दुकानांत त्यांच्या खिडक्यांतून दिवे, त्याच्या खोट्या कलाबुती, बेगडी वस्तू आणि माना डुलवणारी स्नो व्हाईट यांची सुरुवात करतात. मला उदास वाटायला लागतं.

मला रोझीशी बोलायचंय. मला जॅकला बघायचंय. मी माझी ओळखच विसरलोय. माझं कुटुंब कदाचित ती परत मिळवून देतील. ख्रिसमस ही वेळ कुटुंबासाठी असते आणि मला माझी वेळ हवीय. मला रस्त्यावर बेघर राहायचं नाही. मला हे असं राहायचं नाही. मी काय झालोय, हे त्यांना कळायला नकोय. जेव्हा जेव्हा मी विचार करतो, मला खोल एकाकीपणा आणि असह्य दुःख जाणवतं आणि हे सर्व इतकं आहे, की ते वागवत फिरणं मला शक्य नाही. माझं कुटुंब कुठे आहे? माझा मुलगा कुठे आहे? लेक्समध्ये? वेस्ट कंट्रीजच्या त्या पुनर्वसन केंद्रात, जिथे रोझी जाण्याचा प्रयत्न करत होती?

माझा दोस्त जेव्हा चोरलेला मोबाईल माझ्याकडे देतो आणि कोणालाही आणि कुठेही फोन कर असं सांगतो, तेव्हा मी फोनकडे टक लावून पाहतो आणि तो परत देतो. माझ्याकडे फोन करण्यासारखं कोणीही नाही. फोन म्हणजे मला दुःख, कारण त्यामुळे मला एकटेपणाची जाणीव होते; परंतु या वेळी जेव्हा बेन मला तो हातात देतो, मी माझ्याजवळ नेहमी बाळगत असलेला एक कागदाचा तुकडा काढतो. तो इतका चुरगळलाय, की वाचण्याइतपतही नाही आणि ड्रग विक्रेत्यांचे नंबरही त्याभोवती लिहिलेले आहेत; परंतु मध्यभागात रोझीनं मला दिलेला शेवटचा नंबर आहे तो मी फिरवतो.

कुणीतरी उत्तर देतं. मी रोझीजवळ बोलायचंय, असं सांगतो. काही वेळ ते थांबतात आणि मग विश्वास बसणार नाही; पण ते म्हणतात, की ते रोझीला बोलावतील.

मी रिजेंट स्ट्रीटच्या कोपऱ्यावर उभा आहे. ख्रिसमसचे दिवे लागलेले आहेत. दुकानांच्या खिडक्या उजळलेल्या आहेत. आता रस्त्यावरची गर्दीही हल्ली हल्ली उत्स्फूर्तपणे वाढलीय. आज शनिवार आहे, त्यामुळे हॅमलेजमध्ये कुटुंबीयांची गर्दी आहे आणि मी रोझीशी बोलणार आहे, कदाचित जॅकशीही.

जेव्हा मी तिचा आवाज ऐकतो, तेव्हा एक हृदय पिळवटणारी जाणीव मला जाणवते.

"मी मार्क बोलतोय." मी म्हणतो. मला रडावंसं वाटतं.

मग काही वेळ खंड पडतो. ती शांतता आश्चर्य किंवा भावनेनं भरलेली असेल. जेव्हा ती बोलते, तिच्या आवाजात सावधपणा जाणवतो. "तुझं कसं चाललंय?"

"मी ठीक आहे, ठीक आहे." मी खोटं बोलतो. मला माझा आवाज असा कणखर आणि आनंदी असावा असं वाटतं; परंतु तो बारीक आहे आणि तो थरथरतोय. "मी खरं तर लंडनमध्ये आहे. इथे एक काम करतोय."

"छान,"

"जॅक कसा आहे?"

"तो खरंच छान आहे."

"रोझी तू कुठे आहेस?" ओ-ओ आणि ते एखाद्या रडण्यासारखं वाटतं. मी खोकतो. "मला विचारायचं होतं, की तू पुनर्वसन केंद्रातच आहेस ना?"

"हो मार्क आणि मी सुखी आहे. मी ड्रग्ज सोडलंय!" तिचा आवाज कणखर आहे, सुखीसुद्धा वाटतोय. "कारण सरतेशेवटी मला काहीतरी महत्त्वाचं कळलं, ते म्हणजे जिजसचं माझ्यावर प्रेम आहे आणि त्यानं माझं आयुष्य बदललंय."

च्यायला, चुत्या नरकच. मी त्या जिजसच्या बोलण्याकडे दुर्लक्षच करतो. "तर मग तू ड्रग्ज सोडलेस, पूर्णतः सर्वच्या सर्व, शंभर टक्के..."

"मला म्हणायचंय," ती पटकन जरा जास्तच पटकन म्हणते, "मला मेथॉडीन घ्यायला लागतं, एक छोटासा डोस; परंतु मी हेरॉईनमधून सुटलेय आणि मला इथे आवडतं. देवाची आता काय इच्छा आहे, हे मला आता समजतंय. तो आमची काळजी घेतोय आणि लवकरच बाळ होणार आहे."

ती कशाबद्दल म्हणतेय? ती काय म्हणाली, मला माणसांचे घोळके दिसतात, आवाज येतात आणि ही स्त्री कोणत्यातरी दुसऱ्या जगातून माझ्या कानात बाळाबद्दल बोलतेय किंवा ती बोलली का?

"मी म्हणतेय, की बाळ ख्रिसमसच्या सुमारास जन्मास येईल."

बाळ जन्मणार, ख्रिसमसच्या सुमारास.

"मार्क, तू तिथे आहेस ना?"

"कोणतं बाळ?" मी विचारतो. हा कोणत्या तऱ्हेचा प्रश्न आहे? तिला बाळ होणार आहे का? तिनं बाळ होणार आहे, असं सांगितलं होतं का? मी ही गोष्ट कशी विसरेन?

"मी वसंत ऋतूत गरोदर राहिले, तेव्हा तू आयर्लंडवरून तुझं झाडावर चढण्याचं सामान घ्यायला आलास... आठवतं?"

नाही.

"आठवतं?"

मला पार्कमध्ये फिरताना आठवतं. आम्ही बहुधा तिथे मागे तिच्या आई-वडिलांच्या घरी एकत्र आलो. तो लैंगिक संबंध तसा फारसा उत्कट नव्हता. मी इतका खलास झालेला होतो. तो नक्कीच आठवण ठेवण्यासारखा नव्हता.

रोझी सांगते, "ठीक, काही असलं, तरी मी गरोदर राहिले आणि लवकरच बाळ जन्मणार."

हे सर्व नीटपणे समजू या.

"तुला मूल होतंय आणि ते माझं आहे?"

"हो मार्क," ती शांतपणे सांगते.

"हे तू मला आधी का सांगितलं नाहीस?"

"आपण बऱ्याच दिवसांत बोललोच नाही, म्हणजे व्यवस्थित असं."

याचा अर्थ हे आता व्यवस्थित असं बोलणं आहे.

"मला यातून बाहेर पडण्यासाठी बराच विचार करावा लागला. जिजस मला कसा मदत करू शकेल, हे समजावून घ्यावं लागलं आणि मार्क, तू त्याला शरण गेलास, तर तो तुलाही मदत करू शकेल."

ही मात्र बातमी जरा जास्तच आहे. माझं माझ्या मुलावर जॅकवर प्रेम आहे आणि मी जगातील वाईटातील वाईट बाप आहे आणि आता दुसरं मूल जन्माला येत आहे आणि रोझी ड्रग्जमधून बाहेर पडलीय किंवा जवळजवळ बाहेर पडतीय. ओ आणि जिजस मला मदत करणार आहे.

"तू ठीक आहेस ना, मार्क?"

"मी तुला तिथे भेटायला येतोय."

"ते शक्य नाही. हे पुनर्वसन केंद्र आहे. तू असं काही सरळ येऊ शकत नाहीस. ते तुला परवानगी देणार नाहीत."

"मला माझ्या मुलाला भेटण्याची परवानगी आहे?"

"नाही, तुला नाही."

"मी या पुनर्वसन केंद्रात का येऊ शकत नाही? मला हे व्यसन सोडायचंय."

"हे पुनर्वसन केंद्र फक्त स्त्रियांसाठी आहे."

"जर का आया तिथे आहेत आणि मुलं त्यांच्याजवळ आहेत, तर ते बापांना घेत नाहीत का?"

"ते पुरुषांना घेतात; पण दुसऱ्या जागी, डेव्हानला नाही."

"मीही व्यसन सोडू शकेन का?"

"तुला व्यसन सोडायचंय?"

मला पुन्हा ती हृदय पिळवटून टाकणारी जाणीव होते. ती माझ्या सर्व शरीरातून हेरॉईनसारखी पसरते; परंतु ती माझ्या हातातून, खांद्यातून किंवा जांघातून सुरू होत नाही. ती माझ्या हृदयातून सुरू होते. "अर्थात, च्यायला मलाही सोडायचंय! तुला असं वाटतं का, की कुणालाही असं जगायला आवडेल?"

"असं म्हणजे कसं?"

मग मी जरा सावध होतो. "तुला माहीत आहे, मला म्हणायचंय ड्रग घेणं, सर्व काळ ड्रग घेणं."

ती मग एक नंबर देते. मी कुणाजवळ बोलावं, तेही ती मला सांगते. "जर तुला खरंच आम्हाला भेटायचंय आणि व्यसनातून बाहेर पडायचंय, तर फोन कर."

"च्यायला, मी करीन."

"जिजस तुझ्यावर प्रेम करतो, मार्क. त्याला तुझ्या जीवनात प्रवेश दे; परंतु तुला खरंच असं वाटत असेल, तरच फोन कर."

मी ते करायचं ठरवतो. जिजसचं खरंच माझ्यावर प्रेम आहे, जिहोवासारखं नव्हे. जिहोवा सारखा माझ्यावर लक्ष ठेवून आहे आणि जगाचा शेवट करण्याची योजना इतकी वर्षं आखत आहे. जिजस हा मार्कसाठी गोष्टी सोप्या करणार आहे. मी एका कठोर आवाजवाल्या बाईला फोन करतो आणि ताबडतोब मला पुनर्वसन केंद्राच्या कार्यक्रमात दाखल करण्यासाठी सांगतो. ती सांगते, की तिच्याकडे जागा नाही. मी रोझीबद्दल बोलतो आणि आम्ही एकत्र असणं आणि आम्ही दोघांनी व्यसनातून बाहेर येणं दुसऱ्या बाळाच्या दृष्टीनं किती महत्त्वाचं आहे, ते सांगतो.

"मला माहीत आहे," ती म्हणते. माझ्याशिवाय सर्वांनाच येणाऱ्या बाळाची माहिती आहे.

"मी डेव्हानला येऊ शकतो का?" मी विचारतो.

"स्त्रियांचं केंद्र डेव्हानला आहे. पुरुषांसाठी सामरसेटला आहे आणि आमच्याकडे जागा नाही."

"डेव्हान, सामरसेट हे एकमेकांच्या बाजूलाच नाहीत का?"

"ती पुरुषांच्या केंद्रापासून किती दूर आहे?" मी विचारतो.

"हे पाहा, तू तिथे राहणाऱ्यांपैकी असतास, तर तू त्यांना रविवारी भेटू शकशील." ती मला सांगते, "अर्थात, तिथे केव्हा जागा होईल, ते मला माहीत नाही."

मला जागा हवीये. मला जागेची गरज आहे. मला त्या कार्यक्रमात भाग घ्यायचाय. मी फार पूर्वी मागे सारलेलं एक दुःख अचानक परततंय. मी माझ्या कुटुंबाचा बाप होणार आहे. व्यसनमुक्त आणि स्थिर असा. रोझी त्या कुटुंबाची आई; पण व्यसनमुक्त आणि सावरलेली. आम्हाला दोन मुलं असतील आणि तीसुद्धा व्यसनमुक्त आणि स्थिर अशी आणि जिजस आमच्यावर प्रेम करील.

"ठीक आहे, मी पुढच्या आठवड्यात येईन."

ती मान हलवतेय, हे मी पाहू शकतो.

"हे पाहा, मला तुझा नंबर दे आणि शक्यता निर्माण झाली, की मी तुला

फोन करीन.''

हे अवघड आहे. मी तिला माझ्या बहिणीचा बेथनीचा नंबर देतो.

''मी पुढच्या आठवड्यात येईन.'' मी तिला सांगतो.

''पुढच्या आठवड्यात जागा होणार नाही.''

''ठीक आहे, दोन आठवड्यांनंतर. बाळ लवकरच जन्मणार आहे.''

''जागा होईल, अशी मला खात्री नाही. त्याला महिनेही लागतील. मी तुला बोलवेपर्यंत तुला वाट पाहावी लागेल.''

''परंतु मला रोझी आणि जॅकला भेटायचंय... ती गरोदर आहे.''

''हे शक्य नाही.'' ती मला सांगते आणि फोन खाली ठेवते.

मी रागानं थरथरू लागतो. रस्त्यावरून फिरत राहतो. त्या स्त्रीला तीनदा फोन करतो आणि तिसऱ्या वेळी मी तिच्या अंगावर खेकसतोही. मी लिबर्टीमधून उघडपणे, निर्लज्जपणे रागानं चोरी करतो आणि कुणीही मला थांबवत नाही. मी ड्रग्ज घेतो. इंजेक्शन घेतो आणि तरीही मी रागावलेला आहे. ही कोण व्यक्ती आहे, जी मला सांगणार, की मी रोझीला भेटू शकत नाही? हे कोण पुनर्वसन केंद्रातील लोक आहेत, ज्यांच्यावर जिजस एवढं प्रेम करतो? नंतर मी जेव्हा दरवाज्यात चोळामोळा होऊन पडतो, मी रडू लागतो. ते जर तुम्हाला बरं करू शकत असतील, तर ते पुनर्वसन केंद्रातील लोक कोण आहेत, हे महत्त्वाचं आहे का? मला वाटत नव्हतं, की यातून बरं होणं शक्य आहे; परंतु रोझीचं बोलणं इतक्या ठामपणाचं आणि व्यवस्थित, इतकं स्वच्छ आणि स्पष्ट वाटलं होतं, की यापूर्वी ते कधीच असं नव्हतं. तिचं माझ्याहून चांगलंच चाललंय. ती आपल्या आयुष्याकडे मागे वळून पाहते. मी तिचा शेवटचा मित्र होतो. जॉडी ही पण व्यसनमुक्त झालेय आणि लेक्समध्ये आता धार्मिक आयुष्य जगतेय. मी तिचाही शेवटचा मित्र होतो. मी त्यांच्या आयुष्यातून बाहेर पडल्यावर ते सर्व व्यसनमुक्त होतात. मलाही माझ्या जीवनातून बाहेर पडायचंय. मला व्यसनमुक्त व्हायचंय. मी रडरड रडतो. खूप दुःखी होऊन रडतो. जेव्हा मी डेव्हला पहिल्यांदा भेटलो, तेव्हा तोही अशाच दुःखानं विव्हळत होता आणि डेव्ह इथेच आहे.

''सर्व ठीक होईल,'' तो दयाळूपणे सांगतो. ''परंतु तुला डॉक्टरची जरुरी आहे.''

''नाही, मला नाही.''

''हे बघ मित्रा, मला तुझी काळजी वाटते. तुझ्या त्या पायांकडे कुणीतरी बघायलाच हवंय.''

आणि मग मी त्याच्याशी पहिल्यांदा सहमत होतो. पायांची ही अशी अवस्था असताना मी रोझीच्या पुनर्वसन केंद्रात जाऊ शकेन? मी कुठे राहत

होतो, हे ते ओळखतील. रोझी ओळखेल. जॅकही कदाचित ओळखेल. तो तीन वर्षांचा आहे. आपला बाप बेघर म्हणून रस्त्यावर जगत होता, हे त्याला समजू शकेल का? आणि माझ्या अंगावरच्या उवांचं काय? जर हवेतून होणारे संसर्गजन्य रोग घेऊन मी गेलो, तर ते मला घालवून देतील हे नक्की. जिजस प्रेम करतो; पण तो बहुधा अंगावरच्या उवांवर प्रेम करत नाही. मी कदाचित त्याचा संसर्ग जॅकला देईन. बाळालाही.

"ते तुझ्या अंगावरच्या उवांवरही उपाय करतील," डेव्ह सांगतो. "तेव्हा चल, मला तुला दवाखान्यात घेऊन जाऊ दे."

■

३०

सोमवारी आम्ही स्वच्छ कपडे चोरतो. रखडत डेव्हच्या मुंगीच्या चालीनं ग्रेट चॅपल स्ट्रीटवरच्या दवाखान्यात जातो. तिथे नर्स माझ्या पायांवर उपचार करते. ती ते पाण्यात बुडवते आणि त्यावर बाटल्यांतील द्रव चोळते आणि सरतेशेवटी माझे मोजे माझ्या जखमांच्या खपल्यांवरून सुटून येतात. सरतेशेवटी कित्येक महिन्यांनंतर माझे पाय उघडे होतात. ती ते आपल्या हातात हळुवारपणे फिरवते. मी घाणेरडा आहे, म्हणून नव्हे; परंतु जणू तिला मला दुखवायचं नाही. पांढरे स्वच्छ कपडे घातलेल्या स्वच्छ, गोड आणि शांत असलेल्या व्यक्तीनं या अशा तऱ्हेच्या हळुवारपणे, दयाळूपणे स्पर्श करणं मला विलक्षण वाटतं. ती कुणीतरी दुसऱ्या जगातून आल्यासारखं वाटतं. कदाचित, ती देवदूतही असावी.

"आता अंघोळ कर." ती सांगते, "उवा नाहीशा व्हाव्या, म्हणून हे काही क्रीम आहे. ते सर्व तुझ्या अंगावर चोळ, दहा मिनिटं थांब. ती धू आणि हे सर्व पुन्हा एकदा कर."

मी मान डोलावतो. शॉवर असलेल्या खोलीत जातो. आरशात पाहतो. तिथे एक नागडा माणूस माझ्याकडे रोखून पाहतोय. मी त्याला ओळखत नाही. तो इतका बारीक आहे, की त्याच्या फासळ्या दिसतात, सर्व हाडं दिसतात. त्याचं ढुंगण बारीक झालेलं आहे. त्याची कातडी पारदर्शक झालेली आहे. त्याच्या छातीवरील नसा दिसत आहेत आणि इतर ठिकाणच्या नसा भयानक सुजलेल्या आहेत, विशेषत: त्याच्या हातावरच्या. त्याची बोटं सुजलेली आहेत, त्याचे बाहू गोंदवलेले आहेत; परंतु यामुळे त्या गडद काळ्या-निळ्या पडलेल्या खुणा लपत नाहीत. त्याचा चेहरा गोरा आहे; पण त्याच्या शरीराचा इतर भाग घाणेरडा आहे आणि त्याच्या डोळ्यांभोवतीची कातडी काळी पडलीय. जणू काही तो आठवडेन् आठवडे झोपलेला नाही. त्याच्या अंगावर उवा चावल्याच्या खुणा आहेत. त्याच्या पायांवर जखमांच्या खपल्या आहेत. तो दु:खी आणि रागीट दिसतो. देवा, तो माणूस मी

कसा असू शकेन?

ज्या प्रमाणे नर्सनं सांगितलं होतं, त्याप्रमाणे मी अंघोळ करतो. पाणी माझ्या अंगावरून कातडीवरून हाडांवरून कोसळत खाली येतं. त्या पाण्याचा स्पर्श उबदार आणि उदार आहे. पाण्याच्या आवाजाशिवाय मला दुसरं काही ऐकू येत नाही.

मग माझ्या नव्या उवा नसलेल्या कपड्यांत मी त्या उबदार दवाखान्यात ती नर्स माझ्या जखमा धुऊन बांधत असताना बसतो.

"मी पुनर्वसन केंद्रात जाणार आहे," मी तिला सांगतो. "मी माझ्या मुलांच्या आईबरोबर वेस्ट कंट्रीमध्ये जाणार आहे. ती व्यसनमुक्त झालेय आणि मीही पुनर्वसन केंद्रात जागा मिळता क्षणीच जाणार आहे."

ती नर्स थांबते आणि माझ्याकडे पाहते. तिला खरा मनापासून आनंद झालेला दिसतो. "हे फारच छान," ती म्हणते.

पुढचे काही दिवस आणि आठवडे मी त्या पुनर्वसन केंद्राला फोन करतो आणि रोझीलाही आणि जेव्हा ख्रिसमस जवळ येतो, एक बाई उत्तर देते आणि मला सांगते, की रोझीला बाळ झालं.

"तो मुलगा आहे." ती सांगते. "त्याला फ्रेडी असं म्हणायचं."

तो माझा मुलगा आहे. मग त्याला काय नावानं हाक मारायची, हे ठरवण्यासाठी मी मदत करायची; पण मी ती करत नाही. मी माझ्या कुटुंबीयांबरोबर नाही, त्यामुळे अपराध आणि शरम यांनी मला जेरीस आणलंय, मी बेघर आहे.

"अर्थात," तो आवाज पटकन पुढे सांगतो, "परंतु त्याच्यावर औषधोपचार चालू आहेत, कारण आई मेथॉडीन घेत होती, त्यामुळे त्याची बाळावरही प्रतिक्रिया झालेली आहे. हॉस्पिटल ते सर्व सावरायला मदत करतंय. बाकी ते बाळ तसं व्यवस्थित आहे."

"मी त्यांना केव्हा भेटू शकेन?" मी विचारतो.

"जेव्हा पुरुषांच्या पुनर्वसन केंद्रात तुला जागा मिळेल तेव्हा." ती अशा आवाजात मला सांगते, की त्यावरून तिला माझी सर्व माहिती आहे असं दिसतं, ती फोन खाली ठेवते. माझं अभिनंदन करावं, असं काही तिला वाटलेलं दिसत नाही.

मला या फोनमुळे एक प्रकारचा धक्काच बसतो. मला एक नवीन मुलगा झालाय आणि तो कुठे आहे किंवा मी त्याला कधी भेटू शकेन, हे कुणीही मला सांगणार नाही. मला कुटुंब आहे आणि ते फार दूर दुसऱ्या जगात राहते. या ख्रिसमसची गर्दी असलेल्या रस्त्यांवर मी एकटा आणि प्रेमाला वंचित झालेला आहे. मला इंजेक्शनची गरज आहे.

ख्रिसमसच्या आधीचा अतिउत्साह इथे वेस्ट एन्डला शिगेला पोहोचलाय.

काही दिवसांतच तो ख्रिसमसचा दिवस येईल आणि मग हे सर्व थांबेल. या आधीच्या ख्रिसमसपेक्षा हा ख्रिसमस हजारो पटीनं वाईट ठरणार आहे. बँकांच्या सुट्ट्यांचा शेवट करणारी ती बँकेची सुट्टी असेल. त्या वेळी गोठवणारी थंडी असेल, दुकानं बंद असतील आणि ती बराच काळ बंद राहतील. ऑफिसेसही जानेवारीपर्यंत बंद राहतील. रहदारी कमी असेल आणि त्यामुळे नवीन वर्ष सोडलं, तर चोरी करण्याची संधी जवळजवळ नाहीच. नवीन वर्षाचा मात्र सहस्र वर्ष सोहळा होईल, तेव्हा मला एखाद्या तरी प्यायलेल्याला गुंडाळता येईल किंवा एखादी हँडबॅग चोरता येईल. तिथे पोलीस असतील, अनेक पोलीस, तेही साध्या कपड्यांतील, प्रत्येक कोपऱ्या कोपऱ्यावर.

मी फोनबूथवर जातो आणि माझ्या छोट्या बहिणीला, बेथनीला फोन करतो.

"मी मार्क बोलतोय."

"हाय मार्क!" माझा आवाज ऐकून खुश होणारी ही अशी एकच व्यक्ती आहे.

"तू ख्रिसमसला काय करतोयस?" ती विचारते.

"अं..."

"तू लंडनमध्ये आहेस का?"

"हो,"

"तू ठीक आहेस ना?"

"रोझीला बाळ झालं." मी बोलून जातो आणि मग मी तिला त्याबद्दल सांगतो. "मीही पुनर्वसन केंद्रात जागा मिळायची वाट पाहतोय." माझा आवाज मलाच हळू आणि घायकुतीला आलेला ऐकू येतो.

"तू असं कर, पुढची ट्रेन पकडून सरळ इथे ये." ती ते शांतपणे सांगते आणि माझं हृदय उचंबळून येतं. मला वाटलं होतं, की प्रत्येकाची माझ्याबद्दल वाटणारी माया आटलीय; परंतु अजून बेथनी माझ्यासाठी आहे.

मी पुन्हा सुरुवात करणार आहे. रस्त्यावरून बाहेर पडणार आहे. एका सामान्य घरात, सामान्य लोकांबरोबर राहणार आहे आणि लवकरच मी पुनर्वसन केंद्रात जाणार आहे. मग मी रोझीबरोबर एक नव्हे, तर दोन मुलांबरोबर बाहेर पडेन. या वेळी आम्ही निराळे असू आणि सर्व काही ठीक असेल.

अर्थात, यात काही अडचणी आहेत आणि त्यातील पहिली म्हणजे प्रवास. या माझ्या गरजू अवस्थेत कुठे जाणं, म्हणजे अवघडच आहे आणि म्हणूनच मी या लंडनच्या मधल्या भागात ताठरपणे चिकटून राहिलोय, कारण ड्रगचा पुरवठा जिथून होतो, तिथून दूर राहण्यामुळे वाईट समस्या निर्माण होतात.

मी ट्यूब स्टेशनवर पडलेल्या मोफत मासिकांपैकी एक चाळतो आणि त्याच्या मलपृष्ठावर असलेल्या जाहिरातीवरून एक कार विकत घेतो. माझी नवी मिनी मेट्रो

पन्नास पौंडात विकत मिळते. ती पार गंजलेली आहे आणि तिच्यावर मॉट किंवा टॅक्स नाही. माझा विमा नाही, की माझ्याकडे कार चालवण्याचा परवानाही नाही आणि मला त्याची पर्वाही नाही. मी दुकानातून वस्तू चोरण्यात गर्क आहे, त्यामुळे मी माझ्याबरोबर बेथनीच्या मुलांसाठी काही भेटवस्तू घेऊ शकेन. तसं करणं ही सर्वसाधारण गोष्ट आहे आणि मी सामान्य असणं, हे महत्त्वाचं आहे.

मी वॉरविकपर्यंत कार चालवत जातो, जेव्हा पाऊस पडतो, तेव्हा ती मिनी मेट्रो रस्त्यावरून घसरत जाते. तिची टायर गुळगुळीत झाली आहेत, हे जाणण्यासाठी मला ते बघावंही लागत नाहीत. मी थांबू शकत नाही, कारण मला तिथे लवकर पोहोचायचंय, दोन इंजेक्शन्सच्या मध्यंतरात आणि मग पोहोचायच्या जरा आधी मी इंजेक्शन घेतो, त्यामुळे ड्रग न घेतल्याच्या प्रतिक्रियेनं मी लडखडत चालणार नाही.

मी बेथनीकडे पोहोचतो, ती छोटी बॅग घेऊन, ज्यात फक्त चोरलेल्या ख्रिसमसच्या भेटवस्तू आहेत. बाकी ती रिकामी आहे. बेथनी मला प्रेमानं भेटते आणि तिची दोन मुलं त्यांचा फार काळ हरवलेला सवंगडी मिळाल्यागत माझ्याभोवती धावतात. इतकंच नव्हे, तर, बेथनीचा नवरा हासुद्धा प्रेमानं वागतो. ते अनेक छोट्या फ्लॅटनी वेढलेल्या एका छोट्या फ्लॅटमध्ये राहतायत. ते काही भर वस्तीत नाही; परंतु ते माझ्या जंकीच्या दृष्टीनं कमी पडतं. एका दृष्टिक्षेपात मला कळतं, की या ठिकाणी ड्रग घेणं शक्य नाही.

बेथनी मला धरून आत चालत जाते. ती छोटीशीच आहे; पण फारच सुंदर आहे आणि थोडी जाडीही. जेव्हा आम्ही दरवाजा लावतो, ती माझ्याकडे नीट निरखून बघते. गप्प राहते, मग ती वळते आणि मला आत नेते.

"बरं," ती आपल्या खांद्यावरून वळून पाहते. तिचा आवाज कापत असतो. ती रडतेय का? "तुझं वजन बरंच कमी झालंय; पण ख्रिसमसमध्ये ते वाढेल, अशी मी आशा करते. प्रत्येकाचं वाढतं."

बेथनी आता यापुढे जिहोवाची शिष्या नाही आणि आता ती त्याचप्रमाणे ख्रिसमस-विरोधी नाही. तिला लहान मुलं आहेत आणि ख्रिसमस झाडपण. ती सणात गुंतलीय. डॅरेन मित्रत्वानं वागतो; पण जेव्हा तो खोलीत असतो, तो माझ्याकडे टक लावून पाहत असताना मला दिसतं. मी मुलांच्या भेटवस्तू त्या ख्रिसमस झाडाखाली ठेवतो आणि त्यांच्याजवळ खेळण्याचा प्रयत्न करतो; परंतु मला हे जाणवतं, की मी सामान्यपणाला चिकटलोय, मी जास्त प्रयत्न केला, तर मी त्या कड्यावरून कोसळेन.

जेवण तयार आहे आणि आम्ही सर्व सीटवर आणि उंच खुर्च्यांवर बसतो आणि खरं अन्न आणि त्याबरोबर ताज्या भाज्या पाहून मला धक्का बसतो, कारण या पाहिल्याला मला बरेच दिवस झालेले आहेत. मी खाण्याचा प्रयत्न करतो; पण माझं

शिजवलेलं अन्न खाण्याची सवयच मोडलेय.

"तुला आवडलं नाही का?" बेथनी अस्वस्थपणे विचारते.

"ते फारच छान आहे, खरंच छान आहे." मी तिला खात्री देतो; परंतु हल्ली मी फार खात नाही आणि मग लंडनमधील त्या उंच झाडांवर चढण्यामुळे कसं मला नकोसं वाटतं आणि नंतर खायचं, तर मी पार थकतो वगैरे थापा मारतो. मी खोटं बोलायची सुरुवात करतो, मग सर्व सहज होतं. मी वेळेचं घड्याळ सहा महिने मागे नेतो आणि चाकाच्या घरात राहत असल्याचं सांगतो आणि मग लंडनच्या प्लेन झाडांबद्दल बोलतो. मी सेंट पॉल कॅथेड्रल आणि ११ डाऊनिंग स्ट्रीटवर कसं काम केलं, ते सांगतो.

"तू नक्कीच चांगलं काम करत असणार, नाहीतर ते तुला त्या झाडांवर चढू देणार नाहीत." बेथनी उत्साहात सांगते, जरा जास्तच उत्साहात. तिला माहीत आहे, की मी खोटं बोलतोय. तिनं हे याआधी ऐकलंय. डॅरेन काही बोलत नाही आणि माझ्याकडे बघत असतो. जेवल्यानंतर मला इंजेक्शनची गरज भासते. मी बाथरूममध्ये जातो आणि तिथं बराच काळ राहतो. मी क्रॅक घेत नाही, फक्त हेरॉईन. काही झालं, तरी मला सामान्य वागायला हवं आणि ही माझी शेवटची पुडी आहे. तेव्हा मला ड्रग घ्यायची गरज पडेल. मी बाहेर येतो, माझ्या जुन्या मित्रांना भेटायचंय, असं सांगतो आणि सरळ माझ्या गंजलेल्या मिनी मेट्रोमधून एम ४२ कडे ड्रग्ज शोधायला जातो.

मी बर्मिंगहॅमला जातो. जिथे मी जॉडीबरोबर सौदा करायचो त्या जागी. मला जाणवतं, की जणू काही माझं आयुष्य हे ड्रग्जचं एक विलक्षण वर्तुळ आहे. जिथे जॉडी गिऱ्हाईक पटवायची, त्याच पार्कमध्ये मी आहे; पण ते पार्क बदललंय. वेगळ्या जागा, वेगळे लोक. पुढच्या वेळी मी एम ४२ वर राहीन आणि वुल्फहॅम्टनमध्ये प्रयत्न करीन.

ख्रिसमस हे झिळमिळ्या आणि ड्रग्जमुळे अंधुक वाटतंय. मी त्या मोटार रस्त्यानं त्या घाणेरड्या, मोडक्यातोडक्या घराकडे जातो आणि मग परत माझ्या बहिणीच्या घरी सामान्य असल्यागत परततो. बेथनी आणि डॅरेनच्या लक्षात येतं, की मी सामान्य नाही. त्यांच्या घरात एक रानटी प्राणी आहे आणि त्यांना ते माहीत आहे.

ते झोपायला जाईपर्यंत मी इंजेक्शन घेण्यासाठी थांबतो; परंतु काही वेळा डॅरेन मला टेबलखाली लपलेला पकडतो. माझ्या बाहूत असलेली सुई तो पाहतो की नाही, याची मला खात्री नाही. सकाळी ते मला सोफ्यावर कपडे घालून झोपलेला पाहतात, कारण आता मी सामान्य माणसाप्रमाणे पांघरुणाखाली झोपायला असमर्थ आहे. मला कुजबूज ऐकू येते. डॅरेन बेथनीला मला जायला सांगायला विनवतो;

परंतु मी खऱ्या जगात कधीच जगत नाहीये. खरं काय घडतंय की विभ्रमावस्था आहे, तेही मला माहीत नाहीये. जेव्हा बेथनी नर्सरी शाळेसाठी जायला माझा कोट वापरते, ती आपला हात खिशात घालते आणि माझ्याकडे दुखावलेल्या, दुःखी नजरेनं पाहते, असं मला वाटतं. मी ही कल्पना तर करत नाहीये ना? नंतर मला सापडतं, की खिशात मी एक सुई टाकलेय.

त्या दरम्यान मी डॅरेनच्या तरुण नातेवाइकांना इस्टसी आणि कोक विकून पैसे मिळवतो. इतकंच नव्हे, तर मी काही योग्य मार्गानंही पैसे मिळवतो. डॅरेनचा एक चुलता मला काही झाडांची कापाकापी करायला सांगतो. तो पायंडा पायांत घातल्यावर कसं वाटतं, हे मी विसरलोय आणि घरापेक्षा उंच झाडावर कसं चढायचं, त्या खरखरीत झाडाच्या सालीचा स्पर्श करायचा आणि तेथील तो दीर्घ स्थिर वाढीचा प्रवाह बोटांना समजायचा, हेही मी विसरलोय. काही काळ जेव्हा मी झाडांच्या जगात जातो, तेव्हा सर्व काही विसरतो. मी हे जास्त करायला हवं. मला अजूनही हे आवडतं.

मी प्रत्येक दिवस, त्या जंगल कंपनीत गेल्या वर्षी काम केलं होतं तिथून राहिलेले पैसे मिळवण्यासाठी फोनवर घालवतो. ते कबूल करतात, की ते माझं काही देणं आहेत.

या मधल्या काळात बेथनी मला काही पैसे देते, त्यामुळे माझं कसंबसं चालतं. ख्रिसमस संपल्यावर रोझीचं पुनर्वसन केंद्र मला फोन करतं. त्यांच्याकडे माझ्यासाठी जागा आहे.

"आम्ही उद्या तुमची वाट पाहतोय," तुटक आवाजात सांगितलं जातं. त्यावरून असं वाटतं, की मला भेटण्यासाठी ते फारसे उत्सुक नाहीत; परंतु मला पर्वा नाही. मला खूप आनंद झालाय, आता माझी खात्री आहे, की परमेश्वर आहे.

ऑक्सफर्डवरून ममा येते. तिथे एका श्रीमंत घरी राहून ती काम करतेय. ख्रिसमसच्या त्या दिवसांत ममा आणि बेथनीमध्ये माझ्याबद्दल बरीच बोलणी झाल्याचं मला जाणवतं. आता ती इथे आहे, छोटीशी, जरा गरगरीत आणि पूर्वीसारखी. ती येण्याआधी मी इंजेक्शन घेतो. जेवढं शक्य आहे, तेवढं सामान्य दिसावं, असं मला वाटतं; पण ज्या तऱ्हेनं ती माझ्याकडे पाहते, त्यावरून मी सामान्य नाही, असंच तिचं प्रथमदर्शनी मत होतं.

"मार्क, मी तुला ओळखत नाही." ती मला सांगते. ती बेथनीकडे पाहते. तिचा चेहरा लाल झालाय आणि ती रडवेलीही झालेय. "मला नाही वाटतं, की मी तुला जरा पण ओळखते. तू जेव्हा सोळा वर्षांचा होतास, तेव्हा घर सोडलंस आणि त्यानंतर खरंच मी तुला ओळखत नाही."

मी तिच्याकडे दयेसाठी पाहतो. मी तिच्याशी खोटं बोललो आणि तिच्याकडे

चोऱ्याही केल्या आणि वाईटही वागलोय; परंतु मला आता संधी मिळालेय. मी तिला पुनर्वसन केंद्राबद्दल सांगतो. मला ब्रिस्टॉलला जायला अवघे ५० पौंड हवेत, कारण त्यांनी असं सांगितलंय, की मी कार घेऊन जाऊ शकत नाही, त्यामुळे ट्रेन खर्चासाठी मला पैसे हवेत.

ममाच्या चेहऱ्यावरचे भाव कठोर आहेत. तिनं हे सर्व आधी ऐकलेलं आहे. मला नेहमीच आणखी ५० पौंड हवे असतात. तिला असं वाटतं, की माझ्या सर्व जीवनात ५० पौंडाचीच उणीव आहे. ती निःश्वास सोडते.

"नाही मार्क, आपण दोघं बराच काळ एकमेकांना भेटलेलो नाही आणि तू माझ्याकडे पैसे मागायची सुरुवात केलीस."

मी पुन्हा मला पैसे का हवेत, ते सांगतो. मला माहीत नाही, की तिला हे कसं दाखवावं, की या वेळी फक्त एकदाच माझ्या आयुष्यात मी संपूर्ण प्रामाणिक आहे. मी गुडघ्यांवर टेकतो, भीक मागतो, विनवण्या करतो. रडू लागतो. बेथनी रडू लागते. मुलं रडू लागतात. मी इतका बापुडवाणा दिसतो, म्हणून ममा घाबरते; परंतु मी थांबत नाही. मला हे ५० पौंड पुनर्वसन केंद्रासाठी हवेत. मी घायकुतीला आलोय. तू माझी आई आहेस. प्लीज, मला पैसे दे, ज्यामुळे माझं आयुष्य बदलेल.

कदाचित, लाजेखातर ती मान्य करते. दुसऱ्या दिवशी मी निघून जातो. मी पुन्हा त्या गोड, दुःखी बेथनीला निदान मी बरा होईपर्यंत तरी नक्कीच त्रास द्यायला जाणार नाही, म्हणून मला आनंद होतो.

माझी सदसद्विवेकबुद्धी जी नेहमी आदल्या दिवशी अपघातात सापडलेल्यांसारखी सपाट आणि बेजान असते, ती मात्र मला मी बेथनीला अडचणीत आणलं, याबद्दल टोचत राहते. ट्रेनमध्ये मी ख्रिसमसच्या दिवसांत घडलेले प्रसंग आठवू लागतो; पण ते अशक्यच आहे. ती मुलं तिथे सर्व वेळ होती का? त्यांची नावं काय? डॅरेन मला काय म्हणाला? मला फक्त स्पष्ट आठवतो, तो माझ्याखाली असलेल्या त्या झाडाचा स्पर्श. त्या झाडावर मी डॅरेनच्या काकांसाठी चढलो होतो. माझ्या हातात असलेले ते जाड दोरखंड. तो जादूमयी क्षण, जेव्हा मी त्याच्या वरच्या विस्तारातून बाहेर आलो आणि ते झाड भल्या भक्कम मनोऱ्यासारखं माझ्याखाली होतं. माझ्यावर ते अचानक झिरझिरीत झालं होतं. तिथे भोवती प्रकाश होता आणि कित्येक मैल दूरवरचं दृश्य दिसत होतं.

हो, मला ते आठवतं. नाहीतर गरज होती, ती ड्रग्जची, आणखी ड्रग्जची आणि त्यापलीकडे माझं कुणाकडे आणि कशाकडे लक्ष नव्हतं. माझ्या गरजेच्या किनाऱ्याभोवती उरलेलं बाकी सर्व जग मला अंधुक वाटत होतं.

■

३१

माझ्या नव्या आयुष्याची सुरुवात ब्रिस्टॉल स्टेशनवर त्या ड्रग्ज न घेण्याच्या प्रतिक्रियेनं, रॅटलनं होते. मला एक लहान, जाडा, टक्कल असलेला माणूस शेतावरच्या ट्रकमधून भेटायला येतो. तो आम्हाला त्या शहराबाहेर, त्या मोटार रस्त्याच्या पलीकडे आणि गावातील अरुंद, अधिक अरुंद आणि खाचखळग्यांच्या अशा रस्त्यांच्या चक्रव्यूहातून घेऊन जातो. बसणारे धक्के एवढे आहेत, की मला समजत नाही, की हेरॉईन न घेतल्यामुळे होणारी ही खडखड, रॅटल आहे, की ही रस्त्यांची खडखड आहे.

शेवटी आम्ही मोकळ्या जागेच्या मध्यावर येतो आणि ओळखा काय ते, पुन्हा तो मोटार रस्ता तिथे वळण घेत जवळून जातोय. माझं मन वाईट आठवणी आणि वाईट संकेतांनी ताबडतोब भरून जातं. गेल्या वेळी मला एकटं ठेवलं होतं ते एका हिरव्या सुंदर रानात. त्या रानाचं कौतुक इतर लोक ७० मैलांच्या वेगानं जाताना कारच्या खिडकीतून करायचे. माझं आयुष्य हे मात्र अगदी निराशेनं भरलं होतं. मग मला रोझी, जॅक, नवं बाळ, फ्रेडी आठवतो आणि मी माझं जीवन कसं बदलणार, तेही आठवतं. मी ट्रकमधून बाहेर पडतो आणि त्या घरात जातो.

ते एक जुनं दगडी फार्महाऊस आहे. त्याला पाच झोपायच्या खोल्या आणि बेकरी आहे. तो टकल्या माणूस आपल्या गुलाबी गालांच्या थोराड, जाड्या बायको-बरोबर आणि आणखी स्वारस्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या आकर्षक, भुऱ्या केसांच्या आडवयाच्या मुलीबरोबर हे केंद्र चालवतो. माझं आयुष्य बदलण्याच्या त्याच्या युक्त्यांबद्दल ऐकण्यासाठी मी वाट पाहतो. माझ्या ड्रगच्या प्रतिक्रियेचं, रॅटलचं निवारण करण्यासाठी तो नक्की काय करणार, हे ऐकण्यासाठी थांबतो, कारण माझी ही प्रतिक्रिया फार वाईट आहे आणि ती आणखी वाईट होणार आहे. मी ही प्रतिक्रिया, रॅटल एवढ सोसलंय, की या विषयावरचा चालता बोलता ग्रंथ झालोय. मला माहीत आहे, की यातून बाहेर पडण्यासाठी मला पुष्कळ मदतीची गरज आहे.

शारीरिक वेदनांपेक्षा जास्त भयानक आहे मानसिक भीती. एखादा मुरब्बी व्यसनी माणूस यातून सुटलाय, असं मी कधीच ऐकलेलं नाही; परंतु माझ्यापुढे एक चकचकीत, चमकदार उदाहरण आहे ते रोझीचं. ती मेथॉडीन घेते; पण ती जवळजवळ बरी झालीय आणि ती जर हे करू शकते, तर मीही करू शकेन आणि मुलं ही माझी प्रेरणा आहेत.

पहिल्या दिवसाच्या शेवटी भ्रमनिरास होत आहे. दुसऱ्या दिवसाच्या शेवटी हा भ्रमनिरास ही छळवणूक झालेली आहे. तो जाड माणूस आणि त्याच्या गुलाबी गालांच्या बायकोकडे पुनर्वसनाच्या युक्त्या नाहीत, ज्या माझ्यासारख्यासाठी उपयोगी पडतील. मला कशी मदत करायची, ते त्यांना समजत नाही.

मला काहीसा भावनिक आधार हवाय. तो काय प्रकारचा असावा, याची मला कल्पना नाही; परंतु ते फक्त प्रार्थना करतात. प्रार्थनेची मला गरज नाहीये, कारण माझी प्रतिक्रिया, रॅटल ही नेहमीच्या वळणानं चाललंय. भगदाडं उघडी होतायत आणि त्यातून माझ्यावर रेंगतायत ती भीती आणि स्वत:विषयीचा तिरस्कार. हो, पुन्हा ते आवाज येतायत. मी त्या आवाजांना कमिटी म्हणतो आणि ती मला सांगतेय, की मी पापी आहे, गुन्हेगार आहे, वाईट वागणारा आहे. माझं संरक्षण करायला हेरॉईन नसल्यामुळे ती कमिटी माझ्या आयुष्याचं भयंकर असं सिंहावलोकन करते आणि निर्णय देते, की आरोपी हा अगदी वाईट आहे. त्या प्रतिक्रियेमुळे, रॅटलमुळे होणाऱ्या वेदनांबरोबर हे तसं जास्तच आहे.

मी बेकरीत काहीतरी काम करावं, असं त्या जाड्या माणसाला वाटतं; परंतु मी काही करू शकत नाही. मी सरळ विचारही करू शकत नाही. इतर माणसं गप्पपणे मला पाहतात. एक मित्र होतो, त्याचं नाव हिलरी आहे. ज्या नावानं त्याला आयुष्यभर चिडवलं गेलं आणि आताही. हिलरी पण सोसतोय आणि माझ्यापेक्षा काही काळ तो त्या ख्रिश्चन पुनर्वसन केंद्रात असल्यामुळे त्याला युक्त्या माहीत आहेत.

"या अशा तऱ्हेनं तू सर्व गोष्टी थांबवाव्यास, अशी त्यांनी अपेक्षा करू नये. ते हळूहळूच केलं पाहिजे." तो म्हणतो.

"मला इथे ड्रग्ज कसे मिळणार, च्यायला."

"ड्रग मिळणार नाही; पण इथे ड्रिंक आहे आणि तेही बिना परवाना दुकानात."

"आणि आपण त्या बिना परवाना दुकानात कसं पोहोचायचं?"

"सोपं आहे, आपण सॅलीला मदत करायला सांगायचं."

सॅली ही सुंदर, भुऱ्या केसांची मुलगी आहे. ती ठेंगणी, जाडी आणि तिच्या आई-वडिलांप्रमाणे गुलाबी गालांची नाही, कारण ती दत्तक घेतलेली आहे. गाढवांनी वाढवलेली एक अस्सल कुळातील मुलगी आणि काय गाढव आहेत ते! जर मला

सॅलीसारखी दिसणारी मुलगी असती, तर घायकुतीला आलेल्या, ज्यांनी हेरॉईन सोडलंय आणि आपली लालसा पुन्हा ज्यांना सापडलेय, अशा व्यसनी पुरुषांना मी नक्कीच घरात थारा दिला नसता.

हिलरी आणि मी त्या सुंदर सॅलीचं मन आम्हाला मोठी व्होडक्याची बाटली देण्यासाठी वळवतो आणि ती आणते. आम्हाला मग थोडं व्हॅलियम आणि टेम्याझपॅमही मिळतं. हे सोपं आहे. एक नवीन मुलगा वेल्सवरून येतो आणि आम्ही त्याला गुलाबी गालवाली दरवाज्यापर्यंत यायच्या आधी भेटतो आणि व्यसनमुक्तीच्या औषधी गोळ्यांचा साठा सुरक्षित आणि गुप्त जागी ठेवायची तयारी दाखवतो. अर्थात, ते आम्ही स्वत:च घेतो.

त्या रात्रीचं जेवण हे शांतपणे होतं. आम्ही व्होडका घेतलंय, ते औषधी ड्रग्जही घेतलेत. त्या वेल्स मुलानं काय घडलंय, ते ओळखलंय. त्याच्या जेव्हा हे लक्षात आलं, तेव्हा त्याच्या डोळ्यांतील दु:ख पाहून मला वाईट वाटतं; परंतु आता त्याला राग येऊन तो विचार करत गप्प आहे. गॅरेथ एक पाद्री यांचं त्या ख्रिश्चन जागेवर साम्राज्य आहे. ते आपल्या मोठ्या ४:४ गाडीतून आमच्याबरोबर जेवणासाठी आलेले आहेत. हिलरी आणि मी कुस्करलेल्या बटाट्यांत नाक खुपसून काम करत बसलोय.

"काय झालंय काय?" मिसेस गुलाबी गाल विचारते. "मी कधीही ही मुलं इतकी शांत पाहिलेली नाहीत."

ते पाद्री जणू काही काय घडलंय, याचा त्यांना अंदाज असल्यागत बघतात. कसंही असलं, तरी त्यांनी चांगली बातमी आणलेय. उद्या डेव्हान इथे विशेष चर्च सर्व्हिस होणार आहे. हजार वर्षं होण्यापूर्वीची सर्व्हिस आणि ती होणार आहे जिथे स्त्रिया राहतात त्या डेव्हानमध्ये. माझ्या त्या ड्रगच्या धुंदीत मला अंधुकसं जाणवतं, की मी उद्या चर्चमध्ये रोझी, जॅक आणि आमच्या नव्या बाळाला पाहीन. देवाचेच आभार. मी ते वेल्श व्हॅलियम त्या प्रसंगातून जाण्यासाठी ठेवलं.

मी चर्चशी येतो, ते शंभर वर्षांचा म्हातारा झाल्यासारखा. जेव्हा जेव्हा मी त्या पिस्टनना काम करायला भाग पाडतो, तेव्हा माझ्या देहाचे वेदनेनं तुकडे तुकडे होतात. कोणी पाहत नाही, असं पाहून मी थोडं व्हॅलियम गिळतो; पण तरीही वाटतं, की काही लोक माझ्याकडे सर्व वेळ पाहतायत. ही विभ्रमावस्था आहे, की मी खरंच लोकांच्या उत्सुकतेचं कारण आहे?

डेव्हान जागेचा मुख्य मी जेव्हा पाहत नाही, असं त्याला वाटतं, तेव्हा माझ्याकडे टक लावून पाहतो. या सभेला आलेल्या स्थानिक सभासद, या बहुतेक लांब नाकाच्या मध्यमवयीन स्त्रिया आहेत. त्यांना पाहून मला ममाची मैत्रीण मॉरीन आठवते. त्यांचे नवरे जरा विचित्रच वाटतात. ते या सर्व्हिससाठी अगदी झकपक पोशाख करून

आलेले आहेत. ४:४ कार चालवणारा पाद्री गॅरेथ इथे आहे. मिस्टर आणि मिसेस गुलाबी गाल आणि सॅलीपण इथे आहे. मग पुनर्वसन केंद्रातील स्त्रिया येतात.

मी हिलरीबरोबर मागे बसलोय आणि रोझीनं मला पाहण्याआधी मी तिला पाहतो. ती आत चालत येते. मागे जॅक आहे आणि तिच्या हातात एक छोटं गाठोडं आहे. अचानक इतर सर्व अस्पष्ट, जुनं आणि एकरंगी चित्रासारखं होतं आणि उंच, सडपातळ, लांब छोटे केस असलेली, तिच्या चेहऱ्यावर कणखरपणा आहे आणि जिचे कपडे वाऱ्यानं हलतायत अशी रोझी मात्र सुंदर, बहुरंगीत आहे. ती मला पाहते आणि मग स्मितहास्य उमटतं. मग ती पटकन नजर फिरवते आणि आपल्या जागेवर इतर स्त्रियांबरोबर जाऊन बसते. जॅक तिच्यापाठोपाठ येत आहे. तीन नाही जवळजवळ चार वर्षांचा. तो ऐटीत चालतो. त्याचा चेहरा गंभीर आहे. तो मला इकडेतिकडे शोधतोय आणि कसं का होईना, पण माझ्या केंद्रित झालेल्या नजरेमुळे त्याचे डोळे माझ्या डोळ्यांना भिडतात आणि क्षणभर भेट होते. त्याची चाल अडखळते. त्यानं माझ्याकडं पळत यावं, हेच मला जास्तीत जास्त हवंय. माझा पुत्र माझा स्वत:चा मुलगा, आता उंच झालेला, सडपातळ. तो मोठेपणी एक दिवस कसा दिसेल, त्याची चुणूक त्यात आहे. मी हसतो, तोंड फाकवून. इतकं तोंड फाकवतो, की जणू काही त्याचे तुकडे पडतायत. जे स्नायू मी कित्येक महिन्यांत कदाचित वर्षांत वापरले नव्हते, ते मी वापरत आहे. मी माझ्या मुलाकडे पाहतो आणि हसतो.

जॅक माझ्याकडे येत नाही. तो माझ्याकडे पाहून हास्याची परतफेडही करत नाही. तो क्षणभर टक लावून पाहतो आणि त्याची शोधक शहाणी नजर मला घाबरवते. त्यांनी त्याला माझ्याबद्दल काय सांगितलंय? मग तो त्या रोझीमागच्या खुर्च्यांच्या रांगेमधून जातो आणि तिच्या बाजूच्या खुर्चीवर बसतो. माझी नजर त्याचा पाठलाग करते. अर्धं चर्च माझ्याकडे पाहतंय, याची मला जाणीव आहे. त्यांना माहीत आहे, त्या सर्वांना सर्व माहीत आहे. मला त्याचा राग येतो.

प्रार्थनेला सुरुवात होते. तिथे डफ आहे, गिटार आहेत. तिथे छोटा वाद्यवृंद आहे आणि गाणारे आहेत. त्यापैकी एक सॅली आहे. पाद्री सुरुवात अगदी हळुवारपणे करतात; परंतु लवकरच ते चौफेर हातवारे करू लागतात आणि ओरडू लागतात आणि ती सभाही तेच करते. या सभेच्या मानानं जिहोवाचा शिष्यगण रॅपिस्ट साधू असल्यागत वाटतो. तिथे आणखी गायन चालतं आणि जिकडेतिकडे हवेत हात उडतात. मी रोझीकडे पाहतो, तिनं काळजीपूर्वक हातातील छोट्या बाळाचं गाठोडं खाली आपल्या बाजूला ठेवलंय आणि तिचेही हात वर आहेत. तिचे हात वर देवाकडे पोहोचतायत आणि त्या संगीताच्या तालावर ती डुलतेय. आम्ही जायचो, त्या रेव्ह पार्टीपेक्षा हे खूप वेगळं आहे. जॅक बऱ्याचदा मला बघण्यासाठी

मागे वळतो. मी त्याच्याकडे पाहून नेहमीच हसतो; पण तो हास्याची परतफेड करत नाही. तो माझे हात वर जातायत की नाही, हे पाहतोय का? माझे हात वर गेलेले नाहीत.

ते पाद्री त्या रांगेतून फिरतात आणि लोक त्यांच्याशी परकीय भाषेतून बोलतात किंवा बोलतही नाहीत. काही भक्तांना भोवळ येते. मधूनच लोकांचा जथा एका माणसाभोवती जमतो आणि मोठ्यानं धार्मिक शब्द उच्चारतो. मी माझं डोकं ढोपरात खुपसतो. माझ्या शरीराला वेदना होत असतात आणि ते थरथरत असतं. धार्मिक भावनेचा पूर माझ्याभोवती गरगरतोय आणि मला वाटतं, या चुत्या लोकांत मी कसा काय येऊन पोहोचलो? आणि रोझी त्यांच्यापैकी एक का आहे?

ती प्रार्थना चालतच राहते आणि ज्या वेळी ती संपते, तोपर्यंत मी ड्रग न घेतलेल्याच्या प्रतिक्रियेच्या शारीरिक आणि मानसिक वेदनेमुळे जवळजवळ बेशुद्ध झालो आहे. हिलरी मला वर उचलून धरण्यासाठी आपले हात माझ्या हाताखाली घालतो. त्या चर्चमधून मी सर्वांच्या मागून बाहेर पडू शकतो, ते रोझी, जॅक आणि ते बाळ मला भेटू शकतील, या बळावर. हिलरी आणि मी बाहेर धूम्रपान करत उभे राहतो आणि मग आम्ही हॉलमध्ये जातो. त्या हॉलमध्ये मोठी गोल टेबलं आहेत आणि एका भिंतीजवळ जेवण देण्याचे काही कट्टे आहेत. रोझी तेथील एका टेबलजवळ बसलेय. तिच्याभोवती चर्चमधील बायका आहेत. मला बुजल्यासारखं वाटतं. मी तिच्याजवळ जातो आणि ताबडतोब तिच्याभोवतालच्या बायका गप्प होतात. त्या माझ्याकडे रागानं पाहतात. याचा अर्थ मी किती पापी आणि वाईट वागणारा आहे, हे त्यांना माहीत आहे.

"हॅलो, रोझी." मी म्हणतो.

"हॅलो, मार्क."

जॅक तिच्या बाजूला अगदी ठामपणे उभा आहे. जेव्हा मी त्याच्याशी बोलतो, तो काही प्रत्युतर करत नाही आणि जेव्हा मी त्याला मिठी मारतो, तेव्हा तो तसाच ताठ राहतो. त्याला बहुधा सांगितलं गेलं असावं, की त्याचा बाप हा फार वाईट आहे.

"तू कशी आहेस?" मी रोझीला विचारतो.

"माझं ठीक चाललंय. ज्या वेळेपासून मी जिजसवर विश्वास ठेवायला लागले, तेव्हापासून माझ्या बाबतीत सर्व गोष्टी ठीक चालल्यात."

तिच्या आजूबाजूला असलेल्या बहिरी ससाण्यासारखे डोळे असलेल्या त्या स्त्रिया सामूहिकरीत्या माना डोलावतात. मी रोझीच्या हातातील त्या लहानग्याकडे पाहतो आणि माझं मन द्रवतं. मी त्याचा छोटा हात हातात घेतो आणि तो त्याची बोटं माझ्या बोटांभोवती गुंफतो.

"फ्रेडी," मी हळुवारपणे म्हणतो, "हॅलो फ्रेडी,"

मला त्याला हातात घ्यायचंय आणि रोझीला हे समजतं आणि ती म्हातारी बाई त्याला माझ्या हातात देताना एक जोरात श्वास आत घेते. फ्रेडी आपले मोठे डोळे उघडतो आणि माझ्याकडे पाहतो. माझं मेथॉडीन बाळ. मी त्याला धरतो आणि त्याच्या डोळ्यांची उघडमीट होते. मला पुन्हा एकदा नवीन मूल झाल्याचा आनंद मिळतो. नवीन शक्यतांचा आनंद, नवीन सुरुवात आणि दुसरं, वेगळं जीवन.

मी त्याला अलगद हलवतो आणि तो डोळे बंद करतो. मी त्याला घेऊन चालण्याची सुरुवात करतो आणि त्या टेबलभोवती तणाव निर्माण होतो. जणू काही त्या म्हाताऱ्यांना त्याला परत खेचून घ्यायचंय. मला हजार वर्षांपूर्वी घडलेलं आठवतं. जेव्हा बेथनी नवीन जन्मलेलं बाळ होती आणि मी तिला हातात घेतलं, तेव्हा ती सुईण, ममा आणि कदाचित कुटुंबातील सर्वच जणांनी झटकन उठून बेथनीला परत घेतलं होतं. प्रत्येकाला त्या वेळीही मी किती वाईट आहे, हे माहीत होतं; परंतु बेथनीला मला काही इजा पोहोचवायची नव्हती आणि काही इजा केलेलीही नव्हती. फ्रेडीच्या बाबतीत म्हणायचं, तर मी त्याच्यावर प्रेम करतो, शुद्ध आणि साधं. फ्रेडी झोपी जातो आणि सरतेशेवटी मी त्याला रोझीकडे देतो. मी खुर्ची ओढतो आणि आम्ही बाळाच्या जन्माविषयी बोलतो. या वेळी सिझेरियन करावं लागलं नव्हतं; परंतु अनेक डोळे आमच्याकडे निरखून पाहतायत आणि अनेक कान आमचा प्रत्येक शब्द बारकाईनं ऐकतायत. मला अस्वस्थ वाटतं. कुणीतरी त्या ओट्यावरून रोझीसाठी जेवण आणतं. त्यांच्या टेबलवरील सर्व जण जेवू लागतात. मी काही जेवण घेतलेलं नाही. मला नकोयही. रोझी मला थोडं जेवण घ्यायला सांगते; परंतु तिच्याबरोबर खाणं मला अवघड वाटतं. मला जनता जनार्दनात बसून खायला आवडत नाही. बेथनीच्या घरीही ते अवघड होतं आणि त्या फार्महाऊस-वरही ते अवघड आहे. काही झालं, तरी गेले काही महिने मी कचऱ्याच्या डब्यातील तुकडे खात होतो.

हिलरी मला खूण करतो, की त्यानं माझ्यासाठी काही अन्न आणलंय आणि मी जरा दूर बसून खाण्याचा प्रयत्न करतो आणि जेव्हा लोकांचं जेवण संपत आलंय, असं वाटतं, मी पुन्हा माझ्या कुटुंबीयांकडे जातो आणि काहीसं अवघडत मी आणलेल्या भेटवस्तू देतो. त्या वस्तू जरा आपटल्या गेल्या आहेत; पण जॅकचा चेहरा उजळून निघतो आणि पहिल्यांदा तो माझ्याकडे बघून हसतो. जॅक जेव्हा आपल्या चाच्यांच्या जहाजावरचे कागद काढत असतो, तेव्हा तेथील म्हाताऱ्या स्त्रिया चूपचाप बघत असतात. मला वाटतं, की जॅकला ते आवडतं. तो त्याच्याबरोबर खेळू लागतो. आता तो माझ्याकडे तेवढ्या थंड वृत्तीनं पाहत नाही; परंतु तो मला त्याच्यात मिसळूही देत नाही. जेव्हा मी काही मुलं बाहेर फुटबॉल खेळताना पाहतो,

तो माझ्याबरोबर यायचं कबूल करतो. अशा तऱ्हेनं तिऱ्हाइतांच्या मुलांच्या घोळक्यात अनेक संशयी नजरा लगलेल्या असताना मी माझ्या मुलाबरोबर फुटबॉल खेळतो. माझी हाडं दुखत असतात. माझं डोकं ठणकत असतं. वेदना माझ्या देहातून आणि आत्म्यातून धडधडत असतात. हे भयानक आहे, हे पुनर्मिलन हे शब्दांपलीकडे लाजिरवाणं आहे.

जॅक माझ्याशी फारसा बोलत नाही. काही वेळा तो माझ्याकडे निरखून पाहतो आणि तेही मी पाहत नाही, असं वाटत असताना. माझ्या डॅडीनं मला घ्यावं असं वाटायचं, तसं मला त्याला मिठीत घ्यावंसं वाटतंय; परंतु जॅक हा जरा जास्तच सावध आहे. आम्ही परत रोझीकडे जातो. आम्ही इकडचं तिकडचं काहीबाही बोलतो. ती मदत करते; पण फारशी नाही. जॅक माझ्याकडे मोठ्या माणसासारखा जाणीवपूर्वक पाहतो. तो आताच तरुण मुलगा आहे आणि इतर लोकांसारखा आहे. त्याचा त्या आयुष्यावर आणि आपल्या आईच्या आयुष्यावरही ताबा आहे आणि त्याला माहीत आहे, की त्याचा डॅडी आजारी आहे आणि आजारी माणसांना मदतीची जरुरी लागते. चायला, पण तो अवघा तीन वर्षांचा आहे आणि तो एखाद्या मोठ्या माणसासारखा झालाय. मला रडावंसं वाटतं. मला तो लहान मुलगा असल्यागत आक्रोश करील, तसं करावंसं वाटतं.

दुपारी पुन्हा एकदा प्रार्थना आहे आणि ती पहिल्या इतकीच वाईट आहे. कदाचित पहिल्यापेक्षाही जास्त वेड्यासारखी. मी तो काळ माझं डोकं माझ्या पायांत घालून घालवतो. मी माझी शेवटची व्हॅलियमही घेतो. त्यानंतर आम्ही सरळ परत जात नाही. ते मला सांगतात, की रोझीच्या पाद्रीजवळ मला भेट घ्यायची आहे. मला वाटतं, की याचा अर्थ मला काही काळ माझ्या कुटुंबीयांबरोबर एकटं राहता येईल; परंतु नाही. जॅक तिथे नाही. बाळ दूध पितं आणि झोपी जातं. रोझी टेबलशी तिचा पाद्री अंथोनी याच्या समोर बसलेली आहे. मला खोलीत नेण्यात येतं आणि ते हेडमास्तरचं ऑफीस असल्यागत वाटतं.

अंथोनी बोलू लागतो.

"आपण इथे आहोत, ते तुझ्या आणि तुझ्या कुटुंबीयांबद्दलच्या बेतांची चर्चा करण्यासाठी. रोझी ख्रिश्चन झालेय आणि आता तूही पुनर्वसन केंद्रात दाखल झालायस, त्यामुळे आम्हाला तूही त्या तऱ्हेच्या सुधारण्याची इच्छा करावीस यासाठी तुला प्रोत्साहन देण्याची आमची इच्छा आहे. तुला रोझी आणि दोन मुलांचं संगोपन करायचं आहे, त्यामुळे काम शोधणं, ही तुझी सर्वप्रथमची निकड असेल."

कमिटीनं माझ्या डोक्यातून बाहेर पाऊल टाकलंय आणि ती माझ्यासमोर रांगेत उभी आहे. सुरुवातीला मी अगदी मवाळ आहे आणि झाडांचा डॉक्टर असल्याचं पुटपुटतो आणि पुन्हा मला कुटुंबीयांत यायचंय वगैरे; पण जेव्हा माझा देह एका

दुःखाच्या शिखरावर पोहोचतो, तेव्हा एक संतापलेला राक्षस माझ्यातून बाहेर पडतो.

मी उडी मारून उभा राहतो.

"तू साल्या कोण आहेस?" मी ओरडतो. "तुला तू कोण आहेस असं वाटतं? तुझं रोझीवर असं काय नियंत्रण आहे आणि तू माझ्यावरही नियंत्रण का ठेवू पाहतोयस?"

तो तोतरेपणे काहीतरी उत्तर देतो; पण मी आता थांबू शकत नाही. मी माझ्या शरीरातून बाहेर पडलोय, माझ्या वेदनांपासून बाजूला उभा आहे. मी एक फक्त रागानं भरलेली निराळी व्यक्ती आहे.

"आणि मला विचारायचंय की तुझ्यात आणि तिच्यात काय चाललंय?" मी विचारतो, "तुला ती आवडते, हे सर्व त्यासाठी आहे का? तुझे तिच्याशी शरीरसंबंध आहेत का? म्हणून तुला वाटतंय का, की तू तिची प्रत्येक हालचाल नियंत्रणाखाली ठेवशील? ते असं आहे, बरोबर? तुला ती आवडते! तुझे तिच्याशी शरीरसंबंध आहेत!"

अंथोनीचं, त्या पाद्र्याचं तोंड लाल झालंय, त्याच्या बायकोचंही तोंड लाल झालंय. रोझी शरमेनं जवळजवळ टेबलखाली गेलीय. त्या पाद्रीच्या बायकोला ते टेबल उचलून माझ्यावर फेकावंसं वाटतंय.

अंथोनी माझी कानउघाडणी करतो.

"तू साला चुत्या आहेस" मी त्याला सांगतो, मी सर्वांनाच सांगतो, "तुम्हाला काय वाटतं, लोकांची आयुष्यं त्यांची डोकी फिरवून चालवू शकाल? पण ते शक्य नाही. तुम्ही घाण आहात, घाण आणि मला तुम्ही आणि तुमचं हे पुनर्वसन केंद्र याबद्दल जराही काही वाटत नाही, कारण तुम्ही सर्व वेडे आहात."

रोझीचं डोकं आता तिच्या हातात आहे. मी खोलीतून वेगानं बाहेर पडतो आणि बाहेर जाऊन सिगरेट ओढून स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करतो. जेव्हा मी परत येतो, प्रत्येक जण आपल्या जागेवर आहे आणि गुलाबी गालवालाही तिथे आहे.

"काय झालं?" तो गालाला खळ्या पाडत विचारतो. मग पुन्हा एकदा संताप माझा ताबा घेतो.

"जा चुत्या!" मी धोकादायक पद्धतीनं ओरडतो आणि श्री. गुलाबी गालवाला उडी मारतो आणि माझ्या अंगावर धावून येतो. मी एका बाजूला उडी मारतो आणि तो टेबलभोवती मला पकडण्याचा प्रयत्न करतो.

"चुत्या, चुत्या." आपल्या घामेजलेल्या शरीरानं तो माझ्या मागे येत फिरत असतो, तेव्हा मी ओरडतो. जर ते इतकं भयानक नसतं, तर ते मोठं विनोदी वाटलं असतं.

अचानक मी थांबतो आणि वळतो. "जर तू आणखी जवळ आलास, तर मी

तुला पट्ट्यानं ठोकेन.'' मी त्याला सांगतो आणि माझ्या चेहऱ्यावर टाकलेल्या एका दृष्टिक्षेपात मी हे सर्व गंभीरपणे सांगतोय, हे त्याला कळतं. तर मग मी सिद्ध केलंय, की मी पापी, हिंसक आणि वाईट वागणारा राक्षस आहे आणि पुनर्वसन केंद्र हे माझ्यासाठी संपलंय. मी तिथे आठवडाभरही नव्हतो. मी त्या काळात आजारीच होतो आणि हा शेवटचा उपाय म्हणून त्यावर लावलेल्या आशाही संपल्यात, त्यामुळे माझ्यासाठी आता काहीच शिल्लक नाहीये. कुठेही जायलाही नाही आणि आता आणखी संधीही नाही.

मी ब्रिस्टॉलला आहे. तिथे मी सोशल सिक्युरिटीसाठी दावा करतो आणि माझ्या लक्षात येतं, की त्या वनविभाग कंपनीनं मला द्यायचा पैसा माझ्या खात्यात भरलाय. मी बर्मिंगहॅमची बस घेतो. मी निराश आहे. मला भविष्य नाही आणि मी माझा भूतकाळही पुसून टाकलाय.

संध्याकाळ होताच मी इंजेक्शन घेतो. माझ्या आत्म्याला पडलेली भगदाडं ज्याच्या खोल खिंडी झाल्या होत्या, त्या ताबडतोब बंदही होतात.

आता नवीन सहस्त्रकही सुरू होत आहे आणि पृथ्वीवरील प्रत्येक जणाला वाटतं, की हे साजरं करावं. मी माझी रात्र जिथे फक्त हेरॉईनचे व्यसनी लोक आणि त्यासाठी लागणारं सामान याशिवाय काही नाही, अशा बर्मिंगहॅममधील एका घरात घालवतो. मला बाथरूम सापडते. ती मी आतून बंद करतो. खिडकी उघडतो आणि आत एकटाच उभा राहून दारूकाम पाहतो. मी इतकी क्रॅक घेतो, की आत जिकडेतिकडे रक्त सांडतं. या वेळेपर्यंत दुसरा एक व्यसनी दारावर ठोकत आहे, कारण त्याला माझं सामान हवंय. ''मला माहीत आहे, की तू आत आहेस, मला माहीत आहे, की तू काय करतोयस ते.'' तो पिरपिरत असतो.

इ. स. २००० हे वर्ष माझ्यासाठी काही आशा घेऊन येत नाही. मी निराश आहे, निरुपयोगी आहे, वाईट आहे. मी सुधारण्यापलीकडे गेलेलो आहे. मला कुठेही जायला जागा नाही. काही करायला नाही. जानेवारीची पहिली पहाट उगवते आणि मी माझ्या सर्व विकल्पांचा विचार करतो. वॉरविक आहे; पण बेथनी काही मला आश्रय देणार नाही. काही असलं, तरी मी डॅरेनच्या काकांसाठी केलेल्या झाडांच्या कामात मजा आली. ज्याच्यासाठी मी काम केलं होतं, त्या लंडनच्या ट्री सर्जनला मी लंडनमध्ये फोन करू शकेन आणि त्याला मी सांगेन, की मी पुनर्वसन केंद्रात गेलो होतो आणि आता मी व्यवस्थित आहे आणि त्याच्याकडे मी माझं जुनं काम मागेन. मला बदलायला हवं, मला माझ्या सवयींवर नियंत्रण ठेवायला हवं आणि ड्रग्ज ट्यूबच्या प्रवासाइतकंच दूर असल्यामुळे ते सोपं जाणार नाही. दुसरा पर्याय म्हणजे मी नॉटिंगहॅमला जाऊ शकेन. तिथे माझे तीन डीआयवाय मित्र आहेत. अर्थात, त्या माथेफिरू आणि अंदाधुंद वातावरणात मी माझी सवय

नियंत्रणाखाली ठेवायला शिकू शकणार नाही, शिवाय मला हृदयातून खोलवरून जाणवतंय, की माझं ड्रगचं प्रमाण इतकं वाढलंय, की ते कोणी मित्र पचनी पाडू शकणार नाही, अगदी नॉटिंगहॅममध्येही. त्यातील काहींनी लग्न केलंय आणि ते कुटुंबवत्सल आहेत आणि त्यांना मी बाथरूममध्ये इंजेक्शन घेतलेलं चालणार नाही.

मी लंडनला परत जाईन. माझं जुनं काम मागेन. माझ्या सवयी नियंत्रणाखाली ठेवेन.

मी बेथनीकडे मिनी मेट्रोसाठी परत जातो. जेव्हा मी दरवाज्यावरची घंटी वाजवतो, तिला मला बघून धक्का बसतो.

"अरे मार्क तू," ती म्हणते. तिला वाटलं होतं, की मी त्या शांत वेस्ट कंट्री कम्युनिटीमध्ये पुनर्वसन करून घेण्यात गुंतलो आहे.

"अरे मार्क!" आणि तिच्या डोळ्यांत मला ते सर्व दिसतं. तिला वाटलेली निराशा, तिचा झालेला भ्रमनिरास.

"त्याचा काही उपयोग झाला नाही बेथनी. ते ख्रिश्चन्स भयानक होते. त्यांनी मला रोझी आणि मुलांना एकट्यानं भेटून दिलं नाही आणि दिसून आलं, की ते तर वेडेच होते."

ती मला आत बोलावते आणि मला काहीतरी खायला देते; परंतु तिचा आवाज दु:खी आहे. ती म्हणते, "मार्क, तू इथे राहू शकणार नाहीस. ज्या वेळेपासून मला तुझ्या कोटाच्या खिशात ती सुई सापडली, तेव्हापासून मला हे माहीत आहे, की हे माझ्या मुलांसाठी सुरक्षित नाही. मार्क, तुझ्या अवतीभवती राहून तू स्वत:ला काय करून घेतोयस, हे बघणं माझ्या सहनशक्तीच्या पलीकडचं आहे."

असं दिसतं, की माझी लहान बहीणही मला जायला सांगतेय, कारण मी सारखा हरतोय. निदान मला तरी तिच्या शब्दांतून हेच वाटतं.

"मला काही इथे राहायचं नाही." मी फुशारकीनं सांगतो. "मी लंडनला जातोय आणि तिथे मला माझं काम आहे."

मी कारच्या किल्ल्या घेतो आणि त्या गंजलेल्या पेटीत बसतो आणि ती खडखडत कशीबशी लंडनची वाट धरते. बहुतेक करून ती याहून दूर कुठे जाऊ शकली नसती. नाईटब्रिजमध्ये एका सुंदर घराच्या बाहेर मी ती उभी करतो आणि तिच्या चाव्या बागेच्या भिंतीपलीकडे टाकतो आणि चालू लागतो.

मला एक फोनबूथ सापडतो आणि मी कॅनिंग टाऊनमधील माझ्या शेवटच्या मालकाला फोन करतो.

"हो, ते चाकावरचं घर अजूनही तुझ्या सामानासह आहे." तो सांगतो.

"मी आता बरा आहे," मी खोटं बोलतो, 'ब्रिस्टॉलजवळच्या एका पुनर्वसन

केंद्रात गेल्यामुळे माझं व्यसन सुटलंय, मी कामाला तयार आहे. मला काम करायचंय. तुला माझी गरज आहे का?"

तो निःश्वास सोडतो, "खरं सांगायचं, तर मला खरंच एक झाडं शेंदाडणारा हवाय. मी रोजची मजुरी देईन."

मी कॅनिंग टाऊनची ट्रेन पकडतो. तो माणूस काहीशा शंकेनं मला न्याहाळतो.

"तुला खात्री आहे, की तुझं व्यसन सुटलंय?" तो विचारतो.

"हो, खरंच." मी खोटं बोलतो.

"मग उद्या सकाळपासून सुरुवात कर." त्याच्या स्वरात एवढी खात्री जाणवत नाही.

ते चाकावरचं घर किळसवाणं आहे. माझं झाडावर चढण्याचं सामान तिथेच आहे. जेव्हा मी खण उघडतो, मला सुया सापडतात. मी कपाटं उघडतो, मला सुया सापडतात. तिथे दुसरं फारसं काही नाही.

मी दोन दिवस ड्रग न घेण्याच्या प्रतिक्रियेत, रॅटलमध्ये घालवतो आणि माझी सवय ताब्यात ठेवण्यासाठी दारू पिऊन आणि इतर जे काही मला सापडेल, ते घेऊन अगदी भयानकपणे घालवतो. मी कोणतंही ड्रग न घेण्याचा प्रयत्न करतो, कारण यापुढे मी माझं हेरॉईनचं व्यसन नियंत्रणाखाली ठेवणार आहे. मी ते नियंत्रणाखाली ठेवणार आहे आणि सामान्य होणार आहे. यामुळे मी माझ्या मुलांना सामान्यरीतीनं भेटू शकेन; परंतु मला स्वतःला काम करण्यासाठी सामान्य करायचं, तर मला दुसऱ्या ड्रगची गरज आहे. मी एक मेथॉडीनची, एका हिरव्या चिकट पदार्थाची प्लॅस्टिक बाटली खरेदी करतो आणि ते मी चाकावरच्या घराच्या आसेत लपवून ठेवतो. ते मला ठीक करण्यासाठी फार महत्त्वाचं आहे. त्याच्याशिवाय माझी ती प्रतिक्रिया इतकी वाढेल, की मग विचार करणं किंवा काम करणं अशक्य होईल. ते जीवनाचं अमृत आहे. रात्रीच्या वेळी मला त्या घराबाहेर कसलातरी आवाज येतो. मला भीती वाटते; पण शेवटी मी दरवाजा उघडतो. ती महत्त्वाची बाटली तिथे आहे की नाही, त्याची मला खात्री करायची असते. मला त्या धीर देणाऱ्या प्लॅस्टिकच्या बाटलीचा माझ्या बोटांना स्पर्श हवाय. मला तो स्पर्श हवाय, नाहीतर मी मरेन; परंतु तो स्पर्श मला होत नाही. ती बाटली गेलेली आहे.

मी त्या चाकाच्या घरातून बाहेर उडी मारतो आणि त्या अडगळ पडलेल्या अंगणातून धावत सुटतो. ते कुत्रे भुंकायला आणि उड्या मारायला लागतात. मी कुत्र्यांच्या घराकडे सरळ धावतो. तिथे रंगीबेरंगी अशा लांब, लुकडे अवयव असलेल्या, लांडग्यांची शिकार करणाऱ्या कुत्र्यांमध्ये ती प्लॅस्टिक बाटली आहे आणि ती कुत्र्यांच्या लांब सुळ्यांनी फाडून उघडलेली आहे आणि त्यातील चिकट द्रव त्यांच्या त्या गवताच्या शय्येवर पडलेला आहे. माझं जग इथेच संपतं.

सामान्यत्व अशक्य आहे. माझं जीवन हे त्या कुत्र्यांच्या घरात वाहून गेलंय. अरे हरामी, चुत्या कुत्र्यांनो.

दुसऱ्या दिवशी सकाळी बॉस येतो आणि त्याला मी असहाय स्थितीत सापडतो. मी खूप आजारी आहे. ते काम करू शकत नाही, हे कुणालाही दिसण्यासारखं आहे. त्याला माहीत आहे, की तो मला यापुढे कामावर ठेवू शकणार नाही. मलाही ते माहीत आहे. पुन्हा दुसऱ्यांदा मी ते अडगळीनं भरलेलं अंगण सोडतो, निराशेच्या भरात आणि हताश अवस्थेत. पुन्हा एकदा मी वॉटरलूला जाण्यासाठी ज्युबिली लाइन पकडतो, पुन्हा एकदा मी वेस्ट एन्डला ड्रग घेण्यासाठी जात आहे, कारण मला दुसरी कुठेही जायला जागा नाही. मी प्रत्येक उपाय करून बघितलाय; पण कशामुळे, कशानंही मी माझ्या सवयीतून मुक्त होत नाही. सरतेशेवटी वेस्ट एन्डचे रस्ते, तेवढंच काय ते उरलंय. त्याचा अर्थ ती रेल्वे मला घेऊन जात होती, ती हीच जागा होती.

मी पुन्हा माझ्या त्या जीवनात शिरतो आणि सर्व काही तसंच आहे. त्या जागा ते लोक, ड्रग विक्रेते, कुणीही मला अभिवादन करत नाही. फक्त अंगावरच्या उवा मला पाहून खुश होतात. डेव्ह आणि गिन्ज सोडला, तर मी दोन आठवडे इथे नाही, हेही कुणाला इथे जाणवलेलं नाही.

■

३२

पुन्हा त्या रस्त्यावरच्या जीवनात रुळायला मला काही दिवस लागतात. दुकानातील सामान चोरण्याच्या कौशल्यात सुधारणा हवीय. मी अगदी पकडला जाण्याच्या बेतात होतो. माझ्या डोळ्यांच्या कोपऱ्यातून पाहतो, की एक विक्रेती दुकानातील कर्मचाऱ्याला बाजूला घेऊन काहीतरी कुजबुजते. तो कर्मचारी माझ्याकडे पाहतो आणि सरळ फोनकडे वळतो. एक जाळं माझ्याभोवती टाकलं जात आहे. मी पटकन बॅगेत टाकलेल्या डीव्हीडीज काळजीपूर्वक परत ठेवतो. दुकानातून बाहेर पडताना ते मला पकडण्याचा प्रयत्न करतात आणि माझ्याकडे काही नाही, हे पाहून आश्चर्यचकित होतात; परंतु त्यांना संशय मात्र असतोच.

"तू स्वीडीश पर्यटकासारखा दिसण्याचा छान प्रयत्न केलायस." तो दुकानातील गुप्तहेर म्हणतो. "आणि तू जे काही करतोयस त्यात तू वाकबगार आहेस; परंतु आम्हाला असं वाटतं, की तू हे काही काळ करत आलायस. आम्ही तुला आता ओळखतो, तेव्हा पुन्हा इथे येऊ नको."

त्यांनी जे मला स्वीडीश पर्यटकासारखं दिसतो म्हणून माझी प्रशंसा केली, त्याबद्दल मला त्यांचे आभार मानावेसे वाटतात; परंतु त्या ऐवजी मी सरळ ब्रॉडविक स्वच्छतागृहाकडे जातो. दुसऱ्या कोणाबरोबर कपडे बदलतो आणि पंधरा मिनिटांनंतर मी दहा डीव्हीडीज त्यांच्याच दुकानातून यशस्वीपणे चोरतो.

जरी डीव्हीडीजची चोरी करणं हा माझ्या मिळकतीचा मुख्य स्रोत असला, तरी माझ्याकडे अनेक कल्पना आहेत आणि वेस्ट एन्डला परत आल्यावर मला निःशंक वाटायला लागतं. ख्रिसमसच्या त्या वेड्या आठवड्यात दूर राहिल्यावर मी पाण्यातून मासा काढावा, तसा झालो होतो. हे घर माझं आहे आणि इथे माझी भरभराट होते. बेघरांपैकी मी एकच असा असेन, ज्याची मिळकत भरपूर आहे आणि तो व्यवस्थित राहतोय. वेस्ट एन्डमध्ये बरेच टोळीवाले गुंड आहेत आणि मी त्यांच्यासारखा आहे, या भावनेनं मला अभिमान वाटतो.

हमरस्त्यावरील संहिता :

आठवड्यात एक स्निकर आणि पुष्कळ ड्रग्जवर रस्त्यावर कसं टिकायचं हे लक्षात ठेवा, की या गुन्हेगारी क्रिया आहेत आणि त्यामुळे तुम्ही तुरुंगात जाऊ शकाल.

१. मित्राबरोबर इंटरनेट कॅफेत जा. या मित्राला इंटरनेटची काहीतरी समस्या येते आणि ती सोडवण्यासाठी त्याला मुलीची मदत लागते आणि ती अशी मदत करत असताना टेबलखालून तिची हँडबॅग पळवा.

२. ड्रग विकत घ्या. त्यातील बहुतेकाचं सेवन करा; परंतु काही विका.

३. ड्रग्ज चोरा. त्यातील बहुतेक वापरा; पण काही विका.

४. जेव्हा तुमचा चेहरा स्टोअर्समधील गुप्तहेरांना ओळखीचा वाटू लागेल, तेव्हा असा कुणी एक शोधा, जो त्या रस्त्यावर नवा आहे आणि त्याला दुकानात पाठवा. बाहेर डीव्हीडीजची वाट पाहत थांबा. त्या विका आणि मिळालेल्या पैशातून त्याला दहा टक्के द्या.

५. ड्रग विक्रेत्याच्या चोरट्या मालाची ने-आण करणारा वाहक म्हणून काम करा.

६. जेव्हा तुम्ही ड्रगसाठी घायकुतीला आलेले असाल, तेव्हा दुकान फोडून माल पळवा. जर तुम्ही घाईघाईनं आत गेलात, तर जे पाहिजे ते घ्या आणि पटकन बाहेर पडा. बहुतेक तुम्ही यातून सुटाल आणि जर सुटला नाहीत, तर मग मात्र तुम्ही एखाद्या कायदेशीरपणे ड्रग्ज दिली जातात, अशा चांगल्या उबदार कोठडीत राहायची वाट बघा, त्यामुळे तुमचं नुकसान होणार नाही.

७. साध्या कपड्यांतील पोलीस ओळखा. त्यांचं अस्तित्व तुम्ही मोठ्या ड्रग विक्रेत्यांना दाखवू शकाल.

८. जेव्हा ग्रौचो क्लब बंद होतो, तेव्हा मीडियाच्या माणसांना दुसऱ्या एखाद्या ड्रिंक देणाऱ्या आणि ज्याच्याबद्दल त्यांना स्वारस्य वाटेल, अशा क्लबचा रस्ता दाखवायला तयारी दाखवा आणि तिथे दरवानाकडून कमिशन मिळवा. वाटेत आपली दु:खद कहाणी खात्रीनं सांगा आणि तो मीडियाचा माणूस कदाचित त्याच्या खिशातील वीस पौंड देईल.

९. तुमची आतडी भुकेनं तुटतायंत. चिकन, ॲव्होकॅडो-एकतऱ्हेचं हिरवं फळ आणि डुकराचं मांस सियाबट्ट्यावर- एकतऱ्हेचा ब्रेड- थोडंसं मॅयोनीज घालून हवंय? तर मग एखाद्या आधुनिक सँडविचच्या दुकानाबाहेर वास घेत, खाजवत उभे राहा आणि तुम्ही जावं, म्हणून तेच तुम्हाला कॉफी आणि चवदार सँडविच देतील.

१०. युनिव्हर्सिटी कॉलेज हॉस्पिटलजवळ असलेली विकलांगांची स्वच्छतागृहंही तुम्हाला हिवाळ्यात थंड रात्री झोपायला उबदार जागा देतील. अर्थात, तेथील जमीन

ही काही परांची गादी असणार नाही आणि एक लक्षात ठेवा, की तिथे सफाई कामगार लवकर येतात.

११. उंदीर हे काही तुमचे केसाळ मित्र नाहीत. ते तुम्ही आणि चांगला खारवलेला मासा यामध्ये अडसर होऊ शकतात. जर तुम्ही कचऱ्याच्या डब्याआड झोपाल, तर रात्रभर ते तुमच्या अंगावरून धावत राहतील. जिथे घर बांधलं जात आहे, अशा जागा आणखीनच वाईट. छोट्या जागेत झोपण्यापूर्वी याचा विचार करा.

१२. मोबाईल फोनची चोरी करा. तो पुन्हा विकायला तुम्हाला सोपं जाईल. जर त्याच वेळी तो मोबाईल वाजला, तर विकत घेणाऱ्याला सांगायचं, की तुमच्या मित्राचा फोन आहे.

१३. खिसे कापण्याचं कौशल्य तेवढं नाही? तर त्यात वेळ फुकट घालवू नका आणि सराव करताना धोका पत्करू नका. एखादा कसबी खिसेकापू शोधा आणि त्याचा भिडू बना. तुमची बुद्धिमत्ता त्याला चांगल्या संधी दाखवण्यासाठी वापरा आणि मग त्या सावजाचं लक्ष दुसरीकडे वळवा, ज्यामुळे तुमच्या भिडूला त्याचं काम करता येईल.

१४. रात्रीच्या वेळी भिंतीच्या जवळ खबदाडात एटीएमजवळ उभे राहा. जेव्हा एखादा माणूस आपलं बँककार्ड बाहेर काढेल, तेव्हा त्याच्यामागे व्यवस्थित रांग करून उभे राहा. मग त्या महत्त्वाच्या क्षणी तो कार्ड आत ढकलील आणि बटणं दाबल्यावर पैसे बाहेर येतील, त्या वेळी त्या माणसावर आपटा आणि तो पैसे घेण्याआधीच तुम्ही ते पैसे मिळवा.

१५. दारू पिऊन तर्र होणं, हे साथीसारखंच आपल्या रस्त्यावर पसरलंय. त्या उशिरा रात्री पिणाऱ्याला त्याचं कसं चुकलंय, हे जेव्हा तो क्लबमधून लडखडत बाहेर येईल, तेव्हा त्याला गुंडाळून शिकवा. हे करताना त्याच्या अंगावर ब्लँकेट टाका, त्यामुळे कुणाला असं वाटेल, की तुम्ही त्याचे पैसे मारत नाही, तर त्याला मदत करताय.

१६. नेहमी तयार राहा. नेहमी दक्ष राहा. फसवणूक, चोरी करणं आणि खोटं बोलणं, यामुळे लंडनच्या रस्त्यावर अनेक संधी मिळतात. फक्त यासाठी तुम्ही तयार असायला पाहिजे.

अर्थात मला माझे वाईट क्षणही आहेत. क्रॅकची धुंदी उतरत असताना तर हल्ली फारच वाईट वेळ येते आणि मी ते इतकं घेतोय, की मी जवळजवळ काहीच खात नाही. खरं सांगायचं, तर माझं वजन आठ स्टोनपेक्षाही कमी आहे आणि म्हणजे खूप खूप बारीक असणं, कारण मी सहा फूट उंच आहे. डेव्ह मला सांगतो, की

मी अगदी खंगलेला दिसतो.

"जा आणि डॉक्टरना भेट मित्रा," तो म्हणतो.

"कशासाठी? मी ठीक आहे."

काही वेळा मी रात्रभर क्रॅक घेत असतो. ती वेळ आहे, जेव्हा मी स्वत:हून माझ्या खास पद्धतीनं गोल गोल फिरायची सुरुवात करतो. ते म्हणजे एक पाय फरसबंदीवर आणि दुसरा गटारात अगदी हळू, माझं डोकं खाली घालून. प्रत्येकाला वाटतं, की मी भीक मागत फिरणारा आहे. मग ते माझ्या विभ्रमावस्थेत मला त्रास देणार नाहीत किंवा माझ्याकडे पाहणार नाहीत त्यांचं माझ्याकडे लक्ष जाणार नाही. मला नाटक करायला नको, हेही मी विसरतो, कारण मी खरंच भटक्या भिकारी आहे.

माझ्याकडे माझं स्वत:चं असं काही नाही. कचऱ्याच्या डब्यात जेव्हा मी शोधत असतो, तेव्हा सापडलेल्या वस्तू फक्त माझ्या आहेत. मला कचऱ्याचे डबे शोधायला आवडतं, कारण त्यामुळे माझ्या चालण्यात एक लय येते. कचऱ्याचा डबा दिसला, की त्यात बघायच, त्यामुळे मला पुढे जायला एक प्रकारचा उद्देश मिळतो.

दुसऱ्यांना नको असलेल्या वस्तू मला मिळतात. त्या माझ्या होतात. मी सापडलेल्या वस्तूंचा संग्रह केलाय. त्या माझ्या आहेत; परंतु तरीही त्यावर त्या लोकांचा काहीतरी ठसा आहे, त्यामुळे एक विलक्षण तऱ्हेचा संबंध माझा सामान्यत्वाशी आणि सामान्य लोकांशी राहतो. तिथे एक तपकिरी रंगाची प्लॅस्टिकची आर्ट बॉक्स आहे. त्यात अनेक छोटे कप्पे आहेत. तुम्ही जेव्हा झाकण उघडता, तेव्हा ते कप्पे वर येतात. काही मोठ्या सुया, मी वापरतो त्या नव्हे, तर शिवणाच्या सुया, त्या सूर्यप्रकाशात चमकतात. रुपेरी पत्र्याचं मजबूत कव्हर असलेली एक वही, त्यात बरेचसे स्टीकर्स आहेत, थोडी रिकामी पानं आणि डायरीचा रिकामा भाग, एक अर्धा चमचा आहे, त्याचा दांडा मोडलेला आहे आणि त्यावर बारीक लक्ष ठेवून तयार केलेलं नक्षीकाम आहे. काही छोटे रंग, रंगाचे ब्रशेस. मला माझा हा संग्रह आवडतो. मी तो पुलाखालच्या गुप्त जागेत, गटारात आणि दगडांच्या मागे लपवून ठेवतो. तो फार मौल्यवान आहे.

टॉटनहॅम कोर्ट रोडच्या शेवटी असलेल्या अरुंद जागेवर मी इंजेक्शन घ्यायच्या तयारीत आहे. अशा वेळी त्या भयानक जुळ्यांपैकी एक केथ किंवा माल्क माझ्याकडे धावत येतो आणि माझी पुडी चोरतो. त्या वेळी मी अगदी ड्रग घेण्याच्या तयारीत असतो. असं कुणी कधी केलेलं नाही. मी त्याच्याशी मारामारी केली असती; पण त्याचा जुळा तिथेच उभा आहे. मला नागवलं गेलंय. मी माझा ड्रग गमावलाय, त्यामुळे त्याबद्दल शोक करणं, हे मारामारी करण्यापेक्षा जास्त योग्य आहे.

"घे मित्रा, घे." मी धीरानं सांगतो.

तो जुळा हसतो आणि मला शिव्या देतो. मी थांबतो. त्याच्याकडे बघतो आणि जेव्हा ते तो स्वत: घेण्याच्या तयारीत असतो, मी उडी मारतो. त्या अरुंद जागेवरून धावतो आणि त्याला धडक देतो, त्यामुळे ते सामान, ती सुई, ते ड्रग्ज हे जिकडेतिकडे उडालंय. यामुळे आमच्यापैकी ते कुणालाच मिळत नाही.

"तू चुत्या, चुत्या..."

दुसरा जुळा सुरा काढण्याच्या बेतात आहे आणि मी दुसरं काही ऐकत नाही, कारण मी तेथून वेगानं दूर पळत आहे. माल्क आणि केथ हे मला त्या किड्डरमिन्स्टरमधील वेड्या भावांची आठवण करून देतात. ते बाटली संपवायचे आणि मग त्याची काच खाऊ लागायचे. टॉटनहॅम कोर्ट रोडवर मला कोणी ड्रग देईल, या शोधात मी आहे. सरतेशेवटी तिथे बेनदादा आहे. ट्यूब रेल्वेतील भीक मागण्याच्या यशस्वी संध्याकाळी तो ड्रग घेण्यासाठी उड्या मारत जात आहे.

"ते जुळे चुते," मी जेव्हा काय झालं ते सांगतो, तेव्हा तो म्हणतो. तो मला ड्रग देतो. छोटी ऑफिसेस असलेल्या आणि जिथे लोकांचे स्वत:चे व्यवसाय आहेत अशा उदास, पण आधुनिक दिसणाऱ्या मोकळ्या जागेत मी प्रत्येकाच्या दरवाज्यापासून दूर राहतो. तिथे उद्योग आहेत ते फिल्म एडिट करणं, पीआर, ग्राफिक डिझाईन वगैरे. त्यातील काही आज रात्रीही काम करतायत. ते निघून जात असताना मी त्यांना पाहतो. सकाळी कामाला जाणारे आणि रात्री घरी परतणारे लोक मला नेहमीच मूर्ख वाटत होते; परंतु त्यांच्या चेहऱ्यावरून मला वाटतं, की त्यांच्या कामामुळे त्यांना एक प्रकारचं समाधान मिळतं.

एका रात्री एक अगदी नवीन मोठ्या आकाराची रजई फटीमधल्या खोक्यात ठेवलेली मिळते. मी स्वत:ला त्यात एखाद्या किड्यासारखा गुंडाळून घेतो आणि सकाळच्या सूर्यप्रकाशात घामेजून जागा होतो. ती चांगली रात्र झाली. वाईट रात्र, म्हणजे मी दरवाज्यात अंगाची गुंडाळी करून बसलोय आणि लोकांचा एक गट माझ्यावर हल्ला करतो. मला ते दिसत नाहीत. मला माझ्या ब्लँकेटमधून ते जाणवतात. मला त्यांच्या लाथा बसलेल्या जाणवतात. त्यांचं हास्य ऐकू येतं. सकाळी माझं शरीर काळं-निळं झालेलं असतं. ते पाच किंवा सहा जण असतील, असा मी अंदाज करतो आणि माझा असा तर्क आहे, की ती पिण्याच्या मोहिमेवर गेलेली तरुण पोरं नव्हती, तर असहाय माणसाला गुप्तपणे दुखापत करण्यात आनंद मारणारे, दुखापत करण्याची संधी मिळालेले आणि सूड घेतला जाण्याची भीती नसलेले ते सुटाबुटात असलेले व्यापारी लोक होते.

दुसऱ्या एका रात्री हॅमलेजच्या खेळण्याच्या दुकानाबाहेर मला दोन मोठी पुठ्ठ्यांची खोकी मिळतात. इमारतीचं काम चालू असल्यामुळे बंद केलेल्या रस्त्यावर

मोठ्या प्लॅस्टिक ट्रेजवळ मी ते मांडतो. इथे मला कुणीही त्रास देणार नाही. माझ्या पुठ्ठ्यांच्या संरक्षणाला भोकं पाडणारे उंदीरही तिथे मी झोपलेला असताना माझ्या अंगावरून धावणार नाहीत. मी एक भोक पाडतो आणि त्या खोक्यात रांगत जातो आणि सुयांचा डबा उशी म्हणून वापरतो. माझ्या या अत्युत्तम झोपण्याच्या खोलीबद्दल मी स्वत:चं अभिनंदन करतो; परंतु कोणीतरी वेड्यासारखं ओरडून आणि माझ्या खोक्याच्या वरच्या बाजूला थाडथाड आवाज केल्यामुळे मी जागा होतो. मी एखाद्या उंदरासारखा त्या खोक्यातून बाहेर पडतो आणि मग माझ्या लक्षात येतं, की ट्रकची एक रांग माझ्या हलण्याची वाट पाहत आहे आणि जवळजवळ पन्नास घर बांधणारे मजूर वर उंचावर त्यांच्या परातीवर उभं राहून. मी त्या रस्त्यावर धडपडत त्यांना दोन बोटं दाखवत आणि त्यांना गेलात... असं ओरडत असतो. ते माझ्याकडे पाहून ओरडतात. ते काय म्हणतायत ते मला समजत नाही. मला मी अगदी कवडीमोलाचा असल्यागत वाटतं. कदाचित ते मला बाहेर काढण्यासाठी बराच वेळ प्रयत्न करत असावेत; परंतु मला शुद्धबुद्ध नव्हती आणि कोणालाही तो बॉक्स उघडायचा नव्हता. कुणीही हे कधीही करत नाही. सोहोमध्ये पुठ्ठ्याच्या खोक्यांतून काय तऱ्हेचा मानवी माल त्यांना मिळेल, याची त्यांना भीती वाटते. माझ्यासारखा मानवी गाळ सापडल्यावर काहीशा क्रूरपणे आणि सुटल्याच्या भावनेनं ते हसतात.

मी बराचसा काळ स्वच्छतागृहात काढतो. कधी कधी मला त्या स्वच्छतागृहात नकोसं वाटतं. ड्रगचं इंजेक्शन घेतल्यावर मी छोट्या जागेत एखाद्या कुत्र्यासारखा किंवा मार खाल्लेल्या पोरासारखा दबा धरून गुंडाळी करून भीतीनं थरथरत असू शकेन. माझी धुंदी ओसरतेय. माझी विभ्रमावस्था आहे आणि मी आवाज आणि पायरव ऐकतो. माझी विभ्रमावस्था उघड आहे. पोलिसांच्या भीतीनं, येणाऱ्या संकटाच्या भीतीनं आणि त्यांच्या भीतीच्या भीतीनं मी जेरीस आलोय. त्या छोट्या जागेच्या बाहेर मला छाया दिसतात. त्या छाया भरकन येतात आणि जातात आणि मला घाबरवतात.

कॉव्हेंट गार्डन चौकात असलेल्या हॅमलेजच्या छोट्याशा शाखेतून मी लहान मुलांची खेळणी एका वेश्येसाठी इस्टरसाठी चोरत असतो. तेव्हा एक तरुण विक्रेती मला पकडते. मला सांगायचंय, की ती सोळा वर्षांची मुलगी आहे. ती छोटीशी आणि नक्कीच पाच फुटांहून कमी आणि अत्यंत बारीक आहे. जेव्हा मी दुकानाच्या बाहेर पडतो, ती मला पकडते. मी त्या चौकात सुटण्याचा प्रयत्न करतो; परंतु ती माझ्यामागे आहे. ती मला पकडते आणि पायांनी कैची घालते, त्यामुळे मी हलू शकत नाही. तो अपमान. मला माहीत आहे, की मी बारीक आहे, अगदी खंगलेला आहे, मला माहीत आहे, की डेव्ह मला जास्त खायला सांगत असतो, तरीही एका छोट्या मुलीनं मला जखडून ठेवणं, हे भयानक आहे. तिला माझ्या अंगावरच्या उवांचा संसर्ग होईल, अशी मी आशा करतो.

मॅनेजर बाहेर येतो आणि तो पोलिसांना बोलावतो. माझ्या अंगावर ड्रग्ज लपवलेले आहेत; पण पोलीस येण्याची वाट पाहत असताना मी स्वत:ला कसंबसं असं हलवतो, की मी ते माझ्या ढुंगणात घालू शकतो.

जेव्हा ते दोन पोलीस जवळ येतात, मी सांगतो, "माझ्या अंगावर उवा आहेत." त्यामुळे ते माझ्याजवळ येतं नाहीत. कोपऱ्यावर असलेल्या चेरींग क्रॉस रोड पोलीस स्टेशनला मला चालत न्यायचं, की व्हॅनमध्ये टाकायचं, त्यावर बरीच चर्चा होते आणि सरतेशेवटी ते मला व्हॅनमध्ये घालायचं ठरवतात. ते काही हे निर्दयपणे करत नाहीत. आश्चर्य म्हणजे जरी ते माझे सर्वांत मोठे शत्रू आहेत, तरी ते माझ्याशी नीटपणे बोलतात.

जेव्हा आम्ही येतो, तिथे एक डॉक्टर वाट पाहत असतो. तो माझ्या अंगावरच्या जखमा आणि माझी कृश देहयष्टी पाहतो आणि तो दयाळू आणि दुसऱ्याची कदर करणारा आहे. तो काही स्वच्छ कपडे देईन असं सांगतो आणि तो उवा नाहीशा करण्यासाठी अंघोळीपूर्वी वापरण्याचं क्रीम देतो. सर्वांत चांगलं म्हणजे तो अनेक ड्रग्ज लिहून देतो, कारण मी फार व्यसनी आहे, हे त्याला दिसतं. तो मला डायहायड्रोकोडाइन हे विपुल प्रमाणात देतो, मॉर्फिन जे हेरॉइनच्या जागी वापरलं जातं आणि व्हॅलियम.

मी गरम पाण्यानी अंघोळ करतो. एक उबदार कोठडी, चांगल्या ड्रग्ज, एक ब्लॅंकेट आणि उशी. माझ्या त्या घाणेरड्या कपड्यांऐवजी मला एक कागदाचा सूट वापरायला दिला जातो. माझं डोकं उशीवर टेकतं. मी सुरक्षित आणि उबदार आहे. मला असं वाटतं, की मी जणू काही तुरुंगातून सुटलोय.

जरी ते पोलीस ऑफिसर गरज पडेल, त्यापेक्षा जास्त माझ्याजवळ येत नाहीत, ते माझ्याशी दयेनं आणि सहानभूतीनं बोलतात.

"तू मग किती काळ बेघर आहेस?" ते विचारतात.

"तू कसं काय भागवतोयस?"

"ठीक आहेस, मित्रा?"

ते माझ्याकडे दयार्द्र नजरेनं पाहतात. एखाद्या जंकीला किती निराशा वाटते, तेही त्यांना समजतं असं वाटतं. मला आश्चर्य वाटतं. ज्या आकृत्या माझ्या ड्रग्ज उतरण्याच्या विभ्रमावस्थेत मला छळायच्या, ते पोलीस होते आणि आता मी त्यांच्याबरोबर आहे आणि ते भीतिदायक नाहीत. ते चांगले आहेत.

दुसऱ्या दिवशी ते डॉक्टरनी सांगितलेलं ड्रग्ज घेऊन मी धुंदीत असताना आणि तो कागदाचा सूट घातलेला असताना मला पुन्हा पोलिसांच्या व्हॅनमध्ये घातलं जातं. इस्टर असल्यामुळे मला एका खास मॅजेस्ट्रेटच्या कोर्टात मध्यवर्ती लंडनपासून दूर नेलं जातं. ते मला कुठे नेतायत त्याची मला पर्वा नाही, कारण मी डायहायड्रोकोडाइन

घेतलंय. मी एवढीच आशा करतो, की ते ट्यूब रेल्वे शेवटाच्या पलीकडे नसेल.

मॅजिस्ट्रेट मला एक दिवसाचा तुरुंगवास किंवा शंभर पौंड दंड करतो. मी आधीच एक दिवसाचा तुरुंगवास काढल्यामुळे आणि माझ्याकडे शंभर पौंड नसल्यामुळे मला ताबडतोब सोडलं जातं. मला खाली नेलं जातं आणि कोणीही कोर्टातील कर्मचारी माझ्याजवळ येत नाही. ते मी त्यांच्या बाजूनं जात असताना मागे होऊन एक पोरखेळ खेळतात.

"माझ्याजवळ येऊ नको!"

"ओह, मला स्पर्श करू नको!"

ते पटांगणावर येणाऱ्या हलकट मुलांसारखे आहेत. मग ते मला बाहेर फेकतात. माझ्या अंगावर पांढऱ्या कागदाचा सूट आहे. मी त्या रस्त्यावर विचित्र कपडे घालून अनवाणी उभा आहे. मी हरलोय. लज्जित झालो आहे. मी कोणीही नाही. एका क्षणानंतर दरवाजा उघडतो आणि एक काळी प्लॅस्टिकची बॅग रस्त्यावर फेकली जाते. जेव्हा मला पकडलं गेलं होतं, तेव्हा मी घातलेले घाणेरडे कपडे आणि शूज त्यात आहेत. मी वर पाहतो आणि त्या कोर्टाच्या काचेच्या दरवाज्यामागे उभे राहून मला हसताना ते दिसतात.

त्या कागदाचे कपडे घातल्यामुळे उठून दिसणारा आणि शरमिंदा असा मी आजूबाजूला पाहतो. मी कुठे कपडे बदलू शकेन? हे लाजिरवाणं आहे; परंतु यापेक्षा एक जास्त निकडीचा प्रश्न आहे. माझ्या देहावर अजूनही हेरॉइन आहे; परंतु इंजेक्शनसाठी लागणारं सामान त्याआधी मला मिळवलं पाहिजे.

अवकाश मानवासारखा दिसत असताना या दूरवरच्या लंडनच्या भागातून ते कुठे आहे देवजाणे- मी रखडत असताना एक केमिस्टचं दुकान मला उघडं आढळतं. जवळच एक लिंबूफूल मिळेल, असं भारतीय दुकान आहे. मी सार्वजनिक स्वच्छतागृहात कपडे बदलायला जातो आणि इंजेक्शन घेतो. मग मी ट्यूब रेल्वेनं घराकडे परततो म्हणजे पुन्हा वेस्ट एन्डला येतो.

काही काळ मला मी वेस्ट एन्डचा राजा असल्यागत गल्लीतील मोठ्या दादासारखं वाटतं; परंतु हळूहळू अशा तऱ्हेचं अस्तित्व मला खलास करतंय. मी जीवनाशी रोज करावी लागणारी लढाई हळूहळू हरतोय.

एका रात्री मी बेशुद्ध पडतो. चार्लट स्ट्रीटवरील एका छोट्या पार्कमध्ये मी इंजेक्शन घेतो आणि दुसऱ्या दिवशी मी जागा होतो, तर ती सुई माझ्या दंडातच असते. माझे पाय माझ्याखाली दुमडलेले आहेत आणि ढोपरापासून माझा देह सरळ रेषेत आहे. थंडीनं मी काळा-निळा पडलोय. माझे कपडे ओले झालेले आहेत. मी या स्थितीत बरेच तास असावा. मला हलणं शक्य व्हायला आणखी तास लागतात. पाय सरळ करणं आणि त्यावर उभं राहणं तर सोडाच. मी वेदनेनं

विव्हळतो. मी खूप आजारी आहे. जे हेरॉइन मी घेतलं, ते बहुतेक चुकून एखाद्या चांगल्या प्रतीच्या बॅचमधून आलेलं असावं, त्यामुळे मला एवढा जास्त डोस झाला असावा. ती थंड रात्र आहे. मी मेलोही असतो. मला वाटतं, की मी मेलो असतो तर बरं.

या वेळी मी माझ्या चोरलेल्या डीव्हीडीज विल्फ नावाच्या मुलाला विकत असतो. तो सोहोमधील सेक्सशॉपमध्ये काम करत आहे. या रस्त्यावरील सेक्सशॉप यांचा धंदा नेहमी तेजीत असतो. त्यांच्या छोट्या अंतरंगावर तुम्ही जाऊ नका. ही गँगस्टर्सची जागा आहे. विल्फचे बॉस आहेत आणि त्या बॉसचेही बॉस आहेत. त्यापैकी एक थोराड मेक्सिकन पद्धतीच्या मिशा ठेवणारा माणूस आहे. तो त्याच्या व्यवस्थित, पण वेगळ्या उच्चारांच्या इंग्लिशमध्ये माझ्याशी बोलण्याची इच्छा व्यक्त करतो. तो मला जरा अस्वस्थच करतो; पण जेव्हा त्याला काय हवंय, ते मला कळतं. माझ्या चेहऱ्यावर भरभरून हास्य पसरतं. मी त्याच्यावतीनं ड्रग्ज विकावं, यासाठी तो मला विचारत आहे.

माझं नवं काम विलक्षण आहे. ते मला चिकट कागदाच्या दोन पाकिटात घातलेल्या दोन ग्रॅमच्या क्रॅक आणि हेरॉइनच्या पुड्या देतात. त्यापैकी जवळजवळ तीस मी माझ्या तोंडात घालून निघतो. मी वेस्ट एन्डमध्ये फिरून त्या विकतो. जेव्हा पहिल्यांदा मी ते दुकान सोडतो, तेव्हा तोंडात पुड्या असल्यामुळे मी बोलू शकत नाही. जेव्हा मी काही पुड्या थुंकून बाहेर काढतो, तेव्हा मी थोडं बोलू शकतो. बाजारावर अवलंबून मी प्रत्येक पुडीला सात ते दहा पौंड किंमत घेतो आणि माझं तोंड रिकामं झालं, की मी विल्फकडे पैसे द्यायला आणि पुन्हा माल भरून घ्यायला जातो. आणखी थोड्या अनुभवानंतर मी माझ्या तोंडात आणखी पुड्या ठेवू शकतो. पन्नास पुड्या आणि मी एखाद्या गालफुग्या उंदरासारखा दिसतो.

जेव्हा मी तीस पुड्या विकतो, मला पाच पुड्या ठेवता येतात, त्यामुळे हे छान काम आहे आणि मला ते आवडतं. मी ड्रग्ज विकण्यासाठी अनेकदा निवडला गेलो आहे. मी कामात व्यग्र आहे आणि ज्याला खूप मागणी आहे, अशा विक्रेत्यांपैकी एक अशी माझी ओळख आहे आणि मी काही गँगस्टर्समध्ये आहे, कारण आता मला खात्रीनं माहीत आहे, की मी अजिंक्य आहे आणि माझ्या मनातून वेस्ट एन्डचा कारभार मीच चालवत आहे. मग तरीही मी काही वेळा असा दुःखी का होतो?

■

३३

मी पिकॅडली सर्कसच्या भुयारी मार्गाच्या पायऱ्यांवर बसलोय. पावलं माझ्या-जवळून भरभर जातायत. मी रात्रभर क्रॅक घेतोय आणि माझं ड्रग्जचं काम आणखी काही तास सुरू होणार नाही; परंतु मी काही इंजेक्शन घेण्यासाठी थांबू शकत नाही. अगदी घायकुतीला आलोय; परंतु मी थकलोय. इतका थकलोय, की दुसरं इंजेक्शन घेण्यासाठी चोरी करण्याची ताकद माझ्या अंगात नाही. माझे पाय आता भरभर चालत नाहीत. नुसते दुखतात. आता मी फार मोठा दादा वगैरे नाही, ही जाणीव नाही, तर जाणीव आहे त्या माझ्या उघडणाऱ्या अंधाऱ्या जागांची.

माझ्या डोक्यातील कमिटी सुरू होते. मी वाईट आहे. कुणीही माझी पर्वा करत नाही, कारण मी तेवढ्या लायकीचा नाही. मी घाणीहून हीन आहे, कारण लोक त्यांच्या शूजवरील घाण तरी पुसतात; परंतु मी कोणाला दिसू शकत नाही. ते सर्व माझ्याजवळून घाईनं जातायत, कारण मी अदृश्य माणूस आहे.

डेव्ह हा नेहमीप्रमाणे स्वच्छतागृहाच्या बाजूला आहे आणि बुट्स त्याच्या बाजूला गुंडाळी करून आहे. तो न बोलता भीक मागतोय. तो गरीब, लीन तऱ्हेचा भिकारी आहे. तो लोकांना घाबरविण्याचा प्रयत्न करत नाही किंवा त्यांना आपल्याकडे बघायलाही भाग पाडत नाही आणि लोक त्याला नुसतेच पैसेच देत नाहीत, तर कधीमधी ते थांबून त्याची चौकशी करतात. या वाईट दुनियेतील इतका चांगल्या स्वभावाचा माणूस तो आहे, की तो काय आहे हे समजण्यासाठी तुम्हाला त्याच्याशी फार वेळ बोलायला नको.

आता या घडीला एक मुलगी त्याच्यावर वाकलीय. ती पौर्वात्य वाटतेय. श्रीमंत वाटते. तिचे काळे केस ज्या तऱ्हेनं कापलेत त्यावरून तुम्ही हे सांगू शकता. तिच्या शूजवरून सांगू शकता. तिच्या कपड्यांवरून सांगू शकता, बरबेरी स्कार्फ आणि एक हलक्या पिवळ्या रंगाचा रेनकोट. मी ज्या डिझायनर्सच्या दुकानावरून जातो, तिथे मी असले कपडे पाहिलेले आहेत. त्याची सुरुवात व्ही नं होते.

व्हॅलेंटिना? व्हर्सेस?

दुसरी गोष्ट मला समजते, की डेव्ह उठून बसत आहे आणि ती मुलगी आणि तो बरोबर चालत आहेत. बुट्स नेहमीप्रमाणे त्यांच्यामागे एक पाऊल आहे. ते माझ्याकडे चालत येत आहेत. जाताना ते थांबतात.

"हा माझा मित्र मार्क." डेव्ह सावकाशपणे सांगतो. तो मला म्हणतो, "आम्ही नाश्ता घेण्यासाठी चाललोय."

"तू पण येशील?" ती स्त्री विचारते. ती पंचवीशीची आहे आणि सुंदर आणि श्रीमंत आहे. मला कामासाठी कुणाला भेटायचंय असं आधी ठरलेलं नाहीये, त्यामुळे मी पण उभा राहतो.

"तू कुठून आलीस?"मी विचारतो.

"जपान."

"ओ, जपान, फारच छान." डेव्ह माझ्याकडे कटाक्ष टाकतो. तो कटाक्ष म्हणतो, "चुत्या मार्क, तुला जपानबद्दल काय माहिती आहे?" मी त्याच्याकडे कटाक्ष टाकतो. तो कटाक्ष सांगतो, "ही स्त्री आपल्याकडे येणं ही फार आनंदाची घडलेली गोष्ट आहे. तिच्याकडून डेव्ह तुला पुष्कळ पैसे मिळतील."

आम्ही आमच्या जगातून वाट काढत रूपर्ट स्ट्रीटवर जातो. जेव्हा ती आम्हाला एका दुकानाजवळ थांबलेलं पाहते. ती आम्हाला काय हवं म्हणून विचारते.

"कॅस्टेल सुपर स्टेन्थचे दोन कॅन्स आमच्या नाश्त्याबरोबर छान होतील." मी तिला सांगतो आणि ती आम्हाला दुकानात घेऊन जाते आणि जणू काही हे सामान्य असल्यागत ती आम्हाला प्रत्येकी दोन कॅन्स घेऊन देते, त्यामुळे जपानमध्ये लोक नाश्त्यासाठी हे घेत असावेत.

वारडोअर स्ट्रीटवरून वर आणि रेमांड रेव्ह्यू गल्लीतून. त्या जपानी स्त्रीनं छोटे उंच टाचेचे बूट घातले आहेत आणि त्याच्या टकटक आवाजाचा प्रतिध्वनी येतोय. पाऊस पडतोय. ती आपला पिवळट रेनकोट वर काढते.

आम्ही एका तेलकट कॅफेजवळ थांबतो आणि ती स्त्री आपल्या सुंदर कपड्यांत तिथे एका जागी बसते आणि जरी ती या असल्या जागेतून खात नसली, तरी ती तसं दाखवत नाही. कॅस्टेलबरोबर खाण्यासाठी आम्ही भरपूर नाश्ता मागवतो. ती कॉफी घेते आणि या सर्व वेळ डेव्ह आणि मी तिची करमणूक करत असतो. एखादी समाजात प्रथमच लोकांपुढे येणारी ही आमच्या बुद्धिचातुर्यानं आणि मोहकतेमुळे आनंदित होईल. रस्त्यावर राहण्याबद्दल ती विचारते आणि आम्ही तिला चांगल्या कथा ऐकवतो आणि जेव्हा मी डेव्हचं लक्ष वेधतो, तेव्हा त्याच्या डोळ्यांत एक आश्वासन दिसतं, की तो तिनं पैसे द्यावे, भरपूर पैसे द्यावे, यासाठी

बडबड करतोय.

नेहमीची जाणवणारी अस्वस्थतता आणि आताही इंजेक्शनची जाणवणारी निकडही. सबंध इंग्लिश नाश्ता घेतला, तरी त्या निकडेचं समाधान करू शकत नाही. मी सांगतो, की मला जायला हवं. ती आपल्या त्या तपकिरी शिवून घेतलेल्या बॅगेत हात घालते आणि मला किती पैसे हवेत म्हणून विचारते. मी चाळीस पौंडाचा अंदाज देतो. मला दिसतं, की तिच्या पर्समध्ये शेकड्यांवर पैसे आहेत. ती माझ्याकडे पाहून हसते आणि तिचं हे हास्य गोड आहे. तिचे केस तिच्या एका डोळ्यावर येतात. ती ते मागे सारते. ती सुंदर आहे आणि साधी सरळ आहे.

मी परत येईन, असं सांगत पैसे घेऊन पुढे जातो. मी कशासाठी जातोय, हे त्याला माहीत आहे. मी ते कॅफे सोडण्याआधीच ती दोघं एकमेकांशी बोलण्यात गढून गेलीत. ती बोलण्यात इतकी गुंतली आहेत, जेव्हा मी ड्रगचा सौदा करून परततो, तेव्हा मला असं वाटतं, की डेव्ह तिच्याकडून पन्नास पौंड नव्हे, तर आणखी पैसे उकळणार. मी घेतलेल्या त्या पुड्या मी माझ्या उपयोगासाठी ठेवाव्यात. मी जेव्हा इंजेक्शन घेतो, तेव्हा परत जायचं विसरतो.

मी माझ्या कामात दिवस घालवतो आणि मी डेव्ह आणि त्या जपानी मुलीचा विचारही करत नाही आणि मग मध्यरात्री पूर्वी मला ती पुन्हा दिसते. मी शॉफ्टस्बरी ॲव्हेन्यूवरून खाली चालत चाललोय आणि ती चायना टाऊनजवळ असलेल्या अग्निशमनदलावरून येत आहे आणि ती जोरजोरानं मला हातवारे करत आहे.

"मार्क, मार्क!"

मी ताबडतोब तिच्याकडे जातो. ती अस्वस्थ वाटते. ती मला डेव्हला पाहिलं का, असं विचारते.

"नाही, का?"

"कारण तो माझ्यासाठी काहीतरी घेण्यासाठी गेलाय आणि तो अजून परत आलेला नाही." ती सांगते.

"तुझ्यासाठी तो काय घ्यायला गेलाय?" मी विचारतो. याचा अर्थ तिनं आपल्या पाकिटातील सर्व पैसे डेव्हच्या झोळीत टाकलेत आणि तो कुठेतरी ड्रग्ज घ्यायला गेलाय; परंतु ती माझा प्रश्न गंभीरपणे घेते आणि आपल्या तपकिरी बॅगेतून एक कार्ड काढते.

"मी ते उच्चारू शकत नाही."

त्या कार्डाच्या एका बाजूला तिच्या बेकर स्ट्रीटवरील हॉटेलाचं नाव आहे. मी ते सुलट करतो. त्याच्या पाठीवर जे शब्द ती उच्चारू शकत नाही, ते तिनं लिहिलेत. सायनाईड सल्फेट.

मी तिच्याकडे पाहतच राहतो.

"सायनाईड सल्फेट?" मी म्हणतो. "सायनाईड?"

ती मुलगी आपल्या मोडक्यातोडक्या भाषेत आपल्याला जीव द्यायचा आहे, असं सांगते. ती निराश झालेली आहे आणि तिला जपानला परत जायचं नाहीये. त्या तिथे ती आपल्या क्रूर नवऱ्याला घटस्फोट देणार आहे. जो तिला मारतो आणि वाईट वागवतो. त्यापेक्षा मरण बरं असं तिला वाटतं.

"आता असं बघ, हे काही इतकं वाईट असणार नाही." मी म्हणतो आणि बडबडतो. "मी बेघर आहे, तरी मी हसतोय."

मी तिच्याकडे माझे घाणेरडे झालेले दात विचकून हसतो; पण तिची करमणूक होत नाही. तिला ते सायनाईड हवंय आणि डेव्हनं ते आणून देण्याबद्दल सांगितलंय.

अर्थात, डेव्हनं तिला बनवलंय; परंतु तो निघून गेलेला आहे, तेव्हा मी म्हणतो, की मी तिला मदत करीन.

"डेव्हनं तुझ्याकडून किती पैसे घेतले?" मी विचारतो.

"दोनशे पौंड!"

"दोनशे पौंड! प्लीज मला तुला मदत करू दे."

"डेव्हनं पैसे घेतलेले नाहीत. पैसे इथेच आहेत."

त्याचा अर्थ डेव्हनं तिला बनवलेलं नाही. याचा अर्थ मी बनवू शकेन. मी वर पाहतो. देवा, तुझे आभार.

आम्ही दोघं एकत्र ऑक्सफर्ड स्ट्रीटवर येतो आणि मी तिला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो, फक्त मी एवढा जोरदार प्रयत्न करत नाही, कारण जर तिला खरंच मरायचं असेल, तर मला दोनशे पौंड मिळतील. चेरींग क्रॉस रोडच्या वरच्या बाजूला आम्ही उजवीकडे वळतो आणि बसथांब्याच्या शेड खाली दरवाज्यात कृष्णवर्णी विक्रेते दाटीनं जमलेले आहेत. ते नेहमीच हास्यास्पद दिसतात. ते आपण बससाठी वाट पाहत असल्याचं नाटक करतात; पण कुणीही सांगेल, की ते ड्रगविक्रेते आहेत.

मी त्या स्त्रीला बाजूच्या रस्त्यावर नेतो आणि तिला सांगतो, ते तिथे लोक आहेत आणि त्यांच्याकडे तुला पाहिजे ते आहे.

"किती?" ती विचारते.

"दोनशे पौंड." मी सांगतो.

ती आपल्या हातातील बॅगेतून आपली पर्स काढते आणि मला रक्कम देते. त्या नोटा स्पर्शाला इतक्या छान वाटतात, की त्या माझे हात उबदार करतात.

"आता तू माझी बॅग धर," मी तिला सूचना करतो. "त्यावरून तुला कळेल, की मी पळून जाणार नाही." काय वेडगळपणे बोलण्याची ही पद्धत आहे? पहिल्यांदा म्हणजे मी असं काही करीन असं तिला वाटलेलं नाही. ती साधी आणि

विश्वास ठेवणारी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे माझ्या बॅगेत कचराच आहे, थोड्या सुया, लिंबूफूल, घाणेरडं पाणी भरलेली बाटली आणि अर्धे स्निकर्स, त्याची किंमत दोन पौंड इतकीही नाही. दोनशे पौंडाची बातच सोडा; परंतु ती बॅग आपल्याजवळ घट्ट धरते, जणू काही ती बॅग व्हर्सेसवरून आलेय.

मी चार पुड्या क्रॅकच्या आणि चार हेरॉईनच्या विकत घेतो आणि त्याही योग्य किमतीत आणि मग सुटे पैसे ठेवतो. ते काही सायनाईड सल्फेट नाही; पण प्रत्येकाची एक पुडी घेतली, जर तिला या अशा जोरदार ड्रगची सवय नसेल, तर त्या तिला संपवतील. तिला तिच्या पैशात जे हवंय, ते खात्रीनं मिळावं म्हणून मी प्रत्येकी दोन पुड्या तिला द्यायचं ठरवलं आहे.

मी भुयारी कारपार्कवरून तिला उतारावर घेऊन जातो. या रात्रीच्या वेळी तिथे शांतता आहे, फक्त जंकीज विव्हळत आहेत तेवढेच. मी तिला दोन पुड्या ब्राऊन आणि व्हाईटच्या देतो, लिंबूफूल आणि सामान देतो आणि ते कसं घ्यायचं ते सांगतो. ती काळजीपूर्वक ऐकते. पुन्हा मला ते सांगायला सांगते. मान डोलावते. तर मग तिनं जे काही मागितलं होतं, ते मी केलंय आणि आता ती आपल्या हॉटेलकडे ते करायला जाते.

ती इकडेतिकडे पाहते, "आज रात्री तू कुठे झोपणार?"

"इथेच जवळपास कुठेतरी. कदाचित एखाद्या दरवाज्यात."

ती आपलं डोकं हलवते.

"नाही, आज रात्रीसाठी मी तुला हॉटेलचे पैसे देते. "

आम्ही टॅक्सीत बसतो. आम्ही गप्प आहोत. ती काहीशी निस्तेज आणि घाबरलेली वाटते. ती खरंच स्वत:ला ठार मारणार आहे का? मी बोलायला सुरुवात करतो; पण ती खुणेनं मला गप्प राहायला सांगते. तिनं निश्चयच केलेला आहे. जेव्हा आम्ही रसेल स्क्वेअर आणि किंग्ज क्रॉसच्या मध्ये असतो, मी एका स्वस्त हॉटेलकडे बोट दाखवतो. ती मला साठ पौंड देते आणि मग आम्ही निरोप घेतो. ती मला आत जाईपर्यंत पाहते आणि जेव्हा मी पुढच्या हॉलमध्ये जातो, मी तिला टॅक्सीतून जाताना पाहतो. तिच्या त्या डिझायनर बॅगमध्ये ड्रग भरलेले आहेत आणि ते तिला तिच्या हॉटेलमध्ये खलास करतील.

इथे स्वागतकक्षात एक रशियन माणूस आहे. मला काळजी वाटते, की मी त्याला तिथे राहायला नको असेन; परंतु तो माझ्याकडे कशीबशी नजर टाकतो. ती अशी जागा आहे, जिथे खोल्या तासावर भाड्यानं देतात आणि प्रश्न विचारत नाहीत.

मी माझ्या खोलीत जातो आणि संध्याकाळच्या एवढ्या फायदेशीर कामाबद्दल स्वत:चं अभिनंदन करतो. माझ्याकडे ड्रग्ज आहेत, मला झोपायला पलंग आहे. माझ्याकडे पैसे आहेत आणि आता मी इंजेक्शन घेऊ शकेन. ती धावपळ संपल्यावर

नेहमीप्रमाणे विभ्रमावस्था सुरू होते; परंतु या वेळी ही विभ्रमावस्था वेगळी आहे. मी जे काही केलंय, त्याच्या भीतीनं पार गठाळून जातो. त्या बाईला स्वत:ला ठार मारायचं होतं आणि मी तिला मदत केली. जणू काही मीच तिच्या हातात सुई घुसवली होती. कदाचित जणू काही मीच तिला ठार केली असावी. मी बहुधा तिला ठार मारली आहे.

मला एवढा धक्का बसलाय आणि मी एवढा घाबरलोय आणि दु:खी झालोय, की मला आता मरावंसं वाटतं. क्रॅक घेतल्यानंतर ती विभ्रमावस्था गुन्ह्यापेक्षा जास्त होती. हे नक्की आहे, की माझा शोध घेतला जाईल आणि मला पकडलं जाईल. मी जमिनीवर पडतो आणि दरवाज्याच्या खालून येणाऱ्या उजेडाच्या पट्ट्याकडे कान लावतो. तिथे कुणी हालचाल करतंय, बोलतंय का? ते माझ्यासाठी येतायत का? मी इतका कान लावून ऐकत असतो, की मी श्वासोच्छ्वासही घेण्याची हिंमत करत नाही. सरतेशेवटी मी इथे झोपी जातो आणि जमिनीवर जागा होतो. मी हॉटेलमधून बाहेर पडतो आणि ड्रग घ्यायला जातो.

जेव्हा मला गिन्ज भेटतो, मी त्याला सर्व कहाणी सांगतो. मी ती माझ्या मनातून काढून टाकू शकत नाही. गिन्ज ऐकतो; पण काही बोलत नाही; परंतु मला लवकरच कळतं, की त्यानं डेव्हला सर्व काही सांगितलंय, कारण जेव्हा मी कोणाच्याही बाजूनं जातो, त्यांच्याकडे माझ्यासाठी निरोप असतो. डेव्ह रागावलाय. तो तुला शोधतोय. दुसऱ्या वेळी मी गिन्जला भेटतो, तेव्हा म्हणतो, की डेव्ह हा माझ्यावर बहुतेक रागावलाय, कारण डेव्हला त्या जपानी स्त्रीकडून दोनशे पौंड उकळायचे होते; परंतु गिन्ज नाही म्हणतो. डेव्ह चिडलाय, कारण त्या जपानी स्त्रीला मी ड्रग द्यायला नको होते आणि मला माहीत आहे, की त्याचं बरोबर आहे आणि त्यामुळे जास्त दु:ख होतं.

मी काही काळ पिकॅडली सर्कसजवळ जात नाही. मी माझ्या कामात व्यग्र असतो; परंतु तो सर्व वेळ मला जाणवत असतं, की मी कुणाला तरी मारलंय आणि ती व्यक्ती काही वेस्ट कंट्रीमधली जॉनसारखी किंवा अगणित हजारो लोक, ज्यांना मी माल पुरवलाय त्यांच्यासारखी व्यसनी नव्हती. ती एक निराश झालेली दूर देशची स्त्री होती. डेव्हला राग येणं स्वाभाविक आहे; परंतु माझ्या मनाची ही एक झलक आहे जी मी इंजेक्शन घेऊन अंधूक करू शकेन.

काही दिवसांनंतर डेव्हला मी सापडतो. तो एकटा नाही, त्याच्याबरोबर इतर मुलं आहेत.

"मी तुला शोधतोय." तो ओरडतो. त्याचा चेहरा लाल, रागावलेला आणि वेडावाकडा झालेला आहे. "चुत्या तिला हे असं कसं करू शकलास? साला हरामी!"

"ती चुती मेलीय की, नाही याची तुला काही माहिती नाही." मी ओरडतो.

"मला माहीत आहे, माहीत आहे, कारण ती मला भेटणार होती आणि ती आली नाही. मार्क ती फार चांगली होती. तू तिला ते हेरॉईन, क्रॅक आणि सामान का दिलंस?"

"तूही तेच केलं असतंस." मी तिरसटपणे सांगतो.

"मी दिलं नसतं मार्क. मी च्यायला दिलं नसतं."

मला आता जाणवतं, की मी तिला रिकामी पुडी देऊन बनवू शकलो असतो आणि माझ्याकडे जास्त माल राहिला असता आणि ती जिवंत राहिली असती किंवा मी तिचे दोनशे पौंड घेऊन पळून गेलो असतो आणि तिच्या हातात ती सुया ठेवलेली जुनी, घाणेरडी पिशवी राहिली असती; परंतु त्याऐवजी मी प्रामाणिकपणे तिला ते आत्महत्या करण्याचं शस्त्र दिलं होतं.

"चुत्या, मला तुला ठार करावंसं वाटतंय!" डेव्ह किंचाळतो.

तो माझ्याकडे येऊ लागतो; पण मी चपळ आहे. मी माझा सुरा काढतो आणि तो त्याच्यावर आणि त्याच्या भोवताली असलेल्या मुलांवर उगारतो.

"चुत्यांनो जर तुम्ही कोणी माझ्याजवळ आलात, तर मी तुम्हाला कापून काढीन."

सामान्य लोक या रस्त्यावरून जातायत. आमच्याकडे न पाहता ते आमच्यापासून दूर, गोल फिरून जातात. त्यांच्या तोंडावर वीट आल्याची भावना आहे, कारण आम्ही रस्त्यावरची व्यसनी माणसं आहोत, शिव्या देणारे आणि परस्परांशी भांडणारे आणि या भांडणांना तसं काही कारण लागत नाही.

डेव्ह वळतो आणि चालू लागतो. समोरासमोर ठाकून भांडण न करावं लागल्यामुळे मला आनंद वाटतो. मी गेले कित्येक दिवस हे टाळतोय; पण एका अर्थी ते संपलेलंही नाही. मी त्या जपानी मुलीला मारलं, ही जाणीव ठेवून मला जगायचंय आणि डेव्ह आणि त्याच्या प्रेमळपणाशिवाय मला रस्त्यावर जगायचंय. डेव्ह नेहमीच माझ्यासाठी होता. जेव्हा मी अगदी पार निराश झालेला असे, तेव्हा एखाद्या सहनशील आई-बापांसारखा तो होता. डेव्ह हा एकच माणूस माझ्या प्रकृतीची काळजी करतो, मला डॉक्टरकडे जायला सांगतो आणि माझ्या पायांवर औषधोपचार करायला नेतो.

मी निराशेच्या अशा गर्तेत जातो, की जी ड्रगसुद्धा कमी करू शकत नाही. काही मागच्या रस्त्यांवर जाऊन तेथील दरवाज्यांजवळ झोपून मी स्वत:ला दूर ठेवतो.

जेव्हा मी एका निर्जन दुकानाच्या दरवाज्यात जागा होतो, तेव्हा मी इतक्या वाईट तऱ्हेनं थरथरत असतो, की मला जाणवतं, की मी हे वेडेपणाचं जीवन जगू शकणार नाही. मी इतका इतका थकलोय, मला उठून फिरायचीही ताकद नाही.

मला असं दिसतं, की काही वर्षं मला सर्वांत वाटणारी भीती म्हणजे आजारी पडण्याची. ही थरथर, रॅटेल थांबवण्यासाठी, मी माझं सर्व आयुष्य खर्ची घातलंय आणि असं असता तिच्याशी झगडण्याइतकी ताकदही मी गोळा करू शकत नाही. मी शरण जाईन. एका जागी राहीन आणि ही थरथर सोसत, माझ्या अंगावरील उवांना खाजवत या दरवाज्यात मरेपर्यंत पडून राहीन.

थोड्या वेळानं तो आजार, त्या नैराश्यापेक्षाही जास्त वाढतो. मी विस्तवावर असल्यागत. जेव्हा माझ्या शरीराचे वेदनेनं तुकडे पडत असतात, मी स्वत:ला पायांवर उभं करण्यासाठी धडपडतो. मी काळजीपूर्वक एखाद्या म्हाताऱ्या माणसासारखा उभा राहण्याचा प्रयत्न करतो. जर मी माझे पाय दुमडले, तर माझ्या ढोपरांच्या वाट्या बाहेर पडतील असं वाटतं, कारण माझ्या पायांच्या मागच्या बाजूला आता मांसच उरलेलं नाही.

हळूहळू कसाबसा मी चालू लागतो. माझे सांधे हे गंजलेल्या पिस्टनसारखे आहेत. मी त्यांची हालचाल सुरू करतो. आळसावलेलं जुनं मशिन पुन्हा काम करू लागतं. माझ्या पायांवरच्या जखमा या एखाद्या लांडग्यांच्या झुंडीसारख्या माझं मांस फाडू लागतात. ही त्या रॅटलपेक्षा वेगळ्या तऱ्हेची वेदना आहे, जास्त वरवरची, जास्त त्रास देणारी; परंतु दुर्लक्ष करायला सोपी.

मला गॉबी गाझ भेटतो. तो पूर्वीचा पुरुष मॉडेल होता. आता तो व्हायरसनं उद्ध्वस्त झालाय. त्याच्या अंगावर उघडी गळवं आहेत आणि ती आतून कुजलेली आहेत आणि त्याला तसाच कुजका वास येतोय. आम्ही एकत्र येतो. आम्ही दोघं एका कोक कॅनमधून सुयांची आणि रक्ताची वाटणी करत इंजेक्शन घेतो.

दहा मिनिटं आणि मी पूर्ववत होईन आणि पुन्हा कार्यरत होईन. इंजेक्शननं मला नीट केलं, की मी पुन्हा कार्यव्यग्र राहतो; परंतु मला त्या क्रॅकपासून काही ती धुंदी येत नाही. आकाशाकडे झेपावणाऱ्या रॉकेटचं इंधन ते पृथ्वीच्या वातावरणात पोहोचण्याआधीच संपतं. आज सूर्याभोवती फेऱ्या घालणं नाही, फक्त कोसळणं आणि ते हेरॉईनही परिस्थिती सुधारत नाही. माझ्या शारीरिक वेदनाही कमी झालेल्या नाहीत, की माझं नैराश्यही.

गेल्या वेळी घेतलेलं इंजेक्शन, हे एखाद्या गायफॉक्स रात्री दमट दारूकाम उडवण्यासारखं होतं आणि त्याच्या आधीचंही त्यापेक्षा काही जास्त बरं नव्हतं.

ड्रग्ज आता माझ्यावर यापुढे अंमल चढवू शकत नाही, निदान पूर्वीसारखं तरी नाही. ती शक्यता माझा पाठलाग करते. याचा मला धक्का बसतो. मला भीती वाटते. ड्रग्ज मला सोडून चाललेत! मी दु:खी झालोय.

मी दरवाज्यात उभा राहून त्या अंधारलेल्या आकाशाकडे पाहतो. रडू लागतो. माझं शरीर हुंदक्यानं बदबदतं. पूर्वी कधीही रडलो नव्हतो, इतका मी आता रडतो.

गॉबी माझ्याकडे पाहतो मग तो माझ्याभोवती हात टाकतो. मी धाय मोकलून रडत असताना जाणारे-येणारे टक लावून पाहतात किंवा पटकन दुसरीकडे पाहतात. मी एकोणतीस वर्षांचा आहे आणि निराश आहे.

पाऊस पडायला सुरुवात झालेय. तिथे कोपऱ्यावर एक चर्च आहे. त्याला अंगण आहे आणि त्या अंगणात एक झाड आहे. ते मला आवडतं आणि आता मी तिकडे जातोय. ते झाड खूप ठेंगणं आहे. हिरवंगार आहे आणि त्याच्या त्या अणकुचीदार पानांत छोटी तिरकी फळं आहेत. त्याच्या रुंद फांद्या या फरसबंदीवर पसरल्या आहेत. त्या जवळजवळ फरसबंदीला भिडल्यात. मी पाठीवर पडतो आणि त्याच्याखाली धडपडत जातो.

इथे एक दुसरं जग आहे, माझं नसलेलं जग, झाडांचं जग. त्याच्या घट्ट फांद्यांत कोरडेपणा आणि एक वेगळीच ढब आहे. रहदारीमुळे, पादचाऱ्यांच्या पायांमुळे उडणारी धूळ इथे घुसलेली नाही आणि या झाडांची सूचीपर्णी पानं ही ताजी गडद हिरवी आणि त्यांचा हिरवा रंग दूरच्या जंगलातल्यासारखा आहे. त्याचं खोड वर चढलंय; पण ज्यांना त्यानं आधार दिलाय, त्या फांद्यांनीच ते दिसेनासं झालंय, त्यामुळे मी त्याचा शेंडा पाहू शकत नाही. कदाचित, त्या झाडाला शेंडाच नसेल, कदाचित, हे झाडांचं जग निरंतर असेल. याच्या या फांद्या आणि त्यांना चिकटलेली सुईसारखी पानं आणि तिरकी फळं मला मिठीत घेतात असं वाटतं. ते मला गुंडाळून घेतात. मला इथे सुरक्षित वाटतं. त्या झाडाला माझी काळजी आहे आणि ते माझं पालन करतंय.

जेव्हा मला शक्ती आल्यासारखं वाटतं, मी ओल्ड क्रॉम्टन स्ट्रीटकडे चालत जातो. एक दरवाजा शोधतो आणि स्वत:ची गुंडाळी करून झोपतो. सकाळी जाग येते, वेदना होतात, मला जाणवतं, की पावलं इथून गेलीत आणि परत आलीत. कदाचित कोणीतरी मला पैसे देणार आहे किंवा माझ्याशी बोलणार किंवा मला मारणार आहे. मी स्वत:ला आणखी गुंडाळून घेतो.

आता ती पावलं अगदी माझ्यासमोर उभी आहेत. एक आवाज म्हणतो, "मार्क? मि. मार्क जॉन्सन? तो तूच आहेस का?" तो कोणा जंकीचा आवाज नाही. तो या पृथ्वीवरच्या सामान्य माणसाचा आवाज आहे.

व्यवस्थित दिसावं, म्हणून स्वत:ची गुंडाळी मोकळी करत हळूच वर पाहतो. त्या माणसाचा चेहरा माझ्याकडे टक लावून पाहतोय आणि तो ओळखीचा आहे. मोठे तपकिरी डोळे, काहीशी कमावलेली तुकतुकीत त्वचा, तो काहीसा ऐटदार आणि निरोगी आहे. त्याचे कपडे नव्या धर्तीचे आहेत. एक आकर्षक माणूस; पण तो कोण आहे? तो दुसऱ्या काळातील, दुसऱ्या जागेतील आहे. कोण? कुठचा?

"मार्क, मी सीन इव्हान्स."

सीन इव्हान्स...

"नॉटिंगहॅममधील डीआयवाय? अंगेजचा मित्र?"

अंगेज, ती आर्टिस्ट ज्या वेळी रोझीनं मला सोडलं, त्या वेळी जिच्या मी जास्त संपर्कात आलो ती. मी त्या वेळी फोटोग्राफी शिकत होतो. अंगेज डीआयवायसाठी पडदे आणि तेथील सेटची दृश्यं तयार करायची. सीन हा तिचा समलिंगी मित्र होता. मी त्याला नॉटिंगहॅममध्ये भेटलो होतो. तो सायकॉलॉजीचा अभ्यास करत होता आणि तो डीआयवायच्या घोळक्याच्या जवळचा होता आणि तोच सीन इव्हान्स हा त्या लंडनमधील ओल्ड क्रॉम्टन स्ट्रीटवरून चाललाय आणि त्यानं मला दरवाज्यात झोपलेलं पाहिलं. मी अचानक इतका थकलोय, की मला शरम वाटत नाही. मी इतका थकलोय, की मला बोलवत नाही.

मी त्याला अभिवादन करायचा प्रयत्न करतो; परंतु ते कसं करायचं, तेही मला माहीत नाही, हसायचं कसं, तेही मला आठवत नाही.

"मग काय मि. जॉन्सन!" तो आपले हात एकमेकांवर ठेवतो. "आता मला सांग, की तू इथे काय करतोयस?"

ते जुने बेफाम दिवस, त्या प्रदीर्घ, आनंदी रात्री, त्या बेफाम पार्टीज, ते सुंदर संगीत, त्या चांगल्या ड्रग्ज, ती मैत्री, ते सर्व तारुण्य आणि सौंदर्य, पॅननं दिलेला आशीर्वाद या सर्वांनी मला इथे ओल्ड क्रॉम्टन स्ट्रीटवरील दरवाज्याजवळ पोहोचवलंय.

मी म्हणतो, "मी हरलोय, पराजित झालोय."

सीन अधिकारवाणीनं सांगतो,"हं, हे असं तू हरलायंस म्हणून चालणार नाहीस. मी तुला मदत करू शकतो."

मी त्याच्याकडे पाहतो. ड्रग्ज घ्यायला ते जात असले आणि मला बरोबर घेणार असले, तर ते सोडून मला कुणीही मदत करू शकणार नाही.

तो सांगतो, "मी इथे लंडनमध्ये काम करतो, टर्निंग पॉइंटसाठी."

टर्निंग पॉइंट, बर्मिंगहॅममधील ते मोठं घर, जिथे मी पुनर्वसनासाठी गेलो होतो. त्या जागेचं तर हे नाव नाही ना? हं, हं, हजारो वर्षांपूर्वीचं?

"आम्ही वॉरडॉयर स्ट्रीटवर आहोत. मी तिथे ड्रगपासून मुक्त झालेला एक कार्यकर्ता आहे. जर तुझी काही समस्या असेल, तर मी तुला मदत करू शकतो."

तो मदतीसाठी आहे, हे दाखवण्यासाठी काही गमतीदार हालचाली करतो. मी डोरोथी आहे आणि मला आता बुजगावणं, सिंह आणि पत्र्याचा माणूस हे सर्व एकत्रपणे दिसतात. हे सारं इतकं असंभाव्य आहे, की त्याचे ते शब्द पचनी पडायला मला वेळ लागतो. मला माहीत आहे, की कम्युनिटी ॲक्शनचे संघ रस्त्यावर आहेत आणि ते माझ्यासारखे लोक शोधत आहेत; पण त्यापैकी एकालाही मी अजूनपर्यंत सापडलेला नाही. मी हॉस्टेलकडे जात नाही, कारण मला तिथे

अडकवलं जाईल आणि माझ्यावर दादागिरी केली जाईल, अशी मला भीती वाटते. मी सूप वाटणाऱ्या स्वयंपाकघरांजवळही थांबत नाही. मी एकटाच आहे, कारण मला एकटंच राहायचंय; परंतु दुसरे काही लोक कम्युनिटी ॲक्शनमुळे रस्त्यावरून नाहीसे होतात आणि काही वेळा असं दिसतं, की त्यांनी मला सोडून सर्वांना मदत केलीय. जणू काही कोणत्यातरी चाळणीतून मी निसटलोय, कारण मी अदृश्य आहे.

"मार्क, जर तुला ड्रग्ज थांबवायचे असतील, तर मी तुला मदत करू शकतो."

अर्थात, मला ड्रग्जपासून, या वेडसर आयुष्यापासून मुक्त व्हायचंय; परंतु दुसरा मार्ग कोणता, त्याची मला कल्पना येत नाही.

"तू माझ्याबरोबर चल. मार्क जॉन्सन, आपण काय करायचं ते बघू."

परंतु मी आता येत नाही. मला यावर विचार करायला हवा. ख्रिसमसमध्ये रस्त्यावरून निघायचा मी प्रयत्न केला; पण तो अनर्थच ठरला. सीन मग मला टर्निंग पॉइंटला कसं यायचं, ते सांगतो आणि मी त्याला आश्वासन देतो, की मी नंतर तिथे येईन. सीनला भेटायचं की नाही, हे ठरवण्याबद्दल मला काही दिवस लागतात. दुसऱ्या जगातील तो एक आहे. ज्याला आठवतं, की मी सर्व काळ भटक्या नव्हतो, मी सर्व काळ अदृश्यही नव्हतो.

त्या ऑफीसची सजावट ही सफेद रंगाची हॉस्पिटलसारखी आहे. जणू काही ती नोकरदार वर्गानं लोकांना अस्वस्थ वाटावं म्हणून केलेली आहे. सीन मात्र मला प्रेमानं भेटतो. इथे आलेल्या अनेक बेघर लोकांपेक्षा मी वेगळा असल्याचं तो मला दाखवून देतो. मी खास आहे, कारण तो जुन्या मार्कला ओळखतो. आम्ही बाहेर एका कॅफेत चहा प्यायला जातो. सीन मला विचारतो, की खरंच मला हेरॉईन सोडायचंय का? अर्थात, मला सोडायचंय. यात काही प्रश्नच नाही. तो म्हणतो, की तो मला ड्रग उतरविण्याचं खास औषध देण्याचा प्रयत्न करील.

"त्याचा काही उपयोग होत नाही." मी सांगतो. मला त्या ड्रग उतरविण्याच्या अनेक जागांची माहिती आहे. इथे तुम्ही ड्रग न घेतल्यामुळे येणारी प्रतिक्रिया सोसत असता. मग तुम्ही सरळ बाहेर येता आणि पुन्हा ड्रग घेता.

"जर तुम्हाला हवं असेल, तर त्याचा उपयोग होतो. ड्रग्ज उतरविण्याची औषधं घेऊन तुम्ही त्या व्यसनापासून झटकन बरे होत नाही. असं बरं होणाऱ्यांना जास्त आधाराची गरज आहे. त्यानंतर तुम्ही पुनर्वसन केंद्रात जाता."

पुनर्वसन केंद्र. खरं सांगायचं, तर माझा मागचा पुनर्वसन केंद्राचा अनुभव मोठा विनोदी होता.

"तुला खरंच हे व्यसन थांबवायचंय का?" त्या मोठ्या तपकिरी डोळ्यांनी

माझ्याकडे पाहत सीन विचारतो. "काही लोकांना हे करण्यासाठी अगदी अधोगतीपर्यंत पोहोचावं लागतं."

मी प्रत्येक रात्र रस्त्यावर झोपतोय आणि ड्रग्ज विकून आणि चोऱ्या करून उदरनिर्वाह करतोय, यापेक्षा आणखी अधोगती काय उरलीय?

मग मला मी त्यातून गेलोय त्या साऱ्या अधोगती आठवतात. तुरुंगात गेल्याची अधोगती, तीसुद्धा गुन्हा केल्याचं आठवत नसताना. ती अधोगती जिथे मी माझ्या वेश्या मैत्रिणीला मला क्रॅक आणखी हवं, म्हणून गिऱ्हाईकं घ्यायला लावली. ती अधोगती, माझं मन ड्रग्जमध्ये गुरफटवून कोसळण्याची. मुलगा असणं आणि त्याचा नीट संभाळ न करता येणं. कारच्या मागच्या सीटवर बसून इंजेक्शन घेणं आणि त्यानं गप्प राहावं म्हणून पुढच्या सीटवर मिठाई टाकणं, ही अधोगती. त्या अमेरिकेच्या टूरमध्ये हेरॉईनवरून माझं लक्ष उडून दुसऱ्या ड्रग्ज घ्याव्या म्हणून मी काहीही केलं होतं, ती अधोगती. ती अधोगती म्हणजे वाईटातील वाईट कॉलनींच्या जागी तिथे सौदा करण्यासाठी घुटमळणं. ती अधोगती म्हणजे स्वत:च्या मुलांना शंभर तीक्ष्ण डोळे पाहत असताना भेटणं; परंतु यातली कोणतीच खरी अधोगती नव्हती. मी समुद्रात खाली खोल बुडत असताना त्या समुद्रात खाली टाकलेल्या अरुंद फळ्या होत्या. आता मी तळाला पोहोचलोय. मी बेघर आहे आणि कृश झालोय, एकाकी आहे आणि ड्रग्जचा परिणाम आता माझ्यावर होत नाहीये. हो, सीन मला आता बदलण्याची इच्छा आहे.

■

३४

दुसऱ्या दिवशी मी टर्निंग पॉइंटला जातो. सीन म्हणतो, की त्याला अजूनही त्या ड्रग्ज उतरविण्याच्या जागेत माझ्यासाठी जागा मिळालेली नाही. परंतु या मधल्या काळात तो मला एका तात्पुरत्या हॉस्टेलमध्ये ठेवणार आहे, की ज्यामुळे मला राहायला खोली आणि पलंग मिळेल.

मी एन्डस्लेश गार्डन्समधील युस्टन स्टेशन जवळील हॉस्टेलला जातो. ते मला एक उघडीबोडकी खोली दाखवतात. त्यात मी इथे कुणाबरोबर राहणार आहे, हे मला माहीत नाही. मी बाहेर जातो आणि त्या हॉस्टेलमधील मुलांचा घोळका माझ्यापाठोपाठ येतो. एका कटाक्षात ओळखतात, की माझ्याकडे ड्रग्ज आहेत. कोपऱ्यावर माझ्याभोवती वेढा घालतात.

"आम्हाला पण दे." विचारत नाहीयेत, तर मागणी करतायत. मी म्हणतो, "जा चुत्यांनो" मी तिथून जेवढं शक्य होईल, तेवढ्या पटकन निसटतो. याच्यापैकीच कुणा एकाबरोबर तरी मी त्या खोलीत राहणार असेन, त्यामुळे मी तिथे झोपायला जात नाही. बंद जागेत आता मला झोपायची भीती वाटते आणि पलंग तर पार परके वाटतात.

ते हॉस्टेल धर्मादाय ऑफिसच्याजवळ असल्यामुळे मी गेल्या वर्षीचा माझा धार्मिक हप्ता मागायचा ठरवतो. ते मला त्यातील पैसे मिळवण्यासाठी नंतर परत यायला सांगतात; परंतु हॉस्टेलमधील ती मुलंही तिथे आहेत. पुन्हा एकदा ती मला घेराव घालतात.

"आम्हाला काही पैसे दे." ती सांगतात.

मी त्यांच्यामधून निसटतो; परंतु आता मी सर्व वेळ लक्ष ठेवून आहे. माझं तोंड दाखवण्यापुरता प्रत्येक दिवशी मी एकदा हॉस्टेलमध्ये जातो. मग मी माझ्या खोलीत न जाता घाईनं बाहेर पडतो. मला त्या मुलांशी गाठ पडायला नकोय, कारण जर त्यांच्यापैकी एखाद्यानं मला पाहिलं, तर ताबडतोब तिथे इतर हजर

होतील आणि ती आता एक व्यक्ती नसतात. ती मला धमक्या देणारी भली मोठी हिंसक शक्ती आहे. मी इतका बारीक आहे, की मला माहीत आहे, की मी त्यांना पुरा पडणार नाही. यापुढे माझ्या हॉस्टेलच्या भेटी तीस सेकंदांपेक्षा जास्त टिकत नाहीत; परंतु या अशाच भेटीत सीनचा निरोप कळतो, की मी डिटॉक्स सेंटरमध्ये (असं ठिकाण, जिथे ड्रगचा प्रतिबंध व्हावा, म्हणून औषधं दिली जातात.) जात आहे.

डिटॉक्स हा शब्द माझ्या आता डोक्यात शिरतो. डिटॉक्स म्हणजे यापुढे ड्रग्ज नाहीत. तेच मला हवं होतं, हो ना? ड्रग्ज न घेता जीवन मला रिकामं आणि घाबरवून सोडणारं वाटतं. मी ड्रग्जशिवाय कसा जगू शकेन? ड्रग्जशिवाय माझं दुसरं जीवनच नाहीये. यापुढे पडलेल्या दुःखातून बाहेर पडण्यासाठी मला जेवढी शक्य होतील तेवढी ड्रग्ज मी आत जायच्या आधी घेतो. आता संशयच उरलेला नाही, की हेरॉईन आणि कोकीनचा माझ्यावर परिणाम कमी होत चाललाय, त्यामुळे मला ती विभ्रमावस्था आणि ते रॅटल हे ड्रग्ज पुरेसं न घेतासुद्धा सुरू आहे. उन्मादावस्था येण्यासाठी माझं ड्रग्ज घेणं जोरदार प्रमाणात सुरू आहे. असं ड्रग्ज घेणं मला परवडणार नाही.

इक्विनॉक्स क्रायसिस आणि ॲसेसमेंट सेंटर हे ब्रूक ड्राईव्ह या नदीच्या दक्षिणेकडे असलेलं डिटॉक्स सेंटर आहे. हा रस्ता, हा एलिफंट, कॅसल आणि लम्बेथमधून जातो. त्या इमारतीच्या नवीन सजावटीत लाल विटा वापरलेल्या आहेत. तेथील बहुतेक इतर रहिवासी हे रस्त्यावरचे बेघर दारुडे आहेत आणि त्यातील काहींना मी ओळखतो. रविवारी ड्रग विक्रेते यायच्या आधी कॉन्व्हेंट गार्डनला मी ड्रग्जची वाट पाहत असताना मला शांत करण्यासाठी दारू घेण्यासाठी जातो. साधारणपणे स्पेशल ब्रू ही अशी काही गोष्ट आहे, की ती तशीच माझ्या नसांत इंजेक्शननं भरावी, असं मला वाटतं; परंतु मी शेरी, व्होडका, स्कॉच जे काही तिथे आहे, त्यांची नशा करण्यासाठी तिथे जमलेल्या दारू पिणाऱ्यांबरोबर सहभागी होतो. दारुडे हे जंकीजपासून वेगळे आहेत आणि त्यांचा आयुष्याचा क्रम वेगवेगळा असतो. ते बहुतेक वयानं मोठे आहेत आणि स्कॉटलंड किंवा आयर्लंडवरून आलेले आहेत. त्यांची तोंडं लाल आणि नाकं भोपळ्यासारखी मोठी आहेत. त्यांना इथे पुन्हा भेटणं म्हणजे जुन्या मित्रांना भेटल्यासारखं आहे.

मी त्या ड्रग्जच्या प्रतिक्रियेतून, रॅटलमधून घाम येत, शिव्या देत, थरथरत आणि वेदनेनं नेहमीसारखा तळमळत असतो. पहिले दहा दिवस मला मेथॉडीन या डॉक्टरनं दिलेल्या गोळ्यांची मदत होते. मग अकराव्या दिवशी मेथॉडीन बंद केलं जातं आणि मी भगदाडात जोरात जातो. भीती, भ्रमनिराशा, भयंकर घबराट, निरुपयोगीपणा, एकाकीपणा, भयानक विचार माझ्या मनात येतात, जे ड्रग्ज इतर

वेळी दूर ठेवतात. माझी मुलं मला ओळखत नाहीत. जपानी स्त्री, मी तिला मारलं. माझं कुटुंब, त्यांना माझ्याशी काही कर्तव्य नाही... मला हेरॉईन हवंय. मला त्याची फार जरुरी आहे. ते मला माझ्या आत्म्याला झालेल्या जखमा बऱ्या करण्यासाठी हवंय.

बाराव्या दिवशी मी अगदी फार फार हळवा झालोय. वेदना आणि दु:खाचा एखादा राक्षस झालोय. एक रस्त्यावरचा छोटा मुलगा आत येतो आणि बैठकीच्या खोलीत जो टीव्ही चॅनेल आम्ही पाहणार आहोत त्यावरून वादविवाद सुरू करतो. तो उडी मारतो आणि एक ॲश ट्रे उचलतो. मला वाटतं, की तो मला त्यानं मारणार, म्हणून मी त्याला डोक्यावर चावतो. तो बोंबलतो आणि बाहेर पळतो आणि त्या बैठकीच्या खोलीत मला आत ठेवून बंद करू पाहतो. कर्मचारी धावत येतात. ते माझ्याकडे गंभीरपणे पाहतात. माना डोलावतात.

"मी केलेलं नाही."

परंतु ते कर्मचारी त्याच्या डोक्यावरील दातांच्या खुणा दाखवतात. ते म्हणतात, "मार्क, तुला जायला हवं. "

मी रडण्याच्या बेतात येतो. मला जायचं नाही. मी या ड्रग्ज न घेण्याच्या प्रतिक्रियेतून जाताना भयानक सोसलंय आणि मी एकट्यानं व्यसनापासून मुक्त राहू शकणार नाही. मी पटवून देऊ लागतो, की त्या चुत्या मुलानं ही मारामारीची वेळ आणली. ते म्हणतात, की त्यांनाही मला बाहेर घालवायचं नाही; परंतु नियम म्हणजे नियम आणि त्या मुलाची कातडी फाटलीय, त्यामुळे मला जायला हवं. मला हे दिसतंय की त्यांनाही याचा त्रास होतोय. मी रॅटलमधून जात असताना त्यांनीही मला खूप मदत केलीये.

"तुला अठ्ठावीस दिवसांनी पुन्हा प्रवेश देता येईल." ते सांगतात. ते युस्टनमध्ये हॉस्टेलवर माझ्यासाठी राहण्याची व्यवस्था करतात. मला टॅक्सीत घालून पाठवलं जातं. जेव्हा मी दरवाज्यात उभा असतो, तेव्हा त्या कर्मचाऱ्यांना सांगतो, "तुम्ही सर्व मला मारणार आहात."

एक स्त्री मान हलवते. ती तिच्या त्या शांत आणि त्यांच्यापैकी काहीकडेच असलेल्या हताश स्वरात म्हणते, "नाही मार्क, तू स्वत:ला ठार मारणार आहेस."

मी आता बाहेर आहे. कोणतीही ड्रग माझ्या अंगात नाही आणि मी घाबरलोय. हे रस्ते निर्दय, हिंसक, वेडे आहेत. जोपर्यंत माझं डोकं फिरलेलं नाही, तोपर्यंत मी त्यांना पुरं पडू शकत नाही; परंतु सुरुवातीला मी इंजेक्शन घ्यायचं टाळण्याचा प्रयत्न करतो. काही झालं, तरी मी रॅटलमधून गेलोय. सर्वांत वाईट भाग संपलाय. जर मी अठ्ठावीस दिवस स्वत:च्या प्रयत्नांनी टिकलो...

दुनिया गडद आहे. ती एखाद्या धातूच्या वस्तूसारखी धारदार आहे. माझं डोकं

दुखतं आणि बारीकशीही हालचाल वेदना देते. अगदी श्वासोच्छ्वास करणंही तोंडात मोजा घातल्यागत वाटतं. उठणं वेदना देतं, बसणं वेदना देतं, भूतकाळ वेदना देतो. तो मला मी जे काही बोललोय आणि केलंय, त्याचे जणू काही अनेक फोटो माझ्यासमोर फेकतो. हा एक सर्वांत मोठा, सर्वांत वाईट असा हँगओव्हर आहे, कारण काल रात्री मी न पिताही तो आलाय. माझं सर्व आयुष्यच प्यायलेलं आहे.

हॉस्टेलमध्ये मला स्वतंत्र खोली दिली जाते, कारण तेथील कर्मचाऱ्यांना माहीत आहे, की मी दादागिरीला घाबरतो. ते प्रेमळ आहेत आणि ते मी डिटॉक्स सेंटरमध्ये यशस्वी झालो नाही, यावरून काही बोलत नाहीत; परंतु मला ते जास्त जाणवतं. मला बदलण्याची संधी होती आणि मी ती घालवली. माझा डिटॉक्स सेंटरमध्ये अठ्ठावीस दिवसांनी पुन्हा प्रवेश होईपर्यंत मी ड्रग न घेण्याचा निश्चय केलाय. मी हॉस्टेल कर्मचाऱ्यांशी बोलतो. त्यांना हे किती अवघड आहे, ते समजतंय.

"मार्क, इथे एकट्यानं ड्रग न घेतल्यानं होणारी प्रतिक्रिया सोसत राहणं, तुला कठीण जाईल." एक भुऱ्या केसांची आणि डोळ्यांची कर्मचारी बाई म्हणते, "तू सभेला जा. अल्कोहोलिक्स ॲनॉनिमसवाले सर्व ठिकाणी सर्व वेळ सभा घेतात."

मी तिला मध्येच थांबवतो.

"मी काही चुत्या दारुड्या नाही. मला ड्रगचं व्यसन आहे."

"ठीक, यात तसा काहीच फरक नाही; परंतु तिथे नॅर्कोटीक्स ॲनॉनिमस आणि कोकीन ॲनॉनिमस पण आहे, जर तुला ते पसंत असेल तर."

आता ती डिरेक्टरीत शोधत असते. ती एक फोन करते आणि माझ्याकडे वळते.

"ठीक आहे, नॅर्कोटीक ॲनॉनिमसची सभा इस्लिंग्टनमध्ये एका तासाभरात आहे. तुझ्याकडे काही पैसे आहेत?"

मी खिशात हात घालतो. वीस सेन्ट्स.

ती आपल्या पर्समध्ये हात घालते. "हे बघ, हे आणखी १पौंड ८०पेन्स घे. दोन पौंडातून तिथे जाऊन बसनं परत येऊ शकशील. हा पत्ता आहे. त्या सभेला जा, त्यामुळे त्यातून जाण्यासाठी ज्या आधाराची तुला गरज आहे, तो मिळेल आणि कदाचित त्यामुळे तुझं आयुष्यही बदलेल."

आयुष्यही बदलेल? मी त्याची कल्पनाही करू शकत नाही; पण मी मान डोलावतो आणि बस भाड्यासाठी एक पौंड आणि ऐशी पेन्स आणि पत्ता घेतो. मी बाहेर युस्टन रोड वर जातो. हळूहळू, माझ्या देहाला काही चालायचं नसतं किंवा जायचं नसतं, कारण श्वासोच्छ्वासच करण्यात माझी सर्व ताकद संपते, मग हलणार तरी कसं? तिथे बसचे अनेक थांबे आहेत. एखाद्या मोठ्या कीटकासारख्या

बसेस येतात आणि प्रवाशांना आत ओढून जातात. मी जायला कोणती बस पकडायची? ती जागा इस्लिंग्टनमध्ये नेमकी कुठे आहे? माझं डोकं गरगरतंय. माझी हाडं दुखतायत. मी कसाबसा चालू शकतोय. जर आता ड्रग घेतली, तर मी सावरेन. बारा दिवसांच्या संयमानंतर त्याचा खरा परिणाम होईल.

त्या दयाळू बाईनं आपल्या पर्समधून दिलेल्या १पौंड ८० पेन्सकडे मी पाहतो आणि मी नेमकी बस पकडण्याचा आणि नॅर्कोटीक्स ॲनॉनिमसच्या सभेला जाण्याचा निश्चय करतो, त्यामुळे मला यातून बाहेर पडायला मदत होईल. मी बसेसकडे आणि नकाशांकडे पाहतो. कोणालातरी विचारावं म्हणून इकडेतिकडे पाहतो. प्रत्येक थांब्यावर लिहिलेली माहिती वाचण्यासाठी मी त्याच्या समोरच्या गटारातून चालत जातो आणि मग मला दिसतं गटारात माझ्या पायाखाली कोणीतरी उचलावं म्हणून वाट पाहत असलेली वीस पौंडाची नोट. मी खाली वाकतो आणि मग ती माझ्या हातात धरून त्याकडे बघत राहतो. वीस पौंड्स, मी काही काळ डगमगतो आणि मग त्या हॉस्टेलमधील दयाळू स्त्रीला विसरून आणि ज्या सभेमुळे ड्रग्ज सोडण्यासाठी मला आधार मिळेल, तिथे जाण्याची आपल्याला ताकद नाही, असं खिशात बावीस पौंड असताना ठरवतो. मी वेस्ट एन्डला ड्रग घ्यायला जातो आणि जेव्हा मी इंजेक्शन घेतो, मला उन्माद येतो आणि ती रॅटल नाहीशी होते, सर्व वेदना नाहीशा होतात, त्याही ताबडतोब. डिटॉक्समध्ये गेल्यापासून जे जग उलटंसुलटं झालं होतं, ते आता पुन्हा सरळ होतं. मी सुटकेचा निःश्वास सोडत ओरडतो.

मी मग सरळ त्या सेक्स शॉपमधील विल्फकडे जातो आणि असं काही घडतं, की आता काही ड्रग्ज माझ्यासाठी विकायला असतात. मी त्या तोंडात भरतो.

"तू होतास कुठे? आम्हाला वाटलं, की तू बहुधा मेलास!" मला भेटणारा प्रत्येक जण विचारतो. मी विचार करतो, असं झालं असतं, तर केवढं मोठं नशीब; परंतु मी उत्तर देऊ शकत नाही, कारण माझ्या तोंडात हेरॉईन आणि क्रॅकच्या तीस पुड्या आहेत.

सर्व विकल्यावर मी टर्निंग पॉइंटशी येतो.

"काय झालं?" सीन दुःखानं ओरडतो.

"मी इतका ताणतणावाखाली होतो आणि त्या पोरानं मला धमकावलं आणि मी त्याला चावलो, म्हणून त्यांनी मला बाहेर फेकलं."

"तुला पुन्हा प्रयत्न करायचाय?"

"हो, हो, मला करायचाय." हे असं बोलणं आणि असं वाटणं जेव्हा मी त्या आता घेतलेल्या इंजेक्शनमध्ये गुरफटलेला असतो, तेव्हा सोपं आहे.

"ठीक आहे. आम्ही तुला अठ्ठावीस दिवसांनी परत घेऊ, मी त्याची आताच व्यवस्था करतो." सीन म्हणतो.

मी हॉस्टेलमध्ये झोपण्याचा प्रयत्न करतो, कारण त्यांनी मला स्वतंत्र खोली दिलेली आहे; परंतु मी तिथे जास्त काळ घालवत नाही किंवा तिथे खात नाही, कारण मी माझ्या त्या अंदाधुंद जगात पुन्हा परतलोय.

जेव्हा मी त्या सेक्स शॉपमध्ये भरभर ड्रग्ज विकून घेण्यासाठी जात असतो, त्या वेळी मी विल्फला पैशाच्या पेटीत हात घालताना पाहतो. त्या वेळी दुकानात कोणी नसतं. त्या जुन्यापुराण्या लाकडी शेल्फमध्ये ठेवलेल्या सेक्सविषयींच्या घाणेरड्या डीव्हीडीज, मासिकं आणि व्हिडिओ कुणी पाहत नाहीयेत. त्या फाटक्या गालिच्यावर फक्त विल्फ एकटा आहे आणि तो आपल्या मालकाचे पैसे चोरतोय.

मी म्हणतो, "तू काय करतोयस, ते मला माहीत आहे."

विल्फ घाबरतो. तो लहान मुलगा आहे. फारतर विशीच्या आसपास आणि त्याला माहीत आहे, की अशा सेक्सच्या व्यवसायातील त्याचं काम फार काळ नसेल. ती सेक्सविषयीची घाणेरडी चित्रं, डीव्हीडीज, मासिकं हे बेकायदा आहेत आणि जर पोलिसांनी अशा दुकानावर तीनदा छापा घातला, तर तिथे काम करणाऱ्या सहायकाला पकडलं जातं आणि तो तुरुंगात जातो.

मी म्हणतो, "तू काय करतोयस, ते मला माहीत आहे. मला पण त्यात घे, नाहीतर मी तुझ्या बॉसला सर्व सांगेन."

विल्फला त्याच्या बॉसनं त्याच्यावर रागवायला नकोय. ते गँगस्टर्स आहेत आणि देवजाणे ते काय करतील ते. मी एक बेघर माणूस आहे आणि मी त्याच्याशी तसा छान वागलोय, त्यामुळे माझ्या मागण्या तशा फारशा त्रासाच्या जाणार नाहीत, असं त्याला वाटतं.

तो चिडलेला दिसतो. त्यानं चोरलेल्या पैशातील काही पैसा तो निमूटपणे मला देतो. चाळीस पौंड, दहा पौंडाच्या नोटांमध्ये, त्यामुळे मला मिळकतीचा एक नवा मार्ग मिळालाय. विल्फ पैसे चोरत राहील आणि प्रत्येक दिवशी मला ड्रग्जसाठी चाळीस पौंड मिळतील. लंडनच्या रस्त्यावर कसं राहायचं, ते मला माहीत आहे, हे नक्कीच. मीसुद्धा एक गुंड बनू शकेन. कदाचित, पुढच्या महिन्यात मी डिटॉक्सची फारशी पर्वा करणार नाही.

परंतु पैशाचा समुद्रसुद्धा माझ्या या सवयीचं समाधान करू शकणार नाही, कारण ती एखाद्या सुनामीसारखी बारा दिवसांच्या रॅटलनंतर परत आलीये. दुसऱ्या दिवशी विल्फच्या या खासगी धंद्यातून घ्यायला चाळीस पौंड ही अगदी छोटीशी रक्कम वाटते, त्यामुळे मी सकाळी चाळीस पौंड घेतो आणि दुपारी आणखी पैशासाठी जातो.

विल्फ फारसा उत्साही नाही.

"मी तुला पुरेसं दिलंय." तो म्हणतो.

"मी तुझं बिंग फोडीन."

"हे बघ, मी च्यायला एवढं काही कमावत नाही."

परंतु मला माहीत आहे, की तो कमावतोय. तो मला फसवतोय, हेही मला माहीत आहे. मला आणखी पैसा हवाय. मला आणखी पैसा हवाच हवा आणि जंगलात तुम्हाला जे काही हवं असतं, त्यासाठी तुम्ही काहीही करावं. मी सबंध दिवस इकडेतिकडे फिरताना त्याला कसं धुवायचं, याचा विचार करत असतो आणि जेव्हा मी ड्रगसाठी घायकुतीला येतो, माझ्या डोक्यात एक भन्नाट कल्पना येते. मी सिरींज घेऊन त्या सेक्स शॉपमध्ये येतो. त्याच्या डोळ्यांसमोर मी ती माझ्या रक्तानं भरतो.

"मला संसर्ग झालाय." मी म्हणतो, "आणि जर तू मला च्यायला पैसा दिला नाहीस, तर मी ही तुझ्यात खुपसेन."

तो त्या सुईकडे पाहतो. मी अगदी गोड हळू आवाजात बोलत आहे, त्यामुळे तिथे असलेली गिऱ्हाइकं, म्हातारे जे त्या पोर्नोमधून शाळकरी मुलींसारखा पोशाख घातलेल्या मध्यमवयीन स्त्रियांची चित्रं पाहत असतात, त्यांना कसलाच संशय येत नाही; परंतु विल्फला माहीत आहे आणि तो घाबरलाय. त्याला माझी भीती वाटते, माझ्या सुईची भीती वाटते. त्याला **एड्स**ची भीती वाटते.

"ठीक आहे, ठीक आहे." तो म्हणतो आणि ती पैशाची पेटी उघडतो आणि पुन्हा चाळीस पौंड काढतो. काही तासानं मी पुन्हा येतो आणि पुन्हा चाळीस पौंड घेतो. दुसऱ्या दिवशी मी चार वेळा जातो आणि प्रत्येक वेळी जास्त जास्तच गंभीर वाटणाऱ्या चेहऱ्यानं विल्फ मला चाळीस पौंड देतो, त्यामुळे एकशे साठ पौंड आणि त्याशिवाय मला मोफत मिळणाऱ्या ड्रग्ज. जीवन छान आहे. आता मी चोरी करायची, मग विकायचं, मग ड्रग घ्यायचं, वाट पाहायची, पुन्हा ड्रग घ्यायचं या न संपणाऱ्या साखळीत अडकलेला नाही. मला सोहोमध्ये भटकायला वेळ आहे आणि रात्री क्रॅकचं इंधन घातल्यावर मला झोप येत नाही. मी सावध असतो. इतका सावध, की त्या शहराच्या पहाटेपूर्वीच्या स्तब्धतेत ते दुसऱ्या दिवशीचे ड्रग्ज घेऊन येणारे, चोरून ने-आण करणारे वाहक पाहतो. गुपचूप मी त्यांचा पाठलाग करतो. अंधाऱ्या रस्त्यावरून त्यांच्या मागावर जातो. ते भरभर चालतात, तसाच मीही. ते टॉटनहॅम कोर्ट रोडवर जातात. मीही जातो. ते वॉरनस्ट्रीट ट्यूब रेल्वे जवळच्या पार्कमध्ये एकत्र जमतात. तो पार्क एवढा छोटा आहे, की जर मी आणखी पाहण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना मी दिसेन, हे मला माहीत आहे. ते ड्रग्ज कोठे ठेवतात ते मी शोधेन; पण आता नाही.

■

३५

मी तोंडात ड्रग धरून या रस्त्यावर आहे आणि गिऱ्हाइकं माझी वाट पाहत आहेत. मी त्या सेक्स शॉपकडे पुन्हा माल भरण्यासाठी जातो, तेव्हा माझ्या लक्षात येतं, की तिथे असलेले इतर लोक हे गिऱ्हाईक नाहीत. मी थांबतो. मी आधीच दरवाज्याजवळ पोहोचलोय आणि मला बॉस दिसतो. ड्रग्ज विकण्याचं ज्यानं मला काम दिलं तो, तो मनुष्य आहे. मला तो मेक्सिकन असावा असं वाटतं, कारण त्याला मोठ्या मिशा आहेत, रंग सावळा आहे; परंतु तो कुठलाही असू शकेल आणि या घडीला तो माझ्याकडे पाहतोय.

"कसे आहात तुम्ही?" मी नम्रपणे विचारतो; परंतु माझ्या अभिवादनाची तो परतफेड करत नाही. त्याच्या मागे त्याचा बॉस आहे. तो एक सुटाबुटातील व्यापारी आहे. मी त्याला आधी पाहिलेलं आहे; परंतु मी त्याला बोललेलं, ऐकलेलं नाही आणि आताही तो गप्प आहे. तो माझ्याकडे पाहतोय. त्याच्या बाजूला एक तिसरा माणूस आहे, ज्याला मी ओळखत नाही.

तो मेक्सिकन माझ्यावर हल्ला करण्याआधी मला विल्फच्या तोंडावरचं विजयी हास्य तेवढं दिसतं. तो पुढे येतो. माझा कृश देह माझ्या मानेमागे पकडून मला उचलतो आणि त्या काचेच्या दरवाजातून तो मला दुकानात फेकतो. मला त्या फुटण्याचा आवाज ऐकू येतो. तो हजारो मैलांवरून आल्यासारखा वाटतो. ती काच दुसऱ्या कुठल्यातरी खंडावर फुटते; परंतु त्या असंख्य तुकड्यांचा प्रतिध्वनी त्या जगभर पसरतो. मी त्या दुकानावर उंचावर तरंगतो आणि खाली तीन जाड माणसं एका लुकड्या माणसाला मारताना पाहतो. मला गुद्द्यांचा आवाज येतो. त्या मुठी दिसतात आणि सर्वांत शेवटची आठवण म्हणजे एका बुटाचा तळवा माझ्या तोंडावर येताना आणि तिथून जरा वर क्रूर डोळे आणि मोठ्या मिश्या दिसतात. मला माझा बाप आठवतो. त्यानं जेव्हा माझं डोकं विस्तवावर धरलं होतं, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर असलेला द्वेष, धातूची चव आणि माझ्या कातडीवरून वाहणारं रक्त

आणि मग मी जागा होत आहे. मी अंथरुणात आहे. तिथे चादरीची सळसळ येते आणि माझ्याभोवती मला परिचित असलेला वास, निर्जंतुकाचा.

मी डोळे दिपवणाऱ्या झोतामुळे डोळे उघडतो. ते पुन्हा बंद करतो. मला पुन्हा त्या रॅटलचा त्रास होतोय. डोकं, सांधे, मी थरथरतोय. मला घाम फुटलाय आणि मला जितकं हे सर्व भयानक जाणवतंय, त्यावरून माझ्या लक्षात येतंय, की मी हेरॉईन घेतल्याला बराच काळ लोटलाय. मी डोळे पुन्हा उघडतो. पुन्हा प्रकाशाचा झोत. तो एक कॅमेरा घेतलेल्या, माफी मागणाऱ्या माणसाकडून येतोय. तो आताच निघून जातोय.

"पोलीस," तो जाण्याआधी सांगतोय.

"तू युनिव्हर्सिटी कॉलेज हॉस्पिटलमध्ये आहेस." एक आवाज सांगतो. मी माझं डोकं वळवतो. एक नर्स माझ्यावर वाकते.

"तुला मारून मेलं म्हणून टाकून दिलं होतं." ती नर्स मला सांगते. "तू गेले कित्येक दिवस बेशुद्ध आहेस. पोलिसांना तुझ्याशी बोलायचंय. तू शुद्धीवर आलास, की त्यांना बोलवायला त्यांनी मला सांगितलंय."

"माझा हात कुठंय?"

"तो अजून तिथेच आहे; परंतु तो वाईट तऱ्हेनं निखळला होता आणि तुला एक्स-रेची जरुरी आहे."

मी विव्हळतो आणि पलंगावरून उठायचा प्रयत्न करतो.

"जरा जपून. तुझं बरंच रक्त गेलंय आणि तुझे घावही अजून वाईट अवस्थेत आहेत. तुझ्या अंगावर जिकडेतिकडे जखमा आहेत, नाक तुटलंय, पुष्कळ जखमा आणि एका डोळ्यावरचं हाडंही तुटलंय."

"ओच," जेव्हा ती माझ्या दुखापतींचा पाढा वाचते, मला त्या एका मागोमाग जाणवतात. माझी ती रॅटल कुठे थांबते आणि दुखापत कुठे सुरू होते, ते मला समजत नाही. मला एवढं कळंतं, की मला इथून बाहेर पडायला हवं, कारण मला ड्रगची जरुरी आहे आणि ड्रग्ज कुठे मिळवायचे, ते मला माहीत आहे. वॉरनस्ट्रीट ट्यूबच्यामागे ते लपवलेले आहेत. तिथे माझी काय वाट पाहत असेल, या विचारानं माझे डोळे, नाक, तोंडवाहू लागतात. जर मी पलंगावरून उठू शकलो तर.

काही छान, स्वच्छ हेरॉईन त्या हॉस्पिटलमध्ये मला कुठे मिळेल, हे त्या नर्सला कसं विचारायचं, याचा मी विचार करत असताना मला झोप लागते. मी जागा होतो, तेव्हा माझ्या पलंगाजवळ एक माणूस असतो. त्यानं युनिफॉर्म घातलेला नाही; पण तो पोलीस आहे. एका मैलावरूनही मी त्यांना ओळखतो.

तो मला माझ्या मारेकऱ्याविषयी प्रश्न विचारतो. मला स्वत:ला त्यात

गुंतवल्याशिवाय मी त्याची उत्तरं देऊ शकणार नाही. मी सांगतो, की मला काही आठवत नाही. मग तो मला त्या मारामारीविषयी सांगतो. जेव्हा पोलीस तिथे येतात, त्या वेळी तिथे एक स्त्री रक्त पुसत होती आणि बाकी सर्व दुकान रिकामं कसं होतं, त्याबद्दलही तो सांगतो.

"तिथे रक्ताची सुनामी आल्यागत जमिनीवर रक्त होतं, भिंतीवर होतं आणि सहा-सात फूट उंचीवरही होतं."

"कोणाचं रक्त?" मी विचारतो.

"तुझं रक्त. आम्हाला वाटलं, की आम्ही खुनाचा तपास करत आहोत."

त्या भिंतीवर सुनामी असल्यागत रक्त. त्यांनी मला काय केलं होतं?

"तेथील फरसबंदीही रक्तानं माखली होती."

"तेथील फरसबंदी? त्यांनी मला बाहेर फेकलं होतं का?"

"खिडकीतून," मला ते आठवत नाही. मला फक्त आत फेकल्याचं आठवतं.

"आमच्याकडे एक साक्षीदार आहे आणि तो वकील आहे. तो तिथून जात होता आणि त्यानं ते सर्वच बहुतेक पाहिलंय. त्यानं तुझ्या शरीराजवळ कार्ड ठेवलं होतं आणि एक चिठ्ठीही. त्यात त्यानं त्याच्याशी संपर्क साधायला सांगितलं होतं."

"मला खिडकीतून कुणी बाहेर फेकलं?"

"ते तू मला सांगशील, अशी मी आशा करत होतो."

परंतु मी काही सांगत नाही.

"तुला हे समजतंय," तो पोलीस सांगतो, "की तू एका गुन्ह्याचा बळी आहेस आणि तुला भरपूर भरपाई मिळू शकेल."

आता हे काहीतरी स्वारस्यपूर्ण होतंय.

"भरपूर भरपाई म्हणजे किती?"

"हा अंदाज आहे; पण काहीही, १०,००० पौंडांपर्यंतही, त्यामुळे त्या लोकांबद्दल तुला जे काही माहीत आहे, ते मला ऐकायला आवडेल. आम्हाला त्यांच्या धंद्याबद्दल जाणून घ्यायचंय."

१०,००० पौंडांसाठी मी कल्पक बनू शकेन. मी एक छान कथा सांगतो आणि त्याची खात्री झाल्यासारखी दिसत नाही. तो पुन्हा माझ्याशी बोलेल, असं सांगून निघून जातो. वेदनांनी तळमळत आणि ज्यात मी गुन्हेगार बळी दिसण्याऐवजी एक निरागस बळी दिसल्यागत दिसेन, अशी कथा रचत मी पलंगावर पडतो; परंतु मला माहीत आहे, की मी इथे राहू शकणार नाही. माझी ही रॅटल जीवघेणी आहे. मला पोलिसांशी बोलायला आवडत नाही. हॉस्पिटल या संस्था आहेत आणि या हॉस्पिटलच्या जवळच्याच रस्त्यावर खाली विक्रेत्यांनी ड्रग्ज लपवून ठेवलेले आहेत आणि त्यावर माझं नाव आहे. माझी जाण्याची वेळ झालीय.

मी उठतो. माझा देह कुरकुरतो आणि माझा हात लोंबकळतो; परंतु त्या छोट्या पार्कमध्ये चोरटेपणानं ड्रग्ज नेणारे वाहक, माश्या घोंघावतात, तसे घोंघावत असतील. या विचारानं मी तरीही चालत राहतो. मला काही कपडे खुर्चीवर मिळतात. ते फारच ढिलेढाले आहेत; परंतु ते ठीक आहे, कारण माझा निरुपयोगी झालेला हात त्यात सहज घालता येतो आणि मी त्या हॉस्पिटलमधून लंगडत बाहेर पडतो. ओ, ते लंडनचे वास आज फार छान वाटतात. रहदारी आणि माणसांचे वास आणि त्यांनी शिंपडलेला सुगंध आणि घाण आणि काही वेळा कुत्रीही.

माझं शरीर सुजलेलं आहे आणि आंबल्यासारखं झालंय आणि ताठरलंय. मी टॉटनहॅम कोर्टवरून खडखडतच चाललो आहे. जो पहिला मित्र भेटतो, तो स्टीव्ह आहे. घाणरेड्या, तेलकट केसांचा आणि वाकडेतिकडे वळलेले शूज घातलेला आणि तोंडावर वांग असलेला स्टीव्ह, फरसबंदीवर बसून भीक मागतोय; परंतु मला तो अत्यंत छान वाटतो.

"मला ड्रग दे." मी सांगतो, "ए भाऊ, मला ड्रग दे. मी मार खाल्लाय."

"च्यायला, तुझा अवतार बघ!" तो माझ्याकडे घाबरून बघतो. "मला वाटलं, की तू डिटॉक्स सेंटरमध्ये आहेस."

परंतु तो मला ड्रग देतो.

एका हातानं इंजेक्शन घेणं, ही काही समस्या नाही. जर गरज पडली, तर हात नसतानाही मी हे करू शकेन. मला बरं वाटताच मी लांब लांब पाय टाकत वॉरन स्ट्रीट ट्यूबकडे जातो. मला असं वाटतं, की मी बेशुद्ध असताना सर्व वेळ या जागेचीच स्वप्नं पाहत होतो.

तिथे स्टेशनच्यामागे असलेला तो छोटा पार्कही लोक कॉफी प्यायला किंवा ट्यूब ट्रेन पकडायला जातील, अशा रुंद वाटेपेक्षा जास्त मोठा नाही. येथील पावलं घाईनं जात आहेत; परंतु तिथे अनेक घोळके आजूबाजूला आहेत आणि मी त्यांच्यातील एक बनतो. थोड्या वेळानंतर एक माणसांचा थवा एका झाडाभोवती दबून बसलेला दिसतो. तो लंडनमधील जुना प्लेन वृक्ष आहे आणि त्याच्या सालींना ठिगळांचं स्वत:चं सौंदर्य आहे; परंतु ते लोक त्या झाडाकडे पाहत नाहीयेत. ते त्याच्या तळाकडे पाहत आहेत. थोड्या वेळानं आणखी लोक येतात. त्या पार्कच्या आजूबाजूला मोडकळीला आलेली दुर्लक्षित फ्लॅटची वसाहत आहे आणि माणसं एका भिंतीशी जमतात.

ते काही विटा हलवताना मी पाहतो. त्या झाडाजवळचा फरसबंदीचा तुकडा हलविताना मी पाहतो. मी ते सर्व पाहतो; पण मला कुणी पाहत नाही. माझं हृदय धडधडतं. ते नियंत्रण नसल्यागत माझ्या छातीत जोराजोरात धक्के देतं. माझा सुकलेला हात आणि काळे-निळे पडलेले डोळे, हे विसरलं जातं. मला माहीत

आहे, की मला सोनं मिळणार आहे.

संध्याकाळी ते लोक जातात. आता ड्रग्जची चोरटी वाहतूक करणारे वाहक दृष्टिपथात नाहीत. मी त्या झाडाजवळ रमतगमत फिरत, कुणी जात नाही अशा विरळ क्षणापैकी एकाची वाट पाहत असतो. माझे दात उत्तेजनामुळे जवळजवळ वाजत आहेत. मी त्या झाडाच्या खोडाभोवतीची प्रत्येक फरशी माझ्या पायांनी दाबून पाहतो. मग सैल सुटलेला दगड लागतो, मी माझ्या ढोपरांवर बसतो आणि तो वर उचलतो. तिथे खाली एक भोक आहे. मी माझा हात त्यात घालतो. ते दमट लागतं. माझ्या बोटांना कशाचा तरी स्पर्श होतो. मी त्या भोकात वाकून पाहतो; परंतु मला काय मिळेल, हे पाहत मी थांबत नाही. मी ते घेतो आणि पुढच्या भागात कोंबतो. मी तो दगड जागेवर ठेवतो आणि घाईनं पळतो. मी इतका उत्तेजित झालोय, की मी धड श्वासोच्छ्वास घेऊ शकत नाही. जंकींचा कुणी देव आहे का? आता याक्षणी मी त्याचा पाईक आहे.

मी जितका शक्य होईल, तेवढा जलद तेथून उत्तरेकडे, दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडे आणि सरतेशेवटी युस्टन हॉस्टेलला जातो आणि माझी चावी घेतो. मला ज्या दयाळू स्त्रीनं नॅर्कोटीक ॲसोसिएशनसाठी पैसे दिले होते, तिच्याकडे माझं लक्षही नाही. ती मला अभिवादन करते; पण प्रश्न विचारत नाही. तिला विचारण्याचीच गरज नाही. माझे डोळे टाचणीच्या भोकासारखे झालेत. हा सर्व वेळ, ज्याला आयुष्यात काही सर्वांत नवलकारी मिळालंय म्हणून उत्तेजनामुळे बेफाम झालेल्या माणसाऐवजी मी एखाद्या सामान्य व्यसनी माणसासारखा वागण्याचा प्रयत्न करतोय.

माझ्या खोलीत मी ती बॅग उघडतो. त्यात तीन छोट्या बॅग आहेत आणि त्यात प्रत्येकीत तीन छोटी पाकिटं आहेत. एखाद्या टेनिस बॉलच्या आकाराची. वस्तू पातळ प्लॅस्टिक कागदात गुंडाळलेली आहे आणि त्या प्रत्येक बॉलमध्ये आणखी साठ पुड्या आहेत आणि या पुड्या तुम्ही रस्त्यावर घेता, त्या पुड्या आहेत. प्रत्येकीत २ ग्रॅम हेरॉईन किंवा क्रॅक आहे; परंतु बहुतेक क्रॅकच आणि तो एक सुंदर पिवळा दगड आहे. ह्याची रस्त्यावरची किंमत ४५०० पौंड नक्कीच असेल.

काही लोक आयुष्यभर हिरे, सोनं यांचे जमिनीत पुरलेले खजिने धुंडत असतात. त्यांना ते मिळाल्यावर कसं वाटतं, ते आता मला कळतं, कारण आता वॉरन स्ट्रीट ट्यूब स्टेशनच्या मागे मला सोनं मिळालंय. मी पटकन एकत्र इंजेक्शन घेतो. माझे हात या सद्भाग्यामुळे अविश्वासानं थरथरत असतात. क्रॅक चांगलं आहे; परंतु त्याबरोबर उन्मादाच्या ताबडतोब पाठोपाठ विभ्रमावस्था येते. कायद्याचे मजबूत हात मला मागून पडतील म्हणून मी वाट पाहत असतो तशी ही मँकीज पॉ सारखी विभ्रमावस्था नाही. ही विभ्रमावस्था दमदार आहे, कारण जरी कुणी मला पाहिलं असलं, कुणी अंदाज बांधला, जर कुणाला हे ड्रग कुणी चोरलं, याचा संशय

आला, तर मला ठारच केलं जाईल आणि मला मारण्याआधी ते माझे हालहाल करतील.

एखादा व्यसनी स्वप्नांतही पाहणार नाही, पेक्षाही जास्त ड्रग्ज जवळ असलेला आणि खोलीत एकटा असलेला मी भीतीमुळे त्याचा आनंद घेऊ शकत नाही. मला भीतीनं पार खलास केलंय. मला हे ड्रग्ज ठेवायचे आहेत. ते लपवायचे आहेत. मी पन्नास पुड्या ठेवतो आणि ती दुसरी दोन पार्सलं मला जितकी शक्य होईल, तेवढी जोरात दाबतो, की ती त्यामुळे एवढी लहान होतात, की मला ती ढुंगणातून आत घालता येतात. ही पृथ्वीवरील सगळ्यात सुरक्षित जागा आहे. त्याला जरा वेळ लागतो. ती मोठी आहेत, त्यामुळे दुखतंही.

कोणत्याही व्यसनी माणसाप्रमाणे एकदा का मला ज्याची अत्यंत निकड आहे, अशी वस्तू मिळाली, की मग मला ती घ्यावीच लागते. ते सर्व ड्रग्ज माझ्या शरीरात गेल्याशिवाय माझ्या देहाचं समाधान होणार नाही. मी ते ड्रग्ज घेऊ लागतो. मी ते घेतो, घेतो, घेतो. मी हावरटपणाचा राक्षस बनतो. मग ते आवाज सुरू होतात.

मी भिंतीवर माझी नखं रोवून लोंबकळत आहे आणि ते मला ऐकू येतात. ते बोलत आहेत, कुजबुजत आहेत. ते माझ्या दरवाज्याबाहेर आहेत. मी कानोसा घेतो. कानोसा घेताना मी धड श्वासही घेत नाही. हे खरंच आवाज आहेत, की माझी भीती ही प्रत्यक्षापेक्षा जास्त खरी झाली आहे?

माझी कल्पनाशक्ती आणि सत्य यातील सीमारेषा कुठे आहे? का ती आता उरलेली नाहीये? ते आवाज, खोलीत कसं जायचं, याबद्दल चर्चा करत आहेत. ते प्रथम दरवाजा फोडून आत येण्याचा प्रयत्न करणार आहेत. ते आत येत आहेत. मला पकडण्यासाठी येत आहेत. मी दरवाज्याशी पलंग ओढतो आणि ते कपाट त्या पलंगाशी. मी घाणेरड्या सामानाच्या पिशव्या खिडक्यांवर लावतो, त्यामुळे त्या इमारतीवरून खाली येणारा किंवा हेलिकॉप्टरवरून घोटाळत असणारा कोणीही आत बघू शकणार नाही.

जसजसे बाहेरचे आवाज आग्रही बनतात, माझे हात थरथरतात. माझी भीती ताब्यात राहत नाही. मी ड्रग्ज गिळू लागतो. त्यावर अवलंबून असल्यासाखा मी त्या गोळ्या खातो. एक गिळून संपतेय, तर मी दुसरी गोळी गिळतो. शेवटी मी थांबतो. जे काही असेल, ते मी रात्री घेऊ शकेन. अर्थात ते आवाज आत आले नाहीतर तर आणि जर ते आले, तर मी त्या झटकन गिळून टाकीन.

ती रात्र मी उरलेलं क्रॅक घेण्यात घालवितो. माझ्या त्या आकाशात जाणाऱ्या रॉकेटवर बसून मी वर जातो आणि जमिनीवर आदळताना ते आवाज ऐकतो. घाबरून त्या दरवाज्याचं लाकूड तुटण्याची मी वाट पाहतो. त्या इमारतीवर हल्ला

करणाऱ्या लोकांना बघण्यासाठी मी बाहेर चोरून डोकावतो. मी त्या पायरवाचा, आरडाओरडीचा, हेलिकॉप्टर्सचा कानोसा घेतो. जर कधी ते आवाज थांबले, तर पसरणारी शांतताही सर्वांत जास्त भीतिदायक ठरते, कारण मग मला समजतं, की शत्रू पुन्हा एकत्र येत आहेत. पुन्हा नवी बांधणी करत आहेत आणि आपल्या पुढच्या हालचालींचा व्यूह रचत आहेत. ते परत येतील, मला पकडण्यासाठी ते परत येतील.

सकाळी मी उन्मादाच्या अवस्थेत आहे; पण मला ती रॅटलही जाणवतेय, कारण हेरॉईनचा परिणाम त्या क्रॅकआधी केव्हाच संपलाय; परंतु मी तो दगड घेत राहिलोय, कारण मला घ्यायलाच हवंय. आता मला हेरॉईनची गरज आहे. मला हेरॉईन हवंच आहे. याचा अर्थ मला खोलीच्या बाहेर जावं लागेल. मला तो धोका तिथे पत्करायलाच लागेल. बाहेर मला पकडायला आलेल्या त्या लोकांना मला तोंड द्यायला हवं.

माझ्या नेहमीच्या जागांवर जायला मला भीती वाटते. त्या सोहोवरच्या सेक्स शॉपवर मी मेलोय, असं समजून मला टाकून गेलेल्या लोकांची भीती वाटतेय. ते जे कोणी असतील, ते कसे असले, तरी आणि ज्या कुणी मी ते ड्रग्ज चोरले म्हणून माझ्या डोक्यावर किंमत लावली असेल, त्याची मला भीती वाटते. आता प्रत्येक गोष्ट निराळी आहे, कारण सर्व जग माझ्या विरुद्ध गेलंय. मी आता वेस्ट एन्डमधून यापुढे फिरू शकणार नाही. मी त्या रस्त्याच्या कडेनं एखाद्या रानटी श्वापदासारखा, पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे, बावरलेला, उडी मारण्याच्या तयारीत असलेला, घाबरून चोरटेपणे जातो. मला रस्त्यात हॉस्टेलमध्ये राहणारा मित्र भेटतो. माझ्याकडे कोकीनची श्रीमंती आहे; पण हेरॉईनच्या बाबतीत मी भिकारी आहे, त्यामुळे त्याला एक दगड एका पुडीच्या बदल्यात मी देतो. मी तडक माझ्या खोलीवर परत जातो. इंजेक्शन घेतो. माझी रॅटल, थरथर थांबते. मग मी क्रॅक पुन्हा ओढतो. मी ते सबंध दिवस ओढतो. ते क्रॅकचे पस्तीस तुकडे सोडले, तर सबंध दिवसात मी काही खाल्लं नाही. माझ्या पोटात फिरतंय.

त्यात एक माथेफिरू पशू आहे आणि थोड्या वेळात मी पुन्हा आजारी होतो. माझी ती थरथर पुन्हा सुरू होते, कारण मला पुन्हा हेरॉईन हवंय.

आणि सामान घेण्यासाठी मी हॉस्टेलमधून स्वत:ला बाहेर काढतो आणि वॉरन स्ट्रीट ट्यूबच्या तेथील पार्कमध्ये जातो आणि या वेळी तिथे कोणी नाही, याची खात्री करून मी त्या फ्लॅटच्या भिंतीजवळील एक वीट काढतो आणि होय, ते तिथे आहे. दुसरी ड्रगची थैली. तेवढ्यात, एक हात मला धरतो. मला आणि माझ्या पाठीवरील कपड्यांना धरून रागानं खेचतो. मागे न बघता मी लांब तोंडाच्या इल माशासारखा बनतो आणि त्या भिंतीजवळच्या कुंपणाखालून मेटाकुटीनं आत जातो.

माझा हल्लेखोर अजूनही मला पकडून ओरडतोय आणि मला लाथ घालतोय; पण या तारांमुळे त्याला थांबावं लागतं. मला तो तपकिरी चिडलेला चेहरा दिसतो. मी त्या माणसाला सेक्स शॉपमध्ये त्या मेक्सिकनबरोबर बघितलं होतं; परंतु मी त्याचा विचार करत नाही. मी कशाचाच विचार करत नाही. फक्त जोरात वळण्याचा. माझा तुटलेला हात लोंबकळत असतो. माझे पाय दुखत असतात आणि ती ड्रग्जची थैली माझ्या पॅन्टच्या खिशात आतून आपटत असते. मी हॉस्टेलवर परततो आणि माझ्या खोलीत जातो. होय, होय, होय, आता इथे आणखी चार थैल्या आहेत. प्रत्येकीत तीन टेनिस बॉलच्या आकाराची गड्डी आहे आणि त्यात प्रत्येकात ५० छोट्या पुड्या आहेत. आता पुन्हा तिथे हेरॉईनपेक्षा जास्त क्रॅक असलं, तरी रात्रंदिवस असा अनियंत्रित उपयोग करायला माझ्याजवळ पुरेशी सामग्री आहे.

त्यामुळे क्रॅक मला पुन्हा ताब्यात घेतं. त्यांना आता खात्रीनं माहीत आहे मी कोण आहे ते. त्यांनी मला पाहिलंय ते माझ्या मागावर येतील. आता मला पकडण्यासाठी येणाऱ्या माणसांचे आवाजच फक्त असणार नाहीत. ते ज्या पद्धतीनं दरवाज्याखाली बघतात, पोलिसांसंबंधी बोलतात, इमारतीवर शिड्या लावतात. खिडक्यांवर ठोकतात, छपरावर रांगतात आणि दोऱ्यांवरून स्वत:ला खाली घेतात. माझी विभ्रमावस्था नेहमीच्या मानसिक स्तरापलीकडे जाते. ती मला गिळण्याचा धाक दाखवते. मला माहीत आहे, की हा माझ्या मनातील अगदी खोल, अगदी खाली बराच काळ दुर्लक्षिलेला असा समजूतदारपणाचा भाग आहे, जो मला सांगतोय, की हा ड्रगचा जास्त प्रमाणातील डोस आहे; परंतु तरीही मी इंजेक्शन घेतो. सिंकजवळ मी ओकारी करत आहे. त्यातून ड्रग्ज बाहेर पडत आहेत, चुते ड्रग्ज. मी पलंगावर पडतो आणि कचऱ्यांच्या काळ्या पिशव्यांवर संडास करतो, ज्यामुळे मला त्या ड्रग्जच्या छोट्या पुड्या माझ्या विष्ठेत परत मिळतील. मी त्यातील काही घेतो आणि उरलेल्या माझ्या तोंडात टाकतो, झटकन, ते येण्याआधी, त्वरेनं. त्यांना मिळण्याआधी, ते मला पकडण्यापूर्वी. क्रॅक माझ्या तोंडात आहे. ते माझ्या ढुंगणात आहे आणि वेळोवेळी त्या पुड्या माझ्या पोटात स्फोट करत असल्याचं मला जाणवतं. माझ्या सर्व शरीरात कोकीनचे स्फोट झाल्यासारखं वाटतंय आणि त्या वेळी मी त्या सावल्या पाहतोय, त्यांना पाहतोय, त्यांची वाट पाहतोय, त्यांचे आवाज ऐकतोय.

माझ्या डोळ्यांसमोर चमकतंय, अंधारी येतेय. माझ्या कानांतून आवाज येतायत आणि ते फुटतायत. जेव्हा सर्व काही कमी होऊ लागतं, मी जमिनीवर पडतो. मला हलण्याची ताकद नाही. उठून पलंगावर पडण्याचीही ताकद नाही. माझं मांस माझ्या हाडांवरून गळून पडतंय. मी तिथे अनेक दिवस पडून आहे, कदाचित तीन दिवस. जिकडेतिकडे क्रॅक आहे. सर्व जमिनीवर, सिंकमध्ये, पलंगावर. तिथे मॅड हॅटरची

क्रॅक पार्टी आहे आणि मला हलण्याचीही ताकद नाही आणि हेरॉईनमुळे होणारी ती प्रतिक्रिया, रॅटल माझ्या आत्म्याचा चावा घेतेय.

सरतेशेवटी कसाबसा अशक्य असताना मी दरवाज्यातून बाहेर जातो. माझं डोकं क्रॅकमुळे फुटतंय आणि एका डोळ्यानं दिसतही नाही. मी धडपडत मोकळ्या जागेत जातो आणि नुसत्या छोट्या चड्डीवर उघडा उभा राहतो. माझं वजन जवळजवळ सात स्टोन आहे आणि माझी कातडी पारददर्शक झाली आहे. माझ्या दंडावरून रक्त खाली वाहतंय. एखाद्या झूमध्ये मोकाट सुटलेल्या प्राण्यासारखा मी आजूबाजूला घाबरून पाहतोय. तेथील कर्मचारी घाबरून मोठे डोळे करून त्या जिन्यावर बसलेयत आणि मी त्यांची खात्री पटविण्याचा प्रयत्न करतोय, की तिथे वर लोक मला शोधत आहेत आणि त्यांना मला ठार मारायचंय.

ते मला शांत करण्याचा प्रयत्न करतात; परंतु मी शांत होऊ शकत नाही. मला भीतीनं ग्रासलंय. जय, ज्यानं क्रॅकच्या बदल्यात मला हेरॉईन दिलं होतं, त्याला माझी समस्या कळते. तो माझ्याकडे दु:खी चेहऱ्यानं सावधपणे चालत येतो.

"हे बघ मित्रा..." तो हळुवारपणे सांगतो.

"चालता हो, चुत्या चालता हो!" मी व्हॅक्यूम क्लिनर पकडून आणि ते एखादं हत्यार असल्यासारखं फिरवत ओरडतो. "जर तू आणखी जवळ आलास, तर मी तुला यानं ठार मारू शकतो. तुझं डोकंच फोडू शकतो."

"मार्क, हे क्रॅक बोलतंय." तो सांगतो, "तुला आता त्याचा वापर थांबवायला हवा."

परंतु या वेळेपर्यंत मी वळतो आणि धावत सुटतो. जेवढं शक्य असेल, तेवढ्या वेगानं मी हॉस्टेलमधून पळतो, कारण की ते माझ्या मागावर आहेत. यावर कुणाचाच विश्वास नाहीये. मी त्या आवाजांवर किंचाळतोय, कारण यापुढे त्यांना घाबरून राहणं मला चालणार नाही. "मी इथे आहे. या! मला पकडा! या आणि मला पकडा!"

मी दरवाज्याशी येतो आणि थांबतो.

मला माझं बोलणं ऐकू येतं.

मी... अगदी ठार वेड्यासारखं बोलल्याचं वाटतं.

मी स्तब्धपणे उभा राहतो. विचार करतो. येथील कर्मचारी ज्या तऱ्हेनं माझ्याकडे पाहतील, तसा मी स्वत:ला पाहतो. ते पोलिसांना बोलावतील. मनोविकारतज्ज्ञांचा गट बोलावतील.

मी खाली बसतो. मी शांत आहे. खोल आणि मंद श्वास घेत आहे. मला मृत्यू आल्यासारखं वाटतंय.

जय पुन्हा जवळ येतो आणि सावधपणे माझ्या बाजूला बसतो.

"हे क्रॅकमुळे झालंय." मी सांगतो.

"हं, तुला आता ड्रगची गरज आहे."

"हं,"

आम्ही ताबडतोब एक सौदा करतो. हेरॉईनच्या बदल्यात क्रॅक आणि जेव्हा तो सामग्री घेऊन परत येतो, मी त्याला क्रॅक देतो आणि इंजेक्शन घेतो आणि हेरॉईनची शीतलता माझ्या शरीरातून पसरताना मला जाणवतं. डेव्ह, एक कर्मचारी, माझ्या खोलीत येतो आणि मला लांड्या चड्डीत इंजेक्शन घेताना पाहतो. तो माझ्या देहाकडे वेड्यासारखा पाहतोय. त्याच्या चेहऱ्यावर धक्क्यापेक्षा भीतीच जास्त आहे. मी माझ्याकडे आता बघणंच सोडून दिलंय आणि त्याच्या चेहऱ्यावरच्या भावभावनांवरून मी किती खराब दिसतोय, ते मला जाणवतं. तो एक सामान्य माणूस आहे, त्यानं मृतदेह पाहिलाय.

"तू भलताच खंगलायस मार्क. तू खूप आजारी आहेस. तुला हॉस्पिटलमध्ये जायला हवं." तो हळुवारपणे सांगतो.

मी माझी मान हलवतो. मनोविकार विभाग मला नकोय.

"मी मनोविकार विभागाबद्दल बोलत नाहीये. मी काही औषधोपचार आणि विश्रांतीबद्दल बोलतोय." डेव्ह म्हणतो, "मी आता तुझ्यासाठी जिकडे तिकडे फोन करून चौकशी करतो."

आणि मनातून अर्धवट आशा वाटते, की तो यशस्वी होईल; परंतु तो परत येतो आणि मला सांगतो, की कुणीही मला घ्यायला तयार नाही.

"डिटॉक्समध्ये पुन्हा जायला तुला फारसा अवधी नाहीये." तो मला आठवण करून देतो. मला डिटॉक्स आठवतं. दोन आठवड्यांपूर्वी मी तिथे होतो ते. त्या वेळेपासून मी ड्रग्ज घेतोय, मार खाल्लाय, हॉस्पिटलमध्ये आहे, ड्रग्ज शोधलेत आणि मी फरार आहे. हे वर्षांपूर्वी घडल्यासारखं वाटतंय.

आता माझ्याकडे खूपच ड्रग्ज आहेत आणि माझे दिवस उन्मळून पडतायत. मला माझा पुरवठा नीट करण्यासाठी एवढंच करायचंय, की क्रॅकच्या बदल्यात हेरॉईन घ्यायचं. मला काही आता धावत जाऊन सौदा करायचा नाही, चोरी करायची नाही, भीक मागायची नाही, की वादविवाद करायचे नाहीत. यापूर्वी माझं आयुष्य हे अंदाधुंद होतं, असं मला वाटतं; परंतु खरा गोंधळ आता झाला आहे. उन्मादावस्थेत घाबरून आणि चिडून मी सबंध दिवस चोरटेपणे हालचाल करतो आणि या सर्व वेळी मला काहीतरी भयानक दिसतं. बऱ्याच लोकांना ठार करतील एवढे ड्रग्ज मी घेतोय आणि माझ्यावर त्याचा परिणाम कमीत कमी होतोय. माझी ती ड्रग्ज उतरतानाची वाईट प्रतिक्रिया, ते भयानक रॅटल्स आणि समाधान न होणं, ते ड्रग्ज आता काम करत नाहीयेत. मला रडावंसं वाटतंय. पुन्हा तेच घडतंय, ड्रग्ज काम

करत नाहीयेत.

मी कॅम्डेनमध्ये घुटमळतोय; पण आता मी क्रॅकच्या बदल्यात हेरॉईन मिळवण्यासाठी वेस्ट एन्डला जातो. मी सावध आहे. लक्ष ठेवून आहे. मला माहीत आहे, की प्रत्येक जण माझ्यावर रागावलाय, प्रत्येकाकडून मला भीती आहे. विक्रेते रागावले आहेत. विल्फ आणि त्याचे बॉस चिडलेले आहेत, अगदी माझा मित्र डेव्हही चिडलाय. मी दाट गर्दीत वावरतो; पण जंकींना इतर काही दिसत नाही आणि मी जणू काही नग्नावस्थेतच त्या रस्त्यावर आलोय, कारण काही मिनिटांतच माझे सर्वांत मोठे शत्रू कोण आहेत, ते मी जाणतो, ते जुळे केथ आणि माल्क. त्या टोळीवाल्या गुंडांनी त्यांना मला शोधण्यासाठी पाठवलंय.

त्यांच्यापैकी एक मला पाहतो. तो माझ्याकडे बोट दाखवतो. त्या लोकांच्या गर्दीतून तो सरळ माझ्याकडे बोट दाखवतो. तो काही अंतरावर असलेल्या आपल्या भावाला खूण करतो. त्याच्या हातात एक सन ब्लेस्ट ब्रेडची पिशवी आहे. मला त्यात असलेली मोठी सुरी दिसावी, म्हणून तो ती थोडी मागे सरकवतो. ती सुरी माझ्यासाठी आहे. ब्रेड हा जगण्यासाठी आहे; परंतु त्यांना माझा जीव घ्यायचाय. मी गर्दीतून धावत सुटतो. माझ्या मागे पावलांचे आवाज ऐकू येतात. मी जोरात धावतो. मी त्यांना ऐकतो, त्यांचा श्वास जाणतो आणि जेव्हा मी वळतो, मला एक मोठा, कुरूप वेडावाकडा चेहरा माझ्याशेजारी दिसतो. जुळ्यांपैकी एक माझ्या अंगावर उडी मारतो; पण मी त्याला चुकवतो.

मी त्यांच्यापासून जरी निसटलो असलो, तरी माझी काही सुटका झालेली नाही, कारण मला आता माहीत आहे, की मला मारण्यासाठी माझ्या डोक्यावर किमतीचं लेबल चिकटवलेलं आहे. माझ्याकडे एकंदर दहा हजार पौंडांचं ड्रग्ज आहेत. मला मारण्यासाठी त्या जुळ्यांना भरपूर पैसे दिले जातील आणि त्यांना माझं हे ड्रग विक्रेत्याचं कामही हवंय. पोलीस आणखी कुणा एका बेघराच्या आणखी एका मृत्यूचं कारण शोधण्याच्या भानगडीत पडणार नाहीत, कारण तो लवकरच एड्सनं मेला असता.

मग मी पुन्हा वेस्ट एन्डला जायला काही दिवस जातात आणि या वेळी मी मोठ्या रस्त्यावर वावरतो. चेरिंग क्रॉस रोड, शॉफ्ट्स बेरी ॲव्हेन्यू, हे मार्केट; पण पुन्हा एकदा तिथे ते जुळे आहेत. जणू काही ते रात्रंदिवस त्या रस्त्यावर गस्त घालत आहेत आणि मला शोधत आहेत. मी त्यांना दुरून पाहतो आणि तेही मला त्या क्षणी पाहतात. मला त्या सुरीची चमक दिसते. ते तळ्यातील माशासारखे जोरात झटकन पुढे होतात. मी पुन्हा वळतो, गर्दीतून वाट काढत जिवाच्या भीतीनं धावत सुटतो.

तिसऱ्यांदा जेव्हा मी जातो, केथ आणि माल्क पुन्हा इथे आहेत. या वेळी ते

मला मागून पकडतात आणि त्यातील एक मला एका गल्लीत खेचण्यात जवळजवळ यशस्वीही होतो. त्या क्षणी जेवढं शक्य आहे, तेवढ्या जोरात मी त्याला गुद्दा मारतो आणि त्याचा श्वास अडखळलेला असताना आणि त्याचा भाऊ जास्त दूर असल्यामुळे मदत करण्यास असमर्थ असतो, तेव्हा मी वळतो आणि धावतो.

मी असा बराचसा समज करून घेतलाय, की मी वेस्ट एन्डवरचा कोणीतरी आहे; परंतु आता मला समजतं, की मी धुळीकणापेक्षाही कस्पटासमान आहे. अनेक टोळीवाले गुंड आणि मोठ्या ड्रग विक्रेत्यांनी ती जागा भरलेली आहे. त्यांनी माझ्यासाठी कितीही लोक पाठवले असतील, त्यामुळे आता मी वेस्ट एन्डला परत येऊ शकत नाही. आता यापुढे मरण किंवा डिटॉक्स या दोनच गोष्टी शिल्लक आहेत.

माझी पुन्हा एलिफंट आणि कॅसलकडे परत जाण्याची वेळ आली असताना मी चोरलेले सर्व ड्रग वापरले आहेत. ज्या हॉस्टेलमधील कर्मचारी वर्गाला माझ्यात एक विशेष स्वारस्य आहे, कारण त्यांना माहीत आहे, की मी मरणापासून फार दूर नाही. त्यांनी माझ्यासाठी हॉस्पिटलमध्ये जागा मिळवण्यासाठी प्रयत्न केलाय आणि त्यात ते अयशस्वी झाल्यामुळे त्यांना धक्का बसलाय. आता ते सर्व डिटॉक्समुळे सुधारणा व्हावी, यासाठी उत्सुक आहेत. एक टॅक्सी मला तिथे घेऊन जाण्यासाठी वाट पाहत आहे. फक्त एक गोष्ट सोडली, तर मी जाण्याच्या तयारीत आहे. तिथे एक माणूस आहे, जो मला हेरॉईन देणं लागतो. मी त्याच्यासाठी क्रॅकची अनेक पाकिटं दिली आहेत; परंतु त्याची परतफेड करण्यासाठी तो थांबलाय, कारण त्याला वाटतंय, की मी डिटॉक्सध्ये जाईन आणि त्या कर्जाच्या परतफेडीची मागणी करणार नाही. त्यामुळे मी चिडलोय. मी त्या हेरॉईनच्या पाकिटांची वाट पाहतोय आणि आता इथे टॅक्सी आलीय आणि जाण्याआधी त्यांचा वापर करणं मला शक्य नाही. त्या माणसानं माझ्याकडून घेतलेल्या पाकिटावरून मला फसवलेलं आहे. त्याला वाटतं, की तो माझ्याहून हुशार आहे, आहे हुशार? माझ्याकडे वस्तऱ्याचं पातं आहे आणि त्यानं मला त्याचे बारीक तुकडे कापायचेत. मी दरवाज्याकडे जात असताना मला तो जिन्यावर दिसतो.

"डिटॉक्सला जाण्याआधी मला शेवटचं इंजेक्शन घ्यायचं होतं. तू मला माझी शेवटची पुडी द्यायचा होतास." मी त्याच्यावर ते रेझरचं पातं दाखवत ओरडतो. मला त्याचा द्वेष वाटतो. मला त्याला ठार मारायचंय.

एक कृष्णवर्णी कर्मचारी स्त्री माझ्याकडे दु:खानं पाहते. ती अगदी शांतपणे सांगते, "मार्क, तुझी टॅक्सी बाहेर आहे."

मी त्या जिन्यावरच्या माणसावर ओरडतो, "चुत्या हरामी! मला आता डिटॉक्समध्ये इंजेक्शन न घेता जावं लागतंय आणि यासाठी मी तुझा समाचार घेईन."

तो घाबरलेला क्षुद्र प्राणी जिन्यावरून आता वर जातोय. मी माझा वस्तरा

दाखवतो आणि त्याच्यामागे जायची तयारी करतो.

मग माझ्या कानांत तो शांत आवाज येतो, "मार्क, जर तू हे केलंस, तर सर्व संपेल. तुझ्यासाठी सारं संपेल. म्हणून दूर जा, यापासून दूर जा. टॅक्सीत बस आणि डिटॉक्सला जा."

मला तिचा आवाज ऐकू येतो आणि त्याच्यातील हळुवारपणा माझ्या आत पाण्यासारखा झिरपतो; परंतु मी काही निर्णय घेत नाही. मी वळेपर्यंत मला एवढंही माहीत नाही, की मी त्याला मारणार आहे की येथून जाणार आहे. मग मी दरवाज्यातून टॅक्सीकडे जातो. मी त्या हरामीच्या मागून उडी मारून सहजपणे गेलोही असतो. तो मला देणं लागतो आणि मला ते सहन होत नाही. मी एलिफंट आणि कॅसलकडे जात असताना रागानं जळफळत असतो.

तेथील कर्मचारी वर्ग माझं प्रेमळपणे स्वागत करतात. मला मेथॉडीनवर ठेवतात आणि युनिव्हर्सिटी कॉलेज हॉस्पिटलच्या ए अँड इकडे घेऊन जातात. माझ्या अंगावरच्या उवा काढल्या जातात. मला तेथील लॉस्ट प्रॉपर्टीमधून कपडे देतात आणि मग एक डॉक्टर माझा सुकलेला हात पाहतो.

"तू जन्मल्यापासूनच हा असा आहेस का?" तो विचारतो.

मी त्याला सांगतो, की पंधरवड्यापूर्वी मी उत्तम अवस्थेत होतो.

तो माझ्या अंगावरचे घाव आणि जखमा पाहतो आणि मला एका नर्सच्या ताब्यात देतो, तिचं काम आहे शस्त्रक्रिया करून माझे सॉक्स काढणं, कारण माझ्या पायांवरील आणि बोटांवरील खपल्या त्या मोज्यांबाहेर वाढल्या आहेत. हे कापण्यासाठी आणि तो भाग पाण्यात भिजवून ठेवून माझ्या कातडीवरून ते कापड दूर करण्यासाठी तासन् तास जातात आणि ती नर्स एकदा नाही अनेकदा ओकाऱ्या काढते. मला माहीत आहे, की मी काही बघण्यालायक नाही. माझं वजन एखाद्या कुत्र्याहूनही कमी आहे. माझी ढोपरं ही माझ्या मांड्यांपेक्षा रुंद आहेत. माझी कातडी एखाद्या भुतासारखी पारदर्शक आहे आणि माझ्या देहावर व्रण आणि कंगोरे यांच्या खुणा आहेत; परंतु ती नर्स मला माणुसकीनं वागवते. तिचा आवाज मृदू आहे. तिची वागण्याची पद्धत दयाळू आहे. तिचा स्पर्श हा हळुवार आणि जवळकीचा आहे, त्यामुळे मला रडू येतं. दीर्घकाळ मी हे अनुभवलेलं नाही. माझ्या पावलांवर व्यवस्थित मलमपट्टी करून स्वच्छ कपड्यांत मी डिटॉक्स सेंटरला परततो. मी मेथॉडीन घेतलंय, तरी ते रॅटल चालूच आहे. गेल्या वेळी मी इथे होतो तेव्हापासून एक महिन्यात मी अशक्य वाटेल एवढ्या प्रमाणात ड्रग्ज घेतलेले आहेत, यामुळे ते रॅटलही भयानक आहे. ते मला हसतंय. दहा दिवसांनंतर पुन्हा एकदा मेथॉडीन थांबवल्यावर मी अगदी पार थंड पडलोय आणि मला हे सहन होत नाही. आम्हाला बाहेर जायची परवानगी आहे आणि मी काही ड्रग्ज घेण्यासाठी सरळ जातो. वेस्ट

एन्डला नाही, कारण आता ते माझ्यासाठी फारच धोकादायक आहे. मी किंग्ज क्रॉसला जातो. माझी हेरॉईन घ्यायची हिंमत नाही, कारण डिटॉक्समधील कर्मचारी ते ताबडतोब ओळखतील. मी क्रॅक विकत घेतो आणि परत एलिफंट आणि कॅसलला जातो. उघड्या पांढऱ्या बाथरूममध्ये त्या टबमध्ये मी स्वत:ला बुडवून इंजेक्शन घेतो.

वुश, काही मिनिटं मी या जागेतून बाहेरच जातो. या इमारतीतील, या शहरातील, या देशातील, या पृथ्वीवरील थंड पांढऱ्या खोलीतून बाहेर जातो. मी वर चंद्रावर प्रदक्षिणा घालू लागतो आणि उन्मादाच्या त्या क्षणानंतर ताबडतोब पाठलाग करतात ते पावलांचे आवाज, हजारो लोकांची कुजबूज, गुरगुरणं आणि हळू आवाजातील बोलणं आणि माझ्या कानांत गुणगुणणं. ती कमिटी आहे. ते सांगतायत, दुष्ट हरामी, ते आता तुला बाहेर फेकतील. तू पुन्हा रस्त्यावर जाशील. तू एक घाणेरडी कचऱ्याची थैली आहेस. तू तिथे गेलास, की आम्ही तुला धरू किंवा आम्ही ती खिडकी फोडून तो दरवाजा तोडून आणि सरळ आत येऊन तुला धरू का?

मी श्वास घेणं थांबवतो. पाण्याखाली लपतो आणि मग मी त्या सर्व सामग्रीचे तुकडे तुकडे करतो, ते चुरडतो आणि ते खाली खोल खोल पाणी जाण्याच्या भोकात टाकतो, त्यामुळे कुणाला काही कधीच कळणार नाही. माझ्याशिवाय कुणालाच माहीत नाही, की मी डिटॉक्समध्ये आहे आणि ड्रग्ज घेतोय.

मी वॉर्डन स्ट्रीटवर दुसऱ्या दिवशी जातो. सर्व डोळे आणि कान माझ्यावर रोखलेले आहेत, अशी मला भीती वाटते. मी त्या टर्निंग पॉइंट इमारतीत शिरतो.

मी म्हणतो, "सीन, मी काल रात्री ड्रग घेतली. मी काही क्रॅक टोचून घेतलं आणि सामान भोकातून फेकलं."

तो घाबरलेला दिसतो. "तुला बाहेर काढतील! मला खात्री आहे, की हे तुला माहीत आहे."

हो, मी जर ड्रग घेतलं, तर मला बाहेर जावं लागेल, हे मला माहीत आहे आणि मला हेही माहीत आहे, की बाहेर गेलो, तर मी मरेन. आता रस्त्यावर राहणं आणि जगणं शक्य नाही. जर ड्रगनी मला मारलं नाही, तर ते जुळे मारतील.

"हे नियम आहेत." सीन सांगतो. "आणि ते तू मोडलेस."

माझा घसा आवळल्यागत होतो, बोलणं अवघड होतं. "मी थांबू शकत नाही. मी या मध्यवर्ती लंडनमध्ये राहून ड्रग्ज न घेता राहू शकत नाही. हे अशक्य आहे."

सीन आपले तपकिरी मोठे डोळे बारीक करतो आणि गंभीर दिसतो.

"तू त्यांना सांगणार आहेस का?" मी विचारतो.

तो दीर्घ नि:श्वास सोडतो, विचार करतो, त्याचा चेहरा गंभीर होतो आणि त्यानं

हातांची घडी घातलेली आहे.

माझा आवाज आता घायकुतीला आल्यासारखा आहे. "तू त्यांना मला बाहेर फेकू देणार का?"

सरतेशेवटी तो म्हणतो, "ठीक आहे मार्क, मीसुद्धा नियम मोडणार आहे. माझ्याकडे एक दुसरा मार्ग आहे."

एक तऱ्हेची सुटका. ती लाजेसारखी माझ्या अंगांगातून पसरते. सीन मला वाचवणार आहे.

■

३६

आम्ही बॉगनॉर रेगिसमध्ये आहोत. हे दक्षिणेच्या किनाऱ्यावरचं एक समुद्रकाठचं शहर आहे आणि या ठिकाणी मी ड्रग्ज विकलेले नाहीत किंवा घेतलेलेही नाहीत. सीन मला ट्रेनमधून इथे घेऊन आलाय. लोक आमच्याकडे टक लावून पाहतात. एका माणसाला माझ्याविषयी इतकं वाईट वाटतं, की तो आमच्यासाठी आइस्क्रिम विकत घेतो. आम्ही एक विचित्र जोडगोळी आहोत, मी थरथर, घाम काढीत जाणारा आणि सीन मला धरून ठेवत चालणारा.

स्टेशनवरूनचा रस्ता सपाट आहे; परंतु तो एखाद्या उंच टेकडीसारखा वाटतो.

"मी इथे जाऊ शकणार नाही." मी म्हणतो. "मी खूप थकलोय, खूप आजारी आहे. मला दुखापती आहेत आणि माझा डावा हात कामातून गेलाय."

"होय, तू जाऊ शकशील!" सीन म्हणतो, "मी तुझी पेटी तुझ्यासाठी घेतो."

मी त्याच्यावर भार टाकतो आणि तो माझी छोटी करडी आर्ट बॉक्स एका हातात घेतो. मला धरून नेतो. तिथे फरसबंदीलगत एक भिंत आहे आणि प्रत्येक दोन मिनिटांनंतर मी तिथे टेकण्यासाठी थांबतो.

"आता चल मि. जॉन्सन," सीन अधिकारवाणीनं सांगतो. "ते काही फार दूर नाही."

आम्ही एका जुन्या पडक्या घराजवळ येतो.

"हे रॅव्हेन्स कोर्ट अल्कोहल आणि ड्रग ट्रिटमेंट सेंटर आहे." सीन मोठ्या रुबाबात सांगतो. जणू काही आम्ही बकिंगहॅम पॅलेसलाच आलो आहोत. माझ्या शरीराला इतक्या वेदना होत आहेत, की मी त्या जागेकडे धड पाहतही नाही. हे आणखी एक मोठं घर आहे; परंतु ते मी गेल्या वेळी पुष्कळ ड्रग्ज आणि वर्षांपूर्वी बर्मिंगहॅमला ज्या पुनर्वसन केंद्रात होतो, त्यापेक्षा जरा दूर वस्तीत आहे. ते बहुतेक तसंच राहील. ते दुसरी मायसन डी रिलॅक्स आहे आणि मला अनेक मैत्रिणी मिळतील आणि त्या विचारानं मला बरं वाटू लागतं; पण हे काही लागू पडत नाही,

कारण मि. जॉन्सनसाठी कशाचीच मात्रा चालत नाही. तो एक दुष्ट हरामी आहे आणि फारच वाहवत गेलाय.

आम्ही एका लाल मोठ्या, मोकळ्या खोलीत येतो. तिथे अनेक कप पडलेले आहेत आणि त्यांच्यावर बश्या आहेत. विचित्रच आहे, पण हे असं का, याचं आश्चर्य करण्याइतकाही मी त्रास घेत नाही. माझ्या शरीराच्या इतर भागांपेक्षा माझे दात फार दुखत आहेत, माझे डोळे दुखतायत, कारण माझ्या डोळ्यांच्या बाहुल्या उजेड सहन करू शकत नाहीत. माझे पाय दुखतायत, कारण रस्त्यानं ते बहुतेक घासून निघालेत. माझं डोकं गरगरतंय. माझा सर्व देह थरथरतोय. मी जेलीसारखा थुलथुलीत आहे. मी कोणीही नाही. मला माझ्या अस्तित्वाची जाणीवही नाही आणि मी घाबरलोय. मला आता माहीत आहे, की जे अशक्य आहे ते मला करायचंय, ड्रग घेणं थांबवणं.

तिथे बहुतेक रहिवासी बसलेले आहेत, धूम्रपान करत विटक्या मोठ्या आरामखुर्च्यांवर काचेच्या खोलीत बसलेले आहेत. अशा ठिकाणी अरुंद जागेतून आम्हाला पाठवतात. दिव्याच्या उजेडानी मी दिपतो, तरीही मी चेहऱ्यांकडे कटाक्ष टाकतो. तिथे जवळजवळ दहा लोक आहेत आणि ते सर्व वेगवेगळे आहेत. काही म्हातारे, अगदी पन्नाशीचे, साठीचेही, काही थोडे तरुण आहेत आणि बाकीचे माझ्या वयाचे आहेत. ते सर्व माझ्यासारखे रस्त्यावर राहणारे आहेत, असं काही दिसत नाही. ते चांगले धष्टपुष्ट आणि चांगल्या प्रकृतीचे आहेत. एक-दोघं मला अभिवादन करतात. मी प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न करतो; पण मला खूप वेदना होतायत. सीन, प्रिन्स चार्मिंग बनून माझ्यावतीनं गप्पा मारतो.

ॲनी, एक कुरकुरी वाटणारी आयरीश स्त्री, मी ज्या खोलीत कुणाबरोबर तरी राहणार आहे, तिथे आम्हाला घेऊन जाते. ती खोली खूप मोठी आहे आणि तिची खिडकी बाहेर आलेली आहे. खोलीत दोन एकेरी पलंग आहेत आणि दोन कपड्यांची कपाटं. अनेक लोक या खोलीत राहिले आहेत. त्या खोलीला अनेक कथा सांगण्या-सारख्या आहेत. मी जरा गोंधळून माझ्या पलंगाकडे पाहत काय करावं, ते न समजून उभा राहतो. सीन माझ्याकडे पाहतो.

"तू तुझं सामान सोड." तो म्हणतो.

याचा अर्थ मी माझे कपडे या मोडक्या कपाटात ठेवायचे आहेत; परंतु माझ्याकडे कपडेच नाहीयेत. मी माझा आर्ट बॉक्स उघडतो आणि त्यातील कप्पे बिजागरावरून वर येतात. मी आतल्या वस्तूंना हात घालतो. माझा सापडलेल्या वस्तूंचा संग्रह – छोटी रुपेरी वही, बिल्ले, नक्षीकाम केलेला जुन्या चमच्याचा दांडा, काही लहान डबे, शिवण्याच्या सुया, रंगवायचे ब्रशेस आणि एक रंगाची ट्यूब, या माझ्या वस्तू. मला त्यासाठी सुरक्षित जागा हवीये. कोणीतरी त्या कदाचित चोरेल. त्या नेहमीच मला

महत्त्वाच्या वाटल्या होत्या; पण आता त्या मला जास्त महत्त्वाच्या वाटतात. मी त्या वस्तू पलंगाखाली ठेवतो.

आता सीन जायची वेळ आलेय. मला भीती वाटतेय. रडावंसं वाटतंय. मला त्याला धरून ठेवायचंय. मी त्याच्याबरोबर मोठ्या मोकळ्या खोलीत जातो आणि जेव्हा तो माझा निरोप घेतो, त्या वेळी त्याच्या जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहणं मला सहन होत नाही. मी पाच वर्षांचा आहे आणि माझ्या आई-वडिलांनी मला इथे बॉगनॉरमध्ये एकटं सोडून जायला नकोय. सीन वळतो. तो म्हणतो, "मार्क, ही ती जागा आहे, जिथे तू असायला हवंस. आता ही वेळ आहे. इथे तू त्यांच्याबरोबर राहायचंयस." तो निघून जातो आणि मला रितं वाटतं. एखाद्याच्या जवळच्याचा मृत्यू झाल्यागत. माझ्या वेदनांबरोबर मी एकटा आहे. मी माझ्या खोलीत जातो आणि पडतो.

माझी ड्रग न घेतल्यामुळे होणारी प्रतिक्रिया भयानक आहे. मला विश्रांतीची जरुरी आहे. कदाचित, मी अंघोळ करीन. या सुरुवातीच्या रॅटेलच्या स्थितीतून मी डिटॉक्समध्ये मेथॉडीनच्या मदतीनं गेल्याचं अपेक्षित आहे; परंतु मी डिटॉक्समध्ये फसवलंय. मी सर्व ठिकाणी आणि सर्वांना फसवतो, अगदी स्वत:लाही त्या रीतीनं, त्यामुळे माझ्या प्रतिक्रियेची प्रक्रिया फारच भयानक आहे. हे सर्व सुसह्य व्हावं, यासाठी डॉक्टरनं सांगितलेली कोणतीही औषधं इथे रॅव्हन्स कोर्टमध्ये नाहीत. इथे काहीच नाही. मला या आधीच एक कागद सही करण्यासाठी दिलेला होता. त्यात लिहिलेलं आहे, की मला हे माहीत आहे, की जर का मी दारू प्यायलो किंवा ड्रग्ज किंवा इतर काही रसायनं घेतली, गुत्त्यात गेलो किंवा लैंगिक संबंध ठेवले, तर मला इथून घालवून देण्यात येईल.

मला त्या पलंगावरची पांढरी चादर आणि रजई बघायलाही आवडत नाही. मी नक्कीच त्यामध्ये जाऊन झोपणार नाही. मी माझे कपडेही काढणार नाही. जर मी असं केलं, तर मला सुरक्षित असं वाटणार नाही. मला ठीक वाटणार नाही. मी पलंगावर पडतो आणि डोळे बंद करतो. झोपायचं, तर माझं सर्व अंग दुखतंय.

एक ठेंगू जाडा माणूस आत येतो.

"आज ग्रुप थेरपी आहे, हे सांगण्यासाठी त्यांनी मला पाठवलंय."

मी कण्हतो.

त्याचा आवाज मृदू आहे. तो याचनेच्या स्वरात म्हणतो, "ग्रुप थेरपी आता सुरू होतेय."

"मी जाणार नाही," मी म्हणतो. "मी आजारी आहे."

"तुला जायला हवं."

"मी जाऊ शकत नाही."

"ते तुला बाहेर काढतील."

मला बाहेर काढतील. मग मी कुठे जाईन? माझ्या मनात चित्रं उभी राहतात, फरसबंदी आणि दरवाजे, सनबेल्स्ट ब्रेड बॅगमध्ये सुरा घेऊन फिरणारे ते जुळे, एक कोकचा उलटा केलेला कॅन आणि त्याच्या तोंडाजवळ सुकलेलं रक्त.

मी बसतो. त्या पलंगावरून उठण्याचा प्रयत्न करतो. तो माणूस माझ्याकडे पाहत असतो.

"हे मला करायलाच हवं का?" मी धापा टाकत विचारतो.

"जर तुला इथे राहायचं असेल, तर. इथले काही नियम आहेत."

मायसन डी रिलॅक्सबद्दल हे एवढं. मी यंत्र व्हायचा प्रयत्न करतो; परंतु ती पिस्टन काम करत नाहीत. वेदना त्यांच्यावर मात करतात. हळूहळू मी उभा राहतो. तो माणूस मला एका अर्ध वर्तुळाकार आसनं असलेल्या खोलीत घेऊन जातो. मी आधी पाहिलेले तेच लोक इथे आहेत; परंतु आता ते धूम्रपान करत नाहीत आणि ते बेचैन आणि अस्वस्थ वाटतात. जणू काही त्यांना धूम्रपान करायला आवडेल.

या ग्रुपचा काउन्सेलर आहे ॲलन. तो वयानं पन्नाशीचा, सडपातळ, काळ्या केसांचा आहे. तो मला अभिवादन करतो. मागच्या काळात त्यानं अनेक रात्री बाहेर काढलेल्या आहेत, हे तुम्ही सांगू शकता. त्यानं पूर्वी स्पीड घेतल्याचं जाणवतं; परंतु त्याच्याजवळ एकप्रकारचा शांतपणा आहे, ज्यामुळे तुम्हाला आदर वाटतो.

तो थोडं बोलतो. मग एक माणूस बोलतो आणि मग एक स्त्री. मग एक माणूस बराच वेळ बोलतो आणि सरतेशेवटी सर्वच जण बोलतात. शब्द, शब्द. मी त्यांची लय आणि त्यांचं संगीत ऐकतो. सर्व ब्रिटनभरचे शब्दोच्चार मी ऐकतो आणि प्रत्येक स्तरातील स्वर, पण ते काय बोलतात, ते मला ऐकू येत नाही. ऐकायचं, तर मला इतकं दुखत असतं. विचार करायचा, तेही मला दुखत असतं. मी एक जखमी रानटी प्राणी आहे. मला माझं नावही धड माहीत नाही. ड्रग कसं घ्यायचं, एवढंच फक्त मला माहीत आहे.

या नवीन जागेच्या रोजच्या कार्यक्रमातून मी धडपडत जात आहे. मी रात्री झोपू शकत नाही. जेवणाच्या वेळी मला जेवावंसं वाटत नाही. जर मी उभा राहिलो, तर मला बसावंसं वाटतं आणि जर बसलो, तर उभं राहावंसं वाटतं. मला काहीही करू नये, असं वाटतं; पण करावं लागतं, कारण इथे अनेक नियम आहेत. जेव्हा तुम्ही कप वापरत असाल, तेव्हा त्याची बशी त्यावर असली पाहिजे, तसंच तुमची रोजची कामं आहेत. ती तुमची वेळ आली, की आळीपाळीनं केली पाहिजेत. धूम्रपान घरात इतर कुठे न करता फक्त बाहेरच्या व्हरांड्यात करता येईल. तुमच्या आयुष्यातील विशेष घटना तुम्ही लिहा आणि त्या तुमच्या काउन्सेलरकडे द्या. प्रत्येक दिवशी सकाळी सात वाजता उठा.

ते काय मला ठार मारायला बघतायंत? मी एक अंदाधुंद असा ड्रगचा व्यसनी आहे आणि तिथे काही शिस्त नाहीये. इथला हा रोजचा कार्यक्रम म्हणजे गोठलेल्या तलावात उडी मारण्यासारखं आहे. मला इतका धक्का बसलाय, मी इतका दिपलोय, की काय घडतंय, ते मला जवळजवळ माहीतच नाही.

लवकरच इथे आणखी नियम येतात आणि ते फक्त माझ्यासाठी आहेत. मार्कला दिवसा झोपण्यासाठी असं चोरून जाता येणार नाही. मार्कला डुलकी घेण्यासाठी जेवणाच्या टेबलखाली रांगत जाता येणार नाही. ते मला आठवड्याला सहा पौंड देतात आणि जर आम्ही नियम तोडला, तर वीस पेन्स कापले जातात. पहिल्या आठवड्याच्या शेवटी मी सर्वच पैसे घालवले आहेत आणि पुढच्या आडवड्यातील पैशातून मला त्यांना काही द्यायचं आहे.

"तू कसा आहेस?" लोक मला विचारतात आणि माझी उत्तरं नेहमी तीच असतात.

"च्यायला वैतागलोय." माझं डोकं ठेचलंय, माझं सर्व शरीर ठेचल्यागत आहे.

शारीरिक वेदनांमुळे मला त्या ग्रुप थेरपीत भाग घेता येत नाही. जेव्हा ते बोलत असतात, तेव्हा मी गप्प बसून असतो. जेव्हा मी ॲलनबरोबर एकटा असतो, माझा एक प्रश्न असतो.

"माझ्यासारखा कोणी कधी व्यसनमुक्त होऊ शकेल?"

आम्ही एका थेरपीच्या खोलीत आहोत. ही अंगणातील एक लाकडी झोपडी आहे. सूर्याची किरणं एका कोपऱ्यावर पडतायत आणि त्या रंग उडालेल्या खुर्च्यांच्या पाठी उजळतायत. ॲलन माझ्या चेहऱ्याकडे नीट पाहतो आणि पुढे वाकतो.

"हो," तो म्हणतो.

"मला असं विचारायचंय, की माझ्यासारख्या व्यसनी माणसाला बदलणं खरंच शक्य आहे का? वेगळं आयुष्य जगणं? असं आयुष्य, ज्यात मला ड्रगची इंजेक्शन रोज घ्यावी लागत नाहीयेत?"

ॲलन आपले हात फैलावतो आणि आपली मान जोरात हलवतो.

"हो, हो, हो." तो म्हणतो.

"खरंच?"

"हो, मी एक बरा झालेला व्यसनी आहे. मी गेली दहा वर्षं व्यसनमुक्त आहे."

मी त्याच्याकडे पाहतो. दहा वर्षं, मी दहा मिनिटांचीही कल्पना करू शकत नाही, दहा वर्षांचं तर सोडाच.

"तुला दहा वर्षांचा विचार करायला नको. फक्त आजचा विचार कर. प्रत्येक

वेळी फक्त एकच दिवस घे.''

माझ्या डोळ्यांत अश्रू जाणवतात, कारण कोणीतरी दिवा लावलेला आहे. तोदिवा अंधाऱ्या बोळाच्या टोकाला आहे. तो तेवढा जोरदार नाही. तो एखाद्या दूरच्या ताऱ्यासारखा टिमटिमतो. आशा, बदल होण्याची शक्यता. एक अंधूक अंधूक संधी, की असा दिवस उगवेल, जेव्हा मला ड्रग घ्यायची गरज पडणार नाही.

ॲलन माझ्याकडे निरखून पाहतो. त्याला तो दिवा लागलेला दिसतो. तो माझ्याकडे पाहून हसतो.

परंतु तो बोळ लांब आणि अंधारा आहे आणि तो दिवा फडफतोय, लटपटतोयही. पुन्हा दुसरं कोणतं आयुष्य माझ्यापुढे आहे? जर मी ड्रग घेतली नाहीत, तर मी काय करीन? मला जायला जागा कुठे आहे? आणि काही दिवसांतच रॅव्हन्स कोर्ट, त्याचे ते नियम, त्याची ती चाकोरी, बरोबर राहणारे तेथील त्रासदायक लोक, तेथील त्या ग्रुप थेरपीज आणि जो अजूनही भीतीच्या दडपणाखाली आहे आणि माणुसकीच्या टोकावर आहे, अशा माणसाकडे रेव्हन्स कोर्टवाल्यांच्या त्या न संपणाऱ्या मागण्या, यामुळे मी पार निराश झालोय. मी माझ्या सबंध आठवड्याची मजुरी आज संध्याकाळी फुकट घालवलेय, कारण मी डुलकी घेण्यासाठी जेवणाच्या टेबलखाली गुंडाळी करून बसलो होतो. मला माझी जीवनकथा लिहावयाची होती आणि ती एक फार लांबलचक डोकेदुखी होती, त्याशिवाय ते नेहमी आमच्या आयुष्यातील विशेष घटनांबद्दल बोलतात. आम्ही त्याबद्दल चर्चा करायची असते आणि लिहायचं असतं आणि आमचे हे कागद एका तपकिरी पाकिटात घालून टीव्हीच्यावर काउन्सेलरला वाचण्यासाठी ठेवायचे. मला हे करायचं नाही. मला स्वत:ला एका कोपऱ्यात न्यायचं आहे. मी एक जखमी प्राणी आहे; परंतु ते मला स्वत:ला असं गुंडाळून बसू देत नाहीत. ते मला एकटं सोडत नाहीत. मला इथे वैताग येतो. मला पुन्हा ड्रग्ज घ्यायचे नाहीत; परंतु मला व्यसनमुक्त होणं, हेही वैतागाचं वाटतंय. व्यसनमुक्ती ही संपूर्णपणे उद्ध्वस्त करणारी अवस्था आहे.

मी हे ॲलनला सांगण्याचा प्रयत्न करतो. आम्ही पुन्हा थेरपीच्या खोलीत आहोत आणि मी म्हणतो, ''माझी जर रॅटलची स्थिती वाईट नसती, तर मी यात आणखी भाग घेऊ शकलो असतो. जर मला थोडं मेथॉडीन मिळालं तर...''

तो आपल्या भुवया वर करतो.

''नाही, मार्क.''

''या वेदना... त्या मला ठार करतायत.''

''हेरॉईन न घेतल्यामुळे प्रक्रियेतून आलेलं मरण कुठेही नोंदवलेलं नाही. ते भयानक आहे; पण त्यामुळे तू मरणार नाहीस.''

''या वेदनांमुळे मी विचार करू शकत नाही.''

"तू रासायनिकदृष्ट्या अवलंबून आहेस आणि हे अवलंबून असणं थांबवणं, म्हणजे ते रसायन थांबवणं. त्या ऐवजी दुसऱ्या गोष्टी घेऊन त्यावर अवलंबून राहणं नव्हे."

"जेव्हा जेव्हा मी यापूर्वी थांबायचं ठरवलं. मी त्या रॅटेलमधून बाहेर पडू शकलो -नाही."

ॲलन माझ्याकडे पाहतो आणि क्षणभर विचार करतो. शेवटी तो विचारतो, "तू सर्व ड्रग्ज आणि दारू सोडण्याचा कितीदा प्रयत्न केलास?"

"अनेकदा, अनेकदा, अनेकदा." लंडन ग्लास्कों एक्स्प्रेससारखं माझं जीवन सरकन माझ्या डोळ्यांसमोरून जातं. व्यसनमुक्त होण्याचे हे अनेक फसलेले प्रयत्न आहेत, दुसरं काही नाही.

"मला असं विचारायचंय, की तू खरोखर संपूर्णपणे ड्रग्ज घ्यायचं कितीदा थांबवलंस?"

"लाखोवेळा!"

"म्हणजे केव्हा?"

"हे बघ उदाहरण द्यायचं, तर जेव्हा मी फोटोग्राफीचा अभ्यास करायला युनिव्हर्सिटीत गेलो तेव्हा आणि नंतर मी झाडांचा डॉक्टर होण्यासाठी म्हणून केंडॉलला शिकत होतो तेव्हा. त्या वेळी मी नेहमीच सोडत होतो आणि ही रॅटल एका वेळी मी महिनोन् महिने सोसली आहे."

"तू नक्की काय सोडलं होतंस?"

"हेरॉईन."

"या काळात तू दुसरं काही घेत होतास का?"

"काही नाही."

"म्हणजे तू दारूही घेत नव्हतास?"

"ओ होय, अर्थात मी दारू पीत होतो."

"खूप?"

"मी रोज रात्री खूप प्यायचो. मला प्यावीच लागायची. मला त्या ड्रग्जच्या व्यसनातून बाहेर पडण्यासाठी दुसऱ्या कशाची तरी गरज होती."

"तू हेरॉईन सोडायचं म्हणून दुसरं काय घेत होतास? व्हॅलियम? कोकेन? मेथॉडीन?"

"हं... होय."

"त्यापैकी कोणतं?"

"हं... सर्वच."

त्याचा आवाज दयाळू आणि स्पष्ट आहे. जणू काही तो कुणा अगदी तरुण

माणसाबरोबर बोलत आहे.

"मार्क, हे व्यसनमुक्त होणं नव्हे, नाही का? ते म्हणजे फक्त तुझा ड्रगचा वापर बदलण्यासारखं आहे. तू काही काळासाठी हेरॉईन सोडलंस; परंतु त्याऐवजी तू दुसरे आणि डॉक्टरनं दिलेले ड्रग्ज घेतलेस आणि दारू प्यायलीस."

"त्या डॉक्टरनीच तर ते लिहून दिलं होतं!"

मी माझा आवाज ऐकतो. मी एखाद्या सात वर्षांच्या रागावलेल्या मुलाच्या तक्रारी ऐकतो. मी कधीही नाही! त्यांनी मला ती दिली. मी ती काही चोरली नव्हती! ठीक आहे, मी ते डॉक्टरचं औषधं लिहून देण्याचं पॅड माझ्या खिशात चोरून ठेवलं असेल, त्यामुळे त्यानं जे मला दिलं, त्याहून जास्त मला घेता आलं, त्याशिवाय त्यात मला हव्या असलेल्या ड्रगची नावं मी घालू शकलो असेन; परंतु खरं म्हणजे मी त्या डॉक्टरचा गैरफायदा घेतला, कारण त्यानं मला ते करू दिलं.

ॲलन सांगतो, "तू जीवनकथा माझ्यासाठी लिहून दिलीस, त्या वेळी मला वाटलं, की एका ड्रगकडून दुसऱ्या ड्रगकडे जाणाऱ्या व्यसनी माणसाविषयी मी वाचतोय. तू दारूकडून गंमत म्हणून घेतल्या जाणाऱ्या ड्रगकडे वळलास आणि मग त्या नंतर रस्त्यावरच्या ड्रगकडे आणि मग डॉक्टरनं दिलेल्या ड्रगकडे मागे-पुढे होत होतास. हे ते सोडणं नव्हे. ड्रग सोडणं म्हणजे काहीही न घेणं आणि ते आम्ही इथे करतो."

मी गप्प आहे. ॲलन माझ्याकडे निरखून बघतो. आज सूर्य नाहीये आणि ती खोली अंधारी आणि थंड आहे. मी माझ्या याआधी ड्रग सोडण्याच्या केलेल्या प्रयत्नांबद्दल विचार करतो. मला नेहमी वाटायचं, की मी अगदी निकडीनं आणि प्रामाणिकपणे हे करतोय. आता माझ्या लक्षात येतंय, की जर तुम्ही दारूला ड्रग मानलंत, तर मी लहान वयाचा असल्यापासून ते घेण्याचं एकदाच थांबलो आहे, जे काही महिने मी बर्मिंगहॅमच्या पुनर्वसन केंद्रात घालवले होते, तेव्हा.

"मी दारुड्या नाही." मी सरतेशेवटी म्हणतो. मला चिडचिडल्यासारखं आणि त्रासल्यासारखं वाटतं. याक्षणी मी बॉगनॉर स्टेशनकडे चालू लागेन, मला कुणीही अडवणार नाही.

"खरंच?" ॲलन सभ्यपणे विचारतो. तो जेव्हा असा सभ्य होतो, तेव्हा मला आवडत नाही.

"मी ड्रगचा व्यसनी असेनही; परंतु मी दारुड्या नाही. मी रस्त्यावर बेघर म्हणून राहत असताना कधीही दारू घेतली नाही, म्हणजे फक्त कधी कधी."

ॲलन मान हलवितो आणि हसतो. तो माझ्याशी वादविवाद करणार नाही. तो फक्त मला मी चूक आहे, हे दाखविणार आहे. तो फार हुषार आहे, असं त्याला वाटतं, त्याचा मला राग येतो.

त्यानंतरच्या दिवसांत मला कळतं, की रॅव्हन्स कोर्ट हे बारा पायऱ्यांचा कार्यक्रम अनुसरतं. हा कार्यक्रम जगभरातील सर्व दारुड्या आणि व्यसनी लोकांनी स्वीकारलेला आहे. लवकर किंवा उशिरा का होईना, मला त्या बारा पायऱ्यांतून जावं लागणार आहे. फारच थोडी शक्यता. पहिली पायरीही पार करणं मला शक्य नाही.

पहिली पायरी : मी कबूल करतो, की मी माझ्या व्यसनाबाबत शक्तिहीन आहे आणि माझं आयुष्य अंदाधुंद झालं आहे.

प्रत्येक दिवशी मी माझ्या निष्क्रियतेचं आणि माझ्या अंदाधुंद आयुष्याबद्दल दुसरं उदाहरण लिहायचं आहे. मी ते त्या तपकिरी लिफाफ्यात घालायचं आहे आणि तो टीव्हीवर ठेवायचा आहे.

प्रथम, मी रोझीला पुनर्वसन केंद्रात भेटलो आणि मी त्या पाद्र्यावर चिडलो, त्याबद्दल लिहितो.

पुढचं, मग मी रस्त्यावर राहण्याबद्दल आणि सरतेशेवटी ते जुळे मी दिसल्यावर कसा सुरा दाखवायचे, ते लिहितो.

नंतर, मग मी त्या टीव्हीचॅनेलवरून वादविवाद केल्यावर त्या मुलाला डिटॉक्स सेंटरमध्ये कसा चावलो आणि त्यामुळे तिथून कसं बाहेर फेकला गेलो, त्याबद्दल लिहितो.

मी सांगू शकेन, अशा आणखी अनेक गोष्टी आहेत; परंतु मी त्या सांगणार नाही. मी आता बरंच सांगितलंय. मी ही उपचार पद्धती चालू ठेवू शकत नाही, कारण ती फारच वेदनामय आहे, त्यामुळे फार दुखतं आणि हे सर्व विसरण्यासाठी एक मध्यम वर्गातील काउन्सेलर, जो मला हसतो आणि लिहायला लावतो, तो नकोय. त्यापेक्षा मला चुतं इंजेक्शन हवंय.

मी निघतोय. या जागेतून बाहेर पडतोय. मला एक रिकामी बॅग सापडते. निःश्वास सोडत मी ती उघडतो.

मी कुठे जाणार आणि कसा?

माझ्याकडे बरोबर नेण्यासारखं फारसं काही नाही. लोकांनी जेव्हा ते माझ्यासारखे पळून गेले, तेव्हा टाकलेले कपडे ते तेवढे माझ्याकडे आहेत. मी ते सावकाश बॅगेत भरतो. मग मी पलंगाखाली ती आर्ट बॉक्स घ्यायला वाकतो. मी वाकल्यावर माझे सांधे कुरकुरतात आणि माझ्या पायांतून कळा येतात. जेव्हा तुम्ही हेरॉईन सोडता, तेव्हा प्रत्येक गोष्ट दुखते. त्याच्याशिवाय माझा देह निष्क्रिय आहे. माझ्या हाडांतील ते द्रवही पांढरं पडलंय आणि माझा अंशन् अंश दुःखात आहे.

मी ती आर्ट बॉक्स उघडतो आणि माझा सापडलेल्या वस्तूंचा संग्रह पुरा आहे की नाही, ते पाहतो. ते रंगवायचे ब्रशेस, चमच्याचा दांडा, त्या शिवणाच्या सुया,

ती वही, ती पदकं. त्या आर्ट बॉक्समध्ये पाहायचं, म्हणजे दुसऱ्या जगात पाहण्यासारखं आहे. जिथे गालिचे नाहीत, दिवे किंवा छत नाही, फक्त माझे चालणारे पाय तेवढेच, तेही त्या कठीण रस्त्यावरून चालणारे. माझं हृदय धडधडतं. मला भीती वाटते. मला जायचं नाही. हा पुनर्वसनाचा प्रवास तसा लांबचा आहे; पण मला राहायचंही नाही.

"काय झालं?" एक आवाज. माझ्या खोलीत राहणारा कॉलीन. इतकी रात्र झाली होती, की मला वाटलं तो झोपला असावा.

"माझे तुकडे पडतायत." मी म्हणतो. "मी इथे दोन आठवडे आहे आणि हे शरीरात काहीही न घेता राहणं मला आणखी सहन होऊ शकत नाही."

तो पलंगावर उठून बसतो, जांभई देतो. "वेदना अजूनही जास्त आहेत का?"

"त्यामुळे माझं डोकंच गरगरतंय."

त्या सर्व भावभावना ज्या मी ड्रग्जमुळे टाळू शकत होतो, त्या आता एकदम आल्यात. भीती, अपराध, शरम, निष्क्रियता, असहायता, एकाकीपणा, दुःख, एक तऱ्हेची हरवल्याची भावना, मत्सर, राग... प्रत्येक गोष्ट, जी या फुकट गेलेल्या आयुष्यात मला जाणवायला हवी होती, ती मला आता जाणवतेय इतकी वर्षं दुर्लक्षित राहिल्यामुळे या भावनांना एखाद्या मोठ्या रेल्वे इंजिनाची ताकद आहे आणि त्या माझ्यावर चालत आहेत, मला चिरडत आहेत, माझा चेंदामेंदा करत आहेत.

कॉलीन माझ्याकडे पाहतो.

"तुला काय करायचंय?"

"व्यसनमुक्त व्हायचंय. मला नवीन जागा हवीय. मला नवीन मेंदू हवाय."

"ठीक आहे... एक मार्ग आहे."

"कोणता?"

"ते असं आहे. जो सर्व विचार तुझ्या मनाच्या मागे आहे, तो सर्व बाहेर पडायला हवा आणि तुला प्रामाणिक असायला हवं. ज्या सर्व गोष्टी तुझ्या मनात दाबून राहिल्यात, तुझी सर्व गुपितं, ते सर्व, मित्रा, तुला सांगायला हवं."

मी एक मिनिट विचार करतो.

"म्हणजे तुला असं म्हणायचंय का?" मी विचारतो, "मला त्या रस्त्यावर असताना खरं काय होतं, ते सर्व सांगायचंय? बेघर असतानाचं सर्व?"

कॉलीन हसतो.

"त्या स्वाभिमान वगैरे किंवा तू किती कष्टात होतास त्याबद्दल नव्हे किंवा तुला स्वतःबद्दल किती वाईट वाटायचं त्याबद्दलही नव्हे. मला सांगायचंय, की तुला सर्व गुपितं सांगायला हवीत. खरी गुपितं. त्या सर्व शरमेच्या गोष्टी, ज्या कधी तू कुणालाही सांगितलेल्या नाहीस, त्या चोरटेपणाच्या, अडचणीच्या गोष्टी,

त्या खुनशी गोष्टी आणि ज्या तू कधी कुणालाही सांगणार नाहीस, अशी शपथ घेतलेल्या गोष्टी.''

माझी गुपितं, तो मस्करी करतोय. अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या मी कधी कुणाला सांगणार नाही.

तो म्हणतो, ''तुझ्या कमजोरपणाच्याबद्दल तू बोललास, तर तुला तुझी शक्ती परत मिळते.''

मी खोलीतून जात खिडकी उघडतो आणि रात्रीचा गंध घेतो. मी दीर्घ श्वास घेतो. ती खारट हवा, तो खारट समुद्राचा वास घेतो.

कॉलीनचा आग्रही आवाज माझ्यामागून सारखा येतच असतो.

''तुला सांगायलाच हवं.''

मी वळतो आणि अजूनही तो माझ्याकडे पाहत असतो.

''अशा काही बऱ्याच गोष्टी आहेत, ज्यामुळे तू आजारी आहेस. तुझ्या गुपितांमुळे तुझ्या आत्म्यात विष भिनलंय. त्याला स्वत:ची गुप्त बाजू असं म्हणतात. त्याचा विचार कर, मित्रा आणि तेही तुझी बॅग भरण्याच्या आधी.''

मी रात्रभर जागा राहतो. माझं शरीर वेदनांनी भरलेलं असतं. प्रत्येक नस दुखरी, माझ्या पायांचे पंखे त्यांनी आवाज करत गरगरायला हवं, हलायला हवं, मला जायला हवं; परंतु मला जायला कुठेही जागा नाही. मला हे करायचं नाही; परंतु माझ्याकडे दुसरं करायला काही नाही. मला ड्रग्ज घ्यायच्या नाहीत; पण मी ड्रग्जशिवाय जगू शकत नाही.

सकाळी मी अजून इथेच आहे.

मी जेव्हा ग्रुप थेरपीला जातो, तेव्हा पार घाबरलेला आहे. मी माझ्या खुर्चीत दबकून बसलोय आणि प्रत्येक जण सांगू शकेल, की मी आज पहिल्यांदा बोलणार आहे. इथे प्रतीक्षेचं वातावरण आहे किंवा कदाचित जिज्ञासेचं.

''आ,'' ॲलन आनंदित होऊन म्हणतो, ''अशी काही विशिष्ट घटना आहे का मार्क, जी तुला आम्हाला सांगायची आहे.''

''हो,'' मी म्हणतो. मी तोंड उघडतो आणि स्वत:ला बोलण्याची वाट पाहतो. एक मिनिटभर शब्द बाहेर येत नाहीत आणि मग मी सुरुवात करतो.

मी त्यांना, मी ज्या वेळी केंडॉलला फ्लॅटवर गेलो, त्याबद्दल सांगतो. जेव्हा मी जॅककडे लक्ष द्यायला हवं होतं, तेव्हा मी अर्धा ग्रॅम ड्रग टोचून घेतलं होतं आणि तो दरवाजा बंद असताना, त्याची नॅपी खाली गळत असताना, भुकेला आणि तो रडत असताना तो माझ्याबरोबर सबंध दिवस अडकून पडलेला होता.

मी कबूल करतो, की मी एक महाभयानक बाप आहे आणि मग मी बोलणं थांबवतो. मला खूपच शरमल्यागत आणि अपराधी वाटतंय. खोलीत शांतता आहे.

चेहरे माझ्याकडे टक लावून पाहतायत. काहींना धक्का बसलाय. काहींना सहानुभूती वाटतेय. काही लोक दुसरीकडे पाहतात. आपण या अशा माणसाबरोबर इथे काय करतोय, याचं त्यांना आश्चर्य वाटतं. एक बाई खुर्चीत मागे-पुढे होते. तिचे डोळे बंद असतात. ती मला मनातून हद्दपार करायचा प्रयत्न करते.

ॲलन पुढे वाकतो.

"जर तू ड्रग घेत नसतास, ड्रगचं तुला व्यसन नसतं, तर तू तुझ्या मुलाला असं वागवलं असतंस का?" तो हळुवारपणे विचारतो.

"च्यायला, शक्यच नाही."

"तर मग हा प्रसंग भयानक बाप असण्याबद्दल नाही, तर तो ड्रग्ज तुम्हाला कसं अनियंत्रित करतं त्याबद्दल आहे." तो सुचवतो.

मग इतर बोलू लागतात.

"ही तुला फार भयानक आठवण असेल." कोणीतरी हळूच म्हणतो.

"तुझ्या मुलानं त्या वेळी सोसलं, त्या आठवणीनं तू अनेक वर्षं सोसलंयस."

माझं वागणं कितीही राक्षसी असलं, तरीही मी माणूस आहे, हे त्यांनी समजुतीनं घेतलंय. मला त्याबद्दल त्यांचे आभार मानायला हवेत, असं वाटतं.

ही आहे ग्रुप थेरपी आणि ते मला ग्रुपच्या चर्चेचं सार देतात आणि अचानक आजूबाजूच्या लोकांचं प्रेम आणि आधार मी अनुभवतो. मी इतका दयाळूपणा अनुभवलेला नाही. कुणीही सोशल सर्व्हिसवाल्याच्या खात्याला बोलवायला धावत नाहीत. ते अशाच त्यांनी केलेल्या गोष्टींबद्दल बोलतात. अशी वागणूक, ज्यांनी त्यांचासुद्धा पाठपुरावा केलाय. एक बाई सांगते, की तिच्या दोन्ही मुलांची व्यवस्था केली गेलेली आहे आणि रडत ती त्याचं कारण सांगते. एक माणूस त्यानं आपल्या मुलाला दिलेल्या वागणुकीबद्दल सांगतो. त्याला त्याचा खूप पश्चात्ताप होतो. दुसरा माणूस आपलं जॅकबरोबरचं साम्य दाखवतो. त्याच्या दारुड्या आई-बापांबरोबरचे आपले प्रसंग तो वर्णन करतो आणि जेव्हा तो बोलतो, तेव्हा तो गोंधळलेल्या मुलागत वाटतो. त्याचा चेहरा दुःखी, गोंधळलेला आणि त्याचे डोळे अश्रू आवरण्याचा प्रयत्न करत असतात.

जेव्हा हे सत्र संपतं, मला रिकामं रिकामं वाटतं. मला माझ्याच गोष्टींची ओकारी आल्यागत, लाज आल्यागत वाटतं; परंतु एक गोष्ट मला माहीत आहे, या काही भयानक गोष्टी मी केल्यात, तसं दुसरेही आहेत, जे याच अनुभवातून गेलेत. मी काही एकटा नाही.

नंतर मला गळल्यागत वाटतं. मला इथून जावंसं वाटतं. माझ्या डोक्यातील कमिटीला आज बरंच सांगायचं असतं. मी माझ्या खोलीकडे चोरून जातो. एक ऑफीस कर्मचारी मला थांबवतो आणि दंड करतो. मी टेबलखाली लपतो आणि

मला शोधून पुन्हा दंड केला जातो. माझं शरीर अजूनही दुखतंय. माझे दात, डोळे, पाय आणि प्रत्येक सांधा जड झालाय. काही बदललेलं नाही. कॉलीन म्हणाला होता, की मला बरं वाटेल; परंतु मला बरं वाटत नाही; परंतु आता मी बोलू लागलोय. मी सांगायची सुरुवात केलीय.

ॲनी, ती आयरीश बाईही त्या सर्व झोपण्यांच्या खोल्यांवर देखरेख करते. अनेक वर्षांपूर्वी एका दारुड्या मालकानं आपल्या मृत्युपत्रात रॅव्हन्स कोर्ट हे एक पुनर्वसन केंद्र राहील, असं लिहिलं होतं. तेव्हापासून ती इथे आहे. ती नेहमी मी माझ्या कपड्यांत झोपलोय का, हे तपासते आणि जर असलो, तर मला दंड करते. आता ती मला माझ्या पलंगावरच्या चादरी बदलायला सांगते. मी त्या रजईवरचं कव्हर काढतो आणि ते जिन्यानं खाली वॉशिंग मशिनकडे घेऊन जातो.

जेव्हा मी परत येतो, तेव्हा ती विचारते, "तुझ्या चादरींचं काय?"

मी कुरकुरतो. मी त्या पलंगावरची चादर काढतो आणि ती घेऊन खाली जातो. जेव्हा मी परत येतो, तेव्हा माझं शरीर त्या प्रयत्नानं आखडल्यासारखं होतं. ॲनी वाट पाहत असते.

"तू तुझ्या उशीचं कव्हर विसरलास," ती म्हणते.

मी माझे डोळे बारीक करतो.

"चल," ॲनी कमरेवर हात ठेवून म्हणते. "जेव्हा तुम्ही पलंगावरचे कपडे बदलता, तेव्हा रजईचं कव्हर, चादर आणि उशीचं कव्हरही त्यात येतं."

ती पाच फूट उंचीची, कठीण खडकाची बनलेली आहे. तिच्या डोक्यावर पांढरे शुभ्र केस आहेत. या जगातील अशा ॲनींजवळ वादविवाद करण्यात अर्थ नाही, त्यामुळे मला पुन्हा एकदा खाली जावं लागतं.

"तू त्यामुळे शिकशील." मी श्वास लागल्यागत परत आल्यावर ॲनी मला सांगते. "तू पुन्हा विसरणार नाहीस आणि तू आपले कपडे घालून झोपत जाऊ नकोस, समजलं? रात्रीच्या वेळी तू रात्रीचे कपडे घाल आणि मग पलंगावर झोपी जा."

"परंतु मला थकल्यासारखं वाटतंय."

परंतु ती ठाम दिसते. "तू कपडे बदल आणि मग पलंगावर पड आणि तेव्हाच तू झोपायला जाशील. मग सकाळी सात वाजता तू ऊठ. सबंध दिवस तसाच राहा. तुझे कपडे काढून बदलल्यावर आणि रात्री आपल्या पलंगावर पडल्यावरच तू पुन्हा झोपशील."

मी तिचा आदर करतो. मला माहीत आहे, की ती कठोर स्त्री आहे; पण तिचा हा कठोरपणा एक प्रकारचा दयाळूपणा आहे आणि कसं जगायचं, ते तिला मला शिकवावं लागतं, याची मला लाज वाटते.

माझ्यासाठी वैयक्तिक स्वच्छता म्हणून एक गट तयार केला जातो. म्हणून

मला लाज वाटते. मी आता बराचसा स्वच्छ आहे; परंतु तरीही लोक सांगतात, की माझे कपडे चुरगळलेले आहेत आणि मी भिकाऱ्यासारखा दिसतो. केव्हा खायचं, केव्हा झोपी जायचं आणि कसे कपडे करायचे, हे मला माहीत होतं; पण हळूहळू हे ज्ञान माझ्या माणुसकीबरोबर माझ्यापासून निघून गेलं आणि आता ते मला पुन्हा शिकायचंय.

ॲनी मला जेवणासंबंधी एक धडा देते. आमचं दोघांचं बरं जमतं; पण जेव्हा नंतर तिच्या लक्षात येतं, की स्वयंपाकघर स्वच्छ नाही. तिच्या चेहऱ्यावर त्या कठोर रेषा उमटतात आणि जराही विचार न करता ती मला दंड करते. सुरुवातीला मला त्याबद्दल राग यायचा; परंतु पुष्कळ कॉफी आणि सिगरेटनंतर मी तिचा ऋणी आहे. तुम्ही ॲनीबरोबर असताना कुठे आहात, ते तुम्हाला कळतं. तिचा तो नियमांचा कठोर जोर हा तुम्हाला आश्वासनपूर्ण वाटतो.

आमच्यावर कोणी नसताना एकत्र गटानं आम्हाला बाहेर जाता येतं. अट एकच, की आम्ही एकत्र राहायला हवं. आम्ही शहरात किंवा समुद्रकिनाऱ्यावर जाऊ शकतो, आम्ही सर्व दहा जण किंवा पंधरा, आता तरी बरेच लोक इथे राहतायत. आम्ही त्या रस्त्यावर फाटक्या तुटक्या प्राण्यासारखे फिरतो. फक्त आम्ही जे करायचो, ते सोडून आमच्यात तसं काही साम्य नाही; परंतु त्यातील काही लोक मित्रासारखे वाटू लागलायेत. काही झालं, तरी आमची गुपितं आम्ही एकमेकांना सांगतो.

मग जेव्हा आम्ही समुद्रकिनाऱ्यावर जातो, आम्ही त्या वाळूवर बसतो आणि धूम्रपान करतो. इथे फारसे लोक येत नाहीत, कारण ते बहुतेक सर्व त्या किनाऱ्यावरील प्रचंड बुटलीन्स समूहाकडे खेचले गेलेले आहेत. काही लहान मुलं पाण्यात धावतात आणि मग बाहेर येऊन आपल्या आई-बापांकडे आनंदानं ओरडत धावतात. समुद्रपक्षी वर घिरट्या घालतात. कुत्री त्या जागेवर, त्या पाण्यावर आणि दूरवर पसरलेल्या वाळूवर खूश होऊन वेड्यासारखी वागतात. लहान लाटा आपटतात. मी काही शिंपल्या आणि दगड उकरून माझ्या हातात धरतो. ते त्या दिवसाच्या उष्णतेमुळे गरम असतात. प्रत्येक वेगळा आहे आणि सुंदर आहे. सूर्य पश्चिमेकडे येणाऱ्या लालीची सूचना देत आहे. मावळण्याची सुरुवात झालेली आहे आणि मी इथे आल्यापासून पहिल्यांदा, नाही कित्येक वर्षांनंतर पहिल्यांदा माझ्या दु:खात एक छोटी फट, एक प्रकारचा शांतपणा मला भासतो.

दुसऱ्या दिवशी एक काउन्सेलर मला उघड्या खोलीतून बाहेर बोलावते. ती पांढरीफट्ट पडलीय आणि तिचे हात कापत आहेत. माझ्यासाठी एक फोन आहे.

ती मला ऑफीसमध्ये घेऊन जाते आणि ती सांगते, तो फोन वेस्ट एन्डवरील पोलीस स्टेशनवरून आलाय. एक आवाज मला सांगतो, की दोन ऑफिसर्स माझी

चौकशी करण्यासाठी लवकरच येतील.

"कशाबद्दल?"

"आम्ही वेस्ट एन्डमधील तीन संबंधित मृत्यूंचा शोध घेतोय आणि आम्हाला वाटतं, की तुझी या चौकशीत आम्हाला मदत होईल."

मी यामुळे हादरलोय. ती काउन्सेलरही धक्का बसल्यागत वाटतीय. मला पोलीस पकडून नेणार की काय, या विचारानं ती माझ्याकडे टक लावून पाहते. ॲलन येतो. त्याच्या भुवयाही आक्रसलेल्या वाटतात. तो मला बाहेर घेऊन जातो आणि आम्ही धूम्रपान करतो. मी भिंतीशी टेकून उभा असतो. मला तोंडावर सूर्य जाणवतो. मला असं जाणवतंय, की डळमळीतपणे का होईना, जवळजवळ अजाणतेपणी मी इथे एका नवीन आयुष्याची सुरुवात केलीये. ते काही छोट्या डळमळीत रचनेहून मोठं नाही; परंतु ते तिथे आहे, हे मला माहीत आहे, कारण ते सर्व आता खाली कोसळलंय. माझ्या डोक्यात एक हास्य घुमतं. त्या कमिटीनं माझा आधीच न्यायनिवाडा केलाय, मी दोषी असल्याचं तिला सापडलंय आणि मला तुरुंगात पाठवलंय.

ॲलन माझ्याकडे पाहत आहे.

"मी कधीही," मी सांगतो, "मी कधीही कुणाला ठार मारलेलं नाही." अचानक मला ती जपानी बाई आठवते. तिचे काळे केस, तिच्या गोड आणि दुःखी चेहऱ्यावरून मागे सारताना दिसते. मला जॉन निळे ओठ झालेला, उतारावर पडलेला दिसतो.

ॲलन माझ्याकडे निरखून पाहतो, "त्यांना कोणत्या मृत्यूंबद्दल बोलायचंय, याची तुला काही कल्पना आहे का?"

"मला काही दिवसांपूर्वी खूप ठोकलं होतं, त्या वेळी ते प्रश्न विचारत होते; परंतु हे कशाबद्दलही असेल. लोक वेस्ट एन्डमध्ये मरतात."

"तू काही मोठ्या गुन्हेगारांबरोबर गुंतला होतास का?"

"कदाचित, मला माहीत नाही. मला ड्रग्जची गरज पडायची. त्यासाठी मी अनेक गोष्टी केल्या आणि मी अनेक जणांना ओळखतो."

"तू याआधी त्यांच्या प्रश्नांची उत्तरं दिली होतीस का? तुला केव्हा मार बसला होता?"

"नाही, मी खूप काही जुळवून सांगितलं होतं, कारण ते म्हणाले, की मला नुकसानभरपाई मिळेल म्हणून."

तो सुस्कारा सोडतो.

"मार्क, तुला पुनर्वसन केंद्रात राहायचं आहे ना?"

"हो, मला व्यसनमुक्त व्हायचंय." मी माझा आवाज ऐकतो. मी अगदी स्पष्ट

आणि ठामपणे सांगतो, कारण मला माझ्यावर विश्वास ठेवायचाय. जरी आत खोलवर मला हे शक्य आहे, असं वाटत नाही. जेव्हा प्रत्येक सकाळी मी जागा होतो, आत अगदी खोलवर मला वाटत असतं, की आज रात्रीच मी इथून जाईन.

"मग पोलिसांना खरं काय ते सांग. आयुष्यभर तू स्वत:शी आणि इतरांशी खोटं बोललायस. जर का खरंच तुला बदलायचं असेल, जर का खरंच तुला ड्रगच्या नियंत्रणा-खालून दूर व्हायचं असेल, तर मग तू पोलिसांना खरं सांगून आताच सुरुवात कर."

मी माझं सिगरेटचं थोटुक खाली टाकतो आणि ते पायांनी चुरडतो.

"मी नेहमी बेकायदेशीरपणे जगलोय. जर मी त्यांना माझ्याविषयी काही सांगितलं, तर ते मला पकडतील."

"मार्क, तुला एक पर्याय आहे. तू काहीही बोलून यातून बाहेर पडू शकशील किंवा तू खरं काय ते सांगशील. तुझी पाटी स्वच्छ करण्याची ही तुला संधी आहे. फक्त सत्यच तुला यातून बरं करायला मदत करील आणि जर का त्यांनी तुला पकडलं, तर हा कार्यक्रम तू तुरुंगातही चालू ठेवू शकशील."

जेव्हा ते दोन पोलीस अधिकारी येतात, मी त्यातील एकाला ओळखतो. मी जेव्हा शुद्धीवर आलो, तेव्हा माझ्या हॉस्पिटलमधील पलंगाच्या बाजूला बसलेला तो गुप्तचर होता. तो मला अभिवादन करतो.

"मागे तुला मी पाहिलं होतं, त्यापेक्षा तू जास्त बरा दिसतोयस." तो म्हणतो आणि ते खरं आहे. मला त्या सुकलेल्या हातासाठी फिजीओथेरपी दिली जात आहे. त्यावरच्या जखमा, ओरखडे गेलेत आणि माझं वजनही थोडं वाढलंय. मी तेवढा काही वाईट दिसत नाहीये; पण मला मात्र खूप घाण वाटतंय.

माझी चौकशी करण्याआधी ते पोलीस अधिकारी एका खोलीत ॲलनबरोबर बराच वेळ बोलत बसतात. ॲलन त्यांना काय सांगतोय मला माहीत नाही; परंतु मी अंदाज करू शकतो. तो त्यांना सांगतोय, की मला खरंच आयुष्य बदलायचंय आणि रॅव्हन्स कोर्ट मला तशी संधी देतंय आणि मला इथे ठेवणं हे मला पकडण्यापेक्षा जास्त फायदेशीर ठरेल; परंतु ते पोलीस अधिकारी आहेत आणि लोकांना पकडणं हेच ते करतात.

जेव्हा माझी वेळ येते, ॲनी आम्हा सर्वांना चहा देते आणि मी त्यांच्याबरोबर एका थेरपीच्या खोलीत बसतो. मी घाबरलोय. ते पोलीस अधिकारी माझ्याशी छान बोलतात. ते सांगतात, की मी एका स्वारस्यपूर्ण खुनाचा बळी होतो. ते वेस्ट एन्डमधील तीन मृत्यूंची चौकशी करत आहेत आणि त्यांना मला काही फोटो दाखवायचे आहेत आणि मी त्या फोटोंसाठी मनाची तयारी ठेवायला हवी. मला मनाची तयारी म्हणजे काय, ते समजत नाही, म्हणून मी खुर्चीचे हात घट्ट पकडतो.

त्या फोटोतील सर्व लोक माझ्या माहितीचे आहेत. ते एका पद्धतीच्या स्टीलच्या ट्रेज वर पडलेले आहेत. ते मेणाच्या बाहुल्यांसारखे दिसतात; पण ते तसे नाहीत. ते मेलेले आहेत. त्यांच्यापैकी कोणी मीही असू शकलो असतो. जर मी डोळे क्षणभर बंद केले, तर मला माझा स्वत:चा चेहरा त्या न हलणाऱ्या देहांवर दिसेल.

मी या लोकांबद्दल खोटं बोलण्याची आलेली उर्मी दाबून टाकतो. ते कोण होते, ते काय करत होते आणि मी त्यांना कसं ओळखत होतो. खरं सांगून मी माझं आयुष्य कसं बदलू शकेन, हे सांगणारा ॲलनचा आवाज मला आठवतो. मला खात्री आहे, की मी माझं आयुष्य तुरुंगात गेल्यामुळे बदलेल; पण तरीही मी बोलतो. मी त्या वेस्ट एन्डमधील ड्रगबद्दल मला जे माहीत आहे, ते सांगतो. इतकंच नव्हे, तर मी त्यांना वॉरन स्ट्रीट स्टेशनबद्दलही सांगतो.

सरतेशेवटी ते मान डोलावतात. एकमेकांकडे पाहतात आणि मी केलेल्या मदतीबद्दल माझे आभार मानतात. ते जाण्यासाठी निघतात.

"तुम्ही मला पकडणार नाही का?" मी विचारतो.

"नाही मार्क. आम्ही तू बरा व्हावास म्हणून शुभेच्छा देतो." ते म्हणतात आणि मग निघून जातात. पोलीस लोक, त्यांना कसं समजायचं देवजाणे! ते नेहमी माझ्या भीतीत भर टाकायचे आणि माझ्या विभ्रमावस्थेत मला पछाडायचे; परंतु प्रत्येक वेळी माझा त्यांच्याशी संबंध येतो. त्यांनी फक्त दया आणि माणुसकीच दाखवली आहे.

ॲलन आत येतो. तो हसतोय. आपले हात चोळतोय.

"आता सर्व ठीक होईल ना?" मी विचारतो. मला रडावंसं वाटतं. ॲलन आपले हात माझ्याभोवती टाकतो आणि मी त्याला धरून ठेवून देतो आणि त्यामुळे बरं वाटतं.

"हो," तो म्हणतो, "सर्व ठीक होणार आहे."

मी म्हणतो, "तू नेहमी एका वरच्या शक्तीबद्दल बोलतोस."

"ही दुसरी पायरी आहे." तो मला आठवण करून देतो.

"मला असं वाटतं, की माझ्याहून मोठी शक्ती मला शहाणपणाचा मार्ग दाखवील."

"त्यानं ते केलंय. माझं म्हणणं देव किंवा ती वरची शक्ती किंवा तुम्हाला जे काही म्हणायचं असेल ते. जर मी रस्त्यावर राहिलो असतो, तर माझा शेवट काय झाला असता, ते मला दाखवलं गेलंय. इतरांबरोबर स्टीलच्या ट्रेवर, पोलिसांच्या प्रेतागारात. जर मी तिथे परत गेलो, तर माझ्यासाठी ते असंच असेल. कोणीतरी मला या पुनर्वसन केंद्रात राहा, असं सांगत असणार."

यानंतर इथे राहणं एवढं सोपं राहत नाही; परंतु इथून जाणं जास्त कठीण होतं. प्रत्येक दिवस हा तात्पुरता दिलासा आहे. कदाचित, उद्या मी इथून जाईन. मी पुन्हा बेघर होईन. पुन्हा ड्रग्ज घेऊ लागेन. मला आज यातून बाहेर पडायचंय.

माझे दात दुखतात; पण कोणताही दंतवैद्य त्यावर उपचार करणार नाही. हे सोडलं, तर प्रतिक्रियेच्या रॅटलच्या शारीरिक वेदना हळूहळू कमी झाल्या आहेत; परंतु त्या अनेकदा जोरात परत येतात. जसं जसं शारीरिक दु:ख कमी होतं, माझा मानसिक त्रास वाढतो. मला पळून जावंसं वाटतं. कोपऱ्यात लपावंसं वाटतं. कोणालातरी मारावंसं वाटतं. कोणाशीतरी संभोग करावासा वाटतो. हे सर्व नियमाविरुद्ध आहे. रोझी आणि मी आता एकमेकांना पत्र लिहीत आहोत आणि तिनं मुलांना घेऊन मला भेटायला यावं, असं मला वाटतं; परंतु ॲलनशी विचारविनिमय केल्यावर माझ्या लक्षात येतं, की त्याची इथे परवानगी नाही. तो म्हणतो, की त्यामुळे माझ्या उपचारात अडथळे येतील. या आताच्या परिस्थितीत आपल्या भावनांमध्ये जगातील इतर लोकांना सहभागी करून घेणं, हे एखाद्या खास एकाकी नातेसंबंधात वाहवत नेण्यापेक्षा जास्त महत्त्वाचं आहे.

जेव्हा मला या जागेची सवय होते, जेव्हा मी इथली चाकोरी आत्मसात करतो, जेव्हा मी कपडे उतरवून रात्रीचा आपल्या पलंगावर पडतो आणि कधी कधी झोपतो, त्यानंतर निघायची वेळ येते. रॅव्हन्स कोर्ट हे प्राथमिक सुधार केंद्र आहे आणि त्याचा अर्थ तुम्ही इथे बारा आठवड्यांपेक्षा जास्त राहू शकत नाही.

ॲलननं माझ्यासाठी बोर्नमाऊथमध्ये क्विन्टन हाऊस प्रोजेक्ट या माध्यमिक उपचार केंद्रात राहण्याची व्यवस्था केलेय. कित्येक वर्षं मी फिरत होतो आणि आता प्रत्येक लहानसहान बदल माझ्या शरीराभोवती आपटून परत येतो आहे. मी घाबरलोय आणि अस्वस्थ आहे. जेव्हा ॲलन माझा निरोप घेताना मिठी घालतो, मला रडावंसं वाटतं. बारा आठवडे तसा फारच मोठा काळ आहे, जिथे मी स्वत:हून राहिलोय. शेवटचं पुनर्वसन केंद्र सोडायचं, कारण त्यात दुसरा पर्याय होता तुरुंगाचा. या वेळी मी राहिलो, कारण दुसरा पर्याय होता मरण; परंतु रॅव्हन्स कोर्ट हे माझं घर झालंय. मी इथे आल्यापासून अनेक व्यसनी इथे आलेले आहेत. प्रत्येक जण काही या उपचार पद्धतीत शेवटपर्यंत टिकून राहत नाही. जे टिकून राहतात, त्यांना यशस्वी होण्याची खरी संधी असते.

मी जेव्हा बोर्नमाऊथमध्ये येतो, मला वळून पुन्हा बोगनॉरला जावंसं वाटतं. खिडकीतून रस्त्याच्या पलीकडे असलेल्या हिरवळीच्या पट्ट्यावर ड्रग विक्रेते काम करत असताना मला दिसतात आणि मला असं वाटतं, की इथल्या कित्येक व्यसनींना बरं होण्यात स्वारस्य नाहीये. ते या जागेकडे त्यांच्या सवयींपासून मध्यंतर म्हणून बघतात.

हे केंद्र लोरेन पॅरी नावाच्या एका हुशार बाईकडून चालवलं जातंय. ड्रगची सवय पुन्हा उलटू नये, यासाठी तिच्या उपचारांबद्दल तिची ख्याती आहे. ती तुमच्या डोक्यात डोकावते आणि तुमची व्यवस्थित छाननी करते. तिच्या अवतीभवती अनेक गंभीर काउन्सेलर्स आणि थेरॅपिस्टचा गराडा आहे. तुम्ही कसा विचार करता, त्यावर त्यांचं बारीक लक्ष असतं. तुम्हाला कशाबद्दलही जाणवणारी भावना ती कोठून आली, हे विचारल्याशिवाय ते राहत नाहीत. ती तुम्ही लहानपणी अनुभवलीत का, यासारखं वाटायला तुम्हाला कोणी भाग पाडलं. माझी काउन्सेलर सोनिया, ही सगळ्यात भीतिदायक आहे; परंतु ॲलननं तिच्याशी संपर्क साधलाय आणि मला त्यानं मी लायक माणसाच्या हातात आहे, असं सांगितलंय.

हळूहळू जास्त जोरदार ग्रुप आणि व्यक्तिगत थेरपीनंतर माझ्या लक्षात येतं, की मी व्यसनी म्हणूनच जन्माला आलो. जसं लोक जन्मातच व्यंग घेऊन जन्माला येतात, तसाच मला जन्माला आल्या दिवसापासून व्यसनाचा रोग होता, असा दाट विश्वास वाटू लागतो. मी एखादं ड्रिंक किंवा ड्रग घेण्याआधीपासूनचा बराच काळ मी करत असलेल्या चोऱ्या आणि इतर समाजद्रोही वागणूक, हीच माझ्या त्या आजाराची द्योतक होती. माझ्या बालपणाला, माझ्या आई-वडिलांना किंवा माझी पार्श्वभूमी कशालाही दोष न द्यायला मी शिकत आहे, कारण जेव्हा मी इतरांचे अनुभव ऐकतो, मला कबूल करावं लागतं, की अनेक लोकांनी यापेक्षाही जास्त सोसलंय आणि तरीही ते माझ्यासारखे झालेले नाहीत आणि आता माझं आयुष्य माझ्या हातात आहे. पुढे काय घडणार, ते मी ठरवू शकतो. मी आजारी राहायचं, की छान तब्येत सुधारायची, ते मी ठरवू शकतो.

अनेकांपैकी एक आश्चर्यकारक शोध मला लागतो, तो म्हणजे मला एचआयव्हीची लागण झालेली नाही किंवा हिपॅटीटीस.सीचीही. यातून मी कसा काय सुटलो, मला हे कळत नाही. ही जाणीव मला काहीशी नम्र आणि कृतज्ञ बनवते.

परंतु मला इथे वीट आलाय. मला सर्वच नकोसं वाटतं. पुन्हा पुन्हा आपल्याबद्दल बोलण्याचा मला वैताग येतो. मला आता आणखी गुपितं सांगायची नाहीत. नंतर जेव्हा मला वाटत असतं, की जे सांगण्यासारखं आहे, ते सर्व मी सांगितलंय, माझ्या लक्षात येतं, की मी आणखी घाणेरड्या गोष्टींचे आणखी घाणेरडे तपशील देतोय. एक दिवस मी, ज्यामुळे मला अजून रात्री घाम फुटून जाग येते आणि जी गोष्ट मला कधीही, कुठेही आणि अनपेक्षितपणे पछाडू शकते अशाबद्दल घाबरून सांगू लागतो. ती जपानी मुलगी, मी तिला कसं ठार मारलं आणि जेव्हा माझं तिच्याबद्दलचं सांगणं संपतं, मी वेस्ट कंट्रीच्या जॉनबद्दल बोलू लागतो. त्यांच्याबद्दल बोलण्यानं मी केलेलं बदलू शकत नाही. मला अजूनही एकाकी, रितं आणि लाजिरवाणं वाटतं; पण जेव्हा गटातील इतर लोक अशा तऱ्हेचे अनुभव सांगतात,

तेव्हा मला थोडी मदत मिळते. एक मुलगी सांगते, की तिच्या झोपडीतील कुणी निश्चेष्ट पडला आणि तो मेला किंवा जिवंत आहे याची खात्री नसताना पोलिसांनी त्यांना भेट देऊ नये, म्हणून तिनं आणि तिच्या मित्रानं तो काळा-निळा आणि निपचित पडलेला देह, ज्या गालिच्यावर पडला होता, त्यात गुंडाळला आणि तो एका कचऱ्याच्या डब्यात टाकला. दुसरी एक मुलगी सकाळी जागी झाली, तेव्हा तिचा साथीदार तिच्या बाजूला निळा पडलेला होता.

या बोर्नमाऊथमध्ये मी माझं सर्व जीवन सर्वांपुढे उघड करतोय. असे काही दिवस येतात, की हे मला सहन होत नाही. पुढच्या एका गट सभेनंतर ज्यात मला माहीत असायला हवं, त्यापेक्षाही मी माझ्याविषयी बोलताना ऐकतो. मी त्यापैकी एका व्यसनीला खाली समुद्रकिनाऱ्यावर भेटायचं ठरवतो. मी तिला माझ्या भावना आवरायला मदत करायला सांगतो. ती गोड हसते आणि आम्ही वाळूत संभोग करतो.

त्यानंतर मला भयानक वाटतं. जणू काही दुखणं उलटलंय. मी नियम मोडले आहेत. काही वेळ मी काय केलं, ते लपविण्याचा प्रयत्न करतो; परंतु कोणताही अप्रामाणिकपणा ही माझ्याबाबत अशक्य गोष्ट झालेय. जरी मला माहीत आहे, की मी त्यामुळे गोत्यात येईन, तरी मी सांगायचं ठरवलंय. दुसऱ्या एखादा व्यसनीबरोबर लैंगिक संबंध ठेवणं, हे दारू किंवा ड्रग्ज घेण्याएवढं वाईट आहे आणि मी तसाच त्या मुलीचा उपयोग केला. मी ड्रग घेतल्यासारखा मला वाटत होतं, ते विसरण्यासाठी त्या मुलीचा उपयोग केला.

माझ्या या कबुलीनंतर प्रत्येक जण मला इथून काढून टाकायला हवं का, याबद्दल चर्चा करतो. मी या मुलीबाबत तसा लुटारूच ठरलोय. मी तिचा उपयोग माझ्या स्वार्थासाठी केलाय. ती कोणत्याही गोष्टीला बळी पडणारी आणि व्यसनामुळे सोसत असलेली अशी व्यक्ती आहे, जी त्या दिवशी गट चर्चेत विषय निघाले, त्यामुळे फारच अस्वस्थ होती.

सरतेशेवटी ते मला जवळच्या दुसऱ्या केंद्रात पाठवायचं ठरवतात. ते केंद्र क्विन्टन हाऊस प्रोजेक्टचा भाग आहे; पण ते त्याची शाखा आहे. इथे नियम थोडे ढिले आहेत आणि देखरेख तशी फारशी नाही. मी आता पुष्कळ बरा आहे. मी तो बारा पायऱ्यांचा कार्यक्रम, ज्यामुळे माझ्या आधीच्या व्यसनींना आणि दारुड्यांना मार्गदर्शन मिळालं, तो अनुसरतोय. या बारा पायऱ्या मला पहिल्यांदा एक आध्यात्मिक आणि नैतिक संहिता देत आहेत. त्या संहितेला अनुसरून मी जगण्याचा प्रयत्न करू शकेन.

डिसेंबरमध्ये माझा तिसावा वाढदिवस आहे. तिथे पार्टी आहे, केक आहे आणि मेणबत्त्याही. माझा कधी नव्हे तो पहिल्यांदा वाढदिवस. माझा घसा एवढा दाटून आलाय, की मला बोलणं अशक्य आहे. मग मी बाहेर जातो आणि डोळे पुसतो.

हे माध्यमिक पुनर्वसन केंद्र फक्त चार महिन्यांसाठी आहे. फेब्रुवारीच्या शेवटी मी ग्रॅज्युएट होतोय. ते याला ग्रॅज्युएशन म्हणतात; परंतु मला असं वाटतं, की मला पुन्हा रस्त्यावर फेकलं जाणार आहे. मी यासाठी तयार नाही, अशी तक्रारही करतो. खरं सांगायचं, तर मी घाबरलोय. एखाद्या समाजात त्यांच्या संपूर्ण आधारावर आणि नियमानुसार एका स्वच्छ चाकोरीतून जगायचं, ही एक गोष्ट आणि एकट्यानं तेथून बाहेर जायचं, ही दुसरी गोष्ट आहे.

माझी थेरपिस्ट सोनिया मला आश्वासन देते, की मी ठीक असेन. मी गट चर्चेसाठी क्विन्टन हाऊसला येत जाऊ शकेन आणि तीही मी जोपर्यंत इतर व्यसनी आणि दारुड्यांबरोबर सभेला हजर राहीन, तेव्हा मला भेटेल. मला हवा असलेला सर्व आधार मिळेल. फक्त मला वाटतंय, की तो मला पुरेसा नाही. मी त्यांना मला याच समुद्रकिनाऱ्यावर एक तासाचं अंतर असलेल्या तिसऱ्या पुनर्वसन केंद्रात पाठवावं, यासाठी मनधरणी करतो.

येथील ग्रॅज्युएशनचा समारंभ मन हेलावणारा आहे. क्विन्टन हाऊसमध्ये मी केलेला प्रवास दीर्घ आहे आणि तो मी एकट्यानं केलेला नाही. माझ्याभोवती माझी काळजी घेणाऱ्या लोकांचा गराडा आहे, हे मला जाणवतं. माझा मित्र निकोल आणि रॅन मला आधार देत माझ्या दोन्ही बाजूला बसतात. तो भावनिक अनुभव आहे आणि जेव्हा तो संपतो, मी कार्लटन हाऊसची ट्रेन पकडतो. या ठिकाणी माझ्या जगण्याची मांडणी केलेली आहे. मी कुठे जायचं, काय करायचं, हे ठरवेपर्यंत. मी तिथे स्थिर आयुष्य काढणार आहे.

काही महिन्यांनंतर पुन्हा निघायची वेळ येते. आता अशा संस्थांतून राहणं संपविण्याची वेळ आहे आणि मला स्वत:ला मार्ग आक्रमायला हवाय. जर मी इथे एखाद्या चौथ्या पुनर्वसन केंद्राची व्यवस्था असती, तर त्यासाठी प्रयत्न केला असता; परंतु तसं नाहीये. मला आता जिथे भरपूर ड्रग्ज आहेत आणि एकाकीपणा आहे, अशा जगात जायचंय आणि त्यात राहायचंय.

रस्त्यावर राहण्याची शक्यता एखाद्या चिडलेल्या कुत्र्यासारखी माझ्यावर गुरगुरायला लागते, मला घाबरवते आणि धमकावते. मला स्वत:ची जागा हवी. मला माहीत आहे, की फ्लॅट भाड्यानं घ्यायचा, तर डिपॉझिट द्यायला हवं आणि त्यासाठी मी एवढी रक्कम कशी उभी करीन, याची मला कल्पना नाही; परंतु जन्मभराचं खोटं बोलणं आणि काही करून कसंबसं सर्व करून घेणं, यामुळे मला सावरायला मदत होते. मी पुनर्वसन केंद्रात असताना प्रिन्स ट्रस्टकडून गेल्या वेळी मला कॅमेरा घ्यायला पैसे मिळाले होते. त्या वेळी मी तर लहान मुलगा होतो. मला माहीत आहे, की ते लोकांनी स्वत:चा व्यवसाय सुरू करावा, म्हणून मदत करतात, त्यामुळे मी त्या संस्थेकडे झाडावर चढण्याची सामग्री खरेदी करण्यासाठी पुरेसा पैसा मिळावा,

असा अर्ज करतो. त्यांना मी सांगतो, की मी पुन्हा झाडांची सर्जरी करण्याची सुरुवात करणार आहे.

डेव्हिड फॉक्स नावाचा एक चुणचुणीत माणूस माझी जीवनकथा थोडक्यात सांगायला सांगतो. तो त्याच्या ऑफीसमध्ये बसून खरडत असतो आणि मी बोलत असतो. तो मान डोलावतो आणि सांगतो,

"मला वाटतं, आम्ही तुला मदत करू शकू."

मी त्याच्याकडे अविश्वासानं पाहतो.

तो ट्रस्ट मला तीन हजार पौंडांचं कर्ज देऊ करतो. डेव्हिड फॉक्स मला धंद्यासंबंधीचं मार्गदर्शन करतो आणि मला सुयश चिंतितो.

"तुझं कसं काय चाललंय, ते मला कळव." तो म्हणतो. त्या माणसाचा तो विश्वास मला घाबरवतो. त्याला खरंच असं वाटतं, की त्या धंद्यात स्वत:चा जम बसविण्यासाठीचा तो विश्वास, ती ताकद माझ्यात आहे.

यात जास्त भीतिदायक गोष्ट आहे, ती म्हणजे ट्रस्ट मला देत असलेल्या रकमेची. एवढ्या पैशावर मी पुन्हा उलटून, पुन्हा पूर्ववत होईन. मी पुन्हा ड्रग्ज घेऊन बेफाम होईन. मनात सदैव एकच जाणीव असेल, की हेरॉईन घेतलं, की सर्व ठीक होईल आणि मग मी माझ्या हातात सुई बोचून क्रॅकच्या आकाशात जाणाऱ्या रॉकेटमध्ये बसून अवकाशात फिरेन. त्या ३००० पौंडांमुळे मी ते पुन्हा करू शकेन. जरी ते माझ्या शरीराबाहेर जवळजवळ वर्षभर आहे, तरी हेरॉईन मला प्रत्येक दिवशी परत बोलावतं. याचं फक्त हेच कारण नाही, की त्या रॅटलच्या खुणा पुन्हा उद्‌भवतात; परंतु ती उन्मादाची शक्ती मला पुन्हा बोलावते. प्रत्येक दिवशी मला ड्रग हवी असते आणि मला त्यामुळे चुकल्याचुकल्यासारखं वाटतं. फक्त त्या घेण्यापासून स्वत:ला थांबवण्यासाठी मला स्वत:ला त्याच्या परिणामांची आठवण करून द्यावी लागते. जेव्हा डिटॉक्स सेंटरनं मला ए अँड इकडे नेलं, तेव्हा मी कसा भुतासारखा होतो, ते मला आठवतं. जेव्हा मी चोरलेल्या ड्रग्ज घेऊन त्या हॉस्टेलमध्ये मला स्वत:ला बंद करून घेतलं होतं, ते आठवतं. तेव्हा माथेफिरू, वेडा झालेला मी आठवतो. मला ते पोलिसांनी दाखवलेले फोटो आठवतात आणि त्या शवागारातील ट्रेवर ठेवलेल्या देहावर मी माझं तोंड चिकटवतो.

डेव्हिड फॉक्सनं माझ्यावर एवढा विश्वास दाखवलाय, की मी नक्कीच यात अयशस्वी होणार. मला ते पैसे चोरायचे नाहीत; पण ते टाळता येण्यासारखं नाही. मी मूलत: अप्रामाणिक आहे. ती कमिटी मला तसं सांगते. एके दिवशी, एका वेळी.

मी पहिली गोष्ट त्या पैशात करतो, ती फ्लॅट धुंडाळायची. मला खात्री आहे, की यातील बराच पैसा फ्लॅटच्या डिपॉझिटवर जाणार आहे. मी स्वत:ला सांगतो,

की मी मला स्वत:चा पत्ता असल्याशिवाय धंद्यात उतरू शकत नाही, त्यामुळे त्या ट्रस्टच्या पैशाचा हा कायदेशीर उपयोग आहे.

मला दक्षिणेकडच्या किनाऱ्यावर एक फ्लॅट मिळतो आणि डिपॉझिटही अगदी कमी असतं. ते ३००० पौंड खर्च होत नाहीत.

मला माझा फ्लॅट आवडतो. तो एका व्हिक्टोरियन घराच्या चौथ्या मजल्यावर आहे. त्याचं छप्पर उतरतं आहे आणि त्याला गमतीदार असे भिंतीतील कोनाडे आहेत. त्याच्या एका बाजूला चर्च आहे आणि चर्चच्या अंगणात एक मोठं झाड आहे. ते माझ्या इतकं जवळ आहे, की मी त्याच्या एका उंच फांदीवर बसलेला आहे. इथे आवाज नाही. फक्त पक्षी आणि शांतता आहे. फ्लॅटच्या दुसऱ्या बाजूनं तुम्हाला शहराची धावपळ आणि गडबड दिसते.

मी अनेक फ्लॅटमध्ये राहिलोय; परंतु हे मला माझ्या पहिल्या घरासारखं वाटतं. ते माझं आश्रयस्थान आहे. तो स्वर्ग आहे. माझ्याकडे तसं काही फर्निचर नाही. एक मोडकातोडका सोफा आणि दोन उश्या, ज्यावर मी झोपू शकतो आणि तरीही मला तो परिपूर्ण वाटतो. कपाटं, जेवणाची भांडी, रंग हे मी विकत घेतो. रुंद आणि सहजगत्या मारलेल्या फटकाऱ्यांनी त्या भिंतीचा रंग गडद समुद्रासारखा होतो. महत्त्वाचं म्हणजे मित्र मला मदत करतात. मला आता मित्र आहेत. मी जे करतो, ते त्यांच्या मदतीनं करतो.

कधी कधी मला इथे सुख दिसतं आणि या नवीन जागेत समाधान मिळतं. काही वेळा मला भयानक भीतिदायक अशी मी पुन्हा रस्त्यावर गेल्याची स्वप्नं पडतात. काही वेळा मी सकाळी भीतीनं घामेजून जातो. भीती वाटते, की मी हे करू शकणार नाही. म्हणजे मला असं म्हणायचंय, की इतर लोकांप्रमाणे बिलं देणं, माझे कपडे आवरणं, नाश्ता विकत आणणं वगैरे. प्रत्येक गोष्ट एक दिवस; परंतु जगायचं कसं, हे शिकणं कठीण आहे, त्यामुळे धंदा सुरू करायचा आत्मविश्वास माझ्याकडे नाहीये. ते ३००० पौंड माझी वाट पाहतायत.

मी माझ्या फेलोशिपमधील इतर व्यक्ती व्यसनी आणि दारुडे, जे याच बरं होण्याच्या प्रक्रियेतून माझ्यासारखे गेलेत त्यांच्यावर फार अवलंबून आहे. एक बिल्डर आहे रोनी. तो मला अर्ध वेळ काम देतो. माझ्या मजुरीतून मी त्या ट्रस्टच्या कर्जाचं व्याज भरतो.

तर हे असं आहे माझं नवीन आयुष्य आणि अशा तऱ्हेचं नवं आयुष्य हे बाळासाठी नवंच असतं. मी अजूनही नवं कसब शिकतोय. मी ध्यानधारणा करतो आणि मला स्वत:ला एक ठरावीक चाकोरी आखून देतो आणि डायरी ठेवतो. रात्री झोपी जातो. सकाळी उठतो. नियमित शिकतो. लोकांसाठी जेवण बनवतो. ते माझ्यासाठी अन्न बनवतात. मी प्रामाणिक आणि खरा राहून मैत्री

टिकवण्याचा प्रयत्न करतो.

मी इतर मुलांबरोबर आठवड्याचे काही दिवस इमारतीच्या कामाच्या जागेवर जातो. जर आमची रोनीशी गाठ पडली आणि त्यानं काम थांबवून गप्पा मारल्या, तर आम्ही बोलतो. आम्ही बादल्यांवर बसतो आणि तो पीत असताना ज्या काही बेफाम गोष्टी केल्या, त्याबद्दल सांगतो. मला वाटतं, जर रोनी यातून बाहेर पडू शकला, तर मीही पडू शकेन. इथे कामावर खूप हास्यविनोद होतात. इतर वेळी मी समुद्र-किनाऱ्यावर जातो. माझ्या मैत्रिणी आहेत आणि मग असे काही दिवस येतात, फार नव्हे मला एक शक्यतेचा किरण दिसतो, की सरतेशेवटी कदाचित मी इतरांसारखा जगू शकेन. मी उद्याच्या किंवा पुढच्या आठवड्यात ड्रग घ्यायला लागेन किंवा माझ्याभोवती सर्व ढासळून पडेल, याचा विचार करत नाही. मी आजच्या दिवसावर लक्ष केंद्रित करतो. उठायचं, ध्यानधारणा करायची, जगायचं आणि कोणतेही ड्रग घ्यायचे नाहीत.

त्या प्रिन्स ट्रस्टकडून घेतलेल्या त्या ३००० पौंडांच्या रकमेची मला इतकी काळजी वाटते, की मी ते सर्व खर्च करायचे ठरवतो. मी झाडावर चढण्याची सामग्री घेतो. नाहीतरी मी घेईन, असं सांगितलं होतं. मी ते घेऊन काही करत नाही. आता बँक अकाऊंटच्याऐवजी दोरखंड आणि झाडांवर चढण्याच्या सामानानं माझ्या फ्लॅट-मधली जागा घेतलेली आहे. दोरखंड पांढरे आणि नारिंगी आहेत आणि धातूची हत्यारं चमकतायत. काही दिवसांनंतर ते मी पाहतही नाही. त्याच्या बाजूनं फिरतो.

मी एका खूप गरम अशा उन्हाळ्याच्या दिवशी इमारतीच्या कामावर ब्रश घेऊन इतर मुलांसारखा रंगकामात गर्क आहे, त्या वेळी मी बाहेर पाहतो. सूर्याचा प्रकाश आणि छाया यांची झालेली डिझाइन्स मी पाहतो आणि त्याकडे आकर्षिला जातो. मी माझा ब्रश डब्यावर ठेवतो आणि पाहायला जातो.

जरी ती बांधकामाची जागा धुळकट आणि विटा, दगडधोंड्यांनी भरलेली आहे, तरी या इथे हवा ताजी आहे. पुन्हा दरवाजात एक झाड आहे. एक मोठं बीचचं झाड : त्याच्याबरोबर खाली जमिनीवर अंधार आहे; परंतु त्याच्या टोकावर ज्या रांगोळीसारखं खालीवर झालेलं लेससारखं डिझाईन आहे. मी त्याच्या त्या रुपेरी बुंध्याकडे कौतुकानं पाहतो. ते झाड या घामट दिवशी तसं छान थंडगार वाटतं. छोटे कीटक एका फांदीभोवती पिंगा घालतायत. एक पक्षी इतक्या उंचावर गात आहे, की मी त्याला पाहू शकत नाही. ते झाड त्या घनदाट सावलीच्या जगात मला बोलावतं.

मला उंचावर जायला हवं. त्याबद्दल विचारही न करता मी भिंत चढतो आणि इथून त्या झाडाच्या खालच्या फांदीवर जातो. मग दुसरा पाय कुठे जातो, दुसरा हात कुठे पकड घेतो, यावर एकाग्र होत मी चढायची सुरुवात करतो. सुरुवातीला त्या

फांद्या फारच घट्ट असल्यामुळे हे काम कठीण वाटतं; पण जसाजसा मी उंचावर जातो, जास्त चपळ होतो आणि मग वर चढत असताना आडवे येणारे अडथळे ओलांडून बाजूला जायला जास्त सोपं होत जातं. मी इतक्या पुरेशा उंचीवर जातो, की मला पानांतून त्या घराच्या छपरावर पाहता येतं, तेव्हा ते मला निळ्या पाण्याची क्षितिजावर वाफ होताना ते दुधासारख्या पांढऱ्या आकाशात जाताना दिसतं. मी थांबतो. माझा हात एका फांदीभोवती गुंडाळतो. माझी बोटं त्यावर फिरवतो आणि माझ्या तळहाताला त्या बीचचे विलक्षण मऊ दाणे जाणवतात. त्या फांदीच्या टोकाला एक वाऱ्याची हलकी झुळूक त्या पानांना कुजबुजायला लावते.

ते झाड भक्कम आहे. ते वाढतंय; पण त्यात बदल नाही. ते ऋतूमानाप्रमाणे जगतंय. ते मूलतत्त्वांना साद देतंय. ते अनेक जीवांचा आधार आहे, अगदी पक्षी आणि ज्या कीटकांवर ते पक्षी ताव मारतायत त्या सर्वांचा. इथे उभं राहून त्या दयाळू झाडानं वरच्या आकाशापासून माझ्यावर धरलेल्या सावलीनं मला एक खोलवर शांतपणा जाणवतो. मी हळू श्वासोच्छ्वास घेतो. ते झाड धरतो आणि डोळे बंद करतो.

माझ्या आयुष्यानं इतकी वळणं, बदल अनुभवलेत; परंतु माझं प्रेम आहे झाडांवर आणि त्यासाठी मी बऱ्याच वर्षांपूर्वी प्रशिक्षण घेतलंय आणि हे उघड आहे. मला हे समजत नाही, की हे मला आधी का नाही जाणवलं, की झाडं हीच माझा भविष्यकाळ आहेत. माझा प्रवास मला कुठे घेऊन जाईल किंवा माझ्यासमोर काय ताट वाढून ठेवलंय, हे मला माहीत नाही; परंतु झाडांच्या फांदीवर उभं राहून, त्याच्या पानांच्या सावलीत मला पहिल्यांदा माझ्या पुढच्या मार्गाची शक्यता दिसते.

■

उपसंहार

त्या एलिफंट आणि कॅसलमधील डिटॉक्स सेंटरमध्ये मी शेवटचं क्रॅकचं इंजेक्शन घेतलं तेव्हापासून, म्हणजे २१ जुलै २०००पासून मी ड्रिंक किंवा ड्रग घेतलेलं नाही. प्रत्येक दिवस ही तात्पुरती सुटका आहे. मी अजूनही तो पायऱ्यांचा कार्यक्रम चालू ठेवलाय आणि त्यामुळे मी व्यसनमुक्त राहतो आणि माझी वाढही होते. कधीतरी मला त्या उन्मादाचं बोलावणं येतं. कुठूनही ते रॅटेल हळूच येतं. मी कधी कधी ड्रग्ज घेतल्याची स्वप्नं पाहतो. मला घाम फुटतो, कारण मला वाटतं, की मला रात्री पुन्हा सवय लागलीय. माझी सवय पुन्हा उलटलीय.

एक दिवस, एक वेळ.

जेव्हा झाडं पुन्हा माझ्या आयुष्यात आली. मी सुरुवातीला झाडांच्या दुसऱ्या सर्जनसाठी काम करायचो. ड्रिंक किंवा ड्रग्ज आता मला मागे खेचत नसल्यामुळे माझ्या लक्षात आलं, की मी माझ्या बॉसपेक्षाही जास्त चांगलं काम करतो आणि मग मला त्यांच्याबरोबर काम करण्याचा इतका कंटाळा आला, की मी पुन्हा इमारतीच्या कामावर गेलो.

मग मला व्हिकी भेटली. ती तरुण, सुंदर आणि विश्वासू होती. आमचं एकमेकांवर प्रेम बसलं. जरी तिचं आयुष्य, घर, तिचे आई-वडील या सर्व गोष्टींमुळे माझ्या आयुष्यापेक्षा जास्त संरक्षित होतं. तरी आमचे दोघांचे सूर आतवर जुळले. आमचं प्रेम आम्हाला मजल दरमजल करत घेऊन गेलं आणि आम्ही एकमेकांची चांगलीच काळजी घेऊ लागलो. माझ्याबाबतीत म्हणाल, तर हे माझं पहिलंच नातं जुळल्यासारखं वाटलं, कारण या वेळेपर्यंत जरी माझ्या आयुष्यात अनेक स्त्रिया आल्या, तरी तिथे एकच नातं होतं... ड्रग्जचं.

व्हिकी प्रत्येक सकाळी उठून कामावर जायची मी ते पाहायचो. मी आठवड्यातून रोज दोन दिवस इमारतीच्या कामावर जायचो. इतर वेळ मी समुद्रकिनाऱ्यावर काढायचो.

"मला वाटतं, की तू म्हणाला होतास, की तू झाडांचा सर्जन आहेस असं."

व्हिकी माझ्या स्वस्त कपड्यांकडे, माझ्या काम करत नसलेल्या मोबाईल फोनकडे आणि माझ्या मिटमिट करणाऱ्या टीव्हीकडे पाहत म्हणाली, "तू माझ्याशी खोटं बोललास."

"नाही, मी ते सर्व प्रशिक्षण घेतलंय."

"मग ते तू का करत नाहीस?'

"कारण, जेव्हा मी दुसऱ्यांकडे त्यांचं काम केलं तेव्हा त्यांनीच सर्व फायदा घेतला."

व्हिकीनं खांदे उडविले. "मग स्वत:साठी काम करण्याचं काय?" मी काही काळ दु:खातच काढला. क्विन्टन हाऊसमधील माझी काउन्सेलर सोनियानं मला निर्णयाप्रत पोहोचण्याचा आत्मविश्वास दिला आणि अशा तऱ्हेनं मी माझा स्वत:चा व्यवसाय सुरू केला. त्या ट्रस्टला मी करीन म्हणून सांगितलं होतं तसा. त्यांना मी करीन अशी खात्री होती. मी ते केलं आणि रोनी बिल्डर यानं मला मार्गदर्शनाचा कंदील दाखवला.

मला कित्येक गोष्टींचं व्यसन लागलेलं होतं आणि काही काळ मला कामाचं व्यसन लागलं. मी एक व्यापारी बनलो, हो, मी. कामाची किंमत ठरवणं, ट्रक्स विकत घेणं, मुलं कामावर ठेवणं, आमच्या कामाची किमतीसह यादी पाठवणं आणि यासाठी लिखाणाचं काम करणं. ते काउन्सिल, ते कायदे, जाहिराती... आणि सर्वांत महत्त्वाचं, म्हणजे मी बऱ्या होणाऱ्या व्यसनी लोकांना आणि पूर्वीच्या गुन्हेगारांना काम आणि प्रशिक्षण देण्याचं ठरवलं. मी बरा होण्याच्या काळात जशी इतरांनी मला मदत केली होती, तशी मदत मी त्यांना देण्याचा प्रयत्न करायचं ठरवलं. मी बरेच परिश्रम केले आणि माझी धंद्यात चलती सुरू झाली आणि पत वाढली.

या सर्व वेळेत मी जगायचं कसं, ते शिकत होतो; परंतु एका प्रकारे व्यसनी लोकांना नाती ही फार कठीण वाटतात आणि मला तर बहुधा इतरांपेक्षा आणखी पुढे जायचं होतं, कारण माझ्या भूतकाळात चांगलं असं काही नव्हतं. शेवटी व्हिकी आणि मी या सर्व अडचणींवर मात करू शकलो नाही. आमच्या या नात्यामुळे आम्ही प्रत्येक जण आपापल्या मार्गानं पुढे जात होतो आणि त्यामुळे आमच्या प्रगतीनं जिथे आम्ही जायला पाहिजे होतो, तिथे आम्हाला नेऊन सोडलं होतं. दुर्दैवानं एकमेकांबरोबर नव्हे; परंतु आमची मैत्री अजूनही टिकून आहे.

मला वाटतं, की मी जीवनाच्या एका टोकाला पोहोचलो होतो आणि परत आलो होतो. जर मी एव्हरेस्ट चढून जिवंत परत आलो असतो, तर माझ्या स्वागतासाठी पार्टी दिली गेली असती; परंतु अर्थात हिरोच्या विरुद्ध असल्यामुळे मी त्याला पात्र नाही आणि माझी अपेक्षाही नाही; परंतु एका तऱ्हेनं माझ्या

स्वागतासाठी पार्टी दिली गेली. माझा व्यवसाय जोरात होता आणि माझी पत चांगली होती, तेव्हा २००५ मध्ये मला प्रिन्स ट्रस्टकडून तरुण यशस्वी माणसाचं त्या वर्षीचं बक्षीस देण्यात आलं. त्या वर्षीनंतर मी मॉलमधील क्लॅरेन्स हाऊसला गेलो. मी त्याच्या त्या उंच विटांच्या भिंतीवर उभा राहिलो आणि मागच्या वेळी मी इथे घुटमळत असल्याचं मला आठवलं. तेव्हा माझ्याकडे पैसा नव्हता, घर नव्हतं, मी निराश होतो आणि त्या प्लेन झाडाकडे पाहत होतो. मग मी एक दीर्घ श्वास घेतला आणि त्या दरवाज्यातून आमंत्रित पाहुणा म्हणून आत गेलो. आतमध्ये मला एक माणूस भेटला, ज्यानं मला एवढी मदत केली होती, की ती त्याच्या आकलनापलीकडची होती : प्रिन्स चार्लस.

त्या दिवशी झालेल्या मुलाखतीचा परिणाम, म्हणजे डेली मिररच 'प्राईड ऑफ ब्रिटन' हे बक्षीस एका भव्यदिव्य समारंभात मला दिलं गेलं. त्या ट्रस्टचा रॉबकोप मला एका संध्याकाळी घेऊन गेला. ज्या संध्याकाळी प्रिन्स चार्लस यांनी माझी कथा कॅमेऱ्यासमोर सांगितली आणि व्हिक्टोरिया बेकहॅम यांनी थाळीचा वाजवायचा तास मला बक्षीस दिला. सीन इव्हान्स ज्यानं माझं आयुष्य वाचवलं, तो तिथे होता आणि असेच माझे आणखी काही जुने मित्र मला जास्त अभिमान वाटू नये, म्हणून होते. त्यानंतर मी माझं आयुष्य जास्त चांगल्या तऱ्हेनं सांभाळलंय. त्यातील भावनिक बाजू पुन्हा नीट केलीये आणि कसं जगायचं ते आणि स्वत:ची कशी काळजी घ्यायची ते शिकलोय. मी अजूनही धंदा चालवतो; परंतु तो वाढवायचा की कमी करायचा, हे माझ्या कामावर, नोकरवर्गावर, माझ्या इतर स्वारस्यांवर आणि अंगावर घेतलेल्या जबाबदाऱ्या यावरून ठरवतो. माझ्याकडे कामाची किती उलाढाल होते, याच्याशी यशस्वी होण्याचा काही संबंध नाही; पण ज्या तऱ्हेनं तुम्ही राहता त्यावर हे यश अवलंबून असतं, हे मी शिकलोय. माझं स्वप्न आता आर्थिक यशावर केंद्रित करण्याचं नाही; परंतु ती एक सामाजिक संस्था बनावी आणि ज्यामुळे लोकांना मदत होईल, अशी काही कामं त्यात करावी, याकडे माझं सर्व लक्ष आहे, हल्ली मी बराच बाहेर असतो. ज्यावर माझा विश्वास आहे, त्याबद्दल मी लोकांशी बोलतो आणि वरच्या पातळीवरचे लोक ऐकतात. मी त्यांना ड्रगचे व्यसनी आणि तरुण गुन्हेगार यांच्यासाठी प्रतिबंधात्मक धोरणं आणि सरकार यांना पुन्हा समाजात आणायला कशी मदत करू शकेल, याबद्दल सांगत आहे. पूर्वीचा गुन्हेगार असलेला मी, नॅशनल प्रोबेशन सर्व्हिसच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर आहे आणि मी प्रिन्सच्या ट्रस्टच्या देशभर राबवल्या जाणाऱ्या एका नव्या पद्धतीच्या शिकवण्याच्या प्रकल्पावर काम करत आहे. हे शिकवण्याचं काम तरुण गुन्हेगार असलेल्या संस्थेमध्ये दिलं जातं. माझं आयुष्य आता पुढे चाललंय आणि माझा व्यवसायही चालू आहे. मला बाहेर जाऊन झाडांवर चढता यावं, यासाठी काही दिवस मी

आठवणीनं रिकामे ठेवतो.

रोझी आणि मी पुन्हा आमचं नातं जुळवण्याचा प्रयत्न केला; पण आमच्या लक्षात आलं, की ड्रग्जशिवाय आमच्यात काहीच नातं नव्हतं. तीही आता व्यसनातून मुक्त झालेय आणि माझ्याप्रमाणे आपलं आयुष्य सुधारत आहे. आम्ही दोघं आमच्यासाठी आणि मुलांसाठी एक नितळ मैत्री ठेवायचा प्रयत्न करतो. माझ्याबाबत सर्वांत उत्तम घडलेली गोष्ट, म्हणजे माझी मुलं, हे माझ्या विश्वाचा भाग आहेत आणि जेवढं शक्य होईल, तेवढ्या वेळा मी त्यांना भेटतो. पूर्वी मी ज्याप्रकारचा बाप होतो, त्याबद्दलची भरपाई करण्याचा मी प्रयत्न करतो. जेव्हा मी माझ्या बापाजवळचं माझं नातं आणि त्याचं त्याच्या बापाजवळचं नातं याचा विचार करतो, तेव्हा लक्षात येतं, की आमची बाजू जरा कमकुवत आहे; परंतु मी आणि माझी मुलं यावर मात करतोय. ते चक्र इथेच थांबतंय. मी इतका नशिबवान आहे, की अशी समजूतदार, धडधाकट आणि हुशार अशी प्रेमळ मुलं मला आहेत. त्यांनी माझं जीवन उजळवून टाकलं.

या दिवसांत मी माझ्या ममाच्याही संपर्कात आहे. आम्ही आमचं नातं पुन्हा नीट करतोय. निरोगी सीमांवर मी तिला माझी ममा मानायला शिकतोय. तिनं डॅडींबरोबर त्या काही वर्षांत किती सोसलं, याची मी आता जास्त चांगल्या तऱ्हेनं कल्पना करू शकतो. मला फक्त हे कधीही समजणार नाही, की तिचा वाईट तऱ्हेनं वापर केल्या जाणाऱ्या या लग्नात ती अडकून का पडली होती? तिला आता सुख मिळालंय. तिनं एका चांगल्या माणसाशी लग्न केलंय.

माझे माझा बाप किंवा त्याच्या कुटुंबीयांशी सबंध नाहीत. माझ्याबाबत जे काही घडलं, त्याबद्दल मी त्यांना दोष देत नाही, अशा तऱ्हेनं मी विचार करणं योग्य नाही. त्याशिवाय त्यांची त्यांच्या राक्षसांबरोबर लढाई चाललेलीच असेल.

मी अमेरिकेत असलेल्या माझ्या भावाशी संपर्क साधून आहे आणि जेव्हा शक्य होईल, तेव्हा माझ्या बहिणींशी. ज्या तऱ्हेनं मी वागलो, त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न करतो. जिला आपल्या बापाच्या नातेसंबंधाबद्दल जास्त सोसावं लागलं आणि त्या वेळी मी जे समजू शकलो नव्हतो, त्या माझ्या लहान बहिणीला, बेथनीला मी माझ्या माहितीतील एक अत्यंत कणखर आणि सर्वांत सुंदर स्त्री मानतो. तिचं एका चांगल्या माणसाशी लग्न झालंय आणि तिला तीन मुलं आहेत.

कधी कधी माझ्या कानांवर आमच्या किड्डरमिन्स्टरमधील लोकांची बातमी येते. व्हॅनिसानं लग्न केलंय, मुलंही आहेत आणि अजूनही ती सरकारी जागेत राहते. डॅनियल हा सशस्त्र चोरी केल्याबद्दल बारा वर्षांचा तुरुंगवास भोगतोय.

जेव्हा मी जॉडीबद्दल शेवटचं ऐकलं, ती पेनरीथमध्ये निर्दोष आयुष्य जगत आहे. माझे पूर्वीचे क्लबमधील मित्र आता सन्माननीय उद्योगपती बनले आहेत. काही

संगीताच्या विश्वात काम करतात आणि मार्क डाऊन्सप्रमाणे काही मला माझ्या व्यवसायात मदत करतात आणि सदैव संपर्कात राहतात. तो डीआयवाय जमाव अजूनही पार्ट्या करतो आणि गोंधळ घालतो. माझ्याबरोबर रॅव्हन्स कोर्टला असलेला कॉलीन, ज्यानं मला खूप मदत केली, तो व्यसनी, तेथील उपचार संपल्यावर पुन्हा जोरात ड्रग्ज घेऊ लागलाय. ज्यांनी समुद्रकिनाऱ्यावर त्या मुलीबरोबर मी केलेल्या प्रकारानंतर माझ्याविरुद्ध मत दिलं होतं, ते माझे क्विन्टन हाऊसमधील बरोबरीचे लोक, त्यांनाही पुन्हा ड्रगची सवय लागलेय आणि तिथे बरेच मृत्यूही झाले आहेत. मी रस्त्यावर असताना मला किती पटकन लागण होण्याची शक्यता होती, याची मला जाणीव नव्हती; परंतु मला कळलेल्या त्या अनेक निस्तब्ध मृत्यूंनंतर मला ते आता कळतंय. दरवाज्यात, गल्लीत, एकाकी जागेत. नुसते रस्त्यावरील लोकांच्यातच मृत्यू झालेले नाहीत, तर बरे होण्याच्या या कालखंडात जे माझे मित्र झाले होते, त्यांच्यातही मृत्यू झालेत. मग मी स्वत:ला विचारतो, की मी कसा वाचलो आणि मग मी अशा निर्णयाप्रत येतो, की माझ्या आयुष्यात एक वरची शक्ती काम करत आहे.

मला सापडलेल्या वस्तूंच्या संग्रहाबद्दल बोलायचं, तर त्या सर्व फालतू गोष्टी आहेत; परंतु अजूनही माझ्याकडे ते रंगाचे ब्रश आहेत, तो चमचा, ती वही आणि इतर तुकडे आहेत आणि जेव्हा मी त्या फ्लॅटमधून बाहेर पडलो आणि माझं स्वत:चं घर घेतलं, तो तुटका आर्ट बॉक्स माझ्याबरोबर आला. जेव्हा मी माझ्या स्वयंपाकघराकडे, फर्निचरकडे, संगीताच्या संग्रहाकडे आणि माझ्या ऑफीसकडे पाहतो त्या वेळी मला आठवतं, की थोड्याच काळापूर्वी माझ्या मालकीची फक्त एक वस्तू होती ती म्हणजे इतरांनी कचऱ्यात टाकलेल्या फालतू गोष्टींचा संग्रह.

मी डेव्ह आणि त्याचा कुत्रा बुट्स यांना रस्ता सोडल्यावर एकदा भेटलो. मी जेव्हा माझी मैत्रीण व्हिकीला भेटायला जात होतो, त्या वेळी मी पुन्हा पिकॅडलीच्या भुयारी मार्गातून चालत जाण्याचं धाडस केलं. त्या जिन्याच्या तळाशी मानवतेचं एक बोचकं होतं आणि त्याचे पाय त्या ब्लँकेटमधून बाहेर आलेले होते. त्याच्या बाजूला चार चमचे होते.

मी म्हणालो, "अरे! जागा हो! अरे!"

आणि डेव्ह पिचक्या डोळ्यांनी पाहत उठून बसला आणि बुट्सही.

"मार्क! मार्क! तू चुत्या हरामी." तो तोंड लांब विचकून हसत म्हणाला. "तू साला,"

ते प्रेमाचे शब्द होते, म्हणून मी त्याच्या बाजूला बसलो.

"हे बघ मित्रा," गेल्या वेळी त्यानं मला पाहिलं, तेव्हा तो माझ्यावर किती चिडला होता, ते आठवलं. मी सुरुवात केली. "त्या जपानी मुलीबद्दल मला

किती वाईट वाटलं, ते तुला माहीत नाही. मी जे काही केलं, त्यामुळे मला खूप त्रास झाला आणि..."

डेव्ह मला अडवत म्हणाला, "मी तिच्याशी लग्न केलं."

मी थांबलो.

"कोण?"

"ती!"

"ती जपानी मुलगी?" कदाचित मी बरोबर ऐकलं नसावं. ती जिवंत होती? डेव्हनं तिच्याशी लग्न केलं होतं? परंतु आता माझं हृदय खाली-वर होत होतं, कारण शक्यतेची चुणूक मला जाणवली होती.

डेव्ह म्हणाला, "तू दिलेलं ड्रग तिनं घेतलं नाही. ते मी घेतलं."

तिनं ते घेतले नाहीत. तिनं ते क्रॅक आणि हेरॉईन आपल्या दंडात भोसकून ती बेकर स्ट्रीटवरील हॉटेलच्या खोलीत एकटी मेली नव्हती. माझे डोळे अश्रूंनी भरल्यामुळे चुरचुरले. सुटकेचे अश्रू.

"ती मेली नाही? च्यायला मेली नाही!"

डेव्हनं मान हलवली. माझा चेहरा तापला आणि अश्रूंमुळे ओला झाला होता. मी माझा हात त्याच्याभोवती टाकला आणि त्यानं आपलं डोकं माझ्या डोक्याशी आणलं. मी त्याला जवळ धरलं. त्याच्याकडे उवा असतील, याची मी पर्वा केली नाही. मी तिला मारलं नाही, याचीच एक जाणीव मला होती.

"काही दिवसांनी मला शोधत ती आली, मग त्या हॉटेलवर परत गेली आणि तिथे राहिली आणि नंतर.. मी तिच्याशी लग्न केलं."

मी अभिनंदन करायला हवं होतं; पण मी अजूनही बोलू शकत नव्हतो.

"आम्ही इथे लंडनमध्ये राहिलो. तिनं मला ड्रग दिलं आणि मी तिच्या पासपोर्टसंबंधी मदत केली. काही दिवस मी एकटाच आहे, कारण ती माझ्यापुढे जपानला गेलीय. उद्या मीही जाणार आहे."

"उद्या?"

"होय, तिनं मला विमानतळावर जाण्यासाठी टॅक्सीची व्यवस्था केली आहे. नऊ वाजता टॅक्सी मला घेऊन जाईल."

मी ती उंच टाचेच्या चपला घालणारी आणि पिवळा रेनकोट घालणारी जपानी मुलगी या डेव्हसारख्या जंगली माणसाबरोबर असायची ही कल्पना केली. डेव्ह तसा हळवा, दयाळू आणि चांगला होता; पण तो रस्त्यावर राहत होता आणि तो तसा रानटीच होता. तिला वाटत असेल, की तिनं त्याला माणसाळवलंय; परंतु तो बहुधा शक्य असेल, तेव्हा इथे चोरून येत असावा.

मी त्या ट्यूब स्टेशनमध्ये जमिनीवर बसलो. प्रवासी त्याच्यापुढे पैसे टाकत

होते आणि मी माझे डोळे पुसत होतो. माझ्या मनात विचार आला, की एक वरची शक्ती काम करत असावी, कारण जर मला यायला एक दिवस उशीर झाला असता, तर डेव्ह मला भेटला नसता आणि त्या स्त्रीचा मृत्यू माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला सदैव टोचत राहिला असता.

डेव्ह माझ्याकडे वळला आणि म्हणाला, "मला एक बॅग हवीय. तुझ्याकडे काही आहे का?"

मी माझं पैशाचं पाकीट बाहेर काढलं, ते उघडलं; परंतु माझ्यातील व्यसनी त्या बॅगेसाठी डेव्हला काही दहा पौंड देऊ शकला नाही. जर मी ते सुख अनुभवू शकलो नाही, तर मी ते त्याला का द्यावं? "मी तुला सहा पौंड देतो." मी म्हणालो.

काही रस्त्यावरची पोरं तिथे आली – हाडकी, घाणेरडी लहान मुलं. त्यांनी मला मी वेस्ट एन्डला राहत होतो, तेव्हाची माझी आठवण करून दिली.

"हा माझा मित्र मार्क," डेव्ह ओरडला, "तो आपल्यापैकी एक आहे."

त्या मुलांना आश्चर्य वाटलं; परंतु ते बुट्सच्या बाजूला बसले. मला त्यांना माझ्या प्रवासाबद्दल सांगायला आवडलं असतं; पण ते कसं सांगावं, ते मला समजेना. मी त्यांना समजेल एवढं इतकंच सांगू शकलो, की बदल शक्य आहे, काहीही शक्य आहे. त्यांच्या तोंडावरून घाम गळत होता आणि ते त्यांच्या स्पेशल ब्रूच्या कॅनचा वास घेत होते आणि तो गच्च पकडत होते.

मी म्हणालो, "मला वाटलं होतं, की माझं व्यसन सुटणार नाही. कोणाचं व्यसन सुटलंय, असं मला माहीत नाही; परंतु दुसरा मार्ग आहे. मी उपचार केले आणि आता स्वत:ला सावरलंय."

"होय साहेब," ते म्हणाले.

मी डेव्हकडे पाहिलं. तो अजून झोपला नव्हता; पण त्याच्या पापण्या मिटू लागल्या होत्या

"मी म्हणतोय." मी म्हणालो, "माझ्यासाठी सर्वच बदललंय. मी तुमच्यासारखाच रस्त्यावर राहत होतो आणि आता मी निर्व्यसनी झालोय आणि वेगळ्या तऱ्हेनं जगतोय. मी हा व्यवसाय सुरू करतोय..."

"झक्कास," ते म्हणाले. "छान गोष्ट आहे हं. तू खरंच मोठं काम केलंयस साहेबा."

मी त्यांच्याकडे पाहिलं. त्यांचे डोळे मिटलेले होते आणि ते त्यांच्या जगात गेले होते. फक्त बुट्स तेवढा जागा होता.

"ठीक आहे, मित्रा?" मी त्याला म्हणालो.

त्यानं त्याची शेपूट हलवली.

■

अखेर...

कदाचित हे पुस्तक तुम्ही वाचलं असेल आणि तुमच्या-माझ्यातील फरक तुम्ही ओळखला नसेल, फक्त काही साम्य ओळखलं असेल. तर मग माझा तुम्हाला हा वैयक्तिक निरोप आहे.

जर का ड्रिंक किंवा ड्रग यांचा परिणाम होणं थांबलं असेल आणि अनंत प्रयत्नांनंतर तुम्ही अशा जागी आहात, जिथे तुम्हाला भविष्य नाही किंवा प्रयोजनही नाही आणि जर का तुम्हाला फार निराशा वाटली असेल, तर मग तुम्हाला देणगी मिळालीय. मला वाटतं, की आपण जेव्हा निराशेच्या गर्तेत असतो, तेव्हाच पुढे जाऊ शकतो. अर्थात, ज्या वेळी मी खोल जळात होतो, तेव्हा हे मला माहीत नव्हतं, पण आता ते मला माहीत आहे.

मी अशा टोकावर पोहोचलो, जिथे माझ्यापुढे दोन विकल्प होते. मदत घ्यायची आणि जे माझ्या आधी यातून गेलेत, त्यांचं ऐकायचं किंवा मरायचं. हे अगदी स्पष्ट वाटत असेल; परंतु ते मला त्या वेळी तरी तसं वाटलं नव्हतं. मला योग्य निवड करायला फार वेळ लागला; परंतु मी तो केला. आता मला सगळ्यात मोठी भेट मिळालेय, दुसऱ्यांना मदत करायची, जशी मला केली गेली तशी. कोणत्याही ड्रिंक किंवा ड्रगनं मला इतकं चांगलं कधी वाटलं नव्हतं. यात माझ्या समस्येवर उपाय आहे. मला आशा वाटते, की तुम्ही योग्य निवड कराल आणि तुम्हालाही उत्तर मिळेल.

मला अनेक लोकांनी तसंच विविध संस्थांनी अनमोल मदत केली .

वाचलेच पाहिजे असे काही...

तुरूंगातील कोठडीत राहणारा मुलगा, जगण्यासाठी शहरभर स्वत:च्या दोन पायांची चाकं करत फिरणाऱ्या 'दिएगो'ची सत्यकथा!



मार्क जॉन्सनच्या बापाच्या डाव्या हातावर LOVE हा शब्द गोंदवलेला होता; पण त्यामुळे मुलांना बसणारा मार कधी थांबला नाही. लहान वयातच मार्कला वाईट सवयी लागल्या. शाळेत त्याचं बस्तान बसलंच नाही. सहा वर्षांचा असताना तो चोऱ्या करू लागला आणि आठव्या वर्षी दारू पिऊ लागला. अकराव्या वर्षी त्यानं हेरॉईनची चव चाखली. एक भावनाशील बुद्धिमान मुलगा, पण त्याला योग्य वळण लागलं नाही.
हेरॉईन आणि क्रॅकचं सेवन, लंडनच्या रस्त्यावर बेघर राहणं, त्याला ठार मारण्यासाठी टपलेले गुंड अशा परिस्थितीत कुणीही – स्वत: मार्कही – आपण जिवंत राहू, अशी आशा करत नव्हता.

एवढं असून यातून बाहेर पडण्याची शक्ती त्याला मिळाली. आता तो आपला 'झाडांची शल्यचिकित्सा' हा व्यवसाय जोमाने चालवत आहे आणि इतर अशा जंकीजना नोकरीला ठेवून या मादक द्रव्य सेवनातून बाहेर पडण्यासाठी मदत करत आहे.
त्याची ही कथा तशी बरीच धक्कादायक, पण स्फूर्तिदायक आहे. स्वत:ला आणि आपल्यासारख्या इतरांना वाचविण्यासाठी एका माणसानं केलेल्या प्रयत्नांची ही हृदयद्रावक आणि वाचावीशी वाटणारी कथा.

अनुवादित कादंबरी
2009 - 1
₹250
ISBN 9788184980196
9 788184 980196
शा.या. (२००९/८६५)
Follow us
e-Book Available
9789353173746
www.mehtapublishinghouse.com
मेहता पब्लिशिंग हाऊस